# वेचक आणि वेधक

साप्ताहिक सकाळ कथा स्पर्धेतील निवडक कथा

सध्याच्या काळात वाङ्मयीन संस्कृतीचा प्रभाव क्षीण झालेला आहे. मराठी भाषेच्या दुरवस्थेविषयी बराच आरडाओरडा चालू आहे. एकूणच दैनंदिन जीवनव्यवहारात व सर्वच ज्ञानक्षेत्रांमध्ये इंग्रजीचे वर्चस्व वाढत चाललेले आहे. अशा परिस्थितीत, हे कथालेखक कोणत्या भौगोलिक परिसरातून आलेले आहेत, हे पाहणेही उद्बोधक ठरेल. या सर्व कथांचे रचनाबंध सफाईदारपणे घडवलेले आहेत. कथांचे विषय सामान्य वाचकांना आणि अभ्यासकांना अंतर्मुख तर करतीलच, परंतु त्यांच्या एकत्रित वाचनाने सामाजिक अभिरुचीचा कलही स्पष्ट होईल.

राजकीय इच्छाशक्ती, विविध समाजघटकांचे गुंतलेले हितसंबंध, लाठर / लवचीक तात्त्विक भूमिका आणि त्यांना पोषक वा मारक ठरणारे सामाजिक वातावरण यामुळे समस्या जटिल व किचकट होत चालल्या आहेत. वास्तव व कल्पित यांच्या मिलाफातून या समस्यांचे प्रखर भान वाचकाला देण्याचे आव्हान लेखकांसमोर आहे. येत्या काळात हे आव्हान ते समर्थपणे पेलतील, इतपत आश्वासकता या निवडक कथा निर्माण करतात.

या कथाकारांमुळे मराठी कथेची परंपरा समृद्ध होईल, जोमाने बहरेल हे तर खरेच आहे; पण त्यामुळे वाचकांची समजूत प्रगल्भ होईल हे याचे फलित अधिक 'मूल्यवान' आहे.


**डॉ. रेखा इनामदार-साने**
ज्येष्ठ समीक्षक,
मराठी विभागप्रमुख, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, पुणे

सकाळ प्रकाशन

ISBN 978-93-80571-36-2
9 789380 571362

वेचक आणि वेधक

साप्ताहिक सकाळ कथा स्पर्धेतील निवडक कथा



सकाळ प्रकाशन
पुस्तके महाराष्ट्रातील सर्व विक्रेत्यांकडे व सकाळ पेपर्सच्या कार्यालयात उपलब्ध.
संपर्क-०२०-२४४०५६७८ / ८८८८८४९०५०
सकाळ पेपर्स प्रा. लि., ५९५, बुधवार पेठ, पुणे २




डॉ. सीमा सोनीस
पृष्ठसंख्या ११८ ; ₹१२५




डॉ. नितीन उनकुले
पृष्ठसंख्या ८० ; ₹१००




डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या २२४ ; ₹६७०




भाग १ / २ : डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या २२४ / २०८ ; ₹१२५/-




डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या २१६ ; ₹२७५




संपादक: डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या १८६ ; ₹३००




डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या १२६ ; ₹९०




डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या ९२ ; ₹१५०




डॉ. श्री बालाजी तांबे
पृष्ठसंख्या २०७ ; ₹१२५

अक्षरधारा बुक गॅलरी
१३०२, सणस प्लाझा, बाजीराव रस्ता, आचार्य अत्रे सभागृहासमोर, पुणे-२
संपर्क-०२०-२४४४१००१, ९८२२४ ७१००१ info@akshardhara.com
www.akshardhara.com

# वेचक आणि वेधक

## साप्ताहिक सकाळ कथा स्पर्धेतील निवडक कथा

**प्रस्तावना**

डॉ. रेखा इनामदार-साने

सकाळ प्रकाशन

सकाळ प्रकाशन

वेचक आणि वेधक

© सकाळ पेपर्स प्रा. लि., २०१३

**प्रथमावृत्ती**
२ ऑक्टोबर, २०१३

**विशेष सहकार्य**
सकाळ संदर्भ ग्रंथालय, पुणे

**प्रकाशक व मुद्रक**
सकाळ पेपर्स प्रा. लि.
५९५, बुधवार पेठ, पुणे ४११००२

**मुखपृष्ठ**
राजू देशपांडे

**मांडणी, सजावट**
सुनील पाटील

**मुद्रणस्थळ**
सकाळ पेपर्स लि.,
डी-४, एम.आय.डी.सी., शिरोली,
कोल्हापूर-४१६ १२२

**किंमत**
₹२००.००

**ISBN** 978-93-80571-36-2

**अधिक माहितीकरिता**
पुस्तक प्रकाशन विभाग, सकाळ पेपर्स प्रा. लि.
८८८८८ ४९०५० / ०२०-२४४०५६७८
sakalprakashan@esakal.com

©
All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means, electronically or mechanically, including photocopying, recording, broadcasting, podcasting of any information storage or retrival system without prior permission in writing from the writer or in accordance with the provisions of the copy right act (1956) (as amended). Any person who does any unauthorised act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रस्तावना | डॉ. रेखा इनामदार-साने | ५ |
| १. | १९९० | मोर्चा | मनोहर शार्दूल विभांडिक | २१ |
| २. | १९९२ | सूर | मेधा टेंगशे | ३१ |
| ३. | १९९४ | कालनिर्णय | दीपक पारखी | ४२ |
| ४. | १९९५ | काळोख | वृंदा दिवाण | ६४ |
| ५. | १९९६ | नातं | मोनिका गजेंद्रगडकर | ८७ |
| ६. | १९९७ | हॅल्युसिनेशन्स | पद्मनाभ केसकर | १०३ |
| ७. | १९९८ | गाफील | रोहिणी भट-सहानी | १२० |
| ८. | २००० | कॅलिडोस्कोप | अर्चना वर्टीकर | १२७ |
| ९. | २००१ | वारस | नारायण महाले | १३६ |
| १०. | २००२ | शरम गयी तो | संजीव ठकार | १५६ |
| ११. | २००२ | रोबोताशाची शाळा | सुरेशचंद्र वाघ | १७९ |
| १२. | २००३ | झेन | डॉ. एन. सी. एडल | १९१ |
| १३. | २००४ | झलाटा एंडियन घाली | पुरुषोत्तम रामदासी | २०१ |
| १४. | २००५ | माऊलीचा मळा | दिलीप नाईक-निंबाळकर | २१८ |
| १५. | २००५ | एक्झिट | प्रदीप वैद्य | २२७ |
| १६. | २००६ | कठपुतळी | डॉ. तृप्ती बोरूळकर | २३३ |
| १७. | २००७ | परवड | पोपट कासुर्डे | २३८ |
| १८. | २००८ | दप्तर | रायभान दवंगे | २४९ |
| १९. | २००८ | एम्पथी | संतोष शिंत्रे | २५८ |
| २०. | २०१० | बदल | गौतम पंगू | २६८ |

# वेचक आणि वेधक

रूढ अर्थाने ज्याला आकर्षक आणि वलयांकित असे म्हणता येणार नाही, अशा प्रकारचा उपक्रम एखाद्या नियतकालिकाने सलग पंचवीसहून अधिक वर्षे यशस्वीपणे राबवणे ही घटना केवळ उल्लेखनीय नव्हे तर, झपाट्याने बदलणाऱ्या जगात जेथे मागणी-पुरवठ्याचे गणित सतत जमवावे लागते, त्याप्रमाणे उत्पादनाचे प्रमाणच नव्हे तर साचाही विक्रीयोग्य करण्यासाठी धडपडावे लागते, अशा वातावरणात अ-पूर्व म्हटली पाहिजे. प्रतिवर्षी 'साप्ताहिक सकाळ'तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या कथास्पर्धेतून याचे पुरेपूर प्रत्यंतर येते. 'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीतील जोर जरी आता ओसरलेला असला आणि पाऊस पूर्वीइतका कोसळत नसला तरी कथांचा वर्षाव, या स्पर्धेला देशातूनच नव्हे तर विदेशांतूनही मिळणारा उदंड प्रतिसाद अजिबात कमी झाला नाही. वस्तुत: अनेक उपक्रम सवयीचे झाले की त्यातील नावीन्य कमी होते. आयोजकांचा, स्पर्धकांचा व परीक्षकांचाही उत्साह मावळत जातो. हळूहळू त्यांना नित्य नेमाने केल्या जाणाऱ्या कर्मकांडांची कळा प्राप्त होते.

परंतु ही स्पर्धा याबाबतीत सन्माननीय अपवाद ठरली. म्हणूनच कदाचित कथांची संख्या हजाराच्या वर असली आणि ठरावीक कालावधीत त्यांचे वाचन व परीक्षण करणे कष्टप्रद, जिकिरीचे असले, तरी सुरुवातीपासून आतापर्यंत ज्येष्ठ समीक्षक डॉ. रा. ग. जाधव, शंकर सारडा, अविनाश सप्रे, रेखा इनामदार-साने व नामवंत कथा-कादंबरीकार राजन खान यांनी ही जबाबदारी मन:पूर्वकतेने, आत्मीयतेने व आनंदाने पार पाडली. त्याचे प्रतिबिंब त्यांच्या या निमित्ताने लिहिलेल्या टिपणांमध्ये उमटलेले दिसते. कथांइतकीच ही टिपणेही अनेकांच्या अभ्यासाचा विषय ठरली. त्यातील अनुकूल-प्रतिकूल अभिप्रायांवर केवळ

लेखकांनीच नव्हे तर वाचकांनी उलट-सुलट प्रतिक्रिया, प्रत्यक्ष झालेल्या भेटीत किंवा पत्राद्वारे नोंदवल्या. 'साप्ताहिक सकाळ'च्या वर्धापनदिनाला पारितोषिकप्राप्त कथाकार तसेच परीक्षकही आपले मनोगत व्यक्त करीत. तेही लक्षपूर्वक ऐकले जाई. या विचारमंथनातूनच इतकी वर्षे निवडलेल्या कथांचा एक संग्रह प्रातिनिधिक रूपात प्रसिद्ध करावा अशी कल्पना संबंधितांनी मांडली. प्रस्तुत कथासंग्रह हे या कल्पनेचे फलित आहे. या सर्व वेचक व वेधक कथा ग्रंथरूपाने, संग्रहीत स्वरूपात आता आपल्यासमोर ठेवत असताना पुन:प्रत्ययाचा आनंद तर मनात आहेच, याखेरीज सामाजिक अभिरुचीचा अंदाजही त्यांच्या वाचनातून येतो. त्यामुळे साहित्याच्या अभ्यासकांना तसेच सर्वसामान्य वाचकांनाही वेचक व वेधक कथांचा हा संग्रह आवडेल, वाचनीय वाटेल यात शंका नाही.

सध्याच्या काळात वाङ्मयीन संस्कृतीचा प्रभाव क्षीण झालेला असताना, मराठी भाषेच्या दुरवस्थेविषयी बराच आरडाओरडा चालू असताना आणि एकूणच दैनंदिन जीवनव्यवहारात व सर्वच ज्ञानक्षेत्रांमध्ये इंग्रजीचे वर्चस्व वाढत चाललेले असताना, कथालेखक कोणत्या भौगोलिक परिसरातून आलेले आहेत, हे पाहणेही उद्बोधक ठरेल. न्यू जर्सी, बोस्टन, सॅन होजे, वॉशिंग्टन, बोस्टन (अमेरिका), सिडनी, मेलबोर्न (ऑस्ट्रेलिया) तसेच दुबई व बहारीन या मध्यपूर्वेतील देशांतून उत्साहाने कथा पाठवलेल्या आहेत. अहमदाबाद, बडोदा, बंगळूर, चेन्नई, कानपूर, देवास, इंदूर यांसारख्या अमराठी मुलखांतून तसेच पुणे, मुंबई (मुंबईतील विलेपार्ले, गिरगाव, दादर, घाटकोपर या उपनगरांपेक्षा डोंबिवली, कल्याण, नवी मुंबईतील वाशी, नेरूळ या उपनगरांतून व ठाणे जिल्ह्यातील पालघर मधून अधिक कथा आलेल्या आहेत. यावरून मराठी भाषकांचे केंद्र कसेकसे बदलत चालले आहे, याची कल्पना येते.) नाशिक, नगर, वर्धा, नागपूर, सांगली, कोल्हापूर यांसारख्या शहरी भागांतूनही स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळालेला दिसतो. याहून उल्लेखनीय गोष्ट म्हणजे गुंज बुद्रुक, ता. घनसावंगी, जि. जालना, केकत सिंदगी, ता. जळकोट, जि. लातूर, मसुरा मेढावाडी, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, चिकोळणा, वियेरानगर, बोगमळा, गोवा, महिमानगड, ता. माण, जि. सातारा, मु.पो. अंजनवती ता. धामणगाव, जि. अमरावती, पो. कुरतरी, सासष्टी, गोवा, मु.पो. गोंदी, ता. अंबड, जि. जालना, कागल, चिमूर, निमगाव, बेळेवाडी आणि मु.पो. घिसूर, ता. मिरज, जि. सांगली, मखमलाबाद, पांढरकवडा, पलूस अशा कमी वस्ती असलेल्या लहान गावांतूनही शहरांपेक्षा अधिक संख्येने कथा (त्यापैकी काही कथा मुद्रित करून घेतलेल्या आहेत. हेही लक्षणीय वाटते.) दाखल झालेल्या आहेत. याचा एक अर्थ असा होतो की तेथपर्यंत 'साप्ताहिक सकाळ' पोचत असावा. लोक तो नजरेखालून घालत असावेत. पुण्या-मुंबईपेक्षा पश्चिम महाराष्ट्रातून व कोकणातून (अनुक्रमे सांगली, सातारा, कऱ्हाड, इचलकरंजी, कोल्हापूर आणि रत्नागिरी, चिपळून, मालवण, सिंधुदुर्ग, कणकवली) आलेल्या कथांची संख्याही नोंद घेण्याजोगी आहे. उलट पुण्यातील कथांचे प्रमाण उत्तरोत्तर घटत गेलेले आहे. एके काळी आपले मराठीपण व वाङ्मयीन वातावरण अबाधित राखलेल्या या शहराचे रूप कालौघात कसे पालटले आहे, ते यावरून ध्यानात येते. तसेच गेल्या पन्नास वर्षांत सर्वदूर, दुर्गम भागातही शिक्षणाचा झालेला प्रसार, पुरुषांप्रमाणे स्त्रियांना आत्मविकासासाठी उपलब्ध झालेल्या संधी, नव्याने निर्माण झालेली कार्यक्षेत्रे आणि मुख्य म्हणजे आपल्याला जे वाटते, सलते, खुपते ते कल्पित पात्रांद्वारे कथारूपात साकार करण्याचा आत्मविश्वास यामुळे ही स्पर्धा लोकप्रिय ठरली. त्यामध्ये सहभागी होणाऱ्या लेखकांइतकेच प्रमाण लेखिकांचेही आहे.

स्वानुभवांच्या प्रकटीकरणाची अतीव इच्छा आणि 'कथा' या साहित्यप्रकाराचा मर्यादित आवाका, यामुळे समाजाच्या सर्व स्तरांतील, भिन्न-भिन्न जातिधर्मांच्या आबालवृद्धांनी कथा लिहिलेल्या आहेत. आपली कथा संपादकांना वेळेत पोचेल की नाही याबाबत साशंकता असल्याने ती ई-मेलद्वारा पाठवण्याची तत्परताही अगदी ग्रामीण भागात राहाणाऱ्यांनीदेखील दाखवली आहे, तर काहींनी एकाच कथेच्या दोन प्रती काढून पाठवल्या आहेत. विशेष म्हणजे बहुसंख्य लेखक औपचारिक अर्थाने भाषा वा साहित्यक्षेत्राशी संबंधित नाहीत. अभियांत्रिकी, वैद्यकीय, शिक्षण, विधी व कायदा, वित्त, लेखापरीक्षण, कृषी व जैवतंत्रज्ञान आणि करसल्ला इत्यादी क्षेत्रांत कार्यमग्न असणाऱ्यांनीही उत्साहाने कथालेखन केले आहे. या लेखकांमध्ये तरुणांचा व प्रौढांचाच नव्हे तर अगदी हात थरथरणाऱ्या, अक्षर विस्कटणाऱ्या, व्याधिग्रस्त व वयाने सत्तरीच्या वर असणाऱ्या वृद्धांचाही समावेश आहे. 'कथा' या साहित्यप्रकाराला असलेली अमाप लोकप्रियता व त्यासंबंधी वाटणारे आकर्षण यांचा हा मोठा पुरावा मानला पाहिजे. यापैकी काही लेखक सातत्याने स्पर्धेत सहभागी झाल्याने वाचकांना ती नावे जशी परिचित झाली (उदाहरणार्थ, कल्पना शुद्धवैशाख, अर्चना बापट, पुरुषोत्तम रामदासी, अपर्णा भावे इत्यादी) तशीच स्पर्धेत पारितोषिक मिळाल्याने त्यांची उमेद वाढली. मोनिका गजेन्द्रगडकर,

संदीप खरे, एन. सी. एडल, मृणालिनी चितळे, दिलीप नाईक-निंबाळकर, संतोष शिंत्रे इत्यादींना मान्यता मिळाल्याने पुढे त्यांनी अधिक आत्मविश्वासपूर्वक कथा (व कविताही) लिहिल्याचे दिसते. यामुळे मोजके असले तरी गुणवान व कसदार साहित्यनिर्मिती करणारे असे काही लेखक या स्पर्धेतून मराठी साहित्यक्षेत्रास लाभले, आणि 'कथे'चे दालन त्यांनी आपल्या वैविध्यपूर्ण निर्मितीने समृद्ध केले, असे निश्चितपणे म्हणता येईल.

नव्याने लिहिणाऱ्या अनेकांना यामुळे काही पथ्येही कळली. उदा. कथेला आरंभ करण्यापूर्वी लेखकाने आपला व्यक्तिगत परिचय (नाव, पत्ता व दूरभाष इत्यादी) देणे अभिप्रेत असते. परंतु परिचय देताना आपले लक्षवेधक रंगीत छायाचित्र, आपल्याला आतापर्यंत मिळालेले पुरस्कार, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून चालू ठेवलेला व्यासंग आणि आपल्याला त्रास देत असलेल्या व्याधी (म्हणजे हृदयविकार व गुडघे, पाठदुखी सहन करत कथा लिहिलेली आहे किंवा नोकरीतून वेळात वेळ काढून लेखनाचा छंद जोपासलेला आहे किंवा कथा लिहिल्याने आयुष्यात सोसावा लागणारा एकाकीपणा सुसह्य झाला आहे इत्यादी) यांची माहिती देणे अनावश्यक असते. एक तर यामुळे प्रस्तावना अकारण लांबतात व दुसरे त्याहून महत्त्वाचे म्हणजे लेखकाच्या चरित्राचा, त्याच्या सुखदुःखांचा कथेच्या कलात्मकतेशी काहीएक संबंध नसतो. किंवा त्यामुळे परीक्षकांच्या मनावर काही अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होत नाही. आणि वाचकांनाही काही फरक पडत नाही. कथांतर्गत घटनांची संभवनीयता आणि कथेतील घटकांचा सुमेळ हेच येथील कथांच्या निवडीमागचे प्रमुख सूत्र आहे, हे पक्के ध्यानात ठेवावयास हवे. लिंग, जात, प्रदेश, वय, शिक्षण, नोकरी-व्यवसाय, आर्थिक परिस्थिती यापैकी कोणताही निकष येथे लावलेला नाही. कदाचित यामुळेच काही वर्षे उलटून गेली तरी या कथा संस्मरणीय ठरलेल्या आहेत.

ज्याला सामान्यतः 'ललित साहित्य' असे संबोधले जाते, तसे काहीतरी आपण लिहीत आहोत. म्हणजे दैनंदिन जीवनव्यवहारांपेक्षा वेगळी व उच्च प्रतीची कृती करीत आहोत याचे भान कळतनकळत असल्याने ज्ञात-अज्ञात अशा अनेक विषयांना कथालेखकांनी स्पर्श केला आहे. भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचार, जातीय दंगली, स्त्री-पुरुष संबंध, मनोविकार, बँकांतील व्यवहार, अनाथ मुलांच्या समस्या, एकत्र वा विभक्त कुटुंबांतील नात्यांमध्ये उद्‌भवणारे ताणतणाव, वृद्धांचे प्रश्न, पाणीटंचाई, दारिद्र्य, दुष्काळ, विज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे फायदे-तोटे, ग्रामीण व



दलित जीवनानुभव आणि शेतकऱ्यांना कराव्या लागणाऱ्या आत्महत्या (बहुतेक सर्व ग्रामीण कथा शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे चित्रण करणाऱ्या आहेत. ग्रामीण वास्तवाचे अन्य पैलू, विशेषतः गेल्या दोन दशकांत जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग आल्यानंतरच्या काळात, ग्रामजीवनाचे पालटलेले रंगरूप येथे दुर्लक्षित राहिले आहे. तसेच बचतगटांमुळे व राजकारणातील आरक्षणामुळे ग्रामीण स्त्रियांचे झालेले सबलीकरण, त्यातील खाचाखोचाही कोणी दाखवलेल्या नाहीत.) अशा बहुतांश सामाजिक विषयांमध्ये लेखकांनी आपले कथाबीज शोधले आहे. तुलनेने आभास व वास्तव यांची सरमिसळ करून लिहिलेल्या, जीवनव्यवहारातील असंगतता, अनाकलनीयता व अतर्क्यता अधोरेखित करणाऱ्या कथा किंवा वास्तवाचा अन्वयार्थ मिथकांच्या साहाय्याने लावणाऱ्या कथा किंवा सद्यःस्थितीतील विसंगती व दांभिकता यावर भेदक भाष्य करणाऱ्या विनोदी कथा किंवा भविष्याचे विस्मयकारी दर्शन घडविणाऱ्या विज्ञानकथा अत्यंत अल्प प्रमाणात आढळतात. परिणामी या कथासृष्टीत वावरणारी पात्रेदेखील कामगार, मालक, डॉक्टर, प्राध्यापक, पत्रकार, वकील, बांधकाम व्यावसायिक व अभियंता आहेत. समाजाच्या उच्च वा निम्न स्तरातील पात्रे येथे अभावानेच आढळतात. बहुतेक पात्रे मध्यमवर्गीय पांढरपेशा, उच्चवर्णीय आहेत. त्यांचे चेहेरे, त्यांचे भावविचारविश्व परिचित वाटणारे असल्याने आणि त्यांच्याभोवती गुंफलेल्या कथांचे स्वरूप समकालीन समस्याप्रधान असल्याने वाचक त्यांच्याशी झटकन तादात्म्य पावतो.

मुळात कोणतीही गोष्ट सांगणे आणि ती ऐकणे ही माणसाची सहजप्रवृत्ती आहे. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या हजारो वर्षांपासून आजवर 'गोष्टीं'ना जगात विविध रूपे प्राप्त होत गेलेली आढळतात. मौखिक परंपरेत पिढ्यान्‌पिढ्या टिकून राहिलेल्या कहाण्या, सुभाषितात्मक तात्पर्यकथा, वेदोपनिषदात येणाऱ्या पक्षी, प्राणिकथा, परीकथा, दृष्टान्त, दंतकथा, आख्यायिका आणि महानुभाव संप्रदायाच्या साहित्यातील 'लीळा' यामधून 'गोष्ट' नानाविध पद्धतींनी व प्रकारांनी अवतरलेली दिसते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिशांच्या प्रभावाने अनुक्रमे लघुकथा व नवकथा यांचा उदय झाला. कालौघात 'कथे'चे विषय पालटत गेले, आशय व अभिव्यक्ती बदलली, काही स्थित्यंतरे झाली तरी तिची मुख्य लक्षणे कायम राहिली.

वास्तवाच्या आधारे कल्पिताची निर्मिती, व्यक्तीच्या मनःस्थितीचे, तिच्या आयुष्यात घडलेल्या एखाद्या प्रसंगाचे किंवा समाजातील वेचक जीवनानुभवांचे

नेमक्या, काटेकोर शब्दांत केलेले चित्रण, मर्यादित अवकाशात निर्माण करावी लागणारी, विभिन्न स्वभावधर्म असणारी पात्रे, त्यांच्या परस्परसंबंधांतून आकारत जाणारे कथानक, त्याला पोषक ठरणारे वातावरण आणि या सर्वांना मूर्त रूप देणारी निवेदन पद्धती व भाषाशैली हे कथेचे मूलघटक होत. या घटकांची कौशल्यपूर्ण गुंफण करण्यातून जसा कथार्थ सूचित होतो तशी लेखकाची जीवनदृष्टीही त्यातून प्रकटते. 'कथे'चा आखीवरेखीव पैस व तिला असलेली स्थलकालाची मर्यादा ध्यानात घेऊनच बहुदा 'कथा' म्हणजे एक झाड, तर कादंबरी म्हणजे वृक्ष-वेलींनी व्यापलेले अरण्य, कथा एकल गायन-वादनासारखी असते तर कादंबरी म्हणजे जणू वृंद, समूहगान होय, असे म्हंटले जाते. एककेंद्रित्वातून वाचकाच्या मनावर एक संस्कार तीव्रतेने करणे 'कथे'त अपेक्षित असते. उदाहरणार्थ, पती-पत्नींच्या नात्यातील दुरावा हे आशयसूत्र मांडताना दोघांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीची विस्तृत माहिती लेखक देत बसला तर त्यात बरेच शब्द तर खर्ची पडतीलच, शिवाय त्यांचे धागेदोरे कथेत पुढे घडणाऱ्या घटनाप्रसंगांशी त्याला जोडून दाखवता आले नाहीत, त्यांचा अनुबंध दूरान्वयेही जोडला गेला नाही तर आधी आलेला सारा तपशील अप्रस्तुत ठरेल. कथेची एकसंधता कायम राहणार नाही. केशवसुतांच्या शब्दांत सांगायचे तर 'फोल' पाखडून त्यातील 'निके सत्त्व' कथाकाराला गवसावे लागते. अनुभवाची संपृक्तता, संक्षेप, मितव्यय व अल्पाक्षरबहुल शैली यांमुळे गेल्या दीडशे वर्षांत 'कथा' हा साहित्यप्रकार जगभर नियतकालिकांच्या आश्रयाने वाढला, बहरास आला. तिचा विकास व विस्तार वेगवेगळ्या दिशांनी होत गेला. याचे पुरेपूर प्रत्यंतर येथे निवडलेल्या कथांमधून देखील येते.

व्यक्तीचे निसर्गाशी, समाजाशी व अंतिमतः स्वतःशी असलेले सहकार्य-संघर्षयुक्त संबंध, त्यातून उत्पन्न होणारी व्यामिश्रता, निरुत्तर करणारे प्रश्न, जीवनविषयक सखोल व सूक्ष्म समज, मोजके पण प्रत्ययकारी घटनाप्रसंग, आशयाला सुसंगत ठरणारी, पात्रांचे स्वभावदर्शन घडविणारी अनलंकृत, प्रासादिक भाषा आणि सूचक प्रतिमा-प्रतीकांची योजना यामुळे या कथा परिणामकारक व प्रभावी ठरतात. उदाहरणादाखल काही लक्षणीय कथांचे उल्लेख या ठिकाणी करता येतील.

निवडलेल्या कथांपैकी पोपट कासुर्डे ('परवड') दिलीप नाईक-निंबाळकर ('माऊलीचा मळा'), आणि रायभान दवंगे ('दप्तर') या तिघांच्या कथा ग्रामीण/



निमशहरी पार्श्वभूमीवर घडतात. पावसाच्या बेभरवशाने दुष्काळी भागात उत्पन्न झालेले पाण्याचे व चाऱ्याचे दुर्भिक्ष, उजाड, वैराण व बरड जमिनीवर न उगवणारे किंवा उगवले तरी करपून जाणारे पीक, शेतकऱ्याला रोजचा घासही न मिळण्याने, उपासमारीने ओढवणारे मरण, संसाराची होणारी परवड यामुळे गंगाला दुःखाचे चटके बसतातच; परंतु त्याहून अधिक म्हणजे प्राणपणाने सांभाळलेल्या हैबतीसारख्या जिवाभावाच्या बैलाची तडफड, गंगाची त्याच्यासारख्या जनावराशी असलेली एकरूपता यांचे चित्रण सुरुवातीपासून आल्याने कथेचा कळसाध्याय वाचकाला स्वाभाविक वाटतो. (जरी तो मेलोड्रॅमॅटिक म्हणजे क्षोभ/अतिनाट्यात्म असला तरी!) 'माऊलीचा मळा' या कथेतून प्रथमच काळाच्या ओघात वारीचे बदललेले स्वरूप, वारकऱ्यांमध्ये शिरलेल्या अपप्रवृत्ती व त्यांचा संधिसाधूपणा यावर प्रकाश पडतो. या विषयावर अशा तऱ्हेने लिहिलेली, वास्तव दर्शन घडविणारी ही कथा आहे. विषयाचे नावीन्य असले तरी विनायकरावांची संभ्रमित अवस्था, उदासीनता, निष्ठेमुळे स्वभिमान जपत त्यांनी आणलेले अवसान आणि अखेरीस नव्या, व्यवहारी पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या हिरामणने त्यांचा केलेला घात, यामुळे ही कथा परिणामकारक होते. ग्रामीण भाषेचा बाज लेखकाला अवगत आहे, हे कथा वाचताना पदोपदी जाणवते. (उदाहरणार्थ, 'ऊन पिसाळल्या कुत्र्यासारखं लाह्यं करत होतं.' 'पाहिजे तर वाढीदिढीनं दिलंय असं समजा.' अशी कितीतरी वाक्यी ओघाओघात येतात.)

'दप्तर' या कथेवर कोणीही चांगला दिग्दर्शक चित्रपट काढू शकेल. अभावग्रस्त मजूर कुटुंबातील, शिक्षणाची आस असलेला लहान, निरागस वृत्तीचा मुलगा ऊसतोडणीच्या कामावर नाइलाजाने आईवडिलांसोबत जातो; पण तेथे त्यांचं मन लागत नाही, कारण शाळेतील मास्तर, परीक्षा आणि गणिते यांनी त्याचा ताबा घेतलेला असतो. म्हणून गाव सोडून जात असतानाही आपले दप्तर तो त्यातल्या त्यात सुरक्षित जागी कसे जपून ठेवतो, त्याची जिवापाड काळजी कशी वाहतो याची ही भावपूर्ण कहाणी आहे. वाट्याला आलेल्या परिस्थितीतही उमेद कायम ठेवली तर माणूस, मग तो कितीही लहान असो वा मोठा, त्या खडतर अवस्थेवर मात करू शकतो, हे या कथेतून प्रभावीपणे सूचित होते.

'झ्लाटा एडियन घाली' ही कथा, बोस्नियातील वांशिक संघर्षाविषयी दि.९ मार्च १९९४ रोजी दै. सकाळमध्ये 'वेचक वेधक' सदरात जो मजकूर प्रकाशित झाला, त्यावरून लेखकाला सुचलेली आहे. याचा अर्थ हे वृत्त त्याच्या

मनात पुढे दीर्घकाळ रेंगाळत राहिले. यावरून जी कथा त्यांनी रचली आहे तिचा आवाका व्यापक होऊ शकेल इतक्या शक्यता तिच्यामध्ये आहेत. माणसाला चढणारा कशाचाही उन्माद, त्या नशेत हरवून जाणारा त्याचा विवेक, लोभाचा व मोहाचा त्याच्यावर चढणारा अंमल, निष्पापपणाचे केले जाणारे भांडवल, माणसाला क्रयवस्तूची आलेली अवकळा आणि खरेदी-विक्री केल्या जाणाऱ्या बाजारात त्याच्या भावभावनांचीच नव्हे तर अस्तित्वाची ठरणारी किंमत; 'मोठ्या' होत जाणाऱ्या भोळ्या इल्राटाला एका अवचित क्षणी याचा साक्षात्कार होतो, तेव्हा दारी चालत आलेली प्रसिद्धी, यश, पैसा व प्रतिष्ठा यांच्याकडे ती निश्चयाने पाठ फिरवते. नकार देण्याचे धैर्य दाखवणाऱ्या इल्राटाच्या निर्णयातून लेखकाची मूल्यदृष्टीही अप्रत्यक्षपणे प्रकटते.

झोपडपट्टीतील अठराविश्वे दारिद्र्य, गुंडांच्या धमक्या यांना तोंड देतानाच प्रतिष्ठित घरात मालकिणीच्या परोक्ष मालकाच्या विकृती, लैंगिक लालसा सहन न झाल्याने आत्महत्येचा मार्ग अनुसरणाऱ्या अश्राप पोरीला, सामाजिक दबाव झुगारून न्याय मिळवून देण्याचा निर्धार डॉ. सायली आणि डॉ. राजू दोघेही करतात, तेव्हा वेड्यावाकड्या रेषा अदृश्य होऊन त्याजागी त्यांच्या मनाजोगते चित्र साकारते. ('कॅलिडोस्कोप') आधुनिक तंत्रविज्ञानाच्या झपाट्याने डोळे दिपलेली, गावाकडच्या वैचारिक, गंभीर स्वरूपाच्या, अजिबात सवंगपणा नसलेल्या 'निर्भीड' नावाच्या वृत्तपत्रात पत्रकारिता न करता, दूरदर्शन वाहिनीवर २४ तास चमकत, बातम्यांचा रतीब घालणात धन्यता मानणाऱ्या चैत्रालीला, धानीवरचा सामूहिक बलात्कार 'कव्हर करताना', तिच्या शोषणाचे चर्वितचर्वण करत असताना, एका क्षणी त्यातील वैयर्थ जाणवते. दूरदर्शनवर धानीच्या घरच्या आणि बाहेरच्या स्थितीचे सर्वांगांनी आणि हिरिरीने चाललेले प्रदर्शन, त्यातही वाहिन्यांची आपापसात चाललेली जीवघेणी स्पर्धा यांनी तिला उबग येतो, मन विटते, झापडे दूर होतात. परिणामी अनेक पर्याय उपलब्ध असताना बाह्य प्रलोभनांना दूर सारून ती गावाकडे परत येते. कठपुतळी होण्याचे नाकारते ('कठपुतळी').

श्रेयापर्यंत पोचण्यासाठी मुळात जीवनसन्मुख असावे लागते, याचा साक्षात्कार झाल्याने 'झेन' या कथेतील भास्करराव ज्ञानाचे, ग्रंथांचे व धर्माचे त्यांच्या खांद्यावरील ओझे फेकून देतात आणि मोकळे व निर्मळ होऊन विशुद्ध आनंद अनुभवतात. (आत्मशोधाची चाचपडत चाललेली प्रक्रिया, 'निःपक्षपाती जागृतावस्था' बौद्धिकदृष्ट्या कळणे आणि ती प्रत्यक्षात येणे यामधील अंतर किंवा



व्यापक अर्थाने संकल्पनात्मक जाणीव आणि साक्षात अनुभवातून येणारी प्रचिती यातील अंतर) एडल यांनी चांगले उभे केले आहे. तत्त्वचिंतनात्मक डूब दिल्याने आणि कथेतील पात्रे व प्रसंग त्या तत्त्वांचे वाहक असल्याने एडल यांच्या कथा वेगळ्या वाटतात. हे खरे असले तरी काही वेळा त्यांच्या रचनेतील, बांधणीतील सहेतुकपणा, जाणवण्याइतका स्पष्ट असतो. अशा प्रकारच्या साहित्यामध्ये तात्त्विक दृष्टिकोन आशयावर स्वार होऊ लागला तर कथेची परिणामकारकता क्षीण होते. हा धोका त्यांनी लक्षात घ्यायला हवा.

आर्थिक मंदीने जगभरातील आणि विशेषतः अमेरिका नावाच्या स्वर्गतुल्य राष्ट्रातील प्रगतीची प्राक्कथा (मिथ) निष्प्रभ झाल्यावर 'बदल' मधील नितीनचा भ्रमनिरास होतो. आर्थिक अडचणींनी गांजलेला नितीन त्याला जे आवडते ते करून समाधान मिळवतो; परंतु कुटुंबीयांना तो सुखी करू शकत नाही. त्यांच्यापासून तुटणे टळत नाही. त्याचे प्रश्नही सुटत नाहीत. 'गाफील'मधील घटस्फोटित 'ती' मात्र त्याच्या दूर जाण्याने आलेला एकटेपणा धैर्याने स्वीकारते. आत्मसन्मानाची आहुती देण्याचे नाकारते. अंतर्यामी घातलेल्या तटबंदीला अधूनमधून हादरे बसले, खिंडारे पडली तरी ती स्वतःला कोसळू देत नाही. उलट भावनिक मायाजालाकडे अधिक सतर्कपणे, सुजाणपणे पाहाते. प्रतीकात्मक भाषेत लिहिलेल्या या कथेत, मनोविश्वातील विचारांची खळबळ व भावनांची आंदोलने चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'काळोख' मधील गौतमला लाच घेण्यात काहीही वावगे वाटत नाही. त्याच्यासारख्या अनेकांचा तो सवयीचा भाग झालेला आहे. परंतु त्याची पत्नी मात्र त्याला याबाबतीत साथ देऊ शकत नाही, आणि त्याला सोडूनही जाऊ शकत नाही. यामुळे दोघांच्याही वाट्याला एकाकीपण येते. 'सूर' मधील उत्तराला मोलकरणीच्या मुलीची कहाणी शब्दबद्ध करताना आपले हरवलेले स्वत्व गवसते.

मुळात 'पैसे का कमवायचे? काम का करायचं? माणूस माणूस म्हणून जे जे काय करायचं असं म्हणतात ते का करायचं? का हे सर्व लोक असं काहीही करत बसतात?' अशा मूलभूत प्रश्नांचे वादळ डोक्यात घोंगावू लागले की जीवनातूनच 'एक्झिट' घेण्याची इच्छा बळावते. सर्वव्यापी कंटाळा माणसाच्या अस्तित्वाला इतका ग्रासून टाकतो की आत्महत्येशिवाय अन्य पर्याय उरत नाही. याचे प्रत्ययकारी चित्रण प्रदीप वैद्य यांनी 'एक्झिट' या कथेत केले आहे.

'शरम गयी तो' ही या संग्रहातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण कथा आहे.

वारंवार कोणत्याही निमित्ताने होणारी, विद्वेष व तेढ वाढवणारी जातीय दंगल हा या कथेचा विषय असला तरी पात्रांच्या क्रिया-प्रतिक्रियांतून व उक्तीकृतीतून कथेतील समस्या बहुआयामी होते. यातील बशीरचाचाचे दुःख केवळ जातीय दंगलीत होरपळल्याचे नाही, तर अखेरीस स्वतःच्या मनुष्यत्वाचा होणारा अधःपात त्याला लांच्छनास्पद वाटतो आणि खिन्न करून टाकतो. वर्षानुवर्षे तो बिनबोभाट करीत असलेले ठसेकाम, त्यामुळे इतरांचे होणारे समज-गैरसमज, दंगलीचे भावविश्वावर उठणारे ओरखडे आणि त्यातही सरकारी आर्थिक साहाय्याचा पडणारा मोह यामुळे ही कथा केवळ समस्याकेन्द्री राहत नाही. मानवी प्रवृत्तींचे दर्शनही तिच्यातून होते. आशयानुसारी भाषा उदाहरणार्थ, गुजराथी हिंदीमिश्रित मराठी हे ही या कथेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे.

कोंकणी बोलीचा उपयोग 'वारस'मधील कथानुभवाचे विश्व यथार्थतेने उभे करते. सर्वसामान्य मराठी वाचकाला कोंकणी शब्दांचे अर्थ कळण्यास अडचण होऊ नये म्हणून कंसात मराठी अर्थ देण्याची काळजीही लेखक घेतो.

केवळ हास्यनिर्मितीसाठी विनोदी लेखन या स्वरूपाच्या कथा या स्पर्धेमध्ये अभावानेच आढळल्या. त्यांचे प्रतिनिधित्व करणारी 'रोबोताशाची शाळा' ही विनोदी म्हणता येईल अशी एकमेव कथा या संग्रहात दिसते.

'एम्पथी' सारख्या कथेतून तंत्रविज्ञानाचा कडेलोट, बाजाराचे वर्चस्व आणि त्याची येथील सामाजिक प्रवृत्तींशी घातलेली सांगड दिसते. विशिष्ट औषधी गोळ्या घेऊन मेंदूतील रासायनिक द्रव्यांचे प्रमाण कमी-अधिक करून आपल्याला हवे ते, हवे तसे भाव नियंत्रित करता येतात व परिस्थितीचा अंदाज घेऊन निर्णय फिरवता येतात अशासाठी साह्यभूत ठरणाऱ्या, मन वाचणाऱ्या 'माइंड मॅनिप्युलेटर'ची भारतात गरजच नाही; कारण निर्णय घेणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे टक्के आणि अटी ठरणेच पुरेसे असते. परिणामी, येथे अत्याधुनिक साधने अखेरीस त्यांच्या निर्मात्यांवरच उलटतात. हा अंतर्विरोध, गोंधळ त्रुटित भाषेतूनही प्रकट होतो.

अशाच प्रकारची खंडित वाक्ये 'हॅल्युसिनेशन्स' या कथेत येतात. कथांतर्गत कथा या तंत्राचा अवलंब आणि अखेरीस दिलेली नाट्यपूर्ण कलाटणी यामुळे ही कथा वाचनीय होते. 'मोर्चा' या कथेतही वडीलधाऱ्यांच्या अनुकरणाने मुले 'मोर्चा'चा खेळ खेळतात. बघताबघता त्या खेळाचे रूपांतर करूण व भीषण अशा सत्यात होते. विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' या नाटकाचे स्मरण येथे होते.

'कालनिर्णय'मध्ये दैनंदिनी (डायरी) लेखनाचा निवेदनासाठी वापर केला



आहे. पात्रांचे मनोव्यापार उलगडण्यासाठी या लेखनतंत्राचा फार प्रभावीपणे उपयोग करता येतो, हे 'कालनिर्णय' वाचताना जाणवते.

या सर्व कथांचे रचनाबंध सफाईदारपणे घडवलेले आहेत. पात्रांचे संवाद, बोलीमध्ये तर निवेदन प्रमाण मराठीत, अनलंकृत भाषेत केलेले आहे. पात्राचे वय, लिंग, सामाजिक, आर्थिक स्तर आणि मानसिकता यांचा विचार करून त्याला अनुरूप ठरेल अशी भाषेची योजना केल्याने स्वभावदर्शन व कथानकाची गतिमानता ही दोन्ही कार्ये यामधून साध्य होतात. त्यामुळे सामान्य वाचकांना आणि अभ्यासकांना या कथा अंतर्मुख तर करतीलच, परंतु त्यांच्या एकत्रित वाचनाने सामाजिक अभिरुचीचा कलही स्पष्ट होईल.

असे असले तरी या कथास्पर्धेच्या निमित्ताने वाचनात आलेल्या कथांमधील काही मर्यादांचा निर्देश करणेही आवश्यक आहे. ठरीव पद्धतीने, सुसूत्रपणे गोष्ट सांगण्याचा मोह लेखकांना अजूनही आवरत नाही. ना.सी. फडकेप्रणीत कालबाह्य झालेल्या तंत्राचा पगडा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे असल्याने उत्कंठावर्धक आरंभ व अनपेक्षित कलाटणी देणारा शेवट, या दरम्यान संकट, साहस व सुटका अशी कथानकाची क्रमवार, एकदिशीय रचना लेखक करतात. त्यामुळे कथा बाळबोध, सोप्या व सुटसुटीत होतात. वाचकांच्या कल्पनेला वा विचारांना त्या जराही ताण देत नाहीत. वास्तविक लेखकांना समकालीन जीवनातील कितीतरी प्रश्न दिसतात, जाणवतात, ते शब्दांकितही करण्याची उर्मी त्यांच्या ठिकाणी प्रबळ आहे. परंतु आपल्याला जे प्रतीत होते त्याचा कसोशीने शोध घेण्याचे त्यांचे प्रयत्न अपुरे पडतात. बाह्य परिस्थितीच नव्हे तर माणसाच्या मनात होणारी उलथापालथ, निरुपाय करून सोडणारी परिस्थिती सगळ्या जटिलतेसकट मांडण्याचे आव्हान पेलण्यापेक्षा कथेत मांडलेल्या प्रश्नाला ठोस, ठाशीव उत्तर देऊन लेखक थांबतो. म्हणजे एकाएकी अघटित घडते. विवाहबाह्य संबंधात गुंतलेल्या दोन व्यक्तींपैकी कोणीतरी एकजण मरतो किंवा पश्चात्तापदग्ध होतो. बलात्कारित स्त्रीचा बळी जातो किंवा ती जीव देते. चाळीतल्या एखाद्या आजोबांच्या प्रेमळ, समजूतदार मध्यस्थीने हिंदू-मुस्लीम शेजाऱ्यांमधील दुरावा संपुष्टात येतो. कितीही क्लेश झाले तरी पूर्वायुष्याची सुखद उजळणी करीत आजी-आजोबा वृद्धाश्रमात जाऊन राहायला तयार होतात. मुले-नातवंडे त्यांना दुरावलेली वा परदेशी गेलेली असली तरी नवी, पर्यायी, सद्वर्तनी माणसे त्यांना भेटतात. त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करून वात्सल्याची भूक भागवता येते किंवा वय झाल्याने आजीआजोबांचाच

मृत्यू ओढवतो. घरात नकोशा वाटणाऱ्या मतिमंद मुलाचे असेच अकाली निधन होते आणि कुटुंबातील इतर माणसांचे जीवनव्यवहार सुरळीतपणे चालू होतात.

प्रत्यक्ष आयुष्यात अनपेक्षित, अतर्क्य योगायोगांच्या आधारे प्रश्न सुटत नाहीत. म्हणून तर मानवी संबंधातील पेच मती कुंठित करतात, माणसे कोणत्या ना कोणत्या कोंडीत, कधी सकारण तर कधी अकारण, कसलाही गुन्हा न करता देखील सापडलेली असतात. प्रयत्नांची शर्थ केली तरी ती कोंडी फुटत नाही तेव्हा एक तर ती हताश होतात, निराशा त्यांना घेरून टाकते किंवा तशाही विपरीत परिस्थितीत तग धरून ती चिवटपणे जगत राहातात. उभारी, आशा लोप पावू देत नाहीत. माणसांच्या 'नातं' या कथेतील एकुलत्या एका मुलाच्या, रवीच्या अकस्मात मृत्यूचा आघात झालेला असतानाही, त्याचे वडील, वामनराव आपल्या गरोदर सुनेला, मनावर दगड ठेवून, पुनर्विवाह करण्यासाठभ प्रवृत्त करतात. माणसांच्या स्वभावाचे चित्रविचित्र रसायन जसे अंशतः उपजत असते तसे त्याचे काही धागेदोरे वाट्याला आलेल्या परिस्थितीतही रुजलेले असतात. येणाऱ्या अनुभवांनी माणसे बदलत जातात परंतु याची जाणीव नसल्याने कथेत बरेच काही घडले तरी पात्रे जशीच्या तशी राहतात. लेखकाने ठरवलेले, निश्चित केलेले संवाद ती बोलतात आणि मग निर्णायक तात्पर्य/सार सांगून गोष्ट संपते. कौटुंबिक पातळीवर उत्पन्न झालेल्या प्रश्नांची सोडवणूक पात्रांच्या हृदयपरिवर्तनाने केली जाते. म्हणजे उच्चशिक्षित स्त्री, मुले चांगली निघावीत म्हणून त्यांचा (व पतीचा !) सांभाळ करण्यासाठी आपल्या आकांक्षाना तिलांजली देते व घरी बसते; तेव्हा सारे काही आलबेल होते. यातून सर्व गृहिणींची मुले चांगली व नोकरदार स्त्रियांची मुले वाईट निघतात, हे सूचित होते. यात कितपत तथ्य आहे?

आपल्याला जे आवडते, हवेसे वाटते ते कसेही करून सिद्ध करण्यासाठी आपण कथेचा सांगाडा उभा करतो आहोत का? कथेतील व्यक्तिरेखा मग त्या पारंपरिक असोत वा आधुनिक त्यांचे आचारविचार वाचकाला विश्वसनीय वाटतील असे आहेत का? खेड्यातील सरपंचाची/पाटलाची हुशारपण दडपली गेलेली 'गृहकृत्यदक्ष पत्नी' आमदार-खासदार झाली म्हणजे राजकीय सत्ताबदल होतो का? समाजपरिवर्तनाचा वेग वाढतो का? लग्न न करता जिच्याबरोबर एकत्र राहायचे ती मुलगी रूढार्थाने सुंदर नसली तरी सद्गुणांची खाण असली तर ती हा चाकोरीबाह्य (?) निर्णय मित्राच्या आई-वडिलांना मान्य करायला लावू शकेल; त्यांची मने जिंकू शकेल. यातून कथाकार कोणता संदेश देतो? त्याला खरोखर काय सांगायचे आहे?



वर्षानुवर्षे जिची पाळेमुळे येथील समाजात घट्ट रूजलेली आहेत, अशी व्यवस्था इतक्या सोप्या पद्धतीने बदलता येते का? याचा विचार लेखकांनी करायला हवा. प्रश्न एकेरी नसून अनेकपदरी असतात. त्यांच्या संभाव्य उत्तरांच्या निरनिराळ्या शक्यता आजमावून, पारखून बघणे, तेथपर्यंत टप्प्याटप्प्याने वाटचाल करणे यातून कथानकाची उभारणी होते हे लेखकांनी ध्यानात घ्यायला हवे. एरवी कथाविषयात वैचित्र्य असले तरी ते पृष्ठस्तरीय राहते.

काही वेळा वास्तव व कृत्रिम प्रसंगांमुळे कथेतील घटनांची अपरिहार्यता क्षीण होते. उदाहरणार्थ दत्तक मुलाचा स्वीकार, त्याचे भावविश्व हा विषय अनेक कथाकारांना जिव्हाळ्याचा वाटणारा आहे. त्यामुळे स्पर्धेतील कितीतरी कथा यावर लिहिलेल्या होत्या. पण मूल दत्तक घेण्याची प्रक्रिया कायदेशीर, दीर्घकाळ चालणारी व बऱ्याच व्यावहारिक बाबींची पूर्तता करून घेणारी असते. जबाबदार व प्रौढ नागरिकांना याची कल्पना असते. कथेमध्ये मात्र अपत्यप्राप्ती न झाल्याने संसारात दुःखी असणाऱ्या प्रिय पत्नीला पती एका सायंकाळी अनाथाश्रमातून आणलेल्या गोजिरवाण्या मुलाची भेट देतो. सारे कुटुंब आनंदी होते. तरुण जोडपे वृद्धाश्रमातून आणलेल्या प्रेमळ आजोबांची भेट त्यांच्या लहान व लाघवी मुलीला देतात. सजीव खेळणे मिळाल्याने मुलीचा, निराधार आजोबांचा व व्यवसायात गढून गेलेल्या आई-वडिलांचा, सगळ्यांचाच प्रश्न सुटतो. कधी परदेशात स्थायिक झालेला एकुलता एक मुलगा वडिलांचे घरदार विकून त्यांना एकट्याला विमानतळावर नेऊन, तेथेच सोडून स्वतः निघून जातो; तर कधी संबंध तोडलेल्या एका मुलाच्या पत्नीचा व मुलाचा स्वीकार दुसरा मुलगा सहजपणे करतो. कधी अवकाळी पाऊस पडल्याने, तर कधी चातकासारखी वाट (ही सांकेतिक उपमा आता झिजकट, गुळगुळीत झालेली आहे.) पाहूनही पावसाने दडी मारल्याने पीक करपून जाते. पाऊस पडलाच तर आलेले पीक कोणीतरी चोरून वा ओरबाडून नेते. याची परिणती अर्थातच शेतकऱ्यांच्या आत्महत्येत होते. हा ज्वलंत विषय साचेबंद पद्धतीने, हुकुमी प्रसंग निर्माण करून लेखक हाताळतात तेव्हा त्याचे गांभीर्य मनावर ठसत नाही.

हे ठसवण्यासाठी मग लेखक प्रसंगांच्या फंदात न पडता सरळसोट निवेदनाचा मार्ग अवलंबतात. कोणत्यातरी विचाराने लेखकाच्या मनाला अस्वस्थता आलेली असते. तो विचार ठामपणे वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी ते कथा लिहितात. परंतु कथा म्हणजे तार्किक युक्तिवादांच्या साहाय्याने निखळ तत्त्वप्रतिपादनार्थ लिहिलेला निबंध नव्हे याचे भान न ठेवल्याने जागोजागी येणारी लांबलचक भाष्ये कथात्मकतेस

मारक ठरतात. कचऱ्याची विल्हेवाट, दहशतवाद, वृद्धांची उपेक्षा, एड्ससारख्या असाध्य रोगाचे भीषण परिणाम, वैज्ञानिक प्रगती, पर्यावरणाचा ऱ्हास व स्त्रियांवर होणारे अत्याचार इत्यादींवर निवेदकाला जे म्हणायचे आहे ते कथेतील पायांच्या जीवनानुभवातून साकार व्हायला हवे. त्यासाठी केवळ विचार चांगला वा हितकारक असून भागत नाही तर कथानुभवातून साधावी लागतो.

कथन करण्याच्या कितीतरी पद्धती लेखकाला आशयातूनच सापडू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या पात्राला आपल्या अंतर्मनातल्या भावविचारांना दुसऱ्यापर्यंत पोचवायचे असेल तर कदाचित सबंध कथा पत्ररूपात अवतरू शकेल अथवा ते पात्र दैनंदिनी लिहून आपले खाजगीपण व अंतर्मुखता जपेल किंवा लेखक/निवेदक प्रथमपुरुषी एकवचनी निवेदन करेल. काही वेळा कथांतर्गत पात्रे-घटना-प्रसंग यापासून तो दूरस्थ राहील. त्या चौकटीबाहेर, अंतरावर राहून तो निरीक्षकाची भूमिका बजावेल, जेणेकरून त्याला अभिप्राय कथनात सामावून घेता येतील. पुष्कळ लेखक पूर्वसूत्रकथनाने अर्थात फ्लॅश बॅक कथेची सुरुवात करतात. कथेच्या अखेरीस पात्रे पुन्हा वर्तमानात परततात. परंतु यापेक्षा वेगवेगळ्या तऱ्हांनी या पद्धतींचे उपयोजन करता येते. यामुळे कथेच्या मर्यादित अवकाशातही 'काला'शी खेळता येण्याची संधी उपलब्ध होते. विशेषतः रूढ संगती व कार्यकारणभाव मोडून असांकेतिक जीवनानुभवाचे दर्शन घडवण्यासाठी आणि मानवी मनाचे अंधारे कडा-कोपरे प्रकाशात आणण्यासाठी ही क्लृप्ती उपयोगी पडू शकते.

याकरिता कथात्मकता आणि रूपबंध या दोन्हींवर लेखकाची पकड असायला हवी, किमानपक्षी त्याला याची जाण असली पाहिजे. एरवी सदोष शब्दप्रयोग (उदाहरणार्थ, बद्धल/प्रगल्लभता इ. व चुकीची वाक्यरचना; उदाहरणार्थ, तू माझी मदत कर, काळजात कफ झाला होता. भावनांचे ओहोळ वाहिले इत्यादी) यांनीही कथेची वाचनीयता कमी होते. वस्तुतः सध्या आजूबाजूला जे दिसते आहे, सर्वसामान्य माणसास प्रत्यही अनुभवास येत आहे, ते साहित्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक अद्भुत व सुरस आहे. विश्वास बसू नये, अशा घटना रोज घडत आहेत. केवळ घराबाहेरच्या जगात नव्हे तर घरात, कुटुंबात अगदी खोलवर त्यांचे परिणाम झिरपत आहेत. इच्छा असो वा नसो ते सोसावे, भोगावे लागत आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पन्नास-साठ वर्षे उलटून गेली तरी प्रत्यक्षात कितीतरी समस्यांची अद्याप तड तर लागलेली नाहीच, उलट त्यापूर्वीपेक्षा कितीतरी पटीने उग्र झालेल्या आहेत. राजकीय इच्छाशक्ती, विविध समाजघटकांचे गुंतलेले हितसंबंध, ताठर/लवचीक तात्त्विक भूमिका आणि त्यांना पोषक वा मारक ठरणारे सामाजिक



वातावरण यामुळे समस्या जटिल व किचकट होत चालल्या आहेत. वास्तव व कल्पित यांच्या मिलाफातून या समस्यांचे प्रखर भान वाचकाला देण्याचे आव्हान लेखकांसमोर आहे. येत्या काळात हे आव्हान ते समर्थपणे पेलतील, इतपत आश्वासकता या निवडक कथा निर्माण करतात.

असे म्हटले तरी अखेरीस एक सूचना आवर्जून कराविशी वाटते.

पुन्हा एकवार (टिपणातून सुचवले होतेच!) कळकळीने आवाहन करावेसे वाटते की स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या आणि ज्यांच्या कथांचा अंतर्भाव प्रस्तुत संग्रहात केलेला आहे, त्या सर्व जुन्या-नव्या कथाकारांनी किमान मराठी कथेची आजवर झालेली वाटचाल जाणून घ्यावी. राम कोलारकर यांनी संपादित केलेले मराठी कथांचे खंड मनःपूर्वकतेने वाचावेत. म्हणजे हरिभाऊ आपटे, वि. सी. गुर्जर, दिवाकर कृष्ण, गो. गं. लिमये यांच्यापासून पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, दि. वा. मोकाशी व व्यंकटेश माडगुळकर यांच्यापर्यंत आणि त्या नंतरच्या काळात श्री. दा. पानवलकर, विद्याधर पुंडलीक, कमल देसाई यांच्यापासून ते तूर्तास आशा बगे, मेघना पेठे, प्रज्ञा लोखंडे यांच्यापर्यंत मराठी कथेला कशी व कोणती बहुविध परिमाणे लाभली ते त्यांच्या ध्यानात येईल. आपण यांपैकी कोणत्या टप्प्यावर उभे आहोत हे त्यांना समजेल. त्याहून महत्त्वाचे म्हणजे या कथासाहित्याच्या वाचनाने केवळ लेखक म्हणून नव्हे तर 'व्यक्ती' म्हणूनदेखील त्यांचे स्वतःविषयीचे आणि भोवतालच्या जगाविषयीचे आकलन वाढेल. तसे ते वाढले तर केवळ कथेतूनच नव्हे तर त्यांनी केलेल्या कोणत्याही लेखनातून वाचकाला त्याचा प्रत्यय येईल. या कथाकारांमुळे मराठी कथेची परंपरा समृद्ध होईल, जोमाने बहरेल हे तर खरेच आहे; पण त्यामुळे वाचकांची समजूत प्रगल्भ होईल, हे याचे फलित अधिक 'मूल्यवान' आहे.

**डॉ. रेखा इनामदार-साने**
२, स्नेह क्लासिक्स ७/१ जोशी पथ,
एरंडवणे, पुणे ४११००४
भ्रमणध्वनी : ९८६०२०५४३६

●●●

# मोर्चा

## मनोहर शार्दूल विभांडिक

उन्हाची साय पांघरून घरं निमूट बसली होती. रात्रपाळीच्या आळसावलेल्या कामगारागत झाडं पेंगत उभी होती. उंबऱ्याआड कुठं आडोशाला बायका बसल्या होत्या. केसांतला वाढत चाललेला गुंता तटातट तोडण्याचा काही जणी प्रयत्न करीत होत्या. पलीकडे मुलं खेळत होती. त्यांचा भातुकलीचा खेळ रंगत आला होता. छोटी छोटी भांडी, ताटं, वाट्या, पिवळ्याधम्मक लिंबोळ्यांचे ढीग, गुलमोहराची रक्तवर्णी फुलं, काही काड्या, थोड्या चिंध्या मुलांनी कोठून कोठून गोळा करून आणल्या होत्या.

त्या खेळणाऱ्या मुलामुलींमध्ये कोणीतरी एक जण आई होती; एक जण दादा! ताई, भाऊ, आजी, बाबा सारेच होते. दादांना कामावर जायची घाई होती. आई स्वयंपाक करण्यात गर्क होती. कोणीतरी शाळेला जाण्याची तयारी करीत होती. एक जण तिचं दप्तर भरून देत होता. आजी-बाबा खूप लहानग्यांना गोष्टी सांगत होते. एकाला मात्र खरोखरीच भूक लागली होती आणि तो रडत होता. एक धिटुकली त्याला गप्प करण्याचा प्रयत्न करीत होती. तो जोरजोरानं रडत होता. ती त्याला भातुकलीचा खेळ समजून हसत होती. समजावत होती.

उन्हाची साय घट्ट होऊ लागली होती. झाडं आता आमरण उपोषणाला बसल्यासारखी दिसत होती. बायका एकमेकींच्या केसांतला गुंता तोडून तोडून कंटाळल्या होत्या. केसाचे तोडून तोडून ठेवलेले पुंजके वाऱ्याच्या हलक्याशा

झुळकीने उडाले तशा बायका कुतूहलाने त्याकडे पाहू लागल्या. झुळकीची हळूहळू वावटळ झाली. गोल गोल फिरत, धुळीशी फुगडी खेळून ती वरवर आभाळात गेली. निळंभोर आकाश काहीसं धुरकटलं. बायांनी आभाळाकडे पाहिलं. त्यांना दूरवर कारखान्याची चिमणी दिसली.

एरवी नटवी वाटणारी ती चिमणी विधवा बाईगत उजाड दिसत होती. निळ्या स्वच्छ आकाशावर नेहमी धुराच्या गुळण्या टाकणाऱ्या चिमणीतून गेल्या कित्येक महिन्यांपासून थुंकल्याएवढाही धूर बाहेर पडलेला नव्हता. जाता-जाता एखादा चिमुकला ढग कुतूहलाने त्या चिमणीच्या तोंडाशी डोकावून पाही, तेव्हा त्याला तेथे एक टपोरा कोळी जाळं विणताना दिसे!

बायकांनी एक दीर्घ सुस्कारा सोडला. कारखान्याच्या चिमणीकडे पाहून त्या हळव्या झाल्या. स्वतःशीच म्हणू लागल्या,''बाई ग, काय झालं तुला? हसायचीस, बोलायचीस आणि आता का वैरीण बनलीस बाई! का रुसलीस? सांग का बंद पडलीस? तुझ्या आश्रयाला आलो आणि तूच अशी पाठ फिरवतेस? काय करावं आम्ही? सगळा भणका झाला संसाराचा. कच्चीबच्ची वाऱ्यावर आणि माणूस रस्त्यावर! हा डाव कसा सावरू आम्ही? सांग, काय करू? कोठलं व्रत करू?''

बायकांचे डोळे पाण्यानं भरून आले. त्यांनी एकमेकींकडे पाहिलं. प्रत्येकीच्या व्याकूळ डोळ्यात बंद पडलेल्या कारखान्याची उजाड चिमणी उभी होती. पदरानं मग त्यांनी आपापले डोळे पुसरले. एक जण रुद्ध आवाजात म्हणाली,''काल किती लागलं त्यांना... सुजलंय सारं!''

''आणि आमच्याकडेही...'' दुसरी म्हणाली.

''पोटरीवर लाठीचे वळ ग... हिरवेगार... पाहवत नव्हते!'' तिसरी.

''आई, बाई ह्यांचा तर थोडक्यात डोळा वाचला!'' चौथी.

''घोषणा द्यायला हेच होते. रात्रभर घसा दुखला!''

''वीट आला बाई या संपाचा!''

''असं किती दिवस चालायचं, कळेना?''

''आज काय होतं आणखी, देव जाणे?''

''आजतर मालकाच्या बंगल्यावरच मोर्चा आहे म्हणे!''

''आजचं जरा अवघडच दिसतंय पण!''

''आमचे हे, सांगू नाही पण... सुरा घेऊन गेले बाई... हा एवढा!''



''असं, आणि बाई रात्री काय काय घाणेरडं बोलले मुलांसमोर, ऐकवत नव्हतं अगदी! मालकाच्या बायकोला म्हणे ना-''

मग ती एकीच्या कानाशी लागली आणि वाक्य पुरं केलं. ती बाई चेटकीण हसावी तशी फिसकारली. आणि तिने पुन्हा जवळ बसलेल्या एकीला ते सांगितलं. मग ती पुन्हा तिसरीच्या कानाशी कुजबुजली. चौथी... पाचवी... करीत करीत मग साऱ्याच बायांना ते वाक्य कळालं आणि खूप चेटकीणी हसत असल्यासारखं वाटू लागलं. उन्हाची साय थरथरू लागली. मरणासन्न झाडांची पानं या बायकांच्या हसण्यानं शहारली. भातुकलीचा खेळ खेळणारी मुलं कावरीबावरी झाली. भातुकलीच्या खेळामधली आई मग मोठ्यानं म्हणाली,''छोटे ग, आटप चल... त्यांचा डबा भरून दे... त्यांना कामावर जायचंय.'' छोटी काही उठली नाही. तिला वाटलं, दादांना कसलं आलं काम! त्यांची कंपनी तर बंदच आहे. माझे खरोखरीचे दादा तरी कुठे जातात कामावर!

छोटी म्हणाली,''ये... ग खेळातली आई, त्यांना कसलं आलं काम! त्यांची कंपनी तर बंदच झाली नाही का?''

भातुकलीचा रंगत आलेला खेळ मग तसाच थांबला. मुलं म्हणू लागली, ''खरं आहे छोटीचं. आमच्या दादांची कंपनी बंद! बंद... खेळात पण तसंच पाहिजे!''

खेळातली आई साऱ्यांना गप्प करत म्हणाली,''असं रे काय करता! मी करू तरी काय?'' खेळातली आई खरीखुरी रडकुंडीला येऊन म्हणाली, ''मग आपण खेळायचं तरी काय?''

''आपण ठिकरी खेळू. चालेल?'' कोणीतरी सुचवलं.

''ह्हे बायल्या! पोरींचा खेळ तो!'' एक जण फिस्करला. मग मुलं आपापसात ठरवू लागली. लपाछपी? नको, एवढ्या उन्हात! दुकान दुकान ! नको, खाऊ कुठेय आपल्याकडे? विटीदांडू, नको कालच तर खेळला.

''दुसरं सांगू?'' त्यांच्यापैकी एक जण भसकन म्हणाला,''नवा खेळ खेळू...'' मुलं स्तब्ध झाली. पुटपुटली,''कोणचा रे?'' सांगणारा काही क्षण, थांबला अन् म्हणाला,''मोर्चा... मोर्चा!''

मुलं आनंदली. मोर्चा-मोर्चाचा खेळ अगदीच नवा होता. सर्वांनी जल्लोष केला. मोर्चा मोर्चा खेळू चला... मोर्चा मोर्चा खेळू!

''मोर्चाला रे काय काय लागतं?'' एक चिमुरडी म्हणाली.

"त्यात पण बाळ असतं का रे?" एक इटुकली म्हणाली.

"गप्प ग! आम्ही सांगू तसं करायचं. जा दगड गोळा कर!"

"मी रे काय करू?" एकीनं विचारलं.

"तू ना... तू रॉकेल घेऊन ये थोडसं अन् पेटी पण!"

"तू रे जाड्या... तू पोलीस बरं का. जा काठ्या घेऊन ये गुपचूप!" जाड्या उड्या मारत पळाला. कुणीतरी सुचवलं,"माझ्याकडे बंदूक आहे टिकल्यांची. आणू? मग मी साहेब होईन बरं. गोळी मारेन... ढिश्यॉव... ढिश्यॉवऽऽ"

"जा आण..."

"मी पुठ्ठ्याची तलवार आणू का रे? नाहीतर भाजी कापायची सुरी?"

"आण... काहीपण आणा... टाकीजवळ जमा... जा सगळ्यांना घेऊन या! मोर्च्याला गर्दी लागेल गर्दी... खूप खूप गर्दी!!"

मुलं मग पांगली. कोणी दगड गोळा करू लागली तर कोणी रॉकेलसाठी बाटली शोधू लागलं. कुणी घरातून गुपचूप सुरी आणली. काहींनी काठ्या, काडेपेटी असं बरंच काही!

आणखी एका शहाण्यानं तर दोन काठ्यांच्यामध्ये रुमाल बांधला आणि कोळशानं त्यावर गिचमिड असं काहीतरी लिहिलं. मोर्च्याला बोर्ड लागतो ना, तो त्याचेच वडील बनवायचे! मग सारे जण उत्साहानं मोर्च्याची तयारी करू लागले.

मुलांचा गलका कमी झाला तसा बायांना निवांतपणा मिळाला. त्यांनी बसल्या बसल्या जागेवरूनच मुलं खेळत होती त्या जागेकडे पाहिलं. भातुकलीचा अर्धवट टाकलेला खेळ कोमेजून गेला होता. उखडलेल्या अंगणातून घाईनं दाणे टिपून चिमण्यांचा थवा उडून जावा, तशी ती जागा भकास दिसत होती.

आईची साडी, दादांचे बूट, लिंबोळ्यांचे ढीग, गुलमोहराची रक्तवर्णी फुलं, चिंध्यांच्या बाहुल्या, पाण्याची भांडी, दोन छोट्या डबडींचा बनविलेला तराजूकाटा असं सारं काही इतस्ततः पडलं होतं. त्या विस्कटलेल्या खेळाकडे पाहून बायकांचे डोळे पुन्हा भरून आले. त्यांनी दूरवर चिमणीकडे पाहिलं. घुमणाऱ्या बाईनं हात वरती करून आकांत करावा त्याप्रमाणे चिमणी दिसत होती. बाया म्हणाल्या,"आमचा पण संसार असाच विस्कटला ग बये तू...!"

"चांगलं चाललं होतं. मग मध्येच काय झालं असं?"

"सोन्यासारखी माणसं बाई, उन्हातान्हातून काळवंडतात."



"उपोषणं करतात... मोर्चे काढतात..."

"लाठ्या खातात... शिव्या देतात..."

"तोंडातून कधी वाईट वाकडा शब्द नाही निघायचा आणि आताशा तर शिव्या ग नुसत्या... मालकाला, त्याच्या बायकोला, त्याच्या पोराला.... आणखी कुणाकुणाला!"

"बायकांसारखा तळतळाट करतात बाई एवढी पहाडासारखी माणसं!"

बाया मग आपापल्या नवऱ्याच्या बदलत्या तऱ्हा सांगू लागल्या. काळजी करू लागल्या. काळवंडू लागल्या. बोलता बोलता पेंगू लागल्या. आणि मग पेंगता पेंगता लवंडल्या.

उन्हाची साय आता रबरासारखी टम्म ताणली गेली होती. सर्वत्र सुन्नसा शुकशुकाट होता. एखादं तहानलेलं पाखरू झाडावर येऊन विसावे आणि धुमसणाऱ्या झाडाची धग सहन न होऊन क्षणभरानं लहालहा उडून जाई.

पलीकडे कोपऱ्यावर एका छोट्याशा मैदानवजा जागेत पोरांचा मोर्चा मोर्चा खेळ सुरू होण्याच्या तयारीत होता. मुलांनी दोनचार गट केले होते. एक मोर्चावाल्यांचा, एक पोलिसांचा, आणखी एक गट बघणाऱ्यांचा आणि चारपाच जणांचा मालक गट होता. प्रत्येक गटात मुलंमुली दोन्ही होती.

दोन्ही गटांतली मुलं समोरासमोर उभी होती. पोलिसांच्या हातात काठ्या होत्या. एकाच्या हातात टिकल्यांची बंदूक होती. सर्वांच्या पुढे छाती काढून तो उभा होता. त्वेषपूर्ण हातवारे करीत होता.

मोर्चावाल्यांचा उत्साह काही औरच होता. दगडाचे ढीगच्या ढीग होते. लाठ्या होत्या. पळी-झारे होते.

एकदोघांकडे भाजी कापण्याच्या सुऱ्या होत्या. एक हलकासा जीव परिश्रमानं भलीमोठी कुऱ्हाड खांद्यावर पेलण्याचा प्रयत्न करीत मोर्चा-मोर्चाचा खेळ सुरू होण्याची वाट पाहत उभा होता.

मुलींनी आपल्या लालहिरव्या रिबिनी उंच काठीवर बांधून त्यांचे झेंडे तयार केले होते. दोन मुलांनी रुमालाचा बोर्ड ताणून धरला होता. रॉकेलची बाटली सांभाळून एक चिमुकली दमली होती. तिला खरंतर दगड फेकण्याचं काम हवं होतं. एकाला मोठ्यानं घोषणा द्यायचं काम हवं होतं; पण त्याला बोर्ड धरायला लावला होता. त्या बंदूकवाल्या जाड्यासारखं आपणही सर्वांच्या पुढे हातात सुरी घेऊन उभं राहावं असं एकाला वाटत होतं; पण एका पोरीला धरून तिला

मारण्याचं काम त्याच्याकडे आलं होतं.

"ये, कर रे बाबा लवकर सुरू!" एक जण शेवटी कंटाळून म्हणाली.

"आधी काय करतात रे?"

"भाषणं देतात!"

"हट, ओरडतात... नाचतात."

"वेडी ग वेडी, म्हणे नाचतात! शिव्या देतात, रागवतात. खूप खूप मोठ्यानं बोलतात. शेवटी मारामारी करतात!"

"मग करू ना आपण सुरू!"

"हं चला..."

मोर्चावाल्या मुलामुलींचा गट थोडा मागे हटला. मुलींनी झेंडे धरले. रुमालाचा फलक ताणून धरला. सर्वांत पुढच्याने मूठ वर करून काहीतरी ओरडल्यासारखं केलं. त्याच्या पाठोपाठ बाकी जणही हवेत हात उंचावून ओरडू लागले.

एक जण ओरडला, "आणखी मोठ्यानं बोला रे! मोर्चा वाटायला पाहिजे!"

लाजणाऱ्या मुलांना मग चेव आला. आळसावलेल्या मुली खुलल्या. ते जोरजोरत ओरडू लागले. काही पण.... आहू ये.... यी, ह्ये...! असं काही पण!

खूपच गोंधळ झाला तसं मग त्यांना थांबवत एक जण ओरडला, "थांबा रे, असं काहीपण ओरडायचं नसतं. त्यापेक्षा आपले दादा म्हणतात तसं म्हणायचं!"

"म्हणजे काय ते सांग ना पण!"

"हमारी मांगे पूरी करो...."

"हम सब एक हैं..."

"हमारी ताकद... हमारी युनियन..."

"नहीं चलेगी नहीं चलेगी... दादागिरी नहीं चलेगी!"

"हमसे जो टकरायेगा... मिट्टी में मिल जाएगा..."

मुलांनी घोषणा नीट ध्यानात ठेवल्या. मग सर्वांत पुढचा जो होता, तो म्हणाला, "हम सब..." बाकीची ओरडली, "एक हैं... एक हैं" मोर्चा-मोर्च्याचा खेळ मग खऱ्या अर्थाने सुरू झाला.



आता उन्हाची साय पिकलेल्या फोडासारखी फुगली होती. मुलं जोरजोरात घोषणा देऊ लागली. हवेत हात उंचावू लागले.

घोषणा

घोषणा

घोषणा

मोर्चावाला गट पोलिसांना, मालकांना वेडावू लागला. तो बंदूकवाला तोंडानं ढिश्यँव... ढिश्यँवऽ असा आवाज करीत गोळ्या मारल्यासारखं करू लागला.

मोर्चावाल्या मुलांना मग पोलीसवाला गट काठ्यांनी मारू लागला, मोर्चावाले मग घाबरले. त्यांनी दगड फेकायला सुरुवात केली.

दगड

दगड

दगड

"ये, लागतोय ना दगड!"

"मग मी काय करू?"

"खोटं खोटं मार ना."

"मोर्च्यात हे असंच असतं! तू पण मारतोयस ना खरोखरीचंच. आम्ही काही बोललो का?"

"ए आई ग... लागलंय रे डोक्याला! रक्त आलं!"

"हा मोर्चा आहे, लागायचंच!"

"अरे पण आपण खोटं खोटं खेळतोय ना...!

"छट्... मोर्चा खोटा खोटा नसतोच कधी... मारा रे दगड... मालकाला शिव्या द्या!"

घोषणांचा जोर पुन्हा वाढला. मुलं चेव येऊन दगड फेकू लागली. पोलीसवालेही तुफान होऊन काठ्या मारू लागले. एकमेकांना चावे घेऊ लागले. मुलींशी झोंबाझोंबी करू लागले.

मुलांच्या ओरड्याने, मुलींच्या रडण्याने, दगडांच्या आवाजाने त्या परिसरातील सुन्न शांततेवर चरे ओढले जात होते. मुलं एकमेकांवर तुटून पडली होती. अनेकांच्या डोक्यातून रक्त येत होतं. कित्येकांचे कपडे धुळीने माखले होते. मुलींच्या झिंज्या अस्ताव्यस्त झाल्या होत्या. त्या परकर सांभाळीत, घाबरून कोठेतरी आसरा पाहात होत्या. मुलं त्यांचा पाठलाग करत होती.

मोर्चा-मोर्च्याचा खेळ पाहणारे आनंदून उड्या मारत होते. एक आवाज आला...

"मालकाच्या आईला..."

"मालकाच्या बायकोला..."

"मालकाच्या पोरीला..."

मुली या घोषणा ऐकून भीतीनं अधिकच गोठून गेल्या.

"ए अरे रॉकेल आणा..."

"जाळा... चला, ही मालकाची गाडी जाळा..."

"चला रॉकेल टाका... काडी लावा... पेटवा."

मुलांनी खोट्या गाडीवर खरं खरं रॉकेल टाकलं. मालकाच्या खोट्या खोट्या घरावर रॉकेल टाकलं. खोट्या मालकावर रॉकेल टाकलं.

सर्रकन काडी पेटवली. लावली. एकच भडका उडाला. पोलीसवाले ठण ठण घंटी वाजवत गाडी घेऊन आल्यासारखे गोलगोल फिरू लागले. मुलं बोंबा मारू लागली. भडकलेल्या आगीत काहीबाही टाकू लागली.

उन्हाची साय आता तप्त पोलादासारखी खदखदायला लागली होती. आमरण उपोषणाला बसलेलं झाड आगीच्या धुरानं काळवंडून गेलं. पेंगून पेंगून थकलेल्या बायका मुलांच्या किंचाळण्याने जाग्या झाल्या.

आगीची आच त्यांना जाणवली. त्या घाबरल्या. आगीच्या वाढत्या जोराकडे पाहून स्तंभित झाल्या. विचारू लागल्या! "काय झालं? कसं झालं?? कुणी केलं???"

त्या सगळ्या जणी आगीकडे टकामका पाहू लागल्या. तेवढ्यात मुलांचा घोळका, घोषणा देत त्यांच्याच दिशेने येऊ लागला.

नहीं चलेगी... नहीं चलेगी

हम सब...

हमारी मांगे....

मालकाच्या बायकोला...

मालकाच्या पोरीला...

बाया संतापल्या. पुढं झेपावल्या. म्हणाल्या,'रे कारट्यांनो, काय घाणेरडं बोलता मेल्यांनो..."

"हा कसला बाई खेळ..."

"जीवघेणा... जिवावरचा..."



"ये कशाला रे दगड मारतो!"

"अग बाई लागलं गऽ"

"रे रे रे चटका बसेल ना!"

"ये... गाढवा, तिचा परकर का ओढतोस... सोड तिला!"

"नाही सोडणार! आम्ही मोर्चा-मोर्चा खेळतो!"

"मोर्च्यामध्ये हे असंच असतं!"

मुलांचा घोळका आता भयानक क्रुद्ध झाला होता. त्वेषपूर्ण आवाजात घोषणा देत देत आता बायकांच्या जवळ येऊन पोहोचला. मुलांच्या घोळक्यात असकन् घुसून बाया त्यांना पकडायचा प्रयत्न करू लागल्या.

पण,

त्यातल्या काही मुलांनी पुन्हा घोषणा दिली.

मालकाच्या बायकोला...

मालकाच्या पोरीलाऽऽऽ

आणि

मुलांनी एका बाईला पकडलं.

तिच्या साडीशी झटापट करू लागली.

ती आर्तपणे किंचाळू लागली. मुलं ओरडू लागली, दगड फेकू लागली. घोषणा देऊ लागली. पेटती काठी घेऊन तिच्याभोवती नाचू लागली.

बाई घाबरीघुबरी होऊन ओरडत होती. साडीत पाय अडकून अखेर ती जमिनीवर पडली. तिच्या धपापत्या उरावर एक जण बसला आणि तिला बोचकारू लागला.

तिनं त्या मुलाकडे असहायपणे पाहिलं. त्या मुलाचा चेहरा क्रुद्ध आणि लालबुंद झालेला होता आणि त्याचे डोळे तर...

सकाळी सुरा घेऊन मोर्चाला जाताना तिच्या नवऱ्याचे डोळे असाच अंगार ओकत होते! ती पुन्हा एकदा जिवाच्या आकांताने ओरडली...

बाकीच्या बायका आपापल्या घरात पळून गेल्या होत्या. विनमस्कपणे भातुकलीच्या विस्कटलेल्या खेळाकडे पाहात होत्या. उन्हाची साय आता चवताळलेल्या नागिणीगत डंख मारू लागली होती. झाडं अगतिक होऊन मोर्चा-मोर्च्याचा खेळ पाहत होती. सारा आसमंत भीतीनं शहारून गेला.

मोर्च्याच्या खेळात अडकलेली बाई "वाचवा, वाचवाऽऽ" अशा विनवण्या

करीतच होती. मुलांच्या घोषणांचा आवाज बंद पडलेल्या कारखान्याच्या चिमणीपर्यंत जाऊन पोहोचत होता. चिमणीच्या तोंडाशी जाळं विणणारा कोळी त्यामुळे विचलित झाला होता.

शहराच्या दुसऱ्या टोकाकडेही घोषणांनी चांगलंच मूळ धरलं होतं. पोलिसांच्या शिट्या टिटवीसारख्या कर्कश ओरडत होत्या. सूं... सूं... आवाज करीत तप्त गोळ्या माणसांचा वेध घेत होत्या... माणसं जखमी पाखरासारखी आर्त फडफडत करीत होती. आभाळ पांढरंफटक पडलं होतं आणि जमीन रक्तमांसाने रंगून निघत होती. मोर्चा-मोर्च्याचा खेळ रक्तमांसाच्या चिखलात अडकून पडला होता.

●●●



साप्ताहिक सकाळ कथा स्पर्धा १९९२

# सूर

**मेधा टेंगशे**

पोस्टमननं उत्तराच्या हातात पत्रं दिली. तिनं एकेक नजरेखाली घालत अजितची सर्व पत्रं बाजूला करीत असतानाच तिच्या नावाचं एक पत्र तिला दिसलं. खूप दिवसांनी आलेलं ते पत्र तिनं लहान मुलाच्या उत्साहानं फोडलं.

नंदिताचं पत्र!

**प्रिय, उत्तरा,**

क्रांतिकारी सलाम,

पुन्हा मीच पत्र लिहितेय - तुला इथल्या कामासंबधी उत्सुकता आहे हे गृहीत धरून! कारण तुझ्याकडून गेल्या सहा महिन्यांत याबद्दल विचारणा करणारं एकही पत्र आलं नाही...

इथं वडगावमध्ये स्त्रिया हळूहळू संघटित होऊ लागल्यात. आपले प्रश्न समजून घेऊन, आपणच संघटितरीत्या सोडवले पाहितेत, याचं भान त्यांना येऊ लागलंय. सध्या फक्त प्रबोधनावर भर आहे. मुख्य म्हणजे स्थानिक प्रश्नांना आत्ताच हात घालायचा नाही, असं ठरवलंय. संघटनेची ताकद वाढण्यापूर्वीच अशा प्रश्नांना हात घातला तर काहीच हातात येत नाही असा अनुभव आहे.

**या तालुक्यातल्या शेतमजुरांच्या संघटनांमध्ये किरणही गुंतून गेलाय. समता इथल्याच जीवन शिक्षण मंदिरात जायला लागलीय; पण आर्थिक प्रश्न जीवघेणा आहे... हे आम्ही आपल्या अप्पांशी बोललो. त्यांनी एक कल्पना सुचवली. यंदाच्या दिवाळीत दिवाळी अंक काढायचा. तत्त्वाशी तडजोड तर करायची नाही; पण अंक धंदेवाईक दृष्टीनंच काढायचा, असं धोरण ठेवायचं. पैशाची तजवीज आप्पासाहेब करतील; पण साहित्य जमा करण्याची जबाबदारी माझी!**

जाहिरातीसाठी आपल्या सर्व मित्रमंडळींना सांगितलंय. अजितलाही याच पत्री हाच निरोप.

मी आत्तापासून दिवाळी अंकाच्या नेहमीच्या 'लेखकूं' ना पत्र लिहिली आहेतच, पण त्यातले बरेचसे 'इनोदी'(!) (ते निदान बायकांवर विनोद करणारी कथा लिहिणार नाहीत ही आशा!...) किंवा प्रेमाच्या त्रिकोणावर नेहमीप्रमाणे कथा 'पाडतील'!... म्हणूनच चळवळीला पूरक ठरणारं साहित्यही अंकात यावं, यासाठी आपल्या काही मित्रमंडळींना लिहायला सांगितलंय.

तू गेली चार-पाच वर्षं लेखन पूर्णपणे थांबवलंस. लग्नानंतर तर चळवळीतूनही बाहेर पडलीस. पण यानिमित्तानं तू स्त्रियांच्या प्रश्नांवर लिहावंस, सत्यानुभवावर आधारित एखादी कथा लिहावीस - जी प्रेरक ठरेल - पण त्याचबरोबर वस्तुस्थितीही लोकांसमोर येईल, अशी कथा असावी किंवा ललित लेखही चालेल. तर यासाठीच हे पत्र. बाईसाहेब, आळस सोडून चळवळीच्या पूर्वीच्या बांधिलकीला स्मरून पेन हातात घ्या. महिना-दोन महिन्यांत पाठव. वाट पाहते.

बाकी तू कशी आहेस? अमितला घडवताना चळवळीतले विचार उपयोगात आणतेस की नाही? अजितला आठवण.

येत्या आठ मार्चला महिलांचा तालुका पातळीवर मेळावा भरवतोय - सीमाताई येणारेत. कार्यक्रमाचा तपशील पाठवेनच. तूही येण्याचा (मनापासून) प्रयत्न कर.

'आठ मार्च'निमित्तानं शुभेच्छा.

**नंदिता.**



उत्तरानं पत्र मिटलं आणि डोळे मिटून ती तशीच बसून राहिली. नंदिताच्या पत्रातले मुद्दे तिच्या मनात घंटेसारखे घणघणू लागले. नंदिताच्या स्वभावातली आक्रमकता, फटकळपणा अजून आहे तसाच आहे, याचीही तिला गंमत वाटली. वाटेतले काटे बाजूला सारत सारत आयुष्य जगतानाही नंदिताची सामाजिक कामाची ओढ तशीच कायम राहिली आणि जुन्या कपड्यांचा रंग विसरून जावा तशी आपली सामाजिक कामासंबधीची बांधिलकी दिवसेंदिवस फिकी होत गेली याबद्दल तिला विलक्षण अपराधी वाटलं. खंत वाटत राहिली. तेवढ्यात दारावरची बेल वाजली.

"काही पत्रं-बित्रं...." अजितचा आत येता येता प्रश्न.

"हो तुझ्या बिझनेसची पत्रं. मला कुणाचं पत्र आलंय ओळख?"

"त्यात काय ओळखायचं? आई-बाबा-दादा वहिनी..."

"नाही! ... आपल्या जुन्या मित्रमंडळींपैकी..."

"मित्रमंडळी? नावं आठवायला हवीत ना! इथं बिझनेसमध्ये रोज नवा माणूस भेटतो...."

"नंदिताचं पत्र आहे..."

"ओह् ! नंदिता..."

"दिवाळी अंक काढतायत ते. मला कथा लिहायला सांगितलंय. सगळी बडीबडी माणसं लिहिणारेत. मी मुद्दाम लिहिणारेय खूप दिवसांनी..." ती स्वत:शीच बोलल्यासारखी म्हणाली. 'पण त्यासाठी 'कॅपिटलं'? का 'हस्तलिखित'? ... अजितच्या स्वरातली तुच्छता लक्षात येऊ नये इतकी उत्तरा त्या कल्पनेत रमली होती...

"बाईसाहेब ! चहा-बिहा देणार की नाही !..."

"सांगते... बाई... साहेबांना चहा आणा.... अजित तुला सांगू, कथा लिहायची म्हटलं की, मला पूर्वीचे दिवस आठवले मी कथा लिहायची, तू वाचायचास, मग आपण सर्व जण चर्चा करायचो..."

"हं, बाईसाहेब, तुम्ही अजून भूतकाळातच गुंग आहात. शिळं झालं ते आता सगळं. बरं, किरण्या काय म्हणतोय ? तेच दळण दळतोय का...

"आंदोलन, धरणं, उठाव, आग कुठं अन् बंब कुठं ! किरण्याच्या सात पिढ्या गेल्या तरी शेतमजुरांचा प्रश्न सुटायचा नाही. आपलं आपलं बघायचं

सोडून... बरं मी संध्याकाळी उशिरा येईन. जोगदेवांकडं पार्टी आहे...'' अजित बाहेर पडत म्हणाला.

घरच्या व्यापात उत्तरा ही गोष्ट पार विसरून गेली. नंदिताचं पुन्हा पंधरा दिवसांनी पत्र आलं आणि मग मात्र उत्तरानं कथेचं मनावर घेतलं.

सुरुवातीला तिला वाटलं, आपण कथा काय चुटकीसरशी लिहू! पावसाळ्यात उगवणाऱ्या कावळ्याच्या छत्रीसारखे रोज नवीन विषय ऐका-वाचायला मिळतात, मग विषयाला काय कमी! मग तिनं फावल्या वेळात सुचेल-दिसेल त्या विषयावर कथा लिहायला सुरुवात केली; पण बिघडलेली गाडी पाच-दहा पावलं पुढं जाऊन मग तिथंच थबकून राहावी तसं प्रत्येक कथेचं व्हायचं... मग ती उद्वेगाने, चिडून कथेचे कागद फाडून टाकायची. तिच्या आसपास असलेला अमित तिच्याकडं आश्चर्यानं पाहायचा. तिच्याजवळ येऊन म्हणायचा,''मम्मी, तुला पण आन्सर येत नाहीत! मग तू एक्झाममध्ये पास कशी होणार?'' तो गमतीनं टाळ्या वाजवायचा. आल्यावर अजित नुसतं हसायचा. परवा मात्र म्हणाला,''तुला कुणी सांगितलं नसते धंदे करायला? ...गप आपल्या घरी आरामात राहावं. मजा करावी. ते सोडून...''

ती अजितकडं पाहतच राहिली. तिला वाटलं, याच अजितनं तिच्या लेखनाच्या प्रेमात पडून तिला लग्नासंबंधी विचारलं होतं. त्यानंच असं म्हणावं? की ती त्याची 'क्रेझ' होती? आपलं कंगोरे गळालेलं, शिळं व्यक्तिमत्त्व त्याला कंटाळवाणं नसेल का वाटत? की तो आपली तेवढीही दखल घेत नाही?...

पण आपण तरी लग्नानंतर एवढे कोषात का गेलो? कुठलंच दुःख, प्रश्न मनाला भिडू नये इतके कोमट कसे झालोत? की आपल्या सुखासीन आयुष्यानंच आपल्या मनाभोवती पिंजरा केला? मग आपलं सामाजिक काम, त्यासंबंधीचं लिखाण, ही नंदिता आणि इतर मित्रमंडळींबरोबर आलेली केवळ लाट होती का?...

लग्नानंतर आत्ता पहिल्यांदाच ती अंतर्मुख झाली. स्वतःविषयी, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाविषयी विचार करायला लागली.

तेवढ्यात स्वयंपाकाच्या बाई तिच्याजवळ येत म्हणाल्या,''वहिनी, आज काशीबाई येणार नाही बरं का...?''

''का?''

''लेकीकडं जायचंय म्हणाली. जास्त नाही बोलली. तुम्हाला निरोप द्यायला



सांगितला...''

''वैताग आहे ! पाहुणे यायच्या वेळीच बरं फावतं यांना. आत्ता येतील आई-बाबा ....''

आई-बाबा तिच्याकडे येऊन स्थिरावले; पण काशीबाईचा पत्ता नव्हता. दोन दिवसांनी काशीबाई उगवली.

''काय काशीबाई, न सांगता इतके दिवस?''

''वैनी... लेकीकडं...'' काशीबाई अडखळत बोलू लागली.

''अहो, पण म्हणून न सांगता जायचं?'' उत्तराचा आवाज चढा झाला.

''वैनी, अवो लेकीच्या औक्षाच वाटुळं करायला निगाल्यात ते.''

''का? काय झालं?'' उत्तराच्या आवाजात नरमाई आली.

काशीबाईनं बसकण मारली. डोळ्यातलं पाणी पुसत ती बोलू लागली, ''वैनी, लेक माझी दिवस भरत आल्याली. पन तिची सासू तिला धाडायला तयार न्हवती. लगीन झाल्यापासून तिला एक डाव बी म्हायेरी पाटवलं न्हाय. घरात सम्दं सासूचं राज्य. न्हवरा अन् सासरा नुस्तं बैल. नन्देचा नवरा आगीत तेल ओतनारा. दर चार दिसांनी ननद नवऱ्याला कुड्यात घालून आनती आन भावजयीला सेवा कराया लावती...'' थोडा दम घेत काशीबाई पुढं म्हणाली,''कामाचं काय न्हाय पर तो नन्दोबा हिच्यावर वाईट नजर ठिऊन हाय. ही आपली गाईसारखी घाबरल्याली आसती. अवो आपल्याच घरात वावरायची चोरी...''

''तिनं नवऱ्याच्या कानावर घालायचं...''

''हिनं मस्स सांगितलं, पर त्यो म्हनतो, 'माजा म्हेवना तसा न्हाय. तुज्याच मनात पाप हाय...'' काशीबाई उसासा टाकत म्हणाली,

''वैनी, मी भांडान करून लेकीला बाळातपनाला आनलंय. तुमाला सांगते तो नंदोबा तितं याचा बंद झाला न्हाई तर मी काय लेकीला धाडायची न्हाय.''

काशीबाईच्या आवाजातली धार, आत्मविश्वास पाहून उत्तरा दचकली, तिच्याकडे पाहतच राहिली. अंगावरच्या हाडाचंच वजन बाळगणाऱ्या त्या किरकोळ जिवाची शक्ती तिला पहिल्यांदाच जाणवली.

तेवढ्यात तिचं घड्याळाकडं लक्ष गेलं.

''बरं, आज आम्हांला बाहेर जायचंय, लवकर उरका.'' आता काशीबाईनं तिच्याकडं चमकून पाहिलं. आपल्या लेकीच्या होरपळीची आपल्या मालकिणीनं दखलही घेतली नाही या भावनेनं उठून जाता जाता पुटपुटली,''काम तर काय

रोजचंच हाय वैनी...''

क्षणात उत्तराला आपल्या वागण्यातली चूक लक्षात आली.

''सगळेच दिवस सारखेच नसतात. काशीबाई, निघेल मार्ग काहीतरी...'' ती म्हणाली. पण तेवढ्यात काशीबाईनं भांड्यांना हात घातला आणि नळाचं पाणी जोरात सुरू केलं, त्यात उत्तराचे शब्द वाहून गेले. काशीबाईपर्यंत ते पोचलेच नाहीत! बाहेर जायची गडबड कितीही असली तरी आपण एवढ्या कोरडेपणानं वागायला नको होतं अशी चुटपुट उत्तराला लागून राहिली.

आठ दिवसांनी काशीबाई सांगत आली,''वैनी, माझ्या लेकीला लेक जाली. आता ती माणसं पुन्हा नाराज व्हतील, पन मी म्हणते पयली बेटी धनाची पेटी. आन पुन्ना ते आपल्या हातात आसतं का?... बगू, टपाल तर धाडलंय...''

काशीबाईनं कामाचा धबडगा उरकला. निघताना उत्तरा म्हणाली,''काशीबाई, हे घ्या २५ रुपये. औषधपाण्यासाठी असू द्यात.''

''वैनी, पगारातनं-''

तिला अर्धवट थांबवत उत्तरा हसत म्हणाली,''तुमच्या धनाच्या पेटीला भेट समजा. तिला पहिला धनलाभ झाला काशीबाई.''

''वैनी, माजी नात तिच्या आईला बी पायगुनाची ठरू दे. तिचा जाच कमी हू दे.''

''होईलही तसं. पण नाही झालं तरी राग नका धरू नातीचा काशीबाई. मोठ्यांमध्ये पोरांचा काय दोष?''

''ते बी खरंच.'' निघता निघता काशीबाईनं मान डोलावली.

उत्तराला लग्नापूर्वीचे दिवस आठवले. शिबिरातले दिवस. शिबिरातल्या स्त्रियांशी झालेला संवाद आठवला. एकमेकींची दु:खं, प्रश्न ऐकता-सांगता कालच्या अनोळखी स्त्रिया आज अगदी जवळ येऊन जायच्या. आपापसातले फरक, भिंती वाहून जायच्या आणि सर्व जणी 'बाईपणा'च्या धाग्यानं एकमेकींशी बांधल्या जायच्या.

पहिल्यांदाच तिला आपल्याभोवतीच्या एकाकीपणानं घेरल्यासारखं वाटलं... नंदिताची तीव्रतेनं आठवण झाली.

बाप रे! नंदिता!... एप्रिलचा पहिला आठवडा सुरू झालाय. अजून आपण काहीच लिहिलं नाही. कशावर लिहायचं? विषय, अनुभव भावल्याशिवाय लिहायचं नाही म्हणून तर आपण लग्नानंतर लिहिणं बंद केलं. मग आता तरी



बेगडीपणानं कसं लिहायचं?

उत्तराची अस्वथता रात्रीही कायम होती. अजितचं जीवन धावपळीचं. रोज नव्या आव्हानाचं. त्याचं बोलणंही चटकदार. त्यामुळं तिची नेहमी श्रोत्याची भूमिका. आपल्या दिवसभराच्या मिळमिळीत घडामोडींबद्दल त्याच्याशी बोलायचं म्हणजे पक्वान्नाच्या ताटात एखादा बेचव पदार्थ वाढावा, असं त्याला वाटेल, या कल्पनेनं ती अवघडायची. आजही तो तिला काहीतरी सांगत होता.

''तुझं लक्ष कुठाय?'' त्याच्या आवाजात तिखटपणा.

''काही नाही...''

''तरी पण!...''

''नंदिताला काय उत्तर लिहावं याचा विचार करत होते...''

''एवढंच ना!... मला वाटलं तुझ्यावर कोणतं आभाळ कोसळलंय!...''

''अजित, आपल्या काशीबाईंना ...!''

''आता त्यांचं काय?...''

''त्यांना नात झाली; पण सासरची माणसं फार छळतात लेकीला. शिवाय नणंदेच्या नवऱ्याची...''

''आय सी! अग, आयडिया. तू काशीबाईंच्या लेकीवरच का गोष्ट नाही लिहून टाकत...'' त्यानं टाळीसाठी हात पुढं केला. तिचेही डोळे चमकले! खरंच! आपल्या कसं लक्षात आलं नाही!... तिला वाटलं, आत्ता उठावं अन् कागद-पेन घेऊन...

दुसऱ्या दिवसापासून ती काशीबाईंशी मुद्दाम सविस्तर बोलायला लागली. तिचं म्हणणं लक्ष देऊन ऐकायला लागली. ''वैनी, पोर बाळतीन हून धा दिवस जालं... सासरचं कुणी फिरकलं न्हाय...'' काशीबाईच्या डोळ्यांत घायाळ हरिणीचे भाव होते.

''बारशाला येणार असतील काशीबाई...''

''कुटलं? पर्वा त्येंच्याकडचा एक पाव्हना आला हुता. म्हनाला, लेकीला ते नाय न्यायचं म्हनत्यात... वैनी, मला बी न्हाय हौस आली त्या आगीत लेकीला ढकलायची. पर समाज...'' मग थोडी उसंत घेत, इकडंतिकडं बघत खालच्या आवाजात म्हणाली,''वैनी, म्या ठरावलाय - जावयाला ईश्वासात घ्येयाचं आन् येगळा संसार थाटून दियाचा... त्यापायी माज्याकडचं लागंल ते इकीन आन् तिला खोली घिऊन देईन.''

"तुमच्या नातीला बघायला यायचंय एकदा..."

"काय सांगताव, काय वैनी?"

"अहो, खरंच!"

तशी ती गेलीही. त्या एवढ्याशा खोलीत काशीबाईची लेक आपल्या तान्ह्या बाळाला घेऊन, अंग आक्रसून झोपली होती. तरी ती खोली भरून गेली होती! उत्तराला पाह्यलं तशी ती उठायला लागली.

"असू दे. उठू नकोस." उत्तरा बाळाकडं बघत म्हणाली.

"आई यीलच," ती कसंबसं हसत म्हणाली. मग उत्तरानंच विषय काढला. तिला सासरी होणाऱ्या जाचाचा. काशीबाईची लेक क्षीणसं हसत म्हणाली,"अवो, आई म्हन्ती ते सम्दं खरं; पर दात बी आपलंच आन् होठ बी आपलंच. आसं त्यास्नी सोडता येतंय व्हय? तुमीच सांगा. आसं वरीसभरात येगळी चूल करनं कसं दिसंल? आमची माय पयल्यापास्नं अशी ताठ - बापाचा बी नस्ता बोल खपवून घियाची न्हाई - तिचं निभावलं म्हून सम्द्यांचंच तसं निभंल का? वैनी, तुमीच आमच्या मायला पटवून द्या. म्हनावं जरा दमानं घे." काशीबाईची लोक एका दमात बोलली. बोलून दमली, उत्तरानं तिच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं.

"आला का वैनी?" काशीबाईनं चपळाईनं आत येत विचारलं

"चहा ठिवते." म्हणता म्हणता काशीबाईचा चहा झाला सुद्धा. "वैनी, तुमी आमच्याकडं याल आसं कदी वाटलं न्हाई मला. लई बरं वाटलं मला." काशीबाई आवेगानं म्हणाली. पुढं म्हणाली,"माज्या लेकीला समजवा चार सब्दांनं. मी तिला येगळा सौंसार थाटून दिन म्हन्ते तर तीच माघार घेती. नगं म्हनती." तिनं मुलीकडं पाहिलं आणि मुलगी उत्तराकडं पाहत होती. उत्तरानं दोघींनाही समजावलं.

"बघू, ती लोकं काय म्हणतात?"

"आता ती काय म्हननार? सासू काय एकदम सुधारनार? का, नन्दोबा यियाचं बंद करनार?... आन् हिचा न्हवरा...?" काशीबाईला संतापानं शब्द सुचेना.

"आये, आसं डोस्क्यात राख नगं घालून घिवूस..."

"तू गप, तुला काय कळतंय."

काशीबाईच्या बोलण्यावर उत्तरा हसली. "बरं काशीबाई, निघते मी तब्येतीला जप ग." काशीबाईच्या हातात डिंकाचे लाडू देत उत्तरा म्हणाली. जाता जाता काशीबाईच्या आणि तिच्या लेकीच्या विचारांतला फरक तिला तीव्रतेनं जाणवला. जाणवत राहिला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी काशीबाई उत्तराकडं आली आणि गप्पकन खाली बसली. डोळ्याला पदर लावत म्हणाली,"वैनी, काल ती मान्सं आली आन् माज्या लेकीला-नातीला घिऊन गेली. मी म्हनलं, 'पंदरा दिसाची ओली बाळातीन, आजून पंदरा दिस कळ काडा...' तर सासू म्हणाली,'माज्याच्यानं काम न्हाय झेपत. लेक बाळातपनाला आली. नगं का घरात कामाला कुनी?' तर तिचा नंदोबा म्हणाला, 'पाठवायची तर आत्ताच पाठवा. न्हाई तर तुमच्याकडंच ठिऊन घ्या. जल्मभर..." काशीबाईचा बांध फुटला. उत्तरा तिच्या पाठीवर थोपटत राहिली. तिला चहा करून दिला.

दुपारी पुन्हा धुण्याभांड्याला काशीबाई आली तर थेट उत्तराच्या रूममध्येच.

"वैनी, मी आयकलं ते खरं?"

"काय?"

"हितं एक साळा का कायसी हाय; ततं ज्या बाईला सासरचा जाच आसंल तिची सोडवणूक करतात, आसं. त्या आपल्या जोशीबाई न्हवं का, त्या म्हनत होत्या..."

"आँ, हां, 'महिला संघटना'... ती बायकांचीच संघटना आहे."

"आपन जायचं ततं? तुमी याल? म्या खरं सांगते वैनी, माजं काय लक्ष लागंना जालंय कामात. पोर बाळातपनात अर्धी जाली ती सासरी पार मरून जाईल कामाच्या रेट्यानं. बघू तरी काय म्हन्त्यात त्या साळंत." पुन्हा, पुन्हा काशीबाई 'संघटनेला' 'शाळा' म्हणतायत म्हणून त्या वेळीही उत्तराला गंमत वाटली.

"थांबा, मी कांताताईंना फोन करते," तिनं महिला संघटनेच्या तिच्या ओळखीच्या कार्यकर्त्या बाईंना फोन केला आणि दुसऱ्या दिवशीची वेळ मागून घेतली.

कांताबाईंकडे त्या दोघी गेल्यावर त्या काशीबाईंना म्हणाल्या,"आम्ही तुमच्या जावयाला समजावून सांगू. त्याच्या आईशीही बोलू. पण तुमच्या लेकीची साथ पाहिजे. तिनं माघार घेता कामा नये. ती ठाम राहिली तर सासूच्या वागणुकीला आळा घालणं सोपं पडेल. तिच्या नणंदेशी बोलून, तिला विश्वासात घेता येईल.

पण सगळं तुमच्या मुलीवर अवलंबून आहे. तिची तयारी आहे का, हे आधी तुम्ही जाऊन बघा. तसं असेल तर मी तुमच्याबरोबर तिच्या घरी येईन.''

काशीबाईच्या मनाला पुन्हा हुरूप आला. पाच-सहा दिवसांनी ती लेकीकडं गेली. आली ती हतबल होऊन पराभूत झाल्यासारखी. गप्प गप्प होती. मग उत्तरानंच तिला विचारलं.

''काशीबाई, लेक काय म्हणाली?...''

काशीबाई उसळली. म्हणाली,''ती काय म्हन्तीया? म्हन्ती, 'माजं नशीब आन् मी. तू नगं ध्येन देऊस. मी न्हाय त्या बाईंकडं याची' आवो वैनी, हितल्यापरास निम्मी जाली. पन ज्याचं दुखणं त्यानंच अवसद घ्येयाला हवं. आपण हळहळून काय फायदा?''

उत्तराला काय बोलावं ते सुचेना. काशीबाईच्या लेकीनंच जर सर्व दरवाजे बंद करून घेतले तर कोण काय करणार? तिनं स्वत:ची समजूत घातली. ती म्हणाली,''काशीबाई, तुमची मात्र शाब्बास आहे. पोरीपेक्षा तुम्ही नवीन विचाराच्या आहात. आता तिला पटलं नाही तर तुम्ही काय करणार?''

''जाव द्या. तिचं नशीब तिच्याबरोबर हाय. आपन काय करनार? त्या 'वरच्या'नं सांबाळावं.... जाते वो मी,'' काशीबाई जाता जाता म्हणाली.

रात्री अजित तिला थट्टेनं म्हणाला,

''मग, कुठवर आली तुझी कथा?''

ती एकदम जागी झाल्यासारखी दचकली. म्हणाली,''अरे, खरंच की, मी पार विसरून गेले या काशीबाईच्या लेकीच्या प्रकरणात. आज वीस तारीख. आता दोन दिवसांत मला कथा पाठवायलाच हवी.''

दुसऱ्या दिवशी सकाळची गडबड संपल्यावर तिनं कथा लिहायला घेतली.

लिहिता लिहिता तिच्या लक्षात आलं. काशीबाईंच्या लेकीच्या या प्रकरणातून म्हणावं तसं निष्पन्न झालं नाही. काशीबाईनं नेट धरला तरी लेकीनं माघार घेतली. मग नंदिता म्हणते, तशी 'प्रेरक' वगैरे ही कथा कशी काय होईल? तिला एकदा वाटलं कथेत खूप बदल करावेत. काशीबाई परंपरावादी, लेक बंडखोर; पण आईला विरोध करून सासरच्या जाचाविरुद्ध लढते. नवऱ्याला पटवून वेगळी राहते. आईसारखीच धुणीभांडी करून पायावर उभी राहते... किंवा मग एकदम तिचा काडीमोडच दाखवला तर...? पण मग ही 'सत्यकथा' कशी होईल?



तेवढ्यात फोन वाजला. तिनं उचलला तर कांताताईच होत्या. त्यांनी काशीबाईच्या लेकीच्या प्रकरणाची चौकशी केली. काशीबाईंचं कौतुक केलं अन् तिच्या लेकीच्या दुबळेपणाबद्दल खंत व्यक्त केली फोन ठेवता ठेवता म्हणाल्या,''काशीबाईंच्या लेकीला भेटायची संधी मिळाली तर आपण जाऊन जरूर भेटू. बरं, उत्तरा, यानिमित्तानं तू आमच्या संघटनेकडं आलीस. तर, आता पुन्हा ये, तुझ्या पूर्वीच्या कामाच्या अनुभवांचा आमच्या महिलांना, निश्चितच उपयोग होईल. पुन्हा कामाला सुरुवात कर.''

फोन ठेवला तरी कांताताईंचे शब्द उत्तराच्या, कानात गुंजत राहिले,'पुन्हा कामाला सुरुवात कर.' तिला एकदम काय वाटलं कोण जाणे, तिनं एका सणकीत काशीबाईंच्या लेकीची कहाणी जशीच्या तशी लिहिली. काशीबाईनं डोळे मिटून लेकीचं लग्न करून देणं, तिच्या लेकीला होणारा सासूचा जाच, नणंदेच्या नवऱ्याची तिच्यावर वाईट नजर, काशीबाईची बंडखोर वृत्ती, पण लेकीच्या कचखाऊ वृत्तीमुळे या प्रकरणावर पडलेला पडदा... सारं काही!

तिनं नंदिताला सोबत छोटंसं पत्र जोडलं.

'नंदिता,

मी माझ्याच घरच्या कामवाल्या बाईच्या मुलीची कहाणी जशीच्या तशी घडली तशीच लिहिलीय. काहीही बदल न करता!... ही कहाणी तशी नेहमीचीच; पण तिनं माझ्यातली 'कार्यकर्ती' अन् 'लेखिका' दोन्हीही पुन्हा जाग्या केल्या. म्हणूनच या कहाणीसंदर्भातला माझ्या मनाचा प्रवासही तपशीलवार लिहिलाय.

या कहाणीनं मला खूप वर्षांनी माझा सूर पुन्हा गवसलाय. मी पुन्हा काम-लेखन सुरू करतेय.

तुला वरचेवर कळवीनच.

तुझ्या-किरणच्या कामाला शुभेच्छा.

उत्तरा...

●●●

# कालनिर्णय

**दीपक पारखी**

३१ डिसेंबरची रात्र अंगावर घेत दारू चढत होती. नशेच्या लहरीनं बाराचे ठोके ऐकले व ती स्थिरावली. हातातला अर्धामुर्धा ग्लास तसाच ठेवून केतकीनं माझ्या ओठांवर ओठ टेकवत म्हटलं,''हॅपी न्यू इयर!''

तिच्या भावनांना प्रतिसाद देत मी म्हटलं,''हॅपी न्यू इयर यू टू!''

आशाआकांक्षा घेऊन आलेल्या नववर्षाच्या शुभेच्छांनी एकमेकांना गुदरमवून टाकत मी टेबलाचा खण ओढला. लाल वेष्टणात गुंडाळलेलं पार्सल हाती घेत म्हटलं,''केतकी, हिअर इज अ प्रेझेंट फॉर बोथ ऑफ अस.''

तिनं घाईघाईनं पार्सल फोडलं. आतल्या गुबगुबीत कव्हर असलेल्या नववर्षाच्या दोन डायऱ्या हाती घेत तिनं माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. तिची नजर झेलत मी म्हटलं,''एक डायरी तुझ्यासाठी, दुसरी माझ्यासाठी. ४ मे - आपल्या लग्नाच्या वाढदिवशी या डायऱ्या आपण एकमेकांना वाचायला द्यायच्या... एकमेकांना जोखायचं. पडत असू तर सावरायचं. उभारत असू तर प्रोत्साहन द्यायचं. ओके?''

आता ३ मेची रात्र अंगावरून उतरत होती. पहाटवाऱ्यात सकाळी मी केतकीला मिठीत घेतलं. माझ्यापासून स्वतःला मोकळं करत टेबलाचा खण तिनं ओढला. किंचित मळलेली डायरी तिनं माझ्या हाती ठेवली व म्हटलं,''मंगेश, माझ्या सहनशीलतेचा अंत न बघता मला तुझी डायरी हवीय.''



तिच्या उत्सुक चेहऱ्याकडे टक लावून बघत मी म्हटलं,''ही घे!'' डायरीची गुबगुबीत कव्हरं एकमेकांना भिडली. बेडवरच्या परस्परटोकांच्या टेबललॅम्पखाली परस्परांच्या डायऱ्यांचं वाचन सुरू झालं.

**सोमवार :**

मंगेशनं डायरी दिलीय, म्हणजे स्वतःच्या अपेक्षांचं ओझं माझ्यावर टाकलंय. त्याच्या प्रामाणिक हेतूचं कोरडं ॲप्रिसिएशन करणं अवघड ठरणार आहे. माझ्यासारखी केवळ गृहिणी या डायरीत काय लिहिणार? मुलांबद्दलच्या, मंगेशबद्दलच्या भावना फक्त डायरीत नोंदवून माझं समाधान होणार आहे की काय? हे खरं तर मला आवाहन आहे. मी काहीतरी वेगळं करावं, स्वतःची ओळख स्वतः करून घ्यावी, त्याला करून द्यावी, या अपेक्षा बाळगून तो सुटला; पण मी... मी पुरी अडकलेय. माझ्याकडून त्यानं सतत अपेक्षा बाळगणं एरवी किती सुखाचं ठरलं असतं; पण माझी कुवत, माझ्या मर्यादा... मी त्यानं दबून जातेय. पिचून जाणं मला सोयीचं वाटेल; पण त्याचा कोंडमारा... मला त्याच्यासाठी तरी डायरीत नोंदी करायला हव्यात; पण या नोंदींमागं व पुढं काहीतरी उद्दिष्ट असायला हवंय. मी अशा प्रकारचा विचार करणं, हेच तर त्याचं यश आहे. त्याच्या या यशाला तितक्याच समर्थपणे सामोरं जायला हवंय. मी काय करू, म्हणजे त्याचं समाधान होईल?

**२ जानेवारी :**

सालं हे डायरीचं लफडं आपण काढलं आणि पस्तावल्यासारखं झालं. केतकी डायरीत इमानदारीनं लिहितेय आणि आपण बघत बसलोय, ही शिक्षा किती सहन करायची? मनात खूप गोष्टी येतात; पण मनाजोगत्या गोष्टी घडणं आपल्या हाती नाही. मग आपल्या हाती काय? फक्त प्रश्नचिन्ह? ३ मे रोजी आपली डायरी ती वाचेल. त्यात काय, तर सकाळी उठलो, दात घासले, चहा प्यायलो, हे लिहायचं, की अंथरुणावर पडलो, झोप येत नाही म्हणून केतकीला त्रास दिला, त्रास करून घेतला हे लिहायचं? नो नो! काही तरी छान लिहायला हवं. म्हणजे नेमकं काय? आपली मध्यम वर्गाची, मध्यम मार्गाची आयडेंटिटी विसरून जायला हवं. काहीतरी भव्यदिव्य, उदात्त... च्या मारी, नुसते शब्दांचे बुडबुडे! छट्...

**५ जानेवारी :**

बाबरी मशीद पडली. आपण अस्वस्थ झालो. ही अस्वस्थता कशाची होती? अंगात हिंदू रक्त असून या कर्मात आपण आसुसून भाग घेतला नाही याची होती, की

या मूर्ख कृत्याची आपल्याला मनस्वी चीड येतेय, धर्मनिरपेक्षतेची भावना आपल्या हृदयात वसत नाही, याची खंत होती? यात भर म्हणून अलीकडे शेषन, खैरनार आपला पिच्छा पुरवतायत. या लोकांसारखं आपल्याला होता येईल? आपल्या हातातील माफक सत्तेमुळे यांच्यासारखा मार्ग आपल्याला नक्की अनुसरता येईल. कँटिनमध्ये चहा पिताना यांच्या धवल कृत्याचे गोडवे गात, आयुष्य कृतीशिवाय घालवणं तरी जमणार आहे का? तसला मुर्दाडपणाही जमत नाही. आपली मतं... 'चॅरिट बिगिन्स ॲट होम' ही वचनं.... यांचं नेमकं काय करायचं? येस, ठरलं. प्रामाणिकपणानं, तडफदारपणं या भ्रष्ट यज्ञातील समिधा आपण थांबवायच्या. सुरुवात केव्हा करायची? उद्या... नको... आज! आत्ताच!

**गुरुवार :**

विमनस्क मनःस्थितीत अपेक्षांचं ओझं उतरविण्याचा मार्ग म्हणून मी झपाटल्यासारखं वाचन करतेय. दिशा सापडावी म्हणून थोरामोठ्यांची चरित्रं वाचतोय; पण यातून काय साधतंय? या मोठ्या व्यक्तींबद्दलचा आदरभाव वाढतो; पण मी मात्र चाचपडतोय. एवढं आणि एवढंच पुरेसं नाही. माझ्या आयुष्याला दिशा मिळायला हवीय. एखादी नोकरी करावी तर अपुरं शिक्षण आड येतंय. आत्मविश्वासाअभावी स्वतंत्रपणे एखादा व्यवसाय स्वीकारता येत नाही. व्यवसायासाठी थोडंफार भांडवल मंगेश देईल; पण मी आरंभशूर तर ठरणार नाही? मग सारंच संपलं. हे गृहिणीपणाचं ओझं हटवायला हवं. आत्मसिद्ध बनायला हवं.

**शुक्रवार :**

पहाटे एकटीच फिरायला गेले होते. नेहमीच्या आडरस्त्यावरून फिरताना नेहमी किती मजा वाटायची! आजूबाजूला राहणाऱ्या लोकांशी मोजकं बोलत मी चालत राहायची; पण आज मात्र कुणाशीच बोलावंसं वाटत नव्हतं. रोज भेटणाऱ्या लोकांची दखल घ्यायची इच्छा होत नव्हती. फिरता फिरता एका बंगल्यावरच्या पाटीकडे लक्ष गेलं - 'निवारा केंद्र'.

पाटीच्या खाली बारीक अक्षरांत काही लिहिलं होतं, ते वाचण्यासाठी जवळ गेले. त्यावर लिहिलं होतं, 'बौद्धिक अपंगांसाठी काम करणारी संस्था.'

पाटी वाचली अन् एक शिरशिरी अंगातून निघाली. काहीतरी गवसल्यासारखं वाटलं. खरं तर आता घरी जायला हवं होतं. मंगेशचा डबा, मुलांचं आवरणं हे



करायला हवं होतं; पण या कर्तव्याचा विसर पडल्यासारखं झालं. सरळ त्या बंगल्याच्या गेटपाशी उभे राहिले. आवारात एक भला मोठा कुत्रा टवकारून माझ्याकडे पाहत होता. एरवी कुत्रा नुसता बघितला तरी माझे पाय लटपटायचे; पण आज मला त्याची तमा बाळगावीशी वाटत नव्हती. कुत्रा बांधलेला आहे, याची पुसटशी खात्री करून घेत मी आत गेले. दर्शनी दरवाजाची बेल वाजवली. दार उघडलं जाईपर्यंत त्या बंगल्याचा सुखवस्तूपणा न्याहाळला. दार उघडताच एका वयस्कर सौम्य व्यक्तीनं म्हटलं, ''नमस्कार! काय हवंय आपल्याला?''

त्या व्यक्तीच्या ॲप्रोचनं मी भारावून गेले. त्यांनी हात केलेल्या दिशेला सोफ्यावर स्वतःला ठामपणे बसवून घेत म्हटलं, ''मला आपल्या संस्थेची माहिती हवीय.''

''माझं नाव पुणतांबेकर. संस्थेअगोदर मी माझी माहिती तुम्हाला देतो. पूर्वी मी 'पदमजी'मध्ये फोरमन होतो. मला तीन मुलं. थोरला मुलगा सी.ए. आहे. त्यानंतरची मुलगी कॉम्प्युटर इंजिनिअर आहे. ती सध्या अमेरिकेमध्ये असते. धाकटा मुलगा २२ वर्षांचा आहे. मात्र तो मेंटली रिटार्डेड आहे. त्याच्यासाठी खूप पैसा खर्च केला व खस्ताही खाल्ल्या. पैसा असूनही त्याची होणारी आबाळ मला अस्वस्थ करून गेली. त्याला आहे ते आयुष्य व्यवस्थितपणे जगता यावं म्हणून मी खूप ठिकाणी फिरलो, वाचन केलं आणि त्याच वेळी मनात विचार आला, की अशा तऱ्हेच्या इतर मुलांसाठी काय व्यवस्था आहे? अन्य ठिकाणच्या व्यवस्थेत मला खूप त्रुटी दिसल्या, सुधारणांना वाव दिसला, तेव्हा मी माझं जीवितकार्य निश्चित केलं. नोकरी सोडली आणि गेल्या वर्षी अशा मुलांसाठी ही संस्था सुरू केली. एक गोष्ट प्रांजळपणे सांगतो, ही संस्था फक्त भरपूर पैसा खर्च करू शकणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी आहे; पण या वर्गाची ती गरज असल्यानं या संस्थेत सध्या १५ मुलं आहेत. त्यांना मुलं म्हणणंही बरोबर नाही. कारण त्यांचा वयोगट २ ते ३५ हा आहे.

''या मुलांसाठी त्यांच्या कुवतीनुसार शिक्षण यात पुस्तकी शिक्षणाचा भाग फार कमी; पण जगणं सुसह्य होण्यासाठी, शारीरिक हालचाली सुलभ होण्यासाठी आवश्यक शिक्षण दिलं जातं. रोज फिजिओथेरपिस्ट येतात व या मुलांच्या अवयवांना आकार देण्याचा प्रयत्न करतात. मी प्रयत्न एवढ्यासाठी म्हणतो, की यातून आम्हाला फार मोठी आशा नाही. मुलं एकदम धट्टीकट्टी बनतील अशी अपेक्षा नाही; पण त्यांचं रोजचं जिणं सुसह्य व्हावं व आपल्या मुलांची कुणीतरी काळजी घेतंय, हा दिलासा पालकांना मिळावा इतकंच मर्यादित उद्दिष्ट आहे. आपण पत्रकार आहात

की सोशल वर्कर?''

पुणतांबेकरांचा माझ्याबद्दल चांगलाच गैरसमज झाला होता. त्यांच्या केंद्राची एखाद्या वृत्त संस्थेसाठी मी माहिती घेतेय, असं त्यांना वाटलं होतं. माझ्या चौकसपणानं, दिसण्यानं त्यांचा असा गैरसमज होतोय, हेही मला आश्वासक वाटलं. घाईघाईनं मी खुलासा करत म्हटलं,''तुमची इच्छा व गरज असेल तर या केंद्रात काम करावं, अशी माझी इच्छा आहे.''

एवढं वाक्य मी बोलले आणि पुणतांबेकर उल्हसित झाले. ''उद्यापासून या'' म्हणाले.

मला तर समजेनासं झालंय, की या फंदात पडावं की न पडावं? निदान विश्वासात घेऊन मंगेशशी बोलावं का? नकोच... त्याच्या सल्ल्यानं माझं स्वतंत्रपण मी घालवीन. असं काही काम मी करतेय, हे त्याच्यापासून लपवण्यातच फायदा आहे. नाहीतरी डायरीची ही पानं तो लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी वाचणारच आहे.

**६ जानेवारी :**

कालच्या भावनांशी प्रामाणिक राहत गोखलेसाहेबांच्या केबिनमध्ये गेलो आणि म्हणालो, ''साहेब, मीरचंदानीचं रस्त्याच्या डांबरीकरणाचं काम तुम्ही आपटे व मी-आम्हां दोघांकडे सोपवलंय. गेली तीन-चार वर्षं आम्ही जोडीनं, सहकार्यानं काम करतोय; पण यात माझी, माझ्यातल्या इंजिनिअरची कुतरओढ होतेय. मला माझ्या पद्धतीनं काम करून घ्यायला आपटेच्या उपस्थितीनं अडथळा येतोय. हा अडथळा नेमका कशाचा, हे तुम्ही जाणता. त्याच्या अफाट चिकाटीनं, विनातक्रार काम करण्यानं सगळे काँट्रॅक्टर 'आपटे' करतात. मी त्याच्याबरोबर काम करतो; पण त्यात कुठंतरी मला लिंबूटिंबूची वागणूक मिळते. मला हे नकोय. आय वाँट टु एस्टॅब्लिश माय ओन आयडेंटिटी आणि परवाच तुम्ही म्हणालात, की आता आपल्याला व्यवस्थित काम करून घ्यायचं असेल तर आपटे माईट बी मेजर ऑब्स्टॅकल. मी आपटेच्या यशावर, स्थानावर जळतोय, असा कृपा करून गैरसमज करून घेऊ नका; पण व्यवस्थित कामासाठी मला दोन गोष्टींची आवश्यकता भासतेय. एक - हे काम मी एकट्यानं करावं आणि दोन - या कामात वरकमाईची मी अपेक्षा धरणार नाही व मला साथ देण्यासाठी आपणही हा मोह सोडायला हवा.''

गोखलेसाहेबांचे डोळे खूप बोलके आहेत. ते वाचायला आपल्यासारखाच संवेदनाशील माणूस हवा. त्या क्षणी त्यांच्या डोळ्यांत कुठले भाव होते? आपल्याविषयी, आपल्या निर्णयाविषयी, निर्णय अमलात आणण्याच्या कृतनिश्चयाविषयी कौतुक होतं, की या नव्या जन्म घेत असलेल्या प्रवृत्तीविषयी काळजी होती? नेमकं काय होतं हे समजत नव्हतं; पण खळबळ मात्र होती. हे आपलं यश होतं, की भ्रमनिरास?

गोखलेसाहेबांनी येस म्हटलं व पुढ्यात दुसऱ्या विषयाची फाईल ओढली. ही मला जा म्हणून सांगायची खूण होती. मी जाताना मागे वळून पाहिलं. त्यांनी फाईल मिटून ठेवली होती.

**९ जानेवारी :**

आजचा दिवस उत्साहात गेला. साईटवर गेलो. मीरचंदानी कॉन्ट्रॅक्टरला खूप भोसडलं. या कामावर मी एकटा आहे. आपटे नाहीत व मी एकटाच राहणार आहे, याची जाणीव करून दिली. रस्त्याची प्राथमिक मोजमापं घेतली. कामाच्या तरतुदी अभ्यासल्या. मोजमापांवर आधारित लागणाऱ्या मटेरिअलची क्वांटिटी काढली.

साईटवर मीरचंदानीला ज्या गोष्टींची जाणीव करून दिली होती, त्या साऱ्या गोष्टी नमूद करणाऱ्या पत्राचा मसुदा तयार केला. साहेबांपुढे सहीला ठेवला आणि आश्चर्य म्हणजे साहेबांनी त्या मसुद्यात बदल तर काही केलाच नाही; पण जादा वाक्य लिहिलं, की प्राथमिक मोजमापांवर मीरचंदानीने संमतिदर्शक स्वाक्षऱ्या कराव्यात.

फिल्डिंग तर उत्तम लागली होती. बॅट्समनची थोडीही चूक त्याला आऊट करणार होती. माझ्या बॉलिंगमध्ये मी प्राण आणायची खोटी होती.

मी विजयी नजरेनं आपटेकडे पाहत होतो. त्याच्या चेहऱ्यावर कुठे अस्वस्थता दिसतीय का, हे तपासून पाहत होतो. तो शांत होता. त्याच्या कामात मग्न होता आणि त्यामुळेच मी अस्वस्थ होतो. तो खंतावलाय हे दृश्य मला पाहायचं होतं; पण त्याच्या पाऊलखुणा दिसत नव्हत्या.

**बुधवार :**

संस्थेत कामाला जायला लागून चार दिवस झालेत. या चार दिवसांतल्या नोंदी मी केल्या नाहीत. माझी मतं ठाम नव्हती. त्यामुळे अपरिपक्व विचार नोंदवणं मला फ्रस्ट्रेट करणारं ठरलं असतं; पण आज मी मनाशी स्थिरावलेय, म्हणून डायरी लिहितेय. गेले चार-पाच दिवस रोज दोन-तीन तास संस्थेत जातेय. काम करायला खूप स्कोप आहे. मुख्य म्हणजे आपली तिथं गरज असल्यानं आपल्याला

आवश्यक मान मिळतोय, याची खात्री पटतेय. त्यामुळे उद्यापासून पूर्ण वेळ म्हणजे दुपारी १२ ते ५ जाणार आहे. मंगेश व मुले ऑफिस व शाळेमुळे बाहेर असतात. त्यामुळे मी असं काही करतेय, हे लिक व्हायचे चान्सेस नाहीत. खरं तर रोज रात्री मंगेशच्या निकट जाताना हे सारं सांगायचा मोह आवरत नाही; पण चार मे ही तारीख डोळ्यांपुढं आली, की हे सारे मोह टाळायचं बळ येतं. अन् हे डायरीचं खूळ डोळ्यात आल्यापासून मंगेश तरी कुठं फारसं बोलतोय आपल्याशी. आपण दोघांनीही डायरी कोशात राहायचं ठरविल्यानं चूक तर होत नाही ना? रोजच्या जगण्यात वाद नाही, संवाद नाही. जे काही व्हायचं ते चार मे रोजी संयुक्त वाचनानं होईल.

**शुक्रवार :**

बौद्धिक अपंगत्वाची कारणं काय असतात, असं संस्थेतल्या फिजिओथेरेपिस्ट डॉ. वर्तकांना विचारलं, तेव्हा ते म्हणाले, ''काही मुलं ही जन्मतःच अपंग व बौद्धिकदृष्ट्या निम्न स्तरावरची असतात. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे अशा मुलांच्या वेळी दिवस राहणं हा आईवडिलांच्या दृष्टीनं अपघात असतो. त्यामुळे गर्भ पाडण्यासाठी आया औषधं घेतात. ही औषधं सूट न झाल्यानं गर्भ पडत नाही; पण व्यंग घेऊन जन्माला येतो.

''दुसरा प्रकार म्हणजे मूल जन्मतः नॉर्मल असतं; पण आजारपणात घेतलेली औषधं, त्यांचं अतिरिक्त प्रमाण त्याला सूट होत नाही किंवा अतितापाने मेंदूला इजा होते. वेळच्या वेळी औषधोपचार न होण्यानंही नॉर्मल मूल ॲबनॉर्मल वाढत राहतं.

''तिसरा भयानक प्रकार म्हणजे बाळंतपणाच्या वेळी नॉर्मल मूल जन्माला येताच ते वजनकाट्यावर ठेवण्याचं काम हॉस्पिटलमधील नर्सेस करतात. डॉक्टर त्या वेळी मुलाच्या आईची काळजी घेण्यात मग्न असतात. अशा वेळी या नर्सेस/आया यांच्या हातून मूल अपघातानं खाली पडून डोक्याला मार बसू शकतो किंवा फोर्सेप पद्धतीत मूल जन्माला येताना मुलाच्या डोक्याला दुखापत होण्याची शक्यता असते.''

डॉक्टरांनी हे मला सांगितलं व एकदम भानावर येऊन विचारलं,''बाई, हे सांगण्यात माझी चूक तर नाही ना झाली? बहुतेक नसावी. कारण तुमच्या वयाकडे पाहून तुमची बाळंतपणं संपलेली असावीत.''

डॉक्टरांचा हा प्रश्न ऐकून, आपली बाळंतपणं संपलीत हा केवढा दिलासा मला मिळाला. नको ग बाई ते गर्भारपण, बाळंतपण हे आपण एरवी म्हणतो त्याला



हेही एक परिमाण आहे, हा नवा शोध व बोध मला मिळाला.

आपल्या धडधाकट मुलांकडे बघून नेहमी मला किती छान वाटायचं; पण आता हे छान वाटणं किती वेगळ्या प्रकारचं आहे.

**१६ जानेवारी :**

माझ्या साईटवरच्या वागण्यानं मीरचंदानी हवालदिल झाला होता. त्याचं एक टुमणं चालू होतं,''साहेब तुम्ही खा, आम्हांलाबी खाऊ द्या.''

एकूण माझा ॲप्रोच यशस्वी झाला होता. कामाची गती मंदावली होती. यात मी समाधान मानायचं का? गती मंदावणं हे आपलं यश, की आपली काम करून घ्यायची क्षमता नाही हे सिद्ध करण्याची सूचकता होती? आपण जशी फिल्डिंग लावतोय, तशी मीरचंदानी, आपटेही फिल्डिंग लावत नाहीत ना, अशा शंका मनात आणता उपयोगी नाहीत. या शंका आपल्या नव्या मार्गात अडथळे ठरतील. नो, नो. वुई मस्ट स्टँड ऑन फर्म फुटिंग्ज.

**२२ जानेवारी :**

आज मीरचंदानी पुन्हा आला. आपटे व तुम्ही दोघांनी मिळून काम करा. त्यात तुमचा फायदा आहे. आपटेच्या उच्चीच्या ग्रहांचा आजपर्यंत तुम्ही फायदा घेतलात, तो अजूनही घ्या. त्यात तुमचं भलं आहे, असं वारंवार सांगत राहिला. ही मला ढवळण्याची क्लृप्ती आहे. मी यात फसता कामा नये. आपल्याला अपेक्षित यश समोर दिसतंय. गो अहेड, आय ॲम वुईथ यू. मी माझ्याच मनाला बजावलं.

**२८ जानेवारी :**

केतकीचं मनापासून डायरी लिहिणं कालपरवापर्यंत आपल्याला काळजीत टाकणारं वाटत होतं; पण आता ती भावना गेली. ती नेमकं काय लिहितेय, याची कल्पना नव्हती; पण आपण मात्र काहीतरी चांगलं लिहितोय, याचा दिलासा वाटतोय. केतकीला आपण कॉम्पिट करतोय, हा विश्वास वाढतोय. आपल्या मनातली खळबळ तिला सांगावी का? नको. मग तीन मेच्या रात्री ती काय वाचणार? बारीकसारीक गोष्टी तिला सांगायचा परिपाठ थोपवणं जड जातंय; पण ती कुठं आपल्याशी बोलतेय, की तीही तीन मेच्या रात्रीसाठी सगळं राखून ठेवतेय, की तिच्याकडे बोलण्याजोगं काहीच नाही?

तिच्या चेहऱ्यावर नवी झळाळी जाणवतीय. नक्की ती डायरीतून आपल्याला काहीतरी जबरदस्त गोष्ट देणार आहे.

**५ फेब्रुवारी :**

ऑफिसात पाऊल टाकलं, तर माझ्या खुर्चीमागे एक स्टीकर चिकटवला होता - 'अन्यायाविरूद्ध न झगडता गप्पा राहण्यानं आपण लोकांना भेकड बनवतो.'- अब्राहम लिंकन.

कुणी हा स्टीकर लावला असेल? आपलं आजपर्यंतच वर्तन हे भेकडासारखंच होतं; पण हे आपलं एकट्याचंच होतं का? अवतीभोवतीचा प्रत्येकच कमी-अधिक प्रमाणात भेकड म्हणून जगतोय. मग आपल्या मागे हा स्टीकर... आपण जास्त भेकड असल्याचं कुणालातरी सुचवायचंय. मूर्ख आहे लेकाचा. माझा सध्याचा उद्योग त्याच्या कानावर पडलेला नसावा. मी माझी आयडेंटिटी बदलतोय, हे त्याच्या गावीही नसावं... सॅल्युट टू मि. शेषन, खैरनार... अँड मी ऑल्सो!

**शुक्रवारी :**

गेल्या पंधरा दिवसांत खूप मुलं बघितली. मुलांची कीव करताना मला जास्त कीव त्यांच्या पालकांची यायला लागलीय. ज्यांना अजिबात जाणिवाच नाहीत, त्यांची कीव करणं व ज्यांना खूप जाणिवा आहेत, बरंचसं भोगल्यानं जे पालक संवेदनशील झालेत त्यांची कीव करणं, यांत फार मोठा फरक करायला हवाय. या सर्वस्व गमावलेल्या पालकांविषयी सहानुभूती ठेवणं मला जास्त महत्त्वाचं व गरजेचं वाटतंय. या पालकांची मनःस्थिती जाणून घेणं, हे मला व्यसनच जडू पाहतंय. यामध्ये स्वतःची मानसिक गुंतवणूक करून न घेणं व स्वतःला त्रास करून न घेणं हे जमणं अवघड आहे; पण ते करायला हवंय, जमवायला हवंय. नाही तर मी इथं कामच करू शकणार नाही. हे मी स्वतःला बजावतेय. हे सारं मंगेशला सांगितलं असतं, तर त्यानं असाच सल्ला दिला असता. या पार्श्वभूमीवर मंगेशचा विचार करायला लागले, की मन भरून येतं. तो माझा मार्गदर्शक आहे, की सखा? तो यातला कुणीच नाही. तो माझा फक्त नवरा राहायला हवा. या दिवसभराच्या वागण्यात मी व मुलं, मंगेश आणि मी या नातेसंबंधांचा विसर पडायला नकोय. मंगेशच्या आधारानं जगताना मंगेशलाही आधार द्यायला हवा.

**१३ फेब्रुवारी :**

गोखलेसाहेबांच्या केबिनमध्ये बसलो असता, बाहेर मीरचंदानी आलेला दिसला. मी साहेबांना म्हटलं,''आपलं काम करून घ्यायच्या पद्धतीविषयी आपण पत्रातून मीरचंदानीला कळावलंय; पण त्याचा परिणाम म्हणून त्याचं साईटवरचं माझ्याशी वागणं बदललंय. संबंधांमध्ये एक ताण जाणवतोय. असं काम करायला



मला अजिबात आवडत नाही. आपण त्याला बोलावू. दोघं मिळून त्याच्याशी सविस्तर बोलू. थोडंसं ताणून धरल्यानंतर कुठपर्यंत सैल सोडता येईल, याची त्याच्याशी चर्चा करून आणि हा फाजील तणाव संपवून टाकू.''

माझी नजर टाळत गोखलेसाहेबांनी संमती दिली. मीरचंदानी आत आला. त्याच्याशी इकडचंतिकडचं बोलून साहेबांनी अनपेक्षितपणे त्याला विचारलं, ''मीरचंदानी, साईट व्यवस्थित चाललीय ना? आमच्या स्टाफकडून काही त्रास...''

मीरचंदानीला आता कुठं कंठ फुटला. तो उत्साहानं म्हणाला,''साहेब, तसा त्रास करून घेणाऱ्यातली आम्ही माणसं नाही आणि आमच्यामुळे कुणाला त्रास होणारबी नाई. आपलं काम पद्धतशीर आहे. रस्त्याची ग्रेड, कॅंबर सर्व करू पुस्तकातल्याप्रमाणं. आमाला काय फकस्त पैसा नाय कमवायचा. इज्जतबी, तुमच्या लोकांची और आमचीबी.''

जेव्हा माणसाला स्वतःची त्रुटी समजते, तेव्हा ती त्रुटी आमच्यात कशी नाही, हेच तो आवर्जून सांगतो, हा माझा अनुभव होता. मीरचंदानी जेव्हा म्हणतोय, आम्हाला फक्त पैसा कमवायचा नाही, तुमची इज्जत राखायचीय, तेव्हा त्याचा स्पष्ट अर्थ एकच होता, तुमची इज्जत गेली तेल लावत. आम्हाला पैसा मिळाला पाहिजे.

अशा प्रकारचा संवाद एका डेप्युटी इंजिनिअरचा कॉन्ट्रॅक्टरशी... माझ्या मनात खळबळ माजत असतानाच साहेबांनी त्याला थेट दुसरा प्रश्न टाकला, ''मीरचंदानी, तुम्ही साईटवर किती डांबर वापरणार आहात?''

माझा कडेलोट होत असताना मीरचंदानीने शांतपणे म्हटलं,''टेंडर प्रोव्हिजनच्या ५० टक्के....''

माझी डोक्याची शीर उडत असताना साहेब पुढे म्हणाले, ''नाही मीरचंदानी. मला कल्पना आहे. तुम्ही टेंडर ३५ टक्के बिलो भरलं आहे; पण आम्ही चांगलं काम करून घ्यायचं ठरवलंय. मी इतरांकडून ९० टक्के डांबर टाकून घेणार आहे; पण आपले संबंध लक्षात घेता तुम्ही निदान ८० टक्के डांबर तरी टाकलं पाहिजे.''

''नाय सायेब, इतकं परवडायचं नाय... फार झालंच तर आमी ६० टक्के डांबर टाकू,'' मीरचंदानी पुटपुटला.

मी अवाक होत गेलो. एका अधिकाऱ्याचं हे कॉन्ट्रॅक्टरशी बोलणं. खरं तर किती डांबर टाकणार, हा साहेबांचा प्रश्नच गैरलागू. त्यात हिंमत धरून कॉन्ट्रॅक्टर

५० टक्के म्हणतोय. या क्षणी त्याला धक्के मारून बाहेर काढायला हवंय; पण साहेब तर... या पद्धतीनं तो डोक्यावर मिरे वाटील.

मी काहीसा शांत झालो. परिस्थिती वेगळं वळण घेऊ पाहतीय. यातून आपलं म्हणणं रेटण्यासाठी मी थोडं खाली येत म्हटलं, "नो मीरचंदानी. साहेबांचा मान राखून तुम्ही ८० टक्के डांबर टाकायला हवं. तुम्हाला येणारा खर्च... ३५ टक्के बिलो टेंडर या गोष्टी लक्षात घेतल्या तरी हे फार होतंय. कदाचित आजवर आम्ही देत असलेल्या सवलती तुम्हाला हक्क वाटायला लागलेल्या दिसतायत. फार तर मी तुम्हाला अॅश्युअर करतो. तुम्ही ८० टक्के डांबर टाकणार असाल, तर रस्त्याच्या बेसमध्ये लागणाऱ्या मटेरिअलमध्ये मी सवलत देतो; पण वरचं काम मला परफेक्ट पाहिजे. त्यात आमची शान राहील."

आम्हा दोघांकडे आळीपाळीने पाहत मीरचंदानी म्हणाले, "साहेब, आमचीबी राहू दे, तुमचंबी राहू दे. मी ७० टक्के डांबर टाकतो."

त्या क्षणी मी उसळून म्हटलं, "हा काय मंडईतला भाजीपाला आहे? आम्ही इंजिनिअर आहोत. घिसाडी नाही."

मला शांत करत साहेब म्हणाले, "मी फायनल सांगतो. ८० टक्के डांबर तरी मीरचंदानी तुम्ही टाकाच." आणि माझ्याकडे बघून म्हणाले, "मीरचंदानी ८० टक्के डांबर टाकतील की नाही, याची जबाबदारी मी तुमच्या एकट्यावरच सोपवीत नाही. मी पर्सनली चेक करीन."

"नाही साहेब, माझ्या या गृहस्थाच्या ७० टक्के डांबर टाकण्यावरच्या वचनावरही बिलकूल विश्वास नाही. हा गृहस्थ एक जळू आहे. रक्ताची याला चटक आहे. हा माणूस विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नाही आणि साहेब, स्पष्ट सांगतो, तुम्ही म्हणताय, की मी स्वतः यात लक्ष घालीन. माझा यावरही विश्वास नाही. माफ करा मीरचंदानीसमोर तुमच्यावर अविश्वास दाखवतोय; पण आपण तरी कॉन्ट्रॅक्टरसमोर काय बोलावं, याचे संकेत कुठे पाळताय? ही इज ब्लडी चीट."

समोरच्या ग्लासामधलं पाणी पीत शांत होऊन मी म्हटलं, "ओके. बट आय वुईल मायन्युटली ऑब्झर्व्ह दॅट ही इज कंझ्युमिंग दॅट ब्लडी एटी परसेंट ऑफ डांबर."

**२० फेब्रुवारी :**

माझा क्षोभ बऱ्यापैकी शांत झाला होता. साईटवर काम चालू होतं. मीरचंदानीचं ओल्या पार्टीचं निमंत्रण मात्र मी नाकारलं होतं. पार्टी नाकारण्यात एकारलेपण होतं



का? होतंच. कारण मी सोडून सगळे होते. गोखलेसाहेब अन् आपटेदेखील.

**सोमवार :**

या सगळ्या मुलांमध्ये माझं लक्ष समीर साठे या मुलानं जास्त वेधून घेतलंय. समीरचं वय जवळ जवळ पाच वर्षांचं आहे; पण तो बसूदेखील शकत नाही. कायम उताणा असतो. बदल म्हणून त्याला पालथं करावं लागतं किंवा लोड-तक्क्यांच्या साह्यानं बसवावं लागतं. डॉक्टर रोज त्याला मसाज करतात. हातापायांचे व्यायाम देतात. समीरबरोबर येत असलेल्या त्याच्या आजोबा-आजींच्या म्हणण्याप्रमाणं, इथं यायला लागल्यापासून त्याच्यात खूप फरक पडत चाललाय. त्याच्या आजोबांच्या कृतकृत्य चेहऱ्याकडे पाहिलं, की गलबलल्यासारखं होतंय. त्याच्या आजोबांच्या चेहऱ्यावरच्या समाधानाइतकी समीरमध्ये प्रगती दिसतीय का, असा प्रश्न मनाशी विचारणंही गैर वाटतंय. समीरच्या प्रगतीला आपली फुटपट्टी कुचकामी आहे. त्याच्या आजोबांना मिळणाऱ्या दिलाशाला मोजणारी फुटपट्टी मला अनुभवातून, दृढनिश्चयातून मिळवायला हवीय.

समीरपेक्षाही त्याला सांभाळणाऱ्या, त्याची शुश्रूषा करणाऱ्या, श्री. साठे आजोबा यांनी 'अपॉईंट' केलेल्या नारायण या मुलाकडे माझं लक्ष जास्त केंद्रित होतंय. संपूर्ण दिवस-रात्र हा नारायण (वय वर्षे ११) समीरबरोबर असतो. त्याचं काय काय करतो तो... सगळंच. जे जे विधी स्वतःचे म्हणून समर्थपणे तो करतो, ते ते विधी हा नारायण समीरचे, तो परावलंबी असल्याने करवतो. अगदी साधी गोष्ट. नारायण स्वतःची चड्डी बदलताना जसा टॉवेल गुंडाळतो, तसाच टॉवेल तो समीरच्या कमरेभोवतीही त्याची चड्डी बदलताना गुंडाळतो. खरं तर समीरचे कपडे बदलताना इतकी काटेकोर काळजी घ्यायची काय गरज असते? पण नाही. या नारायणला स्वतःचं अस्तित्व नाही. अद्वैताची व्याख्या करायची असेल, तर नारायणकडे पाहावं.

**गुरुवार :**

नारायणचा विचार करता करता माझंच मन कावरंबावरं व्हायला लागलंय. समीरसारख्या अपंग मुलाची शुश्रूषा करण्याच्या नादात हा नारायण स्वतःही पंगू बनतोय. उजाडल्यापासून झोपेपर्यंत हा समीरची सेवा करतोय. याचं स्वतःचं काय? नाही शिक्षण, नाही बालसुलभ खेळणं. याचा बोनसाय होतोय. हा शरीरानं वाढेल; पण नंतर... समीरप्रमाणेच यालाही बौद्धिक अपंगत्व येईल. हा शिकत का नाही?

आजूबाजूला कुणी नसताना हा प्रश्न मी त्याला विचारला. त्याचं समाधानकारक उत्तर तो देऊ शकला नाही. माझी शिकायची इच्छा नाही, एवढंच तो म्हणतोय; पण बोलताना तो माझ्या नजरेला नजर देत नाहीय. शिक्षण न घेणं, हे त्याच्यावर पैशासाठी कुणीतरी लादलं? कुणीतरी म्हणजे कोण? नारायणचे आई-बाप... त्यांना समजायला हवंय. येणाऱ्या पैशानं आपण सुखावतोय; पण नारायणच्या भावी आयुष्याचं काय?

**२५ फेब्रुवारी :**

गेले दोन-चार दिवस माझं त्या स्टीकरकडे वारंवार लक्ष जात होतं. मला डिवचण्यासाठी लावल्या गेलेल्या त्या स्टीकरनं चांगलं काम केलं होतं. माझा निश्चय निग्रहात परिवर्तित होत होता. आपटेचं काय चाललंय, हे पाहण्याकरिता त्याच्या टेबलाकडे नजर टाकली. टेबल रिकामं होतं. मला तर त्याचं अस्तित्व हवं होतं. माझ्या सततच्या नजरेनं त्याचा ध्यास घेतला होता.

प्युनला मी विचारलं,''आपटे कुठायत?'' त्याचं उत्तर आलं,''ते वाढूळ सायबांच्या केबिनमधी बसल्याती.''

आपटे परत यायची मी वाट पाहत राहिलो. दुपारचा एक वाजला होता. मला वाट पाहणं त्रासाचं वाटत असतानाच निरोप आला,'गोखलेसाहेबांनी बोलावलंय.'

मी रुबाबात केबिनमध्ये गेलो. आपटे माझी नजर टाळत समोरच्या कागदांवर लक्ष केंद्रित करत होता. आपटेकडे पाहत गोखलेसाहेबांनी मला जुन्या कामांविषयी विचारलं. त्याबाबत अनेकदा केलेल्या सूचना परत एकदा केल्या व ते शांत बसले. त्यांचं सांगणं संपलं, असं वाटून मी उठत असतानाच त्यांनी मला बसायची खूण केली.

मी परत बसलो. काही क्षण कुणीच बोलत नव्हतं. अखेर शांततेचा भंग करीत साहेबांनी बेल वाजवून प्युनला कॉफी आणायला सांगितलं व घाईनं म्हटलं,''आपल्या मीरचंदानीच्या कामाविषयी बोलायचंय. मी असं ठरवलंय, की त्या कामाचे दोन भाग करायचे. त्यातला एक भाग तुम्ही व दुसरा आपटे पाहतील. मीरचंदानीला द्यायची बिलं पूर्वीप्रमाणेच तुम्ही दोघं मिळून...''

साहेबांचं वाक्य अर्धवट तोडत मी तिडकीनं म्हटलं,''हा बदल तुम्ही करताय, की बदल करायला तुम्हाला कुणी भाग पाडतंय?''

एरवी मी शांत व्हायची गोखलेसाहेब वाट बघायचे; पण आज प्रथमच मी



क्षुब्ध असूनही काहीशा निश्चयानं त्यांनी म्हटलं,''तसं काही नाहीय. इतर कामांमुळे मला अगोदरच टेन्शन डेव्हलप झालीत. यू नो, मला बीपीचा त्रास आहे. या परिस्थितीमध्ये मला वर्किंग स्मूथ पाहिजे. परवा तुम्ही माझ्यासमोर मीरचंदानीवर अविश्वास दाखवलात, त्यानं तो दुखावला गेलाय. त्यामुळे वर्किंग स्मूथ राहणं अवघड झालंय. मीरचंदानीबाबतची तुमची मतं मला १०० टक्के पटतायत. आय ॲम टोटली कन्व्हिन्स्ड; पण माझा नाईलाज झालाय. तेव्हा तुम्ही दोघं मिळून...''

साहेबांचं वाक्य अर्धवट तोडत मी म्हटलं,''ते शक्य नाही. हवं तर सारं काम आपटेलाच बघू देत. आय विद्ड्रॉ मायसेल्फ. आपटेला या कामावर इंट्रोड्यूस करून तुम्ही माझ्यावर पोलीस बसवताय. मीरचंदानी दुखावला गेल्याची तुम्हाला खंत आहे; पण मी दुखावला गेल्याचं तुम्हाला काहीच नाही. आपटेला या कामात ओढणं अन् तेही मीरचंदानीच्या सांगण्यावरून, याचा अर्थ काय होतो? हे तर मीरचंदानीपुढं सपशेल लोटांगण आहे. धिस इज नॉट ॲट ऑल लेक्झिबिलिटी इन ॲडमिनिस्ट्रेशन.

''आपटेचं येणं याचा अर्थ मीरचंदानीच्या नोटा छापण्याच्या कारखान्याला अभय आहे. तो आपटेला, तुम्हाला गृहीत धरतोय. नोटांच्या चवडी कमावताना चार-दोन नोटा फेकून, तुम्ही त्या नक्की उचलाल, याची त्याला बालंबाल खात्री आहे, हे तुम्हा दोघांना त्यानी गृहीत धरण्यातून जाणवतंय. तुमची इमेज त्याच्या लेखी काय आहे, याचा विचार करा. चाललंय हे ठीक नाही.''

आपटेकडे आधारासाठी पाहून गोखले साहेब पुढे म्हणाले,''मी तुमच्याकडून काम काढून घेतोय असं नाही. निम्मं काम तुम्हीच करा. मला समजत नाही, आजपर्यंत तुम्ही एकत्र कामं व्यवस्थित केलीत, मग आत्ताच...''

''नाही साहेब, मी आपटेसमोर सांगतो. मला या गृहस्थाबरोबर काम करायला कधीच मजा वाटली नाही. ही इज अ क्लासिक एक्झॅम्पल ऑफ रोबो. आपटेच्या अनुभवामुळे, जबरदस्त सिन्सिॲरिटीमुळे कामाच्या ड्रायव्हिंग सीटवर कायम तो बसतोय. मला आता दुसऱ्या स्थानावर बसायचा मनस्वी कंटाळा आलाय. आय ॲम टोटली फेडअप.''

''तसं नाही. मी तुमच्या भावना समजू शकतो. पाहिजे तर यापुढची कामं तुम्ही स्वतंत्र करा; पण हे काम मात्र...''

''नो सर. यापुढे कशाला, अगदी आज या क्षणापासून मी स्वतंत्रच काम

करीन. हे काम पूर्णपणे आपटेंना द्या.''

''ठीक आहे, मग पुढचं दुसरं काम तुम्ही स्वतंत्रपणे...''

''हे तरी मी खरं का मानावं? या दुसऱ्या कामातही मीरचंदानी इंटरेस्टेड असू शकतो मग पुन्हा पहिले पाढे पंचावन्न.''

गोखलेसाहेब काहीच बोलत नव्हते. माझं बोलणं तर कधीच झालं होतं. मी उठून चालता झालो. बाहेर येऊन कधी नाही ती विल्सऐवजी चारमिनार पेटवली.

**शनिवार :**

नारायणला शिकायची इच्छा नाही, की पैशासाठी त्याच्या आई-बापाची त्याला शिकवायची इच्छा नाही, या सत्याचा जास्त विचार करता एक वेगळंच सत्य मला जाणवू लागलं. नारायणनं शिकू नये, ही साठे आजोबांची इच्छा आहे. एरवी तोंडदेखली 'नारायणनं शिकावं', अशी इच्छा ते प्रदर्शित करतात; पण मनातून त्यांना तसं मुळीच वाटत नाही. कारण नारायण शिकू लागला, तर महत्त्वाकांक्षी बनेल, स्वतःचा विचार करू लागेल, अन् मग आपल्या नातवाचं आज ज्या पद्धतीने तो करतो, त्या पद्धतीनं तो करील का? नक्कीच नाही. त्यापेक्षा त्याला शिकण्याची इच्छा होणार नाही व तो कायम आपल्या नातवाच्या सेवेत राहील, असं नारायणशी वागणंच साठे आजोबांना सोयीचं आहे. एका अपंग मुलासाठी दुसऱ्या मुलाच्या धडधाकटपणाचा असाही बळी घेतला जाऊ शकतो, हे सत्य पचवणं कठीण जातंय.

साठे आजोबांच्या एरवीच्या हळव्या, हळुवार वागण्या-बोलण्याला माझी ही भावना छेद देतेय. मी नकळतपणे आजोबांवर अन्याय तर करीत नाही?

याविषयी पुणतांबेकरांशी बोलावं का? नको. एखाद्या माणसाचा पूर्ण अभ्यास, अंदाज न घेता बोलण्यानं मंगेशची किती वेळा गोची झालीय ते मी अनुभवतेय. मात्र नारायणविषयी काहीतरी चांगला विचार करणं मला आवश्यक आहे.

**३ मार्च :**

पाच-सहा दिवस मी नुसताच बसून होतो. आपटेचं काम शांतपणे चाललं होतं. गोखलेसाहेबांनी मला बोलावून विचारलं,''मग तुमचं काय ठरलं? आपटे व तुम्ही मिळून मीरचंदानीचं काम...?''

''साहेब, तो विषय केव्हाच संपलाय.''

''माझी अडचण वेगळी झालीय. कार्यकारी अभियंता नवीन आलेत. त्यांना कुठली कुठली कामं कुठल्या कुठल्या इंजिनिअरकडे आहेत ते कळवायचंय.



तुमच्या नावावर काहीच काम न दाखवणं, हे तुमच्या व माझ्यासाठी योग्य नाही. म्हणून मी परत एकदा विचारतोय. तुमचा दोघं मिळून काम न करण्याचा निश्चयच असेल, तर निदान कागदावर तरी मी तसं दाखवू का? रादर आय रिक्वेस्ट, नॉट टू प्लेस मी इन ऑक्वर्ड पोझिशन.''

काहीच न सुचून मी ठीक आहे म्हटलं. कागदोपत्री माझं नाव टाकायला संमती दिली.

गेल्या आठवड्यातला हा उलटा प्रवाह आपल्याला कुठे नेऊन ठेवणार आहे? विचार करायचा नाही, असं ठरवलं तरी मी विचलित होईन की काय, अशी शंका यायला लागली; पण यातून मला आपटेनंच आज सोडवलं.

दुपारी आपटेनं मला म्हटलं,''चल जाऊ आपण मीरचंदानीच्या कामावर.'' मी त्याला ठामपणे नकार दिला. मीरचंदानी तुला त्या कामात का ओढतोय, याची पुन्हा जाणीव करून देण्यासाठी म्हटलं,''मीरचंदानी इज नॉट फूल टू ब्रिंग यू. ही वॉन्ट्स मालप्रॅक्टिस इन द वर्क आणि सगळ्यात वाईट म्हणजे यात तू नक्की सहकार्य देशील, असं त्याला वाटतंय. माझी प्रामाणिक इच्छा सांगतो, आता हे काम तुझ्याकडे आलंय. तुला तो गृहीत धरणार हे लक्षात ठेवून तू तुझ्या स्वभावाच्या विरुद्ध त्याला वेसण घाल. मला तेही समाधान पुरेसं असेल.''

आपटे माझं म्हणणं ऐकून घेतोय, या समाधानात मी असतानाच त्यानं म्हटलं,''मग तू मीरचंदानीच्या कामावर येत नाहीस तर...? ठीक आहे. या कामात मला जे काही पैसे मिळतील, त्यातले निम्मे मी तुला देईन.''

आपटे हे वाक्य म्हणाला आणि माझी दोन दिवसांतील सैरभैरता काबूत आली. मी निश्चयापासून विचलित होईन की काय, ही शंका येत असतानाच आपटेच्या निम्मे पैसे देण्याच्या बोलीनं मी ढवळून निघालो. आपल्या कृतीमागची भावना या माणसाला कधीच कळणार नाही, असं वाटून गेलं. निश्चय बळावला. माघार नाही, कधीच नाही.

**८ मार्च :**

आज घरी जरा लवकरच परत आलो. केतकी घरात नव्हती. किल्ली जवळ नसल्यानं बाहेरच वेळ घालवावा लागला. थोड्या वेळानं ती आली. काहीशी दचकल्यासारखी वाटली. काहीच बोलली नाही; पण तिचा चेहरा समाधानी वाटला. एकदा वाटलं, की विचारावं कुठं गेली होतीस? पण उत्तराऐवजी तिनं विचारलं, तू आज लवकर का आलास? तर... जाऊ दे. झाकली मूठ सव्वा लाखाची. तिनं चहा

करून द्यावा म्हणून वाट पाहत बसलो, तर ती आजूबाजूला दिसेना. बेडरूममध्ये डोकावलं, तर ती एकाग्रपणे डायरी लिहीत होती. मग तर तिला काही विचारायची हिंमतच झाली नाही.

**१२ मार्च :**

घडून गेलेल्या घटनांचा क्रम पाहिला असता माझ्यापुढे मोठा प्रश्न आहे, तो मी मला स्वीकारण्याच्या स्वरूपाचा. आपटेला काम देण्याबरोबर मीही त्या कामात असावं, असं साहेब म्हणाले होते. तेव्हा या कामावर मी तरी असेन किंवा आपटे तरी... असं म्हणून मी बाहेर पडलो. यातून असं बाहेर पडण्यात शूरपणा होता, बाणेदारपणा होता, अंगीकारलेल्या तत्त्वांशी प्रामाणिकता होती, की मीरचंदानीच्या यापुढील कृतीला (जी आपटेला आत आणून दिशा दाखविणारी होती.) सामोरं न जाण्याचा भेकडपणा होता? आपली स्वतःविषयीची मतंच ठाम नाहीत, याला कदाचित आपला भूतकाळ कारणीभूत असावा. आजपर्यंत वरकमाईची संधी आपण कधीच दवडली नव्हती. आता अचानक आपण आपला पवित्र बदलतोय, हा दांभिकपणा आहे, की वृत्तीतला सात्त्विक बदल?

मनाची ही संभ्रमित अवस्था संपवायला केतकीच्या मिठीत शिरायला हवं होतं. तिला विश्वासात घेऊन तिची मतं आजमावयला हवी होती. हे एरवी मी केलंच असतं; पण या डायरी प्रकरणातून माझ्याच वाटा मी बंद केल्यात.

**१८ मार्च :**

अकल्पितपणे गोखलेसाहेबांचा विचार केला, तर त्यांच्या कोलांट्या उड्या अनपेक्षित आहेत; पण त्यामागे एक लॉजिक नक्कीच आहे. त्यांना नुसतं काम करून घ्यायचं नसतं, तर ते रेटायचं असतं. कॉन्ट्रॅक्टरकडून चार पैसे फक्त स्वतःसाठी मिळवायचे नसतात, तर वरच्या अनेक भुजंगांची तहान भागवायची असते. डोळ्यांपुढं येऊ घातलेलं प्रमोशन मिळवायचं असतं. हे साहेबांचं झालं; पण आपटेचं काय?

तो तर माझा उत्तम सहकारी आहे. माझ्यावर प्रेम (?) करणारा आहे. अडल्यानडल्या वेळी सर्व प्रकारची मदत करणारा आहे. स्मूथ वर्किंगमधला पायाभूत घटक आहे. गोखलेसाहेबांचा डौल आणि आसन स्थिर करायची जबाबदारी त्यानं स्वीकारलेली आहे. माझ्यासारख्या माणसाचा अडथळा ओलांडून काम रेटणं, ही त्याची व ऑफिसची जबाबदारी त्यानं स्वीकारलेली आहे. म्हणून तो असा वागतोय?



त्याला पैशाचा मोह आहे का? पैसा जमा करणं हे त्याचं व्यसन आहे का? तसंही वाटत नाही. कारण वारेमाप पैसा उधळणाऱ्याला हाव असते, हे साधं समीकरण त्याच्या बाबतीत लागू होत नाही. मग त्याची माझ्याशी गद्दारी का?

मीरचंदानीनं, हे काम आम्ही दोघांनी मिळून करावं, असा प्रस्ताव मांडला. गोखलेसाहेबांनी आपटेला भरीस घातलं असणार... त्याला तो नाही म्हणू शकला नाही. म्हणजे नकार देणं त्याच्या स्वभावात नाही. येस हेच एक कारण.

या गृहस्थाला कशाचीच आवड नाही; पण तरीही तो सगळ्यांत असतो. कुणी त्याला दारू प्यायला चल म्हटलं.... हा लगेच येतो. ट्रीपला चल म्हटलं, तर हा हो म्हणतो; पण या साऱ्या उपभोगांच्या बाबतीत तो स्वतःला झोकून खूप आनंद घेताना दिसत नाही. सगळ्यांत असूनही तो अलिप्त राहू शकतो, म्हणजेच भिडेखातर तो कुणाला नाही म्हणू शकत नाही. तर्क फारच ताणला, तर कदाचित हा आपल्या पत्नीला, शरीरसंबंधाची इच्छा नसतानाही नकार देऊ शकत नसणार. कुठल्याही प्रयोजनाला नकार न देता येणं, हीच त्याची खरी कमतरता आहे आणि हेच त्याच्या लौकिक यशाचं रहस्य आहे.

**बुधवार :**

आज बाबूला व्यायामाच्या सायकलवर बसवून पॅडल मारायला लावलं. बाबूचं शारीरिक वय २२ आहे; पण बुद्धी केवळ दोन-अडीच वर्षांच्या मुलाएवढी. पॅडल क्लॉकवाईज मारणं कुठं थांबवायचं, ॲन्टिक्लॉकवॉईज कधी सुरू करायचं, हे शिकवायचा प्रयत्न केला; पण त्याला ते काही जमेना. मग खाली उतरवलं. वेगवेगळ्या आकाराचे ठोकळे साजेशा आकाराच्या भोकात घालण्याचं तंत्र मी त्याला समजावून देऊ लागले, तेव्हा माझा हात हातात धरून, 'बाई, तुम्ही इथं बसा' म्हणून आग्रह करायला लागला. त्याला स्पर्शाची, मायेची गरज आहे, हे ओळखून मीही त्याच्याजवळ बसले.

डॉक्टर लांबून ते पाहत होते. मला त्यांनी बोलावलं व म्हटलं, "बाई, तुम्ही एक पथ्य पाळायला हवंय. या मोठ्या मुलांना स्पर्शाची संधी देता कामा नये. कारण त्यांची बौद्धिक वाढ झालेली नाही; पण बाकी वाढ... आणखी एक सांगतो, त्यांच्या मनात जेव्हा त्या भावना आकारतात, तेव्हा आवाजातील हा बदल तुम्ही सरावानं ओळखू शकाल; पण सावधगिरीची सूचना देणं, हे माझं कर्तव्य आहे."

डॉक्टरांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना मला चटकन आठवलं, लग्नाआधी

माझा बालमित्रही एकदा माझ्याशी बोलताना घोगरा झाला होता.

**२५ मार्च**

मीरचंदानीच्या कामासंबंधी मी सतत आपटेवर लक्ष ठेवून आहे. त्याच्यावर नक्कीच परिणाम होतोय, याचे संकेतही मला मिळतायत. त्यांनी केलेलं मीरचंदानीचं बिल मी नजरेखालून घातलं. मी घेतलेल्या प्राथमिक मोजमापापेक्षा फार वेगळं काही त्यात आढळत नाही. त्याच्या हाताखालच्या ज्युनिअर स्टाफकडे चौकशी करता, नेहमीपेक्षा काम जास्त व्यवस्थित चाललंय, याची ग्वाही मिळत होती. बिल तयार झाल्यानंतर मीरचंदानीची होणारी तडफडही आपटेमधल्या राईट ॲप्रोचच्या खुणा दाखवत होती. आता मीरचंदानीला तक्रारीला जागाच नव्हती. मी खूप आनंदात आहे. मला हवं तसं घडतंय, आपटेकडून अनपेक्षितपणे माझीच वाट चोखाळली जातीय.

संध्याकाळचा प्रसंग तर दृष्ट लागण्यासारखा होता. मीरचंदानीच्या सुपरवायझरला तो ऑफिसच्या बाहेर एकांतात भोसडत होता. 'आपटेसाहेब, आज पार्टीला या', या त्या सुपरवायझरच्या निमंत्रणाला आपटेनेच नकार दिला होता.

आपटेचं हे अपवाद ठरू पाहणारं नकारात्मक वागणं मला माझं यश वाटत होतं. आपटे मला आवडू लागलाय. मला आस लागलीय आपटेबरोबर दारू पीत बसण्याची. गोखलेसाहेबांविषयीची कटुता कमी होत होती. मीरचंदानीविषयीची चीड मात्र वाढतेय. म्हणजे माझ्या मनाने पैलतीर गाठला नव्हता. मन समतोल राखून होतं.

**८ एप्रिल**

काल रात्री केतकी खूपच लाडात आली व म्हणाली,''मंगेश, मला आता हे सहन होत नाही. मरू दे तो लग्नाचा वाढदिवस. मला तुझी डायरी वाचायची ओढ लागून राहिलीय.''

त्या वेळी केतकीच्या डोळ्यांत पाहत मी म्हटलं,''ओठात एक पोटात एक.''

''म्हणजे?'' तिनं विचारलं.

''म्हणजे खरी ओढ तुला माझी डायरी वाचायची नाही लागली. ती लागलीय तुझी डायरी वाचायला द्यायची.''

''तू म्हणजे असा आहेस,'' असं करून ती जी मिठीत शिरली की यंव्व. हा क्षण मुद्दाम डायरीत नोंदवतोय. कदाचित या क्षणावर माझं म्हातारपण सुखात



जाईल.

**शुक्रवार**

साठे आजोबा व्हील चेअरवर नातवाला घालून आत आले. नारायण ती गाडी ढकलत होता. केंद्राच्या शेडपाशी येताच व्हील चेअरवरून नारायण व आजोबांनी समीरला उतरवून खाली ठेवलं व आजोबा इतर कुणाशी बोलत बसले. नारायणनं बालसुलभ वृत्तीनं स्वतःला व्हील चेअरमध्ये स्थानापन्न केलं व तो गाडी फिरवत राहिला. ते पाहताच साठे आजोबा त्याच्यावर खेकसले, ''नारायण, ही गाडी तुझ्यासाठी आहे का?''

त्यांचा प्रश्न नारायणला त्याची स्वतःची जागा व आपली मालकी दर्शविणारा होता; पण त्या प्रश्नाचे किती वेगळे संदर्भ माझ्या मनात दाटले. ''नारायण, ही गाडी तुझ्यासाठी आहे का?'' नाही, नारायण, तू स्वतःला पंगू बनवू नकोस. तू तुझा स्वतःचा घडला पाहिजेस. तुला शिकायला हवंय. तुझं स्वतःच जग निर्माण करायला हवंय... हवं तर त्यासाठी मी...

किती वेगळा विचार मनात स्फुरला होता. खूप गवसल्याचा आनंद झाला. अनेक हेतू मनात बाळगून मी केंद्रात आले होते; पण हा एकमेव हेतू घेऊन मी राहिले तर... नारायणला मी शिकवलं तर... मनानं खूप मोठा आळस दिला. नारायणला शिकवायचं मोठं आव्हान डोळ्यांपुढं नाचू लागलं.

**मंगळवार**

साठे आजोबा नसताना मी नारायणला शिक्षणाची महती, गरज समजावली. मला शिकायची इच्छा नाही, हे तो तोंड चुकवून, डोळे पुसत सांगत राहिला. मी पुन्हा त्याला शिकायला उद्युक्त करत राहिले. माझ्या समजावण्यानं तो थकत होता. मी उभारी देत होते. शेवटी मनाचा हिय्या करून त्यला म्हटलं,''हे बघ नारायण, समीर आता पाच वर्षांचा आहे. तू अकरा वर्षांचा आहेस. आपण असं धरून चालू, की समीरचं सगळं तू करत राहिलास. त्यामुळे तो १७-१८ वर्षांचा होईल, त्या वेळी तू २३ वर्षांचा असशील आणि तो दिवस येईल. समीर या जगात नसेल. कारण या मुलांचं आयुष्यही लहान असतं. त्या वेळी तू २३ वर्षांचा असशील; पण तुझी अवस्था मात्र आजच्यासारखीच ११ वर्षांची असेल. तुला हमाली करण्यावाचून दुसरा पर्याय असणार नाही.

''नारायण, तू शहाणा हो. अगदी आजपासून तू माझ्याजवळ शिकायला बस.'' नारायणने मान फिरविली. मी विचार करत राहिलेय, माझं काही चुकतंय?

**१० एप्रिल**

गोखलेसाहेब आठवडाभर रजेवर असल्यानं निवांत होतो. माझ्या टेबलाशी एस्टॅब्लिशमेंटचा क्लार्क सपकाळ उभा राहिला व त्यानं एक कागद हातात दिला. त्यावर माझी बदलीची ऑर्डर होती. कार्यकारी अभियंता यांनी माझी दुसऱ्या सबडिव्हिजनला बदली केली होती.

स्वतःला स्थिर करत मी समोर पाहिलं. आपटे कामात व्यग्र होता.

**१३ एप्रिल**

नव्या सबडिव्हिजनमध्ये मी चार्ज घेतला. नव्या राहतेकर साहेबांसमोर बसलो. त्यांनी उत्साहानं माझा हात हातात घेऊन म्हटलं,''सुस्वागतम्! नव्या गृहयोजनेचं काम तुमच्याकडे सोपवतोय. या कामासाठी तुमची मागणी, मी कार्यकारी अभियंता यांच्याकडे आवर्जून केली. आय होप, यू विल फाईंड कंफर्टेबल इन माय सबडिव्हिजन.'' दुपारीच नव्या योजनेच्या कॉन्ट्रॅक्टरचा - मे. दिघे कंपनीचा इंजिनिअर माझी भेट घ्यायला आला. अतिशय देखणं, रुबाबदार व्यक्तिमत्त्व होतं. स्वतःचा परिचय करून देत सरळ विषयालाच हात घालत म्हटलं, ''मंगेश, (पहिल्या नावानं पुकारण्याची ही स्टाईल मला खूपच अनोळखी, हवीहवीशी वाटली.) या स्कीमचं काम आपण धडाक्यानं सुरू करू. इतर सिंधी/वडारी लोकांसारखी आपली कामाची पद्धत नाही. आय जस्ट ॲश्युअर यू. कामात कुठलीही तडजोड आम्ही करणार नाही, तुम्हाला करायला सांगणार नाही. काम व्यवस्थित, स्पेसिफिकेशन्सप्रमाणं होईल. आमची कंपनी रेप्युटेड कंपनी आहे. आमचा कुठल्याही फालतू गोष्टींवर विश्वास नाही. पुन्हा रेटही आम्ही भक्कम मागितलेत व आम्हाला सुदैवानं मिळालेतही. त्यामुळे काम जलद, क्वालिटी राखून होईल आणि हेही सांगतो, आम्ही तुम्हांला, साहेबांना साईटवरच्या इतर स्टाफला व्यवस्थित एंटरटेन करू, याविषयी खात्री बाळगा.''

तो इंजिनिअर गेला आणि मी कामाच्या तरतुदी अभ्यासण्यासाठी फाईल हाती घेतली. अतिशय रास्त स्पेसिफिकेशन्स, व्यवस्थित प्लॅनिंग दर्शवणारी ती योजना आहे, कामाचे रेट चांगले आहेत, या त्याच्या वाक्यानं मी कामासाठी येणारा खर्च व प्रत्येक चौ. फुटाला येणारा खर्च काढला अन् अवाक झालो. जे काम बाहेरचे बिल्डर २५० रु. चौ. फुटांत करत होते, त्याच कामासाठी आम्ही ३१२ रुपये मोजणार आहोत.

कामाची क्वालिटी नक्कीच चांगली राहणार होती; पण हा जादा पैशाचा बोजा



आम्ही कुठून घेणार होतो? अर्थात कस्टमरकडून. त्यांची ऐपत आहे? ऐपत नसेल तर या स्कीमला कस्टमर उचलून धरतील?

ऐपत नाही, पण काळा पैसाही द्यायला नाही म्हणून हे कस्टमर आमच्याकडून घरं घेणार. आम्ही त्यांना या रेटने उत्तम घरं देणार.

खरंच, याची गरज आहे का? थोड्याशा इन्फिरियर क्वालिटीची; पण कमी किमतीची घरं देणं जास्त श्रेयस्कर ठरणार आहे.

आता मी संघर्ष कुणाशी करायचा? कामात क्वालिटी हवी म्हणून संघर्ष केला. आता क्वालिटी कामाची आवश्यकता नाही म्हणून संघर्ष करायचा?

**शुक्रवार**

आजचा दिवस विलक्षण होता. नारायण माझ्याजवळ येऊन म्हणाला. ''बाई, आजोबा मला सांगत होते, की रोज संध्याकाळी ते येथून तासभर टेकडीवर फिरायला जाणार आहेत. डॉक्टर काकांनी त्यांचा फोटो काढून त्यांना टेकडीवर जायला सांगितलंय.''

''मग?'' मी त्याच्याकडे न बघताच म्हटलं. त्यावर माझ्या नजरेचा अंदाज घेत तो म्हणाला,''त्या वेळात मी तुमच्याजवळ शिकायला बसू?''

मला भडभडून आलं. नारायणला शिकायची इच्छा नाही, हे खोटं होतं. त्याला आजोबा समोर असताना शिकायचं नव्हतं, हे खरं होतं.

**गुरुवार**

आज तीन मे. नारायणला माझ्याजवळ बसायला लागून आठ दिवस झालेत. त्याची ग्रहणशक्ती बरी आहे. मी कृतार्थ आहे. माझी उमेद खूप वाढलीय.

माझं हे रहस्य उद्या डायरी वाचल्यावर मंगेशला समजणार आहे. त्याची प्रतिक्रिया काय होईल? इज ही अनप्रेडिक्टेबल मॅन?

**२ मे**

आज दोन मे. उद्या रात्री ही डायरी केतकी वाचेल. तिला काय वाटेल? आपल्याविषयी प्रेम... आदर वाटेल, की नवं खूळ म्हणून ती संभावना करेल? असं होणार नाही. कारण तिच्या मनाची मशागत अव्याहतपणे गेली १२ वर्षे मी करतोय. फुटलेले कोंब जमिनीला न्याय देतील. शी इज मोस्ट प्रेडिक्टेबल लेडी.

●●●

# काळोख

**वृंदा दिवाण**

सहजच झोपेतून कल्याणीला जाग आली. नेहमीच येत असे तशी. पापण्यांचे पडदे विलग झाले. डोळे सताडपणे उघडे ठेवले होते; मात्र भोवतीची चिरपरिचित, रोज जाग येताच व्हावी तशी जाणीवच होत नव्हती.

खोलीतल्या वस्तू नजरेत भरत नव्हत्या. त्यांच्या प्रतिमांची चित्रं मनात जाणिवेला उतरत नव्हती. तिची जागीच चुळबूळ झाली.

आणि तिला जाणवलं, की भोवती काळोख दाटून आहे. गच्च खोली भरून दाट थरांनी पसरून आहे. इतका गडद काळोख, की खोलीतल्या नेहमीच्या वस्तूही जाणवत नाहीत. नुसताच गडद अंधार... आटीव!

तोच वाऱ्याचा झोत खोलीत घुसला. खिडक्यांची दारं फाडफाड एकमेकांवर आपटली आणि बाहेर जोरात पडत असलेल्या पावसाची जाणीव झाली. उघड्या खिडकीतून गार वाऱ्याची लाट तिच्या शरीरावर येऊन आदळली. तिचं शरीर शहारलं.

तिनं खिडकीच्या दिशेनं मान वळवून पाहिलं. पाऊस आणि वारा यांचं थैमान जाणवत होतं. दृष्टीला मात्र काही दिसत नव्हतं. निसर्गाचं अक्राळविक्राळ स्वरूपातलं तांडवनृत्यच बाहेर असावं असं वाटत होतं.

तिनं हात लांबवून चाचपून पाहिलं. कल्याणीला बागेश्री आणि केदार लागली. अगदी गाढ झोपले. पलीकडं सरकून झोपलेल्या बागेश्रीला तिनं जवळ ओढून घेतलं



आणि पडून राहिली. निपचितपणं.

उठून तरी काय करायचंय, असं तिला वाटलं खोलीभरून अंधार आणि वेळ रात्रीची. रात्रीच्या कुठल्या प्रहराची माहीत नव्हतं. तसं कळून तरी उपयोग होता? गौतम घरी नव्हता. केव्हा परतणार आहे माहीत नव्हतं. दिवसाचे तास लोटत त्याची वाट बघत राहायचं होतं. तो कधी, केव्हा परतणार आहे, तिला माहीत नव्हतं. तिच्याशी तसं काहीही न बोलता तो खाडखाड बूट वाजवत आपली कुठं तरी जाण्याची तयारी करीत होता. त्याचं कपाट उघडणं, फायली फेकणं, निराशेचे उद्‌गार, वैताग, चीड सारं सारं कल्याणी भिंतीशी उभं राहून तिऱ्हाइतासारखं बघत होती.

त्याचं फार काही तरी बिघडलंय, विस्कटून गेलंय हे तिला कळत होतं... पण पुढं होऊन काय हवंय? काय हरवलंय? काय शोधताहेत? कुठली फाईल? कुठल्या रंगाची... असं तिला विचारावंसं वाटेना. ती शांतपणे ओठ मिटून सगळं पाहत मात्र होती. यानं आपणहून आपल्याला विचारावं, असंही तिला वाटून गेलेलं होतं; पण ते घडणं शक्य नव्हतं. कारण एकाच घरात दोन प्रवाह आपापल्या स्वभाववैशिष्ट्यांसह राहत होते. दंड थोपटून एकमेकांच्या विरोधात उभे असावेत असं एकामेकांचं तात्त्विक अस्तित्व नष्ट करण्यासाठी.

सहज जरी तिनं विचारलं असतं, मनात नसताना, पडतं घेऊन, 'काय हवंय?' तरी त्यानं झिडकारत तिला म्हटलं असतं, 'काही नाही. तू गप्प राहा. तीच मदत. कळलं?' आणि आक्रस्ताळेपणानं स्वतःचं काम चालू ठेवलं असतं. त्याला हवं ते मिळेपर्यंत.

पण त्या दिवशी त्याला हवं ते मिळत नव्हतं. काय ते कागद, फाईल, चिठोरं होतं, ते आणि तो अस्वस्थ-बेचैन झालेला होता. नुसतीच उलथापालथ सुरू होती. उभा घमानं निथळत होता. खोलीभर त्याच्या घामाचा वासच भरून होता. उग्रसा. उठून पंखा लावणंही शक्य नव्हतं. कारण इतस्ततः विखुरलेले कागद, फायलीही फाडफाड आवाज करीत फडफडत राहिल्या असत्या. ते लक्षात येताच हिनं पंखा सुरू केला असता तर तो आणखी चिडला असता. ती शांतपणे बघत उभी होती.

बाहेर जीप उभी होती. सुरूच होती. त्या उभ्या जीपच्या सुरू असलेल्या घर्रर्र आवाजानं तो अजून त्रस्त समंधासारखा वागत होता. या खोलीतून त्या खोलीत फिरत होता. हा ड्रॉवर उघड, ते उचक, ते फेकून दे... त्याचं सुरू होतं.

तो स्वतःशी पुटपुटतही होता.

ती त्याच्या ऑफिसच्या म्हणून कुठल्याच वस्तूला हात लावत नसे. तो, त्याचं ऑफिस, तिथली त्याची माणसं, त्यांचे बेत-विचार तिला काही म्हणता काही आवडत नसे. सगळंच तिरस्करणीय आणि घृणास्पद असं तिला वाटे; वाटत आलेलं होतं.

ऑफिसला निघालेल्या त्यानं जवळ घेतलेलंही तिला नको वाटे. एका वेगळ्याच पुरुषाचा त्याच्यात संचार होत असे. त्याचं रूप, त्याचं अस्तित्व तिला नको वाटे. विशेषतः अलीकडं तो कोण आहे, काय आहे हे त्यानं न सांगताही कळून आल्यापासून.

तो घरातून गेल्याचं जाणवल्यावरच ती घरातल्या ज्या कोपऱ्यात असे तिथून हले व हळूच कुठल्या तरी खिडकीतून, दाराच्या फटीतून त्याला बघे. खरं तर घरातून बाहेर जाणाऱ्या पुरुषाला स्त्रिया रोज हात हलवून हलवून निरोप देतात, अगदी मुलाबाळांसह जमून... घोळक्यानं... कितीतरी वेळ. अगदी मनापासून आनंदानं.

तीही पूर्वी करीत होती. असंच वागत होती. त्याच्या बाहेर जाण्याच्या, घरी येण्याच्या वेळी झुलत असायची उंबऱ्याशी... झुळूक होऊन. अगदी आतुरतेने.

पण तेव्हा तो तिला वेगळाच वाटत होता. किमान तिला हवा तसा. अगदी शंभर टक्के तसाच नसला, तरी बराचसा तसाच!

दिवसा-दिवसांनी तिला कळून येत होतं, की हा आपण समजतोय तसा नाही. वेगळाच आहे... अगदी वेगळा, जसा आपल्याला आवडलाच नसता अगदी तसाच. तिचं आतल्या आत आक्रसणं सुरू झालं. तिच्याही नकळतपणे. आणि त्याच्यापासून स्वतःला दूर ठेवण्याचा, वेगळी ठेवण्याचा तिचा प्रयत्न तिच्याही नकळतपणे सुरू झाला. त्यानं तिच्या वाटण्याची, वेगळं असण्याची पर्वा कधी केली नाही. तो त्याला हवं तसंच वागत गेला आणि त्याच्या अरेरावीपुढं ती कोरडी कोरडी पडत गेली, अलिप्तच होत गेली. अगोदर त्याच्यासाठी, मग स्वतःसाठी. ओलाव्याचे, त्याच्यासाठीच, त्याच्या स्पर्शानं, सहवासानं, ओढीनं निर्माण झालेले झरे कोरडे पडत गेलेत, हे तिला जाणवे; त्याच्या कुशीत असताना, त्याच्या मिठीत श्वास घेताना; पण अशी काही तिची दखल घ्यायची असते हेच त्याला, त्याच्या रासवट प्रवृत्तीला मान्य नव्हतं. मिटलेल्या पाकळ्याही तो सहजपणे कुस्करत असे. ती मग मूक होई... अगदी अ-शब्दशी!

बाहेर पाऊस धो-धो पडत होता. वेड्या अहंकारात बरसत होता. मीही



वेडापिसा होऊ शकतो हे दाखवत. वाराही विरोध करीत होता. बाहेर दोन शक्तींचं भांडण सुरू होतं.

लखकन् वीज चमकून गेली आणि खिडकीपुढे असलेलं नारळाचं झाड आपल्या लांब-लांब पानांनी करकचून वाकून जाताना तिनं पाहिलं. फडाफडा झावळ्या एकमेकांवर आपटल्याचा आवाज कानावर पडत होता. हे इतकं चिवट झाड... याची पावसानं ही दशा करावी? मग बागेतल्या इतर झाडांचं काय, तिला तीव्रपणे वाटून गेलं. एक भग्न चित्र मनात तरळलं.

पाऊस, त्याचं स्वरूप, बाहेरचं जग याचा अनुभव, स्थिती क्षणात आसमंत उजळून टाकणाऱ्या विजेनं आणून दिली. ती नुसत्या विचारानं विस्कटून गेली.

पुन्हा काळोख! थरांवर थर साचल्याचा. सगळ्या शहराचेच नव्हे, तर परिसरातील लाईट जावेत असा. दूरवर पसरलेला. एकसंध काळोख. घट्ट विणीचा. अंदाजानं मुलांच्या अंगावरचं पांघरूण सावरून ती हळूच कॉटवरून उठली. चाचपडत पायात सपाता सरकवल्या आणि ती हळूहळू अंदाज घेत खिडकीची दारं तपासली आणि वादळाला सामोरं जात ती बाहेरचं थैमान बघत राहिली. कितीतरी वेळ. आता जन्मात आपल्याला प्रकाश दिसणार नाही. आपली आणि प्रकाशाची भेट होणार नाही, या भीषण जाणिवेनं!

तिच्याही नकळत ती हळूहळू अंदाज घेत ड्रेसिंग टेबलाजवळ आली. हळूच ड्रॉवर ओढला. आतून बॅटरी काढली. टॉर्च खणात मारून मेणबत्ती शोधली. स्वयंपाकघरात जाऊन काडेपेटी आणली, मेणबत्ती पेटवली. ॲश-ट्रेच्या काठावर रोवून ठेवली आणि त्या मेणबत्तीपुढं बसून राहिली. वाट बघत - मेणबत्ती संपण्याची, पाऊस ओसरण्याची आणि दिशा फाकण्याचीही.

तिथून तिनं मुलांकडं पाहिलं. पाच आणि तीन वर्षांची ती मुलं गाढ झोपली होती. कशावर तरी विश्वास ठेवून... बाहेर इतकं वादळ-वारं आहे याची त्यांना भीती नव्हती. असलं तरी ते त्यांच्यापर्यंत येणार नव्हतं. त्यांच्यावर परिणामही करणार नव्हतं.

माणूसही सद्विवेकावर असाच भरवसा ठेवत असावा आणि जगत असावा, हे तिला पटलं. अगोदर माणसाचा स्वतःवर विश्वास असतो आणि मग... मग... तिला आपल्या नावापुढे गौतमचं नाव मनातही लिहावं, जोडावं वाटेना... ती थांबून गेली त्या बाजूनं विचार करण्याची.

कुठंतरी आतच तडा गेलेला होता आणि फट वाढत होती, हे तिला जाणवत

होतं. तो तर बेफिकीर होता. नव्हे, तिला वाटलं आपल्या दिशाच वेगळ्या आहेत. मग मीलन कसं शक्य आहे?

शरीराचं मीलन वेगळं आणि मनाचं वेगळं. शरीरं मिळत असतील. नाइलाजानं... अगतिकपणंही. पण मन... दोन अर्धुकं! आम्ही एकमेकांसाठी आहोत हे सांगत असतानाही संपूर्ण वेगळी, अलग झालेली.

मेणबत्ती संपत आली होती. वितळलेल्या मेणाचा पांढरा ढग जळत्या मेणबत्तीच्या पायाशी साचत होता. बाहेर वादळही सौम्य झालेलं होतं. बारीकशी भुरभुर असावी किंवा नसावीही. या रात्रीच्या सरत्या प्रहरी तिला बाहेर एकटीनं जाववेना.

बागेचं वादळानं काय झालं असावं, असं नुसतं मनात आलं आणि ती थरकली. पुन्हा एकदा स्वतःशीच.

कितीतरी मोडतोड तिच्या मनानं अनुभवली. मिणमिणता प्रकाश मिटून जायच्या आत हातात घेऊन ती स्वयंपाकघरात गेली. घशाला कोरड पडलेली होती. माठातून उभ्यानं पाणी पिऊन ती कॉटकडं वळली. मातीच्या चवीचं पाणी रेंगाळत होतं. मेणबत्ती शेवटचे प्रकाशाचे मंद श्वास सोडत होती. आत आत तिचं विझणं सुरू होतं. कल्याणी मुलांशेजारी येऊन पडली. अगदी दमून. वादळात न जाताही वादळ अनुभवून आल्यासारखी. तिचा सूर धपापत होता. भोवती इतका काळोख असूनही सवयीमुळे डोळ्यांवर आडवा हात ठेवला.

एक हात मुलांवर ठेवला. पांघरल्यासारखा. पार आतलं मन म्हणत होतं, अगदी निघताना तरी आपण थोडंसं शांतपणे विचारायला हवं होतं. काय हवं होतं? काय शोधत होता? मिळालं? दाटून राहिलेल्या काळोखात ती निश्वासली. निःश्वास... त्याचा जोर तिलाच जाणवला. शरीर दुमडून ती पडून राहिली.

डोळ्यांपुढे गौतम होता. त्याची धावपळ... गडबड त्याचं चिडणं... थयथयाट... आणि स्वतःचं अलिप्त राहणंही!

जाग आली तर सर्व घरभर प्रकाश फडफडत होता. उन्हं नुसती उगवलीच नव्हती, तर दुडदुडत फिरत होती. इतका वेळ सकाळ संपून होईपर्यंत ती कधी झोपून जात नसे. निळसर करडा प्रकाश असतानाच तिला जाग यायची. सवयीनं मुलं आणि गौतम झोपलेली असायची; पण तिचा स्वतःसाठीचा दिवस सुरू असायचा, नव्हे होऊन जायचा तिलाही ते जाणवत नसे तीव्रतेनं. हॉलमध्ये बागेश्री आणि केदार उठून तोंड न धुता कसलातरी मेकॅनो जुळवत बसली होती. आता उठायलाच उशीर



झाला, तर काही वेळ झपाझप कामं उरकायला हवीत, असं तिनं ठरवलं. मुलांचं दूध, चहापाणी, ओटा सफाई करता करता तिचं अधूनमधून खिडकीतून बागेकडं लक्ष जात होतं. आता उन्हं वरती आल्यावर रात्रीच्या वादळाच्या पुसटशाही खाणाखुणा जाणवत नव्हत्या; वादळानं झालेली बागेची नासधूस, पडझड बघवत नव्हती.

सकाळची धावपळीची कामं आटोपून तिनं पायात चपला सारल्या आणि ती मागच्या बागेकडं आली. तिला त्या पडझडीतून चालणंही जमेना. वादळानं मोठ्या झाडांना ओरबाडलं होतं, तिथं फुलझाडांचं काय? कळ्या-फुलं, कोवळी रोपं पडून मातीत मिसळली होती. तग धरलेली फळं पडली होती चिखलात.

कुठून कुठून रोपं आणून, माती घालून, तण काढून वाढवलेली रोपटी उद्ध्वस्त झाली होती. हेच नशिबात असावं असं. जणू त्यांनी वादळाला निमंत्रण देऊन बोलावलेलं असावं तद्वत. त्या चिखलात पडलेल्या कळ्या, फळं, पानांवर ती दोन पायांवर बसून हात फिरवत राहिली.

इतक्या निगुतीनं जतन केलेलं हे सर्व... तिचा कंठ दाटून आला. पण दामूच्या मदतीनं आपण दोन-चार दिवसांत हे सर्व स्वच्छ करायचं. पुन्हा हवं तसं निर्माण करायचं. तेच चित्र तिनं मनाशी ठरवलं आणि ती ओली उद्ध्वस्तता तिला थोडी सुसह्य झाली.

वळून ती हॉलकडं आली तर दामू हातात पेपर घेऊन उभा. पेपर पुढं करीत म्हणाला, ''आत्ता आला. किती गाढ झोपला व्हता तुमी बाई. मी आवाज दिला. लई राक्षसी पानी. माणसाला ठिवतं का झोडपून काढतं आसं.''

पेपराची गुंडाळी हातात धरून ती म्हणाली, ''नुसता पाऊस नव्हता. पाऊस आणि वारा. त्यातून लाईट नाहीत. काळोखच काळोख! मला जाग आली होती; पण उठून तरी काय करणार? तुला हाक मारली तरी ऐकायला तरी जायला हवी होती? तसं काही नकोही होतं. ''

''पत्रे धडाधडा उडत होते बाई. जीव मुठीत धरून बसलो मी व बायको. तशी वेळच आली तर आलोच असतो बंगल्याकडं.'' तो लाजून हसला. थांबून त्यानं विचारलं,''काई आनायचंय का भाईरून? ''

''नाही, काही नको. पिशव्यापण आहेत दुधाच्या. थोडी उन्हं कलली की बाग झाडून घेऊ रे. फार नासधूस झाली बघ बागेची. उभं राहवेना. वेली गुलाब मांडवावरून घसरून पडलाय... जाईची वेल तर तुटलीय... बरं, बघू तू जा. तुझं आटोपलं की सांग.''

तो गेला. मुलं पुढच्या व्हरांड्यात केनच्या सोफ्यात बसून खेळत होती. माझी-तुझी खुर्ची करीत खेळत होती. पळत होती मोकळेपणानं.

सोफ्यावर बसून कल्याणीनं गुंडाळी करून हातात धरलेला पेपर उघडला- वरवर तरी मोठ्या बातम्यांवरून नजर टाकावी म्हणून. आणि... आणि... फ्रंटपेजवरची नावं दिसली तिला मोठ्या अक्षरांतली - गौतम खांडेकर, शंकर सातपुते, केशव क्षीरसागर आणि जोसेफ यांची. जोसेफ गौतमचा बॉस. म्होरक्याच वाटे तिला! पेपरमध्ये त्याचं नुसतं नाव वाचल्याक्षणी तिच्या डोळ्यांपुढं त्याचं रूप आलं. काळारोम... काळे-पांढरे कुरळे केस, लालसर डोळे, मोठं भंबोरं नाक आणि जाड मिशा. तसा शरीरानंही अस्ताव्यस्तच होता. दांडगा आणि आता थोडा वयामुळे का पिण्यामुळे सुटलेला. गाल ओघळलेले, तोंडात सदा सिगारेट आणि ती ओठात धरूनच बोलणारा. सोमाणीच्या केसमध्ये चौघांनी मिळून पंचवीस लाख रुपये खाल्याची ती बातमी होती. एकटा केशव क्षीरसागर पकडला गेलेला होता. बाकीचे जोसेफसह फरार होते. त्यांनी बाहेरगावी गेल्याचं नोंदवलेलं होतं.

कल्याणीचं शरीर थंड पडलं, हातपायातली सगळी शक्तीच गेलीय असं तिला वाटलं. ज्या गोष्टीची भीती होती, तेच घडलं होतं. अशा मोहाकडं गौतम एका अनामिकपणे अनावर ओढीनं ओढला जात आहे, हे तिला गेल्या चार वर्षांपासून जाणवत होतं. पण तिच्या बोलण्यात असा काही सूर आला, की त्याचा भडका उडायचा नि तो हातवारे करीत म्हणायचा, "मी काय मूर्ख आहे? मला कळत नाही? स्वतःला अतिशहाणी समजू नकोस. माझ्या ऑफिसच्या भानगडीत तू... विशेषतः तू नाक खुपसलेलं मला आवडणार नाही. कळलं? येतंय का लक्षात?" तो चिडायचा.

कुणीतरी जबरदस्तीनं आपलं तोंड बंद करतंय, आपल्याच घरात आपली मुस्कटदाबी होतीय, हे तिला जाणवत होतं; पण यातून मार्ग सापडत नव्हता. गौतमवर संशय, भांडाभांडी, वादावादी हा काही त्यावर उपाय नव्हता. दुखणं कळलेलं होतं; पण नेमका इलाज सापडत नव्हता म्हणून ती बेचैन होती. आतून ढवळून गेली होती.

त्या दिवशी गौतमला काय हवं होतं? तो इतका वैतागून काय शोधत होता? त्याला हवं ते घरीच आहे, असं त्याला का वाटलं, असे कैक प्रश्न पाचोळ्यागत तिच्यापुढं भिरभिरत राहिले. त्यांची संभाव्य उत्तरं आज तरी तिच्याजवळ नव्हती.



जोसेफ कसाही माणूस असो, तो कसा असावा, हा त्याचा प्रश्न; पण त्याचं बोट धरून गौतमनं आपल्यासाठी निबरपणे काही मिळवावं, हे तिला खटकलं. या पंचवीस लाखांत कुणाचा किती वाटा, वगैरेतही तिला इंटरेस्ट नव्हता. पूर्वीही आणि आताही; पण पगाराशिवाय घरात भरपूर पैसा येतोय, याची तिला चाहूल लागलेली होती. त्या क्षणी तिचं मन हबकून गेलं होतं. हे वाईट आहे. निदान आपल्यासाठी, असं तिला नेहमीच वाटत आलं... कुठल्या तरी आतल्या आवाजानं. पण गौतमला, त्याला पटेल अशा प्रकारे आपण पटवू शकलो नाही, याची तिला खंत होती.

रात्रीतून वादळ आपल्या बागेतच घुसलं नाही, तर आपल्या जीवनातही घुसलंय. त्यानं आपला संसार, गौतम, आपली मुलं... आपलं सौख्य यालाच शह दिलाय, याची तिला तीव्रपणे जाणीव झाली. तूर्त तरी ती हताशच होती... फक्त विचार करीत होती. या सगळ्यात एक सत्य होतं, गौतम घरी नव्हता; पण तो कुठं होता? कोणत्या गावाला गेलेला आहे, हेही तिला माहीत नव्हतं. खुद्द आपला नवरा गौतम खांडेकर, एक जबाबदार सरकारी अधिकारी, गायब होता, बेपत्ता होता, हे त्याच्या बायकोला माहीत नव्हतं. घटनेतले आरोपी वेगवेगळ्या जागी लपून होते का? की सर्वांनी कुठं तरी अज्ञात ठिकाणी आश्रय घेतलेला होता, तिला नव्हतं माहीत. पण सगळ्या आरोपींना तिनं पाहिलेलं होतं. पैकी जोसेफ तिच्या घरी रात्रीचाच, म्हणजे दहाच्या पुढं, दोन-चार वेळेस स्वतःच्या गाडीनं आलेला होता. तो घरी आला, की गौतम समोरचं दार तत्परतेनं बोल्ट करी. आत घरात जाणाऱ्या दाराचा पडदा स्वतः संपूर्णतः सारी. जोसेफसाठीचा चहा-कॉफी तो आत येऊन घेऊन जाई. आपल्या हातानं, अगदी घाईघाईनं. त्यांचं बारीक आवाजातलं बोलणं, कुजबुजही आत तिच्या कानावर येत असे; पण संदर्भ लागत नसे. हप्ता, हिस्सा, शेअर असे काही सूचक शब्द तेवढं तिच्या मनानं टिपलेले होते.

जोसेफ कधीही घरी येऊन गेला, की गौतम अस्वस्थ असे. कॉटवर उताणा पडून छताकडं बघून त्याचं आत विचारहरण सुरू असे. तो बेचैन आहे हे तिला जाणवे; पण तो माणूस आपल्याला नजरेपुढंही नकोसा वाटतोय, हे तिनं तणतणत गौतमला सांगितल्यावर गौतम म्हणाला होता, "तुझा संबंधच काय त्याच्याशी? मी बोलावतो का कधी बाहेर तो इथं आल्यावर? बास. तो माझा बॉस आहे. माझा आणि त्याचा संबंध येणार. येतच राहणार." तेव्हा कल्याणीही म्हणाली होती, "तुझा आणि माझा संबंध आहे म्हणून... म्हणून त्याचा आणि माझा संबंध येत राहणार," पण तेही स्वतःशीच पुटपुटत... आतच आक्रंदत!

जोसेफच्या घरी कोणकोण आहे तिला माहीत नव्हतं. आता मॅरिडच आहे आणि फॅमिलीसह राहतो म्हणजे पत्नी-मुलं आणि एखादं वडीलधारं माणूस घरात असणारच. आई किंवा वडील किंवा अजून कोणीही माहीत नव्हतं. त्याच्या घरात वडीलधारं माणूस असणंच शक्य नाही. अशाही निर्णयाला ती आलेली होती. कारण जोसेफ... त्याची अरेरावी... हुकूमशाही... जुलूम... अनाचार घरातल्या मोठ्या माणसांनी चालवूनच घेतलं नसतं. पण घरातल्या कर्त्या पुरुषाला समजावणं ही कुणाच्याही आवाक्याबाहेरची गोष्ट असते, हे तिनं अनुभवलं होतं. त्या दाहकतेची आच तिनं अनुभवलेली होती. ती त्यानं होरपळून गेलेली होती; पण आतच. एखादी जखम बाहेर भळभळत राहिली तर पाहणारा हळहळतो, सहानुभूतीनं वागतो; पण आतच जखम असेल, तीही ठसठसती, तर सोसण्याशिवाय काही हाती नसतं. कदाचित जोसेफची बायको... तिची आणि आपली व्यथा... तिला दुःखाच्या दोन समांतर रेषा वाटल्या. आपलं जसं गौतमपुढं चालत नाही, तसंच... कदाचित अगदी तसंच जोसेफच्या बायकोबाबत नसेल कशावरून? कधीही न पाहिलेल्या कल्पनेनंही जिचं चित्र मनात रेखता येणार नाही, त्या जोसेफच्या बायकोविषयी तिला कणव वाटली... अगदी आतून.

शंकर सातपुते आणि केशव क्षीरसागर यांच्या बायकांशी कल्याणीची ओळख होती. थोडंसं समारंभानिमित्त येणं-जाणंही होतं. हळदीकुंकू, मुलांचे वाढदिवस, मिळून हॉटेलिंग आणि आऊटिंग निमित्तानं. त्यातही शंकर सातपुतेची बायको सुजाता तिला उथळ आणि थिल्लर वाटत असे. तिचे ते सदाआनंदी असण्याचे हावभाव, अंग घुसळत हसणं, जवळच्याच्या अंगाला हात लावून लावून बोलणं, भडक राहणं कल्याणीला गुदमरवून टाकत असे. केशव क्षीरसागरच्या बायकोनं मात्र मुलगा-मुलगा करीत तीन-चार मुलींना जन्म दिला होता आणि स्वतःच्या संसाराचा पसारा वाढवून ठेवला होता. अजूनही तिला आशा होती, की गॅप ठेवून चान्स घेतला तर मुलगा होईल! खुळी! खुळीच! कल्याणी खदखदून हसली. स्वतःवर ताबा न ठेवता विचारात हरवूनच!

आणि तिच्या हातातलं वर्तमानपत्र समोर पडलं. मांडी हलून पडलं, ते दुमडून-तीच बातमी तिच्यापुढं धरून. तिनं मस्तकात तिडीक जाऊन पेपर पालथा घातला आणि ती ताडकन उठली. वाकून पेपर घेतला आणि त्याची गुंडाळी करून टेबलावर भिरकावली. दूर... कोपऱ्यात...

तिच्या अंगाची आग आग होत होती. आतूनच पेट घ्यावा तशी. क्षणभर



तिला वाटलं, दामूला वाचता येत नाही हे किती बरं आहे? नाहीतर त्यानंही कदाचित साहेबांची बातमी म्हणून ही घटना नावानिशी वाचून टाकली असती. मग हाच पेपर तो एका वेगळ्या उद्देशानं आपल्याकडं आणता झाला असता.

सुजाताला फोन लावण्याचा मोह तिनं टाळला. ती फोनपर्यंत गेलेली थांबली. रिसिव्हरवर ठेवलेला हात तिनं काढून घेतला. तिला वाटलं, काय विचारणार आहोत आपण हिला फोन करून? बातमी वाचली का आपल्या नवऱ्यांची? की तुला माहीत आहेत ही मंडळी कुठं आहेत ती? कुठल्या अज्ञात स्थळी, असं?

सहानुभूतीनं आणि शांतपणे स्थिर मनानं काही बोलण्याऐवजी सुजाता तिच्या नेहमीच्या स्टाईलमध्ये खांदे उडवत, हसत, मन ओरबाडणारं बोलली असती असं वाटलं. आत येऊन तिनं कपडे शोधले आणि ती शॉवरखाली शांतपणे उभी राहिली. अंगावरून ओघळ जात होते तसे मनावरूनही जावेत असं वाटून!

उन्हं कलती झाली तसं दामूला बोलावून तिनं कितीतरी वेळ बाग साफ केली. सगळी पडसद उचलून टाकली, वाफे नीट केले, आळी सारखी केली, वेली बांधल्या. चांगलं चार-पाच दिवस पुरणारं काम होतं. थकली. अंधार पडला तसं दामूला तिनं सांगितलं,''अरे बाबा, एका का दिवसात निपटणारं काम आहे? करू हळूहळू. आता पुरे.''

''साहेब आले उद्याच तर...?'' त्यानं शंका बोलून दाखवली.

''साहेब...? नाही परतणार उद्याच... येतील नंतर आणि आले तरी दामू, हे काम तुला नि मलाच करावं लागणार आहे. साहेब कधी फिरकतात का बागेकडं?'' ती बोलून गेली.

''फिरकले नाहीत म्हणून काय झालं बाईसाहेब? पण कुंड्या, रोपटी, माती ...नं कुणी आणली?'' दामू पुरुषी स्वाभिमानानं हसला व म्हणाला, ''बाईचंच काम हाय घर नीट ठिवणं. तसंच या बागेचं. कामाचा मानूस त्यो. त्याला कुठला येळ? हे समदं आपलं काम हाय.''

खुरपं, दोरी, कात्री घेऊन कल्याणी आत आली. मुलांना भूक लागलेली होती. तिलाही काही खावसं वाटत होतं. तिनं कुकर लावला आणि थालिपिठाचं पीठ मळलं. तशी विचारांची दिशाही बदलली.

कुठून कुठून कुणाचे कुणाचे फोन येत होते. त्या प्रत्येकाचा प्रश्न होता - 'साहेब आहेत घरी?'

'नाहीत'... तिचा थंड स्वर, तरीही सावध.

'कुठे आहेत? काही माहिती? प्लीज...' पलीकडून चौकशी.

'नाही.' प्रत्येक वेळी रिसिव्हर ठेवताना तिला जाणवायचं, की या बाहेरच्या लोकांनाही आत कुठंतरी विश्वास वाटतोय की, गौतम कुठं गेलाय निदान त्याच्या बायकोला तरी नक्कीच माहीत असणार. अगदी खरी शंका आहे. पण मला खरंच माहीत नाही. सरकारी अधिकारी गौतम खांडेकर कुठे गेलेत ते! एक पत्नी म्हणून आणि त्या ऑफिसरची बायको म्हणूनही!

बायकांचे अधिकार धुडकावून लावण्याची परंपरा या देशानं प्राण पणाला लावून जोपासलेली आहे. अगदी पुराण काळापासून! तिचा कंठ दाटून आला. तिला वाटलं, सीतेला तरी कुठं माहीत होतं, लक्ष्मण आपल्याला सोडून जाणार आहे या वनात म्हणून. आज्ञेवरून. आपल्याला का त्यजलं हे कळण्याचा तिचा अधिकार नव्हता? का द्रौपदीला अधिकार नव्हता जाणून घेण्याचा की युधिष्ठिरानं तिला का पणाला लावली?

आज आपणही वेगळ्या संदर्भात त्याच रांगेतली स्त्री आहोत हे तिला कळून आलं... अधिकार मिळालेली नव्हे; नसलेली.

डोकं आणि मन शांत ठेवून प्रसंगाला सामोरं जायचं तिनं ठरवलं.

मुलं लहान होती ते तिला बरंच वाटलं. तशी काही चौकसही नव्हती. एरवीही गौतम कामानिमित्त कुठं जायचा. तसाच तो आत्ताही गेलाय हे त्यांच्या मनानं कधीच मानलं होत. तिला ही जमेचीच बाजू वाटली.

तीन दिवस नुसते तळमळण्यात आणि गौतमचा काहीतरी निरोप संदेश यावा या इच्छेत संपले. अवघ्या घरादारावर मरणकळा पसरली. पांढरट प्रकाश घरभर पसरून आहेसं तिला वाटलं. कुठे बाहेर पडणं, कुणाशी बोलणं तिला नको वाटलं. जे मनात दडवून टाकण्याचा प्रयत्न होता, तेच त्यांच्या नजरेत दिसण्याचीच जास्त शक्यता होती तिला अपमानित वाटत होतं. गौतमनं नव्हे, तर आपण भ्रष्टाचार केलाय असं. आपण आणि गौतम अगदी भिन्न आहोत असं तिला वाटलं --- तिला वाटलं, त्याचा अपमान, मग आपला अपमान कसा? कुठे माणूस एकमेकांपासून जोडलेला असतो... वेगळा... स्वतःचा आणि कुठले धागे चिवटपणे त्याला चिकटून असतात... विरोधातही! काही माणसं येऊन जात होती. चौकशी होत होती. प्रश्न विचारले जात होते. अलिप्तपणे ती शक्य होती ती उत्तरं देत होती. काही न बोलणं, गप्प बसणंही तिला अपराधी वाटलं. गौतमची बायको म्हणून समोरच्याच्या मनात जी प्रतिमा होती तिला तडा जाणं शक्य नव्हतं. माणसं बोलत. एकानं तरी



तिला बाजूला घेऊन हळू आवाजात सांगितलं होतं,'हे सगळे सोपस्कर होतात... होणारच. मनाला लावून घेऊ नका. प्रसंग गुदरला त्याला तोंड देत जावंच लागतं. साहेब इथं नाहीत तरी आम्ही आहोत, काळजी करू नका.' म्हणजे आम्ही त्याच पंथातले आहोत हेच त्यानं अप्रत्यक्षरीत्या सांगून टाकलेलं होतं. तिला वाटलं, इतकं वाटतंय गौतमविषयी, त्याच्याविषयी, तर याला विचारावं... कुठं आहेत साहेब माहीत आहे तुला?

पण ओठापर्यंत आलेले शब्द तिनं मागं घेतले. इतरांच्या संशयी नजरा आणि कान इकडेच होते.

कुठल्याही क्षणाचा शेवट असतो. तसा या क्षणाचासुद्धा असावा. या विचाराशी ती येऊन बसली.

टीव्हीवरची कुठली तरी सिरियल ती पाहत बसली होती. मुलं सोफ्यातच झोपली होती. त्यांना उठवून बेडरूममध्ये न्यायचं होतं. मनावरची मरगळ संपत नव्हती. सैलावून ती पडून होती. यांत्रिकपणे चित्रं पाहत होती. आत विचारचक्र सुरू होतं.

तोच दामू 'बाईसाहेब' करून आला. कल्याणी भानावर आली. टॉमी भुंकत होता. दामू काय सांगतोय ते ऐकू येत नव्हतं. टॉमीचं भुंकणंच श्रेष्ठ होतं. तो आत येऊन म्हणाला,''माणूस आलाय सातपुतेंकडून. तुमाला बलावलय.''

''मला... इतक्या रात्री...'' तिनं म्हटलं.

''मी थांबतो बाई पोरांजवळ... तुम्ही जा. अर्जंट हाय मने.''

कल्याणीनं पायात चपला सारल्या. केसांवरून हात फिरवला. गाऊन चढवला नव्हता, बरंच झालं वाटलं. कुणाचा काय निरोप तिला विचारावंसं वाटेना. ...नीच्या टोकाशी सातपुत्यांचा बंगला होता.

त्या माणसाच्या मागे कल्याणी रात्री दहानंतर निमूटपणे चालत होती. मनात कैक विचार होते.

व्हरांड्यातच सुजाता सातपुते उभी होती. कल्याणी दिसताच हसून म्हणाली, ''या.'' कल्याणी आत हॉलमध्ये येताच तिनं दार लावलं हॉलचं. स्वतः सोफ्यावर बसत म्हणाली,''बसा.''

सोफ्यात टेकता टेकता कल्याणीनं विचारलं,''इतक्या रात्रीचं काय काम काढलंत? मुलं एकटी आहेत घरी.''

''काम माझं काय असणारंय? तुमचंच आहे. गड्याला झोपेतून उठवून

पाठवला तुमच्याकडे.'' ती कुजकट हसली. माझं काम? कल्याणीला उलगडा होईना.

''फोन होता खांडेकरांचा. तुमच्याकडे दोनदा ट्राय करूनही लागला नाही म्हणे. पाच मिनिटांत येईल फोन इथं त्यांचा. बोलायचं म्हणत होते. निरोप सांगा म्हंटलं मी, पण...''

ती खांदे उडवत हसली. गलिच्छपणे. कल्याणीला त्या तशा स्थितीतही त्या बाईचा राग आला. कपड्याचा एकच रंग एखाद्याला आवडावा तसा जीवनाचा एकच रंग तिला माहीत होता. प्रणय... शारीर संबंध... स्त्री-पुरुषांतलं तेवढंच नातं... तेच म्हणजे जीवन मानणारं.

...तोच रिंग आली. फोन खणखणला तशी सुजाता तत्परतेनं आत उठून गेली स्वयंपाकघरात, पण तिचं लक्ष बाहेरच होतं. कल्याणी काय बोलणार इकडं... ती आतून मान वळवून ऐकत होती. उत्सुकतेनं.

कल्याणीनं रिसिव्हर कानाला लावला आणि ती हुंकारली, तिच्याही नकळत. काय बोलावं कळेना.

चार दिवसांनंतर गौतमचा आवाज कानावर पडत होता. तोही इतक्या तणावानंतर. एरवी काय बोलू, काय नको असं तिला झालं असतं. पण संयमाच्या काठावर आलेलं आतुर मन स्तब्ध झालं... मूकच! तरंग आतच होते. गौतमच बोलत होता. ''ठीक आहेस ना? खरं तर अगदी घरून निघताना तुझ्याशी बोलायचं होतं... थोडक्यात तरी तुला सांगायचं होतं... पण तुझ्याकडं पाहिलं तर तू त्या प्रत्येक वेळी... नेहमीप्रमाणे अलिप्त वाटलीस. मी येईन. मधूनच येऊन जाईन. पण केव्हा, ते असं सांगता येणार नाही. सांभाळून राहा. मुलांना जप...''

तो बोलत होता आणि ती ऐकत होती. असं इतरांकडे, निदान शंकर सातपुतेकडे येऊन तिला फोनवर पाच मिनिटांत काही बोलायचं नव्हतं. मुळीसुद्धा नाही. ती त्याचंच बोलणं ऐकत राहिली.

सुजाता सातपुतेकडे तर मुळीच नाही. गौतमनं फोन ठेवल्याचं कळताच तिनंही ठेवला. तोच क्षण पकडून सुजातानं सरबताचे ग्लास ट्रेमधून आणत नवलानं विचारलं, ''काय कमाल आहे तुमची! एक अक्षर बोलला नाहीत त्यांच्याशी? आपला नवरा असा फरार असताना...'' तिनं जीभ चावली. ती थांबलीच. कल्याणीपुढं काही बोलायला तिची जीभच रेटेना. टेबलावर ट्रे ठेवत तिनं ग्लास कल्याणीपुढं धरत म्हटलं, ''घ्या. सरबत अवेळीही चालतं.''



कल्याणीला काहीही नको होतं तरी तिनं ग्लास घेतला. तोंडाला लावला आणि ती सरबत संपवत राहिली. कल्याणी गप्पच आहे म्हणता सोमाणीच कसा बदमाष आहे, त्याची काय काय लफडी-धंदे आहेत ते सुजाता तावातावानं सांगत सुटली.

कल्याणी उठलीच. निघताना वळून सुजाताला म्हणाली, ''पुन्हा त्यांचा फोन आला तर सांगा, घरी करा म्हणावं, नाही तर नको.'' आणि मागंही न पाहता ती पायऱ्या उतरून अंगणात आली. फाटक उघडून रस्त्यावर आली. गडी तिच्या चालीशी चाल जुळवत, पण अंतर ठेवून तिच्यामागून तिच्या बंगल्यापुढं आला. कारण सुजातानं खुणेनं त्याला जा तिच्यामागं असं सांगितलेलं होतं. बहुधा असावं. हा तिचाच तर्क. आपल्यामागं चार पावलांवर कुणीतरी येतंय हे कळूनही कल्याणीनं ती व्यक्ती कोण म्हणून मागं वळूनही पाहिलं नाही.

फाटक उघडून आत येताच मागं वळून त्या माणसाला ती म्हणाली, ''जा आता तुम्ही.''

हॉलमध्ये प्रवेशताच दामूनं विचारलं, ''साहेबाचा फून व्हता? त्यो फून हाय म्हणत व्हता.''

तिनं हो म्हटलं आणि ती गप्प झाली.

दामू गेला आणि तिनं मुलांना आत बेडवर आणून झोपवलं. हॉलमधला टीव्ही बंद केला. लाईट घालवले आणि ती सोफ्यात कोसळली. इतका वेळ सांभाळलेलं मन दशदिशांनी वाट फुटेल तिकडं भरकटत सुटलं. स्वतःसाठीच ती हुंदके देत देत रडत राहिली. आपलीच असहायता जाणवून.

नंतर त्या प्रकरणाचंही एक रुटिन झालं. फोन येणं, चौकशा, माणसं येऊन अंदाज घेत बसणं, तिचं बचावाचं आखून बोलणं, स्वतःच्याच हुशारीवर खूष होणं...

आठ दिवस निघूनही गेले. वादळ होऊन आणि ती घटना घडूनही.

तिनं मध्ये पाऊसवादळ नसल्यामुळे बाग नीट केली.

मध्यरात्रीच केव्हातरी तिला झोपेतच जाणवलं की आपली बेल वाजतीय. अगोदर तर तिला भासच वाटला.

जाग आली तर खरंच बेल वाजत होती. बेल वाजवण्याची पद्धतही थेट गौतमसारखीच!

ती बंद दारापुढं आली. उभी राहिली. तिनं अंदाज घेतला, खरंच गौतमच

आहे, का अजून कुणी? भीतीची एक लाट अंगभर रोमांच पेरत गेली. रक्तात थरार उठला. तिनं विचारलं,“कोण?”

आवाज गौतमचा असला तरच अशा मध्यरात्री दार उघडायचं. नाही तर परत आत वळून अंथरुणावर पडून जायचं - असा एक प्रसंग अनेक प्रसंगांना जन्म देत असावा, हा तिचा विचार. त्याच दृष्टीनं आत विचार सुरू.

“कल्याणी, मी गौतम. दार उघड पटकन.”

आणि तिनं दार उघडलं - त्याचा आवाज ओळखून. गौतमकडे बघून ती घाबरली. गेल्या आठ दिवसांतील उलटसुलट घटनांनी आणि त्यांच्या ताणांनी. तो पार काळवंडून गेलेला होता. चेहरा उतरलेला, केस विस्कटलेले, कपड्यांची इस्त्रीही गेलेली. एका भयाण स्वप्नातून प्रवास करून यावा तसा. थकलेला आणि दमलेलाही!

सोफ्यात बसून त्यानं बूट-मोजे काढले. पाय लांबवून तो पडून राहिला डोळे मिटून काही वेळ. ती कोपऱ्यात त्याच्यापुढं उभी. त्याची स्थिती वाचत. आपल्याच घरात असं चोरासारखं येण्याची वेळ आपणच आणावी, काय हे कृत्य, असे वाटून.

डोळे उघडून तिच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकत त्यानं म्हटलं,“पाणी आण प्यायला. गार... चिल्ड.” स्वरात चीड, राग. ती हलली.

आत जाता जाता तिनं विचारलं, “जेवणार?”

“अंडी असली तर ऑम्लेट टाक. मोठं दोनतीन अंड्यांचं. बाकी काही नको. नसली अंडी तर दूध दे ग्लासभर गरम.”

याला सगळं टोकाचंच आवडतं, तिला वाटलं. ती ऑम्लेट करेपर्यंत बाथरूममध्ये जाऊन त्यानं आंघोळ केली. शॉवरमधून पडणाऱ्या पाण्याचा, अंगाला खसाखसा साबण लावण्याचा, त्या श्रमानं त्याच्याही नकळतपणे त्याच्या तोंडातून येणारा च च आवाज ती ऐकत राहिली.

अंघोळ करून अंगभर पावडर शिंपडून तो फ्रेश होऊन टेबलाशी आला. थोडासा फ्रेश झाला. तिनं त्याच्यापुढं मोठं ऑम्लेट, ब्रेड आणि ग्लासभर दूध ठेऊन दिलं. बटरही ठेवलं.

ती ओट्याशी उभी राहिली त्याला निरखत. आपणहून काही विचारायचं नाही, बोलायचं नाही हे तिनं स्वतःशी ठरवलेलं होतं. अशा प्रकरणात तिला वाटलं, नवीन ते काय असणार? तसं पेपरमधून, सुजाता सातपुतेकडून तिला बरंच कळलेलं होतं.



म्हणजे या प्रकरणातील त्या त्या माणसांबद्दल. ती सर्व माणसं तर तिला माहीत होती. तिच्या परिचयाची होती. तिच्या घरी आलेली होती. भेटली, बोललेली होती. त्यात तिचा नवराही होता. गौतमला खूप सपाटून भूक लागलेली असावी. त्यानं भराभरा ब्रेड, ऑम्लेट खाल्लं आणि ग्लासभर दूध एका दमात संपवून टाकलं. तृप्त झाला. त्यानं अंग ताणलं.

तो टेबलापासून उठला. बैठकीत सेटीवर जाऊन हात डोक्याखाली घेऊन उताणा पडून राहिला नेहमीसारखा.

आत कल्याणीचं सावकाशीनं आवरणं सुरू होतं. भांडी सिंकमध्ये टाकणं, फडक्यानं ओटा पुसणं, बटर आत ठेवणं... आणि मनात विचार गौतमविषयीचे. मुलांना उठवावं का? आत मुलांजवळ जाऊन पडावं का बाहेर जाऊन त्याच्याशी बोलत बसावं? सोमाणी प्रकरणाविषयी आजवर तो काही बोललेला नव्हता तिच्याशी. मग आता बोलेल का? आपणहून मुळापासून काय काय कसं कसं घडत गेलं सांगेल का? त्यानं काही सांगितलं नाही तर आपणहून विचारावं का? काय विचारायचं? तुम्ही किती पैसे घेतले असं? का तुमचा शेअर किती होता असं? का कानावर येत गेलं ते सगळं असंच आहे का, असं? तो आपलीच बाजू सांगेल. सर्वसाधारणपणे अशा केसेसमध्ये घडतं तसं; पण तिला गौतमची बाजू स्वच्छ वाटेना. तीच साक्षी होती. वदवून घेऊन काय साधणार होतं माहीत नाही. सुजाता सातपुते आणि क्षीरसागरच्या बायकोला काय वाटत असेल? त्यांनी हे सर्व स्वीकारलं? विरोधात उभ्या राहिल्या? सुजाता सातपुतेला तर पुरुषार्थ म्हणतात तो हाच असतो असं वाटत असावं. केशव क्षीरसागरच्या बायकोचं माहीत नव्हतं. ती एक गुळगुळीत दगड होती. कुणीही ढकललं की घरंगळत जाणारी. स्वतःची दिशा माहीत नसणारी. कल्याणीला वाटलं... वेगळ्या... निराळ्या म्हणून आपण तरी काय केलं? त्याच रांगेत बसलो ना?

रेंगाळत तिचं काम चालू होतं. कामंही आटोपतच आलेली होती.

तोच बाहेरून त्याचं,“कल्याणी, कल्याणी” हाका मारणं सुरू होतं. ती हाक, त्या हाकेचा रंग तिला कळला. ती उभी आत चिरत गेली.

तिच्याही नकळतपणे तिचा हात लाईटकडे गेला. ती बाहेर आली. एकेक पाऊल टाकत. अंदाज घेत. हाकेतून जाणवलं ते खरंच का? म्हणून. तो पार थकलेला होता. कमालीचा शिणलेला. मनावर केसचा ताण असावा. डोळे, चेहराच सांगत होते.

झपकन उठून त्यानं तिला खेचली. जवळ घेतली आणि काय घडतंय, काय होतंय कळायच्या आत ती थकून गेली. त्याच्या धपापणाऱ्या शरीराखाली पडून राहिली. पराभूतशी.

डोळे वाहत होते. तिला अश्रू पुसावेसेतही वाटेना. तिला क्षणभर स्वतःचीच किळस वाटली. याच्याचसाठी का तो इथवर आला, असा विचार भकास मनात गिरकी घेऊन आला.

आज्ञा करावी तसा तो म्हणाला,''जा झोप जाऊन मुलांजवळ.'' शरीराचा चोळामोळा सावरून ती उठली. ती तोंड ओंजळीत घेऊन रडू लागली. तिच्याकडे बघत तो म्हणाला,''खरं तर तू तूहूनच... जाऊ दे. मागून मिळत नसेल तर...''

तिनं चमकून; पण तिरस्कारानं त्याच्याकडे पाहिलं. खाली पंखा मोठा करून उशी घेऊन मगासारखाच उताणा पडला. शांतपणे म्हणाला,''पहाटे तुला जाग येताच मला उठव. आत जाऊन पडेन मी. सांगत बसू नको आल्यागेलेल्यांना की मी घरीच आहे म्हणून. मला उद्या रात्रीच निघायचंय.''

आणि त्यानं डोळे मिटले.

ती आत मुलांजवळ येऊन पडली. मोळी फेकून द्यावी तशी. उशीत तोंड खुपसून घट्टपणे डोळे मिटून झोपेची आराधना करीत आणि रडत....

तिचं ओट्याशी काम चालू होतं.

आत मुलांजवळ येऊन पडलेला गौतम पुन्हा झोपला नव्हता. बागेश्री आणि केदारला दोन्ही बाजूंना घेऊन त्यांच्या गप्पागोष्टी चाललेल्या होत्या. मुलं आणि तो हसत होती. गुदगुल्या केल्यासारखं. या क्षणासाठी आपणच का पारखे झालो, तिला प्रश्न पडला. मोठं होणं, ज्ञान होणं, वाईट, असं वाटलं. इतर स्त्रियांपेक्षा वेगळं असं आपल्यात काय आहे? बुद्धी का विवेक? का ही पापभीरू वृत्ती? काय? काय असं वेगळं आपल्या रक्तातून शरीरात वाहतंय की आपण गौतमपासून दूर उभ्या आहोत. हेलपाटत, स्वतःचा तोल सावरत, सत्य-असत्याचा हिशेब मांडत... पुन्हा पुन्हा आकडेमोड तपासणं आपलं संपतच नाही, हे कळून आलं. ती स्वतःशीच क्षीणशी हसली.

मुलं खूष होती. कारण त्यांचे वडील आलेले होते. तेही आठ दिवसांनी! मुलांना आनंदच झाला होता.

कल्याणीला वाटलं, निष्पाप असणं किती चांगलं, नाही? नाही तर हीच मुलं गौतमच्या सहवासात अशी रमली असती?



तो आजचाच दिवस राहणार आहे म्हटल्यावर तिनं त्याच्या आवडीचा स्वयंपाक केला. नारळाची चटणी, पुरी-भाजी आणि श्रीखंड. कुकर ऐन वेळी लावून तिनं त्याच्या पानात गरमागरम साधं वरण-भात वाढला.

घरात सण असावा तसं सगळं घडून गेलं. दिवसभरात बाहेर तिघं जण आले; पण तो पूर्वीसारखा बनियनवर शर्ट चढवत चढवत बाहेर आला नाही की त्यानं बाहेर डोकावूनही पाहिलं.

खणखणलेला फोनही तिनंच घेतला आणि समोरच्या एकाला चक्क सांगितलं, ''नाहीत. साहेब नाहीत. आम्हांलाही माहीत नाही ते कुठं आहेत. तुम्हांला कळलं तर मला कळवा... हो... हो... आठ दिवस झाले ते घरी नाहीत. नाही हो, सांगता कुठं आहेत ते? मी अशी इथं मुलांना घेऊन राहते. मग?''

उदास हसली. रिसिव्हर ठेवताना बेडरूमच्या जवळ उभं राहून गौतम ती काय बोलतीय ते ऐकत होता. तिनं रिसिव्हर ठेऊन दिल्यावर तो पळतच परत मुलांजवळ गेला... थोडंसं लगबगीनं. कल्याणीला वाटलं, का सांगितलं नाही आपण गौतम घरी आहे असं? या आणि त्याला अरेस्ट करा का म्हणालो नाहीत? का खोटं बोललो आपण? कोणासाठी?

कल्याणीच्या डोळ्यापुढं तिचीच चिमणी मुलं आली. गौतमच्या सहवासात पुलकित झालेले चेहरे आणि तिला वाटलं, मुलांच्या मनातील त्याच्या प्रतिमेला तडा जाऊ नये म्हणून... म्हणून वेगळंच बोलत गेलो... आपल्या आत असलेली आई बोलत गेली... ऑफिसर गौतमच्या कल्याणीवर मात करून... हेच खरं.

दिवेलागणीला त्यानं तिला बोलावलं. समोर बसायला सांगितलं. मुलांना हॉलमध्ये पाठवलं. दार लावून पडदा सारला आणि तिच्याजवळ बसत तो म्हणाला, ''स्वतःहून त्रास करून घेतीयेस. सातपुतेची बायको काय किंवा क्षीरसागरची काय? किती मजेत असतात त्या. जीवन उपभोगतात. इथं सगळं वेगळंच!'' तो वैतागला. कल्याणी कठोर होत म्हणाली,''मी जी आहे ती आहे. मला माझी कोणाशीही तुलना केलेली आवडत नाही. माझा पिंड, माझे संस्कार, माझे विचार हे जे माझं माझं मी जपलं आहे ना... त्यालाच तडा जातोय. मी आतून तुटतेय असं वाटतंय मला. ही फट वाढत गेली तर...'' तिला शब्दांनी बोलवेना.

तो चटकन उठला. म्हणाला,''मला तयार व्हायला हवं.'' ती बसून होती. तो तिच्यापुढं तयार होत होता; पण आज गौतम शांत होता. मागच्यासारखा नाचत नव्हता. अस्वस्थ नव्हता. इकडे तिकडेही बघत नव्हता. तयार होताच त्यानं मुलांना

हाक मारली आणि मांडीवर घेऊन तो इस्त्रीच्या कपड्याचीही परवा न करता बसून राहिला; त्यांना कुरवाळत, पाप्या घेत.

कल्याणी उठली. तिनं ग्लासभर दूध-कॉफी तयार केली. त्याला दिली. त्यानंही ती घेतली. पिऊन निघताना तो घुटमळला. मुलांच्या अंगावरून हात फिरवत राहिला.

कल्याणी म्हणाली,''फोन घरीच करा. इथं लागला नाही, तर नकोच. आता फोनवर काही बोलायचं उरलेलं नाही. एखादा दिवस नाही लागला फोन तरी चालेल.''

''कल्याणी हे पैसे, तुझ्या खात्यात भर. मुलांचे हाल करू नकोस. मी अधूनमधून येत जाईन; पण असाच. काही दिवस. केसचा निकाल लागेपर्यंत. नंतर कदाचित काही दिवस...'' तो थांबला. ती नजर खाली पाडून बसलेली. काय करायचंय त्याच्या डोळ्यांत पाहून. ''पुढचं पुढं बघू... निकाल लागेपर्यंत बिनपगारी रजा घ्यावी लागते. इतक्या दिवसांत एखादा हिशोब चुकतो.''

''हिशोब?'' तिनं विचारलं त्याच्याकडे पाहत.

''हो हिशोबच. चुकला आडाखा.'' त्याचं हळहळणं. म्हणजे हे सगळं जाणून बुजून स्वीकारायचं आणि परत... तिची कानशिलं तापली. ते पैसे त्याच्या अंगावर फेकून द्यावेत वाटलं. हे त्याचे प्रकरणातले पैसे नसतील कशावरून, असंही तिला वाटलं. पण क्षणभरच! पैसा हा पैसाच असतो. ज्या मार्गानं तो तुम्ही कमावला असाल, त्याची काळीबिद्री मोहोर त्यावर उमटलेली नसते. पापी असतं मन.

मनोव्यापार... आपल्याच आतले... गढुळलेले.

शांतपणे गौतम म्हणाला,''तू म्हणतीयेस तसा वागत गेलो असतो ना कल्याणी, तर मुलांसाठी महिन्याला अर्धा लीटर दूध घ्यावं लागलं असतं. आज महिन्याच्या पगाराला हात लावत नाही आपण. तोच पगार पुरवता पुरवता भांडत राहिलो असतो आपण... आजच्यापेक्षा वेगळ्या प्रकारे. कळलं? तत्त्वं वाचायला ठीक असतात. आचरणात आणताना आपल्याच नाकातोंडात पाणी जायची वेळ येत असते.'' बोलता बोलता त्याचा स्वर तापला आणि त्याची जाणीव होताच त्यानं तो वेगानं खाली खेचला. बाहेर मुलं होती. अंगणात दामू आणि त्याची बायको. अंतरावर का होईना शेजारी बंगले होते. गौतम आलाय हे कळणं तसं योग्य नव्हतं त्याच्या दृष्टीनं. महत्प्रयासानं त्यानं स्वतःला सावरलं. डोळ्यांत जमलेलं पाणी बोटानं निपटीत ती म्हणाली, ''अशाच मार्गानं का पैसा यावा घरात? तेही माझ्याच. हेच का प्राक्तन



आहे आपल्या संसाराचं... आज मुलं लहान आहेत. त्यांना काही कळत नाही; पण काही दिवसांनी याच पैशांत वाईट गोष्टींची रुजवण का होणार नाही?''

''असाच का तू विचार करतीयेस?''

''सहजपणे पैसा वापरायला मिळाला की कष्टांची किंमत कळत नाही. माणूस विवेकच हरवून बसतो. तुमच्या पगारातही आपण सुखी राहिलो असतो. अशी किती तरी कुटुंब आहेत. असतात. तिला भडभडून आलं.''

''तेही अगदी अशक्य नव्हतं कल्याणी. पण प्रश्न काही दिवसांचा नसतो. वर्षांचा असतो किंवा जीवनभराचाही. गेल्या पाच वर्षांत आपण कुठल्या कुठं पोचलो हे दिसत नाही तुला? हा बंगला घेतला. फर्निचर केलं. गाडी घेतली. मुलांसाठी, तुझ्यासाठी जे जे करता आलं, ते करणं शक्य नव्हतं. पुरुषाच्या बाबतीत बायकांनी अति लक्ष घालू नये म्हणतात ते याचसाठी. बाहेरचं जग वेगळंच असतं. तिथली तत्त्वं वेगळी. रीतीभाती वेगळ्या... तू मुलांना घेऊन कुठं जाऊन यायचं तर ये. दामू आहे बंगल्यावर. स्वतःशीच कुढत बसायचं सोड.''

''नको,'' तिनं थंडपणे म्हटलं.

तो बॅग घेऊन गेला. मुलं फाटकापर्यंत धावत जात होती. तिनं हॉलच्या तोंडाशीच त्यांना रोखलं. दार बंद करून घेतलं. खिडकीतून पाहिलं तर दामूच्या खोलीचं दारही लोटलेलं होतं.

सोफ्यावर बसताच तिला आतून भरून आलं. स्वतःचीच कणव आली. कुठं जाणार आहे मी? माझं मन? ते तर माझा पिच्छा सोडणार नाही. कुणाच्या काही कानावर आलंच नाही असं म्हणून निबरपणे थोडंच वावरता येणारेय मला? शक्य तरी आहे का ते?

गौतम त्या रात्रीतून हैदोस घालणाऱ्या वादळासारखा आला आणि गेलाही. तसाच झपकन. तिला घर रिकामं रिकामं वाटलं. तो आत होता तर घर भरलेलं वाटत होतं. मन शांत होतं. कसलेच आचकटविचकट भास होत नव्हते.

दोन दिवसांनी तिच्या वडिलांचं पत्र - निघून ये मुलांना घेऊन. सविस्तर बोलायचंय.

तिनं मग त्यांना सविस्तर पत्र लिहिलं. उगाच कानावर काहीबाही येऊन त्यांच्या रात्री खराब होऊ नयेत म्हणून. अगदी गौतम फरार होता इथंपासून अचानक येऊन गेल्याचं कळवून सोमाणी प्रकरणाची तिला होती ती माहिती तपशिलात देऊन. तिला वाटलं, आपले वडील म्हणून त्यांना हे कळणं आवश्यक आहे आणि आपण

आपल्याशीच प्रामाणिक राहून ते कळवणं, हेही आपलं कर्तव्यच आहे. त्यांना काळजी वाटणारच मुलीची.

मन शांत ठेवून तिनं चांगलं जाडजूड पत्र लिहिलं आणि आपण इथंच राहणं कसं आवश्यक आहे ते कळवलं.

तरीही तिचं पत्र जाताच उभ्या उभ्या आईवडील येऊन भेटून गेले. तिलाही बरं वाटलं. ते निघताना ती म्हणाली,''काळजी करू नका.'' त्यांच्या दृष्टीनं ही फार मोठी घटना होती. अपमानाची, उलथापालथीची, मुलीच्या भवितव्याबाबतची; पण ती शांत होती. आपली बाजू तिनं वडिलांपुढं मांडली आणि म्हणाली,''पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीचं काही चालत नाही. मला असा पैसा, त्यानं येणारी प्रतिष्ठा नको होती, तरी माझा नकार निष्प्रभ ठरला आणि अखेर सर्व हे घडलं. हे असं कधीतरी घडणारच होतं. काळ थोडा पुढं-मागं झाला असेल इतकंच. अजूनही गौतमला वाटत नाही, आपण चूक केली. चुकीच्या रस्त्यानं जातो आहोत. याचं मला वाईट वाटतं. माझ्या क्षमायाचनेचा भाग संपून गेलाय.'' ती मुसमुसून रडली... अगदी स्वतःसाठी.

गौतमचे अधूनमधून फोन येत होते. तीही फोनच आलाय म्हणून बोलायची. त्याच्या विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं द्यायची. अगदी अलिप्तपणे.

क्षीरसागरबाईंनी मुलीच्या वाढदिवसाला बोलवलं. कल्याणीही मुलांना घेऊन गेली. छानसं प्रेझेंट दिलं. केशव क्षीरसागर घरी नव्हते. असण्याचा संभवही नव्हता. सुजाता सातपुते मात्र नेहमीच्याच पद्धतीनं नटून आलेली होती. खांदे उडवत तिचं हसणं सुरू होतं. घरात काही मनःस्ताप देणारं, मन उस्कटून टाकणारं घडलंय असं दोघींकडे पाहून वाटत नव्हतं.

केशव क्षीरसागरची बायको म्हणाली,''तुम्ही याल की नाही, वाटलं होतं. तुम्ही फारच मनाला लावून घेतलंय सोमाणी प्रकरण असं ऐकलं. अहो, महागाई किती? पगारातून दूध, किराणाही होणार नाही. आणि असा पैसा यायलाही पोस्ट तशी हवीच ना? उगाच का कुणी कुणाला सहज पैसा देईल? चार-आठ महिने कळ सोसावी लागणार. नोकरीत - त्यातून सरकारी नोकरीत - हे चालणारच. असं वागलं नाही तर नोकरीच जाईल.'' आणि आपण फार मोठं तत्त्वज्ञान सांगितलंय वाटून ती हसली.

केस चालू होती. निकाल लवकरच लागणं शक्य नव्हतं. एखादं वर्षही वेळ लागणार होता.



एक होतं, प्रकरणातले गडी आपापल्या संसारात येऊन थडकले होते. मोठ्या रजेवर गेल्यासारखे.

त्यांचं मोर्चे बांधणं, भेटणं, फोन सुरू होते. मधूनमधून हव्या तिथं चकराही सुरू होत्या.

गौतम तर म्हणाला होता,''पाच वर्षांत इतकी विश्रांती मिळाली नाही. थँक्स टू सोमाणी.''

सात-आठ महिने चालणारी केस चार महिन्यांत निपटली गेली. पार वरून भरपूर वजन ठेवून प्रयत्न केले गेले होते... आणि यश आलं होतं सर्वांना. सोमाणीच्याच गळ्यात तंगड्या अडकवून जोसेफ, क्षीरसागर, सातपुते आणि गौतम खांडेकर सुटले होते. प्रत्येकाच्या खिशाला खार लागला होता. प्रत्येकी पन्नास-साठ हजार खर्च आला होता; पण फट बुजली होती. प्रकरण मिटलं होतं. जे पेपरातून वादंग माजलं होतं, ते तसं नव्हतंच असंही छापून आलं. आरोपाचे सगळे ओहोळ बुजून गेले. चित्रच फिकट केलं गेलं. सहेतुकपणे. हिरमुसली, नाराज झाली ती कल्याणी. हे इतकं सहजपणे सर्व होऊन जाईल असं तिला वाटलं नव्हतं. थोडी तरी शिक्षा होईल वाटत होतं, पण घडलं उलटंच!

चार महिन्यांनी तिघांनाही नोकरीवर रुजू होण्याच्या नोटिसा आलेल्या होत्या. ऑफिसतर्फे.

कुटुंबीयांसमवेत जंगी पार्टी दिली गेली संबंधितांना; तीही फाईव्ह स्टार हॉटेलात.

आणि तो दिवस उगवला. ओठात शीळ घेऊन गौतम ऑफिसला जाण्याची तयारी करीत होता.

तो खुषीत होता. त्याचं ऑफिस बॅगेत हे ठेव, ते ठेव सुरू होतं. सारखं कल्याणी, कल्याणी करीत होता. काय काय तिला मागत होता. पूर्वीसारखं, नुकतंच त्यांचं लग्न झालं होतं तेव्हासारखं... सारखा हसत होता स्वतःशी.

कल्याणीला वाटलं, पापानंच कात टाकलीय. पाप अजूनच ताजंतवानं झालंय. नवीन डंख मारण्यासाठी. ती कडवट हसली. काहीच तिच्या मनासारखं घडलेलं नव्हतं.

अगदी घराबाहेर पडताना त्यानं मुलांना उचलून घेऊन त्यांचे पटापट पापे घेतले. त्यांना खाली सोडलं आणि त्यानं कल्याणीकडे हसून पाहिलं. विजयानं... आनंदानं... थोडंसं मत्तपणेही! तिच्या गालावर बोटं ठेवून म्हणाला,''आता विचार

करायचा नाही. सहीसलामत सुटलो आपण.'' तो हसला.

मुलं पळत फाटकापर्यंत गेली. तिनं त्यांना अडवलं नाही. ती दारातच गाऊनमध्ये उभी राहिली.

गाडीत बसताच त्यानं हात हलवला. जोरानं. आणि तिच्याही नकळतपणे तिचा हात उंचावला गेला. हलला... हलतच राहिला.

आत येऊन तिनं खिडकीतून बागेत डोकावून पाहिलं.

बाग चांगली फुलली होती. चार महिन्यांपूर्वी तिथं वादळानं हैदोस घातला होता, नासधूस केली होती, हे खरंही वाटलं नसतं. ती खिन्नपणे हसली आणि कामाला लागली... आज सर्व आलबेल होतं. पण पुन्हा वादळ उठलंच नसतं, अशीही शक्यता मनात येईना. ज्या जिद्दीनं तिनं उद्ध्वस्त झालेली बाग उभारली होती आणि पुढच्या वादळासाठी सज्ज ठेवली होती; तिला वाटलं तसंच आपल्याला आतून आपलं आत्मिक बळ एकवटायचं आहे आणि त्या भविष्यात येणाऱ्या आपत्तीला तोंड द्यायचं आहे.

स्वतःशीच विचार केल्यानं तिला बरं वाटलं. समाधान मनभर पसरून गेलं... हव्या असणाऱ्या निळ्याभोर निरभ्र आकाशासारखं!

●●●





# नातं

**मोनिका गजेंद्रगडकर**

पहाटे चारचा सुमार, लक्ष्मीबाईंना परत तोच भास झाला.

''आई दार उघडतेस?'' - रवीचा आवाज. त्या उठून बसल्या.

दुसऱ्याच क्षणी अवघडलेले पाय ओढत त्या दरवाजाच्या दिशेने चालूही लागल्या. पण मग त्यांच्या एकदम लक्षात आलं. रोजच्यासारखाच भास आहे हा. त्यांचे पाय एकदम गळाल्यासारखे झाले. त्या भिंतीचा आधार घेत समोरच्या भिंतीशी ठेवलेल्या टेबलापाशी गेल्या. रवीचं टेबल. तो मॅट्रिकला असताना मुद्दाम त्याला अभ्यासासाठी त्याच्या वडिलांनी, वामनरावांनी बनवून घेतलेलं. वाटलं होतं का तेव्हा, त्याच टेबलावर काही वर्षांनी रवीचा हार घतलेला फोटो ठेवावा लागेल... खोलीभर अंधार दाटलेला होता. पण त्या अंधारातही त्या फोटोतील रवीची रेषान्‌रेषा त्यांना स्पष्ट दिसत होती. त्याचे कुरळे केस... डाव्या गालावरचा तीळ... कपाळावर पडलेली आडवी खोक... त्याचं देखणं, तिशीतलं व्यक्तिमत्त्व त्या फोटोतही लपलं नव्हतं. कितीतरी वेळ त्या फोटो न्याहाळत राहिल्या. बघता बघता त्यांचे डोळे भरून आले. समोरचा फोटो धूसर झाला. त्यांनी मान वळवून झोपलेल्या वामनरावांच्या दिशेनं पाहिलं. रवी गेल्यापासून गेल्या दीडएक महिन्यात आता आता त्यांना झोप अशी लागू लागली होती. डोळ्यांवर पाणी मारावं म्हणून त्या खोलीतून बाहेर पडून व्हरांड्यात आल्या. वर दांडीवर वाळत घातलेल्या कपड्यांतले एक-दोन वाळलेले कपडे वाऱ्यानं खाली

पडले होते, ते त्यांनी वाकून उचलले नि जवळच्या स्टँडवर तसेच ठेवले. या कपड्यांत आता रवीचे कपडे नाहीत. त्यांनी वर पाहिलं. दूर कोपऱ्यात रवीच्या जुन्या झब्ब्याचं कळकट पोतेरं लोंबत होतं, तेवढंच. त्यांनी बेसिनचा नळ सोडला. थंड पाण्याच्या गारव्यानं क्षणभर त्यांना बरं वाटलं. पदरानं डोळे पुसत त्या खोलीकडे वळल्या. सहजच रवी-उमाच्या खोलीकडे लक्ष गेलं. खोलीत दिवा होता. म्हणजे उमा जागीच आहे की आपल्यासारखी! झोप मोडली असेल? त्यांना वाटलं, तिच्या बंद दारावर टकटक करून विचारावं, झोप येत नाही का म्हणून. मग त्यांचं त्यांनाच वाटलं, तिला आवडेल न आवडेल. रवी गेल्यापासून बदलून गेलीये. काहीशी अबोल अबोलही झालीये. त्या तशाच खोलीत परतल्या. रोजच्याप्रमाणे एकदा झोप मोडली, की परत लागतच नव्हती. त्या स्वस्थपणे कॉटवर बसून राहिल्या.

सकाळी उठून त्या स्वयंपाकघरात आल्या तो उमा डबा भरत होती.

''हे काय, कोणासाठी ग?'' लक्ष्मीबाईंनी जरा आश्चर्यानंच विचारलं.

''माझ्यासाठी. आजपासून मी कामाला जातेय.''

''आजपासून? अग, मग बोलली नाहीस काहीच. नेहमीसारखा मी नसता का करून दिला?... पण मन लागेल नं कामात? नाहीतर मी म्हणत होते, काही दिवस जाऊ देत अजून...''

''नको. रजा कशाला वाढवायची? आणि कधीतरी सुरुवात करायलाच हवी. आज काय नि उद्या काय...?'' उमा म्हणाली आणि डबा उचलून तिथून निघून गेली. थोड्या वेळानं लक्ष्मीबाई चहाचा ट्रे घेऊन बाहेर आल्या. वामनराव पेपर वाचत बसले होते.

''उमा, अग चहा घ्यायला येतेस ना?'' सवयीनं लक्ष्मीबाई हाक मारणार होत्या. पण त्यांच्या लक्षात आलं. उमा आताशा तिच्याच खोलीत एकटीच चहा घेऊ लागली आहे. रवीचा आणि उमाचाही अट्टाहास असायचा, सकाळचा चहा सर्वांनी मिळून घ्यायचा.

''मी निघते.'' घड्याळाचा पट्टा लावत उमा बाहेर आली. पायात चपला घातल्या नि घराच्या दोन पायऱ्या उतरून बाहेर पडली. लक्ष्मीबाई तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत होत्या. कमरेपर्यंतचे केस किंचित आखूड झाल्यासारखे वाटले. वेणीही किती पातळ झालीये या दीडएक महिन्यात... दाट, काळभोर केस. तिच्या केसांतच खरंतर तिचं सौंदर्य होतं. रवी तर चेष्टेनं



म्हणायचा,'उमाच्या केसांनीच माझा गळा कापला...'

'एवढ्या मोठ्या आघातानं पोरीचं चैतन्य गेलं सारं...' त्या खिन्नपणे पुटपुटल्या. त्यांना गहिवरून आलं.

''आजपासून ऑफिसला जाते म्हणाली,'' त्या वामनरावांकडे वळून म्हणाल्या. ''मलाच वाटलं, मन लागेल का तिचं कामात. बरं, आधी बोललीही नाही. फार गप्पगप्प झालीये... सगळे दुःख आतल्या आत ठेवलंय पोरीनं. पोटभर रडलीसुद्धा नाही. काळजी वाटते तिची, कसं व्हायचं? संबंध आयुष्य जायचंय पोरीचं. वाटतं, म्हणावं तिला, एकदा मोकळेपणानं रड ग बाई, अगदी हवी तेवढी दुःखाला वाट करून दे, तुला बरं वाटेल...''

ट्रेमध्ये कपबशा एकत्र ठेवत लक्ष्मीबाई बोलत होत्या. वामनरावांचं शांतपणे पेपर वाचणं चालूच होतं. मग ते एकदम तिरसटपणे म्हणाले,''तिनं दुःखाला तोंड कसं द्यावं, हे तू कोण ठरवणार? जो तो भोगतोच आहे की... ती तिच्या परीनं; आपण आपल्या परीनं.''

''तिला आई नाही म्हणून वाटतं...'' त्या समजुतीनं म्हणाल्या,

''आपलं दुःख काय कमी आहे? नियतीनं पुरती जिरवलीय. सुखात आहेस काय, घे मग. कर, सहन कर. कसं करतोस बघू! त्या दैवाचं काय बिघडवलं होतं देव जाणे! वाट्याला शेवटी असे दिवस यावेत!'' ते काहीशा त्राग्यानं म्हणाले नि गप्प झाले.

''कशाला त्रागा...'' लक्ष्मीबाई परत समजावण्याच्या सुरात बोलू लागल्या. तोच वामनराव परत त्वेषानं म्हणाले,

''तो लाभायचा नाही... लाभायचा नाही.... सारखी भीती. कायम धास्ती. त्याला उशीर झाला, त्याचं साधं डोकं दुखायला लागलं... मनात भीती डोकावलीच. नाना शंका... तो असतानाचे ते दिवस असेच हातून निसटले. सगळं आयुष्य सालं एका क्षणात विस्कटून गेलंय...''

लक्ष्मीबाईंच्या अंगावर झर्रकन काटा आला. रवी असेल तेव्हा मॅट्रिकला... रात्र रात्र अभ्यास करत बसायचा... कधी मित्राकडे अभ्यासाला. त्या रात्री नव्हताच तो... वामनराव मध्यरात्री झोपेत किंचाळले. ते किंचाळणं इतकं भयानक होतं! आपण खडबडून जागे झालो. शेजारी पहिलं तर वामनरावांना दरदरून घाम फुटला होता. ''केवढ्यानं किंचाळलात! वाईट स्वप्न पडलं का?'' विचारलं. ''रवी... रवी... माझा रवी...'' ते म्हणत होते. मग ते एकदम म्हणाले,''लक्ष्मी

आपल्याला रवी नाही लाभायचा. नाही...''

''अहो, असं काय म्हणता? जागे झालात का पुरते?'' त्यांना गदागदा हलवून आपण विचारलं. दुसऱ्याच क्षणी त्यांनी आपल्या मांडीवर डोकं ठेवलं आणि हमसून रडत म्हणत राहिले,''मला खूप भीती वाटतेय लक्ष्मी. रवी नाही लाभणार आपल्याला. डोळ्यासमोर रवी नसलेलं घर येतं...''

''कसली अभद्र वाणी तुमची. नका ना बोलू असं. काहीतरी काय म्हणताय?'' मन चर्र. होऊन गेलं होतं. मग ते हळूहळू शांत झाले. पण त्यांची ती भीती मनात कायमच राहिली. अधूनमधून ओरडत उठणं, परत परत तेच म्हणणं, उठून उठून रवीच्या खोलीत जाऊन झोपलेल्या रवीला न्याहळत राहणं... त्या भीतीचं सावट नाही म्हटलं तरी प्रत्येक सुखाच्या क्षणी दबा धरून बसावं तसं हल्ला करी - अगदी आपल्या मनातही, खोल कुठेतरी... आणि रवी खरंच लाभला नाही... नाहीच लाभला... तो गेला त्या दिवशी आपल्याच छातीवर मारून घेत वामनराव म्हणाले होते,''आयुष्यातली भीती गेली, लक्ष्मी!''

का, का असं वाटत होतं यांना? आणि तेच खरंही व्हावं? नियतीची ही कुठली गणितं असतात? लक्ष्मीबाईंचे डोळे डबडबले. त्यांच्या पुढे सगळा भूतकाळ उभा होता. त्यांनी डोळे पुसले. भानावर येऊन त्या म्हणाल्या,

''नशिबावर कशाला रागवायचं?... सोसावं तर लागतंच आहे, समाधान एवढंच मानायचं, रवी नाही, आता उमा आहे ती आपली.''

''अशी एकाची जागा दुसरं कोणी घेत नसतं. किती पोकळ, दुबळे आधार शोधतेस आणि आपल्याच मनाला फसवतेस. अग, विचार केला तर उमा आणि आपल्यात आता नातं तरी कोणतं उरलं? ती स्वतंत्र आहे... आणि मृत्यूनं नातीसुद्धा बदलतात, एकदम आटून जातात... काही नाती तर फसवीच असतात. जवळची तर वाटतात, पण असतात दूरचीच...'' वामनराव एकदम तोडून म्हणाले आणि पाठीवर हाताची उलट घडी घालून तडक तेथून निघूनही गेले. अशी घडी घातली की समजावं, ते संतापले आहेत आपले आपल्यावरच.

लक्ष्मीबाईंनी कपबशांचा ट्रे उचलला आणि स्वयंपाकघरात येऊन त्या बेसिनमध्ये कपबशा विसळू लागल्या. त्यांना वाटत राहिलं, दुःखानं किती कडवट झालेत वामनराव! मृत्यूनं नाती थोडीच संपतात! कदाचित त्यात अंतर निर्माण होत असेल. मधला दुवा निखळला, की एक प्रकारची पोकळी येणारच; पण उमाचं या घराशी जोडलं गेलेल नातं कायमचं नाही? ते रवीमुळे असेल, पण रवी गेला तरी आजही ती या घरचीच की... रवी जितका आपला तितकीच उमाही नाही का?...

त्यांनी अंघोळ करून देवाची पूजा केली. रवी असताना वामनरावच पूजेचं बघत; पण आताशा देवाला हात जोडणंही सोडलं होतं त्यांनी. स्वयंपाकही झाला. दुपार मात्र त्यांना रोजच्याप्रमाणे खायला उठली. महिन्यानंतर भेटायला येणाऱ्यांची वर्दळही जवळजवळ संपली होती. कालपर्यंत उमा तरी घरी होती... ती तिच्या खोलीत असायची - दिवसेंदिवस. कोणी भेटायला आलं तरी क्वचित बाहेर यायची. पण उमाचं घरात असणंही पुरेसं वाटायचं... त्या उठल्या आणि नकळत त्यांची पावलं रवीच्या खोलीकडे वळली. डाव्या बाजूच्या भिंतीवर लाकडी कपाट, कपाटाला लागून रवीच्या पुस्तकांची लायब्ररी... लक्ष्मीबाईंची नजर काचेच्या कप्प्याकडे गेली. तो कप्पा मेडल्सनी भरलेला. शाळेत, कॉलेजात अभ्यासात मिळवलेली ती मेडल्स त्यानंच ओळीनं मांडून ठेवलेली. पुढे ड्रेसिंग टेबल, टेबलावर उमाचा लग्नातला फोटो. रवीचं सुटातलं व्यक्तिमत्त्व. झाला तेव्हा त्याचं रूपडं बघून वामनराव किती भारावून गेले होते! लहान मुलानं आपलं नवं खेळणं ज्याला-त्याला दाखवत सुटावं, तसं येईल-जाईल त्याला दाखवणं, त्याला फिरायला घेऊन गेलं की जाता-येता त्याच्या गालाला हात लावणं... त्या वेळी अभिमान असायचा वामनरावांच्या डोळ्यात. वामनराव त्याच्या गालावर ओठ टेकवत रोज एकदा तरी म्हणत,'आईचं रूप घेऊन बरं केलंत रवीबुवा! आमच्यासारखे झाला असतात ना, तर रोज चापट ठेवून दिली असती.' नि खळाळून हसत... परत लक्ष्मीबाईंची नजर खोलीवर स्थिरावली. समोरच्या भिंतीला डबलबेड. बेडखाली रवीच्या सपाता. त्यांना क्षणभर वाटलं, नाही, रवी गेलाच नाहीये. त्याचं अस्तित्व या खोलीत आहे तसंच आहे. त्याच्या पुस्तकांवरून हलकाच हात फिरवला. या पुस्तकांवरून कितीतरी वेळा रवीचे हात फिरले असतील. वाचनाचं किती वेड रवीला! त्याच्यासाठी वामनराव त्याच्याकडे नसलेली पुस्तकं शोधून घेऊन यायचे... त्याच्या भोवऱ्यात उभ्या राहणाऱ्या आठ-दहा केसांच्या तुऱ्याला हातानं सरळ करून विचारायचे,''काय रवीबुवा, खूष ना?'' मग स्वारीची मागणी वाढलेली. ''अप्पा, अजून एकच पुस्तक आणाल?''

त्या दिवशी हौसेनं आपण त्याची पुस्तकं लावत होतो. रवी कधी येऊन उभा राहिला होता देव जाणे! आपण तंद्रीतच होतो. मोठ्यानं ओरडला,''काय

चाललंय?'' पुस्तक गळायचंच तेवढं बाकी होतं. इतकं दचकायला झालं. तो हसत सुटला होता. जवळ येऊन म्हणाला,''चल, मी करतो मदत. अशी नको लावूस. मग मला ती सापडायची नाहीत. तू पुसून दे बरं... मी लावतो...''

तास-दोन तास दोघांनी एकत्र काम केलं पुस्तक लावण्याचं. मग कॉटवर आडवा होत म्हणाला,''आता फर्स्ट क्लास चहा हवा. करतेस? तूही घे ना माझ्याबरोबर.''

चहा घेता घेता गप्पा चालूच होत्या.

मध्येच मांडीवर थोपटत म्हणाला,''एक गंमत सांगतो तुला आई. माझा एक कॉलेजातला मित्र आहे ना, त्यानं ॲस्ट्रॉलॉजीचा अभ्यास केलाय. काल म्हणाला, हात दाखव बघू! केला मी पुढे म्हणाला, हात छान आहे की, पण आयुष्य कमी आहे रे तुला, ॲक्सिडेंट डेथ...'' हसायला लागला. आपण त्याच्या तोंडावर चटकन चापटीच मारली,''असल्या कसल्या रे थट्टा करता?'' आपण रागावून म्हणालो. पण त्यांच्या वडिलांचे शब्द, त्याचे शब्द एकमेकांत मिसळून मोठा नाद कानात घुमत राहिला. क्षणभर मृत्यू... रवीचा... त्याबद्दलची भीती... भविष्य... यांचं स्वप्न... पुढे नोकरी लागल्यावर त्यानं उमाशी लग्न ठरवलं, तेव्हाही वामनराव उमलले नव्हते. म्हणाले,''आणखी धास्ती वाढवली पोरानं... किती रागावलो त्या दिवशी आपण.'' कधी नाही ते त्यांच्याशी अबोला धरला. आपलं आपणच समाधान करून घेतलं. असं कसं होईल? काय कोणाचं वाईट केलंय. आपण?... या सगळ्याची संगती काय अखेर? त्यात काहीतरी अर्थ होता?...

वामनरावांनी हाक मारली, तशा त्या दचकून जागेवर आल्या. त्यांनी भिंतीवरच्या घड्याळात पाहिलं. चहाची वेळही टळून गेली होती. पदरानं तोंड पुसत त्या स्वयंपाकघरात आल्या.

''मी घेतला चहा करून... जरा बाहेर जाऊन येतो. उशिराच परतेन. वामनराव स्वयंपाकघरात डोकावून म्हणाले. त्या क्षणीही लक्ष्मीबाईंना त्यांचा किंचित राग आला. मग बाहेर येऊन दार नुसतंच ओढून घेऊन त्या परत स्वयंपाकघरात आल्या. संध्याकाळच्या स्वयंपाकाची तयारी करत असतानाच उमा परतली.

''चहा घेशील नं?'' त्यांनी विचारलं.

''नको. लागला तर मी घेईन करून.'' ती म्हणाली.



''अग, घोटभर तरी घे. दमून आली असशील. तेवढंच बरं वाटेल.''

पण ती उत्तर न देताच आत निघून गेली.

रात्रीची जेवणं उरकल्यावर त्या उमाच्या खोलीत गेल्या. ती डोळ्यांवर हात ठेवून पडली होती. तिच्या पायाशी बसत लक्ष्मीबाईंनी विचारलं,''तू झोपलीस का ग?''

उमानं डोळ्यांवरचा हात बाजूला केला.

त्यांच्याकडे पाहत ती उठू लागली.

''अग, तू पड ना. मी आपली सहज -.''

''उठते ना.'' ती उठून बसत म्हणाली.

''कसा गेला दिवस ऑफिसात? कामात लक्ष लागलं ना?'' लक्ष्मीबाईंनी मायेनं विचारलं.

''हं. प्रयत्न करायचा... तुम्ही बऱ्या आहात ना?''

उमाच्या प्रश्नानं त्यांचं मन भरून आलं. रवी गेल्यापासून आस्थेनं असं तिनं आजच विचारलं होतं.

''तू नव्हतीस तर अधिकच एकटं एकटं वाटत होतं बघ.''

काही क्षण दोघी गप्पच होत्या. मग लक्ष्मीबाईंनी तिला विचारलं,

''तुला झोप लागत नसेल, तर येऊ का इथं झोपायला?''

''अं? नाही... नको आई. खरंच नको. झोप लागते मला तशी...'' ती किंचित थांबून म्हणाली,

''एक विनंती करू? मला काही दिवस एकटं राहू दे. प्लीज. मी यातून बाहेर येऊ पाहतीये. एकटं बरं वाटतं मला. दुसऱ्याच्या सहानुभूतीची सवय नाही करून घ्यायचीय आणि आपलं दुःख आपलंच असतं शेवटी. समोरचं माणूस तितक्या तीव्रतेनं ते नाही समजू शकत... रवीच्या नि माझ्या आठवणी मला माझ्यापुरत्याच ठेवायच्यात... आणि माझा नवरा जाणं आणि तुमचा रवी जाणं यात फरकही...'' तिनं ते वाक्य तसंच सोडलं. ''रागवू नका. माझी काळजीही नका करू. मी सावरतीये.''

लक्ष्मीबाईंना एकदम तुटलेपण जाणवलं. डोळ्यांत टचकन पाणी आलं. तिच्या हातावर समजुतीनं थोपटून त्या उठत म्हणाल्या,''नाही रागावणार बरं. तुला जसं बरं वाटेल तसं. झोप आता.''

दारावरचा पडदा बाजूला सारून त्या आपल्या खोलीकडे वळल्या.

वामनरावांना झोप लागली होती. छातीवर पालथं पुस्तक होतं. रवीही वाचता वाचता असाच झोपून जायचा. छातीवर पुस्तक तसंच. लहानपणी रोज ते पुस्तक वामनराव मिटून ठेवायचे नि त्याच्या मिटलेल्या पापण्यांचा मुका घ्यायचे.

लक्ष्मीबाईंनी दीर्घ श्वास सोडला. खोलीतला दिवा मालवून त्या कॉटवर आडव्या झाल्या. परत उमाचं मघाचं बोलणं आठवलं. मन आधीच हुळहुळं झालं होतं... रवी जाण्याचं दुःख उमानं किती एकटीचं मानलं आहे. आपण रवीची खुद्द आई असूनही तिचं दुःख समजू शकणार नाही? उमात आणि आपल्यात, रवीच्या जाण्यानं इतकं झटकन परकेपण का यावं?... पोपडे उडालेल्या छताकडे त्यांचं लक्ष गेलं आणि डोक्यात कोणीतरी घणकन घाव घालावा, तसा त्यांच्या डोळ्यांसमोर रवीचा मृत्यू गरगरत आला... गेला त्याच्या आदल्या रात्री पुस्तकच वाचत बसला होता उशिरापर्यंत... मग सकाळी उठायला उशीर... घाई... त्याची चिडचिड... उमाला सोडणं जमणार नाही... मग दोघांची धुसफूस... भरून ठेवलेले डबे टेबलावर तसेच विसरून गेले दोघं... दिवसभर आपल्याला चुटपुट... संध्याकाळी तर उगीचच हुरहूर वाटत होती. अगदी कारण नसताना डोळे भरून काय येत होते आणि आठ-साडेआठच्या सुमारास दारात पोलीस! रवीच्या मोटारसायकलला अपघात... डोळ्यांसमोर अंधारी आली... भोवळच आली... शुद्धीवर आले... अवतीभवती माणसं... वामनरावांचं धाय मोकलून रडणं खोलीभर व्यापलेलं... उमा कोपऱ्यात थिजलेली... रात्री सर्व सोपस्कारांनंतर रवीचा छिन्न-विच्छिन्न देह घरी आला नि क्षणात रवी नसलेलं घर होऊन गेलं... बस्स! त्यांनी डोळे गच्च बंद केले; परंतु डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहतच राहिलं. त्या वामनरावांपाशी गेल्या, अलगद आपलं डोकं त्यांच्या छातीवर ठेवलं. वामनरावांना जाग आली. लक्ष्मीबाईंच्या खांद्याला धरून त्यांनी उठवलं.

''कितीही मनाला शिकवलं तरी वाहूनच जातं असं...'' पदरानं नाक पुसत त्या म्हणाल्या.

वामनरावांनी त्यांचं बोलणं ऐकलं न ऐकल्यासारखं केलं.

''का परत परत भूतकाळ आठवत बसतेस? रवी नावाची कोणी व्यक्ती या जगात होती हेच का विसरत नाहीस तू? मनातून त्याच्या आठवणी का पुसता येत नाहीत तुला? तुझ्या मनाला कोऱ्या पाटीसारखं ठेवायला शीक की जरा! आपण निपुत्रिक आहोत असं समज. माझ्यासारखं दगड बन दगड...''

ते काय बोलताहेत हे लक्ष्मीबाईंना कळतच नव्हतं. त्यांचं सगळं



बोलणंच त्यांना विचित्र वाटायला लागलं. रवी नावाची एक व्यक्ती नव्हतीच असं मानायचं? रवीला विसरून कसं येईल? त्याच्या आठवणी मनातून पुसता कशा येतील? त्यांचा गळा दाटून आला, ''मी आई आहे हो त्याची! त्याला कसं विसरता येईल?''

''हो, आम्हीसुद्धा वडील आहोत त्याचे. त्यानं आम्हांला अग्नी द्यायचा; पण या हातानं आम्हाला त्याला द्यायला लावला - त्या... त्या वरच्या देवानं. ज्यानं तुला-मला त्याचं आईवडील बनवलं ना, त्यानंच. समजलं ना? काय करणार? भोगा! भोगा! भोगा फक्त...''

हाताची मूठ उशीवर दाणदाण आपटत ते ओरडून म्हणाले. रात्रीच्या शांततेत त्यांचं ओरडणं एखाद्या खोल गुहेत ओरडावं तसं घुमलं. ''शांत व्हा. पडा बरं.''

लक्ष्मीबाईंनी त्यांना झोपवलं. त्या सुन्नपणे बसून राहिल्या. त्यांना वाटलं, उमानं आणि वामनरावांनी या दुःखाला तोंड द्यायचे मार्ग निवडले आहेत - आपापले.

एकेक दिवस असाच सरत राहिला. उमा आता सावरल्यासारखी वाटत होती; पण पूर्वीचं तिचं हसरेपण, लाघवीपण मात्र आटून गेलं होतं. पूर्वीची उमा राहिलीच नाही... रवी तिला प्रथम दाखवायला घरी घेऊन आला, तेव्हा ती या घरची कधीचीच झाली आहे, इतक्या मोकळेपणानं, अधिकारानं वागत होती. 'आई, आई' म्हणून तिचं लक्ष्मीबाईंच्या जवळ जाणं, तोंडावर सतत हास्य, वागणं तर इतकं लाघवी... त्यानं ती परकी अशी कधी वाटलीच नाही. वामनरावांशी तर रोज एखाद्या विषयावर तिच्या गप्पा चालायच्या. रवी खाकरून म्हणायचा, ''उमा, मी इथं आहे. तुझा आपला गरीब नवरा!'' मग उमाचं उत्तर ठरलेलं, ''रवी, तुझ्यापेक्षा अप्पा माझी बौद्धिक भूक अधिक भागवतात बरं का!'' मग वामनरावांची तिच्या डोक्यावर हलकीशी टप्पल. तेच हे घरं? तेच हे वामनराव? आणि उमाही तीच? लक्ष्मीबाईंना राहून राहून वाटे.

वामनरावांनी तर रवी हा शब्दच गिळून टाकला होता. लक्ष्मीबाईंना त्याच्या आठवणींचाही खूप आधार वाटे. पण त्याच्या आठवणी त्यांनी काढल्या की वामनराव तिथून निघून जात. आताशा खोलीतला रवीचा फोटोही त्यांना डोळ्यांसमोर नकोसा झाला होता.

उमानं स्वतःला ऑफिसमध्येच गुंतवून घेतलं होतं. रोजच्या वेळेपेक्षा ती

उशिरा घरी येई. अबोलपणे वावरत राही.

"अलीकडे थकलेली दिसतेस ग जास्त. ऑफिसात काम वाढलंय का तुझं? गेले दोन महिने उशीरही होतो तुला?"

त्या दिवशी रात्री लक्ष्मीबाईंनी टेबलावर पानं मांडत उमाला विचारलं

"मीच उशिरापर्यंत काम करत बसते. नाहीतरी घरी कुणासाठी यायचं?"

लक्ष्मीबाईंना वाईट वाटलं. खरंय, रवी नाही तर तिनं कुठल्या ओढीनं घरी यावं? त्यांचे डोळे किंचित पाणावले. त्यांना म्हणावंसं वाटलं, 'आमच्यासाठी ये. बरं वाटेल...' लग्नानंतर कितीदा उमा म्हणायची, 'आई, तुम्ही वाट पाहता ना, इतकं बरं वाटतं. आपली कुणीतरी घरी वाट पाहतंय या भावनेनंच घरी ओढीनं यावं वाटतं. आपलं आहे कोणीतरी असं वाटतं...' पण परिस्थिती बदलली की त्या म्हणण्याला कसा अर्थही उरत नाही...

एव्हाना वामनरावांचं जेवण झालं होतं. "उमा, ठीक चाललंय?" पानावरून उठत त्यांनी विचारलं.

उमानं मानेनंच होकार दिला. लक्ष्मीबाईंनी उमाकडे पाहिलं. रिकाम्या ताटात ती रेघोट्या मारत होती. तिचा चेहरा पारच उतरलेला त्यांना जाणवला. त्यांनी न राहवून तिला विचारलं, "का ग, गेले दोन-चार दिवस पाहत्येय, कमी जेवतेस... आज तर चेहरा फारच थकलेला दिसतोय. कामाचं काही दडपण नाही ना?"

"तसं काही नाही. जबाबदारी जास्त वाढलीये आणि..."

ती एकदम थांबली. पण ती थांबलेली लक्ष्मीबाईंच्या मात्र लक्षात आलं नाही. मग उमाच पुढे एकदम म्हणाली,

"आई, रवी गेला त्याच महिन्यात माझी पाळी चुकली होती. बोलायला अवघड वाटत होतं. वाटलं, धक्क्यामुळे पुढेमागे पण..."

"म्हणजे?" लक्ष्मीबाईंनी गोंधळून विचारलं.

"मला दिवस आहेत. आणि... आणि मला मूल हवंय." उमा शांतपणे म्हणाली.

लक्ष्मीबाईंना गहिवरून आलं. त्या उठून तिच्यापाशी गेल्या. तिचं डोकं आपल्या पोटात आवळून स्फुंदत म्हणाल्या, "काय नशिबाचे खेळ ग हे!" आणि न आवरता येऊन त्या मान इकडेतिकडे हलवत ओक्साबोक्शी रडत राहिल्या. काही वेळानंतर उमानं आपलं डोकं बाजूला केलं आणि रडून झालेला चेहरा पदरानं पुसला. लाल झालेले डोळे तिनं जमिनीवर स्थिरावले.



लक्ष्मीबाई काहीशा रडतच बोलू लागल्या, "तू काळजी करू नकोस. सगळं निभावेल. मी आहे ना... आणि एक सांगू? कुठल्या तोंडानं म्हणू, पण तुझा मूड बरा ठेवायचा प्रयत्न कर बाई... खिन्न राहू नकोस, अं?" आणि त्यांना हलकाच तिच्या केसांवरून हात फिरवला. खोलीत गेल्यावर त्यांना एकदम आठवलं, रवी-उमाच्या लग्नाला दीड वर्ष जसं उलटून गेलं, तसं त्यांना आपण छेडलं होतं, "पुरे रे तुमचं प्लॅनिंगबिनिंग आता चिमणी पावलं नाचू देत घरभर..." रवी ओठातल्या ओठात हसला होता. आज रवी असणार नाही त्याच्या पोराचं तोंड पाहायला. सगळं काय होतंय आपल्या आयुष्यात? कशाचा कशाला मेळ नाही. मग लक्ष्मीबाईंना वाटू लागलं वामनरावांना हे कसं सांगावं?... काय म्हणतील ते? जरा तरी बरं वाटेल... की?... त्या खोलीत आल्या. खिडकीजवळच्या आरामखुर्चीत वामनराव डोळे मिटून स्वस्थ बसले होते. लक्ष्मीबाई त्यांच्यापाशी गेल्या.

"उमाला दिवस आहेत." त्या धीर एकवटून म्हणाल्या, "...मी म्हंटलं तिला कसलीही काळजी करू नकोस..."

"दिवस आहेत? ती हे मूल ठेवणार आहे?" वामनरावांनी डोळे उघडून वर पाहत खाडकन विचारलं.

"असं का विचारता?" लक्ष्मीबाई काहीशा रागानं म्हणाल्या.

वामनरावांनी आपलं डोकं खुर्चीवर मान टेकवलं. डोळे मिटून ते म्हणाले, "ठीक आहे."

लक्ष्मीबाईंनी मनाशी ठरवलं. उमाच्या आसपास राहायचं. रवीचं प्रतिरूप उमात उतरलंय... या घरात फिरून एक वेगळं अस्तित्व येणार आहे. कितीतरी नाती नव्यानं तयार करणारं आणि रवीची आठवण कायम जागवत ठेवणारं.

उमाच्या बातमीनं नाही म्हटलं तरी लक्ष्मीबाई रवीच्या मृत्यूपासून किंचित का होईना लांब गेल्या होत्या. हळूहळू उमेद धरून त्यांनी तयारीही चालू केली होती... छोटी झबली, दुपटी, लंगोट... उमाचं खाणंपिणं...

"डॉक्टरांकडे नियमित जातेस नं? चौथा सरला नाही आता? आणि दगदगही आता कमी कर हो. नाही म्हटलं तरी गर्दीतून जायचं-यायचं." लक्ष्मीबाईंनी त्या दिवशी भांडी विसळताना उमाला विचारलं.

"दोन दिवसांपूर्वीच गेले होते डॉक्टरांकडे. विसरले हे सांगायला. ठीक

आहे म्हणाले.'' ओट्यावर ओली भांडी पालथी घालत ती म्हणाली. तेवढ्यात वामनराव आत आले. खुर्चीवर बसत म्हणाले,''उमा, जरा बसतेस? बोलायचंय तुझ्याशी.''

''काय अप्पा?'' उमा वळली आणि ओट्याला पाठ टेकवून उभी राहिली.

''इथे ये.'' वामनरावांनी शेजारची खुर्ची टेबलाखालून बाहेर ओढली.

''हे बघ, तू तुमचं मूल ठेवायचा निर्णय घेतलास...''

''हो अप्पा. मला हे मूल हवंय. आम्हां दोघांनाही फार मूल हवं होतं. लग्नानंतर...''

''नाही. त्याबद्दल मला काही म्हणण्याचा अधिकार नाही. तो अधिकार सर्वस्वी तुझा आहे. हा मोठा आणि तितकाच महत्त्वाचा निर्णय तू ज्या धीरानं घेतलास, तसा त्या मुलाला भक्कम आधार देण्याची जबाबदारीही तुझ्यावर आहे.''

''अर्थातच आहे अप्पा.''

''नाही. ते तितकं सोपं नाही उमा. वाट्याला आलेलं दुःख एक प्रकारे सुरुवातीला बळ देत असतं, माणसाला सगळं निभावून नेण्याचं. पण काळ जातो तसं दुःख मागे पडतं आणि समोर वर्तमानातले अनेक प्रश्न उभे राहतात.''

''रवी जाणं हेच इतकं अघटित आहे अप्पा, त्यापुढे संबंध आयुष्यच म्हटलं तर मोठा प्रश्न झालाय... म्हणून पुढच्या आयुष्याचं काय आणि कसं करायचं, याचा विचारच मी केला नाही अजून...''

''म्हणूनच तो आताच तुला करायला हवा उमा. आयुष्य एका क्षणी असं स्तब्ध झालं, की ते जाणीवपूर्वक पुढे रेटावंच लागतं... कोणता ना कोणता मार्ग अवलंबून...''

''म्हणजे?'' इतका वेळ शांतपणे भांडी विसळत राहिलेल्या लक्ष्मीबाईंनी एकदम विचारलं.

''म्हणजे उमा, तू दुसऱ्या लग्नाचा विचार करावास असं मला वाटतं.'' वामनराव शांतपणे म्हणाले.

''पण लग्न हाच मार्ग आहे? नाही अप्पा, रवीशिवाय मी अन्य कोणाचा...''

''उमा, तुझा आणि रवीचा सहवास किती वर्षांचा? लग्नानंतरची दोन वर्षं



आणि आधीचे सहाएक महिने. त्यावर संबंध आयुष्य काढावंस? तेही ठीक मानलं एक वेळ; पण तुझ्या गर्भाचं काय? त्यानं कायम वडिलांच्या छत्राशिवाय जगावं? का?...''

लक्ष्मीबाईंना वाटलं, असं बोलून वामनराव तिच्यावर दडपण तर आणत नाहीयेत? उमाचे या घराशी असलेले बंध दृढ झाले आहेत. ते तोडणं तिला अशक्य वाटणारच.

''हे बघ उमा, मुलाला आई-वडील या दोन्ही नात्यांची नितांत गरज असते. तुला आई नाही, मी तुला काय सांगणार? तुला अनुभव असेल. त्यातलं एक नातं नसेल तरी थोडंफार अनाथपण त्या मुलांच्या वाट्याला अपरिहार्यपणे येतंच. तू आई-वडील दोघांची भूमिका पार पाडू शकशील. पण त्या त्या नात्याची भूमिका ते ते नातंच उत्तम रीतीनं पार पाडू शकतं.''

मग ते जरा थांबले. आणि मग अविचलपणे म्हणाले, ''मी एक स्थळ आणलंय. मुळगावकर आडनाव त्यांचं. मुलाचं नाव श्रीधर मुळगावकर... रवीच्याच वर्गात होता - कॉलेजात, म्हणे. बायको वर्षापूर्वीच कॅन्सरनं गेली. त्याचा धंदा आहे स्वतःचा, मला वाटतं, तुम्ही दोघं एकमेकांना भेटा- एकदोनदा... अगदी सहज. काहीही मनात न ठरवता. मग विचार करा. घाई नाही. माणसं चांगली आहेत. सुशिक्षित आहेत. तुझ्या अवस्थेची त्यांना कल्पना आहे. मान्य आहे त्यांना...''

''तिच्या या अशा नाजूक अवस्थेत तुम्ही...'' लक्ष्मीबाई मध्येच म्हणाल्या.

''कल्पना आहे मला. पण हीच वेळ योग्य आहे यातून बाहेर पडण्याची. उमा, अंतिम निर्णय तूच घ्यायचा आहेस...''

वामनराव थांबले, तसं लक्ष्मीबाईंनी उमाकडे पाहिलं. ती शांत होती. ती काही बोलली नाही. ''तू दडपण घेऊ नकोस.'' लक्ष्मीबाई खोलीतून बाहेर पडताना म्हणाल्या.

खोलीत आल्या आल्याच त्या वामनरावांना म्हणाल्या,''तुम्ही उमावर सक्ती...''

''काय बोलतेस? सारं तिच्यावरच सोपवलं आहे मी...''

''पण आपण आहोतच की तिला...''

''कसं समजत नाही तुला? इतकी भाबडी का होतेस? उमापुढे सबंध

आयुष्य पडलंय... आज ना उद्या तिला तिच्या आयुष्याचा नव्यानं विचार करायला नको? ती जितका लवकर निर्णय घेईल, तितकी पटकन या सगळ्यातून बाहेर पडू शकेल ती.''

''तुम्हाला रवीच्या मुलाबद्दलही...''

''रवीशी नातं संपल्यावर उरलं काय आता? उमानं तरी तुझ्या गेलेल्या मुलाची बायको म्हणून कायम का जगावं?''

''तसं नाही हो... पण...''

लक्ष्मीबाई गप्प होऊन गेल्या.

दोन-अडीच महिने उलटून गेले. उमा त्या गोष्टीबद्दल काहीच बोलत नव्हती. एकदा-दोनदा ती श्रीधरला भेटली. त्यांच्या घरीही जाऊन आली. वामनरावांनी तिला त्यावर काहीच विचारलं नव्हतं. त्या मंडळींना काहीतरी सांगणं जरुरीचं तर होतंच. त्यांना घाई नव्हती; पण निर्णय तर घ्यायला हवाच होता. होकार वा नकार.

लक्ष्मीबाईंना मात्र वाटत होतं, उमा तयार कशी होईल? तिच्या रक्तात मिसळून एक झालेलं रवीचं रक्त आपलंच आहे. आपल्या रवीचं. ते रक्त तिला या घरापासून वेगळं कसं करेल?

लक्ष्मीबाई हॉलच्या खिडकीत उभ्या होत्या. लांबून त्यांना उमा येताना दिसली. अवघडलेली, ओढलेली. त्यांनी दार उघडलं. चपला काढताना बाजूनं तिचं पोट आता चांगलंच पुढे आलेलं दिसत होतं. सातवा महिना सरत आला होता. चेहऱ्यावर एक प्रकारची सूजही आली होती. लक्ष्मीबाईंना तिच्या पोटाकडे पाहून वाटलं, मुलगाच होणार बहुधा... आज रवी असता तर हे दिवस किती आनंदात घालवले असते... उमाचं डोहाळजेवण, कोडकौतुक...

''दूध देऊ गरम करून?''

''नको मला दूध. चहा झालाय. मी पडते जरा...''

आठ वाजून गेले. उमाच्या खोलीत अंधार होता. लक्ष्मीबाईंनी लोटलेलं दार किंचित उघडून कानोसा घेत विचारलं,''उमा... बरी आहेस ना?'' उमानं डोळे उघडले. नि उठून दिवा लावला. मग व्हरांड्यात येऊन बेसिनपाशी तोंड धुतलं. ती परत खोलीत गेली. लक्ष्मीबाई स्वयंपाकघराकडे जाऊ लागल्या, तोच खोलीतून बाहेर आलेल्या वामनरावांनी त्यांना हाक मारली,''ये जरा'', ते म्हणाले नि कधी नाही ते उमाच्या खोलीत शिरले. पाठोपाठ लक्ष्मीबाईही.



कपाटाशी असलेलं स्टूल वामनरावंनी ओढलं.

''काय म्हणतेस? तब्येत बरी आहे ना?''वामनरावांनी विचारलं. मग थांबून ते म्हणाले,''काही विचार केलास? कशी वाटतात माणसं?'' उमानं उत्तर दिलं नाही. ते पाहून वामनरावच म्हणाले,''मी पाठीमागे नाही लागत तुझ्या. नसला केलास...''

''नाही. मी केलाय विचार, खूप केला...''

''सगळंच कठीण आहे... हे तर खरंच. माझ्या पिलाला...'' उमाचा आवाज गलबलला होता. तिनं आवंढा गिळला आणि म्हणाली,''शेवटी रवीच्या मृत्यूपेक्षा येणारा आमचा जीव महत्त्वाचा... मी त्यासाठीच तयार आहे... काय करू?... आहे तयार...''

आणि त्याच क्षणी ती हमसाहमशी, बांध फुटल्यासारखी रडत राहिली. लक्ष्मीबाईंचे डोळेही टपाटप गळू लागले. त्यांनी जवळ जाऊन तिला मिठीत घेतलं. कितीतरी वेळ त्या एकीकडे आपले डोळे पुसत होत्या आणि दुसरीकडे तिला थोपटत होत्या.

''काय करणार, उमा?'' वामनराव हताशपणे डोक्याला हात लावून पुटपुटले.

काही क्षणांनंतर उमा स्वतःला सावरत म्हणाली,''फक्त काही महिने जाऊ देत. मी श्रीधरना तसं सांगेन.''

वामनराव उठले. तिच्या जवळ गेले. तिच्या डोक्यावरून त्यांनी समजुतीनं थोपटल्यासारखं केलं नि ते खोलीतून बाहेर गेले.

''योग्य केलंस उमा तू. आम्ही किती दिवस पुरणार? त्या जिवाला आधार हवाच ग कायमचा...''

लक्ष्मीबाईंना वाटलं, उमापेक्षा स्वतःलाच आपण समजावत आहोत.

''चला, पानं मांडता ना?'' वामनरावांनी दारातच उभं राहून लक्ष्मीबाईंना विचारलं. लक्ष्मीबाई सावकाश चालत बाहेर आल्या.

रात्री वामनरावांचा डोळा कधी लागला लक्ष्मीबाईंना कळलंही नाही. खोलीतला दिवा तसाच होता. त्या उठल्या, दिवा बंद केला; पण झोप येईलसं त्यांना वाटेना. त्या व्हरांड्यात आल्या नि हॉलच्या दिशेनं चालू लागल्या. वळून त्यांनी उमाच्या खोलीत पाहिलं. खोलीत दिवा नव्हता. सगळं घर शांत शांत होतं. त्या शांततेत ते घर त्यांना क्षण दोन क्षण परकं वाटलं. हॉलमध्ये येऊन

अंधारात त्या कोचावर बसून राहिल्या. मनात विचारांची गर्दी दाटून आली. वामनरावांनी आपलं कर्तव्य पूर्ण केलं. त्याच अलिप्तपणे आणि अगदी सहजपणे ते उरल्यासुरल्या संसारातूनच वेगळे झाले. इतके की रवीचा या घरात येऊ पाहणारा जीवही त्यांना कसलीही ओढ निर्माण करू शकला नाही... पोराचा मृत्यू त्यांनी आधी पाहिला होता, नव्हता अनुभवलाच होता, म्हणून असेल का, ते इतक्या सगळ्यापासून अलग होऊ शकले?... उमाचं आयुष्य आज नाहीतर उद्या सुरू होईल आणि घराशी असलेलं नातं संपूनही जाईल. तिच्या बरोबरीनं मात्र त्या छोट्या जिवाचं - आपलं रक्ताचं नातं एका नवीनच, अनोळखी घरात जोडलं जाईल. उमाचं आयुष्य एका निर्णयावर किती गोष्टी ओलांडून पुढं गेलं... आपल्याला मात्र कुठलाच मार्ग सापडला नाही. रवी गेला, सगळं आयुष्य किती बदलून गेलं. म्हणता म्हणता एकेक... एकेक सगळं निसटत चाललंय. कुठंतरी कळत होतं आपल्याला; पण स्वीकारायला मन तयार नव्हतं. धरून ठेवू पाहत होतो आपण सगळं - चिवटपणे. त्यांनी खिडकीबाहेर पाहिलं. सर्वत्र अंधार पसरला होता. खिडकीजवळ लहानपणी रवीनं लावलेला सोनचाफा स्तब्ध होता... लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांच्या कडांवर आपसूक पाणी जमा झालं...

●●●





# हॅल्युसिनेशन्स

## डॉ. पद्मनाभ केसकर

बाहेर पावसाची रिपरिप चाललेली, हवेत कमालीचा गारठा जाणवतोय, रात्रीचे साडेदहा वाजत आले आहेत. तसा फार वेळ झालाय म्हणता येणार नाही, पण या अशा सुस्त वातावरणामुळे बाहेर केव्हाचीच सामसूम होऊन गेलीय. काळा चिकट अंधार सुस्त अजगरासारखा वेटोळे घालून पडलाय... त्यात लाईट पण नाहीत!

मी नुकताच संध्याकाळची ओ.पी.डी. करून परतलो होतो, अंगात जर्किन असूनसुद्धा नखशिखान्त भिजलो होतो, थंडीनं डोकं सुन्न पडल्यासारखं झालं होतं... जड... जड... हँगओव्हर असल्यासारखं. इतकं जड, की इलेक्ट्रिकचा एखादा सौम्य झटका डोक्याला घेतला तर बरं होईल! आज असं विचित्र फीलिंग का येतंय?... काहीसं तरंगल्यासारखं?... गुरुत्वाकर्षण नसलेल्या स्पेसमध्ये फिरल्यासारखं? नीट संदर्भ पण लागत नाहीयेत. आज घरी कोण, कसं नाही? का मी वाट चुकलोय? पण असं कसं शक्य आहे? मला चांगलं आठवतंय, मी बरोबर साडेनऊला दवाखाना बंद करून निघालो... तेव्हा पण धो-धो पाऊस कोसळतच होता, रस्त्यातून अंधार कापत निघालो, हळूहळू... कारण रस्ता चिखलाने भरलेला होता... सामसूम रस्ता... हेडलाइटचा फोकस इकडे-तिकडे फिरवत गाडीवर ठेचकाळत येताना अभिमन्यूच्या चक्रव्यूहाची आठवण का यावी?... यातून बाहेर पडताच येत नाहीये...असं विचित्र फिलिंग भिनत चालल्यासारखं... ॲनेस्थेशिया

दिल्यावर अंग जसं जडजड पडत जातं... जागं राहण्याचा पराकोटीचा प्रयत्न करत असतानाच हळूहळू डोळे आणि अंग जड पडत असल्यासारखं!... त्यानंतर अंधार आतला आणि बाहेरचा... तो भेदून डोळ्यांसमोर होणारे रंगीत भास!... हॅल्युसिनेशन्स?... त्यानंतरची जाणीव?

मी आता घरी एकटा... मेणबत्तीच्या उजेडात कॉफी पितोय... हे सत्य की आभास? 'नो नो इट मस्ट बी ट्रू!'... घरचे सगळे कालच अष्टविनायक दर्शनाला गेलेत... आपणच नाही का सांगितलं... मी दवाखाना बुडवून येत नाही म्हणून... मी एकटा घरी थांबतो... ते कालच की खूप वर्षांपूर्वी? ... काही कळत नाहीये. नुसते विचित्र भास होतायेत... मी नक्की कोण?... शेजारच्या वर्मांना कडी वाजवून विचारावं का?... 'मी' 'मी'च आहे ना म्हणून... पण मग ते 'वेडा' म्हणाले तर?

बाहेर पावसाचा जोर वाढलाय... बेडकांचा डराँव डराँव आवाज कानांवर आदळतोय. मला येऊन बराच वेळ झालाय का? किती वेळ झाला मी इथं बसलोय...

ट्रिंग ट्रिंग... ट्रिंग ट्रिंग...

फोनचा आवाज कानांवर आदळतोय.

हा आवाज तरी खरोखरचा येतोय का हा पण आभास? चान्स घ्यायला काय हरकत आहे?

"हॅलो..."

"हॅलो... डॉ. प्रथमेश दातार आहेत का?" एका बाईचा पुरुषी आवाज.

आवाज पूर्वी ऐकल्यासारखा वाटतोय.

"बोलतोय..." जर मी खरोखरच प्रथमेश असेन तर... मनातल्या मनात.

"तुमची ऊर्मी मासिकातली कथा वाचली... म्हणून थोडी चौकशी करायची होती..."

माझी भूल थोडीशी उतरायला लागली होती का?... मला संदर्भ लक्षात यायला लागले होते. जरी मी व्यवसायाने डॉक्टर असलो तरी हौस म्हणून मी कथालेखन करायचो... बहुतेक वेळेला काहीतरी कॉम्प्लिकेटेड... मानसिक गुंतागुंत असलेलं!

"तुम्ही कोण?... आणि इतक्या रात्री का फोन करताय?" मी आता बाहेर पडायला लागलोय विळख्यातून... का मला असं नुसतं वाटत होतं?

"मी अपूर्वा नाईक... आणि आत्ता रात्र नाही, सकाळचे चक्क साडेसात



वाजलेत." तो बाईचा पुरुषी आवाज मला परत विळख्यात खेचतो.

"काय?" मी विश्वास न बसून ओरडतो. "हे कसं शक्य आहे?... अपूर्वा नाईक तर माझ्या त्या कथेतलं काल्पनिक पात्र आहे..."

"असं तुम्हाला वाटतं." थंडगार बर्फासारखा तिचा आवाज.

"असेल कदाचित... तू अपूर्वा नाईक असशीलसुद्धा... नावाचा योगायोग असू शकतो. ती कथा पूर्ण काल्पनिक होती... असं सत्यात काही घडलेलं नाहीये..." माझा समजावण्याचा दुबळा प्रयत्न.

"डॉ. प्रथमेश... कसं शक्य आहे हे?...

"फक्त नावाचाच योगायोग नाही हा... तुम्ही लिहिलंत तशीच ती ३१ डिसेंबरची रात्र होती... न्यू इयरच्या पार्टीत ड्रिंक्स जरा जास्तीच झालं... मला खरं तर एवढी सवय नाही... मी माझी 'हिलमन' बाहेर काढून घरी जायला निघाले तेव्हा रात्रीचे साडेबारा वाजले होते. प्रथमेश नावाचा योगायोग असू शकतो; पण गाडी सुद्धा 'हिलमन'च आणि रात्रीचे बरोबर साडेबाराच?... माझा बंगला गावाबाहेर आहे... हवेत प्रचंड गारवा... मद्याची नशा डोळ्यांवर चढायला लागलेली... डोकं जड, त्यात गार वाऱ्याच्या झुळकीनं जास्तीच तरंगल्यासारखं... गाडीचा स्पीड किती वाढलाय कळत नव्हतं... गावाबाहेरचा कच्चा रस्ता... पूर्णपणे निर्मनुष्य... अंधारमिट्ट... एका वळणावर अचानक एका पायानं लंगडत जाणारा म्हातारा कुठून आला?... हा म्हातारासुद्धा एका पायानं लंगडणाराच?... हा पण योगायोगच?... मेंदूपर्यंत जाणीव पोचेपर्यंत कारच्या बोनेटवर आदळून म्हातारा लांबवर फेकला गेला... क्षणार्धात नशा उतरली... म्हाताऱ्याला लगेच हॉस्पिटलमध्ये न्यावं का?... आणि समजा, तो मेलेला असेल तर?... जालीम गुन्हा होता... कदाचित जेल?... असंच सुसाट निघून जावं... अंधारात... कुणाला कळणार आहे? जाऊ नका नको... निघून गेले आणि त्या म्हाताऱ्यात धुगधुगी असेल तर या निर्मनुष्य रस्त्यात त्याला रात्रभर मदत मिळणं काही शक्य नाही... मी वाचवलं तरच तो वाचणार, पण मग मी अडकणार... दोनच क्षण विचार केला... आणि गाडी सुसाट वेगानं सोडली... घराच्या दिशेनं... अगदी तुमच्या कथेतल्यासारखीच आणि नंतर तुम्ही त्या स्त्रीच्या मनाची जी उलाघाल दाखवली... कदाचित मी थांबले असते तर तो वाचला असता... ती माझीच उलाघाल होती. दुसऱ्या दिवशी सकाळी मी परत त्या स्पॉटजवळ गेले तर तिथं कुणाचाच मागमूस नव्हता... नंतर पण मी बरीच चौकशी केली, पण काहीच कळलं नाही... माझ्या मनाची अजून तडफड चाललीय... तुम्ही

मला मदत करू शकता प्रथमेश... मला यातून बाहेर काढा.''

सगळ्या संवेदना बधीर झाल्या होत्या. असं कसं शक्य आहे? मग हा आवाज पूर्वी ऐकल्यासारखा का वाटतोय? अपूर्वा नाईक खरोखरच अस्तित्वात आहे का...?

''हॅलो डॉक्टर... मला फक्त एक सांगा, त्या म्हाताऱ्याचं नंतर काय झालं? तो जिवंत आहे का मेला?... तुम्ही मला जोपर्यंत ते सांगत नाही, तोपर्यंत मी तुमचा पिच्छा सोडणार नाही...''

अजून एक विळखा पडला होता. नाकातोंडात पाणी गेल्यावर जी घुसमट होते, तशीच... मला लवकर वर काढा...

''मला खरंच माहीत नाही हो... पुढं काय झालं ते मला कसं काय माहीत असणार?'' माझा केविलवाणा आवाज...

''खोटं बोलू नका... मला माहितीय, त्या वेळी तुम्ही तिथंच होता, त्या अंधारात कुठंतरी विरघळलेले... म्हाताऱ्याला उडवलेलं पण तुम्ही पाहिलंत, मला तेव्हा सारखी जाणीव होत होती, आम्हा दोघांपलीकडे अजून कुणीतरी तिसरा तिथं आहे म्हणून, तुम्ही साक्षीदार आहात... मी तुम्हाला लवकरच भेटायला येतेय...''

''ओहऽऽ नोऽऽ'' मी किंचाळलो, छातीवर हात दाबत... मी पूर्ण तळाला पोचलो होतो. वर येऊ नये म्हणून जणू काही एखादी अज्ञात शक्ती मला खाली दाबत होती... भयानक घुसमट... शेवटचे क्षण जवळ आल्याची जाणीव, शेवटचा उपाय म्हणून मी जोरात ओरडतो... हातपाय त्वेषाने झटकत... अंधाराची झूलं फेकून देण्याचा प्रयत्न करत... गुंगीचा अंमल झटकण्याचा शेवटचा क्षीण प्रयत्न...

श्वास फुलला होता, छातीचा भाता वर-खाली होत होता... खूप दमल्यासारखं, कपाळ घामानं डबडबलं होतं.

लिहिता लिहितासुद्धा किती एक्साइट झालो होतो?

मी पेन खाली ठेवलं.

कथेची सुरुवात तर छान झाली होती.

काय नाव देऊ कथेला?

'हॅल्युसिनेशन्स'

... पण आत्ताचा हा होता तो सत्य की... आभास?

****



एक लांबलचक पांढरी खोली. मध्यभागी ग्लासचा टॉप असलेलं अंडाकृती टेबल. समोरच्या खुर्चीत रेलून प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. मेहता बसलेले. माझ्या शेजारी माझे वडील.

एव्हाना माझ्या वडिलांनी एकूण पार्श्वभूमी सांगितलीये- 'त्यांच्या दृष्टिकोनातून'.

डॉ. मेहता हाताने माझ्या वडिलांना बाहेर जाण्याची खूण करतात.

आता त्या शांत वातावरणात फक्त आम्ही दोघंच.

''डॉ. प्रथमेश, आय होप यू विल को-ऑपरेट मी?''- डॉ. मेहतांचा धीरगंभीर आवाज कानावर पडला.

हा आवाजसुद्धा कुठंतरी ऐकल्यासारखा वाटत होता... ओळखीचा.

मी यंत्रवत मान डोलावतो.

''आता मी सांगतो त्याप्रमाणे करा. फर्स्ट, मला जानेवारीपासून उलटे महिने क्रमाने म्हणून दाखवा.''

मी न अडखळता म्हणून दाखवतो.

''गुड! आता ५० पासून उलटे आकडे क्रमाने...''

मी वैतागतो.

''डॉ. मेहता, तुम्ही यातून प्रूव्ह काय करणार आहात?''

''आय वॉंट टू चेक युवर ओरिएंटेशन.''- डॉ. मेहता उत्तर देतात.

''याचा अर्थ, तुम्ही मला वेडा असंच ॲझ्युम करून सुरुवात करताय. डॉ. मेहता, बट फॉर युअर इन्फर्मेशन मी एक यशस्वी डॉक्टर आणि प्रतिभासंपन्न लेखकही आहे.''- मी थोडासा चिडून म्हणतो.

''आय ॲग्री विथ यू,'' डॉ. मेहता स्मित हास्य करत म्हणतात. ''बट धिस इज द मेथड ऑफ कौन्सेलिंग.''

मी थोडासा शांत होतो.

''डॉ. मेहता, माझं बॅडलक असं, की या ज्या काही घटना घडतायत, त्याचा माझ्याजवळ काहीही पुरावा नाही. त्यामुळे घरच्या लोकांना वाटतं, मला 'भास' होतात. पण ते तसं नाहीये... तसं खरोखरच घडतंय, किंवा मग असंपण असू शकेल... माझ्याविरुद्ध षड्यंत्र रचलं जात असेल... मला एकटं पाडण्यासाठी.''

''...''

''तुम्हाला 'गोबेल टेक्निक' माहितीये डॉ. मेहता?... माझ्यावर सगळे जण

हॅमरिंग करतायत...''

"तुला भास होतायत... तुला भास होतायत...''

"मला खरोखरच भास होत असतील? पण ते कसं शक्य आहे? मी स्वतः त्या व्यक्तीशी बोलतो. मला खात्री आहे माझ्याबद्दल. माझा माझ्यावरचा विश्वास का दुबळा करताय? तुमचा तरी माझ्यावर विश्वास आहे ना डॉ. मेहता?'' डॉ. मेहता खांद्यावर थोपटतात.

"नक्की सुरुवात केव्हा आणि कशी झाली ते सांगता का? तुमच्या दृष्टिकोनातून!''

मी दोन क्षण विचार करतो... "सुमारे सहा महिन्यांपूर्वीची गोष्ट...''

****

अजून धुंदी उतरायला तयार नव्हती. इतकं मोठ्ठं यश आणि इतक्या लहान वयात? अवघा चोवीस वर्षांचा मी आणि हजारो कथाकारांमधून माझी 'सर्वोत्कृष्ट नवोदित लेखक' म्हणून निवड होते काय, माझा नागपूरला मराठी साहित्य संमेलनात सत्कार होतो काय, माझी 'गोबेल' नावाची कथा सर्वोत्कृष्ट म्हणून निवडली जाते काय, सगळंच स्वप्नवत! हजारोंच्या उपस्थितीत शाल, श्रीफल, बक्षीस... टाळ्यांचा कडकडाट!

... दोन दिवस उलटले तरी भेटायला येणाऱ्या लोकांची रीघ चालूच आहे... अभिनंदनाचे येणारे फोन...

आज जरा लवकरच जाग आली. घड्याळ्यात पहाटेचे साडेपाच वाजलेले होते. झोप पूर्णपणे उडाली आहे, उगीच लोळत कशाला राहा, असा विचार करत मी उठतो, तोंडावर पाणी फिरवून गॅलरीत येतो.

ऐन डिसेंबरमधली पहाट...

कमालीचा गारवा. उजाडायला सुरुवात झाली आहे; पण अजून सगळं अस्पष्ट. धुक्याचे थर जमा झाले आहेत. दाट. त्यामुळे सगळंच धूसर धूसर...

... मला धुकं कशाचं प्रतीक वाटतं?

संदेह!

मी गॅलरीत असलेल्या खुर्चीत बसतो विचार करत... मी अति विचार करतो का?

धुक्यावरून डोक्यात विचार येतो माझ्या 'गोबेल' कथेचा. संपूर्ण कथा धुक्याने वेढल्यासारखी... संदेह निर्माण करणारी!



माणसाचं मन किती कमकुवत असतं. एकच गोष्ट सारखी सारखी मनावर बिंबवायला सुरुवात केली की हळूहळू ती खरी वाटायला लागते. माणसाचा स्वतःपेक्षा समोरच्या सांगणाऱ्यांवर जास्त विश्वास असतो.

... मी समोर पाहिलं, धुकं जास्तच दाट झालं होतं. माझ्याभोवती वेढलं जात होतं. मी अडकणार तर नाही ना या धुक्यात?

माझी 'गोबेल' गोष्टपण काहीशी अशीच.

निशा राव आणि अभिमान राव एक नवविवाहित दांपत्य. सुखाचे, नवीन नवलाईचे दिवस चालले आहेत आणि एक दिवस रात्री पिक्चर पाहून ते दोघं परततात. रात्रीचा बारा-साडेबाराचा सुमार असेल, सगळीकडे सामसूम. दारात एक माणूस बसलाय... उंचापुरा, गोरापान, गालावर थोडेसे दाढीचे खुंट वाढलेत, पण ते त्याला शोभतायत. जीन्स पँट, वर ढगळा स्टोनवॉशचा शर्ट... घारे डोळे, एकूण व्यक्तिमत्त्व रुबाबदार... अभिनवसारखं!

... पण इतक्या रात्री हा माणूस आपल्या घरापाशी काय करतोय?

"तुम्ही कोण?'' अभिनव निशाला जवळ खेचत विचारतो.

तो अविचल. आपले घारे डोळे अभिनववर रोखत उलट विचारतो,

"मी अभिनव राव. पण तुम्ही कोण?''

... त्या रात्रीपण असंच धुकं पसरलेलं असतं का?

... ट्रिंग... ट्रिंग... ट्रिंग...

आतमध्ये घरात फोन वाजतोय. कुणी उचलत नाहीये त्या अर्थी अजून सगळे गाढ झोपेत असले पाहिजेत. मी उठून कॉर्डलेस फोन घेऊन परत गॅलरीत येतो.

"हॅलो, मी डॉ. प्रथमेश दातार बोलतोय.''

"मी निशा राव बोलतीये. डॉ...''

"काय...?'' धुक्याचे लोटच्या लोट एकदम अंगावर चाल करून येतात... संदेह... संदेह!

"कोण निशा राव? मी या नावाच्या कोणा व्यक्तीला ओळखत नाही.''- मी स्वतःला सावरत म्हणतो.

पलीकडच्या बाजूने हसण्याचा गोड आवाज... हवाहवासा... ओळखीचा...

"डॉक्टर, मस्करी करताय का? माझ्यावर, माझ्या जीवनावर 'गोबेल' लिहिता आणि मला ओळखत नाही?''

"लिसन मॅडम, ती गोष्ट पूर्णतः काल्पनिक होती. तशी टीप मी गोष्टीखाली दिलेली होती."- मी माझी बाजू भक्कम करतो.

परत एकदा तोच हवाहवासा हसण्याचा आवाज..." त्या टिपेवर कितपत भरवसा ठेवायचा डॉक्टर? तसा तर वैधानिक इशारा प्रत्येक सिगरेटच्या जाहिरातीत तळाला दिलेला असतो. त्याच्याकडं कोण लक्ष देतं?... तर सांगायचा उद्देश हा, की तुम्ही 'गोबेल' माझ्या जीवनावर लिहिली."

"तुमचा गैरसमज होतोय मिसेस राव. हा योगायोगही असू शकतो..."

"असं कसं शक्य आहे डॉक्टर? योगायोग एखाद्या नावाचा, एखाद्या प्रसंगाचा असू शकतो, पण तुमच्या कथेत तसं झालेलं नाहीये... प्रसंग अन् प्रसंग... वेळ अन् वेळ सारखी आहे, अगदी शब्दपण तेच..." तिचा आवाज कमालीचा उत्तेजित झाला होता.

ती खोटं बोलत नसावी, असं मला आतून वाटायला लागलंय. खरं तर मला असं वाटायला नको, की मी तिच्या कह्यात चाललोय. कदाचित...

"तुम्ही खरं बोलताय का?" माझा सुरुवातीचा आवेश नष्ट झाला होता.

"नाहीतर काय?... आता बघा, तुमचासुद्धा माझ्या बोलण्यावर पहिल्यांदा विश्वास बसला नव्हता ना, तसाच माझासुद्धा त्या रात्री त्या माणसावर विश्वास बसला नव्हता आणि बसेलच कसा? दोन वर्षं एखाद्या माणसाबरोबर संसार केल्यावर अचानक एका रात्री एक त्रयस्थ येऊन म्हणतो, मीच तुझा नवरा आहे, मीच अभिनव राव आहे. कसा विश्वास बसणार, सांगा ना तुम्ही?"

"हो," मी भारावून म्हणतो.

"आणि नंतर तुम्ही जसं कथेत लिहिलंत तसंच घडलं! तो रोज यायचा आणि सांगायचा, मीच अभिनव राव आहे, मीच तुझा नवरा आहे. हळूहळू अभिनवची मनःस्थिती बिघडायला लागली. सुरुवातीला चिडचिड, मग अस्वस्थता, बेचैनी. कदाचित माझा त्या परक्यावर विश्वास बसला तर? कारण तो तसा रुबाबदारच होता."

"मग?"

"मग काय, एक दिवस तो असाच सकाळी सकाळी आलेला... आम्ही सोक्षमोक्ष लावायचं ठरवलं, अभिनव डावखोरा आहे... व्हॉट अबाऊट यू?...तो हसला. त्यानं खिशातून पेन काढलं व वळणदार अक्षरांत डाव्या हातानं समोरच्या कागदावर लिहिलं,'मीच अभिनव आहे'..."



"आश्चर्य आहे... माझ्या कथेत पण हा उल्लेख आहे:" - मी.

"आश्चर्य या एकाच गोष्टीचं नाही, डॉक्टर... अभिनवच्या डाव्या खांद्यावर तुळशीपत्र आहे, जन्मखूण आहे ती त्याची... आयडेंटिफिकेशन मार्क! तो त्रयस्थ आता बरोबर अडकणार होता. त्या दिवशी तो माझ्या वाढदिवसाचा बुके घेऊन आला होता... अभिनवनं त्याला हसत हसत ते तुळशीपत्र दाखवलं. त्यानं शांतपणे बुके माझ्या हातात दिला आणि... डाव्या खांद्यावरून शर्ट खाली ओढला... बटनं तुटली, शर्ट फाटला... खांदा उघडा पडला... डाव्या खांद्यावर तुळशीपत्र, सेम अभिनवसारखंच!... तो हसला आणि म्हणाला, 'मेनी हॅपी रिटर्न्स ऑफ द डे... माय डियर!"

"..." मी स्तब्ध.

"डॉक्टर, तुमच्या कथेतही तसंच तुळशीपत्र आणि तेही डाव्या खांद्यावरच? पॉइंट टू बी नोटेड!"

मुद्दा बिनतोड होता.

"आणि त्या दिवसापासून अभिनवचा स्वतःवरचा विश्वास उडाला... त्यात त्याला भीती वाटायला लागली. मी त्या त्रयस्थालाच अभिनव समजायला लागले तर?... अभिनव जितका बेचैन तितकाच तो त्रयस्थ शांत होता... जणू तोच खरा अभिनव होता."

"इट लुक्स इंटरेस्टिंग!" ... मी म्हणालो.

"शब्दांचे खेळ करू नका, डॉक्टर. मला एक सांगा, आमच्या जीवनातल्या या सगळ्या घटना तुम्हाला कशा काय ठाऊक?" निशा धारदार आवाजात म्हणाली.

"हा योगायोग असावा... शिअर कोइन्सिडन्स," मी म्हणालो; पण खरं तर मीही आश्चर्यचकित झालो होतो.

"माझं आणि अभिनवचं रजिस्टर मॅरेज झालेलं... आणि आमच्याजवळ आमच्या लग्नाचा एक पण फोटो नाही, हे पण तुम्हाला माहिती?... हा पण योगायोगच?"

मी गप्प... डोक्याला मुंग्या यायला लागल्यात. असं घडू शकतं?

"बरं, ते राहू दे... आपण आता कथेच्या शेवटाकडे वळू... अभिनव पूर्ण खचला होता, स्वतःचं व्यक्तिमत्त्व हरवल्यासारखा!... शेवटी या प्रकरणाचा निकाल लावायचं आम्ही ठरवलं. अभिनव उत्कृष्ट मोटारसायकलपटू होता. तो सिंहगड

त्याच्या रेसर मोटरसायकलने अवघ्या चार मिनिटांत उतरायचा. चढावर गाडीचा कंट्रोल त्या मानानं सोपा, पण वेडीवाकडी वळणं आणि बेफाम उतार! अशा वेळी अभिनवचं कौशल्य बघत राहावं... चौथ्या मिनिटाला तो कोणत्याही परिस्थितीत पायथ्याला हजर असायचा... हे फक्त 'अभिनवच' करू शकतो, आता तेवढाच उपाय शिल्लक होता... त्यानं हेही आव्हान सहज स्वीकारलं आणि म्हणाला, "बिलिव्ह मी, मीच अभिनव आहे."

"हे तर अगदी माझ्या कथेतल्यासारखं झालं!" मी नकळत म्हणालो.

"तुमच्या कथेत पण ती १५ ऑगस्टचीच संध्याकाळ होती. बारीक पाऊस पडून गेला होता. डॉक्टर, त्या दिवशीही धुकं होतं ना?... माझा खरा अभिनव मला मिळणार होता... गर्दी ओसरली होती, नीरव शांतता... बरोबर साडेसहा वाजता त्या शांततेत, दोन मोटारसायकलचे फायरिंग उमटले... मीच माझा दुपट्टा हलवून सिग्नल दिला... सुसाट वेगानं गाड्या निघाल्या... धुक्यात अदृश्य झाल्या... आणि..."

"... आणि तिसऱ्याच वळणावर अभिनवची गाडी दरीत कोसळली... डेड ऑन दि स्पॉट." मी तिचं वाक्य पुरं केलं... संमोहित होऊन.

"हो, तसंच घडलं... आश्चर्य. ऑन दि स्पॉट" मी तिचं वाक्य पुरं केलं... संमोहित होऊन.

"हो, तसंच घडलं... आश्चर्य... त्याचं नाही डॉक्टर; पण तुम्हाला कसं कळलं, की तो 'त्रयस्थ' माझा पूर्वायुष्याचा प्रियकर होता, आणि मीच अभिनवच्या मोटरसायकलचे ब्रेक फेल केले होते म्हणून..."

माझे शब्द घशातच अडकले... मी घुसमटत चाललो होतो... खोल खोल पाण्यात बुडल्यासारखा... किंवा... किंवा ऑक्सिजनवर असलेल्या पेशंटचा मास्क काढून घेतल्यावर त्याची तडफड अशीच होईल का?... जड जड शरीर...

"डॉक्टर, मला संशय आहे... त्या धुक्यात तुम्ही मला दिसला होतात... अस्पष्ट!... तुम्ही पाहिलंत, ब्रेक फेल करताना... यू आर आय विटनेस... मी लवकरच तुम्हाला भेटायला येतेय..."

... आता फक्त शेवटचा क्षण... जिवाचा आकांत, मी ओरडतो, पण तो हात पुढे येतो... खांद्यावर! ... मानेवर...

"प्रथमेश... प्रथमेश काय होतंय?... फोन का हातात घेऊन बसलायस?"

हा आवाज माझ्या वडिलांचा आहे ना?

फोनवर फक्त डायल टोन ऐकू येत होता.



त्या बर्फाळ थंडीत मी घामानं चिंब झालो होतो.

घरचे म्हणतात मला भास झाला!

* * * *

"हं... एकूण असं आहे तर!" डॉ. मेहता डोळे मिटत... दोन भुवयांचा मधला भाग चिमटीत पकडत म्हणाले.

परत नीरव शांतता.

ती शांतता भंग करत डॉ. मेहता परत विचारतात, "हा एकच प्रसंग?... का आणखी अजून काही अनुभव?"

मी सरसावून बसलो.

निदान डॉ. मेहता माझं बोलणं हसण्यावरी तरी नेत नव्हते. कदाचित ते याच्यातून मार्ग काढतीलसुद्धा!

"नाही, असं बऱ्याचदा होतं... पण प्रत्येक वेळी मी एकटा असतो. आता परवाचीच गोष्ट घ्या ना! आई आणि मी दोघंच घरात होतो. आई अंघोळीला गेली आणि फोन वाजला, फोन उचलला तर फोनवर नितीन गोडबोले."

"कोण नितीन गोडबोले?" डॉ. मेहता.

"नितीन गोडबोले म्हणजे माझ्या 'वाट चुकलेला प्रवासी' या कथेतलं मध्यवर्ती पात्र हो! तुम्हाला कसं माहीत असणार म्हणा. तुम्हाला थोडक्यात पार्श्वभूमी सांगतो. या कथेत हा नितीन गोडबोले रोजच्या ठरावीक जीवनाला कंटाळून आत्महत्या करायला एका टेकडीवर जातो. तो आत्महत्या करणार, इतक्यात त्याला एक तिथं फिरायला आलेला माणूस अडवतो. हा माणूस म्हणजे आशिष सन्मित्रा. त्याचा आज काही केल्या वेळ जात नसतो. त्याचं म्हणणं - आपण एक तासभर गप्पा मारू, मग तू आत्महत्या कर. नाहीतरी असा तासाभरानं काय फरक पडणार आहे?"

डॉ. मेहता लक्ष देऊन ऐकत होते.

"आणि एक तासभर ते अशा काय गप्पा मारतात, की ज्यामुळे नितीन गोडबोलेची जीवनाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाते! आणि तो आत्महत्या न करता टेकडी उतरून जातो आणि जो समजून सांगणारा आशिष सन्मित्रा असोत तोच आत्महत्या करतो."

"इंटरेस्टिंग वन..." डॉ. मेहता कॉम्प्लिमेंट देतात.

"... पण डॉक्टर या नितीन गोडबोलेंनी त्या दिवशी फोनवर माझ्यावर भीषण आरोप केलाय. त्याच्या मते त्याच्या जीवनात पण असंच घडलं... पण

ही गोष्ट माझ्यापर्यंत कशी पोचली?... डॉक्टर, त्याचा आवाज संशयी होता, त्या संध्याकाळी... संध्याछायेत... त्या दोघांशिवाय अजून कोणीतरी... अस्पष्ट... धूसर... आकृती त्यांच्या आसपास घोटाळत होती असा त्याला संशय आहे... डॉक्टर, आता मलाही माझ्याबद्दल संशय यायला लागलाय!... माझ्या नकळत तर मी तिथं पोचत नसेल ना?'' माझा आवाज थरथरत होता.

डॉ. मेहता शांतपणे ऐकत होते.

''... असा कुणाचा फोन आला, की मी खूप अस्वस्थ होतो... मला घाम फुटतो. कोंडल्यासारखं किंवा जिवंत माणसाला थडग्यात पुरल्यावर कसं होत असेल, तसं होतं. आता या नितीन गोडबोलेनं माझ्यावर आरोप केलाय, की त्याच्या पश्चात कदाचित मीच आशिष सन्मित्राला दरीत ढकललं असावं... नाहीतर ती आत्महत्या असणं शक्यच नाही!... कथेची उत्कंठा वाढावी म्हणून मी हा खून केला, असा त्याचा आरोप आहे... तो मला परत उद्या फोन करणार आहे... मला खूप टेन्शन आहे डॉक्टरऽऽ!'' माझ्या कपाळावर घाम जमा झाला होता.

डॉ. मेहतांनी शांतपणे खांद्यावर थोपटलं आणि पाण्याचा ग्लास पुढं केला.

मी क्षणार्धात तो रिकामा केला.

मला खरोखरच गरज होती त्याची.

डॉ. मेहता खुर्चीतून उठले. शांतपणे डोळे मिटून दोन भुवयांच्या मधला भाग चिमटीत दाबला. कदाचित ती त्यांची सवय असावी.

''आता मी थोडंसं बोलू?'' त्यांचा धीरगंभीर आवाज खोलीभर उमटला.

''प्रथमेश, सुरुवातीच्या काळात मीही लेखन करायचो, पण एवढं झोकून देऊन नाही! तरीसुद्धा आय कॅन अंडरस्टँड द मेंटॅलिटी ऑफ अ रायटर.''

त्यांचं बोलणं ऐकत राहावं किंवा कदाचित हा आवाज मी पूर्वी ऐकलेला आहे, असं मला का वाटतंय?... पण मी भारला गेलो आहे...

''एखादा लेखक एखादी कथा लिहितो, तेव्हा त्यात तो पूर्णपणे समरस होऊन जातो... नाही, त्याने तसं व्हायलाच पाहिजे... त्याशिवाय ती कथा जिवंत कशी होणार?... कथेतला एखादा प्रसंग जेव्हा तो फुलवत असतो, तेव्हा तो प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर अक्षरशः घडत असतो... जणू तो प्रसंग घडत असताना तो तिथंच बाजूला उभा असतो, पण त्रयस्थ म्हणून! तो त्या प्रसंगात हस्तक्षेप करत नाही... 'काळाचा' रोल कसा असतो? त्याच्या डोळ्यांसमोर... रामायण... महाभारत... शिवराज्य घडतं!... तो साक्षीदार असतो, पण तो हस्तक्षेप करत नाही, तसंच



लेखकाचं असतं!... मी बरोबर बोलतोय ना?''

मी मूकपणे मान हलवतो... अभिनवची गाडी माझ्याच डोळ्यांसमोर तर नव्हती का दरीत कोसळली?

''कथा पूर्ण झाली की तो लेखक त्या वातावरणातून, त्या प्रसंगापासून, पात्रांपासून वेगळा होतो. त्याचं उद्दिष्ट फक्त ती कथा जिवंत वाटावी एवढंच असतं... ते पूर्ण झालं, की ही फर्गेट्स अबाऊट द एपिसोड!...''

दोन क्षण ते मुद्दाम थांबतात, माझ्यावर झालेला परिणाम तपासण्यासाठी.

कुठंतरी आतून पटतंय.

''पण तुमच्या बाबतीत तसं घडत नाहीये! ... तुम्ही त्या कथेत, त्या प्रसंगात त्रयस्थ बनून राहत नाहीत... तुम्ही त्या कथेच्या फ्लोमध्ये इतके एक्साईट होता, की तुम्ही त्या प्रसंगात हस्तक्षेप करता... त्या कथेतल्या पात्रांशी जवळीक निर्माण करता आणि मग ही पात्रं तुम्हाला कॉन्टॅक्ट करतात... नो डाऊट हे सगळं सब-कॉन्शियस लेव्हलला घडतं, पण तुम्हाला मात्र ती वस्तुस्थिती वाटते.''

मी खूप गोंधळलोय.

''आता हे बघ प्रथमेश, या घटना घडतायत त्या फक्त कथेच्या संदर्भातच घडतायत की नाही?... ती कोण अपूर्वा नाईक तुला फोन करते किंवा 'गोबेल' कथेतली निशा तू ब्रेक फेल करताना पाहिल्याचा आरोप करते आणि कोण बरं...? हां, तो नितीन गोडबोले तुझ्यावर सन्मित्राच्या खुनाचा आळ घेतो. या सगळ्या घटना कशाच्या प्रतीक आहेत? तू तुझ्या कथेतलं कल्पनेचं विश्व आणि तुझं स्वतःचं विश्व यांच्यातील सीमारेषा ओळखू शकत नाही, त्याचे परिणाम आहेत हे'' - डॉ. मेहतांचं बोलणं कुठंतरी पटत होतं.

''पण कशावरून त्या घटना सत्यात घडल्या नसतील?... कदाचित त्या लोकांच्या जीवनात मी लिहिलं तसं घडलं पण असेल.''- माझ्या मनाच्या गाभ्यात दडून बसलेली शंका मी व्यक्त केली.

''सोप्पं आहे!... तुम्हाला त्या पात्रांचा फोन आला की त्यांच्याकडे ही घटना सत्यात घडल्याचा पुरावा मागा...'' डॉ. मेहता.

सगळं पटतंय!... पण मनात संदेह आहेच... ही अनुभूतीच काहीतरी वेगळी असते... गर्द घेतल्यावर येणाऱ्या धुंदीसारखी!

''... म्हणजे मला फोन येतात, मी फोनवर बोलतो, ते सारं खोटं?'' - मी चाचरत विचारतो.

डॉ. मेहता खुर्चीवर रेलून बसतात, पण डोळे माझ्यावर रोखलेले, "ही एक मानसिक विकृती आहे, डॉ. प्रथमेश! यात त्या व्यक्तीला बाहेरून काहीही संदेश नसताना एक्स्टर्नल स्टिमुलाय म्हणजेच भास होतात... चित्रविचित्र स्वप्नं सत्यात जगतात ही माणसं. आजूबाजूला कोणीही बोलत नसलं तरी या व्यक्तींच्या कानावर शब्द पडतात... स्पष्ट!... आमच्या भाषेत या विकृतीला काय म्हणतात माहितीये?"

"...."

वातावरणात थंडावा आलाय का?

"हॅल्युसिनेशन्स!"- डॉ. मेहतांचा धीरगंभीर आवाज खोलीभर घुमतो.

"काय?..." मी ओरडतो.

"ही तर माझ्याच 'हॅल्युसिनेशन्स' कथेची कल्पना आहे..."

... असंच काहीसं घडतं का माझ्या त्या कथेत?

... अजून ती कथा पूर्ण झालेली नाही... काय होईल पुढे?... विचारावं का डॉ. मेहतांना?... मला एक गोष्ट कळत नाहीये... मी आता डॉ. मेहतांच्या समोर बसलोय, ही तरी वस्तुस्थिती, का हा पण आभास?

****

दिवसामागून दिवस चाललेत.

... मी जास्तच अडकत चाललोय. आता परवाचीच गोष्ट घ्या ना -

निशा रावचा परत फोन आला. फोनवर ती जरा जास्तीच रेस्टलेस वाटत होती का? कारण तिने केलेल्या गुन्ह्याचा मी साक्षीदार होतो.

"मिसेस निशा राव, तुम्ही इतक्या उतावळ्या का होताय? तुम्ही म्हणताय तसं काही सत्यात घडलेलं नाही... म्हणजे सगळ्यांचं तरी असंच मत आहे... कदाचित..."

"प्रथमेश तुम्हाला कसं समजावून सांगू?... अगदी कथेत लिहिल्यासारखंच घडलंय, बिलिव्ह मी." निशा ठामपणे म्हणते.

तिचा ठाम स्वर परत माझा आत्मविश्वास डळमळीत करतो. "तुम्ही म्हणताय त्याला पुरावा काय?"

ऐन वेळी डॉ. मेहतांनी सांगितलेला सल्ला आठवतो.

"पुरावा?" हसण्याचा आवाज... १६ ऑगस्टचा पेपर काढा, 'सकाळ'मध्ये तिसऱ्या पानावर डाव्या कोपऱ्यातल्या चौकटीत बातमी आहे.



"काय?... खरंच?..." मी ओरडतो.

मी थोडा आनंदी झालो होतो का? मला पुरावा मिळणार होता म्हणून!... मला येणारे फोन हे 'भास' नाहीत हे सिद्ध होणार होते म्हणून!

*****

मी खूप अस्वस्थ आहे.

कदाचित सगळ्यांनी माझ्याविरुद्ध कट रचला आहे!

१६ ऑगस्टचाच पेपर काही केल्या मिळत नाहीये. घर सगळं पालथं केलं... शेजाऱ्यांकडे, मावशीकडे... सगळीकडे बघितलं. बरोबर १६ ऑगस्टचाच पेपर गायब!

मला हे लोक पुरावा मिळू देत नाहीयेत!

मला बाबा समजून सांगतायत... १६ ऑगस्टला कुठलाच पेपर प्रसिद्ध झाला नाही... स्वातंत्र्यदिनाच्या सुट्टीमुळे. पण मला ते पटतच नाही... का?

माझा निशा राववर... माझ्या पात्रांवर... येणाऱ्या फोनवर जास्त विश्वास बसत चाललाय?

खूप दिवसांचं स्वप्न साकार झालं.

माझ्या 'हॅल्युसिनेशन्स' कथेला 'साप्ताहिक त्रिकालप्रभा कथास्पर्धेत' प्रथम क्रमांकाचं पारितोषिक मिळालं!

... खूप दिवसांची इच्छा होती. फर्स्ट प्राइझ मिळविण्याची!

... ती नशा काही औरच असते!

त्यानंतर बालगंधर्वमध्ये सत्कार झाला... पुष्पगुच्छ, बक्षीस... आणि पाठोपाठ टाळ्यांचा कडकडाट!

अजूनही मी ट्रान्समध्येच आहे! गॅलरीत एकटाच बसलोय... रात्रीचे ११ वाजलेत... रात्रीच्या अंधारात सभोवतालचे चमचमणारे दिवे किती छान दिसतायत ना?

टुडे, आय ॲम ॲट द टॉप. बट इट इज ऑल्वेज लोनली ॲट द टॉप.

आज अशी एकटेपणाची... रितेपणाची जाणीव का होतेय?

तेवढ्यात फोन वाजतो.

मला बरं वाटतं...

मी कॉर्डलेस फोन घेऊन गॅलरीत येतो.

"हॅलो, डॉ. प्रथमेश दातार बोलतोयऽऽ"

"काँग्रेच्युलेशन्स..." एक धीरगंभीर आवाज कानावर येतो.

... हा आवाज कुठंतरी ऐकल्यासारखा वाटतोय का?

"... तुमची 'साप्ताहिक त्रिकालप्रभा'मध्ये 'हॅल्युसिनेशन्स' नावाची गोष्ट वाचली." तो आवाज मला संमोहित करतोय.

"थँक यू. पण आपण कोण बोलताय?" मी.

"मी डॉ. मेहता बोलतोय," त्या आवाजात कंपनं जास्त जाणवायला लागली.

"कायऽऽऽ?" मी ओरडतो. "हे कसं शक्य आहे...? हे तर माझ्या 'हॅल्युसिनेशन्स' कथेतलं काल्पनिक पात्र आहे..."

"... नाही डॉ. प्रथमेश, मी पण काल्पनिक नाही आणि ती कथेतली घटना पण काल्पनिक नाही."

परत तोच घुमणारा आवाज.

... तो आवाज मला तळ नसलेल्या विहिरीत ओढून नेतोय... विलक्षण वेगाने!

"म्हणजे?" मी न राहवून विचारतो.

"तुम्ही कथेत लिहिलंत तसाच काहीसा अनुभव मला माझ्या आयुष्यात आला... काही दिवसांपूर्वीचीच गोष्ट... माझ्याकडे एक पेशंट आला होता; पण तो लेखकच होता आणि तुमच्या कथेतल्याप्रमाणेच डॉक्टर. त्याला पण तुम्ही कथेत लिहिलंत त्याप्रमाणेच भास व्हायचे... त्याच्या कथेतली पात्रं त्याला रात्री-अपरात्री फोन करायची..."

"काय सांगता काय?" मी घामाने थबथबलो होतो... आजूबाजूला चमचणारे दिवे जास्ती प्रखर आणि अंधार जास्ती गडद वाटायला लागला... कथेतल्या शेवटाप्रमाणे निर्णायक क्षण जवळ आल्याची जाणीव व्हायला लागली.

... मी आधारासाठी गॅलरीच्या कठड्याला टेकत विचारतो,"मग पुढं काय झालं?"

"पुढे?... तुमच्या कथेतल्यासारखंच झालं हो!... त्याला हळू हळू फोनवरती होणारे भास जास्त जाणवायला लागले... त्याचा आजूबाजूच्या लोकांपेक्षा त्या पात्रांवरतीच जास्ती विश्वास बसायला लागला."

मी स्तब्ध होऊन ऐकतोय.

"... आणि अशाच एका रात्री त्याला 'त्या' कथेतल्या पात्राचा फोन आला



आणि फोनवर बोलता बोलता... त्या भरात... गॅलरीतून तोल जाऊन तो खाली पडला... चौथ्या मजल्यावरून खाली!... डेड ऑन दि स्पॉट!... अगदी तुमच्या 'हॅल्युसिनेशन्स' कथेतल्या शेवटासारखाच शेवट!"

"आश्चर्य आहे!..." माझे पाय थरथरतायत.

"... नाही डॉक्टर, त्याहून आश्चर्य म्हणजे, त्याचं पण नाव प्रथमेश दातारच होतं हो!..."

"कायऽऽऽ?" मी जिवाच्या आकांताने ओरडतो... विळखा पूर्ण झाल्यासारखा.

... माझे पाय जमिनीपासून निसटले आहेत... गॅलरीचा आधार नाहीसा झाला आहे... आणि मी... वेगाने जमिनीच्या दिशेने निघालोय...

हाच माझ्या 'हॅल्युसिनेशन्स' कथेचा शेवट होता.

●●●

# गाफील

**रोहिणी भट-साहनी**

घटस्फोट झाल्यानंतर ती एकटीच राहत असे. नवऱ्याच्या २० वर्षांच्या आठवणी होत्या. काही गोड - त्या अगदी सुरुवातीच्या आणि बाकीच्या कडू. अगदी कडू. घटस्फोट झाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात त्या कडू आठवणींनी तिचे सगळे दिवस आणि रात्री भरून टाकलेले होते. जखमा भळाभळा वाहत असत. पण रोजच्या जीवनाच्या रहाटगाडग्याने काही काही तपशिलाच्या जखमा भरून काढल्या होत्या. तरीही अर्थातच आत खोलवर अतिशय ठसठसणाऱ्या, एखाद्या भयानक दृश्यासारख्या आठवणी होत्याच. त्या सगळ्या जखमांचा सारांश तिला आताशी कुठे कळायला लागला होता. घटस्फोट होऊन पाच वर्षं व्हायला आली होती आणि आता कुठे तिच्या लक्षात आलं होतं, की या सगळ्या दुखण्याचा फक्त एकच अर्थ होता. इसापनीतीच्या शेवटी तात्पर्य देतात तसा, की आपण हे सगळं सहन केलं हेच आपलं चुकलं. सहन करणाऱ्याच्या डोक्यावर आणि मनावर आजूबाजूची सगळी माणसं वजनाचे बोजे अगदी बिनदिक्कतपणे टाकत जातात. आपलं तिथंच चुकलं. आपण आपले प्रेमाच्या नावाखाली आणि उगीच भांडण आणि मनस्ताप नकोच्या नावाखाली एकामागोमाग एक अपमान गिळत गेलो. आधी आपल्या कामाची कदर नसण्याचा अपमान, मग आपल्या कष्ट करून-करून रोजरोज केलेल्या जेवणाचा अपमान, मग आपल्या दुर्लक्ष केलेल्या देहावर केलेली विनोदी टीका, मग हळूहळू नवऱ्याची होत गेलेली शारीरिक चढाई, आणि शेवटी



मनाने विवस्त्र झालेल्या आपल्याला उकिरड्यावर फेकून देणं!

का बुवा आपण प्रतिकार केला नाही? शत्रूनं केलेल्या वारापेक्षाही आपण प्रतिकार केला नाही याचं दुःख तिला जास्त जाचत असे. तिची ही जखम भरूनच येईना. प्रत्येक वेळी ती स्वतःला समजावून सांगत असे, की आपल्याला कुठे माहीत होतं, की ते आपले शत्रू आहेत म्हणून. प्रत्येक वेळेस लढाई अगदी मामुली दिसत असे. इन फॅक्ट, मुळात ही लढाई आहे हेच कळायला आपल्याला किती वेळ लागला! प्रत्येक बाणाचा आकार 'हार्मलेस' दिसत असे. वर्षानुवर्षं झेलत गेलेल्या बाणांची एकूण संख्या किती मोठी होईल, याची तेव्हा तिला कुठे कल्पना होती? आपल्याला मोठ्या लढाईत विजयी व्हायचंय-व्हायचंय असं म्हणत राहून ती सगळ्याच्या सगळ्या छोट्या लढाया हरत गेली. प्रत्येक वेळेस हात टेकत गेली. प्रत्येक वेळेस म्हणत गेली, की या वेळी जाऊ दे; पण पुढच्या वेळी मी खंबीरपणे उभी राहीन. पुढची ती वेळ नेमकी कोणती होती, हेच तिला प्रत्येक वेळी समजत नसे. प्रत्येक पुढच्या वेळी केलेली तडजोड, मानलेली हार तिला त्या क्षणी अगदी छोटीशीच भासत असे. काय झालं त्यात एवढं मोठंसं; करू या की आपण ॲडजेस्ट! त्यांना कुठे माहीत आहे की बाहेरून आपण इतके बांधले गेलेलो दिसत असताना, हार मानत असताना, आतून मात्र आपण किती स्वतंत्र आहोत. आपल्या आत आपण जागेच आहोत की!

ही आणखी एक जखम तिची भरूनच येईना. बाहेरच्या तिच्या रोजच्या जीवनात पावलोपावली केलेली तडजोड आणि तिच्या आतल्या मनाचा स्वच्छंदपणा याचा मेळ तिला कसा बरं घालता आला नाही? जसं काही त्याचं काही नातंच नव्हतं. जसे काही ते तिच्या जगण्याचे वेगवेगळे दोन कप्पे होते. एका कप्प्याचा दुसऱ्या कप्प्याशी काही संबंध नव्हता. या दोन जखमा तिच्या अगदी स्वतःच्या होत्या. तिला वाटत असे, की या जखमांना जबाबदार मी आहे. मीच माझ्या पायावर कुऱ्हाड मारली आहे. गेल्या पाच वर्षांत तिनं सतत, सारखं या दोन जखमांचं ओझं वाहिलं होतं. वरून ती आता शांत झाली होती. बाहेरच्या सगळ्या लोकांनी आता निःश्वास टाकला होता, की बुवा ही आता खूपच ताळ्यावर आलीय. आपल्या कामात खूप बिझी झाली आहे. तिला स्वतःचा विचार करायला वेळ तरी कुठे असतो? एकूण आता सगळं उत्तम चाललंय. बाहेरच्या लोकांना कल्पना नव्हती, की गेल्या पाच वर्षांत तिनं तिच्या मनात नेमकी काय तयारी केली होती ते. त्या दोन जखमा पूर्ण भरून येणं शक्य नव्हतं, हे तिला कळून चुकलं होतं. पश्चात्ताप

करून स्वतःला दोष द्यायचाही तिला कंटाळा आला होता. म्हणून तिनं एक वेगळीच आघाडी निर्माण केली होती. ती मध्यभागी आणि तिचं सगळ्या बाजूंनी संरक्षण करणारे सैनिक, अशा जय्यत तयारीत ती कायम राहत असे. हे संरक्षण करणारे सैनिक तिच्या मनाचेच होते. प्रत्येक पुरुषाशी होणाऱ्या नव्या नात्याची सुरुवात होताना हे सैनिक कामाला लागत. त्या पुरुषाला तिचं आतलं मन ते दिसू देत नसत. आधी सैनिकांना खूष करा, मग आत प्रवेश मिळेल, असा तिचा पवित्रा असे.

एकेका सैनिकाला एकेक काम दिलं होतं. उदाहरणार्थ पहिला सैनिक, तो नवीन पुरुष आपला आदर करतो की नाही हे आधी तपासत असे. दुसरा सैनिक, प्रेमाच्या आणि मैत्रीच्या नावाखाली तो आपला किती फायदा घ्यायच्या बेतात आहे हे तपासत असे. तिसऱ्या सैनिकाच्या टोळीकडे अपमान हे क्षेत्र होतं. प्रत्येक क्षेत्राचा एकएक वेगळा सैनिक होता. शारीरिक अपमानाचा एक, मानसिक अपमानाचा दुसरा, भावनिक अपमानाचा तिसरा. अशा रीतीनं आपण आपल्यालाच केलेल्या जखमा आपल्याला पुन्हा होऊ नयेत, पुन्हा मोठी लढाई जिंकण्यासाठी आपण छोट्या लढाया हरू नयेत, यासाठी ती सदैव डोळ्यांत तेल घालून, एखादा पहारेकरी असतो, तशी कायम तयारीत असे. पुन्हा कुणी पुरुष आपल्या व्यक्तिमत्त्वाचं साधं फडकं करून हात-पाय पुसून जातो तरी कसा, हेच तिला बघायचं होतं.

इतकंच नाही, गेल्या वर्षभरात हा तिच्या मनाचा एक खेळच झाला होता. प्रत्येक पुरुषाशी येणारा संबंध ती वरून गॅलरीतून एखाद्या डोंबाऱ्याचा खेळ बघावा तशी पाहत असे. तटस्थपणे. तो पुरुष आणि तिचे सैनिक यांचीच काय ती बोलाचाल होत असे. तिचा स्वतःचा त्यात सहभाग जवळजवळ नसेच. खरंतर प्रत्येक पुरुष, तिला भेटणारा, तिच्या आतल्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा एक अंदाज बांधून तिच्या जवळ जात असे. तिच्याकडे आकर्षित होत असे. पण तो जवळ आला रे आला, की तिचं सारं व्यक्तिमत्त्व मृगजळासारखं दिसेनासं होई. एकाएकी सगळे सैनिक प्रकट होत असत आणि तो पुरुष एकदम गांगरून जात असे. ती वरून हा खेळ पाहते आहे हे त्याला कळतच नसे. एखाद्या प्रचंड अद्भुत मांजराच्या तावडीत सापडलेल्या छोट्याशा उंदरासारखी त्याची धडपड होत असे. ती धडपड बघायला तिला खूप मजा येत असे.

खरंतर गेल्या वर्षभरात असे कितीतरी उंदीर तिनं घायाळ केले होते. कधीकधी एखाद्या नाजूक क्षणी, त्याचं तिला वाईटही वाटत असे. एखाद्या विशेष चांगल्या उंदराची तिला दयाही येत असे; पण त्याला तिचा काही इलाज नसे. आपल्या



सैनिकांना पार करून आत येऊ शकेल तोच खरा उंदीर, असा तिचा घट्ट समज होता. अशा खऱ्या उंदराची वाट पाहण्यातच तिचा वेळ जात होता. आपण पूर्वी स्वतःला केलेल्या जखमा पुन्हा करायच्या नाहीत हा तिचा निर्णय स्वतःशी इतका पक्का होता, की तिला स्वतःचीसुद्धा दया येत नसे. स्वतःची नको तिथं दया करूनच आपण त्या सगळ्या लढाया हरलो, असं तिला वाटत असे. जसं काही एखादा माणूस एखाद्या मोठ्या जीवघेण्या ऑपरेशनला भिऊन जाऊन छोट्या छोट्या सुया स्वतःला टोचून घेतो, तसा. आता तिला छोट्या सुया टोचून घ्यायच्या नव्हत्या आणि ऑपरेशनलाही ती आता घाबरत नव्हती.

अशाच एका दुपारी तिला एक मनुष्य भेटला. तिला तो लागलीच खूप आवडला होता. इतका आवडला होता, की तिनं त्याच्यासाठी सैनिक बोलवायची पण घाई केली नव्हती. त्याची हसून दाद द्यायची लकब तिच्या लगेच लक्षात आली. त्याची अधूनमधून लकाकणारी मिस्कील ठिणगी तिला गमतीची वाटली. त्याचं धारदार व्यक्तिमत्त्व आणि कायम सगळं बारीक निरीक्षण करण्याचं कौशल्य बघून सैनिक बोलवायला ती थोडी बिचकलीसुद्धा. स्वतःला थोडंसं फसवून तिनं तिच्या अंतर्मनाचं मृगजळ त्याला इतरांपेक्षा थोडं जास्त दाखवलं. नेहमीप्रमाणे, काही दिवसांतच अर्थात सवयीनं तिचे सैनिक कामाला लागले खरे; पण हा उंदीर मात्र गांगरला नव्हता. कदाचित तो त्याच्या 'स्ट्रॅटेजी'चा भाग होता! गांगरला नाही म्हणून तिनं तिच्या सैनिकांची पकड थोडी ढिली केली. असे थोडे दिवस गेले. हळूहळू तिला सैनिकांची गरज कमीकमी भासायला लागली. एखाद्या वेळी तर आपले इमानेइतबारे सेवा करणारे सैनिक तिला थोडे हास्यास्पद वाटायला लागले. बघताबघता तो मनुष्य तिच्या घरीच राहायला लागला. तिच्या सगळ्या वेगवेगळ्या कल्पनांची, भीतीची आणि तऱ्हेवाईकपणाची त्याला सवय व्हायला लागली होती. ती त्याच्यासाठी कोणतीच तडजोड करत नाही याचाही त्यानं स्वीकार केला होता.

''जिंकलो बरं का आपण,'' असा एक दिवस तिनं विचार केला. अभिमानानं तिची छाती फुलून आली होती. आधीच्या उंदरांची आठवण तिच्या मनात एखाद्या लांबच्या दृश्यासारखी इररेलेव्हंट व्हायला लागली होती. तिच्या दोन्ही अस्वस्थ जखमा भरून आल्या होत्या. तिनं तिचे सगळे अंगरक्षक, सगळे सैनिक बरखास्त करून टाकले. कारण त्यांच्या कायम पहाऱ्याची आता तिला जरूर वाटत नव्हती. आनंदाचा सोनेरी क्षण म्हणतात तो हाच, या सुखद जाणिवेनं ती हरखून गेली.

तिच्या नेहमीच्या आयुष्यात काहीही बदल न करता आणि विशेष म्हणजे तिच्या रोजच्या स्वभावात काहीही बदल न करता त्यात आणखी एक चांगली ॲडिशन म्हणून हा मनुष्य तिच्या जीवनात आला होता, यापेक्षा आणखी मोठा विजय कोणता असणार?

ती दोघंही रस्त्यावरून झपाझप चालली होती. खाचखळगे तिला दिसत होते, कारण ती खालीच पाहत होती. तो काहीतरी बोलत होता, काहीतरी खूप महत्त्वाचं असल्यासारखं. पण तिचं त्या बोलण्याकडे लक्षच नव्हतं. ती फक्त आनंदात होती. त्याच्या बोलण्याच्या शब्दांपेक्षा त्याचा सूर तिला जास्त आवडत होता. ते इतके भरभर चालत होते, की रस्ताच संपला. त्यांना घाई तरी इतकी कशाची झाली होती? एकमेकांच्या ओढीची ती घाई होती, हे तिच्या हळूच लक्षात आलं. (गेले कित्येक दिवस, तो तिच्या घरी राहायला आल्यापासून, ते असेच कायम एका आनंदी घाईत असत.) तेवढ्यात वारा सुटला आणि उडणारा तिचा पदर त्यानं सहज नीट केला. त्याच्या त्या एका खांद्याला हात लावण्यानं आपण दोघंही किती जवळ आलो आहोत याची कल्पना तिला आली. एकदम पाऊस आला तेव्हा ती दोघंही आसरा शोधायला इकडेतिकडे बघत बसस्टॉपखाली जाऊन उभी राहिली आणि बसस्टॉपला छप्परच नव्हतं, हे बघून डोळ्यांतनं पाणी येईपर्यंत हसली.

त्या दिवशीच्या संध्याकाळच्या पार्टीत सगळी मंडळी ओळखीचीच होती. तरीसुद्धा ती फक्त त्याच्याशीच बोलत होती. सगळा वेळ आजूबाजूचे त्यांचे मित्र त्यांना बघून एकमेकांना कोपरखळ्या मारत होते. याला म्हणतात खरं प्रेम, या अर्थानं. याला म्हणतात स्त्री-पुरुषांचं एकमेकांना समजून घेणं, याही अर्थानं. त्या दोघांचं एकमेकांना समजून घेणं, त्यांचा तो दुवा, जसा काही त्यांच्यामधल्या स्पेसमधून एखाद्या मंद प्रकाशासारखा हलकेच तेवत होता आणि त्याची जाणीव इतरांना होत होती.

काच खळकन फुटावी तसा तिच्या मनःशांतीचा भंग तेव्हा त्या क्षणी झाला. तो तिच्या एका मित्राला सहजपणे म्हणत होता, ''लवकरच आम्ही लग्न करणार आहोत...'' तिला बसलेला तो आश्चर्याचा एक फटकाच होता. आपण तर त्याच्याशी या विषयावर काहीच बोललेलो नाही. हा विषयच आपल्यात कधी निघाला नाही. आपल्याशी आधी बोलायच्या आत तो असं स्टेटमेंट कसा करू शकतो? तेही इतक्या सहजपणे? जसा काही हा निर्णय त्यानं, म्हणजे महत्त्वाच्या माणसानं आता घेतलाच आहे. आपलं काय? ती म्हणेलच हो म्हणून. ती कुठे



जाते? तिला काय, नुस्तं विचारलं की झालं किंवा नुस्तं विचारलं म्हणून तिला कृतज्ञतेनं हुरळून जायला काय हरकत आहे?

ती एकदम खालीच बसली. तिला आपलं आधीच्या लग्नातलं आयुष्य आठवलं. आनंदाच्या ढगावरून एकदम खडकावर येऊन आदळावं तसं तिचं झालं. तेवढ्यात तिच्या जुन्या काळातला एक म्हातारा सैनिक तिच्यापुढे येऊन उभा राहिला. त्याचे डोळे भरून आले होते. त्याला काही बोलता येईना. हळूहळू तिचे सगळे सैनिक एकएक करून तिच्यासमोर येऊन उभे राहिले. तो म्हातारा सैनिक कळवळून विचारत होता, ''बाईसाहेब, आपण त्याला जाब तरी कसा विचारणार?'' त्या सैनिकांची ती हार, त्यांचे ते उदासवाणे चेहरे बघून ती आणखीच हताश झाली. ते सगळे सैनिक मिळूनही आपल्याला आता काहीच मदत करू शकणार नाहीत, हेही तिला कळलं. ती सुन्न झाली.

इतकी सुन्न झाली, की तिला हेही कळेना, की आपल्या त्या दोन जखमा नुस्त्या चाळवल्यात, की वाहायला लागल्या आहेत? जखमा न होता आपण प्रेमच करू शकत नाही की काय? की आपल्याला जखमा न होता प्रेम करायचा अधिकारच नाही?

त्या रात्री टॅक्सीतून घरी परत येताना ती गप्प होती. त्याच्या ते लक्षातही आलं होतं. ती का गप्प होती हे मात्र त्याच्या लक्षात आलेलं नव्हतं. म्हणून तो तिला हसवण्याचा प्रयत्न करत होता. तो हसवण्याचा प्रयत्न तिला भलताच कावेबाज वाटला. आज ना उद्या (किंवा आताच!) तो लग्नाचा विषय काढेलही. तेव्हा आपण त्याला काय उत्तर देणार? की बुवा तू निर्णय घेतलेलाच आहेस; आता मी फक्त मम म्हणायचं! मग अर्थातच तो म्हणेल, पाघळेल, केविलवाणा चेहरा करून बोलेल,''अग, काय तू अशी साध्या साध्या गोष्टींचा मोठा प्रश्न करून टाकतेस? आत्ता आपण लग्न झालेल्या लोकांसारखेच नाही का?'' मग आपण त्यावर काय म्हणणार तरी काय? की तरीसुद्धा तू मला आधी विचारायला हवं होतंस? यातलं 'तरीसुद्धा' म्हणणं म्हणजे पुन्हा माघारच घेणं झालं की! त्यावर तो आणखी म्हणेल (आता आपण त्याला चांगलं ओळखतो!) ''मी तुझ्या मित्रालाच तर म्हणालो, असा कुठे जगात बोभाटा केलाय? एवीतेवी त्या मित्रानं आपल्या लग्नाचं ताडलंच असेल की! तूसुद्धा कुणाशी बोलणार नाहीस असं कशावरून?'' तेव्हा त्याच्या लॉजिकला आपण काय उत्तर देणार? असं म्हणू, की तुझं बरोबर आहे, पण मी उगीच मूर्खासारखी सगळं परतपरत तपासत बसते? की मला हा

'उगीचच' महत्त्वाचा इश्यू वाटतो? की मी ही अशी माझ्या पहिल्या नवऱ्यामुळे झाले? आता झालंगेलं विसरून 'नॉर्मल' व्हायला हवं? आई ग! पुन्हा लढाई. पुन्हा तीच लढाई. पुन्हा आपल्याला शस्त्रहीन करणारी लढाई. पुन्हा माघार. पुन्हा छोट्या छोट्या सुया. पुन्हा आपल्या भूमिकेला अर्थहीन, पॉईंटलेस करणारा झगडा. जशी काय आपण भूमिका घेतो हेच आपलं चुकतं.

अरे, पण आपल्याला आवडलाय ना तो? आपलं भयंकर प्रेमही आहे त्याच्यावर. तो आता आपली एक उत्कट गरज होऊन बसला आहे. त्या गरजेचं काय? त्या प्रेमाचं काय? आणि वरवर पाहता प्रश्न तेवढा मोठा तात्त्विकही दिसत नाहीये आणि पुढचेही सगळे प्रश्न असेच तात्त्विक नसतील. तिचे अश्रू बाहेर वाहायच्या ऐवजी आतच वाहत होते. बापरे! पुन्हा प्रेमाच्या नावाखाली 'डेड एंड' आणि 'अबाऊट टर्न'! आपण व्हायचं का तयार या अबाऊट टर्नला?... पण कदाचित नाहीसुद्धा होणार पुन्हा तसंच. तो तसा इतरांपेक्षा वेगळा होताच की. वेगळा होता म्हणून तर आपण गाफील राहिलो. वेगळा होता म्हणून तर विश्वास टाकून प्रेमात पडलो... कदाचित केलं थोडंफार अ‍ॅडजस्ट, तर असं काय आभाळ कोसळत नाहीच मुळी. आधी एक छोटासा तुकडा पडतो. मग दुसरा. मग तिसरा. असंच तर थोडं थोडं आभाळ कोसळत राहतं. आपण पुन्हा त्या मोडणाऱ्या आभाळाचे छिलके उचलत बसायचं? आपण कसं आणि केव्हा समजावणार त्या भल्या माणसाला, की आपण या तुकड्यातुकड्यांनी मोडणाऱ्या आभाळाच्या सांगाड्यालाच घाबरतो?

एक उलट टाका आणि एक सरळ टाका...

"जहर पीने की तो आदत थी जमानेवालों..." तिची आवडती कविता तिला आठवली. तेच तेच जहर पुन्हा पुन्हा पिण्याची आदत. थोडं थोडं जहर पुन्हा पुन्हा पचवण्याची लुळीपांगळी आदत... रोज नवीन जगण्याच्या आशेसाठी हळूहळू मरण्याची आदत... तीच तीच ओळ तिच्या डोक्यात घुमत होती. पण त्या कवितेची दुसरी ओळ जेव्हा तिला आठवली, तेव्हा मात्र तिला हसावं की रडावं ते कळेना.

"अब कोई और दवा दो के मैं जिंदा हूँ अभी!"

●●●





# कॅलिडोस्कोप

**अर्चना वर्टीकर**

"आई, मी निघते ग. सरांचा पुन्हा फोन आला तर सांग मी अर्ध्या तासात पोचेन म्हणून. ओके?" सायली घड्याळाचा पट्टा अडकवीत म्हणाली. त्यावर जरा रागातच विमलताई म्हणाल्या, "पण मी म्हणते, तुलाच ही ऐन वेळची बोलावणी का येतात? तुझी ती रीमा नाही होणार डॉक्टर? तू आपली खाणंपिणं सोडून धावतेस, फोन आल्याबरोबर."

"आई, जागरण करता यावं म्हणून कमी जेवले मी. केसेस पाहणं हा अभ्यास आहे माझा. जेवढा जास्त करेन तेवढा माझाच फायदा होणार आहे. उगीच का धावेन मी? हं आणि पिंकूताईंचं काय चाललंय तिथे एवढा वेळ?" सायलीने नेहमीप्रमाणे विषय बदलला. तशी हातातल्या खेळण्यावरून नजर न हलवता पिंकी म्हणाली, "अग आत्या, मला हवं तसं डिझाईन जमतच नाहीये या कॅलिडोस्कोपमध्ये किती वेळा फिरवलं, तरी आपली तीच तीच वेडीवाकडी चित्रं येताहेत." त्यावर हसून सायलीने तिच्या डोक्यावर एक नाजूक टप्पल मारली आणि ती गडबडीने बाहेर पडली. सर 'आठच्या आत ये' म्हणाले होते आणि घड्याळात साडेसात वाजून गेले होते.

रिक्षातून उतरल्यानंतर सायली घाईने हॉस्पिटलच्या पायऱ्या चढू लागली. तेवढ्या घाईतही दुतर्फा फुललेल्या गुलाबाच्या ताटव्यांकडे तिचं लक्ष गेल्याशिवाय राहिलं नाही. हिरव्यागार लॉनच्या कडेकडेने फुललेल्या त्या रंगीबेरंगी गेंदांकडे

पाहून नेहमीचाच तो विचारही तिच्या मनात डोकावला. तिला वाटे, बाहेर एवढे प्रसन्न गुलाब आणि आत मात्र सदैव चिंताग्रस्त, दुःखाने ओढलेले चेहरे... केवढा हा विरोधाभास! कदाचित, त्या दुःखी माणसांचा ताण थोडातरी कमी व्हावा म्हणून का फुलवली असेल ही बाग? का क्षणभंगुर आयुष्यदेखील किती प्रसन्नपणे, दुसऱ्याला आनंद देता जगता येते हे शिकवण्यासाठी वाढवली असतील ही फुलझाडं? पण आज या विचारांशी रेंगाळायला सायलीला सवडच नव्हती. खांद्यावरची बॅग आणि हातातला एप्रन सांभाळत तिने डॉक्टरांच्या केबिनचा हलता दरवाजा ढकलला आणि विचारलं, ''मे आय कम इन सर?''

डॉक्टरांनी समोरच्या फाईलवरून नजर उचलून वर पाहिले आणि आपला आनंद न लपवता दिलखुलास हसत म्हणाले, ''येस, कम इन. थँक गॉड, तू तरी या प्रोफेशनबाबत गंभीर आहेस. हे बघ, आयसीयूमध्ये एक आत्महत्येची केस आली आहे. गॅस्ट्रिक लवाझ केलाय, पण अशा वेळी दाह असह्य होतो. तू जरा सिस्टरना मदत कर. थोडी सेटल झाली की मग सलाईन लाव आणि हे बघ, माझं कार्ड ठेव तुझ्याजवळ. दर तासाला मला मोबाइलवर कॉन्टॅक्ट कर.''

''सर, केस सिरियस आहे?'' सायलीने काळजीच्या स्वरात विचारलं.

''अर्थात! म्हणूनच तुला फोन करून यायला लावलं. तुझी ती मैत्रीण... अचानक सुट्टी घेऊन ट्रीपला निघून गेली. मजा मारण्याची एवढी हौस असणाऱ्यांनी खरंतर या प्रोफेशनमध्ये येऊच नये. त्यातून मिनिस्टरसाहेबांबरोबर मीटिंग आजच ठेवली आहे मॅनेजमेंटनी. मला तिथेही हजर राहणं भाग आहे. हॉस्पिटलच्या नवीन विंगसाठी धडपडायला हवं. बरं, पेशंटचं काही बरंवाईट झालं, तर पुन्हा माझाच गळा धरतील. तारेवरची कसरत आहे पोरी... पण तू काळजी करू नकोस. राजू आणि सुबू थांबतील तुझ्याबरोबर. निघू मी?'' सायलीने मान डोलावताच, नेहमीच गोड हसू चेहऱ्यावर पांघरून डॉक्टर निघून गेले. सायलीने एप्रन चढवला आणि तिसऱ्या मिनिटाला ती आयसीयूमध्ये दाखल झाली.

तिथलं दृश्य फारच हेलावून टाकणारं होतं. दाह असह्य होऊन ती मुलगी तडफडत होती. तीनचार नर्सनी तिचे हातपाय धरून ठेवले होते. सिस्टर पलंगावर घालण्याच्या चादरीने तिचे हात पलंगाच्या लोखंडी गजांना बांधत होत्या. तिचं किंचाळणं वाढतच होतं. एवढ्यात तिच्या तोंडातून एक हिरवट ओघळ बाहेर पडला आणि नंतर पांढरा फेसही. सायली क्षणभर शहारली. इंटर्नशिपचे सहा महिने पूर्ण होत आले होते. पण या काळात आणि पाच वर्षांच्या एमबीबीएसच्या शिक्षण



काळातही तिने अशी विषप्राशनाची केस पाहिली नव्हती. पण लगेच दुसऱ्या क्षणी तिने मन घट्ट केलं आणि तिच्याजवळ पलंगावर बसत म्हणाली, ''बास... बास. ओरडून का दाह कमी होणार आहे? त्रास कमी व्हायला हवा असेल तर मला औषध देऊ दे. शांत हो, पाच मिनिटांत हा सगळा त्रास कमी होईल. विश्वास ठेव माझ्यावर... प्लीज.'' सायलीने तिचा हात हातात घेतला.

सायलीच्या आवाजातला आत्मविश्वास आणि स्पर्शातून झिरपणारी माया, या दोन्हींचा अपेक्षित परिणाम झाला. तिचे हातपाय झाडणे कमी झाले. सिस्टर आंटीच्या हातातील कापड आणि कापूस घेऊन सायलीने हळुवारपणे तिचा चेहरा पुसला. नाकपुड्या व कानामागचा भागही स्वच्छ केला. हळूच हाताची शीर शोधून सलाईन लावले आणि त्यातून झोपेचे इंजेक्शनही दिले. प्रेमाने तिच्याकडे पाहत सायली म्हणाली,

''शहाणी मुलगी आहे बरं का ही? पाच मिनिटांत झोप लागेल आणि उद्या सकाळी उठली की टुणटुणीत होऊन फिरायलाही लागेल.''

त्यावर हताशपणे सायलीकडे पाहत ती मुलगी म्हणाली, ''कुठं फिरू? त्या नरकात?'' एवढेच शब्द ती उच्चारू शकली, कारण दुसऱ्या क्षणी तिचे टपोरे काळेभोर डोळे पाण्याने डबडबले आणि तिने ते मिटून घेतले. जणू त्या मार्गाने तिने सारे दुःखाचे कढ काळजात लपवून टाकले असावेत. सायली अस्वस्थ झाली. ती त्या मुलीकडे निरखून पाहू लागली. एवढा वेळ तशी उसंतच मिळाली नव्हती. वेदनेने श्रांत दिसणारा तिचा चेहरादेखील दहा जणींमध्ये उठून दिसेल असा रेखीव होता. काळेभोर कुरळे केस उशीभर पसरले होते. काही बटा घामाने कपाळावर चिकटून राहिल्या होत्या. फार तर पंधरा-सोळा वर्षांची असेल ती... ''डाग्दरीणबाई, माज्या सुमीला वाचवा हो. तुमच्या पाया पडतो बगा...'' असे म्हणत एक बाई खरोखरच वाकून तिचे पाय धरू लागली.

''कोण तुम्ही? माझ्या का पाया पडताय?'' सायली बावरून म्हणाली.

''या पोरीची आई हाय मी. कसंबी करून तिला वाचवा हो. धावीपत्तुर साळा शिकली... मोठ्या घरचं काम मिळालं... आन ही कसली अवदसा सुचली म्हणायची वं हिला? ईश घ्यून माराया निघाली... अजून धाकली चार लेकरं हायती. हिच्या कामावर सारी दोन टायमाला खात्यात... तीच ग्येली तर...'' बाईने बोलता बोलता डोळ्यांना पदर लावला.

काही न बोलता सायली तिथून बाहेर आली आणि सिस्टरना म्हणाली, ''आंटी,

त्या बाईला आयसीयूमधून बाहेर काढा. पोरगी जगते का मरते याची काळजी नाही. तिचा पैसा आणि यांचं जगणं महत्त्वाचं शी ! काय माणसं असतात एकेक.'' त्या तिरीमिरीतच ती स्टाफसाठी असणाऱ्या खोलीत आली. सुबू आणि राजू तिची वाट पाहत होते. राजू खुर्चीतून उठून नाटकीपणाने म्हणाला.

''आईये, आईये... कभी हम आपको कभी इन दीवारोंको देखते हैं।''

त्यावर राग विसरून हसत सायली म्हणाली,''झाली सुरुवात? सुबू, हा अशा गोड गोड गप्पा मारून तुझा डबा फस्त करतो रोज. फसू नकोस हं तू? आज मुळीच डबा उघडू नकोस.'' त्यावर सुबूला बोलू न देता राजू म्हणाला,''सायली, त्याचा डबा मी दुपारीच खाल्ला. आता तू नाईटला येती आहेस कळल्यावर त्यानं घरून गरम गरम वडासांबर मागवलंय... तुझ्यासाठी... कळलं?''

राजूने 'तुझ्यासाठी'वर दिलेल्या जोराने सुबू एकदम मिटून गेला. त्याचे रोज डबा आणणे आणि सायलीसाठी थांबून राहणे सायलीच्याही लक्षात आले होते; पण त्या गोष्टी तिला इतक्यात वाढवायच्या नव्हत्या. तिची स्वप्ने, तिचे आदर्श सामान्य तरुणांना पचण्यासारखे नव्हते. राजूला मस्करीतच उडवण्याच्या हेतूने सायली म्हणाली,''पण तू आणतोस का एक दिवस तरी डबा? माझ्यासाठी जाऊ दे, सुबूसाठी तरी?''

''डबा? कुठून आणू? माझ्या घरात उंची फर्निचर आहे, मार्बल आहे, लॉकरमध्ये नोटांची बंडलं आहेत... पण पोरगा उपाशी राहील, या काळजीनं हैराण होणारी आई कुठं आहे? ममी आणि पपा म्हणजे जिवंत टांकसाळ आहेत माझ्यासाठी... बाकी काही नाही... सुबू ईज अ लकी चॅप... आय एम जेलस ऑफ हिम... रियली...'' राजू बोलता बोलता गंभीर झाला. एवढ्यात सिस्टर आत आल्या आणि त्यांचे संभाषण मध्येच थांबले. ''सायलीबाय, हवालदार आलाय. त्या मुलीचा जबाब घ्यायचाय म्हणतोय.''

''आंटी, त्यांना इथे पाठवा प्लीज.'' सायली म्हणाली.

''ठीक आहे.'' म्हणत सिस्टर निघून गेल्या. पाचच मिनिटांनी हवालदार दरवाजात येऊन म्हणाला,''पेशंटची कंडिशन हाय का जबाब देण्याजोगी? तुमचं एस्टिमेट काय हे?''

''जजमेंट म्हणायचं का तुम्हाला?'' सुबूने विचारले. ''त्येच काय ते. लवकर बोला. रिपोर्ट दिला की लगोलग अलिबागची एसटी पकडायची हाय मला. सख्ख्या म्हेवणीचं लगीय हाय, पर ही हवालदाराची नोकरी लई वंगाळ... काय



सांगू तुम्हाला.'' बोलत बोलत हवालदार खुर्चीत बसला आणि डाव्या हातावरची तंबाखू उजव्या हाताच्या बोटाने चोळायला त्याने सुरुवात केली. तशी सायली घाईने म्हणाली,

''इन्स्पेक्टर, आपण उद्याच या प्लीज. कारण आत्ताच झोपेचं इंजेक्शन दिलंय. आठ तास तरी उठायची नाही ती. हवं तर मी सरांना फोन करायला सांगते, ती शुद्धीवर आल्यावर. ठीक आहे?''

''असं म्हन्ता? ठीक आहे. उद्या ड्युटीवर असंल त्यो यील मग. सकाळची आठची अलिबाग पकडली तर म्हूर्त घावंल. सायबांना रिपोर्ट करतो ताबडतोब...'' असे म्हणत हवालदार खुशीत निघून गेला. तसा राजू मिश्कीलपणे म्हणाला, ''सायली, हवालदाराला 'इन्स्पेक्टर' बनवलास आणि मस्त कटवलास हं.''

''तो तंबाखू कुठे थुंकणार याची काळजी होती रे मला. शिवाय, एवढीशी मुलगी ती, काय जबाब देणार? आत्महत्येचा प्रयत्न केल्याबद्दल अटक होईल का रे तिला?'' सायली काळजीच्या स्वरात म्हणाली

''बाटलीशेजारी बाटली होती, चुकून खोकल्याचं औषध समजून घेतलं... असं म्हणल्यावर अटक कशाला होईल?'' राजू बेफिकीरपणे केसाची बट उडवीत म्हणाला. तसं आश्चर्यमिश्रित कौतुकाने सुबूने विचारले,

''ग्रेट आहेस राज, कसं सुचलं तुला हे?''

''सुचलेलं नाही, विकत घेतलेलं शहाणपण आहे हे, माझ्या वडिलांनी माझ्यासाठी... वकिलांकडून''

''काऽऽय?'' सायली जवळजवळ किंचाळलीच. पण तेवढ्याच शांतपणे राजू उत्तरला, ''होय. बारावीला मी मेडिकलला जायलाच हवं म्हणून ममा आणि पपा सतत प्रेशराईज करायचे. तेव्हा एकदा ताण असह्य होऊन...''

राजूचे वाक्य अर्धवटच राहिले, कारण सिस्टर घाईने आत येत म्हणाली, ''सायलीबाय, त्या मुलीची टीचर आली आहे. तुम्हाला भेटायचं बोलते. पाठवू?''

''पाठवा ना. एवढ्या उशिरा वॉचमनने सोडलं बरं आत त्यांना. नऊ वाजले ना रे सुबू?'' सायलीने विचारले.

''अरेच्चा, नऊ वाजले की! राजू, चल, टीपीआर चार्ट भरू या, जनरल वॉर्डच्या सायली मॅडम आज आयसीयूला आहेत बाबा.'' सुबू एप्रन अडकवीत म्हणाला. आळस देण्याचा अभिनय करीत राजू त्याच्याबरोबर निघून गेला.

तेवढ्यात पन्नाशीकडे झुकणारी एक प्रौढा केबिनच्या दाराशी येत म्हणाली, "येऊ का मी आत?"

"या ना, एवढ्या रात्री आपण इथे? सायलीने विचारले.

"सोडतच नव्हता हो वॉचमन. पण आमच्या शाळेची मुलगी आहे सुमन, काळजी नाही का वाटणार?" बाई मनापासून बोलत होत्या.

"पाहून आलात का तिला? नुकतीच झोपली ती. केव्हाची तळमळत होती. एवढ्या लहान वयात जीव नकोसा का व्हावा हो तिला?" सायली दुःखी स्वरात म्हणाली.

"तेच तर समजत नाही मला. आठवीपासून तीन वर्षं शिकवतेय मी तिला. हुशार आहे हो मुलगी. नेहमी पहिल्या पाचात असायचा नंबर. पण या लोकांचे घरचे प्रॉब्लेम काय समजणार आपल्याला?" बाई म्हणाल्या.

"तेही खरंच आहे म्हणा. तिच्या मिळकतीवर कुटुंब बरंचसं अवलंबून आहे म्हणे." सायली मोकळेपणाने बोलली.

तशी बाईंचीही भीड कमी झाली. खासगीतला आवाज काढीत त्या म्हणाल्या, "अहो, एक लंगडा दादा आहे त्यांच्या वस्तीतला. त्रास द्यायचा म्हणे तिला वरचेवर. धमक्याही द्यायची सुरुवात केली होती त्यानं... ॲसिड टाकीन म्हणायचा तोंडावर. म्हणून तर चांगल्या घरात चोवीस तासाच्या कामाला ठेवली होती आईनं. चांगल्या आहेत हो त्या बाई. शाळेतही यायच्या, तिच्या अभ्यासाची चौकशी करायला. सगळा खर्चही करायच्या तिचा."

"हो का? मग जीव का द्यावासा वाटला असेल बिचारीला?" सायली स्वतःशीच बोलल्यासारखी म्हणाली आणि विचारमग्न झाली. दोनतीन मिनिटे अशीच शांततेत गेली आणि उगाच खाकरून बाई बोलू लागल्या,"तर मी काय म्हणत होते मॅडम, शाळेचा याच्याशी काही संबंध नाही. दोन दिवसांवर दहावीचा निकाल आलाय हा निव्वळ योगायोग आहे. प्लीज, शाळेचा उल्लेख कुठेही येणार नाही, एवढी काळजी घ्या. संस्थाचालक, पालक, देणगीदार अशा अनेकांना तोंड देताना फार तारांबळ उडेल आमची. आपण समजू शकता ना माझा प्रॉब्लेम?"

त्यावर सायली म्हणाली. "हो, पण जबाब त्या मुलीचा घेतला जाईल. माझा नव्हे. तेव्हा मी काय करणार याबाबतीत?"

"तिला काय कळतंय हो? अवघी चौदा-पंधरा वर्षांची मुलगी आहे ती. आपणच कल्याणाच्या चार गोष्टी समजावयाला हव्या नाही का? उद्या सकाळी



येईनच मी. रव्याची खीर घेऊन येईन तिच्यासाठी. सरकारी दवाखान्यात चहाशिवाय काय मिळणार हो बिचारीला? येते हं मी." बाई पर्स आणि साडीच्या निऱ्या सावरीत उठून उभ्या राहत म्हणाल्या. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत सायलीने मान हालवली आणि नकळत एक सुस्कारा तिच्या तोंडून बाहेर पडला.

सुमनचे रिपोर्ट्स तपासून सायलीने चार्टवर त्यांची नोंद केली. थर्मामीटर तिच्या काखेतून काढून त्यावरील तापमानाचीही नोंद करून तिने पारा झटकला आणि शांतपणे सुमनच्या उशाजवळ खुर्ची ओढून बसून राहिली. सलाईनच्या थेंबागणिक नाना विचार तिच्या मनात येऊ लागले. एक लंगडा माणूस या मुलीच्या मनात एवढी दहशत निर्माण करू शकतो. पण तिच्या अवतीभोवती वावरणारी शेकडो धडधाकट माणसे तिचा आधार बनू शकत नाहीत? समाज वगैरे नावे दिलेली ही मानवी व्यवस्था एवढी तकलादू आहे की एवढी आप्पलपोटी? एवढी स्वार्थांध? एका निरागस मुलीला मरण्यासाठी सोडून देणारी... दुसरा कोणताच मार्ग न दाखवणारी... "तुमचा फोन आहे मॅडम." नर्स आयसीयूचा काचेचा दरवाजा किलकिला करून म्हणाली. सायली क्षणभर दचकलीच. डॉक्टरांनी एक एक तासाने फोन करायला सांगितले होते. त्यांचा तर नसेल?

"हॅलो, कोण बोलतंय?" सायलीने फोन उचलून विचारले.

"हॅलो, मी माई बोलतेय. सुमन माझ्याकडेच कामाला होती. तिची तब्येत कशी आहे आता?" एक बायकी आवाज काळजी पांघरत म्हणाला. पण सायली या वेळी हळवी झाली नाही.

"जालीम विष घेतलेला माणूस जसा असतो तशीच आहे. असंख्य वेदनांनी तडफडत होती. झोपेचं इंजेक्शन देऊन झोपवलं आता."

"काही बोलली का हो ती? पोलीस केस झाली असेल ना?" धास्तावलेला आवाज म्हणाला.

"मला माहीत नाही. पेशंट बोलण्याच्या कंडिशनमध्ये नाही, एवढंच कळवलंय आम्ही. मी फोन ठेवते, मला इतर पेशंटही पाहायचेत." सायलीने फोन जरा जोरातच ठेवला.

"काय झालं सायली? रागात दिसतेस?" राजू तिला न्याहाळीत म्हणाला.

"संताप आलाय मला या साऱ्या प्रकरणाचा. सरांना स्वतःच्या रेप्युटेशनची काळजी, बाईंना शाळेच्या प्रतिष्ठेची काळजी, सुमनच्या आईला कुटुंबाच्या पालनपोषणाची काळजी, तर हवालदाराला मेहुणीच्या लग्नाची काळजी; पण

एकाच्याही मनात हा विचार येत नाही की जे जगणं असह्य होऊन सुमनने जीव दिला, ती त्याच आयुष्याला सामोरी कशी जाईल?'' बोलता बोलता सायलीच्या नाकपुड्या लालबुंद झाल्या. ओठही सूक्ष्म कंपन दाखवू लागले. तेव्हा समजुतीच्या स्वरात राजू म्हणाला, ''तू ही केस एवढी मनाला लावून घेणार असशील, तर मी तिची सोय करेन. नर्सिंग कोर्सला पाठवू तिला. राहण्याजेवण्याची सोय होईल आणि स्टायपेंडसुद्धा मिळेल तिला. पपांच्या एका सहीने काम होईल. पण तू एवढी हळवी होऊ नकोस. जग त्या बाहेर फुललेल्या फुलांसारखं सुंदर नाही. त्या लंगड्या, पायात लपवून ड्रग्ज विकणाऱ्या दादाइतकंच हिडीसही आहे. समजलं?''

''राजू? तू... तुला एवढं सगळं कसं माहीत?'' सायलीने आश्चर्याने विचारले.

''या पत्रानं सांगितलं सगळं. तिला ॲडमिट केलं तेव्हा मला खात्री होती, तिच्याजवळ चिठ्ठी असणार याची. होतीच ती... तिच्या फ्रॉकच्या खिशात. योग्य वातावरण पाहून प्रगट करायची म्हणून ठेवून घेतली. स्वतःजवळ.'' राजू कागदाची घडी तिला दाखवीत म्हणाला.

''काय लिहिलंय?'' सायलीने अवंढा गिळून विचारले.

''काय लिहिणार? घरी अठरा विश्वे दारिद्र्याशिवाय दादाच्या धमक्या... त्यातून बाहेर पडण्यासाठी 'चांगल्या' कुटुंबात काम धरलं तर... बायको जरा इकडे तिकडे गेली की हा सगळे कपडे काढून तिच्यासमोर उभा राही... नग्न... विकृत मनोवृत्ती... घाबरून पळणार कुठे? सांगणार कोणाला? सांगितलं तरी तो घरमालक, श्रीमंत प्रतिष्ठित... हिच्यावर कोण विश्वास ठेवणार? अखेर तिनं मरायचं ठरवलं... ते मात्र फार सोपं होतं...'' राजू दूर शून्यात पाहत म्हणाला.

''तू काय ठरवलंयस? पत्र पोलिसांना देणार का लपवूनच ठेवणार आहेस?'' सायलीने विचारले.

''दोन्ही नाही.'' राजू ठामपणे म्हणाला.

''म्हणजे? मनात तरी काय आहे तुझ्या?'' सायलीने आश्चर्याने विचारले.

''ती माई का कोण ती... त्या घरमालकाची बायको... उद्या येईलच हिला पाहायला. तिच्याकडून कबूल करून घेणार आहे. ताबडतोब नवऱ्याला सायकिक सायकिॲट्रिक ट्रीटमेंटसाठी ॲडमिट कर म्हणून. नाहीतर पत्र पोलिसांकडेही जाईल आणि प्रेसकडेही. झक मारत कबूल करते की नाही, तू पाहाच. ही मानसिक



कुचंबणा मी अनुभवली आहे... पण दोषी होते माझे आईबाप! त्यांना शिक्षा करणं तेव्हा माझ्या हातात नव्हतं, पण आता गप्प राहणार नाही. सुमनला तरी न्याय मिळवून देईन. पाहा तू...'' एवढे बोलून राजू झरझर पायऱ्या उतरून निघून गेला आणि खूप वेळानंतर सायलीने मोकळा श्वास घेतला. समाधानाने हसत ती सरांना फोन करण्यासाठी वळली.

सायलीला नकळत पिंकीच्या कॅलिडोस्कोपची आठवण झाली. अनेक वेड्यावाकड्या चित्रांनंतर एक मनाजोगे चित्र तिला दिसले होते त्या हॉस्पिटलच्या कॅलिडोस्कोपमध्ये... राजूच्या रूपाने.

●●●

# वारस

**नारायण महाले**

तिठ्यावरील इंगर्जीच्या आमोरीच्या (तिन्हीसांजेच्या) घंटा नेहमीसारख्या एका लयीत घणघणू लागल्या. तशी ती एकदम भानावर आली आणि तिनं भाटाच्या बांधाकडं पाहिलं. तिच्याच घराच्या माडीकडं एकटक बघत उभा असलेला मुंडकार (भाटातला हिस्सेदार) मिंगेल दिसला. आज दुपारी तीन-साडेतीनच्या दरम्यान तो तिच्या घराभोवती दोन-तीनदा फेऱ्या मारून गेल्याचं तिनं पाहिलं होतं. हातातली वेताची लांबलचक काठी तिनं जोरात बल्कांवावर (ओसरीवरील सिमेंटचे सोपे) आपटून मोठ्यानं शिवी हासडली,

"चोट्टया कॉस्ताचो(चोर जातीचा)!"

तिच्या शिवीचा आवाज घराच्या सांदीकोपऱ्यांनी घुमला. माडीच्या जुन्या फळ्या एकदम करकरल्या. रोझी वावराडीनं (मोलकरणीनं) स्वयंपाकघरातून डोकावून बल्कांवाच्या दिशेनं पाहिलं आणि पाठीवर वेताची काठी टपकण हाणल्यागत आपलं सुटलेलं पोट आतल्या आत आकसून घेत नि स्थूल देह सावरीत मिंगेल इंगर्जीच्या दिशेनं चालू लागला.

एव्हाना आमोरीच्या घंटांचा आवाज आसमंतात विरून गेला होता. सगळीकडं शांतता पसरली होती. संध्याछाया दारात गेलेल्या. समोरचं माडांचं भाट (माडाची बागायती), भाटातील मुंडकारांची घरं, भाटापलीकडील डोंगर, मातीचा लांबलचक बांध... आणि नजरेत स्पष्ट भरणारा समुद्राचा पट्टाही अंधारात नाहीसा झाला होता.



भरतीच्या लाटा किनाऱ्यावरील दगडांना आपटून फुटत होत्या. लाटांचा धस्स् धस्स् आवाज तिच्या अधू कानांत शिरू लागला.

"भाटकारणी (मोलकरीण), आमोरी झाली ग...!"

असं म्हणत रोझी घरातले दिवे लावू लागली. तशी तीही बल्कांवातला दिवा लावायला, ऑल्तारावरून (आरामखुर्चीवरून) उठली. तोच गाडीच्या दिव्याचा प्रकाशझोत माडांच्या बुंध्याबुंध्यातून फिरून तिच्यावरच स्थिरावला. त्या प्रकाशाने तिचे डोळे दिपून गेले. गाडीच्या इंजिनाच्या घरघरीनं आसमंतातील शांतता पिरगाळून निघाल्याचं तिला जाणवलं. कोण आलंय, हे पाहण्यासाठी बाहेर आलेली रोझी दाराच्या मागं उभी राहून त्या दिशेनं पाहू लागली आणि माडीवर पावलांचा धप्प-धप्प असा आवाज झाला. तशी तिनं थरथरल्या नजरेनं माडीकडं पाहिलं. रोझीची थरथरती नजर तिच्या चेहऱ्याकडं लागली होती. माडीवर बेसावध बसलेलं कुणीतरी सावध झालं होतं. जिन्यावरून धडधडत खाली उतरलं नि मागील दाराची खिडकी खाडकन उघडून खिडकीतून खाली झेपावलं. आणि अंधारातच रानाच्या दिशेनं धावत सुटलेलं दोघींनीही पाहिलं. माडीच्या जुन्या फळ्यांना-जिन्याला आणि घराच्या मातीच्या भिंतीला सुटलेली थरथर त्यांना जाणवली होती.

"चोट्टया कॉस्ताचा!"

रोखून धरलेला श्वास मोकळा करीत ती तिरस्कारानं उद्गारली आणि हातातली वेताची काठी तिनं बल्कांवावर आपटली. गाडी अंधार कापीत बांधावरून दर्या-किनाऱ्याच्या दिशेनं गेली होती. ताणलेलं वातावरण थोडंस सैल झालं होतं. किती वाजले हे कळायला काही साधन नव्हतं. भिंतीवरील जुन्या पद्धतीचं टोल्याचं घड्याळ बंद पडून बरेच दिवस लोटले होते.

"...भाटकारणी, चार घास खाऊन घ्या. तुमचं जेवणाकडं नीट लक्ष नाही..."

तिचं लक्ष दुसरीकडं वळवावं, या उद्देशानं रोझी म्हणाली.

"मला भूक नाही. रोझी... तू जेवून घे...!"

स्वतःला सावरीत ती आरामखुर्चीवर बसली.

"...स्वतःच्या जिवाला मारून काय मिळणार तुम्हाला... सगळी मजेत आहेत... तुम्हाला दुपारीच सांगणार होते... ॲना भाटकारणीनं...!"

रोझी मनातलं एकदम बोलून गेली, पण दुसऱ्याच क्षणी तिनं आपली जीभ चावली. तसं तिनं रोझीच्या चेहऱ्याकडं निरखून पाहिलं. बल्बच्या उजेडातही तिला

रोझीच्या चेहऱ्यावर उमटलेलं सुरकुत्यांचं जाळं स्पष्ट दिसलं.

"....काय केलं ग ॲनानं...? काय ऐकलंस तू ॲनाबद्दल...?"

"...काही नाही!"

असं अडखळत, अस्पष्ट बडबडत रोझी घरात गेली. आज तिला सायबिणीच्या समोर गुडघे टेकवावेसे वाटले नाहीत. सायबिणीची प्रार्थना करावीशी वाटली नाही. मनात राग भरून आला होता. सायबिणीचा... ॲनाचा... स्वतःचा... रोझीचा आणि आंतोनचाही.

गेले आठ दिवस ती सायबिणीची प्रार्थना करीत होती. 'ॲना येऊ दे एकदाची.' तिच्या स्वाधीन तिचा 'पूत' करीन आणि मी सुखानं मरेन. या घराला वारस नको. भाटकार नकोच या घराला. माझ्या उरावर बसलाय तो.'

तेवीस डिसेंबरपासून ती ॲनाची वाट बघत होती. ॲनाची दुबईहून आलेली कांदोळची मैत्रीण ॲना २३ डिसेंबरला येणार, असं सांगून गेली होती. दुपार झाली, की ती आतूर व्हायची. मुंबईहून सुटणारं विमान दीड-दोनच्या दरम्यान दाबोरीला येतं. तिथून स्पेशल टॅक्सीनं घरी यायचं म्हटलं, तर ॲना एका तासाभरातच पोचली असती. आज दुपारी तिनं रोझीला ॲनाच्या आवडीचं मासळीचं-मुडदुश्यांचं (एक प्रकारचे चविष्ट मासे) हुमण (मासळीचं कालवण) नि अख्खा विसवण (सुरमई) तळून ठेवला होता. गेले आठ दिवस ती ॲनासाठी रोझीला काही ना काही मासळीचे पदार्थ बनवून ठेवायला सांगायची. पण गेला आठवडाभर चाललेली तयारी वायाच गेली होती. आज नाही तर उद्या ॲना नक्कीच येईल, ही मनात ठासून भरलेली आशा सुटत सुटत नव्हती, पण आज मात्र तिच्या मनात घोर निराशाच भरून राहिली होती.

बांधावरून कुणीतरी हातातली काठी मुद्दाम जोराजोरात जमिनीवर आपटत चालल्याचं तिला आवाजावरून कळलं. मिंगेलच असावा तो. तिनं अंदाजावरून ताडलं आणि हातातील वेताची काठी जोरात बल्कांवावर हाणली. तसं त्यानं चालण्याची गती वाढवली. काठीची आवाजही तिला ऐकू येईनासा झाला. घरात खरपूस तळलेल्या विसवणाचा वास भरून राहिला होता. तरीही तिची भूक चाळवली नव्हती. तिनं बल्कांवावर हाणलेल्या काठीचा आवाज ऐकून रोझी बाहेर आली होती. मिंगेलच बांधावरून गेला असावा, असा रोझीनं अंदाज केला अन् म्हणाली, "...भाटकारणी, मरू दे त्याला. तू स्वतःच्या जिवाला घोर लावू नकोस... चल जेवायला...!"

रोझीच्या आग्रहाखातर ती उठली. रोझीच्या मागून हातातल्या वेताच्या काठीच्या आधाराने स्वयंपाकघरात गेली. रोझीनं तिच्या पुढ्यात जेवणाचं ताट ठेवलं. तिचं



जेवणाकडं लक्षचं नव्हतं. मनात ॲनाचे विचार पुनःपुन्हा येत होते. मघाशी रोझी बोलण्याच्या ओघात सहज बोलून गेली होती. काय केलं ॲनानं? दुसरं लग्न तर नव्हे! तिनं स्वतःच्या कल्पनाशक्तीला ताण दिला. रोझीला कसं कळलं हे...? तो चोट्या कास्ताचा मिंगेल भाटकरांच्या घराबद्दल काहीबाही बोलतोय... भाटकरांच्या घरात रात्रीची भुतं वावरतात... घरात सोन्याचे सात हंडे पुरलेले आहेत... हंड्यावर सात फण्यांचा नाग हंड्याची राखण करतोय. तो ॲनाबद्दल असलंच काही तरी अचरट-बिचरट रोझीच्या तोंडावर बोलला असेल... रोझीला स्वतःची अक्कल नाही...!

तिनं स्वतःच्या मनाला समजावलं. जेवण संपवून ती उठली नि आतल्या खोलीत झोपायला गेली. आणि रोझीनंही भांडी सकाळी धुता येतील, असा विचार करून भांडी मोरीत ढकलली नि तीही आपल्या खोलीकडे वळली. रोझीला झोप आवरत नव्हती.

रात्र हळूहळू वाढत चालली होती. काळोख आपल्या रंगानिशी आणि शक्तीनिशी सगळीकडं पसरला होता. दर्यावेळेवरून लाऊडस्पीकरचा आवाज कानी येत होता. नव्या वर्षाच्या स्वागतासाठी दर्यावेळेवर हॉटेलवाल्यांनी पार्टी आयोजित केली होती. तिची झोप उडाली होती. ॲनाचे विचार मनात येत होते. ॲनाचा निरोप घेऊन आलेल्या तिच्या मैत्रिणीनं तिला पुनः पुन्हा, 'ॲना तुझी खूप आठवण काढते, मायला (आईला) कधी एकदा पाहीन, असं झालंय ॲनाला... आणि ॲनानं तुझ्यासाठी खूप काहीतरी खरेदी केलंय,' असं सांगितलं होतं. ती ॲनाबद्दल आणखी काही बोलल्याचं तिला आठवेना.

मागीलदारची खिडकी धसमुसळेपणानं उघडल्याचा आवाज कानी आला नि मग स्वयंपाकघरातला दिवा लावल्याचं तिला आवाजावरून कळलं. भांड्यांच्या आवाजावरून आंतोन जेवत असल्याचं कळलं तिला. गेले आठ दिवस त्याच्या खाण्यापिण्याची चंगळ चालली होती. ॲनासाठी रांधून ठेवलेलं सगळं त्याच्याच भकीला पडत होतं.

"...चोट्या कॉस्ताच्या. चोरी करून बसलाय... पोलिसांचं भय नसतं तर तिकडं दर्यावेळेवर फॉल्गा (मौजमजा) मारायला गेला असता. काळजावर दगड होऊन बसलाय...ॲनाच्या स्वाधीन केला, की सुटले एकदाची!"

तिच्या मनांत विचारांचे गुंते निर्माण होत होते आणि सुटता सुटत नव्हते.

आणि तिचं मन भूतकाळाशी झोंबू लागलं.

आंतोन भाटकारांसारखा दिसायचा. वयानं सोळा-सतरा वर्षांचा. गोरापान.

शरीराची पुरी उंची गाठली होती त्यानं. आपल्या आईच्या, ॲनाच्या रूपावरच गेला होता. पणजीच्या सेंट क्लारा कॉन्व्हेंट हॉस्टेलमधून तिनंच त्याला घरी आणला होता. भाटाला भाटकार हवा आणि घराला वारस हवा म्हणून. वाढत्या वयामुळं तिचं भाटाकडं दुर्लक्ष होत होतं आणि मिंगेल मुंडकार तिचं भाट गिळंकृत करायला टपून बसला होता. आंतोन नुकताच अकरावी पास झाला होता. तिनंच त्याला मडगावच्या कॉलेजात ॲडमिशन घ्यायला सांगितलं होतं. त्याला या घरात येऊन पुरं वर्षसुद्धा झालं नव्हतं. आंतोनच्या येण्यानं घराला घरपण आल्यासारखं वाटलं होतं. तिला स्वतःलाही उतार वयात मोठा मानसिक आधार मिळाल्यासारखा वाटलं होतं. ती त्याच्या आवडीनिवडी जपायची. तो हॉस्टेलमध्ये असताना ॲनाच दुबईहून परस्पर हॉस्टेलच्या नावावर खर्चासाठी चेक पाठवायची. त्याला घरी आणलं आणि त्याच्या खर्चासाठी पैसे पाठवू नको, असं ॲनाला तिनं पत्रानं कळविलं होतं. आंतोन भाटात फिरायचा. मुंडकाराच्या आपल्या वयाच्या मुलांबरोबर फिरायचा. त्यांच्याबरोबर दर्यात मासेमारीला जायचा. खायचा-प्यायचा. त्यांना रात्रीचा घरी आणायचा. खाऊ-पिऊ घालायचा. एक दिवशी आंतोन तिला मिंगेलबरोबर भाटात फिरताना दिसला. तशी ती सावध झाली. त्या रात्री तिला आंतोनच्या खोलीतून गिटाराचे सूर ऐकू आले नाहीत. मध्यरात्रीला त्याच्या खोलीत ट्यूबलाईटचा प्रकाश दिसला, म्हणून ती पावलं न वाजवता त्याच्या खोलीत गेली तर तो घराच्या छताकडे शून्यात नजर लावून खाटेवर झोपलेला दिसला. तिनं हळूच हाक मारली तसा तो एकदम ओरडला,''भूतऽऽ भूतऽऽऽ!''

त्याचा आवाज घरात घुमला. रोझीही झोपेतून दचकून उठली नि आकांत करत धावत आली. तिच्यावर आकांत उठला. ती रोझीवर खेकसली,

''रोझी, चूप बैस!''

रोझीनं डोळे चोळून पाहिलं, तर समोर भाटकरीण उभी होती. आंतोन तिच्याकडं ताठरलेल्या डोळ्यानं काही क्षण पाहातच राहिला होता. तिनं त्याला खोदून खोदून विचारलं तेव्हा तो म्हणाला, ''...श्यामाय,(आजी) या घरांत रात्रीची भुतं फिरतात का ग...?'' ती ऐकतच राहिली. तो पुरा सैरावैरा झालेला दिसला तिला. आणि थोड्या वेळानं स्थिर होतं त्यानं पुन्हा विचारलं,

''श्यामाय, या घरात सोन्यानं भरलेले सात हंडे आहेत म्हणे!''

''तुला कोणी सांगितलं ...?'' तिनं विचारलं,

''श्यापायनं (आजोबांनी)...!''



तो उद्गारला.

''श्यापाय म्हणतो , हे 'भाट' आपलं!''

त्याला कसं समजवावं हे तिला कळेना. रोझी मिंगेलच्या नावानं बोटं मोडू लागली.

''तू त्याच्यासमोर फिरू नकोस, भाटकाराकारखा वाग. तो आमचा मुंडककार...!''

तिनं स्थिरपणं म्हटलं आणि तिला तर मिंगेलला वेताच्या काठीनं फोडून काढावं असं वाटत होतं.

या घटनेनंतर अवघ्या चार दिवसांनी सकाळी-सकाळी रोझीनं भाटातल्या माडांच्या आडसरांच्या (शहाळ्या) पेंडीच्या पेंडी कुणी तरी चोरून नेतंय अशी तिच्याकडं तक्रार केली. तसा तिच्या मनांत मिंगेलबद्दल संशय उत्पन्न झाला. 'दाखवतेच त्या चोट्ट्या माणसाला कास्ताच्या', असं मनाशी म्हणत त्याच रात्री अंधार तुडवीत ती भाटात गेली नि माडाच्या मुळाशी दबा धरून बसली. हातात वेताची काठी होती तिच्या. मिंगेलच्या घरात एकदम घाईगडबड झाली आणि घरातले विजेचे दिवे विझवून टाकल्याचं तिनं पाहिलं. नि पाच-सहा आकृत्या काळोखातच समोरच्या माडांकडं झेपावल्याचं तिनं पाहिलं. तिच्यासमोरच माडाच्या खाली कुणी तरी उभं होतं. उंच, धिप्पाड तो मिंगेलच असावा, असं वाटलं तिला. तशी तिनं पुढं होऊन हातातली वेताची काठी त्याच्या पोटऱ्यांवर सर्व शक्तीनिशी हाणली. तसा तो 'माय-माय' असा ओरडत दर्याच्या दिशेने पळाला. माडावर चढलेल्यांनी अर्ध्यावरूनच पटापट उड्या मारल्या नि दर्याच्या दिशेने धाव घेतली. तिनं मिंगेलच्या दारात उभं राहून त्याला आव्हान दिलं,''चोट्ट्या कॉस्ताच्या, हिंमत असेल तर आडसर पाडून दाखव!'' मिंगेलच्या घरात काहीच गडबड दिसली नाही तिला.

सकाळी तिनं पाहिलं, तर आंतोन लंगडताना दिसला तिला. संशयानं डोळे लुकलुकले तिचे. तो कॉलेजला गेल्यावर तिनं रोझीला विचारलं,''आंतोन रात्री कुठं गेला होता...?'' तर रोझी म्हणाली,''तो खोलीत झोपला होता. मी बघितला होता त्याला.'' तिला हायसं वाटलं, रोझीला कळलं असतं तर ती वाडीभर सांगत सुटली असती - भाटकरणीचा नातू 'भाट' पाडतो... म्हणून!

त्या दिवसापासून भाटातल्या आडसरांची चोरी झाली नाही. आंतोन रात्रीचा गिटार वाजवू लागला. ती स्थिरावली. मिंगेलही भाटात वावरताना दिसत नव्हता. त्याला आपली चूक कळून चुकली असावी, असा कयास तिनं मनाशी बांधला; पण

एके दिवशी मात्र आंतोन आणि त्याच्या मित्रांना रात्रीच्या वेळी गस्त घालणाऱ्या पोलिसांनी, गाड्या-स्कूटरच्या सुट्या भागांची चोरी करताना मुद्देमालासह पकडलं. दोन-तीन स्कूटर्स, गाड्यांच्या यंत्राचे सुटे भाग घरामागच्या डोंगराच्या खळणीत सापडले.

काहीच म्हणून लपवू शकली नाही ती. चार दिवस पोलीस कोठडीत त्याची धुलाई चालली होती. चार दिवस पेपरवर आंतोनचेच फोटो, बातम्या छापून येत होत्या. भाटकरणीचा 'नातू' चोर असे लोक उघडउघड बोलू लागले. मिंगेल मुंडकार तर तोंडाला येईल तसं बोलू लागला. जणू त्याला दहा तोंडे फुटली होती.

''मारिया भाटकरणीला नातवाला सांभाळता आलं नाही. ती त्याला कपड्यालत्त्याना पैसे देत नव्हती. जेवणखाण नीट देत नव्हती म्हणून आंतोननं चोरी केली. माझी सून आंतोनला दुबईहून पैसे पाठवते, पण भाटकारीण ती मधल्यामधे हडप करते... भाटकारीण चोट्ट्या कास्ताची...!''

तिनं या प्रकरणाची चौकशी केली, तेव्हा तिला कळलं, की आंतोनला मौजमजा करायला पैसा हवा होता म्हणून मित्रांबरोबर या चोरीत भाग घेतला होता. तो मिंगेलही त्याला प्रोत्साहन द्यायचा म्हणे! चर्चच्या फादरला पुढं करून तिनं आंतोनला नि त्याच्या मित्रांना जामीनावर सोडवून आणलं. फादरनं त्याला, त्याच्या मित्रांना त्यांच्या हातून घडलेल्या कृत्याबद्दल चर्चमध्ये कोमसार (प्रायश्चित्त) मागायला सांगितले.

त्याचं मूळचं रूप पार बदलून गेलं होतं. विद्रूप दिसत होता तो. पोलिसांनी बडवून त्याचा मूळचा गोरा चेहरा व पाठ काळीनिळी केली होती. डोक्याचे केस विचित्ररीत्या भादरले होते. त्याचं कॉलेज कायमच सुटलं होतं. त्याचे मित्र घरी येईनासे झाले होते. तो घराच्या माडीवर स्वतःला कोंडून घेऊ लागला. आणखी एक-दोन ठिकाणी त्याच भागात चोऱ्या झाल्या, तेव्हा पोलिसांनी आंतोनकडं लक्ष वळवलं. पोलीस त्याला घरातून उचलून घेऊ लागले, तेव्हा तिनंच तो घरातून बाहेर पडत नाही, याची पोलिसांना खात्री पटवून दिली. तरीही त्याच्या मनातलं पोलिसांचं भय काही केल्या जात नव्हतं. बांधावरून येणाऱ्या गाडीचा आवाज ऐकला, की तो घरामागच्या जंगलात पळून जायचा. त्यानं गिटार वाजवणं सोडून दिलं होतं. आज ना उद्या तो सुधारेल, अशी आशा तिला वाटत होती, पण तीही आशा फोल ठरली होती. तो सुधारण्याऐवजी अगदीच बिघडत गेल्याचं प्रत्यंतर तिला आलं.

एके दिवशी ती दुपारच्या वेळेला मागीलदारी नीरफणसाच्या झाडाखाली बसली होती. रोझी वावराडी काठीनं नीरफणस झोडपीत होती आणि अचानक घराच्या मागच्या



अंधारलेल्या खोलीतून भला मोठा पिवळा जर्द नाग फसफसत बाहेर आल्याचं रोझीनं पाहिलं, तशी तिनं 'साप... साप' म्हणून मोठ्यानं करंदाय केली. तसं तिनंच रोझीला करंदाय करू नकोस, असं सांगितलं. पण करणार काय...? नाग तर फणा फुलवून बसलेला, त्याच वेळी मिंगेल बांधावरून तिठ्यावर जायला निघाला होता. रोझीचा आकांत ऐकून तो धावतच आला. नागाचं दुरून निरीक्षण करून तो उद्गारला,

''हाच तो कास्ताचा (जातीचा) भुजंग नाग. भाटकरणीच्या घरात भांगरांचे (सोन्याचे) सात हंडे जमिनीत पुरलेले आहेत... हंड्यांची राखण करीत असलेला हाच तो भुजंग...!''

आणि त्या शांत, तणावग्रस्त वातावरणात माडीच्या फळ्यांची करकर तिच्या कानांत शिरली. तिनं माडीकडं पाहिलं, तर खिडकीत आंतोन दिसला तिला. मिंगेलला वेताच्या काठीनं झोडून काढावं, असं तीव्रतेनं वाटलं तिला, पण समोर नागाच्या रूपाने वास्तव उभं राहिलं होतं. मिंगेल 'पेर्गाव' घालीत (दवंडी पिटत) तिठ्यावर गेला आणि नागाला पाहण्यासाठी तिठ्यावरची माणसं लोटली.

''भाटकारणीच्या घरात भांगारांचे हंडे आहेत... भुजंग नजरेला पडला...''

सगळी जणं बोलू लागली. नाग जागचा हलेना. मांत्रिकांना बोलवून आणला तिनं. तसा नाग फुत्कारत परत त्याच खोलीत गेला. मांत्रिकांनी शोध-शोध शोधला त्याला, पण नाग कुठंच दिसला नाही. मातीच्या भिंतींना हजार जागी उंदीर-घुशींनी बिळं पोखरून ठेवली होती. वाड्यावर-तिठ्यावर अफवांचं उदंड पीक येऊ लागलं. त्यातच रोझी वावराडी आणखीनच भर घालू लागली. तिलाही सात तोंड फुटली होती. आल्या-गेलेल्यांना सांगू लागली,

''...मीसुद्धा बघितला त्याच खोलीत नाग. सात फण्यांचा होता. खोलीत काळोख भरलेला होता. आणि जमिनीत भांगर चकचकत होतं.''

घरात भयाण शांतता भरून राहिली होती. मांत्रिक रात्रभर नागाला शोधीत होते. माडीच्या फळ्या रात्रभर करकरत होत्या. सकाळी 'नाग पुन्हा बाहेर आला तर मला बोलवा,' असं सांगून मांत्रिक निघून गेले आणि दुपारी दुसऱ्याच खोलीतून नाग बाहेर आला नि मोकळ्या जागी फणा फुलवून ऊन खाऊ लागला. आंतोन माडीवरून धडपडत खाली आला आणि त्यानं क्षणाचीही उसंत न घेता नागाला दगडाने ठेचून काढला. त्याच्या अंगात जणू सैतानच संचारला होता. सगळीकडे बातमी पसरली, 'भाटकराच्या घरात सोन्याचे सात हंडे सापडले.' आणि तो त्या खोलीत कुदळीनं खणू लागला.

कोणी एकेकाळी मिनेझिसच्या कारकिर्दीत त्या घराचं 'मोठेपण' नि भाटकाराचं 'भाटकरपण' सिद्ध करण्यासाठी उठविण्यात आलेली अफवा असं विकृत रूप घेऊन वेड्यावाकड्या पद्धतीनं तिच्यासमोर उभी राहिली.

काय करावं तेच तिला सुचत नव्हतं. तिची पाचावर धारण बसली होती. तो न सुधारण्याच्या पलीकडे गेला, याची तिला अनुभवानंतरच पूर्ण खात्री पटली होती. आधारासाठी तिनं ज्याचा हात धरला होता, तोच भुजंग होऊन तिच्या भोवती विळखा घालून बसला होता. कुठले भांगारांचे सात हांडे? नि कुठला भुजंग? सगळंच खोटं! तो नाग तेवढं खरा. घरामागच्या रानातली वाट चुकवून जिवाच्या भीतीनं घरात घुसलेला नि उंदीर-घुशींच्या घरात लपून राहिलेला, पण लोकांना कसं पटवून द्यायचं? त्या नागानं सगळं चित्रच बदलून टाकल्याचा अनुभव तिला आला होता. तिच्या घराविषयी त्या नागाच्या निमित्ताने चर्चेला आणि अफवांना उधाण आलं होतं आणि शेवटी निरुपाय झाला, म्हणून भिरभिरत्या मनःस्थितीतच तिनं पीटरला, सांतानला नि मारियोला पत्रानं सविस्तर सगळं कळवलं. ते घरासाठी तरी येतील नि यावर काहीतरी तोडगा काढतील, आपल्या भाच्याला, आंतोनला समजावतील असं वाटलं होतं तिला. तिच्या थोरल्या पुतानं पीटरनं मात्र तिला लगेच पत्र पाठवलं. त्यानं लिहिलं होतं पत्रात, 'माय, तू या चोर आणि हलक्या जातीच्या पोराला आमच्या घरी आणायला नको होतं. कोणाचं बीज ते? जात काय त्याची? त्या रेंदेरशी (माडाची ताडी काढणारा) लग्न करताना ॲनानं आमचा विचार केला होता का? ॲनालाच त्या पोराची चिंता नाही. आम्ही का म्हणून त्याची चिंता करावी? तो पैशासाठी आमचं घर खणत असेल तर त्याला पोलिसात दे नि मोकळी हो यातून!'

पीटरनं सुचवलेल्या या उपायानं ती अधिकच बिथरून गेली होती. काही झालं तरी पोलिसांना कळवायचं नाही, असा पक्का निर्णय करून तिनं ॲनाला मात्र पत्रानं दुबईला कळवलं होतं. 'आंतोन नकोच या घरात. हा घरदार संपवील. घर खणतोय तो. सोन्याचे हंडे नाहीत, माती मिळेल याला माती. हा पिसावेल आणि आपल्यालाच या फॉणांत खड्ड्यात गाडेल...! '

या विचारांनी तिची झोप उडाली होती. आंतोन घर खाणतोय ही बातमी तिठ्यापर्यंत गेली होती. मिंगेल तिठ्यावर जाता-येता तिच्या घरासमोर उभा राहायचा. रोझी तिची नजर चुकवून मिंगेलला काहीबाही सांगायची आणि मिंगेल तिठ्यावर उभा राहून भाटकारणीच्या घरात अमूक गावलं - तमूक गावलं अशा अफवा पसरवित होता आणि एके दिवशी ती आंतोन खणत होता त्या खोलीत गेली आणि तिनं कंबरभर



खड्ड्यात ओणव्यानी मातीत चाचपडणाऱ्या आंतोनच्या पाठीवर हातातील वेताची काठी हाणली. तो विव्हळला. अंग आकसून घेतलं त्यानं आणि जिवाच्या आकांतानं तो माडीवर पळून गेला. जमिनी खणणं त्यानं बंद केलं होतं. तिच्या हातातल्या वेताच्या काठीला तो घाबरत असावा, पण तिची त्याच्या विषयीची भीती नाहीशी झाली नव्हती. ती आंतोनला विसरण्याचा प्रयत्न करीत होती. पण विसरू शकत नव्हती.

त्यानं पायदळी तुडवलेली मिनेझिस भाटकाराची पुण्याई नि भाटकारपण ती अनुभवत होती.

तिच्या सासऱ्यांनी-आंतोन मिनेझिसनं पोर्तुगीज काळात ते भाट लागवडीखाली आलं होतं. त्या काळात आंतोन नावाजलेले सरकारी एप्रेगांद (अधिकारी) होते. गावात नि पंचक्रोशीत त्यांचा मोठा दबदबा होता. त्यांनीच भाटकाराच्या राहणीमानाला शोभेल असं मोठं, प्रशस्त इटालियन पद्धतीचं घर बांधलं होतं. घरापासून हाकेच्या अंतरावर समुद्र नि घरासमोर नजरेत न मावणारं भाट होतं. आपल्या मुलाबाळांनी, सुनालेकींनी भाटकरासारखंच सुशेगाद जीवन जगावं, अशी त्यांची इच्छा होती आणि आपल्या हयातीतच त्यांनी पोर्तुगीज कायद्यानुसार आपले तीन मुलगे आणि एक मुलगी यांच्यात भाटाच्या वाटण्या करून दिल्या होत्या. ते हातात वेताची काठी घेऊन भाटात गेले, की मुंडकार अंग चोरून उभे राहायचे. त्यांच्या निधनानंतर त्यांचे दोन मुलगे आंतानियो आणि अँथनी वडिलांचं भाटकारपण आपल्याला नको म्हणून नोकरीच्या निमित्तानं आफ्रिकेला निघून गेले. मुलगी फ्रेडी लग्नानंतर अमेरिकेला स्थायिक झाली. त्यांचं भाटाकडं दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांची भाट मुंडकार अडवून बसले. तिच्या नवऱ्याने, रूझारियोनं मात्र आपल्या वाट्याला आलेल्या भाटाचं सोनं केलं होतं. तो बँकेत मॅनेजर होता, पण स्वतः वेताची काठी हाती घेऊन मुंडकाराबरोबर भाटात खपायचा. रूझारियो नेहमी सांगायचा तिला, "मारिया, आम्ही भाटकार म्हणून जगावं ही माझ्या 'पाय'ची (वडलांची) इच्छा होती. माझी मुलं-नातवंडं भाटकार म्हणून जगावं अशी माझी इच्छा आहे."

तिला पीटर, ईनास आणि मारिओ हे तीन मुलगे आणि ॲना ही मुलगी. मुलगे तर बापाच्या वळणावर गेले होते. काहीसे ओबडधोबड, काळेसावळे, बुटकेसे; तिन्ही भावांच्या पाठीवर जन्माला आलेली ॲना मात्र तिचं रूप-रंग घेऊन जन्मास आली होती. गोरीपान, उंच, मोठ्या आकर्षक डोळ्यांची. तिचं प्रतिरूपचं जणू. सगळे जण ॲनालाही भाटकारीण म्हणायचे.

वयाच्या पस्तीशीतच तिला वैधव्य आलं. रूझारियो भाटात माडांचं पाडप

करायला गेला होता. तिथंच हार्टअटॅकनं गेला. मुलाबाळांची, तिच्या वाट्याला आलेल्या भाटाची नि एवढ्या मोठ्या भाटाची देखभाल नि उस्तवारी करायची जबाबदारी जणू बदलत्या काळानचं तिच्यावर टाकली होती.

ते भाट आणि ते घर तिच्याच छाताडावर बसलं. पीटर, इनांस, नि मारिओचं घराकडं, भाटाकडं लक्ष नव्हतं. ते खुशालचेंडू नि निष्क्रिय निपजले होते. चांगली सुगंधी अत्तरं नि चांगले-चांगले कपडे नेसून ते तिठ्यावर, बारमध्ये बसलेले असायचे. एके दिवशी ती पीटरला रागावली, तसा पीटर म्हणाला,

"भाटात काय पिकतंय? मी दुबईला जातो!"

आणि तो एका महिन्याभरातच पासपोर्ट मिळवून दुबईला गेला. त्यानंतर एक-दोन वर्षांच्या अंतरानं सांतान नि मारियो पण दुबईला गेले. तिनं कुणालाच नको म्हणलं नाही. त्यांना पैसा हवा होता. भाटात कष्ट करायला नको होते. तिनं आपलं सगळं लक्ष भाटावर नि ॲनावर केंद्रित केलं. ॲना हुशार, सकाळची मडगावला कॉलेजला जायची नि संध्याकाळी तिच्याबरोबर भाटात देखरेख करायला यायची.

आणि एके दिवशी रोझी वावराडीनं सावध केलं तिला,

"भाटकारणी, ॲना भाटकारणीवर लक्ष ठेव. भाटात ठेवू नकोस तिला... चांगलासा भाटकार मुलगा बघ नि काजार (लग्न) उरकून टाक तिचं!"

"तू काय ऐकलंस ॲनाबद्दल? सांग तरी...!" तिनं विचारलं, पण रोझीनं आणखी काही सांगितलं नाही. भाटातले मुंडकार भाटकारांविषयी मनाला येईल ते बोलतात. रोझीनं त्यांनी बोललेलं ऐकलं असेल असं तिला नेहमीसारखं या क्षणी वाटलं होतं. एके दिवशी ॲना कॉलेजात जाते म्हणून घरातून बाहेर पडली. नेहमीची घरी यायची वेळ टळून गेली तरीही ॲना आली नव्हती. आमोरीला भाटातले मुंडकार ॲना दर्यात बुडाल्याची वार्ता घेऊन आले. ती धावतच गेली दर्यावेळेवर. मिंगेल मुंडकार तिला पाहून गडगडल्यासारखा हसत म्हणाला, "भाटकारणी, तुझी मुलगी आणि माझा पूत जुआंव होडीत बसून दर्यात मोग (प्रेम) करायला गेली होती. होडी दर्यात उलटली. मी वाचवलं तिला ॲना माझी सून होणार...!"

"आम्ही चाड्डे (क्षत्रिय, उच्चवर्णीय) आणि तुम्ही सुदीर (क्षुद्र)...!" तिनं त्वेषानं उत्तर दिलं. मिंगेल रागानं लालेलाल झाला.

"पण आम्हीसुद्धा माणसंच आहोत. तुम्ही गोऱ्या कातीची (रंगाची); आम्ही काया रंगाचे, आम्ही आमच्याच माय-पायसारखे (आई-बापासारखे)." तिनं मिंगेलची 'जात' वर काढली म्हणून तो रागाने थरथरत होता. मिंगेलनं आपल्या मुलाच्या, जुआंवच्या कानशिलात दिली. तिच्यावरचा राग त्यानं जुआंववर काढला होता. जणू अपमानानं पेटून उठला होता. ही सोयरीक मोडली असं रागानं म्हणाला होता तो आणि तिनंही मिंगेलचा राग ॲनावर काढला होता. तिला काठीनं बडवत बडवत घरी आणली नि खोलीत डांबून ठेवलं आणि रोझीनं सुचवलं म्हणून बाणावलीच्या मिरांडा भाटकार घराण्यात तिनं ॲनाची सोयरीक जुळवली. नवरा मुलगा डॉक्टर होता. वयानं तिशीतला, उंचापुरा, गोरापान, भाटकारासारखा. ॲनाला चांगलाच शोभून दिसला असता. तिनं पीटर, सांतान आणि मारिओला दुबईला पत्र पाठवून ॲनाच्या काजारासाठी बोलावून आणलं; पण लग्नाच्या आदल्याच दिवशी ॲना घरातून पळून गेली. ज्या खोलीत तिला बंद करून ठेवली होती, त्या खोलीच्या छपराची कौल काढून ती छपरावरून खाली उतरली आणि चर्चमध्ये जाऊन जुआंवबरोबर काजार (विवाहबद्ध) झाली. पीटरने घर डोक्यावर घेतलं, सांतानं बंदूक ठासून भरली. मारिओनं पाच-पंचवीस लोकांना गोळा केलं नि तिघंही जण ॲनाला नि जुआंवला जिवंत मारून भाटातच पुरतो म्हणाले. शेवटी तिनं समजावलं त्यांना नि त्यांची परत दुबईला रवानगी केली. ॲनावर तिचा खूप जीव होता. तिच्याबद्दलच्या अपेक्षा, स्वप्नं सगळंच काही धुळीला मिळालं होतं. ॲनाच्या नावावर तिनं तिच्या मालकीचं भाट, जमीनजुमला करून द्यायचं ठरवलं होतं. ॲनाच्या या प्रकरणामुळे ती चर्चमध्ये मिसाला जात नव्हती.

"मारिया नशिबाचे घडे आणि दुश्मनाघरी पडे!"

चर्चच्या फादरनी पण तिला समजावलं होतं. ॲनानं असं का केलं? ती कित्येक दिवस विचारच करत होती.

रोझीच पटदिशी म्हणाली एकदा,"भाटकारणी, ॲना आणखी दुसरं काय करणार होती? दुसरा इलाजच नव्हता तिच्यासमोर. ॲना गरोदर होती. केलेलं कर्म कुठं लपून राहातंय!"

ॲनाचं सासर तिच्या नजरेच्या टप्प्यातच होतं. भाटकारणीचा जावई मुंडकार-रेंदेर असं घरासमोरच्या बांधावरून येता-जाता लोकांनी बोललेलं तिच्या कानी यायचं. आपण भाटात गेलो तर ॲना नजरेला पडेल या भीतीपोटी तिनं भाटात जायचंच बंद केलं होतं. रोझीच भाटाची देखरेख करायची. ॲनाविषयी तिला सांगायची. 'मिंगेलनं ॲनाची चांगली बडदास्त ठेवलीय. ॲनाला तो रोज रापणीची ताजी-ताजी मासळी खायला घालतो. तिला नववा महिना लागलाय. चुडतांची खोप मोडून नवीन घर बांधलंय... नवीन न्हाणीघर... '

तरीही तिनं ॲनासाठी आपल्या मनाचे बंद दरवाजे उघडले नाहीत. ॲनाच्या आठवणी तिनं मनातून दूर केल्या होत्या. ॲना जणू तिला मेल्यातच जमा होती.

एके दिवशी रोझी भाटाच्या बांधावरून धावत-पळत घरी येताना दिसली. मिंगेलच्या घराच्या दिशेनं आलेल्या फटाक्यांच्या आवाजानं तिचं लक्ष वेधून घेतलं होतं. घरात आल्या आल्या रोझी म्हणाली, ''भाटकारणी, पेढे द्या पेढे. भाटकार जन्माला आलाय. तुझ्यासारखं - ॲना भाटकारणीसारखं रूप... गोरापान 'मुद्याळ्या' (कुरळ्या) केसांचं आंतोन भाटकाराचं रूप लपून राहत नाही...!''

तिला वाटत होत, 'ॲनाला पोर होईल ते मुंडकारासारखं काळं-कुळकुळीत, बेढब. आकार-रूप-रंग नसलेलं.'

भाटाकडं तर तिचं दुर्लक्ष झालं होतं. एकदा अशीच दुपारची ती भाटाकडं शून्य नजरेनं बघत बल्कांवात बसली होती. धप्पऽऽ धप्प असा भाट पाडल्याचा आवाज तिच्या कानात शिरला. मग पाच-सहा जण माडांना झोंबताना दिसले तिला.

रोझी घरातून बल्कांवात आली नि थंड सुरात म्हणाली,''तो मिंगेल माडाची 'आडसर' पाडतो. आडसरांना चांगला दर मिळतो बाजारात. नारळांना दर नाही मिळत!''

ती पेटून उठली. भिंतीवर अडकवून ठेवलेली वेताची काठी घेऊन ती तरातरा चालत भाटाच्या बांधावर आली नि हातातील काठी हवेत गरगरवत ती उद्गारली, ''चोट्ट्या कास्ताच्या, हिंमत असेल तर माझ्यासमोर भाट पाडून दाखव...भाट तुझ्या पायचे (बापाचे)?''

मिंगेल नि जुआंव आणि त्यांनी भाट पाडायला बोलावलेले 'पाडेली' आपापल्या घरांत लपून राहिले आणि तिनं सगळी अडसर वावराड्यांना आपल्या घरात आणून टाकायला सांगितले.

आणि त्याच रात्री दारू पिऊन तर्रर झालेला मिंगेल तिच्या घरासमोर उभा राहून जोरात ओरडत होता.

''चोट्ट्या कास्ताच्या भाटकारणी - बाहेर ये - दाखवतोच तुला - मी भाटकर ह्या भाटाचा. माझ्या नातवाला आंतोन भाटकाराचं नाव ठेवलंय मी. ॲना माझी सून. तिच्या नावावर भाट लिहून दे. तुझे मुलगे गाव सोडून दुबईला गेलेत. ते येणार नाहीत परत - तुझं चोट्ट्या संतान होईल!''

ती रागानं थरथरली नि उद्गारली,

''फुलूच्या कुस्तार खोजनो...(आयजीच्या जीवावर बायजी) चोट्ट्या कास्ताच्या, तुला माझं भाट हवंय - घे,'' असं म्हणून तिनं हातातली काठी अंधारातच मिंगेलच्या दिशेनं भिरकावली होती. मिंगेलला काठी लागली असावी. तो तोल जाऊन बांधाच्या खाली गडगडत गेला. पण पोलिसांनी त्याला हाकलून लावलं. त्या दिवसापासून मिंगेल तिच्या घरासमोरून येता-जाता घराच्या दिशेनं तोंड करून पचकन थुंकायचा.

ॲनाच्या नावानं करंदाय करीत मिंगेलचा जीवघेणा त्रास भोगणं तिच्या नशिबी आलं होतं. तिनं ॲनासाठी आपल्या मनाचे दरवाजे बंद करून टाकले होते. आंतोन भाटकाराचं भाट तिला सांभाळायचं होतं आणि भाटकारीण म्हणून तिला स्वतःसाठी जगायचं होतं.

ॲनानं मिंगेलचं घर सोडलं, ही बातमी जेव्हा रोझीनं तिच्या कानी घातली, तेव्हा मात्र ॲनासाठी बंद केलेले मनाचे दरवाज थरथरले होते. ॲनाचं आणि मिंगेलचं भाटावरूनच भांडण झालं होतं. मिंगेल ॲनाला मायकडून भाट आपल्या नावावर उतरवून दे असं सांगायचा. म्हणे - तर 'भाट माझं, तुला ते मिळणार नाही,' असं मिंगेलला ठणकावून सांगून एका वर्षाच्या आंतोनला घेऊन ॲनानं त्याचं घर सोडलं होतं. ॲना आपल्या खानदानी रक्ताला जागली, याचा तिला अभिमान वाटत होता. ॲना आपल्याकडं छोट्या आंतोनला घेऊन येईल असं वाटत होतं तिला. ती ॲनाच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. रोझीच तिला अधून-मधून ॲनाविषयी सांगायची, ''ॲनानं पणजीला बिऱ्हाड थाटलंय. एका प्रायव्हेट कंपनीत ती नोकरी करतेय, छोट्या आंतोनला सांभाळण्यासाठी तिनं एक दाई ठेवलीय.''

तर रोझी कधी-कधी जुआंवबद्दल तिला सांगायची,

''जुआंव, खूप दारू पितो. खूप दिवस जगणार नाही.''

आणि एके दिवशी सकाळी-सकाळी इंगर्जीच्या घंटांचा आवाज तिनं ऐकला. बांधावरून लोकांचे घोळके मिंगेलच्या घराच्या दिशेने जाताना पाहिले. 'जुआंव मेला - माझा दायजी (नातेवाईक) मेला ऽऽ' असा आकांत करीत रोझी आपल्यासमोरूनच जुआंवच्या 'इन्तेर'ला (अंत्ययात्रेला) गेल्याचं तिनं कोरड्या डोळ्यांनी पाहिलं. ॲनाच्या नवऱ्यासाठी चार अश्रू ढाळावेत, असं तिला वाटलं नाही. तिच्या जावयाचा 'इन्तेर' तिच्या घरसमोरूनच गेला.

सिमेट्रीतून आल्या-आल्या रोझीनं म्हटलं,

''ॲना 'घोवा'च्या (नवऱ्याच्या) इन्तेराला कशी येणार? ती दोन दिवसांपूर्वीच दुबईला गेली!''

''रोझी, वेताच्या काठीनं झोडून काढीन तुला - खोटं सांगशील तर - मुंडकार

आमच्याबद्दल मनाला येईल ते बोलतात, तसं तू बोलू नकोस! ''

आयुष्यात पहिल्यांदाच ती रोझीवर ओरडली होती, आणि रोझीनेही आवाज चढवला होता, ''खोटं कशाला बोलू? ॲनाची वावराडी आली होती जुआंवच्या इन्तेराला. तिनंच मला सांगितलं. ॲनानं आंतोनला चर्चच्या हॉस्टेलमध्ये ठेवलाय. ती वावराडीच आंतोनला भेटायला जाते.''

रोझीचं हे बोलणं ऐकून ॲनासाठी बंद असलेले तिच्या मनाचे दरवाजे कोलमडून पडले होते. रोझीला सोबतीला घेऊन ती पणजीला हॉस्टेलमध्ये गेली. बेवारशासारखा हॉस्टेलात वाढणाऱ्या आंतोनला तिला आपल्या घरी आणायचं होतं. ती चर्चच्या फादरांना भेटली. ती दाईही आंतोनला भेटायला आली होती. तिनं हाका मारूनही आंतोन तिच्यापाशी आला नाही. 'माय... माय' अशा हाका मारून तो त्या वावराडीलाच बिलगला. त्या वेळी तो सात-आठ वर्षांचा होता. पराभूत होऊन ती घरी आली.

'काय, चुकलं आपलं? ॲनानं असं का केलं? दुसऱ्याच्या स्वाधीन का केलं त्याला?' विचार करूनही तिला या प्रश्नाची उत्तर सापडली नव्हती.

वर्षं भराभरा उलटून जात होती. शरीराने नि मनाने ती थकली होती. रोझीचंही वय झालं होतं. आणि मिंगेलचे उपद्व्याप आणखीच वाढलेले होते. वयाची सत्तरी ओलांडलेला मिंगेल हातात कोयतूल घेऊन रोझीच्या मागंच धावला. परत भाटात पाय ठेवलास तर तुझी आणि तुझ्या भाटकारणीची आडसरासारखी मुंडकीच कापतो म्हणाला.

मिंगेलच्या भयानं तिचं मन थरारलं होतं. घरात पुरुष कुणीच नव्हता. मिंगेलचा विचार करता करता तिच्या डोळ्यासमोर हॉस्टेलमध्ये वाढणारा आंतोन तरळू लागला आणि रोझीनं, आंतोनला सांभाळणारी दाई मलेरियानं मेली, असं तिला सांगितलं तेव्हा ती हॉस्टेलवर गेली. चर्चच्या फादरच्या परवानगीनं तिनं आंतोनला घरी आणला.

आंतोनचं रूप-उंची, चालणं थेट आपल्या पणजोबांसारखंच. आंतोनला घेऊन ती पहिल्या दिवशी भाटात गेली तेव्हा भाटात वावरणारा मिंगेल जिवाच्या भयानं आपल्या घरात पळून गेलेला तिनं पाहिला होता.

पण अवघ्या काही दिवसांतच मिंगेलनं आंतोनला आपल्यासारखाच 'चोट्टया कास्ताचा' करून टाकला होता आणि आंतोन तर सगळ्यांना पुरून उरला होता. मौजमजा करण्यासाठी तो चटावला होता. सोन्याच्या हंड्यासाठी घर खणत होता.

सकाळी सकाळी रोझीचा आवाज कानी आला, तसं तिनं खिडकीतून बाहेर पाहिलं. मासे द्यायला आलेल्या रापनकारला रोझी सांगताना ऐकलं तिनं,



''दाय, मी तुला म्हणून सांगते, ॲना भाटकारीण येणारच नाही. भाटकारणीला लागलंय वेड. वाट बघतिये ॲनाची. त्या चोट्टया कास्ताच्या आंतोनची मात्र मजा चाललीय, रुचीचं खायला मिळतंय!''

रोझीचं बोलणं ऐकून तिच्या तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिनली.

''रोझीऽऽऽ!''

ती उभ्या जागेवरून कडाडली. रोझी मुडदुशांची गाथन घेऊन आत गेली. ॲनाच्या आठवणीने ती घायाळ झाली होती. सकाळीच ॲनाची आठवण करून देणाऱ्या रोझीला काठीने झोडपून काढावं असं वाटलं तिला, पण दुसऱ्या क्षणी आपल्या हातापायाला कंप सुटल्याचं तिला जाणवलं. बोलवल्यासारखं रोझी आली, नि तिच्या दंडाला धरून टॉयलेटमध्ये धरून गेली. मनातला रोझीविषयीचा राग कुठल्या कुठं पळून गेला होता. रोझीनं भरवलेला चहा-पाव खाऊन ती ऑल्तारावर बसली.

सूर्य रेंगाळत रेंगाळत भाटाच्या माथ्यावर आला होता. उजाड झालेल्या भाटात लख्ख सूर्यप्रकाश पसरला होता. बांधावरच गाडीचा आवाज ऐकू आला. तशी माडीच्या फळ्या करकरल्याचं तिला जाणवलं. घरासमोरच गाडी उभी राहिली. गाडीतून कुणीतरी उतरताना दिसलं तिला. स्वयंपाकघरातून बाहेर आलेली रोझी एकदम अविश्वासानं उद्गारली,

''ॲना भाटकारीण तू...?''

''भाटकारणी - ॲना आली - ॲना!''

रोझीनं तिला गदागदा हलवत सांगितलं. घराच्या पायऱ्या धावतच चढत ॲना आली. तिनं तिला बिलगत विचारलं,

''माय, कशी आहेस तू? ''

तिच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या हलल्या, डोळे भरून आले तिचे.

''ॲना, मला वाटलं होतं तू मला विसरली असशील!''

खूप वेळानंतर ती अडखळत अडखळत बोलली.

''माय-!''

असं भावनातिरेकानं उद्गारत तिनं तिच्या मांडीत डोकं खुपसलं. ॲनाला काही क्षण आणखी काहीच बोलता आलं नाही.

''ॲना, माय तुझी गेले आठ दिवस वाट बघते. तुझ्या आवडीची मासळी आणते ती-!''

बऱ्याच वेळानंतर रोझी बोलली.

"रोझी आन्टी, मी तेवीस तारखेला गोव्यात आले!"

चेहरा रुमालानं पुशीत ॲना उद्‌गारली

"अग, होतीस कुठं तू इतके दिवस?"

"बाणावलीला, माझ्या मित्राच्या घरी!"

ॲना अगदी सहजपणे उद्‌गारली. रोझी तिच्याकडं बारीक नजरेनं पाहू लागली. रेशमाच्या जांभळ्या रंगाच्या तंग फ्रॉकमध्ये तिचं गोरेपण उठून दिसत होतं. तंग फ्रॉकमधून किंचितसं टरारून वर आलेल्या तिच्या पोटावर रोझीचं लक्ष स्थिरावलं होतं. रोझी आपल्याकडं पाहतेय, हे लक्षात येताच ॲना घाईघाईत म्हणाली,

"माय, मी तुझ्यासाठी विसवण तळून आणलाय!"

आणि तिनं गाडीच्या दिशेनं पाहात हाक मारली,

"जुआंव, गाडीतला मासळीचा डबा घेऊन ये!"

हाती डबा घेऊन एक धिप्पाड, उंच-रुबाबदार पुरुष आत आला नि त्यांच्याकडे पहात स्मित वदनाने उद्‌गारला,"गुडमॉर्निंग एव्हरीबडी!"

रोझी आणि ती खुळ्यासारखी पाहातच राहिली. त्याच्या हातातला डबा आपल्या हाती घेत ॲना म्हणाली,"माय, हा जुआंव फर्नांडीस, बाणवलीचा. दुबईला असतो. आर्किटेक्ट आहे!"

त्यानं पुढं होऊन, तिचा हात हातात घेतला. तसा सतरा-अठरा वर्षांपूर्वीचा भूतकाळ तिच्या नजरेसमोर ठसठसू लागला. तिला आठवलं, ॲनाच्या नवऱ्याचं नावही जुआंव होतं. तो काळा कुळकुळीत खत्री (निग्रो) रेंदेर... पण हा जुआंव 'त्या' जुआंवसारखा नाही. हा गोरापान, उंच, धिप्पाड. आपण ॲनाला बाणवलीच्या मिरांडा भाटकराच्या घराण्यातील सोयरीक आणली होती. त्याच्यासारखा हाही दिसतो!

माडीच्या फळ्या एकदम करकरल्याच्या आवाजासरशी तिनं आवाजाच्या दिशेनं पाहिलं. रोझी लगबगीनं स्वयंपाकघराच्या दिशेला वळली.

ॲना पावात विसवणाचा तुकडा भरून तिला भरवता भरवता बोलू लागली, "माय मला तुझी खूप आठवण यायची!"

तिचं लक्ष मात्र त्या पुरुषाकडं लागून राहिलं होतं. तो भिरभिरत्या नजरेने घर न्याहाळीत होता. नि एकसारखा बल्कांवातून आत-आतून बाहेर अशी ये-जा करीत होता.

"ॲना, मी जरा मोकळ्या हवेत फिरून येतो!" असं सांगून घराच्या पायऱ्या उतरून तो भाटाच्या दिशेनं गेलेला तिला दिसला.



"माय, मी निर्णय घेतलाय, दुबईला जायचं नाही. मी माझ्या मुलाची काळजी घेणार आहे!"

ॲना भारावल्यासारखी बोलली. तशी जिन्याच्या पायरीवर थबकलेली पावलं दिसली तिला. आता आपल्याला लागून राहिलेली आंतोनची चिंता कायमची मिटून जाईल, असं त्या क्षणी तिला मनोमन वाटू लागलं. ॲना खूप काही बोलली -, घराबद्दल... भाटाबद्दल, पण तिचं ॲनाच्या बोलण्याकडं लक्षच नव्हतं. आंतोन आपल्या आईला कधी येऊन भेटतोय याचकडं तिचं लक्ष होतं आणि ॲनानं सांगितलं म्हणून तिनं ॲनानं सोबत आणलेल्या कागदपत्रांवर सह्याही केल्या. रोझीनं स्वयंपाकघरातून जेवण तयार असल्याची वर्दी दिली. तशी ॲना जुआंवला शोधायला बांधावर गेली. रोझी घाईघाईत आली. ॲनाला ऐकू जाणार नाही याची काळजी घेत तिनं विचारलं,

"भाटकारणी, कागदपत्रांवर सही केलीस का तू?"

"अग, होय. हे घर, हे भाट सगळं तिचंच तर आहे. तिचा मुलगा, हे घर, - भाट सगळं तिच्या स्वाधीन केलं. आता मी मरायला मोकळी झाले! "

रोझीनं गळा खाकरला नि म्हणाली,

"भाटकारणी, ॲना गरोदर आहे. कर्म लपून राहत नाही...!" तिनं हातातली वेताची काठी रोझीच्या पाठीवर रऽऽपकन ओढली. हूं की चू न करता रोझी स्वयंपाकघराच्या दिशेनं वळाली आणि माडीवर धप्प-धप्प असा आवाज झाला. माडीच्या फळ्या मोडून खाली पडतात की काय असं वाटलं तिला. ॲनाला हाका मारून आपल्या मुलाला आवर, असं सांगावंसं तिच्या मनात आलं. तिनं बसल्या जागेवरून पाहिलं तर बांधावर उभी राहून एकाग्रतेनं भाटाकडं पाहत उभी असलेली ॲना दिसली तिला.

'खणऽऽखणऽऽखणऽऽ' घरातून आवाज आला. तशी ॲना धावत घरात आली. घरात भूकंप होतोय असं ॲनाला वाटलं.

"माय, काय झालं? माय...! "

ॲनाने एकदम घाबरून विचारलं तिला. तिनं बंद खोलीकडे बोट दाखवलं. माडीच्या भिंतीला हादरे बसत होते. माडीच्या फळ्यांना कंप सुटला होता. कुदळीचे घाव जमिनीत घुसत होते आणि खण्णकन करून येणारे आवाज घर हादरून टाकीत होते. ॲना आवाजाच्या दिशेनं धावली. अंधारलेल्या खोलीशी थबकली. खोलीचं दार आतून बंद होतं.

"कोण आहे? कोण आहे आत? दार उघड ...!"

ॲना दार ठोठावू लागली. तसं दार आतून धसमुसळेपणानं उघडलं गेलं. नि अंधारलेल्या खोलीतून आलेल्या त्या पुरुषाकडे पाहून ॲनाची छाती जोरात धडधडू लागली.

"कोण तू ऽऽऽ कोण ऽऽ?" ॲनानंचं विचारलं त्याला

"मी आंतोन, या घराचा मालक!" त्यानं दरडावून सांगितलं.

"कोण आंतोन?"

तो हसला गडगडून. ॲनाला ... रोझीला आणि तिलाही त्या क्षणी जुआंवच्या बापाच्या मिंगेलच्या हसण्याची आठवण झाली.

"आंतोन - कोण? तुझा पूत - आंतोन!"

त्याच्या बेंबीचा देठ टरारून एकदम आत गेल्याचं सगळ्यांना दिसलं. त्याच्या छातीचा भाता विलक्षण वेगानं खाली-वर होत होता. त्याच्या हातात कुदळ होती. उघडा देह घामानं डबडबून गेला होता. हातपाय मातीनं बरबटलेले होतं. त्याच्या गोऱ्यापान चेहऱ्यावरच्या शिरा टटटटून आल्या होत्या. डोळ्यात रक्त साकळलं होतं. तो हळूहळू ॲनाच्या दिशेनं सरकू लागला, तशी सगळ्यांचीच पाचावर धारण बसली.

"माय, याला या घरात कुणी आणला?" ॲनानं तिच्याकडं पाहत किंचाळत विचारलं.

"मी आणला त्याला या घरात घराला वारसा हवा म्हणून!" तिने जोरात उत्तर दिलं. तसं तिच्या मागं लपत ॲना ओरडली, "माय, हा वारस नको. माय, हा माझा पूत नव्हे. याला पोलिसांच्या हवाली कर. हा चोट्या कास्ताचा, घरादाराचा सत्यानाश करील हा!"

आणि बोलता बोलता ॲनाचा श्वास घशात अडकला. तिने ॲनाकडे पाहिलं. ॲना घामानं डबडबली होती.

रेशमाचा झिळझिळित फ्रॉक घामानं भिजल्यामुळे अंगाला चिकटला होता. त्यातूनच टरारून वर आलेल्या पोटावर तिची नजर स्थिरावली होती. काही क्षणानंतर ॲनाचा घशात अडकलेला श्वास मोकळा झाला. श्वासाबरोबर तिचं पोट खालीवर होऊ लागलं. ॲनाचा गर्भ श्वासाबरोबर तुटून बाहेर पडला तर बरं होईल, असा विचार तिच्या मनात तरळून गेला. आंतोनची तीक्ष्ण नजरही ॲनाच्या गर्भारलेल्या पोटाकडं लागून राहिल्याची जाणीव तिला झाली. तिनं पूर्ण विचारांती हातातली वेताची काठी सावरली. तसा आंतोन एकदम टरकल्यासारखा तिच्याकडं पाहू लागला. हातातल्या



कुदळीची पकड ढिली झाल्याचं तिच्या लक्षात आलं. हातातली वेताची काठी दूर कोपऱ्यात भिरकावत सौम्य शब्दात ती म्हणाली,

"आंतोन, पुता - हातातली कुदळ खाली टाक!"

"पुता, माझ्या पुता-आंतोना!"

आणि तिनं त्याला छातीशी घट्ट कवटाळलं. बांधावर एकदम आरडाओरडा झाला, म्हणून तिनं त्या दिशेनं मान वळवली. सुटाबुटातला जुआंव जिवाच्या आकांतानं पळताना दिसला तिला. आणि त्याच्या मागून पिसावलेला मिंगेल हातात कोयतुल घेऊन धावताना दिसला, पण आंतोनवर लक्ष केंद्रित करीत ती शांतपणे म्हणाली, "माझ्या पुता, अरे - हे भाट - हे घर - ज्यांना कुणाला हवं असेल त्यांना नेऊ दे, पण मी माझा आंतोन मात्र कुणालाच देणार नाही! "

आणि तिनं त्याच्या केसांतून हळूवारपणे हात फिरवला.

गाडीचा आवाज कानी आला, तसं तिनं त्या दिशेनं पाहिलं. तर तिला घाईघाईत गाडीत बसलेली ॲना दिसली. घरभर नजर फिरवली तर टी-पॉयवर फाईल दिसली नाही तिला आणि रोझीही कुठं दिसत नाही. म्हणून तिनं बल्कांवात येऊन पाहिलं तर रोझी रापणकर दायशी बोलत असलेली दिसली.

"दाय, उद्यापासून रापणीची मासळी आणू नकोस. भाटकारणीच्या घरात आज आकांत झाला. भाटकारणीला घरही नाही आणि भाटही. भाटकारीण आणि तिचा नातू आंतोन दुसरीकडं राहायला जाणार. माझं कसं होणारं रे दाय? मला ना पोर ना नातू. मी उघड्यावर पडणार रे दाय - या वयात!"

आज तिला रोझीला हाक मारून घरात बोलवावंसं वाटलं नाही. आपल्या घराबद्दल-माणसांबद्दल लोकांना ती काय वाट्टेल ते सांगते म्हणून तिला वेताच्या काठीनं झोडपून काढावं, असंही वाटलं नाही तिला.

इंगर्जीच्या आमोरीच्या घंटांचा नाद तिच्या कानी आला. मागं वळून हॉलमधल्या सायबिणीच्या प्रतिमेकडं तिनं पाहिलं, तर तिला सायबिणीच्या प्रतिमेकडं गुडघे टेकवून प्रार्थना म्हणणारा आंतोन दिसला आणि तिनंही छातीवर हातानं क्रॉस केला.

घरासमोरच्या भाटावर अंधार आपले अक्राळविक्राळ हात पसरवत होता.

●●●

# शरम गयी तो...

संजीव ठकार

झंकनाच्या नजरेतली ती तीव्र घृणा, तिरस्कार पाहून बशीरचाचाचे पाय जमिनीला खिळून राहिले. ''बेटा, झुमुक है?'' कसेतरी अडखळत त्याच्या तोंडून शब्द निसटले. झंकना दार दडपून झटकन पाय ओढत दुडक्या चालीत आत निघून गेली; बशीरचाचाकडे जळजळीत दृष्टिक्षेप टाकून, ''बापू, जो तमारेकने कोई आयवो छे।'' असं मोठ्यानं म्हणत. बशीरचाचाच्या डोक्यात त्या टोकदार विखारी नजरेनं चांगलंच घर केलं. 'अरे, आपल्या सकिनाच्या उमरीची ही झंकना, लहानपणापासून पाहिलेली, तिच्या डोळ्यात ही तिरस्काराची भावना? काल पहाटे आलेल्या आपल्या माणसांच्या नजरेतही असाच द्वेष, तुच्छता होती.' बशीरचाचाच्या मनात विचार आला. ते येऊन गेल्यानंतर अम्मीची अवस्था आटोक्यात आणण्यात, तिला इथे आणण्यात बशीरचाचा इतका गुंतला होता, की त्या प्रसंगाची त्याला भूल पडली होती. झंकनाच्या नजरेनं तो प्रसंग बशीरचाचाच्या नजरेसमोर उभा राहिला. त्या आठवणीनं त्याच्या पाठीच्या कण्यातून भीती सरसरत गेली. उभ्या उभ्या तो शहारला. शहारता शहारता कापू लागला.

इतकी वर्षं तो त्या साबरखेडा गावातल्या छप्पन्नगुजरी भागात राहत होता. उमर गुजरली म्हणता येईल; पण काल रात्रीसारखा प्रकार त्यानं कधी ऐकला नव्हता. पाहायची बात तर दूरच. गुजरातला हिंदू-मुसलमानांचे दंगे नवीन नाहीत; पण बशीरचाचाला किंवा छप्पन्नगुजरीला त्याची फारशी झळ लागली नव्हती.



रंगरेजी खत्री मुसलमानांची ती वस्ती. वस्ती कसली, जेमतेम आमदनी असलेल्या सूत, कापड रंगवणाऱ्या रंगरेजांची ती झोपडपट्टीच. या जातीच्या मुसलमानांना इतर मुसलमान हलके समजत. सूत, कपडा रंगवण्याचा धंदा कोलमडून पडून बरीच वर्षं झाली होती. कित्येक जणांनी दुसरीकडे कामं, नोकऱ्या बघितल्या. कुणी मुंबईला, कुणी अहमदाबादला जाऊन स्थायिक झालं. छप्पन्नगुजरीत आता या मुसलमानांचा पाचपंचवीस उंबरा जेमतेम उरला होता. बशीरचाचाचं पत्रा आणि लाकडी फळकुटाच्या भिंती असलेलं घर आणि त्याला लागून असलेली तसलीच किडुकमिडुक घरं, वीस-एक. त्या सर्वांमध्ये एकमेकाला धरून राहायची वृत्ती होती. तरी कधी भांडण, कुरबुरीमध्ये बशीरचाचाला हिणवलं जायचं. 'काफिरोंका कुत्ता' म्हणत शिवीगाळ व्हायची. अशा वेळी नादिरा हमखास चिडून उठायची आणि मग बशीरचाचा आणि अम्मीशी तिचं भांडण जुंपायचं.

बशीरचाचाची नजर आपसूकपणे आपल्या हाताकडे गेली. केशरी-लाल रंगात रोज रंगणारे तळहात त्याच रंगाचे होऊन गेले होते. धुऊन धुतला न जाणारा रंग त्याच्या हातावर कायमचा वस्तीला आला होता. अंगभूत झाला होता. काफिरांचा रंग, केशरी भगवा. शालींवर, उपरण्यांवर भगवा रंग चढवून त्यावर जय श्रीराम, बजरंग बली की जय, जय राधेकृष्ण अक्षरं उमटवणं हा त्याचा पिढीजात धंदा. भागवती लिपीतले ऐन्याच्या लाकडापासून बनवलेले ठसे हीच त्याची पिढीजात संपत्ती. त्याच्या आजोबांनी बनवून घेतलेले ठसे अजून वापरात होते. त्याचे बाकीचे भाईबंदही याच व्यवसायातले; पण ते निरनिराळ्या रंगांनी कापडं रंगवत आणि त्यावर गडद रंगांनी राघू, मोर, फुलं, पानं यांचे ठसे उमटवत. पानाफुलांची सोनेरी चंदेरी खडी काढत; पण देवांच्या नावाचे ठसे उमटवणारा बशीरचाचा हा एकमेव. काफरांच्या धर्माचं काम करणारा म्हणून हेटाळला जाणारा. बशीरचाचा त्याची पर्वा न करता निरनिराळ्या दलालांकडून आलेले कापडांचे गठ्ठे रंगवून त्यावर हव्या असलेल्या देवाच्या नावाचे छाप उठवून द्यायचा. स्वस्तिक, ॐ, त्रिशूल यांचेही ठसे होते. कोनाड्यातल्या कुराणाच्या शेजारी हे ठसे ठेवलेले असायचे.

काल पहाटे तीन-साडेतीन वाजता बशीरचाचाची झोपमोड झाली. बाहेर घोषणांचा गलका माजला होता. 'बाळी नाखो भडवाओंने, राख करी नाखो हरामखोराओंने', 'जय श्रीराम' जमावातून आवाज उमटत होते. प्रत्येक आरोळीला एकापाठोपाठ प्रतिसाद मिळत होता. धार चढत होती. बशीरचाचा उठून काय झालं ते पाहायला बाहेर पडायच्या आधीच दाराची कडी बाहेरून लावली गेली. तोवर

आसपासच्या घरांवर रॉकेल, पेट्रोलचे जळते बोळे पडले होते. आगी लावण्यात आल्या होत्या. मोठमोठ्यानं मदतीच्या याचना केल्या जात होत्या. काळजाचं पाणी-पाणी करणारे वेदनेचे चीत्कार उमटत होते. नखशिखान्त हादरलेल्या बशीरचाचाच्या पायांतलं बळ हरपून गेलं होतं. घशातून आवाज फुटत नव्हता. लटपटत त्यानं खिडकीतून बाहेर पाहिलं. बाह्या दंडावर दुमडलेल्या, नजरेत रक्त उतरलेल्या, सूड भावनेनं पेटलेल्या जमावाच्या कानी कोणताही आक्रोश पडत नव्हता. ओठांवर रामाचा जयघोष, हातात मशाली, लाठ्या, तलवारी आणि नजरेत कमालीचा तिरस्कार आणि सूडभावना. तोवर नादिरा, सकिना जाग्या झाल्या होत्या. अम्मी जागीच होती. सत्तरीच्या आसपास पोचलेल्या अम्मीला पाच वर्षांपूर्वी पॅरॅलिसीस झाला होता. अर्धं अंग आणि जीभ लुळी पडली होती तिची. नादिराला आणि सकिनाला लटलट हलणाऱ्या हातानं गप्प बसायचा इशारा करत बशीरचाचानं सकिनाच्या, जावेदच्या तोंडावर हात आवळून धरला. त्या खोलीच्या मधोमध ते सगळे थरथरत एकमेकाला बिलगून कोंडाळं करून बसले होते.

बाहेरच्या आगीची धग जाणवत होती. अंगातून घामाच्या धारा ओघळत होत्या. पराकोटीच्या भीतीनं जीव मुठीत धरून बसलेल्या त्या लोकांच्या तोंडून एकही शब्द फुटत नव्हता. इतरांचे आक्रोश त्यांना सुन्न करत होते. जिवंत प्रेतं मरणाची वाट पाहत असतानाच त्यांच्या घराच्या दाराची कडी खडकन उघडली गेली. बाहेर वाळत घातलेल्या रामनामाच्या उपरण्यांवरून हे कुणा हिंदूचं घर गैरसमजातून जाळलं जातंय, अशी कुजबुज सुरू झाली होती. धाडकन दार उघडून टोळीचा म्होरक्या आत शिरला.

जिवाच्या आकांतानं बशीरचाचा उठला. त्याच्या गळून गेलेल्या पायात शरीरातलं सारं त्राण एकवटून आलं. झटकन दोन ढांगांत अंतर कापून तो म्होरक्याच्या पायावर कोसळला. नुसते पाय पकडून विनवण्या करून त्याच्या डोळ्यातलं लाल रक्त निवळणार नाही, याची जाणीव होताक्षणी तो ताडकन उठला. त्याचं मनगट घट्ट धरून त्याला खेचत त्यानं खोलीच्या कोपऱ्यातल्या कोनाड्यासमोर आणलं. कुराणाशेजारी मांडलेले देवांच्या नावाचे ठसे त्यानं दाखवले. कितीदा धुऊनही भगवा रंग न जाणारे तळहात दाखवले. ते हात त्यांच्यासमोर जोडून डोळ्यात अजीजी, याचना आणून त्यानं प्राणांची भीक मागितली. उलट्या अक्षरातले ते ठसे हातात घेऊन निरखून झाल्यावर म्होरक्यानं खोलीभर नजर फिरवली. ठिकठिकाणी रामनामाची पखरण झालेल्या शालींचे



गट्ठे त्याला दिसले. "भडव्यो, रामनामाए बचाण्यो तने," म्हणत त्यानं ठसे आणि चादरी, शाली घेऊन जाण्यासाठी बाकीच्यांना खूण केली. घाबरून थरथर कापणाऱ्या, पाण्यात भिजून भेदरलेल्या उंदरांच्या पिल्लासारख्या दिसणाऱ्या सकिना, नादिरा, जावेदकडे तुच्छ नजर टाकत तो मागे फिरला. बशीरचाचाला सुटल्यासारखं वाटलं. प्राणाची भीक मिळाल्यानं त्याला आभाळाएवढा आनंद झाला; पण इतक्या दिवसांचे सोबती असलेले ठसे हिरावल्यामुळे मनात आतमध्ये कुठेतरी तटातटा तुटल्यासारखं वाटलं.

आगीतलं त्याचं घर वाचलं म्हणून सुस्कारा सोडतोय न सोडतोय तोच जावेद जोरजोरात रडू लागला. असह्य ताणातून एकदम सुटका झाल्यानं तो हमसाहमशी रडू लागला. पाठोपाठ सकिना, नादिरा रडू लागल्या. जोरजोरात गळा काढून रडताना त्यांच्यावरच्या भीतीच्या पगड्याचा निचरा होत राहिला. हुंदके देऊन ऊंऽऽऽऊं करत बशीरचाचाही रडत राहिला. पहिला आवेग ओसरल्यावर त्यानं अम्मीच्या खाटेकडं पाहिलं. अम्मी गप्पगार पडली होती. तिच्या तोंडून फेस बाहेर पडत होता. डोळे मिटले होते. एरवी उजव्या हाताची काही ना काही सतत हालचाल चाललेली असायची तिची. गळ्यातून कसले कसले अगम्य आवाज उमटायचे. तो धसकन तिच्या खाटेपाशी गेला. तिचा हात हाती घेऊन पाहिलं. अम्मीची नाडी लागत होती. तिला सावध करण्यासाठी हलवताना तिचा पोळलेला, मोठमोठे फोड उठलेला डावा हात त्याला दिसला. शेजारची खोपटी जळताना लागलेल्या धगीनं ते झालं होतं. दुखण्यानं कृश झालेल्या अम्मीला सावध करण्यासाठी त्यानं तिला हलवलं, पाणी मारलं. तिची एकंदरीत अवस्था बघताना त्यानं तिला कॉटेज हॉस्पिटलला न्यायचं ठरवलं. तोवर पहाट झाली होती. बाहेर उजेड पसरला होता.

त्यानं बाहेर बघितलं.. सगळीकडे घरं धुमसत होती. माणसं जळाल्याचा करपट वास पसरला होता. जखमी विव्हळत होते. अग्निप्रलयानंतरच्या निखाऱ्यातून निघणाऱ्या धुरानं काहीच दिसत नव्हतं. त्यानं पुन्हा एकदा अल्लाचे आभार मानले. रामाचेही मानले. त्याच्यामुळेच तर त्याचं कुटुंब वाचलं होतं. इतक्या जणांवर मरणाची कुऱ्हाड पडलेली असताना आपण मात्र वाचल्याबद्दल अल्लाचे आभार मानतोय, या स्वार्थी विचारामुळे त्याची त्यालाच लाज वाटली. त्यानं अल्लाच्या नावानं गालाला उजवा हात लावत तोबा केली. रामाच्या नावानंही.

दंगल झाल्याचं त्याला उमगलं. कशामुळे, का झाली ते अजून गुलदस्त्यातच

होतं. त्याच्या गावाला दंगलीनं आजवर कधी स्पर्श केला नव्हता. अहमदाबाद, गोध्रा, राजकोट कुठे कुठे हिंदू-मुसलमान दंगली व्हायच्या. वातावरण तंग व्हायचं. कुठे कुठे किरकोळ हल्ले, दोन-चार जखमी, एक-दोन ठिकाणी लाठीमार व्हायचा. लोक दोन-तीन दिवस घरात बसायचे. हळूहळू वातावरण निवळायचं. व्यवहार सुरळीत व्हायचे; पण अशी सामुदायिक चिता पेटवल्यासारखा प्रलय कधी झाला नव्हता. हल्लेखोरांच्या डोळ्यांत दिसलेला विखार कधी कुणाच्या नजरेत दिसला नव्हता. त्या नजरेची आठवण येताच बशीरचाचा अंतर्बाह्य शहारला.

पोलिसांच्या गाडीच्या सायरनचा आवाज जवळ येऊ लागला. पाठोपाठ संचारबंदीच्या घोषणा देत गाडी फिरू लागली. गुजराथी, हिंदी, इंग्रजीमध्ये संचारबंदीच्या सूचना दिल्या जात होत्या. अजूनच अडीच तासानं संचारबंदी जारी होणार होती. आता लगोलग हालचाली कराव्या लागणार, याची जाणीव बशीरचाचाला झाली. आता वेळ न घालवता अम्मीला कॉटेज हॉस्पिटलला घेऊन जायचं ठरवलं. उठत तो नादिरावर खेकसला.

''बस हो गया रोनाधोना. उठा आता दोघी जणी. मी अम्मीला घेऊन कॉटेजमध्ये जातो. तू बाहेर पडून पाव, दूध, अंडी, तरकारी काय मिळेल ते घेऊन ये. मुझे लगता है की बहुत बुरा वक्त आनेवाला है। अब होना था वो तो हो गया। आगे की सोचो। कुठूनही जे काही मिळेल ते घेऊन ये. दोन-चार दिवसांचा गुजारा होईल असं. उठो... और सकिना, देख, दरवाजे को अंदरसे कुंडी लगाके चुपचाप बैठो। जावेदला बाहेर सोडू नकोस आणि तूही बाहेर पडू नकोस. अब्बा यहाँ होते तो'' बशीरचाचा न बोलता एकदम गप्प झाला.

नादिराची बडबड लागलीच सुरू झाली. ती अम्मीला शिव्या घालू लागली. तिचं आणि सासूचं कधीच पटलं नव्हतं. त्यातून गेल्या तीनेक आठवड्यांपासून तिला अम्मीचं थोडंफार बघायला लागलं होतं. बशीरचाचाच्या बरोबरीनं. अब्बा राजस्थानातल्या फकीर फतेहबाबाच्या दर्ग्याला उरसाला गेले तेव्हापासून. तोवर अब्बांनी नादिरावर काय पण बशीरचाचावरही अम्मीचं काही पडू दिलं नाही. तिचं सारं दवा, दारू, हवं-नको तेच बघायचे. पंचाहत्तर वर्षांचे असले तरी त्यांची तब्येत व्यवस्थित होती. अम्मी रात्री झोपली, की ते दोन घरं पलीकडच्या आपल्या मित्राकडे जाऊन झोपायचे. रेहमानमियाँकडे.

रेहमानमियाँचा विचार अब्बांच्या आठवणीसरशी बशीरचाचाच्या मनात घुसला आणि त्याचं काळीज लक्कन हललं. रेहमानमियाँचं घरही जाळलं गेलं



असणार, बुढा रेहमानमियाँ आणि फातिमाबी यांचं काय झालं असेल? कोळसा? दुसरं काय? आणि रसूलचं? त्याची मौतही अशीच? परवरदिगार, ये क्या हो रहा है? इतना अच्छा हट्टाकट्टा नौजवान. सकिनाशी त्याचा निकाह लावून द्यायचं चाचाच्या मनात होतं. तोही तलाकशुदा होता. बशीरचाचाला एकदम खिन्न, विषण्ण वाटू लागलं. काळीज भरून आलं.

''मरी, मरती भी नहीं जल्दी से! बोझ बनके पडी है हमारेपे, खाटपे पडी रहती है और उसका लाल, मेरेसे उस मुर्देकी खातिरदारी...'' नादिराचे पुढचे शब्द ओठातच जिरले. बशीरचाचाच्या रागानं लाल झालेल्या डोळ्यांकडे नजर जाताच तिचं बोलणं अर्धं राहिलं. मान उडवत ती गप्प झाली. तोवर बशीरचाचानं अम्मीला चादरीत गुंडाळून खांद्यावर टाकलं आणि तो झपाझप कॉटेज हॉस्पिटलकडे निघाला.

अब्बा इथं हवे होते. अम्मीची काळजी घेतली असती. जावेदला सांभाळलं असतं. आपल्याला सलाह दिली असती. नाही; पण नव्हते तेच किती चांगलं झालं नाही तर रेहमानमियाँबरोबर होरपळत, जळत, किंचाळत त्यांचाही कोळसा झाला असता. खैर है खुदाकी। अब्बांच्या आठवणीनं बशीरचाचा हेलावला.

हॉस्पिटलच्या आवारातल्या झाडाखाली अम्मीला टेकवून त्यानं दम खाल्ला आणि लगेच झुमुकला शोधायला आत घुसला. जेमतेम आठ खाटांचं ते हॉस्पिटल. तेही तिथला आमदार वनखात्याचा राज्यमंत्री झाला दहा वर्षांपूर्वी, तेव्हा त्याच्या प्रभावामुळे आकाराला आलेलं. एक रखवालदार, दोन आया कम नर्सेस, एक कारकून आणि एक रेसिडेंट डॉक्टर आणि हो; झुमुकही होता तिथे. डॉक्टरांच्या हाताखाली; कंपाऊंडर टाईप. थोडंफार वैद्यकीय ज्ञान असलेला. डॉक्टरांच्या गैरहजेरीत हॉस्पिटलचं काम रेटून नेणारा. अम्मीला पहिल्या खोलीतल्या एका बाकावर आडवी निजवत त्यानं झुमुकला शोधायला सुरुवात केली.

झुमुक त्याचा बालमित्र. झुमुकलाल दवे. एकाच बाकावर त्यांनी शाळेतली चार-पाच वर्षं काढली होती. बशीरचाचानं पुढं शिक्षण सोडलं. एकतर शिक्षणात गती नव्हती आणि दुसरं म्हणजे अब्बाकडचं काम वाढलं होतं. ठसेकाम करणारी कुटुंबं कमी झाली होती. त्यातून काफिरांच्या देवांची नाव उमटवणं हे त्यांच्या इतर जातवाल्यांना नापाक काम वाटू लागलं होतं. अब्बांच्या लेखी असा दुसऱ्या धर्मांचा दुस्वास करण्याचा उपदेश करणारा नव्हता त्यांचा इस्लाम. नवीन जहरी विचार पसरत होते. कडवेपणा येत चालला होता. तरीही अब्बांनी 'पुरखोंसे चला

आया काम' सोडलं नाही. दहा-बारा 'छाप्पोकाम' करणाऱ्या कुटुंबातलं फक्त एकच अब्बांचं कुटुंब उरलं होतं - रामनामाच्या शाली, उपरणी तयार करणारं. बाकीच्यांनी खडीकाम सोडलं नाही तरी काफरांच्या देवाच्या नावाचे ठसे निकालात काढले. बशीरचाचा अब्बांचा सहायक बनला.

झुमुकनं मॅट्रिकनंतर शहरात जाऊन दोन-तीन वर्षांचं कसलंसं शिक्षण घेतलं. मग सहा वर्षं कुठल्या कुठल्या सरकारी इस्पितळात नोकरी करून तो आपल्या गावातल्या या कॉटेज हॉस्पिटलमध्ये जो चिकटला, तो आता बाहेरगावी बदलून जायचं नावच काढेना. बदली न होता वर्षानुवर्षं आपल्याच गावात राहण्यासाठी काय उलाढाली करतो अल्ला जाणे. बहुधा पायात दोष असलेल्या झंकनाच्या व्याधीची ढाल पुढे करून आजवर सतत त्यानं आपली बदली टाळली असावी. झंकनाचा पाय कधी पुरता बरा झाला नाही. लंगडत चालायची ती. बशीरचाचानंही बरेच प्रयत्न केले. मालिश केलं, हकिमाकडं बऱ्याचदा घेऊन गेला लहानपणी झंकनाला. 'हा पठ्ठ्या झुमुक इथं आपला चांगला वट ठेऊन असतो हं' बशीरचाचानं मनोमन कबूल केलं.

झुमुकलाल आता तर तिथला बुजुर्ग झाला आहे. इथं आलेला डॉक्टर कागदोपत्री त्याचा साहेब असतो. प्रत्यक्षात तो झुमुकच्या ऐकण्यातला असतो. पहिल्या काही दिवसांतच एकंदर रागरंग पाहून तो झुमुकला मानानं वागवायला लागायचा. आलेल्या डॉक्टरला ठाऊक असायचं, की आपण इथे तीन वर्षांचे पाहुणे आहोत. झुमुक इथला पर्मनन्ट मेंबर आहे. एखादा नुकता पास झालेला डॉक्टर असला तर तो झुमुकच्या दाबाखालीच राहायचा.

पूर्वी बऱ्याच वेळा बशीरचाचा वेळ झाला की येऊन जायचा. इथली झाडं, शांत वातावरण त्याला आवडायचं. त्या दोघांच्या गप्पा व्हायच्या. राजकारण, हवा-पाणी, शाळेतल्या गोष्टी वगैरे संवादात उमटायच्या. तासाभरानं अम्मीसाठी औषध घेऊन निघायचा. चार वर्षांपूर्वी सकिनाला तिच्या मियाँनं तलाक दिल्यानं जावेदला घेऊन ती माहेरी परतली. हल्ली हल्ली बऱ्याचदा तीच अम्मीचं औषध आणायची.

झुमुक सापडला नाही म्हणून लगोलग बशीरचाचा त्याच्या घराकडे वळला. डॉक्टरांच्या क्वार्टरशेजारीच दवेजींची क्वार्टर होती. तीन खोल्यांची बैठी, जुनाट दिसणारी. पांढऱ्या चाफ्याच्या मोठ्या झाडाखालची. पायऱ्यांशी उभं राहत त्यानं झुमुकला हाक मारली,''झुमुक, ओ झुमुक, घर में है काय तू?''



झंकनानं दार उघडलं. तीव्र नजरेनं त्याच्याकडे पाहिलं आणि झपाट्यानं ती आत निघून गेली.

''कोण छे? आऊछूँ।'' झुमुक तोंड पुसत बाहेर अला. स्थूल, मध्यम उंचीचा, टकला, गोरी तुपट कांती असलेला. झुबकेदार मिशांचा, उघडा, गळ्यात रुद्राक्षाची माळ घातलेला. कपाळावरचा केशर गंधाचा टिळा मात्र बशीरचाचाला नवा होता.

''मै बशीर हूँ झुमुक, अम्मीको लाया हूँ। काल रात्री आमची वस्ती जाळली. आमचंच घर वाचलंय. अम्मीचा हात पोळलाय. बेहोष है, चल यार जल्दी कर।'' बशीरचाचा घाईघाईत बोलत होता. शब्द कसेबसे उमटत होते. बोलता-बोलता रात्रीच्या घटना अनुभवत होता. शहारत होता, थरथरत होता. तटकन बोलणं थांबवत त्यानं झुमुककडं पाहिलं. त्याची नजर तुटक, कठोर झाली होती. ओठ घट्ट मिटले होते. बरसू पाहणारा आपला आवेग प्रयासानं आवरत, आवंढा गिळत त्यानं बशीरचाचाला म्हटलं,''चल बशीर, बघू यात काय झालंय अम्मीला.'' झुमुकनं प्रयत्नपूर्वक नजरेतून तिरस्कार निपटला होता; पण पूर्वीची आपुलकी नव्हती तिथे. बशीरचाचा पुरता गोंधळून गेला.

दोघं हॉस्पिटलच्या खोलीत गेले. अम्मीला आतल्या रूममधल्या कॉटवर ठेवत बशीरचाचानं झुमुकला तिचा हात दाखवला. तेवढ्यात डॉक्टर शहा तिथे आले. तिशी-पस्तिशीचे. बशीरचाचाला पाहताच त्यांच्या कपाळावर नापसंतीची आठी उमटली. डोक्यावरची मळकट पांढरी विणलेली टोपी अदबीसाठी नीट करत बशीरचाचा मागं सरकला. डॉक्टरांनी झुमुकला सूचना दिल्या. गोळ्यांची नावं सांगितली आणि सलाईन लावायला सांगून बशीरचाचाकडे न बघता ते पुढे निघून गेले.

झुमुकनं बशीरचाचाला बाहेरच्या खोलीत थांबायला सांगितलं आणि तो अम्मीच्या उपचाराच्या व्यवस्थेला लागला. या एवढ्या वेळात झुमुक बशीरचाचाची नजर टाळत होता. बशीरचाचा बाहेरच्या खोलीत येऊन बसला. तिथं बसलेल्या रखवालदाराच्या नजरेत संतापाची तिरीप चमकून गेली बशीरचाचाला पाहताच. त्यानं मान वळवून टीव्हीवर आपली नजर रोखली. बशीरचाचानंही यांत्रिकपणे बाकावर बसत टीव्हीकडे डोळे लावले.

थोड्याच वेळात त्याला झंकनापासून रखवालदारापर्यंत सर्वांच्या नजरेचा अर्थ कळला. अवाक होत तो बाकाशी खिळून निश्चल झाला. पाषाणवत होत

पापणी न लवता एकटक बघत, ऐकत राहिला. काल दुपारी गोध्रा स्टेशनवर रामजन्मभूमीच्या शिलापूजनासाठी जाऊन परत आलेल्या कारसेवकांवर हल्ला होऊन त्यांना जिवंत जाळण्यात आलं होतं. पंचावन्न माणसांना. डब्यांच्या दारांना बाहेरून कड्या लावून आतमध्ये रॉकेल, पेट्रोलचे पेटते बोळे टाकून डब्याला आग लावली होती. कोंडलेली बायका-मुलं, पुरुषमाणसं पेटत्या कपड्यांनी सैरावैरा पळत बाहेर पडायचा मार्ग शोधत जळून कोळसा झाली. त्यांच्या जळालेल्या देहांचा मधोमध एक ढीग बनला होता. जाळणाऱ्यांनी त्यांना कसलीही मदत मिळू दिली नाही. हा सारा बनाव अमलात आणणारे जिहादच्या घोषणा देत होते.

बशीरचाचा काळीज करपल्यासारखं हाय हाय करत होता. संतापानं त्याचे डोळे लाल झाले आणि मग स्वतःची असहायता जाणवून अतीव करुणेनं त्याचे डोळे झरझर वाहू लागले. त्याला स्वतःचीच लाज वाटू लागली. अस्वस्थ होत अगतिकतेनं त्यानं नजर बाजूला वळवली. त्या दारातून झुमुक येत होता. आवेगानं बशीरचाचा पुढे झाला. त्यानं झुमुकचे हात हातात घट्ट पकडले आणि डबडबल्या डोळ्यांनी त्याच्याकडे बघत त्याच्या खांद्यावर डोकं टेकवलं. झुमुकचाही हात त्याच्या पाठीवर विसावला.

दोघांच्या नजरा निवळल्या. भानावर येत झुमुक बशीरचाचाला म्हणाला, "बशीर, अब निकल तू। तुला कर्फ्यू सुरू व्हायच्या आत परतायला पाहिजे घरी. घरी नादिराभाभी, सकिना एकट्या असतील. नशीब समज तुम्ही लोक जिवंत आहात. थोड्या वेळातच इथं अनेक जखमी लोक दाखल होतील. पोचतीलच दोन-पाच मिनिटांत. किती मेले, किती जळाले जगदीश जाणे. एक नक्की, ही दंगल पेलताना कॉटेज हॉस्पिटल मोडून पडणार आहे. काय मांडून ठेवलंय समोर माहीत नाही. एवढंच लक्षात ठेव, आजवर बघितलंही नव्हतं इतकं काहीतरी भीषण घडणार आहे. अम्मीची काळजी करू नको. घाबरल्यामुळे तिची ही अवस्था झालीये. आधीच अशक्त, त्यात पलंगाला खिळलेली. भाजल्याचं काही फार विशेष नाही. पोळलंय जरा हाताला. फोड आलेत. त्यावरूनच ओळखायचं, की फार गंभीरपणे भाजलेलं नाहीये." बशीरचाचानं मान डोलवून वळायच्या आत झुमुक म्हणाला,

"जमलं तर ये रात्री. कर्फ्यूला ढील दिली, की अम्मीला बघायला. नाहीच जमलं तर काळजी करू नकोस. मी आहे इथं. तुझ्या अम्मीचा मीही बेटा होतो. लहान असताना तिच्या हातचे शक्करपारे खाल्लेत कितीतरी वेळा. मला आवडतात



म्हणून, केले की बोलवायची अम्मी. मी आहे. तिला हलवून सिरियस पेशंटला जागा करून द्यायची वेळ आली, तर घरी हलवीन माझ्या. जा तू. निर्धास्त जा." बशीरचाचानं त्याच्याकडे कृतज्ञतेनं बघत मान वरखाली केली.

झुमुक म्हणाला ते खरं ठरत होतं. परतीच्या रस्त्यावर अनेक जण आपल्या जखमी माणसांना सायकल, हातगाडीवर घालून उद्ध्वस्त अचेतन शरीरमनानं कॉटेज हॉस्पिटलची वाट चालत होते.

झपाझप चालत बशीरचाचा घराशी पोचला. त्या वस्तीतलं फक्त त्याचंच घर वाचलं होतं. राखेच्या ढिगात उठून दिसत होतं. भयभीत, टेकीला आल्यागत दिसत होतं. अजूनही कुठे कुठे आग आतल्या आत धुमसत होती. धूर हवेत झेपावत होता.

सकिनाला हाक मारल्यावर तिनं आधी बाहेर डोकावलं आणि मग दार उघडलं. बशीरचाचानं आत येत दार दडपलं, त्याला कडी घातली. "कैसी है अम्मी?" सकिनानं तात्काळ विचारलं. बशीरचाचा काही बोलायच्या आतच नादिरानं धारदार आवाजत तिला सुनावलं,"ठीक क्यूं नहीं होगी डायन, हमको दफनाके मरेंगी वो।" तिच्या आवाजावरून, अविर्भावावरून तिच्या पदरात काही फारसं पडलेलं नाही. पायपीट मात्र झाली असणार. तो गप्प राहिला. सकिनानं आणून दिलेलं पाणी घटाघटा प्यायलं आणि तो घाम पुसू लागला.

बिनकामाचं बसायची सवय नसलेल्या बशीरचाचाला रिकामा वेळ खायला उठला. मनात काहीबाही विचार येऊ लागले. नादिराची बडबड चालली होती. जावेद कशाशी तरी खेळत होता. जेवायची वेळ झाल्यावर तो सकिनाला, "मम्मी, भूक लगी खानेको देव ना." म्हणून झोंबू लागला.

नादिरा बसकण सोडत फणफणत उठली. कोपऱ्यातल्या फडताळात ठेवलेलं रोटीचं टोपलं आणि लोणच्याचं पाकीट तिनं बशीरचाचा आणि जावेदच्या पुढ्यात आदळलं आणि फुस्कारत म्हणाली,"तरकारी नहीं मिली। अचार मिला और ब्रेड लायी हूँ मुश्कीलसे। आधा लीटर दूध मिला नाकेपे। टांगे टूटी वहाँ जाते मेरी। दूध और ब्रेड रातके लिए रखो। क्या जाने बाहेर जानेको मिलेगा की नही। अल्लाह! क्या दिन आये, क्या होगा कुछ अंदाजा नही।"

भूक नसताना सगळ्यांनी थोडं थोडं खाऊन घेतलं. जावेदला लोणचं आवडलं. ताव मारून जेवल्यानंतर तो पेंगुळला होता. झोपी गेला.

संध्याकाळची कर्फ्यूत ढील दिली गेली. बशीरचाचा बाहेर पडलाच नाही.

खायला काही आणायचं म्हणजे काही मिळायची शक्यता नव्हती. मिळालंच तर प्रचंड महाग असेल याची त्याला खात्री होती. घरात पैसा तर काहीच शिल्लक नसणार. किरकोळ चिल्लर असली तर असेल. हल्ली धंदा तरी कुठे होता. अनेकांकडून पैशाऐवजी वायदे मिळायचे. त्याची आठवण होताच त्याच्या तोंडात कडवट चव उतरली. अम्मीला बघायला जायलाही त्याला नको वाटायला लागलं.

रात्र झाली. आदल्या रात्रीच्या आठवणींची दहशत त्या सगळ्यांना झोपू देईना. नादिरा आणि सकिना आडव्या झाल्या होत्या, तरी डोळ्यांवर झोप नव्हती. पुढच्या क्षणी काय घडेल याची दाट चिंता डोळ्यात साठली होती. बशीरचाचा भिंतीला टेकून बसला होता. काहीतरी अघटिताची चाहूल लागावी तसा धास्तावून अज्ञातात बघत शून्य, रित्या नजरेनं.

कालच्यासारखाच, रात्र जून झाल्यावर झोपेच्या अनावर झापडेमुळे मान खाली पडलेला बशीरचाचा दार खडखडल्याच्या आवाजानं खडबडून जागा झाला. दरवाजावर लाथा बसत होत्या, शिव्या घातल्या जात होत्या, कालच्यासारख्याच घोषणा होत होत्या; आवाज दिले जात होते, फक्त भाषा वेगळी होती, पेहराव वेगळे होते, रंग वेगळे होते. बशीरचाचानं धडपडत उठून दार उघडलं. आपलीच माणसं आपल्याशी असं का वागताहेत हे त्याला कळेना. अचंब्यानं त्यानं दार उघडलं. लागलीच फाडकन थोबाडात बसलेला बशीरचाचा चार पावलं धडपडत तोंडावर पडला. त्याच्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात अंगावर पडलेला हा पहिलाच हात. अब्बांचाही मार खाल्ला नव्हता त्यांनी कधी. हेलपाटत उठून, ''क्या हुआ? क्यूं...'' म्हणता म्हणता परत त्याच्या कानाखाली आवाज झाला.

''हरामजादे। काफिरोंके कुत्ते। रामनामकी चदरिया दिखाके जान बचाई सालेने। अरे इससे तो मिट्टी में मिलता तो अच्छा था। धरमके खातीर मरता तो जन्नत में जाता।'' बाकीचेही इतर आवाज त्यात मिसळून गलका झाला. चार हात अंगावर पडले. बशीरचाचा बघत होता. रंगरूप-चेहरामोहरा वेगळा होता; पण नजर तशीच होती, कालच्या माणसांसारखी. तो तसाच कण्हत-विव्हळत पडून राहिला. त्यांच्यातला एक जण कोपऱ्याशी गेला; त्यानं कुराण आणि मक्केच्या मशिदीची तसबीर उचलली आणि दुसऱ्या कोपऱ्यात घाबरून एकमेकींना बिलगून बसलेल्या नादिरा, जावेद आणि सकिनाकडे मग्रूर नजर टाकत बाहेर निघून गेला.

म्होरक्यानं सकिना, नादिरा, जावेदला बाहेर जायला फर्मावलं. कण्हणाऱ्या बशीरचाचाला फरफटत बाहेर नेऊन टाकलं आणि बशीरचाचाच्या त्या खोपटाला आग लावून टाकली. आगीनं हजार जिभांनी ते घर मटकावून टाकलं. जमाव निघून गेला. हतबुद्ध झालेल्या बशीरचाचानं आसपास सभोवताली नजर फिरवली. कुठेही पोलीस नजरेस पडले नाहीत.

नेसत्या वस्त्रानिशी पाय ओढत ते चार जणांचं कुटुंब एका झाडाच्या खाली गेलं. कोरड्याठक्क उघड्या डोळ्यांनी निर्विकारपणे रात्र संपायची वाट बघत, ताटकळत राहिलं.

पहाटे जावेदला खांद्यावर टाकून बशीरचाचा त्या दोघींना घेऊन कसाबसा चालत मोठ्या रस्त्याशी येऊन बसला. गस्तीच्या पोलीस व्हॅनला हात दाखवून थांबवलं. आपली कथा सांगू लागला. त्यानं दोन-चार वाक्यं उच्चारली असतील-नसतील त्यावर त्यातल्या पोलिसांनी खेकसत शिवी घातली आणि पंधरा ऑगस्ट मैदानावर जायला सांगितलं. तिथं निर्वासितांसाठी तंबू उभारले होते. आपल्याच देशात आपण निर्वासित? मनात हा प्रश्न उमटल्यावर तो आणिक खिन्न झाला.

जड पायांनी ते निर्वासित कॅम्पपाशी येऊन पोहोचले. आपसूक रांगेत उभे राहिले. मागून येणाऱ्यांच्या रेट्यानं पुढे ढकलले जाऊ लागले. जावेद, सकिना, नादिराची नावं, वयं, पत्ता वगैरे फॉर्म भरणारा कारकून, त्याच्या टेबलाशी ते आल्यावर त्यांना विचारून फॉर्म भरू लागला. जावेदच्या जन्मखुणा सांगितल्यावर दोघींनी शरमेनं मान खाली घालून आपल्या अंगावरच्या खुणा सांगितल्या. तो कारकून मोठ्यानं उच्चारत त्या लिहून घेऊ लागला. बशीरचाचासंबंधी तपशील जेव्हा जन्मखुणेपर्यंत आला तेव्हा त्यानं आपले तळवे त्या कारकुनाला दाखवले आणि म्हणाला, ''लिख्खो, केसरिया रंगे हाथ।'' एखाद्या वेड्याकडे बघावं तसं बघत तो वैतागलेला कारकून खेकसला. ''पागल, ऐसा नहीं लिखते, चलो आगे।'' चाचाला म्हणावंसं वाटलं, ''वो रंग जायेगा नहीं और हरा चढेगा नहीं मेरे हथेलियोंपे। वैसे रंग कौनसा भी हो, जब एकदम गहरा हो जाता है तब वो कालाही होता है।'' न बोलता तो पुढे सरकला. फॉर्मची कॉपी दाखवल्यावर त्यांची एका राहुटीत सोय झाली. सगळ्यांत मिळून एक खापराचं मडकं, ॲल्युमिनियमची एक मोठी थाळी, ग्लास, वाडगा आणि प्रत्येकाला पांघरूण. व्यवस्था करणाऱ्यांच्या नजरेत तिटकारा होता. बांडगुळाची जोपासना करावी लागतीये असा आविर्भाव होता.

राहुटीच्या कोपऱ्यात थोडा वेळ स्थिरावल्यावर नादिरा आणि सकिना पुढच्या व्यवस्थेला लागल्या. सकिनानं मडकं भरून आणून ठेवलं. जावेदकडे

लक्ष द्यायला सांगून देहधर्माची सोय बघण्यासाठी त्या दोघी गेल्या. सुस्कारा सोडत बशीरचाचानं एका हातानं ग्लास उचलला. तोंडाशी नेऊन पाणी पिणार इतक्यात जावेद म्हणाला, "दोनों हाथ से पकड के पानी पीना, एक हाथ से नहीं। कितनी बार अब्बाजीने कहा है -" बशीरचाचा थबकला. बघता बघता अब्बांच्या नुसत्या नावानं त्याचे डोळे वाहू लागले. एखाद्या मोठ्या माणसाशी बोलावं तसा तो बांध फुटून जावेदशी बोलू लागला.

"कल मेरा करम लूटा उन लोगोंने। त्या गुंडांनी माझे ठसे नेले देवाच्या नावाचे. रोजीरोटीचा सहारा छीन लिया उन्होंने। लेकिन अब्बांच्या म्हणण्यानुसार नहीं कुछ गया। तुला आठवतं ना ते; अब्बा नेहमी म्हणतात ते. करम गया तो नहीं कुछ गया, धरम गया तो थोडा कुछ गया। लेकिन शरम गयीं तो सबकुछ गया। आदमी वहीं जानवर बन गया। आजच्या गुंडांनी माझं कुराण नेलं रे! धरम नेला रे त्यांनी जबरदस्तीनं. जैसे की मैं मुसलमान रहने के काबिलही नहीं रहा। धरम गया तो थोडा कुछ गया। आता शरम राहिलीये फक्त अपने पास। गरीबों के पास वो हमेशा रहा करती है। कोई छीन नहीं ले सकता उसे। खुदको धुत्कारनी पडती है। कुत्तेको लात मारके भगाते हैं ना, वैसे।

"तुझे मालूम है जावेद, शरम है इसलिए हम जानवरोंसे जुदा है। अभी वो जी जानसे संभालनी चाहिए। नहीं तो हमारे में और जलानेवालों मे कोई फर्क नहीं रहेगा। करम गया, धरम गया, सिर्फ शरम रह गयी है। दुवा करो जावेद बेटे, कभी वो न जाये।" परत उमाळ्यानं चाचा गदगदू लागला. जावेदला काही न कळल्यानं तो फक्त टकामका बघत राहिला.

बशीरचाचानं बाहीनं डोळे पुसले. दोन दिवसांतल्या सगळ्या प्रसंगांचा, दुःखाचा निचरा झाला. अब्बा नसताना त्यांच्या आठवणीनं त्याचं लहान मूल झालं आणि सकिना, नादिरा नसताना छोट्या जावेदसमोर प्रकट होऊन ते दुःखाला वाट देत मोकळेपणानं रडलं. लगोलग त्याला अंगदुखीची जाणीव झाली. त्यानं तो कळवळला. पहिल्यांदाच झाली त्याला ती. सरकारच्या दयेवर जिणं सुरू झालं त्याचं. कुणीच आपलं रडगाणं गात नव्हतं. सगळेच पोळलेले, जळालेले. फुरसत कुणाला होती? भकास चेहऱ्यानं, घाणीनं भरलेल्या चरात प्रातर्विधी उरकणं, तट्ट्याच्या आडोशाला अंगावर अर्धी बादली उपडी करणं; उकाड्यात तगमगणं, अंगावरच्याच कशानं तरी वारं घेण्याचा प्रयत्न करणं; डाळ-भात, रोटीच्या चार चौकोरांसाठी रांगा लावणं; मिळेल त्यावर दिवस काढणं आणि कशाचीच तक्रार



न करणं. येत्या काही दिवसांत, काही आठवड्यांत, किंबहुना महिन्यांत हाच आपला दिनक्रम राहणार आहे याची पहिल्याच दिवशी बशीरचाचासकट इतर साऱ्यांची खात्री झाली. जावेद मात्र आनंदात होता. त्याला कधीच इतकी मुलं खेळायला मिळाली नव्हती.

पहिल्या दिवशी आलेल्या डॉक्टरांकडून बशीरचाचानं अंग ठणकत असतानाही रांगेत उभं राहून गोळ्या मिळवल्या. त्यामुळे तिसऱ्या दिवशी थोडं बरं वाटायला लागलं. संचारबंदी सैल झाल्या झाल्या तो चौकीतल्या रजिस्टरमध्ये नाव, नंबर बाहेर पडायचं कारण, जायची वेळ वगैरे तपशील भरून अम्मीकडे जायला निघाला. "अरे मरनेदो उसको वहीं। मरती को मिलने के लिए अपनी जान क्यूं खतरे में डालते हो? साली। मरा मुर्दा कब बनेगा उस जिंदा मुर्देका अल्ला जाने।" नादिरानं जळजळीतपणे ओढलेले ताशेरे कानाआड करून चाचा लगबगीनं पावलं उचलू लागला.

"करम गया नहीं कुछ गया
धरम गया तो थोडा कुछ गया
शरम गई तो सब कुछ गया
बोले फत्तू, बंदा वहीं जानवर बन गया।"

अब्बांनी वेळोवेळी ऐकवलेल्या फकीर फतेहबाबाच्या ओळी मनाशी घोळवत बशीरचाचा चालत होता. अम्मीच्या ओढीनं. झपाझप. बरोबर चालणाऱ्या जखमींच्या अवस्थेकडे दुर्लक्ष करत. त्याच्या नातेवाइकांना बाजूला करत. आयुष्यात त्यानं कधीच कॉटेज हॉस्पिटलच्या रस्त्यावर लोकांची एवढी रीघ पाहिली नव्हती. एरवी जखमींना उचलून, सायकलवरून हाताला धरून नेणाऱ्यांकडे चाचानं त्यांची चौकशी केली असती. चुकचुकला असता. दुवा मागितली असती. मदत केली असती; पण आता लागलेल्या अम्मीच्या ओढीपुढे सारं काही गौण होतं.

कॉटेजच्या त्या खोलीत अम्मी कुठेच दिसली नाही. आठही कॉटवर जखमी निजवलेले होते. नव्यानं भरती झालेल्यांना खाली झोपवलं गेलं होतं. चादरीवर, सतरंजीवर आणि गोणपाट, प्लास्टिकच्या कागदावरही. बशीरचाचा धसकून झुमुकलालच्या घराकडे पळाला. धास्तावल्या आवाजात त्यानं हाक घातली. झंकनानं दार उघडलं. या वेळेस मागच्या वेळची विखारी नजर नव्हती तिची. उलट ओळखीची, स्नेहाची भावना होती. "आवो ना चाचा अंदर। बापू

जरा आत पडलेत.'' ती दार उघडून पाय ओढत बाजूला होऊन त्याच्यासाठी वाट करत म्हणाली.

''अम्मी?'' अधीरपणानं बशीरचाचानं विचारलं. खळखळून हसत झंकना म्हणाली, ''ती काय तिकडे व्हरांड्याच्या खिडकीपाशी. बापूंनी इथंच आणून ठेवलं तिला. अर्धीअधिक जळालेली, हात-पाय तुटलेली माणसं दाखल करून घ्यायला लागली. कॉटच काय, जमिनीही भरून गेल्या त्यांनी. तिथं कुठे ठेवू म्हणाले बापू म्हणून इथेच आणलं. चाचा, कुठे होता तुम्ही? कसे होता? बापू म्हणालेच, की तो कशात तरी सापडला असेल. त्याला यायला खूप त्रास -'' बोलता बोलता झंकना तटकन थांबली. चाचा अम्मीच्या खाटेपाशी जाऊन थांबला होता. तिला न्याहाळत होता.

''कसा आहेस बशीर?'' असं झुमुकनं विचारल्यावर बशीरचाचाला कळलं झुमुक तिथे आलाय म्हणून. झुमुकनं त्याच्या खांद्यावर हात ठेवल्यावर त्याच्या डोळ्यात पाणी तरारलं. ''क्या बताऊँ तुम्हें,'' म्हणताना त्याची नजर खिन्नपणे शून्यात हरवली. उसासा सोडत, भानावर येत म्हणाला,''ते जाऊ दे. आमच्या सगळ्यांची कर्मकहाणी सारखीच. थोडेफार फेरफार. एक बताऊं झुमुक, पचास बरसों में जो जिया हूँ उससे कई गुना दो दिन में जीके निकल चुका हूँ। अम्मी की तबियत -''

''बशीर, अम्मीचं आहे तसंच आहे. खरं तर थोडी बिघडलीच आहे. सुधारणा नाहीये. नाडी कमी-जास्त होतेय. हं, हाताचं ठीक आहे. भाजल्याची जखम भरत आली आहे. फारतर उद्या एकदा मलम लावायला लागेल.'' झुमुकनं झंकनाला बशीरचाचासाठी चहा करायला सांगितलं. ती आत गेली. बशीरचाचा आणि झुमुकलाल तिथंच कट्ट्यावर बसले.

''क्यूं रे झुमुक, आँखे लाल दिखती हैं। चैन की नींद नहीं आयी क्या?'' काहीतरी विचारायचं म्हणून बशीरचाचानं विचारलं.

''काय सांगू तुला, ह्या असल्या दंगलीमुळे लोकांवर जितके अत्याचार, हाल होतात ना, त्याच्या अनेकपटीनं आमची ओढाताण होते; मेडिकल स्टाफची. या असल्या कॉटेज हॉस्पिटलमध्ये माणसांची गर्दी होते. प्रत्येक जण घायाळ असतो. कुणी वर्मी घाव लागलेला, कुणी मरणाच्या दाढेतला. रात्रंदिवस नुसती धावपळ, काम मानेवर खडा ठेवून. दोन घास पोटात कोंबायला फुरसत नसते. कापली-ठेचलेली, जाळली-तोडलेली माणसं विव्हळत तळमळत सामोरी आणली जातात.



काय करायचं त्यांचं? थकलोय, पाठ दुखतीये म्हणून कुणाला सांगायचं? तुला माहितीये, तिकडे वडोदऱ्याला दंगल पेटलीये. नुसता खच पडलाय पेशंट्सचा. आजूबाजूच्या डॉक्टरांना बोलावून घेतलंय. शहा डॉक्टरही तिकडेच गेलेत काल रात्रीपासून.''

''यहाँ के डॉक्टर वहाँ क्यू? वहाँ नही हैं क्या?''

''हैं बहोत हैं। पण तिकडे पत्रकार असतात, फोटोग्राफर असतात. वेगवेगळ्या चॅनेलचे व्हिडिओवाले असतात. ते सगळं टिपत असतात. टीव्हीमुळे देशात-परदेशात सगळं दाखवलं जातं. मग सरकारनं खूप मदत पुरवली दाखवायला लागतं ना. म्हणून इकडचे डॉक्टर काढून -''

''जैसे की इधर के आदमियों के जिंदगी की कुछ कीमतही नहीं।'' बशीरचाचा उफाळून म्हणाला.

''होईल, होईल! गरिबांच्या प्राणांची किंमत केली जाईल.'' झुमुक गूढपणे म्हणाला. चाचाला काहीच कळेना. तो गोंधळून त्याच्याकडे पाहात राहिला. विषय बदलून झुमुक म्हणाला,''मगाशी विचारलंस ना डोळे लाल का दिसताहेत? सांगू तुला? अरे पोस्टमार्टेमचे रिपोर्ट तयार करत होतो. फॉर्म्स भरत होतो त्याचे. पुरुष, स्त्री, वय, वजन, केसांचा रंग, दात आहेत का? अंगावरच्या खुणा, जखमांचं वर्णन-किती टक्के भाग जळालाय, किती ठिकाणी भोसकलंय, लाख लफडी-''

''अरे पण चिरफाड करतात डॉक्टर प्रेताची आणि मग देतात ना रिपोर्ट -'' बशीरचाचाच्या नजरेत आश्चर्य होतं.

''ते इतर वेळी, परिस्थिती सामान्य असताना. अशा दंगलीच्या परिस्थितीत जगतात की मरतात अशा अवस्थेतल्या पेशंटची रीघ लागल्यावर त्यांच्या उपचाराकडे आधी बघायचं का मेलेल्यांच्या बॉडीजची चिकित्सा करायची? स्टाफ, सुखसोयी, औषधं सगळ्यांचाच तुटवडा. डॉक्टरसुद्धा एखाद-दुसरा. अशा वेळी आलेल्याला वाचवायची कसोशी करायची की प्रेतांच्या जखमा, वणांची उठाठेव करायची? मी पोस्टमार्टेम करून - म्हणजे पोस्टमार्टेमचे फॉर्म्स भरून निकालात काढलेली प्रेतं आहेत ना, त्यातली निम्मी-पाऊण जळालेली, उरलेली वर्मी घाव लागलेली. नुसतं प्रेताकडे बघून योग्य वाटेल ते कारण लिहून पुढच्या वासलाती लावायला लागतात त्या मला. बघणं आणि लिहिणं हेच पोस्टमार्टेम. तरीही कामानं पार पिट्ट्या पडतो माझा. तुझ्या अम्मीसारखी एकही केस नाही इथे. नुसतीच आजारी असलेली. तुझीमाझी बालपणापासूनची दोस्ती आहे म्हणून ठेवून घेतली तिला.''

झुमुकचं बोलणं अर्धंच राहिलं. अम्मीचा उल्लेख आल्यावर चाचा तिच्यापाशी जाऊन उभा राहिला. तोंड वाकडं झालेली, एक बाजू लुळी पडलेली, हातापायाच्या काड्या झालेली, पाच फूट उंचीची. लहान परकरी पोरीएवढं वजन झालेली. बशीरच्या पोटात कालवलं. त्यानं तिचा हात बघितला. भाजल्याची कोणतीही खूण नव्हती. फक्त कातडी लालसर होती. तिनं डोळे उघडून आपल्याकडं पाहावं असं त्याला तीव्रतेनं वाटत होतं. झुमुकचा हात खांद्यावर पडल्यामुळे बशीरचाचा भानावर आला. बशीरचाचाला त्यानं अम्मी ग्लानीत असल्याचं सांगून 'आता नीघ' असं सुचवलं. जड पावलानं चाचा निघाला.

मान खाली घालून आपल्याच विचारात मग्न झालेला चाचा निर्वासित कॅम्पमध्ये दाखल झाला. राहुटीचे चार कोपरे चार कुटुंबांनी व्यापले होते. पुरुष माणसं बाहेर उघड्यावर झोपायची. बायका-पोरं आत झोपायची. तरीही त्यांचे हात-पाय एकमेकांना लागायचे. बशीरचाचाच्या राहुटीच्या कोपऱ्यात जावेद एकटाच खेळत होता. नादिरा आणि सकिना आसपास कुठेतरी गेल्या असाव्यात. चाचा बसल्या जागेवरून बाहेर पाहात होता. कॅम्पमधल्या निर्वासितांची दुःखं चार दिवसांत बोथटली होती. रोजच्या रोज जगण्यासाठी करायला लागणारी उठाठेव, धावपळ यामुळे मनाचे घाव भळभळणं बंद झालं होतं. सगळेच दुःखी, सर्वस्व गमावलेले. कोण कुणापाशी रडणार? कोण कुणाचे अश्रू पुसणार? सगळ्यासाठी रांगा, तोंड वेंगाडणं, बोलणी खाणं, तिरस्काराच्या नजरेचं धमनी होणं वगैरे रामरगाड्यात मनातलं बोलायला फुरसत कुठली. सगळा निर्वासित कॅम्प उद्यात अजिबात डोकावत नव्हता, कालचं किंचितही आठवत नव्हता. आजची लढाई फक्त आज लढत होता.

बाहेर संचारबंदी होती तरी आत नव्हती. रखवालदार अधूनमधून गस्त घालायचे. साबण, तेलं वगैरे विकणारे, गोळ्याबिस्किटं, केळी विकायला घेऊन येणारे अधूनमधून येऊन जायचे. बरोबरीनं बिडी-तंबाखूवाले आणि रुमाल, टॉवेल, लुंग्या, ओढण्या वगैरे विकणारेही येऊ लागले. सगळ्यांचा माल लगोलग खपून जायचा. निर्वासित झाले म्हणून काही तिथली माणसं कैदी नव्हती; चीजवस्तू अंगावरून काढून घेतलेली. अंगावरचा फुटका मणी, जुनंपानं घड्याळ, चांदीची चेन, कडं, अंगठी वगैरे गोष्टींचे पैसे देणारेही येत असायचे. कमी का होईना, पण पैसे मिळायचे. त्यातून लागणाऱ्या किरकोळ वस्तू चढ्या भावानं विकत घ्यायच्या. निर्वासितांच्या परिस्थितीचा फायदा चीजवस्तूंचे पैसे देणारे आणि वस्तू विकणारे



दाबून घ्यायचे. अर्थात आतमध्ये शिरून ही 'सुविधा' पुरवण्यासाठी त्यांनाही चौकीतल्या बाबूंचे, रखवालदारांचे हात चांगले ओले करायला लागायचे.

"देखो देखो, मेरे साथ कौन आया है। अपना रसूल, रेहमानमियाँ का बेटा।" बशीरचाचाला पाहून नादिरा लगबगीनं त्याच्याकडे येत म्हणाली.

"रसूल, रसूल तू जिंदा है? अल्ला का शुकर है बेटा।" झटकन उठत चाचा आवेगानं म्हणाला. रसूलही पुढे होऊन चाचाच्या मिठीत शिरला. दोघांच्या तोंडून शब्द फुटेना, डोळे पाणावले.

"अब्बा और अम्मी दोनों ही मौत के शिकार हो गये, मैं बदनसीब बच गया रोने के लिए, चाचा।" म्हणत स्फुंदत रसूल रडू लागला. त्याला थोपटून शांत करत बशीरचाचानं त्याची समजूत काढली. दोघं खाली बसले. डोळे पुसून रसूलनं आपली हकिकत सांगितली. रसूल जळिताच्या घटनेआधी चार दिवस काकाकडे केसरबावडीला गेला होता. काल आला. तोवर इकडे हे सगळं अघटित घडून गेलं होतं. त्याचा विलाप ऐकायला आणि डोळ्यातून घळघळणारं विदीर्ण काळीज पाहायलाही कुणी नव्हतं; सांत्वनाची बात तर दूरच. छावणीतल्या लांबच्या राहुटीत राहायला लागला. नादिराला दिसला आणि आपल्या ओळखीचं, धागेदोरे गुंतलेलं कुणीतरी सापडलं म्हटल्यानंतर ती त्याला उत्साहानं घेऊन आली. थोडा वेळ बसून खुदा हाफिज म्हणत निरोप घेऊन गेला. संध्याकाळी येण्याचा वायदा करत. सकिनाची नजर आपल्या नजरेत गुंतवून घेत. मग नादिरा बराच वेळ "कितनी बुरा तरह मारा नसीबने रसूल को। उसके दुःखदर्द के सामने अपनेपे आ पडी मुसीबत कुछ भी नही।" या आशयाचं बशीरचाचाला बरंच सांगत राहिली. चाचा मनोमन ते मान्य करत होता. मान हलवत.

रात्री बशीरचाचा गाढ झोपी गेला. इतरांच्या गलक्यानं नादिरा आणि सकिना जाग्या झाल्या होत्या आणि जाग्याच राहिल्या. सारी छावणीच त्या रात्री जागी होती. साऱ्यांची झोप उडाली होती. रात्री दहाच्या बातम्यांत जाहीर केलं होतं मुख्यमंत्र्यांनी - प्रत्येक बळीच्या नातेवाइकांना दोन लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचं. छावणीत खळबळ माजली. कुणाच्या चेहऱ्यावर उघडउघड खुषी तरळत होती. कुणी वरवर निर्विकार तरी पण अंतर्यामी सुखावलेलं होतं. कुणी आठवणीनं रडत, विव्हळत होतं, मनोमन विकल झालेलं होतं. तरीही त्यांचं सुप्त मन स्वप्नं रंगवू लागलं होतं.

नादिरा सैरभैर झाली. तिला झोप लागेना. ताबडतोब बशीरचाचाला गदागदा

हलवून उठवावं आणि त्याच्या कानावर हे सगळं घालावं असं तिला वाटलं. आयुष्यात पहिल्यांदा तिला सासूच्या तब्येतीविषयी विचारावंसं वाटलं; पण तिनं चाचाच्या कलानं घ्यायचं ठरवलं. ती आणि सकिना शेजारीशेजारी लवंडल्या. दोघींनाही स्वस्थ झोप नव्हती, वेगवेगळी सोनेरी स्वप्नं पडत होती.

सकाळी उशिरा नादिरा खडबडून जागी झाली. तोंड धुऊन गाडीवरून चहा घेऊन आली. रसूल तोवर तिथं आलाच होता. सकिनानं डोक्यावर ओढणी सरकवली होती. रसूलला पाहताच तिनं छाती बडवत रडायला प्रारंभ केला आणि रडता-रडता म्हणू लागली, उसना गहिवर घालू लागली, ''तुम्हारे अम्मी, अब्बा अल्लाह को प्यारे हो गए। बहुत ही बुरी बात हो गई। ऐसा होना नहीं चाहिये था। पर किस्मत में ही लिखा था सो हो गया। सरकार तुम्हें चार लाख देगी। लेकिन उससे अपने खून के आदमी वापस मिलेंगे क्या? कुछ कीमत नहीं चार लाख की अपने अम्मी-अब्बाके सामने। खुदा की मर्जी। चलो, अब ये भी ठीक है। थोडा तो इन्साफ हुआ। बदनसीबी के अंधेरे में छोटा दिया तो जला।'' डोळे पुसत नादिरा थांबली. रसूलच्या डोळ्यात पाणी आलं. ते पाहून नादिरा पुढं झाली. त्याला आपल्या गळ्याशी लावत म्हणाली, ''ऐसा मत समझ की इस दुनिया में तू बिलकुल अकेला पड गया करके। हम तुम्हारे हैं। तू बेटा है हमारा, इधर ही रहा कर हमारे साथ।'' रसूलने पोकळपणे मान डोलावली. थोडा वेळ बसून तो जाण्यासाठी उठला. जाता-जाता बशीरचाचाला म्हणाला, ''नसीबने एक हाथ से लिया तो दुसरे हाथ से दिया। समझ में नही आता चाचा अब इतने पैसे से काय करूं? मेरे सब अरमान पूरे हो जाएंगे। बहुत कुछ...।'' तो बशीरचाचाचा निरोप घेऊन निघाला. सकिनाकडे न पाहता. त्याच्या वागण्यात आलेला तुटकपणा चाचाला लगेचच जाणवला.

इतक्या पैशाचं रसूल काय करेल? सगळं काही करता येईल त्याला या पैशातून. घर, शादी, गाडी, शेती असा विचार मनात आल्या आल्या नादिराला आपल्या परिस्थितीची टोचणी तीव्रपणे खुपू लागली. आजवरच्या सगळ्या परिस्थितीचा झाडा घेत ती मोठमोठ्यानं तोंड चालवू लागली.

बशीर पुरा वैतागला तिच्या एकतर्फी तंटणाला. वैतागून तो बोलला, ''क्यूं गधी के माफिक बोल रही हो। माँ-बाप के सामने सारी दुनिया कचरा होती है और तुम चार लाख रुपिया और माँ-बाप एकही पलडे में तोल रही हो। तुम्हारी अकल तो...।''



''और तुम्हारी तगडी है, है ना। तो उसी अकल के सहारे अब ठीक करवाओ। घरदार जळलंय ते उभं करणार आहे तुमची अक्कल? इथे निर्वासितांच्या छावणीत भिकाऱ्यासारखं राहतोय. तुकडे मोडतोय. सकिनाचं लग्न करून द्यायचंय. तिला, तिच्या पोराला पोसायचंय. तुमच्या अकलेच्या कृपेनं कितीतरी महिन्यांत गोडधोड, मांस-मटण खाल्लं नाहिये आम्ही. फाटक्या सलवारकुडत्यावर दिवस काढतोय. या छावणीत निदान दोन वेळा पोटात अन्न पडायची खात्री तरी आहे. तुमच्या धंद्यात ते होतं का हो? आणि सगळ्यात कहर म्हणजे ती बुढी. सत्तर बरस की। मुर्दे की माफिक बिस्तर पे पडी हुई। झूठ बोलूं तो अल्लाह सजा दे। हाथ जल गया है ना उसका? इसी वक्त में चल बसी तो दो लाख मिल जायेंगे हमको। कभी किसी काम न आई, अब इस काम आ गयी तो जिंदगीभर एहसानमंद -'' नादिराचं बोलणं चाचानं तिच्या मुस्कटात दिल्यानं अर्ध्यातच तुटलं.

त्याला अम्मीची तीव्रतेनं ओढ लागली. तो बेचैन झाला आणि सकिनाला सांगून छावणीच्या बाहेर पडला. तिरीमिरीत तो कॉटेजच्या रस्त्याला लागला. नादिराला शिव्या घालत. पण हळूहळू त्याचा राग शांत झाला आणि कॉटेज दिसू लागल्यावर तर त्यानं नादिराचं बोलणं कडू वाटलं तरी अगदी खरं आहे हे मनोमन मान्य केलं. दोन्ही हातांनी थोबाडात मारून घेत त्यानं तोबा केली. आयुष्यात प्रथमच त्याला स्वतःच्या मनाची शिसारी आली. शरमेनं मान खाली घातलेल्या अवस्थेत तो झुमकच्या घरापाशी पोहचला.

व्हरांड्यात झुमक कुणाशी तरी बोलत होता. त्या माणसाच्या पेहरावावरून, अविर्भावावरून तो स्थानिक पुढारी वाटत होता. दादा-मवाली टाईप. सौजन्याच्या झिरझिरीत आवरणाखाली अधिकार आणि मग्रुरी मिरवणारा. त्यांचं बोलणं होईतोवर चाचा बाहेरच थांबला. त्याला ती दोघं दिसत होती, पण बोलणं ऐकू येत नव्हतं. त्यानं पुन्हा एकदा त्या माणसाकडे पाहिलं. त्याच्या आधुनिक सफारीसारख्या पेहेरावावरून त्याला तो हिंदू आहे का मुसलमान ते कळलं नाही. त्यानं निरखून पाहूनही त्याला ते कोडं सुटलं नाही. त्यानं नाद सोडून दिला. त्या दोघांचं बोलणं संपवून झुमक त्याला निरोप द्यायला बाहेर आला.

''मग झुमकजी, करताय माझं काम! तुमचाही फायदा, माझाही. ठीक आहे, चलतो मी. वाट बघतो.''

''या पटेलजी पुन्हा. तुमच्या इच्छा म्हणजे आमच्या लेखी ऑर्डरच म्हणायची. अवघड आहे, पण करतो तुमचं काम बाबूभाई.'' झुमक थोडा

अवघडून बोलला. मान तुकवून तो माणूस इकडेतिकडे न बघता निघून गेला. प्रयत्न करूनही त्याच्या नावा-आडनावावरून बशीरचाचाला त्याचा धर्म, जातपात कळेना. त्यानं मग तो प्रयत्न सोडून दिला.

झुमुकचं लक्ष बशीरचाचाकडे गेलं. ये ये म्हणत त्यानं त्याला आत घेतलं. बशीरचाचा अम्मीच्या पलंगाशी जाऊन उभा राहिला. थोड्याच वेळात झुमुकलालचा हात त्याच्या खांद्यावर पडला.

"बशीर, बघून घे अम्मीला डोळे भरून. आता काही खरं नाही तिचं, कधीही काही होऊ शकेल. डोळ्यातलं तेज गेलंय. कानाच्या पाळ्या पडल्यात. नाकाचा शेंडा वाकडा झालाय. ही मरणाची चाहूल आहे बशीर. बघून घे. पुन्हा अम्मी जिवंत दिसेल ना दिसेल. इथे बस. हात हातात घे. चेहऱ्यावरून हात फिरव, काहीतरी बोल -" झुमुक त्याचा खांदा दाबत म्हणाला, "हात बराय तिचा. नॅचरल डेथ होणार तिची. ओल्ड एजमुळे."

बशीरचाचा गर्रकन वळाला. त्यानं जिव्हारी घाव लागलेल्या नजरेनं झुमुककडे पाहिलं. त्याच्या डोळ्यातून घळाघळा पाणी वाहात होतं. "धीरानं घे बशीर. अम्मीची आणि तुझी पुन्हा गाठभेट होईल ना होईल म्हणून - माझं कर्तव्य आहे ते."

बशीरचाचानं अम्मीचा हात हातात घेतला, कुरवाळला. बराच वेळ तो तिच्याकडे बघत राहिला. तिच्या हाताचा मुका घेऊन त्यानं निर्धारानं तिच्याकडे पाठ फिरवली. तो झुमुकपाशी आला. त्याच्या समोर बसला.

"सावरलास बशीर? केटलो प्रेम करे छे रे तू माँपर! नाहीतर तो बाबूभाई बघ. हरामखोर. धाकट्या भावाला घेऊन आलाय इथे. दारू पिऊन-पिऊन लिव्हर सिऱ्हॉसिस झालाय. एक-दोन दिवस जगेल. फार तर चार दिवस. तू जवळचा मित्र आहेस बशीर, म्हणून फक्त तुलाच सांगतो. तो मला म्हणतोय की त्याचा भाऊ गेला की जळून मेल्याचं सर्टिफिकेट दे म्हणून. काल सरकारनं जाहीर केलंय ना, प्रत्येक दंगलग्रस्त मृत माणसापोटी दोन लाखांची नुकसानभरपाई देणार म्हणून. त्याच्या तोंडाला पाणी सुटलंय."

"पण तू तर म्हणालास ना त्याला करतो तुमचं काम म्हणून. खूप अवघड असलं तरी..." चाचानं थोडं चिडीनं विचारलं.

"बशीर, तुला खरं सांगू? तो इथला दादा आहे. राजकारणी बडं धेंड आहे. गाव पातळीवरचं. त्याचं काम करायला लागेल; पण मी अर्धी रक्कम मागणार



आहे, ते करण्यासाठी." झुमुक निर्णय घेतल्याप्रमाणे ठामपणे म्हणाला.

"झुमुक तूसुद्धा..." न राहवून बशीरचाचा ओरडला.

"का नको सांग? मी काय संत आहे? संसारी माणूस आहे. मलाही बायका-पोरं आहे. घर बांधायचंय. तुला माहीत आहे बशीर, झंकनाशी लग्न करायला एक जण तयार आहे आमच्या बिरादरीतला; पण तिचा लंगडेपणा पदरात घ्यायला पाच लाख मागतोय हुंडा म्हणून! आणि का रे बाबा, आपणच नीती, चांगुलपणाचा मक्ता घेतलाय का? अरे आज बघावं तिकडे घोटाळे होताहेत. पाचशेहजार कोटींचे. प्रत्येक जण हात मारतोय. मग आपण का मागे राहायचं? तुला काय वाटतं, ते सगळेच्या सगळे पैसे माझ्या खिशात जाणार आहेत? अरे डॉक्टर शहा आहेत, बाकीचा आमचा स्टाफ आहे. प्रत्येकाला गप्प ठेवायला लागेल; तोंडात पैशाचा मलिदा देऊन. अरे, या बाबूभाईला काहीही कमी नाहीये. पाच-सहा करोडची मालमत्ता आहे, दारूचे गुत्ते आहेत, पेट्रोल पंप आहे. स्मगलिंगही करतो. त्याला कशाला सोडू मी? हां, आता एखाद्या गरिबाचं असं काम असेल नक्की मी कमी पैशात करून देईन..." नको ते भलतंच तोंडातून बाहेर पडल्यासारखा झुमुक तटकन बोलायचा थांबला.

चाचाची मान खाली होती. बऱ्याच वेळानं मान वर करत त्यानं अडखळत झुमुकला ऐकू येईल ना येईल अशा आवाजात विचारलं, "देशील?"

दोघांच्या नजरा एकमेकीत गुंतल्या.

बशीरचाचाच्या नजरेत पुन्हा प्रश्न उमटला, अडखळला, डळमळला, पण मग रेंगाळत, धीट होत ठामपणे उभा राहिला.

झुमुकची नजर दचकली. तिच्यात उत्तर डोकावलं, धडपडत मागे वळलं, पुन्हा सामोरं होत कसंनुसं उभं राहात स्थिरावलं.

दोघांच्या पापण्यांनी त्यांच्या नजरांवर पांघरूण घातलं. बशीरचाचा झटकन उठला आणि चालू लागला.

झपाझपा पावलं टाकत तो छावणीकडे परत निघाला. घरदार, मोठं दुकान, सकिनाची शादी, नादिराची प्रत्येक हौसमौज, मांस-मटण, बिर्याणी-कबाब, कपडेलत्ते सगळं त्याच्या नजरेसमोर तरळत होतं. लहानपणापासून मनात राहिलेल्या सर्व इच्छा तो पुरवून घेणार होता.

रसूलचा विचार अनाहूतपणे त्याच्या मनात डोकावला. पैशाची नुसती खबर आली, की सकिनाकडे बघेनासा झाला ना. "हूं, फार नको घमेंड करूस, माझ्याही

गाठीला पैसे लागणारेत आता बऱ्यापैकी. तुझ्या इतके नसले, तरी... अब्बा इथे असते ना तर तेही... रेहमान मियाँकडे रोज रात्री झोपायला जायचे ते. त्यांचे तर पुरे दो लाख मुझेही मिलते. कितना अच्छा होता अगर..." मनात घुसलेल्या त्या भीषण विचाराचं भान आल्याबरोबर बशीरचाचाच्या पायातलं बळच सरून गेलं. मटकन खाली बसत तो आक्रंदू लागला.

"अब्बा, सबकुछ लूट गया मेरा अभी। तोपर्यंत मी श्रीमंत होतो, आता पुरता कंगाल झालो. अब्बा, शरम गेली हो माझी. शरम गयी तो सबकुछ गया। नाही. मी कुठल्याच लायकीचा उरलो नाही. अब्बा, तुम्हारे अच्छाई के सिक्के सीधे थे, लेकिन जब मेरे मनपे उठे तो उलटे उठे और इस बातका, इस भयानक सच का भी मुझे अभी पता चला। जानवर बन गया बिलकूल। अब्बा, बनानेवाले ने इन्सान भी क्या चीज बनाई है। दुसरोंपे थूक सकता है, लेकिन खुदपे नहीं।"

बशीरचाचाच्या मनातल्या या आकांतानं त्याला जोरजोरात रडू फुटलं नाही, की त्याच्या डोळ्यातून पाण्याच्या धारा गळू लागल्या नाहीत.

शरम गेलेल्या माणसाला कसलं रडू, कसले अश्रू?

●●●





# रोबोताशाची शाळा

सुरेशचंद्र वाघ

"अग ऐकलंस काऽऽ पिंटूचा अभ्यास घेण्याची कटकट नको आता... त्याला रोबोताशा आणून दिला म्हणजे झालं." स्वयंपाकघरात पोह्यांना फोडणी देत असलेल्या सौ. स्मिताला हाक मारीत मी म्हटले.

"अय्याऽऽ कोण हा रोबोताशाऽऽ" स्मिताने चकित होऊन विचारले. "आहे तरी काय हे गौडबंगाल?"

"चक्क बाहुला आहे हा... जपानी यंत्रमानव! नको क्लास, नको शिकवणी, वर्गपाठ, गृहपाठ, तोंडी परीक्षा, चाचणी परीक्षा, सराव परीक्षा, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा... पिंटूची अभ्यासाची सारी तयारी घरच्या घरीच करून घेईल तो." वर्तमानपत्रातली एक लक्षवेधी जाहिरात वाचून दाखवत मी स्मिताला म्हटले.

"खरं की काय?" नवल वाटून स्मिता म्हणाली, "कमालच आहे अगदी; पण का हो... किंमत काय आहे त्याची? केवढ्याचा आहे तो? फार महागडा असणार असला बाहुला."

"जवळपास मारुतीच्या किमतीचा आहे. दोन लाखाच्या घरात. लोकल टॅक्सेस एकस्ट्रॉऽऽ" मी जाहिरातीखालची किंमत पाहून म्हटले.

"बापरे! मग कसचा परवडतोय. एवढे पैसे आणायचे हो कुठून?" इति व्यावहारिक स्मिताचा प्रश्न.

"अग... स्पॉट फायनान्सची सोय आहे. नको उत्पन्नाचा दाखला. सोपी

कागदपत्रं. त्वरित मंजुरी, शिवाय सुलभ हप्त्यावर मिळतोय. मग काय हरकत आहे!'' मी उत्साहात म्हणालो.

''अहो, गृहकर्जाचा हप्ता नुकताच सुरू झालाय. स्कूटीचा हप्ता अजून फिटतोय, पर्सनल लोन... फर्निचर लोनचे हप्ते पुढल्या पगारात सुरू होणार, क्रेडिट कार्डचा वापर खूप झालाय. खर्चाचा ताळमेळ बसवताना किती दमछाक होतेय कळतंय ना.'' सौ. स्मिताचे व्यावहारिक गणित.

''अग, पण त्याच्यापासून फायदेच फायदेच आहेत. पहिलीपासून ते हायर सेकंडरीपर्यंत नि इंजिनिअरिंग, मेडिकल, कॉम्प्युटर सायन्सपर्यंत कुठलीही शिकवणी तो करतो.''

''ते कसं काय? मास्तरकी करण्याआधी कुठल्या शाळेत शिकत होता हा बाहुला?'' स्मिताने विस्मयपूर्वक विचारले.

''छे ग! जपानमध्ये रोबोट कंपनीचा कारखाना आहे हार्डवेअरचा. तिथे यंत्रमानवांची निर्मिती होते. नताशा नावाच्या तिथल्याच कंपनीने या यंत्रमानवाच्या कवटीतलं अत्याधुनिक सॉफ्टवेअर तयार केलंय. दोन्ही कंपन्यांची नावं मिळून त्या यंत्रमानवाचे नाव ठेवलंय रोबोताशा. अशी त्याची जन्मकथा.''

''पण त्याला सारे विषय शिकवायला जमतं कसं.'' इति स्मिता.

''त्याचं असं आहे, त्याच्या कंबरेत तुम्ही फक्त सीडी ढकलायची. इयत्ता पाचवीची शैक्षणिक सीडी टाकली की बस्स! तो पाचवीचं मराठी, गणित, विज्ञान, इतिहास, भूगोल सारं शिकवणार.'' मी खुलासा केला.

''अय्याऽऽ गंमतच आहे. मला पाकशास्त्र शिकवेल का तो?'' स्मिताने हसून विचारले.

''हो ग! योगा पण शिकवील तो. फक्त तुम्हांला जे शिकायचंय ती सीडी बाजारातून आणली की झालं. इंजिनियरिंगची सीडी, मेडिकलची सीडी, बीसीएस व्हायचंय, एमसीएस व्हायचंय, आणा सीडी, सी-डॅक करायचंय.. टाका सीडी.''

''कमालच झाली. पण काय हो,'' स्मिताने एक अवघड प्रश्न टाकला, ''पिंटू आपला द्वाड नि मस्तीखोर. खोड्या किती काढतो माहिती आहे तुम्हांला. त्याचं आणि रोबोताशाचं सूत जमेल का?''

''न जमायला काय झालं, पिंटूचा बंदोबस्त करण्यासाठीच तर हा सारा आटापिटा.'' मी उत्साहात म्हणालो,''मास्तर आला की शिस्त आलीच. शिवाय



आपली पिंटूच्या तावडीतून सुटका होईल ते वेगळंच. तुला माहीत नाही, जपानमध्ये कारखान्यात सुपरव्हिजन करणाऱ्या एका यंत्रमानवाने कामचुकार कामगाराच्या थोबाडीत मारली.'' मी खुलासा केला.

''बापरे! म्हणजे पिंटूला शिकवताना हा रोबोताशा त्याचा कान पिरगळणार की काय, नको ग बाई... त्याने पिंटूचा कान उचकटला तर हो, यंत्रच ते.'' घाबरून स्मिता म्हणाली.

''अग... छडी लागे छम छम... विद्या येई घम घम...'' मी हसून म्हणालो, ''पण घाबरू नकोस. छडी मारायची की नाही किंवा कान पिळायचा की नाही हे आपण यंत्रमानवाला आदेश दिल्याशिवाय ते तो पाळणार नाही.''

पिंटूसाठी अभ्यास शिकवणारा यांत्रिक बाहुला आणायलाच हवा, या माझ्या योजनेवर जोर देण्यामागे खरं गोपनीय कारण काय होतं सांगू का तुम्हांला?

रविवारचा दिवस. सुटीचा... निखळ आनंदाचा. सावकाश उठायचा. स्मिताच्या हातचा गरमागरम लज्जतदार बेड-टी घ्यायचा. मस्त मस्त खायचा-प्यायचा. चुस्त आराम करायचा. वगैरे... वगैरे... वगैरेचा. पण गेले ते दिवस. पिंटूचा जन्म झाला आणि ते मौजमजेचे सप्तरंगी रविवार हळूहळू कृष्णधवल झाले. सारे वार सारखे झाले. सौ. स्मिता हळूहळू पिंटूतच रमायला लागली. त्याचे लाड वाढले. मला बरीचशी विसरली ती. पिंटू रांगायला लागला... ती त्याच्याभोवती पिंगा घालायला लागली. पिंटू दुडदुड चालायला लागला... ती त्याच्यामागे धावायला लागली.

पिंटू वाढत्या वयाबरोबर खोडकर बनला. दंगामस्ती करायला लागला. हळूहळू माझ्या अंगावर उड्या मारायला लागला. बुचकळ्यात टाकणारे प्रश्न विचारून भंडावायला लागला. रविवारची शांतता भंग पावली. झोप उडाली. नको तो रविवार असे झाले. तो शाळेत जायला लागला तसा रविवार माझा नावडता झाला. रविवार म्हणजे मला धडकीच बसायला लागली.

त्याचे कारण अलीकडे मला तो गृहपाठ करताना अवघड गणिते विचारायला लागला. मी गणितात कच्चा हे त्याला कुठल्या तोंडाने सांगायचं! पिंटूची गणिते मेंदूचा भुगाच. काळ-काम-वेगात आगगाडी पूल ओलांडण्याआधीच तो कोसळावा असे मला वाटायचे... महापालिकेने सायंकाळी पाणीपुरवठा बंद ठेवावा म्हणजे टाकीच्या नळाच्या गणितातून माझी सुटका होईल, असे वाटायचे. (अ+ब) चा वर्ग वरच्या मजल्यावर भरतो, असे उत्तर लिहिल्याने मला 'ढ' तुकडीत ढकलण्यात

आले, हे पिंटूला मी कसे सांगायचे.

पिंटूला तत्त्वज्ञान या विषयावर लेक्चर द्यायला मात्र मला आवडायचे. तो माझा स्कोअरिंग सब्जेक्ट होता; पण इथेही कधीकधी माझी फिरकी घेऊन तो माझी दांडी उडवायचा. सौ. स्मितादेखील व्यवहारज्ञानी असल्याचे दाखवत असली तरी भाजीवालीपुढे आणि दूधवाल्यापुढे हिशेब करताना गोंधळ घालायची, हे मी प्रत्यक्ष आय विटनेस पाहिले आहे.

एकूणच पिंट्याच्या गणिताची दोघांनी बरीच धास्ती घेतली होतीच. पिंट्याने गणित विचारले, की लॉन टेनिससारखे आम्ही एकमेकांच्या कोर्टात त्याला ढकलायचो. सबब रोबोताशाला हप्त्यावर विकत आणण्याचा निर्णय आम्ही एकमताने घेतला.

पिंटूला मात्र आपल्याला बाहुला खेळायला मिळणार याचा कोण आनंद झाला म्हणून सांगू. तो शेजारीपाजारी केव्हाच गाजावाजा करून ढोल बडवून आला होता.

टीव्हीवर तर 'आज तक'मध्ये बातमीची चित्रफीतच दाखवली जात होती. 'गणपती बाप्पा मोरया' तसे 'रोबोताशा मोरया' असे म्हणून गुलाल उधळीत, ढोलताशा वाजवीत मिरवणुकीने श्रींची मूर्ती आणावी तसे लोक रोबोताशा या बाहुल्याची मूर्ती कंपनीच्या शोरूममधून वाजतगाजत आणत होते.

'चला, शुभस्य शीघ्रम', मी प्रस्ताव मांडला नि तो स्मिताने पास केला.

रोबोताशाच्या शोरूममध्ये आम्ही शिरलो, तर तेथे पेणच्या गणपती सारखे कितीतरी विविधता असणारे यांत्रिक बाहुले विक्रीकरता मांडले होते. एका बाहुल्याच्या हातात लॉन टेनिसची रॅकेट होती. तर एक बाहुला सचिन तेंडुलकरसारखी बॅट हातात धरून फटका मारण्याच्या आवेशात होता. एकाच्या गळ्यात डॉक्टरसारखा स्टेथस्कोप होता तर दुसऱ्याच्या अंगात वकिलाचा काळा कोट होता. अर्थात हा रोबो एलएलबीचा अभ्यास शिकवणार हे उघडच होते.

पलीकडच्या दालनात काही स्त्री रोबो होत्या. त्यातली एक जण माधुरी दीक्षितसारखी सदाबहार हसरी वाटत होती. काही जणी हवाई सुंदरीसारख्या दिसत होत्या, तर काही जणी मॉडेलिंग करत उभ्या होत्या.

आम्हाला शालेय शिक्षण देणारा मास्तरसारखा दिसणारा बाहुला हवा होता. चौकशी करता सेल्समनने पिंटूला विचारले,''तुला शिकवायला गुरुजी हवेत की बाई चालतील?''



पिंटू म्हणाला,''मला शाळेत सायन्सला माधुरी मॅडम शिकवतात आणि इंग्लिशला ऐश्वर्या मॅडम छान छान शिकवतात.''

एका मॅडम रोबोकडे अंगुलीनिर्देश करून पिंट्या म्हणाला,''पपा ऽऽ त्या सोनाली बेंद्रेसारख्या दिसणाऱ्या मॅडम रोबो आपल्याला घ्या की हो. मला त्याच बाई शिकवायला पाहिजेत.''

मी वेळ न दडवता लागलीच त्याला अनुमोदन दिले.

स्मिताने त्या वेळी असे काही मोठ्ठे डोळे करून पाहिले की दुर्गेचा अवतारच. पिंटूच्या पाठीत धपाटा घालीत म्हणाली,''तुला कशी रे सोनाली बेंद्रे ठाऊक?''

''अग टीव्हीवर निरमाच्या जाहिरातीत नसते का तीऽऽ पाहिली असेल त्याने तिला.'' मी न राहवून म्हटले.

''त्याने पाहिली की तुम्ही पाहिलीत.''

स्मिताचे नाक लालबुंद झाले होते. 'त' म्हणजे 'ताकभात' काय ते समजावे. यानंतर मात्र स्मिताने एकूणच प्रसंगाचा ताबा घेतला आणि बिनपोशाखाचा सरळसरळ अंतराळवीरासारखा दिसणारा, डोक्यावर ॲन्टिना असणारा, स्टीलचे हातपाय असणारा रोबो निवडला.

आम्ही कंपनीच्या कागदपत्रांची पूर्तता केली. माहितीपत्रक, वॉरंटी कार्ड, टूल बॉक्ससह रोबोताशाचे पार्सल ताब्यात घेतले आणि मोठ्या दिमाखात गाजावाजा करीत आमच्या 'गजरा' अपार्टमेंटमध्ये प्रवेश केला.

बाहुल्याचे पार्सल घरी टेकवले नाही तोच शेजारच्या डिम्पलवहिनी, जोशीकाकू, पोंक्षेआजी, पांडूतात्या, काकडे अण्णा यांनी त्याच्याभोवती घेराव केला.

कुणी मुहूर्त काढा म्हटले. कुणी सत्यनारायणाची पूजा घाला म्हटले. औक्षण करून बोरनहाण घालण्याची सूचना आली. रिबन कापून उद्घाटन, स्वागत समारंभ, बुफे पार्टी अशा सजेशन्स आल्या.

हो-नाही करता आम्ही भटजीबुवांकडून मुहूर्त काढला. पाच सुपाऱ्या, पाच बदाम या एकशे एक पंचवस्तूंच्या यादीव्यतिरिक्त भटजींना शाल, उपरणे, आणि धोतरजोडी, शेवटी रु. ५०१/- दान, शिवाय दक्षिणा व येण्याजाण्याचे भाडे देण्याचा कबुलीजबाब झाला.

''भटजीबुवा, अहो लो बजेट पूजा उरकता आली तर बघा.'' मी म्हणालो, ''हा तर चक्क मुंजीचा खर्च झाला.''

"यथासांग... षोडशोपचार रोबोनारायणाची पूजा केली तर त्याला व्हायरस एन्फेक्शन होणार नाही कधी," अनुनासिक स्वरात भटजी म्हणाले.

त्याआधी आम्ही रोबोताशाचे सर्व माहिती पुस्तक (युजर मॅन्युअल) वाचून काढले. ऑन-ऑफ करण्यापासून ते त्याच्या डोक्यावरची, पाठ, पोट, अगदी बेंबीवरची बटणेदेखील कशी व कधी वापरायची ते नीट समजून घेतले. रिमोट कंट्रोलचा अभ्यास केला. एका विषयाचा कंटाळा आला तर चॅनेल्स बदलावेत तसे अभ्यासाचा विषय कसा बदलायचा, फास्ट फॉरवर्ड - रिव्हर्स कसे करायचे इ. शंकाकुशंका यांचे निरसन केले.

दुसऱ्या दिवशी अंगारकी होती. भटजीबुवा सकाळीच उपरणे उडवीत आले. पूजेसाठी सौ. स्मिताने चक्क नऊवारीपासून नाकातल्या नथीपर्यंत साज चढवला. मीही धोतर, पंचा नेसलो. जणू आम्ही पुन्हा एकदा बोहल्यावर चढणार होतो.

शेजारच्या डिम्पलवहिनी देखील नटून आल्या होत्या. जोशीकाकू आणि पोंक्षेआजी पैठणीत आल्या. तर पांडुतात्या आणि काकडे अण्णा नेहमीच्या पेहेरावाशिवाय गांधीटोपी घालून आले.

पत्रं... पुष्पं... फलं... तोयं... असे म्हणत नि अथर्वशीर्षाची आवर्तने करत भटजींनी रोबोताशावर अभिषेक केला. आरती, धुपारती झाली. नारळ फोडला. श्रीगणपतीसह बाहुल्यालादेखील २१ मोदकांचा नैवेद्य दाखवला. हळदी-कुंकू, गुलाल, बुक्का, तीर्थप्रसाद सारे सोपस्कार झाले.

मुहूर्ताची वेळ झाली. पिंट्याने बरोबर ११ वाजून २२ मिनिटे ३३ सेकंदांनी रिमोट कंट्रोलची कळ दाबली. चंद्रावर माणूस उतरला तेव्हा सारे जग जसे श्वास रोखून टीव्हीवरील दृश्य पाहत होते, तसेच रोबोताशाच्या हालचाली पाहायला आम्ही उतावीळ झालो होतो.

बिंगऽऽऽ बिंगऽऽऽ बिंगऽऽऽ असा आवाज करीत रोबोताशा हालचाल करायला लागला. त्याने आपले स्टीलचे पाय हलवले. पालथ्या बादलीसारखे दिसणारे डोके वरखाली केले. कवडीसारखे दिसणारे डोळे गरागरा फिरवले. त्याच्या डोक्यावरचा ॲन्टिना मुंगीच्या सोंडेसारखा थरथरायला लागला.

हाऽऽऽ हाऽऽऽ हाऽऽऽ धबधब्यासारखे हास्य करीत आणि एक पाऊल पुढे टाकून तो म्हणाला, "स्वागतम... सुस्वागतम...नमस्कार.... गुडमॉर्निंग... मी रोबोताशा. मेड इन जपान. पिंटूचा मास्तर."

सारे जण चकित होऊन रोबोताशाकडे पाहत राहिले. त्याने शेकहँडसाठी हात



पुढे करताच पिंटूला ढकलून त्याचे बालमित्र पुढे सरसावले.

पिंकीने विचारले,"तुला बालवाडीतला अभ्यास ठाऊक आहे?"

"होऽऽ" मान डोलावत रोबोताशा म्हणाला,"मला बडबडगीतं येतात. तळ्यात मळ्यात... लहान माझी बाहुली... येरे येरे पावसा... माकडा माकडा हूप; मी गोष्टी सांगतो. उंदराची टोपी... ढुम ढुम ढुमाक... इसापनीती, पंचतंत्र माझं पाठ आहे. मी शुभंकरोती म्हणतो. मला पाढे, मनाचे श्लोक, रामरक्षा गीतेतले अध्याय येतात."

"तुला आरत्या ठाऊक आहेत?" पोंक्षे आजींनी त्याला विचारले.

"आरत्या, भूपाळ्या... अभंग... ओव्या... भजन... कीर्तन... हरिनामाचे पाठ सगळे काही येतं..." रोबोताशा म्हणाला. "दळिता कांडिता, इंद्रायणी काठी, सुखकर्ता दुख:हर्ता ही गणपतीची आरती, घालीन लोटांगण वंदिन चरण... बोला कोणतं भजन म्हणू नि कोणती आरती म्हणू..."

"तुला उखाणे, म्हणी येतात?" डिम्पलवहिनींनी विचारले.

"होऽऽ भोंडल्याची गाणी... पाळणेदेखील येतात."

"रोबोताशा, तुला नाव घेता येतं? घे, बरं ना." स्मिताने त्याला मुद्दाम छेडलं...

"त्यात काय... ऐकाऽऽ" रोबोताशाने नाव घेत म्हटले.

"रिमझिम... रिमझिम
रोबोताशा... बीमबीम
स्मितावहिनी, साहेब आणि...
पिंटूचे नाव घेतो...
आमची आहे ड्रीम टीम
खुलजा सिमसिम..."

साऱ्या जणांनी थक्क होऊन टाळ्या वाजवल्या. शेजाऱ्यांचा चहाचिवडा झाला. प्रत्येक जण कोडकौतुक करीत निघून गेल्यावर आम्ही रोबोताशाचा ताबा घेतला.

"हे बघ, रोबोताशा... उद्यापासून पिंटू तुझ्या ताब्यात. काय? अश्शी तयारी करून घे... अश्शी तयारी करून घे... की तो दर वर्षी वर्गात पहिला यायला हवा," स्मिताने ठासून सांगितलं.

"त्याची काळजीच नको," तो म्हणाला,"पिंटूला पीएच.डी. करीन तरच

नावाचा रोबोताशा.''

''१० वी... १२ वी ला... मेरीटला यायला हवा. एन्ट्रन्सला टॉपला आला पाहिजे... काय?'' मी पण जोर देऊन म्हणालो.

''ते माझ्याकडे लागले.'' रोबोताशाने आश्वासन दिले.

पिंटू आणि रोबोताशा यांना अभ्यासासाठी स्वतंत्र खोली देण्यात आली. रोबोताशाने पिंटूचे अभ्यासाचे वेळापत्रक आखून दिले.

सुरुवातीला त्याने पिंटूला 'ज्ञान हेच बळ', गुरुजींची आज्ञा पाळावी, विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व, या जगामाजी अभ्यास हीच प्रगतीची गुरुकिल्ली, हे सुविचार शिकवले. त्यानंतर काही म्हणी, वाक्प्रचार शिकवले. अभ्यासात व्यत्यय नको म्हणून स्मिताने अभ्यासाच्या खोलीचे दार लोटून ठेवले. अर्थातच दाराला कान लावून ऐकण्याचे व फटीतून पाहण्याचे तिचे कसब वाखाणण्यासारखे होते. तिला भीती ही की न जाणे चुकून रोबोताशाने पिंटूचा कान पिरगळला तर! पण तसे काही घडले नाही.

रोबोताशा आमच्या पिंटूला छान शिकवीत होता. पिंटू मनाचे श्लोक मनापासून म्हणायला लागला. सुसंगती सदा घडो... ही मोरोपंतांची केकावली तो मोरासारखा टाहो काढून ठेक्यात म्हणू लागला. २७,२८,२९ चे अवघड पाढे क्रिकेटच्या कॉमेंट्रीसारखे द्रुत गतीने म्हणताना मी ऐकले. इंग्रजीचे शब्दार्थ फाडफाड सांगणे... नळाचे नि आगगाडीचे गणित चुटकीसरशी सोडवणे, कुठलाही प्रमाद न घडता भूमितीचे प्रमेय सुटणे. व्यत्यय न येता व्यत्यास सुटणे, वाक्प्रचार आणि म्हणी तोंडपाठ असणे... सामोसे चवीने खावेत तसे सहजपणे समास सोडवणे, ज्ञानदेवाच्या भिंतीसारखा व्याकरण चालवण्याचा चमत्कार पिंटूकडून घडू लागल्याने आम्ही सुटकेचा निःश्वास सोडला. सिद्धिविनायकापुढे सव्वाशे ग्रॅम कंदी पेढे ठेवून त्याचे आभार मानले.

पिंटूची नेत्रदीपक प्रगती पाहून स्मिता म्हणाली,''अहोऽऽ पिंटूचे पाय पाळण्यात दिसायला लागलेत.'' आणि ती अधूनमधून त्याची मीठमिरची ओवाळून दृष्ट काढायला लागली. नजर लागू नये म्हणून रोबोताशाच्या गळ्यात ताईत नि दंडाला गंडा बांधला. हळूहळू स्मिताने दाराला कान देणे, पीपहोलमधून पाहणे बंदही केले.

पिंटूला डॉक्टर बनवायचे की इंजिनियर, यावर आमच्या चर्चेच्या फैरी झडू लागल्या. किंवा त्याला कॉम्प्युटर सायन्सला ॲडमिशन घेऊन सी-डॅक करायला



लावायचे आणि मग सिलिकॉन व्हॅलीत युएसएला पाठवायचे अशी भाषा आम्ही करू लागलो. आमच्या वेळी हा रोबोताशा असता तर माझ्यावर अशी कारकून बनायची पाळी आली नसती म्हणून मला हळहळ वाटायला लागली.

तर रोबोताशाने नव्या नवलाईचे दिवस मागे पडले. तो आमच्यात चांगलाच रुळला. अधूनमधून कंपनीचा सर्व्हिस इंजिनिअर यायचा. त्याची तपासणी करायचा. त्याचे पाठीतले, पोटावरचे, डोक्याचे स्क्रू-नट्स नीट पिळून सर्व्हिसिंग करायचा. जाताना आमच्या नव्या शंकांचे निरसन करायचा. पिंटूदेखील इंजिनिअर काकांना अनेक प्रश्न विचारत अपार्टमेंटच्या प्रवेशद्वारापर्यंत हातवारे करत अनेक वेळा जाताना मला दिसला.

एकूण सगळे सारे सुरळीत चालले होते; पण गेल्या काही दिवसांत काही वेगळ्याच घटना घडायला लागल्या. चिन्हे काही वेगळीच वाटत होती.

पिंटूने एक दिवस अभ्यासाच्या खोलीतून बाहेर येऊन गदा मागितली. ''गदा कशाला पाहिजे?'' आम्ही चमकून विचारले. पिंटू भीमासारखी ताठ छाती करून म्हणाला,''इतिहासाचा तास चालू आहे. रोबोताशा मला गदायुद्ध शिकवणार आहे.''

''पिंट्याऽऽ'' मी रागावून म्हटले. ''गदायुद्धात भीमाने दुर्योधनाची मांडी फोडली, तुला डोकं फोडून घ्यायचं का? म्हणे गदायुद्ध शिकतो.''

मी रोबोताशाला याचा खुलासा आणि जाब विचारला. त्यावर तो म्हणाला,''पिंटू खोटं बोलतोय. मला फास्ट फॉरवर्ड करून आणि माझे चॅनेल बदलून त्याने इतिहासाचा तास केव्हाच ड्रॉप केलाय. आता त्याने आदेश दिल्याप्रमाणे खेळाचा तास चालू आहे. गदायुद्ध शिकण्याचा आदेश त्यानेच दिला आहे.''

''पिंट्याऽऽ आम्ही रोबोताशा सेट केला होता. तुला फास्ट फॉरवर्ड करायला नि चॅनेल बदलायला कुणी शिकवलं?'' मी त्याला विचारले.

''इंजिनियर काकांना मी ते विचारून घेतलं.'' पिंट्या म्हणाला.

''आणखीन काय काय विचारलंस तू त्यांना ?'' स्मिता रागानेच बोलली.

''रोबोताशा कुठले कुठले गेम खेळायला शिकवील एवढंच मी विचारलं त्यांना.'' पिंटू म्हणाला.

आम्ही त्यानंतर गप्प बसलो; पण पिंटूने एक दिवस माणसांच्या हाडांचा सापळा मागितला. रोबोताशा त्याला शरीरशास्त्र शिकवणार होता.

"हाडांचा सापळा कशाला हवा? पुस्तकातली आकृती पाहून शिका की सारं," मी म्हणालो.

"शरीरशास्त्राचा अभ्यास झाल्यावर रोबोताशा मला भुतांचा नाच दाखवणार आहे." पिंट्या म्हणाला.

"बापरे!" स्मिता घाबरून म्हणाली,"उद्या हा रसायनशास्त्राच्या तासाला अणूंची रचना शिकवून झाल्यावर अणुभंजन क्रियेचं प्रॅक्टिकल म्हणून अणुबॉंबचा स्फोट करून दाखविल. काय सांगावे!"

एकूण मामला गंभीर होता. सर्व्हिस इंजिनिअर काकांकडून पिंटूने गणित, इंग्रजी, इतिहास हे नावडते विषय ड्रॉप करण्याचं गुपित विचारून घेतलं होते. त्याचे लक्ष खेळण्यावर होते. रोबोताशाला तो खेळात ओढून घ्यायला पाहत होता. म्हणतात ना! ढवळ्याशेजारी बांधला पवळ्या. इथे पिंट्याचे गुण रोबोताशाला लागण्याची चिन्हे दिसत होती.

चित्रकलेच्या तासाला मुक्तहस्त चित्रांच्या नावाखाली चिंटूने जे मॉडर्न आर्ट काढले होते ते अतिमुक्त आणि स्वैर असल्याचे माझ्या निदर्शनास आले. स्मिताने तर कपाळावर हात मारून घेतले. ती म्हणाली, "नको त्या वयात नको ते काढलंय," पिंटूला खुलासा विचारला असता, ते पोपटाचे चित्र असल्याचे म्हणाला.

एकूणच आम्ही धास्तावलो. नाही म्हटले तरी जपानी कारखान्यात तयार झाल्याने रोबोताशावर पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव असणारच. एक दिवस स्मिता अभ्यासाच्या खोलीतून पॉप संगीताचा आवाज आल्याने पीपहोलमधून पहायला लागली. तर पिंटू आणि रोबोताशा दोघेही मायकल जॅक्सनसारखे हिडीस हातवारे करून नाचत होते. आता मात्र ते अतिरेक झाला. मी आत जाऊन रिमोटने रोबोताशा बंद करून टाकला. पिंटूला खडसावून विचारले असता, त्याने रोबोताशाच्या कंठात म्युझिक सिस्टीम असल्याचे आणि कंबरेच्या मणक्यात फॉरिन डान्सचे बटन असल्याचे मला सांगितले. हे बटन पिंटूने ट्रायलने शोधून काढले होते.

मी सर्व्हिस इंजिनियरला ताबडतोब बोलावून घेतले. त्याने रोबोताशाच्या डोक्यावरल्या ॲंटिनाची दिशा बदलून छोटीशी दुरुस्ती केली. "आता हा पूर्ण भारतीय संस्कृतीच्या अमलाखाली राहील." त्याने आश्वासन दिले. आम्हांला थोडासा दिलासा वाटला.

रोबोताशात गुणात्मक बदल झाले होते खरे, तो 'गुडमॉर्निंग' न म्हणता फक्त नमस्कार करायला लागला. हस्तांदोलन करण्याचे त्याने टाळले.



एक दिवस दिवस मी आणि स्मिता बाजारात गेलो होतो. जेव्हा परत आलो तेव्हा जे दृश्य पाहिले त्याने आम्ही थक्कच झालो. पिंटू आणि रोबोताशा दोघेही टेरेसवर पतंग उडवीत होते. पिंटूने मांजाचे रीळ हातात धरले होते. रोबोताशा चक्क रंगात येऊन दुसऱ्याच्या पतंगांना काटशह देत होता. पिंकी, पप्पू आणि बालचमूंची कंपनी 'हुर्यो' म्हणून टाळ्या वाजवीत धिंगाणा करीत होती. आम्ही दोघे धापा टाकीत टेरेसवर गेलो.

"अरे ! काय चाललंय काय रोबोताशा..? अभ्यास टाकून खुश्शाल पतंग उडवताय?" मी रागाने पिंटूच्या हातातले रीळ हिसकावून म्हटले.

"पतंग उडवणे ही चौसष्ट कलांमधली एक महत्त्वाची कला आहे." रोबोताशा शांतपणे म्हणाला,"पूर्वीच्या काळी राजेमहाराजेदेखील पतंग उडवीत असत. भगवान श्रीकृष्णदेखील यमुनेच्या काठी पतंग उडवीत असत. पिंटूला मी प्राणायाम, योगासने, सूर्यनमस्कार, जोरबैठका, कुस्त्यादेखील शिकवणार आहे. त्याला पोहतादेखील आले पाहिजे."

"अग बाई, तू याला पोहायलादेखील शिकवणार?" स्मिता घाबरून माझ्याकडे पाहत म्हणाली,"याने पिंटूला पोहता पोहता पाण्यात सोडून दिला तर काय हो. नको ग बाई!"

आम्ही दोघांना बखोटीला धरून फ्लॅटवर आणले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पुन्हा तेच. पिंटू आणि रोबोताशा खालच्या मैदानात इतर मुलांना घेऊन गोट्या खेळत होते. मी धावतच मैदानात गेलो.

"पिंट्याऽऽ अरे गोट्या खेळतोस," त्याच्या मी कानफाटातच लगावली. पिंट्या रडत रडतच म्हणाला, "रोबोताशानंच आम्हाला गोट्या खेळू या का म्हणून विचारले."

मी रोबोताशाकडे पाहिले. तो गोट्या खेळण्यात दंग होता. त्याला नावाने हाक मारली पण त्याने ओळखदेखील दिली नाही.

त्याच्या बखोटीला धरले तर त्याने हिसडा मारला अन् मला विचारले, "कोण तुम्ही? मला का खेळू देत नाही? मी गोट्या खेळणार... विटीदांडू खेळणार... वाट्टेल ते खेळणार. मला का अडवता?"

रोबोताशाला भ्रम झाला होता असाच मी तर्क केला. त्याच्या डोक्याला टप्पू मारला की आणीबाणीत तो बंद करता येतो हे मी वाचले होते. चटकन मी त्याला टप्पू लगावला आणि तो खरंच पुतळ्यासारखा स्तब्ध झाला. त्याला घरी आणून

कोपऱ्यात उभे केले.

स्मिता म्हणाली, ''माझ्या लेकाला गोट्या खेळायला लावायचे नाही मला. आला तसा रोबोताशाची परत पाठवणी करा.''

दुसऱ्या दिवशी मी सर्व्हिस इंजिनियरला घरी बोलावून घेतले. रोबोताशाला कॉटवर उलथेपालथे करून त्याने त्याची संपूर्ण प्रकृती तपासली. त्याचे पाठीवरचे सर्किट तपासले; पण प्राथमिक तपासणीत त्याच्या दुखण्याचे कोणतेच निदान होईना.

''मामला गंभीर आहे. रोबोताशाला यंत्रशाळेत ॲडमिट करून घ्यावे लागेल.'' इंजिनियर चिंतायुक्त चेहेरा करून म्हणाला.

रोबोताशा आला तसा गेला. मी आणि स्मिताने सुटकेचा निःश्वास टाकला असला तरी पिंटूचा चेहरा रडवेला झाला होता. रोबोताशाचा लळा लागला होता ना त्याला. एकसारखा आठवण काढत होता त्याची बिचारा. रोबोताशा परत कधी येणार म्हणून तो वारंवार विचारीत होता. पिंटूचे मित्रदेखील राहून राहून रोबोताशाची चौकशी करीत होते.

चार दिवसांनी वर्तमानपत्रात खालील बातमी आली -

रोबोताशा कंपनीचे विक्री झालेले सर्व यंत्रमानव बाहुले (वैज्ञानिक खेळणी) पतंग, गोट्या आणि विटीदांडू खेळू लागल्याने यंत्रशाळेत दुरुस्तीसाठी रवाना. असे समजते, की खोड्या काढणाऱ्या मुलांकडून त्यांना व्हायरल इन्फेक्शन झाल्याने आजारी पडून बहुतेक जण इंटेन्सिव्ह केअर युनिट म्हणजे आयसीयूध्ये ॲडमिट.

दुसऱ्या दिवशी पिंटूला मी शाळेत जायला लावले. रविवारी नेहमीप्रमाणे पिंटू माझ्याकडे धावत आला नि म्हणाला,''पपाऽऽ रँग्लर म्हणजे कोण हो? तुम्ही रँग्लर का नाही झालात.''

मी मनातल्या मनात राग दाबून म्हणालो,''रँग्लर म्हणजे गणितातला गॅम्बलर.''

●●●





# झेन

**डॉ. एन. सी. एडल**

भास्कररावांनी पुस्तक बंद केलं, आपले डोळे मिटून घेतले आणि विचारात बुडाले. खरंच, 'Impartial Awareness!' आनंदात जगण्याचा एकमेव मार्ग. 'निःपक्षपाती जागृतावस्था!' झेन पंथाची एक महत्त्वाची शिकवण! त्यांना हे शब्द फारच आवडले आणि 'Impartial Awareness!' च्या छोट्या-छोट्या लाटा त्यांच्या ओठांवर राहून-राहून उमटू लागल्या.

बौद्ध धर्म आणि 'ताओ', यांच्या मिश्रणातून फुललेली एक जीवनशैली म्हणजेच 'झेन!' किती निर्मळ, किती पवित्र हा संगम! आणि लोक हे प्रयाग ते प्रयाग करत कुठे-कुठे धडपडतात! जेव्हा एक दूषित नदी दुसऱ्या दूषित नदीला भिडते, तेव्हा लोकांना कसला आनंद होतो कोण जाणे? एका 'डब्बल' दूषित नदीत स्नान करण्याचा? भास्करराव किंचित हसले. 'मोक्ष मिळवणं एवढं सोपं नव्हे; पण या लोकांचा काय दोष? अज्ञानी बिचारे!' भास्कररावांना त्या सर्व 'अनएनलाईटन्ड' लोकांची कीव आली. सांगायला लाज वाटे; पण त्यांचा ठाम विश्वास होता, की ते स्वतः एक साक्षात्कार झालेली 'एनलाईटन्ड' व्यक्ती होते आणि त्याचं कारण हे पुस्तक.

त्या एनलाईटन्ड माणसाने पुस्तकावर प्रेमाने हात फिरवला आणि ते पुन्हा वाचू लागले. 'The grass grows by itself....' हे वाचून भास्करराव एकदम हर्षित झाले. वाह! क्या बात है! गवत आपोआप वाढतं. किती महत्त्वाची गोष्ट.

त्यांना हे माहीत असूनसुद्धा माहीत नव्हतं. ते परत विचारात बुडाले. घराच्या मागे गवत चांगलंच वाढलं होतं, म्हणजे जरा जास्तच. आता ही गोष्ट चांगली की वाईट? ते जरा गोंधळले; पण लगेच त्यांनी निःपक्षपाती जागृतावस्थेची आठवण करून स्वतःला सावरलं.

गवत कितीही वाढू द्या, आपल्याला काय? पक्षपात करू नये, बस! काही दिवसांपासून मात्र गवत काढण्याबाबत त्यांच्या बायकोची कुरकूर चालूच होती; पण बायकांचं काय? बायका कधी एनलाईटन्ड झाल्यात का? भास्करराव परत थोडे हसले आणि पानं उलटली.

'Small Pleasures...' सत्य आहे. अतिसत्य. छोट्या-छोट्या गोष्टींतच जगण्याची खरी मजा असते. जेव्हा भास्कररावांना हे उमजलं तेव्हा त्यांना आनंद झाला. प्रत्येक दिवस सुख, शांती आणि समृद्धीनं जाऊ लागला. आजचा रविवार पण तसाच जाणार होता... छोट्या-छोट्या गोष्टींचं सुख उपभोगत.

दर रविवारी लाँड्रीतून कपडे आणण्याचं काम भास्करराव करीत. या कामातून आनंद कसा मिळवायचा, हे फक्त त्यांनाच माहीत होतं. इतरांना ते जमलं नसतं, त्यांच्या बायकोला तर अजिबात नाही. दोनदा तिने प्रयत्न केला होता; पण दोन्ही वेळा पोलीस चौकीवरून जप्त केलेली स्कूटर भास्कररावांना सोडवावी लागली. त्यानंतर भास्कररावांनीच स्कूटरची किल्ली जप्त केली आणि लाँड्रीचं काम आपल्याकडे घेतलं. दोन-एक किलोमीटरच्या अंतरासाठी कशाला पाहिजे वाहन?

आपली जांभळी सुती पिशवी खांद्यावर लटकवून ते चालत जात. कोपऱ्यावरच्या दुकानातून एक आइस्क्रीम कोन विकत घेत आणि त्यातल्या प्रत्येक पदार्थाचा विचार करत झेन पद्धतीने खात. चालता-चालता आइस्क्रीम आपल्या जिभेने कोनमध्ये ढकलत राहत आणि शेवटचा तुकडा तोंडात टाकण्याआधी, निरखून पाहत चिंतन करीत...

''लाँड्रीतून साडी आणायचं विसरू नका,'' बायको स्वयंपाकघरातून ओरडली.

भास्करराव दचकून जागे झाले. काय ही बाई! विनाकारण ओरडायचं. लाँड्रीत जाणं ते कधी विसरले होते का?

''आणि ती एकदाची सुखरूप आणा! आज संध्याकाळी पार्टीला नेसायची आहे. मागल्या वेळी चिखलात घसरून पडलात आणि माझी पांढरी साडी



चॉकलेटी झाली.''

''अग, एकदा पडलो काय आणि...''

''एकदा? त्या आधी साडीवर कसलेतरी घाणेरडे लाल-लाल डाग.''

''पण मी थोडंच पान खातोय? कुठल्यातरी हरामखोरांनी बसमधून पिचकारी मारली तर माझा काय दोष?''

''तुम्ही जरा हुशारीने काम करू शकत नाही का?'' भास्कररावांच्या पुढे कांदे-पोहे आणि चहाचा कप ठेवत त्यांची बायको म्हणाली,''आज तरी काही गडबड करू नका. हात जोडते.''

स्कूटरचा विषय न काढता, राग न धरता, त्या एनलाईटन्ड व्यक्तीने नाशिकचा कांदा बाजार, कोकणातली भाताची शेती आणि सागरातल्या मिठाचा विचार करत शांतपणे नाश्ता केला, तोंड-हात धुतले आणि आपली जांभळी पिशवी घेऊन बाहेर पडले.

*****

'Lukki Liks' येताच ते आत शिरले. काऊंटरवर बसलेल्या मुलीनं त्यांना ओळखलं. रविवारचं नेहमीचं गिऱ्हाईक.

''गुड मॉर्निंग सर!'' ती म्हणाली.

''गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग!'' मेजर जनरलच्या स्वरात भास्करराव बोलले.

''आज काय घेणार सर?''

खरं तिर तिला माहीत होतं, की 'सर' 'Nuttie Delite' घेणार. दहा रुपयाला एक कोन. भास्कररावांना हे आइस्क्रीम आवडायचं आणि त्याच्या सहवासात सुरक्षित वाटायचं. समजा दुसरं एखादं आइस्क्रीम 'ट्राय' केलं आणि ते पसंत पडलं नाही तर? दिवस गेला ना वाया! भास्कररावांनी मेनूकार्ड वाचलं, काचेतून फ्रीझरमधली भांडी पाहिली, थोडा विचार केला आणि म्हणाले, ''एक नटी डिलाइट प्लीज''

''नाही सर!'' ती पोरगी बोलली,''आज नटी डिलाईट नाही!''

''का?'' भास्कररावांनी खिन्न स्वरात विचारलं,''संपलं?''

''भरपूर आहे सर; पण आज एक नवीन फ्लेवर आला आहे. सुप्रीम डिलाईट!''

''नको, नको,'' भास्करराव म्हणाले,''एक नटी डिलाईट, प्लीज.''

"पण सर, एकदा ट्राय तरी करून बघा! सुप्रीम डिलाईट एकदम खास आहे!"

बोर्डावर लिहिलेलं **'Supreem Delite'** वाचत भास्करराव हसले. "तुम्ही हे स्पेलिंग कुठनं शोधून काढता?"

"म्हणजे काय? सर, तो आमचा ट्रेड मार्क आहे."

"आहे हे खरं." भास्करराव परत हसले, "पण माझी मुलगी-तिला परवा क्वालिटीचं स्पेलिंग विचारलं तर तिनं काय उत्तर दिलं, माहीत आहे?"

"काय सर?"

**"K-W-A-L-I-T-Y"** भास्करराव बोलले.

कपाळाला आठ्या घालून त्या मुलीनं काही क्षण विचार केला आणि बोलली,"पण ते ठीक आहे ना, सर?"

भास्कररावांनी दीर्घ श्वास सोडला. जाऊ द्या!... पण नटी का सुप्रीम ? नटीच बरं नेहमीचं आपलं... पण सुप्रीम  दिसतंय मात्र खास, काय करावं? दिवसाची अशी संदिग्ध सुरुवात... त्यांना अस्वस्थ वाटू लागलं. मग एकदम त्यांना आठवलं-निःपक्षपाती जागृतावस्था!

"तुला पाहिजे ते दे!" भास्कररावांनी त्या मुलीला थाटात सांगितलं; पण दुसऱ्याच क्षणी त्यांना सुप्रीम  डिलाईट ट्राय करण्याची तीव्र इच्छा झाली.

त्या मुलीने सुप्रीम  डिलाईटच्या भांड्यात हात घातला आणि भास्कररावांच्या चेहऱ्यांवर स्मितरेषा उमटली. जोपर्यंत त्यांचा आणि त्या मुलीचा पक्ष एकच होता तोपर्यंत निःपक्षपाती राहण्यात काही अडचण नव्हती.

आइस्क्रीम घेऊन भास्करराव बाहेर पडले. गुलाबी कोनवर एक चांगला मोठा केशरी गोळा आणि त्यातून बाहेर डोकावणारे काजू-पिस्ता-बदाम. प्रत्येक गोष्टीचं चिंतन करत त्यांनी खाण्याची सुरुवात केली. दूध जिभेला लागताच त्यांना आपल्या खेड्यातल्या दोन-चार गायी दिसल्या. केशराचा स्वाद येताच त्यांच्या डोळ्यांपुढे काश्मीर उमटलं आणि साखरेच्या चवीनं दादा कोंडके आणि उषा चव्हाण उसाच्या मळ्यात नाचू लागले.

आइस्क्रीमचा आनंद लुटत ते चालत राहिले. किती मजा असते या छोट्या-छोट्या गोष्टींत आणि आता झेनचा तो अत्युत्तम क्षण आला होता. कोनचा शेवटचा कण आपल्या बोटात फिरवत चिंतन करण्याचा आणि मग....

अचानक त्यांच्या मनगटावर एक काळा इवलासा हात पडला.



"मला द्या ना ते!"

भास्करराव एकदम दचकले. आपली तंद्री भंग करणाऱ्या प्राण्याकडे त्यांनी आश्चर्यानं पाहिलं. एक आठ-नऊ वर्षांचा काळाभोर पोरगा, पिंजारलेले केस, अंगावर एक गुडघ्यापर्यंत लोंबणारा फाटका शर्ट, माखलेले पाय आणि खोलवर गेलेले काळे डोळे. ओठांवर जीभ फिरवत तो पुन्हा म्हणाला,"मला द्या ना ते!"

भास्करराव डोळे फाडून बघत राहिले. "चल हट!" ते खेकसले.

"द्या की! किती थोडं राहिलं आहे." ओठांनी चपक-चपक आवाज काढत तो बोलला.

हे काय विलक्षण! थोडंच राहिलं होतं हे खरं, पण ते थोडं झेनच्या अगदी टोकावर विराजलेलं. त्याची आहुती देणं अशक्यच.

"चल नीघ इथून," ते ओरडले.

पण तो खवीस मुलगा आपला हट्ट सोडेना. "असं काय करता? द्या की! राहिलेलं द्या ना. किती खाता तुम्ही?"

"किती खातोय म्हणजे," भास्करराव कडाडले. "तुझ्या बापाचं थोडंच खाल्लंय मी."

"माझ्या बापाचं तर मी बी खात नाही. नसतंच त्याच्याकडं."

"तू जातोस का पोलिसाला बोलवू?"

"पोलीस? एवढ्यासाठी पोलीस?"

भास्करराव एकदम गोरेमोरे झाले. त्यांनी एक लांब श्वास घेतला आणि शांतपणे म्हणाले,"हे बघ, मी हे तुला अजिबात देणार नाही. समजलं? फेकून देईन पण तुला देणार नाही."

"फेका बघू!" त्या आचरट पोरानं आव्हान दिलं.

रागारागाने भास्कररावांनी आइस्क्रीम फुटपाथवर फेकलं. पटदिशी त्या पोरानं ते उचललं. भास्कररावांना हे अपेक्षित नव्हतं. त्यांना वाटलं, जणू आपला प्रतिस्पर्धी आपल्याला फसवून स्पर्धा जिंकतोय. त्याचा पाठलाग करून तो कोन त्यांनी त्याच्या हातातून हिसकावून घेतला. खाली फेकला आणि आपल्या बुटाने चिरडला.

"खा आता." कापऱ्या स्वरात, धापा टाकीत ते म्हणाले.

ओठांवर जीभ फिरवत, चपक चपक करत त्या पोरानं आपल्या खोल

डोळ्यांनी त्या चुराड्याकडे काही क्षण पाहिलं. मग वाकून आपली तर्जनी त्यावर दोन-एकदा फिरवली आणि शर्टावर पुसली. रडक्या चेहऱ्यानं त्यानं भास्कररावांकडे पाहिलं न पाहिलं आणि एका बोळात पळाला.

पाय आपटत भास्कररावांनी लाँड्रीत प्रवेश केला, कपडे आपल्या पिशवीत कोंबले आणि बाहेर पडले. तेव्हा एक कुत्रा ते अवशेष चाटत होता. भास्कररावांना वाटलं, की आपण असं वागायला नको होतं. त्या गरीब पोराचा चेहरा त्यांच्या डोळ्यांपुढे उमटला आणि त्यांना त्याची अतिशय दया आली. आपण स्वतःला एनलाईटन्ड समजतो आणि एका वेड्यापिशासारखा वागतो? आपण खरंच एनलाईटन्ड आहोत का? आपण तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर, किती चिंतन केलं आहे, किती पुस्तकं वाचली... मग आपल्या हातून असं का घडत राहतं? आता जे झालं ते झालं; पण त्याचं प्रायश्चित्त तरी घ्यायला हवं....

त्यांनी त्या पोराला एक अख्खं आइस्क्रीम देण्याचं ठरवलं आणि दुकानात जाऊन एका सुप्रीम डिलाईटची मागणी केली. हे ऐकून त्या पोरीला अतिशय 'डिलाईट' वाटलं असावं. कारण तिनं एक किंकाळीच मारली.

"अजून एक! मी सांगत होते ना सर, तुम्हाला आवडणार हा फ्लेवर! बघा, तासाच्या आत परत!"

एका हावऱ्या मुलाकडे बघावं तसं दोनचार लोकांनी त्यांच्याकडे वळून पाहिलं. ते एकदम ओशाळून गेले आणि इकडेतिकडे न बघता आइस्क्रीम घेऊन पटकन बाहेर पडले. मुलाला शोधत ते चौकात आले आणि डोकावून बोळात पाहिलं. पण तिथे कोणी नव्हतं.

"ए पोरा! ए पोरा!" दोनएक हाका त्यांनी मारल्या. रस्त्यावर फेऱ्या मारल्या, बोळात जाऊन आले; पण तो मुलगा काही दिसेना. आइस्क्रीम वितळायला लागलं होतं. त्यांचा हात चिकट होऊ लागला होता. कोन दुसऱ्या हातात सरकवून त्यांनी आपला माखलेला हात रुमालाने कसाबसा पुसला. परत हाका मारल्या, पण तो मुलगा कुठेही दिसेना. काय करावं? त्यांनी आइस्क्रीमकडे पाहिलं आणि हे काय!

आइस्क्रीमचा गोळा गुल! त्यांच्या हातात होता फक्त एक रिकामा कोन. त्यांनी खाली पाहिलं; पण फुटपाथ एकदम कोरडा. मागे-पुढे, डावीकडे, उजवीकडे ते बघतच राहिले; पण तो आइस्क्रीमचा गोळा कुठेही दिसेना. काय झालं बरं? त्यांना काही सुचेना आणि मग अचानक ते हसू लागले. तो चावट



पोरगा, डांबरट कुणीकडचा, जेव्हा ते आपला हात पुसत होते तेव्हा पटकन त्याने तो आइस्क्रीमचा गोळा हडप केला असावा. नाहीतर काय आइस्क्रीम आकाशात उडालं? भास्करराव हसत राहिले. आइस्क्रीमचा चुराडा बघून त्याचा रडका चेहरा त्यांनी पाहिला होता. आइस्क्रीम खात असलेला त्याचा हसरा चेहरा बघायला ते व्याकूळ होते; पण शेवटी त्यांना जे हवं होतं ते एका तऱ्हेनं झालं आणि त्याचं त्यांना थोडंफार समाधान वाटलं.

ते घराकडे वळले. झेनमुळे बिघडलेला दिवस ते वाचवू शकले. आपल्या बुद्धीचा, आपल्या ज्ञानाचा त्यांना थोडा अभिमान वाटला; पण काहीतरी चुकल्यासारखं त्यांना जाणवत राहिलं. त्यांच्या काळजातली एक रिक्त जागा कशाच्या तरी अभावानं थोडी पीडित होती. त्यांनी स्वतःला विचारलं, "तू खूष आहेस?" आणि उत्तर आलं, "होय." मग त्यांनी विचारलं, "तू सुखी आहेस का?" आणि ते उत्तर शोधू लागले.

आता घर दिसू लागलं होतं आणि बायको बाल्कनीत उभी होती. त्यांच्या ओठावर स्मितरेषा फुलली. साडी सुखरूप आणली होती एकदाची. काही काळापासून मांडीला जरा ओलसर वाटत होतं; पण ते आपल्या विचारात मग्न होते. आता मात्र त्यांनी पँटला हात लावला, पिशवी चाचपून पाहिली आणि थबकले. डोळे बारीक करून त्यांनी पिशवीत हात घातला, कपडे तपासले, हात बाहेर काढला आणि डोळे विस्फारून त्या माखलेल्या हाताकडे बघतच राहिले. त्यांच्या बोटावरनं केशरी दूध गळत होतं. त्यांचं मन एकदम स्तब्ध झालं. एनलाईटनमेंटच्या पलीकडे म्हणजे 'बियाँड एनलाईटनमेंट'ला जाण्यासाठी हा अप्रतिम क्षण होता; पण दुर्दैवानं असं काही घडलं नाही. त्या खवीस पोराच्या आईच्या आठवणी काढणारे, एका साक्षात्कार झालेल्या माणसाला बिलकूल न शोभणारे पाच-सहा शब्द आवेगानं भास्कररावांच्या तोंडातून बाहेर पडले. ते मागे फिरले आणि दात-ओठ खात लाँड्रीच्या दिशेनं झपाझप चालू लागले.

*****

डब्बल चार्ज भरून 'अर्जंट ड्रायक्लिनिंग'ला कपडे टाकले आणि दोन तास घालवण्याचा मार्ग शोधू लागले. एका झेन शिष्याला दोन तास चिंतन करण्यास काही हरकत नव्हती; पण भास्कररावांच्या दुःखी मनात विचारांची गर्दी झाली होती.

असा का वागतो मी वारंवार? एका साक्षात्कार झालेल्या माणसाच्या

तोंडात अशा शिव्या? छे छे! किती वर्षं मी विद्यार्थ्यांना तत्त्वज्ञान शिकवलं, भाषणं दिली, ऐकवली. हजारएक पुस्तकं, धार्मिक ग्रंथ वाचले. अजून कुठल्या ज्ञानापासून मी वंचित आहे? ती कुठली चीज आहे ज्याच्या अभावामुळे मी असा वागतो? अधूनमधून थोडं सुख आपण मिळवतो. पण तो अमर्याद आनंद कुठे शोधावा? त्यांना असं वाटू लागलं जणू सर्व पुस्तकं, सर्व धर्मांनी त्यांना त्या साक्षात्कारी नदीकाठी आणून सोडलं होतं; पण त्या पाण्याचा स्पर्श मात्र करून दिला नव्हता आणि त्या नदीपलीकडच्या खजिन्याच्या कल्पनेचा त्यांना सुगावा पण नव्हता.

आपल्याकडे कुणीतरी बघत आहे, असा भास झाल्यावर त्यांनी मान वळवली. पटकन एक सावली बोळात शिरली. त्यांनी त्याचा पाठलाग केला आणि एका पोराचा हात धरला.

"सोडा मला, मी काय न्हाई केलं." नाचत ओरडत तो बोलला.

"अरे ऐक जरा, चल मी तुला एक अख्खं आइस्क्रीम देतो. चल."

"नको मला."

"अरे चल. खरं सांगतो." भास्करराव प्रेमानं बोलले.

थोडा डळमळत तो त्यांच्या मागेमागे आला.

"मी पोलिसाला नाही भीत." तो मुलगा अचानक बोलला. "तुम्ही किती बी मारा, मी न्हाई रडत."

"अरे वेड्या, तू चल, मी तुला एक चांगला मोठा आइस्क्रीम कोन देणार आहे."

हलक्या पावलांनी भास्करराव दुकानात शिरले.

"काय सर, परत अजून एक?" त्या मुलीचा विश्वास बसेना.

"होय." भास्करराव खणखणीत आवाजात बोलले.

"दोन तासांत तिसरं आइस्क्रीम?"

परत लोकांनी फिरून त्यांच्याकडे पाहिलं; पण या वेळी न लाजता त्यांनी सर्वांकडे हसत हसत पाहिलं.

बाहेरच्या कठड्यावर त्यांनी त्या पोराला बसवलं, स्वतः बसले आणि आइस्क्रीमचा कोन त्याच्या हातात दिला.

"खा!"

ते पोर काही वेळ आइस्क्रीमकडे नुसतं बघत राहिलं. मग अलगद त्याला



आपली जीभ लावली आणि भास्कररावांकडे बघून आपले पांढरे शुभ्र दात दाखवत हसलं.

"खा, खा! कसं आहे?"

"मस्त!" तो बोलला आणि मग गपागप खाऊ लागला. त्याच्या नाकाखाली आइस्क्रीमच्या मिशा उमटल्या. मग अचानक त्यांच्याकडे बघून तो बोलला, "साहेब, तुम्ही लई चांगले आहात."

भास्करराव जरा गहिवरले. त्याच्या डोक्यावरून हात फिरवावा, त्याला जवळ घ्यावं, असं त्यांना वाटू लागलं. पण... पण काय? एवढा संकोच कशाला? काय होणार होतं? आणि मग ते त्याचे विस्कटलेले केस नीट करू लागले.

"साहेब, तुम्ही लई चांगले आहात." ते पोर परत बोललं. भास्कररावांनी त्याची पाठ थोपटली.

"गोड आहेस. खरंच गोड आहेस तू." ते बोलले.

"मी गोड आहे?" त्या मुलानं विचारलं, "तुम्हाला मी आवडतो?"

"फारच!" भास्करराव हसत हसत बोलले. "फारच!"

आइस्क्रीम संपवून ते पोर मान खाली करून काही वेळ गुपचूप बसून राहिलं. भास्कररावांनी वाकून पाहिलं तर त्या कधी न रडणाऱ्या मुलाचे डोळे भरून आले होते. भास्कररावांनी त्याला जवळ घेतलं. त्यांना पण बरं वाटलं. कदाचित त्यांच्या काळजातली ती रिक्त जागा प्रेमासाठीच बेचैन होती.

असं दाटीवाटीनं बसण्यात त्यांना एक तऱ्हेचा आनंद वाटू लागला. जो त्यांनी कधी अनुभवला नव्हता; पण त्याबरोबर एक अनाकलनीय भीतीसुद्धा. त्या नदीचा स्पर्श झाल्यासारखं त्यांना वाटलं. तिचा तीव्र प्रवाह त्यांच्या पायावरून खळखळ करत वाहू लागला. आत ओढू लागला. ते थरथर कापू लागले आणि त्या पोराला सोडून एक पाऊल मागे टाकायचं बघू लागले; पण त्या पोरानं त्यांचा हात धरला आणि आपल्या खिशातून दोन-चार शेंगा काढून बोलला, "घ्या." आपल्या चिमुकल्या हातांनी त्याने शेंगा फोडल्या आणि हसत हसत पाच-सहा दाणे त्यांच्यापुढे केले.

भास्कररावांच्या अंतःकरणात खळबळ उडाली. आता पाणी त्यांच्या कमरेपर्यंत आलं होतं. त्यांनी त्याचा प्रसाद स्वीकारला. या वेळी त्यांना ना भुईमुगाचं शेत दिसलं ना तेलाच्या गिरण्या. त्यांना दिसलं ते फक्त आपल्याविषयी एका गरिबाचं निर्मळ प्रेम आणि जगाच्या सर्व पीडित माणसांप्रती आपल्या मनाला

विव्हळ करणारी करुणा.

ते नदीत बुडाले. हात-पाय मारत एक-दोनदा वरती आले. पलीकडचा काठ गाठला; पण तो मृदू प्रेमाचा तीर त्यांचा भार पेलू शकत नव्हता. ते पुन्हा पुन्हा बुडाले, गुदमरले, गोंधळले. ज्या ज्ञानानं, धर्मानं, ग्रंथानं त्यांना ही नदी दाखवली होती तेच आता पैलतीर गाठण्यात अडथळा बनले होते. त्यांनी ते सर्व भयंकर फेकून देण्याची सुरुवात केली, मोकळे झाले, निर्मळ झाले आणि आपसूक त्या प्रेमसागरात मजेत तरंगू लागले. जो अमर्याद आनंद ते शोधत होते तो शेवटी त्यांनी अनुभवला आणि मग नकळत भास्करराव पलीकडच्या काठावर पोहोचले.

●●●





# इल्राटा एडियन घाली

पुरुषोत्तम रामदासी

ममाची हाक ऐकून इल्राटानं मान वळवली. लाकडी जिन्यावर पावलं वाजली. ममा इल्राटाच्या रूममध्ये आली. इल्राटानं काहीही प्रतिसाद न देता तिच्याकडं पाहिलं.

“उफ्… इल्राटा… तू पुन्हा इथं बसलीस… खिडकीत!… कितीदा सांगितल… इथं बसू नकोस…’

इल्राटानं तिच्याजवळ आलेल्या ममाकडं रोखून पाहिलं आणि शांतपणे विचारलं,“मी काय करू ते तुम्हीच सांगा…”

ममाच्या चेहेऱ्यावर त्या प्रश्नानं अगतिक भाव आले.

“तुम्हाला माहितेय… स्कूल बंद पडलंय… आणि तुम्ही मला खेळायला बाहेरही सोडत नाही…”

इल्राटाचं वाक्य ऐकून ममा अधिकच अस्वस्थ झाली. ती म्हणाली,

“तुला ठाऊक आहे…. बाहेर जाणं किती धोकादायक आहे… लहान नाहीस तू… तेरावं वर्ष पूर्ण झालं ना… इल्राटा… काय दोष होता नॅन्सीचा… कोवळी पोर बिचारी… घरातून उडून बाहेर गेलेला चेंडू आणायला गेली आणि त्या दुष्टांनी…”

ममा त्या आठवणीनं शहारली. दोन घरं सोडून पलीकडं राहणारी, इल्राटाच्याच वयाची नॅन्सी, बार्डी अतिरेक्यांच्या गोळीची शिकार झाली होती. तिची आई टाहो

फोडून बेशुद्ध पडली होती.

"तुम्हाला भीती वाटते ना... की मी बाहेर गेले तर मलाही रक्तानं अंघोळ घालतील ते लोक..."

इलाटानं हे वाक्य उच्चारलं मात्र... ममा पुढं आली आणि तिनं इलाटाच्या ओठांवर हात ठेवला. तिला जवळ घेत कापऱ्या आवाजात ममा म्हणाली,

"असं बोलू नकोस... रक्ताची अंघोळ... उफ्..."

इलाटा हसली.

"तुम्हाला रक्त या शब्दाची एवढी भीती वाटते? अवतीभोवती रक्ताचे सडे पडत असूनही?"

"प्लीज इलाटा... फॉर गॉड्स सेक... ही खिडकी बंद करून घे..."

"म्हणजे माझा एकुलता एक विरंगुळा बंद करू म्हणता?... मी इथं बसते ना... रक्ताची होळी पाहत...! तुम्ही मला सांगता का? वंश म्हणजे काय?"

"हे काय विचारतेस इलाटा?"

"मी रेडिओवर बातम्या ऐकते ना... आपल्या देशात वांशिक संघर्ष पेटलाय... बार्डी आणि सुर्जी वंशाचे लोक आपल्या अस्तित्वासाठी, स्वातंत्र्यासाठी वांशिक लढाई करीत आहेत... सांगा ना... वंश म्हणजे काय?"

आपली अस्वस्थता लपवीत ममा म्हणाली,

"कशाला असे प्रश्न विचारतेस- ज्या प्रश्नांची उत्तरं मी देऊ शकत नाही."

"तुम्ही चुकीचं उत्तर दिलंत तरी चालेल मला... मला कळू तरी दे, की वंश म्हणजे असं काय आहे की ज्यासाठी तुम्ही मोठी माणसं एकमेकांना ठार मारत आहात... सांगा ना..." इलाटानं आग्रही आवाजात म्हटलं.

तेवढ्यात बाहेर मशिनगननं बेछूट फैर झाडल्याचा आवाज आला. इलाटानं खिडकीतून बाहेर पाहिलं. रस्त्याच्या वळणावर झाडाखाली तीन माणसं कोसळताना तिला दिसली. तिघांच्या शरीरातून भळभळणाऱ्या रक्ताचा एक मोठा ओघळ काळ्या डांबरी सडकेवर एखाद्या लालभडक सापासारखा पुढं सरकला. इलाटानं वळून ममाकडं पाहिलं. तिनं डोळे मिटले होते. मिटलेल्या पापण्यांमधून अश्रू ओघळले. इलाटानं आपल्या पुढे टेबलावर ठेवलेली डायरी उघडली. ती पेन उचलणार तेवढ्यात ममानं खांद्यावर हात ठेवत विचारलं,

"इलाटा... कशासाठी विचारतेस असे प्रश्न?"

इलाटा म्हणाली,



"तुम्हाला ठाऊक आहे... मी डायरी लिहिते,"

"हे वय डायरी लिहिण्याचं नाही पोरी..."

"मला माहीत आहे. हे वय आहे शाळेत जायचं..., अभ्यास करायचं..., खेळायचं..., हसायचं..., बागडायचं...! तुम्हीच सांगा... चारपाच वर्षांपूर्वीपर्यंत मी तेच करत होते ना... मला शाळा खूप आवडायची... आमची सामूहिक प्रार्थना... हे ईश्वरा... आमचे पाय फुलांइतके कोमल बनव म्हणजे पायाखाली मुंगीही मरणार नाही... आमचे हात वेलींसारखे कर... आलिंगन द्यायला, वळसे घालायला... मोठी घंटा वाजत असताना आमच्या प्रार्थनेचा सामूहिक आवाज किती मधुर वाटायचा... माझे त्या वेळचे सवंगडी... फिलीप्स डोगा... गुंथार... डॉल्बी... कॅथोरिस... नॅन्सी... शाळेजवळच्या गार्डनमध्ये आम्ही खूप हुंदडायचो... फुलपाखरांसारखे... पण..."

एखाद्या सुंदर स्वप्नातून जागं व्हावं आणि वास्तवाचं भान येऊन हबकून जावं तशा हबकल्या स्वरात इलाटा पुढं म्हणाली, "पण... कसा, का कोण जाणे... वांशिक संघर्ष सुरू झाला... वाढत गेला. शाळा बंद झाली... घराबाहेर खेळणं बंद झालं आणि आता तर... घराच्या बाहेर पाऊल टाकणंही बंद झालं! तुम्हाला राग येईल, पण... पण तुम्हीच सांगा... मी काय करायचं घरात बसून? ही डायरी लिहिते, कारण माझं मन मोकळं होतं... या खिडकीत मी अगदी सुरुवातीला बसले ना... लहान होते... साडेआठ-नऊ वर्षांची... बाहेरचा गोळीबार ऐकून खूप भीती वाटली... आणि एकदा... प्रथमच पाहिलं... माणसाच्या शरीरातून रक्ताचा सडा कसा पडतो ते... एका सुर्जीनं बार्डीच्या पोटात मोठ्ठा सुरा भोसकला तेव्हा..."

"इलाटा..." ममा कळवळून म्हणाली. इलाटा जणू त्या क्षणांमध्ये गेली होती. आपल्याच तंद्रीत ती पुढं म्हणाली,

"त्या रात्री ना मी जेवू शकले ना झोपू शकले... जेवढी झोप लागली त्या झोपेत रक्तरंजित स्वप्नमालिका चालू राहिली. रक्ताची नदी... पूर आल्यासारखी! प्रवाहात वाहणारी प्रेतं...

"आणि मग मला हळूहळू सवय झाली... रोज या खिडकीत बसून संघर्ष पाहायचा... मनात येणारे प्रश्न, मनात येणारी बरोबर किंवा चुकीची उत्तरं... माझे विचार... सारं काही या डायरीत लिहून काढायचं... तुम्ही जाणता..."

"इलाटा... मला कळतंय सगळं, पण... पण आज तरी सांग... तू मला ममा का म्हणत नाहीस पूर्वीप्रमाणे? मला अहोजाहो का करतेस?"

इलाटा एखाद्या पोक्त माणसासारखी जागची उठली. तिनं रूममध्येच एक चक्कर टाकली. जणू शब्द तयार... पण मांडायचे कसे या विचारात. तिनं ममाकडं पाहिलं. तिच्या मनात आलं, माझी बिचारी ममा! आणि तिचा नवरा... माझे डॅड! मोठ्यांची मोठी दुनिया... पण... पण माझ्या मनावरचा आघात...! इलाटाच्या डोळ्यांसमोर तो प्रसंग जसाच्या तसा उभा राहिला.

इलाटाचे डॅड, एडियन घाली घरी आले तेव्हा त्यांच्या हातात पुष्पगुच्छ होता. सहा ब्लॅक कॅट कमांडोजच्या संरक्षणात ते घरात आले. कमांडोज बाहेर थांबले. फ्लोराकडे आनंदाने आणि काहीशा अभिमानानं पाहत ते म्हणाले,

''फ्लोरा... तुझा नवरा आज सुर्जी लिबरेशन फ्रंटचा अध्यक्ष झाला!''

फ्लोरानं काहीशा उसन्या आनंदानं नवऱ्याचं अभिनंदन केलं. पण तिच्या मनातील अस्वस्थता तिला गप्प बसू देईना.

''एडी, मला असं वाटतं... तू हे पद घ्यायला नको होतं... बार्डी लोकांशी आपलं वैयक्तिक वैर नाही मग... कशाला या संघर्षात उतरायचं...''

''फ्लोरा... फ्लोरा माय डिअर, प्रश्न वैयक्तिक वैर असण्यानसण्याचा नाही... प्रश्न आहे सुर्जी वंशाच्या अस्तित्वाचा, स्वातंत्र्याचा... हा देश आमचा होता, आमचा आहे आणि आमचा राहील... सुर्जींच्या देशात बार्डी लोकांचं काय काम?''

फ्लोरा काहीशी निराश होत म्हणाली, ''एडी... मला तुमच्या राजकारणातलं काही कळत नाही... पण मला माझं घर सुरक्षित हवंय... माझा नवरा, माझी मुलं...''

एडियन घाली मोठ्यानं हसला. त्यानं फ्लोराला जवळ घेतलं, थोपटून म्हणाला, ''त्याबाबत तू काळजी करू नकोस फ्लोरा... आपला थोरला आयझॅक परदेशात शिकतोय... राहिला प्रश्न इलाटाचा! ती अजून लहान आहे... तिला...''

''नाही एडी,'' एडियनचं वाक्य तोडत फ्लोरा म्हणाली,

''ती आता लहान नाही... दहावं वर्ष संपलंय. पण ती आता मोठी झालीय, विचारानं... मनानं...! बाहेरचा रक्तपात बघत असते तासन्तास... एडी, मलासं वाटतं... आपण हा गाव, हा देश सोडून दूर जाऊ... शांत जीवन जगू... आपलं...''

एडीनं तिचे हात काहीशा नाराजीनं झटकले. फ्लोराचे पुढचे शब्द घशातच विरून गेले. एडीनं तिच्याकडे काहीशा रागानं पाहिलं. तो म्हणाला,



''सुर्जी जमातीनं मला मोठ्या विश्वासानं अध्यक्ष बनवलं आणि तू...! तू मला... डॅम इट! वंशासाठी, धर्मासाठी प्राण द्यायची तयारी ठेवायची तर तू आपल्या स्वार्थाचा, सुखाचा विचार करतेस... फ्लोरा... समजून घ्यायचा प्रयत्न कर... इलाटालाही समजावून सांग... वंशयुद्ध, धर्मयुद्ध हे पवित्र कर्म आहे...''

''पवित्र कर्म...'' आत्ताही त्या आठवणीनं इलाटाच्या तोंडून ते शब्द अभावितपणे बाहेर पडले. काहीशा तुच्छ अलिप्तपणे ती म्हणाली,

''ज्या दिवशी मिस्टर एडियन घाली...''

''मिस्टर एडियन घाली? तुझ्या डॅडला तू...'' फ्लोरानं तिला काहीशा दुखावल्या स्वरात विचारलं.

''सॉरी... मी त्यांना डॅड म्हणूच शकणार नाही... त्यांनी एस.एल.एफ.चं अध्यक्षपद स्वीकारलं त्याच दिवशी माझे डॅड संपले... माझ्याशी खेळणारे..., गप्पा मारणारे... रात्री मला कुशीत घेऊन गोष्ट सांगणारे माझे डॅड...''

बोलता बोलता स्थिर नजरेनं इलाटानं ममाकडं पाहिलं. ममा तिच्याकडं अपेक्षेनं पाहात राहिली. तिच्या नजरेतून डोकावणारा प्रश्न जाणून इलाटा म्हणाली, ''...आणि तुम्हाला ममा म्हणणं त्या दिवसापासून बंद केलं मी! तुम्ही जिवाच्या आकांतानं तुमच्या नवऱ्याला अडवू शकला असता... पण तुम्ही... तुम्ही विसरला असाल, पण मला आठवतंय... किचनमधल्या झुरळालासुद्धा मारू नये असं वाटायचं तुम्हाला... कारण तोही छोटा जीव आहे. अन्नाच्या चार कणांसाठी येतो... त्याला अन्न द्यायचं सोडून जहाल विषानं मारायचं ही कल्पनाही तुम्हाला सहन करायची नाही... बागेतलं फूल तोडू नये हे तुम्हीच सांगायचा ना मला! कारण ते म्हणे त्याच्या आईच्या... फांदीच्या कुशीत खेळत असतं... झुलत असतं, त्यांची ताटातूट करणं पाप आहे! त्याच ना तुम्ही? तुम्ही अडवलं असतं तर मिस्टर एडियन घाली त्या फ्रंटचे अध्यक्ष राहिले नसते...

''तुम्हाला माहितीय का, ते अध्यक्ष झाल्यापासून हिंसाचार वाढलाय ते! माझी नॅन्सी आणि डॅनियल... माझ्याच वयाचा... बार्डी वंशात जन्म घेतला हा त्याचा गुन्हा होता का... तोसुद्धा...''

इलाटाचे डोळे पाणावले. तिनं ममाकडं पाहिलं. ममाच्या डोळ्यांतून अश्रू घळाघळा ओघळत होते. बाहेर चाललेल्या संघर्षाचं एक कटू फळ तिच्या घरात उगवलं होते. पोटची पोर हा हा म्हणता अकाली प्रौढ झाली आणि दुरावली. थोरला आयझॅक तर दूर गेलाच आणि आता ही पोरही मनानं दूर दूर गेली... फ्लोराच्या

डोळ्यांतून अजून अश्रू येऊ लागले. तिला आपले हुंदके आवरेनासे झाले. तिच्या गळ्यातील लॉकेट हेलकावे देत होतं. त्या लॉकेटला बुलेटच्या आकाराचं एक पदक होतं.

इलाटाचा हात अभावितपणे स्वतःच्या गळ्यातील लॉकेटकडे गेला. तिचंही लॉकेट ममासारखंच होतं. इलाटा उद्वेगाने म्हणाली,

''...आणि हे लॉकेट! लॉकेट नाही हे! गळ्यात बांधलेला मृत्यू आहे हा... बार्डी लोकांचा रक्तपात वाढवणाऱ्या मिस्टर एडियन घालींनी बायकोच्या आणि पोरीच्या गळ्यात बांधलाय! आठवतंय ना... हे लॉकेट गळ्यात बांधताना त्यांनी काय सांगितलं ते... या बुलेटच्या पदकामध्ये सायनाईड आहे! दुर्दैवाने आपण दोघी चुकून शत्रूच्या हाती लागलो तर पुढचा छळ टाळण्यासाठी रेडिमेड मृत्यू!''

बुलेटशी चाळा करत इलाटा क्षणभर गप्प बसली. मुलीच्या तोंडून येणारं विदारक सत्य ऐकून फ्लोराचे हुंदके थांबले. तिला जाणवलं, आपण मुलीचं मन कधीच जाणून घेतलं नाही. इलाटा हताश स्वरात म्हणाली,

''या पदकाचं टोपण काढून पाहिलं मी... साखरेच्या कणासारखे चारपाच कण आहेत यामध्ये... खरं तर... त्याच वेळी वाटलं... जिभेवर टाकावेत आणि...''

''इलाटाऽ'' फ्लोराला पुढं बोलवेना. ती उठून पटकन पोरीच्या जवळ आली. अपार उत्कटपणानं इलाटाला आपल्या कुशीत घेत ती म्हणाली, ''इलाटाऽ पुन्हा कधी असा अविचार करू नकोस... नाहीतर असं कर... काढ ते पदक... दे माझ्याकडं...''

''नको... राहू दे गळ्यातच माझ्या... न जाणो... मिस्टर एडियन घाली म्हणतात त्याप्रमाणं याचा कधीही उपयोग होईल सुटकेसाठी!''

''पण मग... पुन्हा असा विचार मनात आणू नकोस... इलाटा... यू नो.... माझं तुझ्यावर किती प्रेम आहे... आणि तूच जर... नो नो... इलाटा...''

फ्लोराला पुन्हा एकदा गहिवरून आलं. इलाटानं ममाच्या हातावर थोपटलं. तेवढ्यात दरवाजावरची बेल वाजली.

एकदा... दुसऱ्यांदा... तिसऱ्यांदा... फ्लोरा घाईघाईनं डोळे पुसत खाली आली... कोण असेल? तिनं दारावरची झडप उघडेपर्यंत बेल पुनःपुन्हा कर्कशपणे वाजत राहिली. तिनं दार उघडलं आणि ती बघतच राहिली. तिला बाजूला करीत एडी, कमांडोज आणि ॲम्ब्रोसच्या मदतीनं आत आला. त्याची संपूर्ण डावी बाजू रक्तानं माखली होती. कमांडोजनी त्याला सोफ्यावर बसवलं.



''ॲम्ब्रॉस...'' फ्लोराला काय विचारायचं ते सुधरेना. ती आत्यंतिक काळजीनं पुढे आली. एडी त्याही अवस्थेत कठोर वाटत होता. कमांडोजनी एडीचा शर्ट फाडून काढला. शर्टाची बाही फ्लोरासमोरच पडली. तिनं अभावितपणे ती उचलली. एक भोक होतं... म्हणजे... गोळी छातीत जाण्याऐवजी दंडात गेली होती तर... तिनं पाहिलं...

ॲम्ब्रॉसनं स्वच्छ फडक्यानं एडीच्या दंडावरील रक्त पुसायला सुरवात केली. चारही कमांडोज ॲम्ब्रोसला जे जे काही लागणार होतं ते घेऊन तत्परतेनं उभे होते. फ्लोराच्या अचानक लक्षात आलं... आज चारच कमांडो! दोन कमांडो दिसत नाहीत...

''ॲम्ब्रोस... एडी... मला सांगा कुणीतरी... काय झालं?... आणि... आणि....''

ॲम्ब्रोसनं एडीकडं पाहिलं. एडी हसला व म्हणाला,

''फ्लोरा... एवढं गोंधळून जायचं कारण नाही. तुला अंदाज करता येतो ना... हो, अशी बघू नकोस... तुझा अंदाज खरा आहे.... अचानक हल्ला झाला... काल आम्ही त्यांच्या वस्तीवर जो हल्ला केला होता त्याचा बदला घेतला त्यांनी... पण अयशस्वी बदला...! बघ, मी जिवंत आहे.'' एडी हसला.

''एडी... एडी, मला खूप काळजी वाटते... तू त्या बार्डींशी...''

तिचं बोलणं तोडत एडी म्हणाला,''फ्लोरा... बार्डींशी वैयक्तिक वैर नाही, असं म्हणाली होतीस ना तू! बघ... बघ हे रक्त... त्याच हरामखोर बार्डी लोकांनी हल्ला केला माझ्यावर... माझे दोन कमांडोज मध्ये आले नसते तर... ॲम्ब्रॉस... सांग तुझ्या मॅडमला...''

ॲम्ब्रॉस काही न बोलता उभा राहिला. फ्लोरा पुढं आली. तिनं नवऱ्याच्या डाव्या दंडात घुसलेल्या गोळीचा खळगा पाहिला. अजूनही रक्त येत होतं; पण एडीच्या चेहऱ्यावर वेदना नव्हती. त्याही स्थितीत तो बार्डी लोकांचा उद्धार करत होता. तिच्या मनात आलं, जीवघेण्या वेदनेपेक्षा वैरभावना जास्त प्रबळ असते! ''स्सऽ'' आवाज ऐकताच फ्लोरानं पाहिलं. ॲम्ब्रॉसनं एडीच्या दंडात घुसलेली गोळी काढून जखमेवर ॲंटीसेप्टिक लावलं होतं. एडीनं आपला खालचा ओठ दातांखाली गच्च दाबून धरला होता. जणू उफाळणारी तीव्र वेदना कैद केली होती! फ्लोराचं जिन्याकडं लक्ष गेलं. इलाटा जिन्यात अर्ध्यावर येऊन सारा प्रकार पाहत होती. इलाटाच्या चेहऱ्यावर विषादाची भावना तिला जाणवली. ती तिला खाली

येण्याची खूण करणार तेवढ्यात दारावरची बेल कर्कश वाजली. त्या आवाजासरशी चारही कमांडोजनी आपापल्या स्टेनगन दरवाजाकडं रोखल्या. ॲम्ब्रोस एडीच्या इशाऱ्यासरशी पिस्तुलावर हात ठेवत दरवाजाकडं गेला. त्यानं दाराची छोटी झडप उघडून बाहेर पाहिलं आणि लगेच दार उघडलं. सुर्जी फ्रंटचा आघाडी नायक गॉर्दा घाईघाईनं आत शिरला. त्यानं एडीला सॅल्यूट दिला व म्हणाला,

"चीफ, तुम्हाला ताबडतोब सदर्न एरियात यायला हवं... संयुक्त राष्ट्रसंघाचं पथक दुतर्फा गोळीबारात सापडलंय. हरामी बार्डी गोळीबार थांबवायला तयार नाहीत. जर युनो पथकाला इजा झाली तर आपलं नाव..."

साऱ्या वेदना विसरून एडी पटकन उठला. नशीब एवढंच, की बॅंडेज बांधून झालं होतं.

"चला पटकन... हजारो बार्डी गेले तरी चालतील; पण युनोच्या एकाही माणसाला इजा होता कामा नये..." असं पुटपुटत एडीनं आपलं खास रिव्हॉल्व्हर कमरेच्या पट्ट्यात खोचलं आणि तो निघाला. फ्लोराचा अंतरात्मा ओरडत होता... 'अशा जखमी अवस्थेत जाऊ नकोस एडी...' पण ती भेदरलेल्या डोळ्यांनी गप्प बसली. एडी सर्वांना घेऊन लगबगीनं निघून गेला. जाण्यापूर्वी फ्लोराकडं वळून त्यानं दोनच शब्द उच्चारले. म्हणाला, "टेक केअर!"

त्या बकाल वस्तीतील घाणेरड्या पाणवठ्यावर फ्लोरा नळाखाली आपलं भांडं ठेवून उभी होती. डुकरांची एक मादी आपल्या पिलावळीसह त्या बाजूला येताच फ्लोरानं हात उगारून तिला पिटाळलं. वस्तीतील दोन कुत्री वचावचा ओरडत त्या डुकरावर धावली. फ्लोरानं नळाकडं पाहिलं. पाण्याची धार खूपच बारीक होती. पाणी जायची वेळ झाली होती. याआधीच पाण्यासाठी यायला हवं होतं; पण... वस्तीतल्या कजाग बायकांच्या भीतीनं फ्लोरा आली नव्हती. सगळ्यांचं सगळं आटोपल्यावर ती तिथं आली.

नळाच्या कठड्यावर काहीतरी चकाकलं. फ्लोरानं नीट पाहिलं. फुटलेल्या आरशाचा एक तुकडा होता तो. फ्लोरानं तुकडा उचलला आणि त्यात ती आपलं प्रतिबिंब पाहू लागली. स्वतःचेच डोळे दिसले तिला... निस्तेज... खोल गेलेले!

एडी गेला आणि... एडी, एडी, एडी! हटवादी होता... वंशाचा दुराभिमानी होता; पण तो होता तोवर सर्व काही होतं. युनोच्या पथकाला वाचवायला गेला आणि तिथंच बार्डींच्या गोळीबारात चाळणी झाली! एडी गेला! खरंच वाटेना काही काळ... मला 'टेक केअर' असं सांगून गेला; पण स्वतः मात्र केअरलेस राहिला...



तो गेला! सर अल्बर्टनं सांत्वन केलं पण... पण, दुसऱ्या का तिसऱ्याच दिवशी बार्डींचा जीवघेणा हल्ला... घर गेलं, सोननाणं गेलं... जीव वाचवून कसेबसे इथं पोचलो.

पण आयझॅक असं का वागला? पोटच्या पोराच्या आठवणीनं फ्लोराची तंद्री अधिकच गहिरी झाली.

बाप मेला आणि आयझॅकनं चार-आठ ओळींचं पत्र पाठवलं - 'ज्या वयात मला मॉम आणि डॅडची उबदार सावली हवी होती, त्या वयात परदेशात ढकललंत! हॉस्टेलची रूम म्हणजे तुरुंग वाटला... जगात एकटं असणं म्हणजे काय हे अनुभवलं आणि तेच पचनी पडलं... ढसढसून रडत नको नको म्हणणाऱ्या मला ज्या दिवशी डॅडनं सक्तीनं रवाना केलं... खरं तर त्याच दिवशी माझे डॅड गेले... आता केवळ त्यांचा देह संपला! सो... मी एकटा आहे... एकटा जगेन... एकटा मरेन! गुडबाय!'

आयझॅक... आता उरला फक्त आठवणीत! गोरापान... कुरळ्या केसांचा, दाट भुवयांचा... दुडुदुडु पळत यायचा माझ्याकडं आणि खिदीखिदी हसायचा!

उनाड मुलांच्या फिदीफिदी हसण्यानं फ्लोरा भानावर आली. तिनं कावऱ्याबावऱ्या नजरेनं इकडंतिकडं पाहिलं. नळाचं पाणी गळणं केव्हाच थांबलं होतं आणि ती दुःखद आठवणींमध्ये हरवून पुतळ्यासारखी उभी होती. हातात फुटक्या आरशाचा तुकडा! वस्तीतल्या उनाड व टारगट मुलांना हसण्यासाठी आणखी काय हवं होतं! जिवंत कार्टून!

फ्लोरानं पटकन काचेचा तुकडा फेकून भांडं उचललं आणि ती आपल्या खुराड्याकडं निघाली... मघाचीच डुकरीण पुन्हा एकदा आपल्या पिलावळीसह तिच्या वाटेत आडवी आली. ती हेलपाटली. उनाड मुलांना अजून मौज वाटली. फ्लोरा कशीबशी सावरत पुढं गेली.

फ्लोरा वाकून घरात शिरली. तिनं पाहिलं, इल्लाटा एका कोपऱ्यात निवांत बसली होती. वडील गेल्यापासून अधिकच गंभीर आणि प्रौढ वाटू लागली होती. फ्लोरानं दोघींचं जेवण बनवायला घेतलं. काम करता करता ती म्हणाली,

"इल्लाटा..."

"हं..."

"शाळा सुरू होतील पुढच्या आठवड्यात. जाणार ना तू...?"

"हो... जाईन ममा..."

फ्लोराच्या चेहऱ्यावर समाधान उमटलं.

तिला भीती होती, की ही पोर शाळेला नकार देते की काय. एडी गेला त्यानंतर इलाटानं तिला 'ममा' म्हणायला सुरुवात केली होती.

"ममा..." इलाटाच्या हाकेनं फ्लोरा भांबावून म्हणाली,

"काय ग."

"रद्दीचं दुकान लांब आहे ना?"

"रद्दीचं दुकान? ते कशासाठी?"

"हा ढीग रद्दीत द्यायचाय..." असं म्हणत इलाटानं बोट दाखवलं. फ्लोरानं पाहिलं. एका बाजूला एकावर एक रचलेल्या डायऱ्या होत्या.

"तुझ्या डायऱ्या रद्दीत द्यायच्या?"

"हो... आपल्या देशातला संघर्ष युनोच्या शांतिपथकानं थांबला. ते दिवस संपले. त्या दिवशी डॅडच्या मृत्यूनंतर युनो पथकाचे चीफ आले होते ना घरी तेव्हा..."

इलाटा थांबली. फ्लोरा भाजी चिरता चिरता थबकली.

"तेव्हा काय? इलाटा..."

"मी डायरी लिहीत बसले होते. त्यांना आश्चर्य वाटलं... या मुलीच्या डॅडचा मृत्यू झाला... दफनविधी थोड्या वेळापूर्वी पार पडला आणि ही मुलगी इतक्या शांतपणे काय लिहीत बसली आहे... त्यांनी डायरीत डोकावलं... आणि वाचतच राहिले... ममा, तुलाही त्या दिवशी भेटले ना ते..."

"अं... हो... मिस्टर ॲल्बर्ट... तुझ्या डॅडच्या मृत्यूबद्दलचा युनोतर्फे आलेला शोकसंदेश द्यायला आले होते ते... पण इलाटा... या डायऱ्या तू..."

"या साऱ्या आठवणी, सारे विचार दफन करायचेत मला... माझे डॅड गेले... रक्तरंजित संघर्ष संपलाय... ते आपलं घर, ती खिडकी, सारं सारं संपलंय. मग या डायऱ्या... खरं तर... घेणारच नव्हते, पण..."

"एक्सक्युज मी..."

अपरिचित आवाज ऐकून दोघींनी दाराकडे पाहिलं. दारात एक उंच, गोरीपान रिमलेस चष्मा घातलेली व्यक्ती उभी होती. तिच्या हातात छोटी ब्रीफकेस होती.

"मे आय कम इन...?" तिनं विचारलं.

"येस... प्लीज कम..." फ्लोरानं म्हटलं. तो आता आला. त्यानं सर्वत्र पाहिलं. फ्लोराला खूप लाज वाटली. या अशा वस्तीत, अशा बकाल घरात न शोभणारा पाहुणा...



"मी रॉबर्ट कॉफोन्ट... फ्रान्समधून आलोय... आपण मिसेस फ्लोरा घाली..."

"हो... पण आपण?"

"मी खूप शोध घेत आपल्याला गाठलंय... मला थोडं पाणी मिळेल का?"

"ओह् आय ॲम सॉरी..." असं म्हणत फ्लोरा पाणी देण्यासाठी वळली. तिनं एक ग्लास उचलला. त्या ग्लासकडे पाहून ती स्वतःच संकोचली. एके काळी आपल्या घरात चायनीज डिझाइन्सचे, इटालियन कटवर्कचे कितीतरी प्रकार होते. ग्लासचे, पण आज...

"तुमच्यासारख्या उच्चभ्रू माणसाला इथं पाहून मी भान विसरले... सॉरी..."

पाणी देत फ्लोरानं दिलगिरी व्यक्त केली.

'इट्स ऑल राईट' म्हणत त्यानं पाणी संपवलं. नंतर तो बोलू लागला.

"मी फ्रान्सच्या नामांकित वर्ल्डमीडिया पब्लिशिंग हाऊसचा चीफ आहे. युनोच्या मिस्टर अल्बर्टनं इथल्या वांशिक संघर्षाबद्दल टाईम मॅगेझिनमध्ये एक आर्टिकल लिहिलं होतं. त्यामध्ये त्यानं मिस्टर एडियन घाली आणि त्यांची मुलगी इलाटा... आणि मुख्य म्हणजे तिनं लिहिलेल्या डायऱ्या याविषयी खूप काही लिहिलं होतं... मिसेस फ्लोरा, हीच ना ती मुलगी... इलाटा..."

कॉफोन्टनं स्मित करत इलाटाकडं पाहिलं.

"येस सर..."

"ग्लॅड टू मीट यू मिस इलाटा..." कॉफोन्टनं तिच्याशी हस्तांदोलन केलं.

"आम्ही आपल्यासाठी काय करू शकतो?" फ्लोरानं विचारलं.

"आमच्या हाऊसनं त्या डायऱ्या छापायचं ठरवलंय!"

"माझ्या डायऱ्या छापणार?" चकित होत इलाटानं मोठ्या आवाजात विचारलं. कॉफोन्टनं स्मितहास्य करीत होकारार्थी मान हलवली. फ्लोराकडे पाहात इलाटानं आश्चर्य व्यक्त केलं. फ्लोरालाही अचंबा वाटत होता. इलाटा कॉफोन्टकडे वळून म्हणाली,

"अहो त्यात काहीच विशेष नाही... त्या काळात शाळा नव्हती, खेळायला मिळत नव्हतं... बाहेर जाता येत नव्हतं.... बाहेर रक्तरंजित धुमश्चक्री चालू होती.

हे पाहून त्या वेळी माझ्या मनात जे जे काही आलं ते मी लिहिलंय... एका छोट्या मुलीच्या त्या डायऱ्या...''

'मिस इलाटा... त्या डायऱ्या आमच्या दृष्टीनं लाख मोलाच्या आहेत... आपल्याला त्याचा भरपूर मोबदला देऊ आम्ही!'

दोघींनी एकमेकींकडे पाहिलं. कॉफोन्ट सुहास्य मुद्रेनं पुढे म्हणाला,

''आपण होकार दिला की आम्ही तुम्हा दोघींना फ्रान्समध्ये घेऊन जाऊ. तुम्ही आमचे पाहुणे म्हणून राहा तिथं. आम्ही तुमच्याशी करार करू... तुम्ही मागाल तेवढी रॉयल्टी देऊ... तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण आत्ताच सांगतो..., आम्ही फार मोठा प्रकाशन समारंभ आयोजित करणार आहोत, ज्यामध्ये खूप सेलिब्रिटीज उपस्थित राहतील. मिस इलाटा... तुमचं नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल.''

''आम्ही तयार आहोत!'' फ्लोरानं घाईघाईनं म्हटलं आणि इलाटाला तिने जवळ घेतलं. क्षणभरानं ती काहीशा उद्विग्न स्वरात म्हणाली,''नाहीतरी या देशात आता आमचं काय राहिलंय!''

''ठीक आहे... थँक्स मिसेस फ्लोरा... थँक्स मिस इलाटा... मी तासाभरात पुन्हा येतो. आपण तोवर इथलं सारं आवरून ठेवावं... बाकी आय थिंक... येथून बरोबर घ्यावं असं खास काही दिसत नाही... पण... त्या डायऱ्या मात्र जरूर घ्या...''

दोघींचाही विश्वास बसत नव्हता. आयुष्याला मिळालेल्या अनपेक्षित कलाटणीनं दोघींचं आयुष्य बकाल वस्तीतून एकदम फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये आलं होतं. रॉबर्ट कॉफन्टनं दिलेलं प्रत्येक वचन पाळलं होतं. दीड महिना Park Hyatt Paris या आलिशान हॉटेलमधल्या स्यूटमध्ये राहून त्यांनी परमोच्च सुख भोगलं. प्रकाशन समारंभ म्हणजे तर सुखाचा, सन्मानाचा कळस ठरला होता. जगभरातल्या प्रसिद्ध टीव्ही चॅनेल्सनं इलाटाला झगझगीत प्रकाशानं न्हाऊ घातलं होतं.

'इनोसंट एक्स्प्रेशन्स' या नावानं प्रकाशित झालेल्या डायरीची पहिली एडिशन हातोहात खपली आणि पुढील आवृत्तीच्या आगाऊ नावनोंदणीसाठी गर्दी उसळली. रॉबर्ट कॉफन्ट इलाटाला फुलासारखं जपत होता. फ्लोराला तर आपली पोरगी देवापेक्षा जास्त महत्त्वाची वाटू लागली. इलाटाला चौदावं संपून पंधरावं वर्ष लागणार म्हणून कॉफन्टनं तिच्या बर्थडेचा जंगी सोहळा आयोजित केला आणि त्याच रात्री तिच्यासमोर नवा प्रस्ताव मांडला.

विविध चॅनेल्सवर इलाटाच्या डायरी वाचनाचा प्रोग्राम! फ्लोरानं तो मान्य केला



आणि इलाटाच्या आयुष्याला लाईट्स, कॅमेरा, साऊंड या गोष्टी चिकटल्या.

सीबीएस चॅनेलवर इलाटानं प्रथम वाचन केलं. तिच्या डॅडचा रक्तबंबाळ मृतदेह पाहून, दफनविधी उरकून आल्यानंतर इलाटानं लिहिलेलं शेवटं पान असं होतं -

'आज माझे डॅड अंतिम प्रवासाला निघून गेले... त्यांनी या प्रवासाला जावं हे त्यांनी नाही, दुसऱ्याच कुणीतरी ठरवलं होतं, सक्तीनं!

अँब्रॉसनं ममाला आणि मला हॉस्पिटलमध्ये डॅडचा मृतदेह दाखवला. रक्तबंबाळ देह! मी आजवर अनेक मृतदेह पाहिलेत... या खिडकीतून... रक्तानं माखलेले... तसाच हाही एक मृतदेह! फरक एवढाच, की त्या मृतदेहांशी माझं नातं नव्हतं. पण हा मृतदेह माझ्या डॅडचा! पण ते मृतदेहसुद्धा कुणाच्या तरी डॅडचे, अंकलचे किंवा ममाचे होते ना!... ममा ओक्साबोक्शी रडत होती, पण मला रडू आलं नाही! या वांशिक संघर्षानं.... धर्मयुद्धानं माझं बालपण संपवलं.... माझंच का, माझ्यासारख्या अनेक मुलांचं! उमलत्या मनांचे दगड बनवले या संघर्षानं! का भांडतात हे लोक वंशावरून, धर्मावरून? का...? का...?'

डायरीचं वाचन संपलं तेव्हा इलाटाचे डोळे अश्रूंनी भरून आले. हा कार्यक्रम लोकांना तुफान आवडला आणि चक्र सुरू झालं. चॅनेलवाल्यांनी इलाटाचा कार्यक्रम जाहीर करायचा अवकाश, की जाहिरातीसाठी प्रचंड बुकिंग यायचं, पाचदहा सेकंदांच्या जाहिरातीसाठी हजारो डॉलर्स मोजायला जाहिरातदार तयार व्हायचे. कारण इलाटाच्या कार्यक्रमाचा टी.आर.पी. हायेस्ट राहायचा.

सहा महिने कसे गेले ते कळलंच नाही. साऱ्या सुखसोयी होत्या; पण इलाटाला कशातच रस वाटेनासा झाला. श्रीमंतीनंतर जे दारिद्र्य येतं ते माणसाला हळवं बनवतं आणि दारिद्र्यानंतर पुन्हा ऐश्वर्यसंपन्नता येते तेव्हा त्या ऐश्वर्यातील पोकळपणा जाणवतो... अंतर्मनात! इलाटाच्या मनाची अवस्था काहीशी अशीच होत राहिली.

तिनं आपल्या सोनेरी, मनगटी घड्याळ्यात पाहिलं. रात्रीचा दीड वाजला होता. गुबगुबीत आलिशान बेडवर तिची ममा सुखनैव झोपली होती. तिनं ममाकडं निरखून पाहिलं. ममाचा मूळचा गोरा रंग आताशा खूप उजळला होता. मध्यंतरीच्या कष्टामुळं कृश झालेलं शरीर पुन्हा भरलं होतं. नकळतपणे इलाटाचं लक्ष आरशाकडं गेलं. तिनं स्वतःला आरशात न्याहाळलं. आपण सुंदर दिसतो आणि नवतारुण्याच्या रसरशीत खुणा अंगभर उमटू लागल्या आहेत हे तिला जाणवलं, पण... पण आपले

डोळे!

या डोळ्यांत चैतन्य नाही! शेवाळानं झाकलेल्या... आडरानातल्या एखाद्या डोहासारखे गूढ आणि उदास वाटतात आपले डोळे!.... विचार झटकून तिनं खिडकीतून बाहेर पाहिलं. पॅरिसची रात्र ऐन भरात आली होती. त्या रंगीबेरंगी उजेडानं ती आणखी अंतर्मुख झाली.

काय मिळवलं मी? बँक बॅलन्स... प्रसिद्धी... आज अमक्या राष्ट्राध्यक्षांबरोबर... उद्या तमक्या राजदूताबरोबर... कॅमेऱ्याचे फ्लॅशेस... डोळ्यांपुढे अंधेरी येईपर्यंत चकाकत राहणारे! ज्या निरागसपणे डायऱ्या लिहिल्या त्या निरागसतेचा बाजार झाला! झाला? की मी केला? डायरीच्या वाचनाचा टीव्ही शो म्हणजे तर भावनांचा लिलावच!... आणि तो लिलाव कुणाच्या जिवावर...? चालतेबोलते आप्तस्वकीय पाहता पाहता डोळ्यांसमोर निष्प्राण झाले, त्यांच्या जिवावर! नॅन्सी गेली... गुंथार गेला... त्या दिवशी माझे अश्रू डायरीच्या पानावर पडले... कॅमेरामननं त्या अश्रूंचा... त्या डागाचा... अस्पष्ट झालेल्या शब्दांचा क्लोजअप घेतला... माझं दुःख एन्लार्ज करून दाखवलं! कुठं गेला माझ्या भावनांचा हळवेपणा? हेच मिळवायचं होतं का मला? पैसा, प्रसिद्धी, झगमगाट...

नाही! नाही!

इत्लाटा अत्यंत अस्वस्थपणे उठली आणि बाल्कनीत आली. हवेत शीतल गारवा होता. त्या हवेनं तिला जरा बरं वाटलं, परंतु उलटसुलट विचारांनी तिचा पिच्छा सोडला नाही.

उद्या 'चॅनेल फॉर यू' साठी डायरी वाचनाचा कार्यक्रम करायचाय! परवा तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचा सोहळा आहे. 'इनोसंट एक्स्प्रेशन्स' पुन्हा मीडिया... पुन्हा मुलाखती... तीच ती प्रश्नोत्तरं! अगदी सुरुवातीला त्या प्रश्नांची उत्तरं देताना ते ते क्षण जिवंत व्हायचे. डोळ्यांत अश्रू आपसूक यायचे... पण आताशा तो गहिवर येत नाही. मग कॉफन्ट ग्लिसरिनची छोटी बॉटल घेऊन तयारच असतात. शी!

काय करावं? हे सगळं कसं टाळावं? दूर दूर जायचंय या सगळ्यापासून... आयझॅक जसा एकटा झाला... तशी मी पण एवढ्या गर्दीतही एकटीच आहे... ममा तर केव्हाच हरवली या गर्दीत!

इत्लाटा सैरभैर झाली. विचार करून करून तिचं डोकं भणभणायला लागलं! आणि अचानक वीज चमकावी तसा एक नामी विचार तिच्या मनात आला.



येस्स....! ती स्वतःशीच बोलली आणि तिचं मन एकदम शांत झालं. निवांतपणे ती बेडवर पहुडली.

C4U (चॅनेल फॉर यू)चा स्टुडिओ जय्यत तयार होता. इत्लाटाच्या कार्यक्रमासाठी चॅनेलनं खास सेट उभारला होता. सेटवर पार्श्वभूमीला बनवलेलं म्यूरल सर्वांचं लक्ष वेधून घेत होतं. अनेक हत्यारं, अनेक मृतदेह दाखवून म्यूरल बनवणाऱ्या कलावंतानं मधोमध एक कबूतर चितारलं होतं आणि कबूतराच्या मानेवर इत्लाटासारख्या मुलीचा निरागस चेहरा दाखवला होता. इत्लाटा सेटच्या मधोमध असलेल्या खुर्चीत बसली. पलीकडच्या बाजूला कॉफन्ट अत्यंत खुशीत शीळ वाजवत आला. चॅनेलच्या ऑफिसातून भरभक्कम रकमेचा चेक त्यानं नुकताच कोटाच्या खिशात टाकला होता. दुसऱ्या बाजूला असलेल्या खोलीत फ्लोरा आरामात बसली होती. तिला दहाच मिनिटांपूर्वी कॉफन्टनं पंचवीस हजार डॉलरचा चेक दिला होता. फ्लोरानं मॉनिटरवर दिसणाऱ्या इत्लाटाकडं कौतुकानं पाहिलं. ही पोर म्हणजे सोन्याची खाण आहे! या विचारानं फ्लोरा आत्मसंतोषानं हसली.

डायरेक्टर बॅरीनं कॅमेरामनला रेडी करून हवेत बोटं उचलली. इत्लाटा त्याच्या इशाऱ्याकडे पाहत होती. पाच... चार... तीन... दोन... एक.. एक बोट आडवं दुसरं उभं... टेक!

इत्लाटानं कॅमेऱ्याकडे पाहिलं आणि म्हणाली,

''हा कार्यक्रम पाहणाऱ्या तमाम प्रेक्षकांना माझा... इत्लाटा एडियन घालीचा नमस्कार! आय नो... तुम्ही माझ्या डायरीत लिहिलेले शब्द ऐकायला उत्सुक आहात. पण... पण आज मी डायरी वाचणार नाही...''

डायरेक्टर बॅरीनं चमकून पाहिलं... तो इत्लाटाला खुणावू लागला. कॉफन्टदेखील बावरला, इत्लाटाला खुणावू लागला; पण इत्लाटानं त्यांच्या इशाऱ्याकडं दुर्लक्ष करत पुढं म्हटलं,

''पाहा... कार्यक्रमाचे डायरेक्टर मिस्टर बॅरी आणि मला रेड कार्पेट ट्रीटमेंट देणारे मिस्टर कॉफन्ट माझ्या या उत्स्फूर्त बोलण्यानं किती अस्वस्थ झालेत... मला खाणाखुणा करताहेत... प्रीप्लॅन्ड... कॅल्क्युलेटेड इनोसंट एक्स्प्रेशन्स व्यक्त करण्याऐवजी आज ही पोरगी हे काय भलतंच बोलू लागली आहे, या विचारानं सर्व जण भांबावलेत... हा लाईव्ह प्रोग्राम आहे ना... प्रेक्षकहो, हा कार्यक्रम यांच्यापैकी कुणीही बंद करू शकेल, पण... मला खात्री आहे, असा मूर्खपणा ते करणार नाहीत....''

घराघरात इलाटाचा कार्यक्रम पाहणारा प्रत्येक जण अचंबित होत टीव्ही सेटकडं पुढं झुकला. काहींनी आपल्या फ्रेंड सर्कलला सेलवर मेसेज दिला... चॅनेल फॉर यू चालू कर... जस्ट डू इट अँड वॉच इट! जिवाचा कान करून सर्व जण इलाटा काय बोलतेय ते ऐकू लागले. इलाटा पुढं म्हणाली,

"आज मी डायरी वाचणार नाही. कारण मला उबग आलाय...! उबग आलाय त्या डायरीचा, त्यातील निर्जीव झालेल्या शब्दांचा....! उबग आलाय या सर्कशीचा! येस... माझ्या भावनांची सर्कस झाली आहे! आणि मी एक प्राणी... दौऱ्यावर जाणारा, मुलाखती देणारा. खोटं खोटं हसणारा आणि ग्लिसरीनचे अश्रू ढाळणारा... एक प्रदर्शनीय प्राणी! नशीब माझं की दयाळू कॉफन्टसाहेबांनी माझ्या गळ्यात पट्टा बांधला नाही."

इलाटा उपहासानं हसली व क्षणभर गप्प बसली. तिच्या डोळ्यांच्या कडा स्वतःविषयी कणव आल्यानं ओलावल्या. स्टुडिओमध्ये कमालीची शांतता होती. कॉफन्टला काय करावं ते सुचत नव्हतं. चॅनेलच्या ऑफिसात शेकडो फोन कॉल्स येत होते आणि सांगत होते कार्यक्रम मध्येच बंद करू नका. काहींनी विनंती केली, तर काहींनी धमकी दिली! इलाटानं एक आवंढा गिळला व ती पुढे म्हणाली, "तुम्ही माझ्या डायरीला दाद देता... याचा अर्थ असा नाही का होत, की तुम्हांला रक्तरंजित वर्णनं आवडतात! एका लहान मुलीच्या भावनांवर झालेले आघात आणि त्या वेळचं दुःख याचं प्रदर्शन तुम्हाला आवडतंय...

"दुःखाचं प्रदर्शन - डेकोरेटिव दुःख तुम्ही एंजॉय करताय! वंशयुद्धाचा, धर्मयुद्धाचा तिटकारा वाटण्याऐवजी सर्वांनाच वंशयुद्धाच्या मी पाहिलेल्या, लिहिलेल्या चटपटीत घटना आवडतात! ज्या धर्मयुद्धानं, वंशयुद्धानं माझं आणि माझ्यासारख्या हजारो मुलांचं बालपण उद्ध्वस्त केलं, भावविश्व संपवलं, त्याच युद्धाच्या सावल्या आता माझं तारुण्य झाकोळू पाहत आहेत! माझं गेलेलं बालपण तर मला परत मिळणार नाही, पण आता या सर्कशीत मला माझं तारुण्य घालवायचं नाही! खरं तर मला रममाण व्हायचं होतं शाळेमध्ये, कवितांमध्ये, शाळेच्या लयबद्ध प्रार्थनेच्या स्वरांमध्ये!... मला रममाण व्हायचं होत माझ्या सवंगड्यांमध्ये, बागेतल्या फुलपाखरांमध्ये आणि कुशीत स्वतःला विसरून जायचं होतं! हो... ममाच्या कुशीत, डॅडच्या कुशीत! सारं सारं संपलं... आणि आता आता -"

भावविवश होत इलाटा क्षणभर थांबली. डायरेक्टर बॅरीसुद्धा खजील झाला. आपण स्वतःला डायरेक्टर म्हणवून घेतो, पण एका कुमारवयीन तरुणीच्या मनाची,



भावनांची दिशा आपल्याला कधी समजलीच नाही. कॉफन्टही काहीसा उद्विग्न झाला. त्याच्या निगरगट्ट धंदेवाईकपणाचं कवच काहीसं सैलावलं. त्यानं सहानुभूतीनं इलाटाकडं पाहिलं. इलाटानं स्वतःचे पाणावलेले डोळे टिपले व कॅमेऱ्याकडं रोखून पाहत पुढं म्हणाली,

"हा माझा शेवटचा कार्यक्रम!... मला हजारो, लाखो डॉलर्स नकोत... फाईव्ह स्टार लाईफ नको, मला जगायचंय एक माणूस म्हणून! फक्त एक सामान्य व्यक्ती म्हणून! मला माझा इतिहास विसरायचाय... माझा वंश, धर्म, जात विसरायची आहे आणि झाडं, वेली, पशुपक्षी जगतात तसं जगायचंय...

"म्हणून मी आज तुम्हा सर्वांचा निरोप घेते... माझ्या ममाचासुद्धा. माझा शेवटचा नमस्कार स्वीकारा... आणि माझ्या मागं येऊ नका... प्लीज... कृपया माझ्या मागं येऊ नका! मला एकटं सोडा... मोकळं सोडा! या स्टुडिओतून मी बाहेर पडून वाट फुटेल तिकडं जाणार आहे. माझ्या मागं येऊ नका. नाहीतर मी..."

इलाटानं क्षणभर विसावा घेतला आणि आपल्या गळ्यातील सोनसाखळीला असलेलं बुलेटचं पदक कॅमेऱ्यासमोर धरत ती म्हणाली,

"नाही तर मी या पदकात असलेलं सायनाईड खाऊन स्वतःला संपवेन! येस... आय मीन इट! तसं झालं तर कदाचित तुम्ही माझा मृत्युसोहळाही स्पॉन्सर कराल... पण... पण मग लोक तुम्हाला क्षमा करणारी नाहीत. तेव्हा प्लीज... मला निरोप द्या. थँक्स एव्हरीबडी फॉर एव्हरीथिंग!"

इलाटा उठली आणि शांतपणे स्टुडिओच्या बाहेर पडली. संमोहन झाल्यागत सर्व जण जागच्या जागी खिळून तिच्याकडे पाहत होते. फ्लोरा सामोरी दिसताच इलाटानं पदक हातात धरलं, त्यासरशी फ्लोराची पावलं गोठली.

इलाटा इमारतीबाहेर आली. बाहेर मीडियावाल्यांची प्रचंड गर्दी होती. पण स्टॅच्यूची शपथ दिल्याप्रमाणे सर्व जण स्तब्ध होते. इमारतीच्या विस्तीर्ण पायऱ्या उतरून इलाटा खाली गेली. तिनं रस्ता ओलांडला आणि पलीकडच्या अंधारात विलीन झाली.

●●●

# माऊलीचा मळा

**दिलीप नाईक-निंबाळकर**

खूप वेळ बसल्यामुळे मांडीला रग लागायला लागली, तरी विनायकरावांना उठावंसं वाटेना. मग बसल्याजागीच त्यांनी पाय लांबविले. तळहातावर रेलून शरीराचा भार मागे टाकला. पायांची आपोआपच तिढी टाकली गेली. पालखी तळावर दुपारी झाल्या घटनेचा पट मनात घोळत होता. त्या सगळ्याचा अर्थ कसा लावायचा, हे त्यांना अजूनही कळत नव्हतं. खरं तर मळ्यातील ही विहिरीच्या धारेवरची जागा विनायकरावांची आवडती जागा. आजवरच्या आयुष्यातील कितीतरी कोडी त्यांनी येथे बसून सोडविली होती. विहिरीच्या रुंद कठड्यावर असे रेलून बसल्या बसल्या सगळा मळा नजरेखाली यायचा अन् मनातल्या विचारांना वावरायला ऐसपैस वावही मिळायचा. कधीकाळी आजोबा-पणजोबांनी बांधलेल्या या विहिरीवरची ही धावेची जागा एका परीने विनायकरावांची चिंतनिकाच होती. पाण्याच्या मोटा बंद झाल्या तरी मोटरने खेचून आणलेलं पाणी थारोळ्यात पडायचं - वावराला पोचायचं. पाणी प्यायलेला तृप्त मळा पाहताना जीव सुखवायचा. मळ्यात कोण येतंय - कोण जातंय, हे येथून स्पष्ट दिसायचं. मळ्यात कोण कशासाठी येत असेल, याचा अंदाज ती व्यक्ती जवळ येईपर्यंत घेता यायचा. विनायकरावांचा तो एक चाळाच होता. मळ्यात येणारी व्यक्ती जवळ येईपर्यंत तर्क-आराखड्यांच्या आट्यापाट्यांतून बहुतेक वेळा ते अचूक निष्कर्षापर्यंत पोचायचे. जागेचा गुण की काय कुणास ठाऊक, येथे बसल्यावर सगळ्या समस्या



आपण सोडवू शकतो हा विश्वास त्यांना होता. गेल्या काही दिवसांपासून मात्र हे सारं संपत आल्याची भावना मनात मूळ धरायला लागली होती. धावेवरच्या दोन चिऱ्यांच्या मध्ये पाखरांच्या शिटेतून कधीतरी जीव धरलेल्या पिंपळाच्या रोपट्याने हळूहळू डोकं वर काढायला सुरुवात केली होती. कितीही खुडली तरी काही दिवसांतच ती नव्या जोमाने लवलवायला लागायची. एक ना एक दिवस ती विहिरीची तोडन्तोड निकामी करणार, ही भीती विनायकरावांच्या मनात रुजली होती. त्याला कारण होता गेल्या तीन वर्षांचा दुष्काळ पाठीवर घेऊन आलेला या वर्षीचाही कोरडाठक्क आषाढ. आताही मोकळी वावरं लख्खपणानं दाखविणारा आषाढी पौर्णिमेचा उजेड त्यांना भेसूर वाटायला लागला होता. शिवारात गवताची काडी नाही. विहिरीतला तळचा खडान्खडा उघडा पडलेला. रानोमाळ भुतासारखा पिसाटल्यासारखा वाहणारा वारा मनातील ओल उडवून लावीत होता. कुठवर दम काढायचा आता? अन् कशाच्या जोरावर? सलग चौथ्या वर्षातला आषाढ-श्रावण कोरडा चालला होता. त्याआधी नवरात्रात हस्ताचा तरी पाऊस हमखास व्हायचा. पण आता कोणत्या मुलखाला तो पसार झाला होता ते पांडुरंगच जाणे. शेवटचा पाऊस कधी झाला तेदेखील आता आठवत नाही.

तसा तर हा पावसाळी मुलूख नाहीच. पण आषाढ-श्रावणात एखादा, गौरी-गणपतीबरोबर कधीतरी चुकारीने येणारा, नंतर हस्तात एक-दोन वेळा खात्रीनं पडणारा पाऊस झाला की संपला पावसाचा हिशेब. चुकूनमाकून कधीकाळी दिवाळी झाल्यावर पाऊस पडलाच तर माणसं हरखायची. ज्वारीचं पीक हमखास येणार, या खात्रीनं बाणगंगेच्या कोरड्या पात्रातूनही रामाचा रथ ओढत वर्षाचा सण उत्साहात पार पाडायची. हे दर सालाला घडायचंच असं नाही; पण पहिल्या दोन-तीन पावसांवर सालबेगमी व्हायची. या वर्षाचं त्या वर्षाला धान्य पुरलं म्हणजे आबादीआबाद समजावं.

गेल्या चार वर्षांत मात्र पावसाची अन् या मुलखाची नजरभेटही झाली नव्हती. दुनियाभर पडणारा पाऊस जणू या मुलखाचा रस्ताच विसरला होता. पहिली दोन वर्षं धूळपेरणी करून, दाणं मातीत घालून, होतं नव्हतं तेवढंही गमावून बसलेल्या मनाचा कोळसा झाला होता. आता पाऊस पडला तरी पेरणीसाठी काही शिल्लकच राहिलं नव्हतं. निम्म्याहून अधिक गावाने मुंबई गाठली होती. जगायलाच बाहेर पडायचं तर... खात्रीशीर वळचणीला जाण्याचं शहाणपण होतं त्यात. कोण कसा, काय करून, काय खाऊन जगतोय, याचे हिशेब पोट भरलेल्यांनी करावेत.

आला दिवस पार पाडण्याच्या विवंचनेत असणाऱ्यांना कसले हिशेब अन् कसलं काय! काहींनी कॅनॉल बागाईतदारांच्या बंगल्यापुढे पालं टाकली होती. त्यांच्या उसाच्या वाढ्यावर शेरडा-करडाबरोबर माणसंही अंग धरून होती. बागाईतदारांना तरी इतक्या कमी हजेरीत कुठं माणसं मिळणार होती? मोलमजुरांचं, वावराचा एखादा-दुसरा तुकडा मालकीचा असणाऱ्यांचं हे असं जगायला बाहेर पडणं ठीक होतं. दर दिवसाला नव्या गावाची वेस ओलांडली तरी त्यांचे दिवस पार पडणार होते. तेवढ्यासाठीच तर गाव सोडलेल्यांना हे अवघडही वाटत नव्हतं. विनायकरावांची गोष्ट वेगळी होती. घरातली दहा माणसं, कुत्री, कोंबड्या, बैल-बारदाना, इतकं सगळं घेऊन कुणाच्या दारात जायचं, हे प्रश्नचिन्हही लहान वाटावं इतका मोठा दुसराच प्रश्न होता. जगण्यासाठी दुष्काळाला तोंड देता येत नाही म्हणून बाहेर पडायचं? बापजाद्यांनी कमावलेली प्रतिष्ठा टांगून ठेवून दिवस पार पाडण्यासाठी बाहेर तरी कुठे जायचं? स्वतःच्या दोन-दोन पदव्यांचं शिक्षण पोट भरण्यासाठी कुणाकडे गहाण टाकायचं नाही, म्हणून तर मळ्याची वाट धरली होती. या गोष्टीला आता पंचवीस-तीस वर्षं होऊन गेली होती. अन् आता या वयात?

शे-दोनशे रुपयांसाठी मन मारून, खाली मान घालून लायकी नसलेल्यांपुढे हात बांधून उभा राहात नोकरी करण्यासाठी आपला जन्म नाही, हे ओळखूनच त्यांनी शेतीचा मार्ग स्वीकारला होता. इतक्या वर्षांनंतर तरुणाईतील ती तडफ, तो जोष कमी कमी होत गेलेल्या पाऊसकाळासारखाच नाहीसा होत आला होता. खरं तर कमी झालेल्या पावसाचाच हा परिणाम होता. नियमित पाऊस पडत राहिला असता तर ही वेळ आली नसती. अगदी साध्या साध्या अपेक्षाही विरी गेलेल्या कपड्यासारख्या भसकन टरकत होत्या. दहा ठिकाणी उघडं पाडत होत्या. पाऊसपाण्यावर मळा पिकत होता तोवर एवढ्या मोठ्या खटल्याचं घर चालवणं कधी जड गेलं नाही; पण आता मात्र जीव घायकुतीला आला होता.

नक्षत्रासारख्या देखण्या, गुणवान पोरीला उजवण्यासाठी घरातनं बायकोचा रोजचा धोशा सुरू झाला होता. विश्रामचं- मुलाचं वकिलीचं शिक्षण संपत आलं होतं; पण पुण्यासारख्या शहरातील त्याच्या शिक्षणाचा खर्च मेटाकुटीला आणत होता. अजून चार-पाच वर्षं तरी त्याच्या कमाईची अपेक्षा करता येणार नव्हती. आई-आबांची किरकोळ आजारपणं, रक्तानात्याचा नसलेला, पण या घरासाठीच लहानपणापासून राबत आलेला भाबड्या अन् त्याची बायको बबईचे मावळतीचे दिवस, या सगळ्याचं ओझं आता पेलवेनासं झालं होतं. पाय लटपटायला लागले



होते. कमाईची खात्रीशीर अशी एकही वाट राहिली नव्हती, पण खर्चाला मात्र दहा-बारा वाटा. रानात काय अन् मनात काय, नुसत्या वांझोट्या बाज्याचा धिंगाणा सुरू असायचा.

ज्या मळ्याच्या मोहात पडून शेती करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता, त्या माऊलीच्या मळ्याचा आधार मिळेनासा झाला होता. याचीच खंत दिसामाजी उफाड्याला आलेल्या पोरीगत वाढतच होती. एम.ए. उत्तम मार्कांनी उत्तीर्ण झाल्यानंतर त्या काळात सहजी नोकरी मिळत असतानाही आलेली नोकरीची संधी शेतीच्या प्रेमापायी नाकारली होती. त्यापाठीमागे काही भावना होत्या, विचार होते. नोकरीसाठी नाही, तर मनापासून शिकावं वाटलं म्हणून शिक्षण घेतलं, ही नेमकी जाण, घरच्या शेतीत लक्ष घालण्याचा आबांचा आग्रह अन् मुख्य म्हणजे माऊलीच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या मळ्याबद्दलचा मनातील उमाळा, या सगळ्यामुळे नोकरीचा मोह झाला नाही. मातीआड केलेल्या एका एका दाण्यातून चैतन्याचा कोंब सळसळून वर येताना पाहण्यातील आनंद विनायकरावांना मोलाचा वाटत राहिला होता. इतक्या वर्षांनंतरही त्यातील नवलाई, कोवळेपण सरलेलं नव्हतं. दर वर्षीच्या या निसर्गनिर्मिती सोहळ्यात 'नेमेचि येतो मग...' असं स्वरूप इतक्या वर्षांनंतरही आलेलं नव्हतं. पेरणीनंतर रानाला येऊ लागणारं पोपटी जावळ दिसायला लागल्यापासून ते थेट शिवार मोत्याच्या माळा-मुंडवळ्या बांधून उभा राहीपर्यंत विनायकराव मळा सोडायचेच नाहीत. 'माऊलीचा मळा' या नावानं ज्ञानियांचा पसायदानाचा हा प्रसादच जणू आपल्या वाट्याला आहे, या कृतज्ञ भावाची साथ त्यांच्या आयुष्यावर दाटली होती.

दर वर्षी आषाढात माऊलींची पालखी पंढरपूरला जातेवेळी दुपारच्या एका जेवणवेळी गावाजवळ थांबायची. प्रपंचातून सुटका नसणारे विठुरायाचे- माऊलीचे भक्त पालखीच्या दर्शनासाठी पालखी तळावर गर्दी करायचे. इथंच त्यांचं पंढरपूर अन् आळंदी. जमेल तसा घासातला घास वारकऱ्यांच्या मुखी घालताना विठोबाचं मुख न्याहाळीत असल्याचे सुख पुढच्या वर्षांपर्यंत पुरून उरतं. वारकऱ्यांना एक वेळचं जेवण देण्यासाठी म्हणून कधीतरी पाच-दहा पिढ्यांमागे हा मळा विनायकरावांच्या पूर्वजांना मिळाला होता. तोच हा माऊलीचा मळा. या मळ्यातील धान्यावरचा वारकऱ्यांचा हक्क आजवर कोणीही डावलला नव्हता. जुन्नरकडील मारुतीबुवांच्या दिंडीची एक दुपारवेळ या मळ्यातील धान्यावर भागत असे. यात देणारा मालक नसे, घेणारा याचक नसे. पंढरीच्या वाटेवर कुठले दिल्या-घेतल्याचे हिशेब?

दिंडीचं नाव मारुतीबुवांची दिंडी, असं असलं तरी आता मारुतीबुवांच्या पुढच्या पिढ्यांनी दिंडीचा वारसा चालविला होता. पण यामुळे काही फरक पडत नव्हता. वर्षातल्या एका दिवसाची दुपार. तास-दोन तासांचा सहवास दोन्ही बाजूंकडील पिढ्यांनी जपला होता. पाऊसपाण्याच्या, पिकांच्या, वर्षभरातील सुखदुःखाच्या गोष्टींची विचारपूस जेवताना व्हायची. जेवण तरी काय? भाकरीबरोबर कधी मटकीची उसळ, तर कधी हुलग्याची. गोड म्हणून लापशी असायची. अन्नब्रह्माचा घास प्रत्यक्ष विठुरायाला भरवीत असल्याचं हे समाधान पुढच्या वर्षावर सावली धरायचं. भाकरीतुकडा खाऊन झाला की थोड्या विश्रांतीनंतर पालख्या मार्गस्थ व्हायच्या. दिंडी पुढच्या गावाच्या शिवेत जाईपर्यंत विनायकराव पालखी-दिंडीसोबत जायचे. मुलूख हा असा बेभरवशी पाऊसपाण्याचा. मळा कधी पिकायचा कधी नाही. एखाद-दुसरं वर्ष असं नापेरीचं जायचं. पण दिंडीसहित घराची सालबेगमी विहिरीच्या पाण्यावर व्हायची. हीदेखील माऊलीचीच कृपा असल्याचा विनायकरावांच्या मनातील कृतज्ञ भाव मात्र कधीच मावळला नाही. दर वर्षी दोन-तीन हारे भरून भाकरी, दोन-दोन गड्यांनी उचलावीत अशी उसळ अन् लापशीची मोठी भांडी बैलगाडीत घालून पालखीतळावर जाण्याचा, दिंडी जेवू घालण्याचा एक सोहळाच असायचा. तो पार पाडण्यासाठी सगळं घरदार उत्साहानं राबायचं. अगदी कळत्या वयापासून विनायकरावांचं एकदेखील पालखी-दिंडीचं जेवण चुकलं नव्हतं. दिंडीची बदलती रूपं ते इतकी वर्षं पाहत आले होते. निव्वळ विठोबाच्या चरणावर डोळे लावून, जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी विठ्ठलच पाहत होते. पंढरीची वाट चालणाऱ्या वारकऱ्यांना सोय-गैरसोयीचं भान नसायचं. त्यामुळे पंढरीच्या वाटेवर मुखी पडणारा घास - मग तो हातावर घेऊन खावं लागणारं पिठलं-भाकरी असो वा पत्रावळीवरील लापशीचं जेवण असो - यज्ञकर्मातील ती आहुती मानून त्याचा स्वीकार व्हायचा.

आता मात्र सगळंच बदलत चाललं होतं. दिंड्यांचं सामान वाहून न्यायला आता ट्रक-टेंपो दिसायला लागले होते. त्यात सगळा संसारच बरोबर घेतला जाई. वारकऱ्यांना जेवू घालण्यात, त्याची जाहिरात करण्यात चक्क स्पर्धा दिसायला लागली. पिढ्यान्‌पिढ्या वारकऱ्यांच्या मुखी विनायकरावांसारख्या माऊलीभक्तांनी घरचा घास नेऊन घातला. ते अन्नदान नव्हतं वा वाटपही नव्हतं. गेल्या काही वर्षांपासून मात्र वारकऱ्यांना अन्नदान केलं जाऊ लागलं होतं. ग्रामीण अर्थकारण ताब्यात ठेवणाऱ्या सहकारी संस्थांनी ही संस्कृती जन्माला घातली होती. दूध,



लाडू, केळ्यांपासून कपड्यांपर्यंत मोफत वाटप व्हायला लागलं होतं. हे वाटप करणाऱ्यांच्यातील हिशेबकरी सदैव जागा असायचा. हे अन्नदान-वाटप करताना याचे फोटो दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रात कसे येतील, याबाबत ते कमालीचे दक्ष असायचे.

विनायकरावांना याचंही फारसं आश्चर्य वाटलं नाही. दानाची जाहिरात करण्याच्या, त्याचं प्रदर्शन करण्याच्या काळाला हे साजेसं होतं. आपण करीत असलेलं दानदेखील 'कॅश' करण्याची कला, हे तर या दानशूरांच्या यशस्वी आयुष्याचं रहस्य होतं; आणि हे समजण्याइतके विनायकराव सुज्ञ होते. त्यांना समजली नाहीत ती वारकऱ्यांची बदललेली पावलं. याच गोष्टीची खंत मनात ठसठसती घेऊन ते आज इथं बसले होते. गेल्या काही दिवसांतील उलघालीचे क्षण ते परत न्याहाळायला लागले. जणू काही त्यातून स्वतःलाच नव्यानं शोधत होते.

सलग चौथ्या वर्षी दुष्काळ मुक्कामाला थांबला होता. चार-दोन दिवसांनी एखाद्या शेतकऱ्यानं गळफास लावून स्वतःची सुटका करून घेतल्याच्या बातम्या यायला लागल्या होत्या. अगतिकतेची ही भावना रोगाच्या साथीसारखी पसरायला लागली होती. निराधार होत असल्याची भावना विनायकरावांच्याही मनात प्रथमच घर करायला लागली. पालखीचा दिवस जवळ यायला लागला तसतसे ते सैरभैर व्हायला लागले. कधी नव्हे तो प्रश्न पडला होता... दिंडीला भाकरी घालायच्या कशातनं? गेल्या वर्षी मळ्यात झालेल्या ज्वारीचं बाचकं तर महिनाभरात संपलं होतं. त्याआधीच्या वर्षातल्या शिलकीच्या दाण्यांवर दिवस कसेबसे रेटणं चाललं होतं. दिंडीसाठी तो शिलकीचा साठा वापरला असता तर... या वर्षी पाऊस झालाच तर पेरायचं काय अन् पीक येईपर्यंत घरी खायचं काय? सांभाळायचं काय? वारकरी की घर? वाडवडिलांपासून माऊलीच्या नावानं मिळालेल्या मळ्यानं दिंडीला जेवू-खाऊ घालायला बळ दिलं होतं. ते बळच सरल्यावर करायचं काय? वारकऱ्याच्या मुखी घालायचं तरी काय? माऊलीचरणाशी पोचण्याची ही एकुलती एक वाट - तीदेखील मोडून टाकायची? मग जगायचं तरी कशासाठी? ना घराला पुरे पडतोय आपण, ना वारकऱ्यांना. लोळागोळा झालेलं हे आयुष्य कडेला पोचविण्याचा हट्ट कशासाठी? चाळीस एकराचा हा मळा चाळीस वारकऱ्यांच्या दिंडीला एक वेळ भाकरीही पुरवणार नसेल तर आपल्याला काय अधिकार आहे हे माऊलीचं धन सांभाळण्याचा? एकाच प्रश्नाची विविध रूपांतील भुतं रोजच फेर धरायला लागली होती.

सैरभैर झालेल्या मनातील वादळ नाहीसं झालं ते अगदीच अनपेक्षितपणे. प्रतापनं - सौदामिनीबाईंच्या भावानं, पालखीच्या चार दिवस आधी ज्वारीची दोन पोती, गव्हाचं एक पोतं, मटकीचं बाचकं स्वतःच्या जीपमधून आणून घरात टाकलं होतं. तेव्हा नाराजीची एक बारीकशी आठी विनायकरावांच्या कपाळी नकळत आलीच होती. पै-पाहुण्यांच्या दारात धान्यासाठी आजवर ते कधीच गेले नव्हते. एवढ्या दुष्काळातदेखील गावातल्या गावात वाढीदिढीनं ज्वारी उधारीवर घेतली होती; पण दहा मैलांवर, कॅनॉल बागायतदार असलेल्या मेव्हण्याकडे ते कधीच हात पसरायला फिरकले नव्हते. आताचं हे कामदेखील सौदामिनीबाईंच्या निरोपानंच झालं असणार, याची त्यांना खात्री होती. ते काही बोलण्याआधीच प्रताप म्हणाला होता, ''दाजी, मी स्वतःहोऊन हे घेऊन आलोय. दिंडीसाठी आणलंय. नाही म्हणून नका. पाहिजे तर वाढीदिढीनं दिलंय असं समजा.'' प्रतापच्या खुलाशानं विनायकरावांना गप्पच बसावं लागलं. माऊलींची इच्छा असेल तर हे ओझंही पुढच्या सुगीपर्यंत वागवलंच पाहिजे, म्हणून ते गप्प बसले. चालत आलेली रीत आता तुटणार नाही, याचं समाधानही या गप्प बसण्यात होतं.

या समाधानातच मारुतीबुवांच्या दिंडीचं पत्र अजून आलं नाही, हे त्यांच्या लक्षात आलंच नाही. दिंडीप्रमुखांचं, पालखीच्या मुक्कामाचं वेळापत्रक कळविणारं पत्र येत असे. इतक्या वर्षांनंतर असं पत्र म्हणजे निव्वळ एक औपचारिकता झाली होती. काही वेळा तर पालखी येऊन गेल्यानंतर अशी पत्रं मिळाली होती. 'पोस्टाचा गहाळपणा असेल यात,' हे घरात सांगत, रिवाजाप्रमाणे विनायकराव पालखीतळावर हजर झाले होते. पालखीदर्शनासाठी, दिंडीला जेवण देण्यासाठी नेहमीप्रमाणे घरातील सगळी जणंच आली होती. पालखीदर्शन झालं. माऊलींच्या पादुकांवर डोकं टेकवून ठरल्या जागी दिंडीकऱ्यांची वाट पाहत सगळे जण थांबले. पोरं मात्र पिपाण्या-रेवड्या घ्यायला पळाली.

विसाव्यासाठी पालखी थांबून तास होत आला, तरी दिंडीतील कुणीच कसं फिरकलं नाही, म्हणून पालखीतळावर एक चक्कर मारून तरी बघावी म्हणून विनायकराव उठले. वारकरी जेवू घालायला, पालखीदर्शनाला आजूबाजूच्या दहा गावांतील माणूस गोळा झालं होतं. मैलभर लांबीच्या रस्त्यावर, बाजूच्या वावरात माणसांचा लोंढा पसरला होता. हौसे, गवसे, नवसे - सगळ्यांचाच पूर आलेला. त्यात भर पडली होती ती फिरत्या दुकानदारांची. रेवडी, फुगेवाल्यांची. हे कमी म्हणून की काय, वारकऱ्यांच्या जेवू घालण्यासाठी ठिकठिकाणी उभारलेल्या



मांडवांची दाटी झाली होती. तिथले लाऊडस्पीकर्स खच्चून किंचाळत होते. आता एक नवं खूळ वाढीला लागलं होतं. वर्षानुवर्षं झाडाच्या सावलीला दिंड्या जेवू घातल्या जात होत्या. तासा-दोन तासांचा तर प्रश्न असे. कोण मांडव टाकणार अन् स्पीकर लावणार? पण गेल्या पाच-सहा वर्षांपासून सगळंच चित्र बदललं होतं. पिढ्यान्‌पिढ्या वारकऱ्यांसाठी भाकरी घेऊन येणाऱ्या विनायकरावांसारख्या अनेक जणांना आताशा पालखीतळावर जागाच मिळायची मारामार होत असे. सहकारी दूध सोसायट्या, संघ, साखर कारखाने यांनी मांडव घालून आधीच जागा अडविलेली असायची. पाण्याचे टँकर, सदासर्वकाळ कोकलत राहणारे लाऊडस्पीकर्स, त्यावरून चेअरमनचा चाललेला उदो उदो... सगळा बाजारच झाला होता! संस्थेच्या खर्चानं वारकऱ्यांना अन्नदान करून स्वतःच्या नावे पुण्य लावण्यासाठी पुढाऱ्यांच्या चाललेल्या स्पर्धा उबग आणणाऱ्या होत्या.

या सगळ्याकडे निर्लेप वृत्तीनं बघण्याची ताकद माऊलींनंच विनायकरावांना दिली होती. त्यामुळेच असल्या बाजारातही माऊलींच्या पादुका मनात वागवत, दिंडीतील कोणी दिसतंय का, याचा शोध घेत ते फिरत होते. दिंडीचं प्रमुखपद गेल्या वर्षीपर्यंत तरी अण्णाबुवांकडे होतं. त्यांचं वय झाल्याचं, ते थकल्याचं गेल्या वर्षीच जाणवलं होतं. म्हणूनच नसत्या शंका मनात घेऊनच विनायकरावांचे डोळे भिरभिरत होते. तोच हिरामण - अण्णाबुवांचा मुलगा दिसला. गेल्या काही वर्षांपासून तो दिंडीत यायला लागला होता. गर्दीतून पुढं सरकत विनायकरावांनी त्याला गाठलं. हातातल्या मोबाइलवर तो कुणाशी तरी बोलण्याचा प्रयत्न करीत असल्याचं दिसत होतं. पाहून न पाहिल्यासारखं करीत निघालेल्या हिरामणला थांबवत विनायकराव म्हणाले,''कुठं पत्ता आहे माऊली? तास झाला वाट बघतोय तिकडं. सगळी मंडळी ताटकळलीत. चला, चला लवकर! अण्णाबुवा कुठं आहेत? दिंडीतील बाकीची मंडळी दिसत नाहीत ती?''

हातातल्या काडीनं दात टोकरत हिरामण म्हणाला,''बुवांनी हातरून धरलंय चार महिन्यांपासनं. ते कशाचं येत्यात आता? पण दिंडी थांबविता येतीय का? वारी चुकवायची नाही म्हणून आम्हीच आलोय बाकीची सगळी जणं. जेवायचं म्हणाल तर विनायकराव, हितनं पुढं आता तुम्ही त्रास घेत जाऊ नका. तुम्हालाबी झेपंनासं झालेलं दिसतंय दिंडीला जेवण घालायचं. तुमच्याच गावच्या भाऊसाहेब शिंद्यांकडे - चेअरमन आहेत जणू ते हितल्या साखर कारखान्याचं - जेवण झालंय आताच. तिकडनंच येतोय बघा आता. बाकीची मंडळी, दिंडीतले लोक आहेत

तिथंच अजून. लाडू-मसालेभाताचं जेवण म्हटल्यावर दोन घास जादा जाणारच की! बाकी सगळं ठीक आहे ना?''

पायाला खिळे ठोकल्यासारखे जागीच उभा राहून गप्प झालेल्या विनायकरावांना पाहून हिरामणच पुढे म्हणाला,''एवढं गप्प का होताय? दिवस बदललं आता विनायकराव. चालायचंच! उसळ-भाकरी खात खातच पांडुरंगाची वारी केली पाहिजे असं कुठं लिहिलंय? चार चांगले घास दिंड्यांच्या मुखी पडणार असतील तर तुम्ही तरी कशाला वाईट वाटून घेताय? माऊलीची सेवा केलीच की तुम्ही इतकी वर्षं! ते कोण विसरणार आहे का? चलतो मी. जरा बाजूला जाऊन फोन लावतो घरी. या गर्दीत काही धडपणानं ऐकायला येईनासं झालंय.''

पाठमोऱ्या हिरामणकडे बघत उभा राहिलेल्या विनायकरावांना एवढ्या गर्दीतही एकटं - आधारहीन झाल्यासारखं वाटायला लागलं. एखाद्या निर्जन माळरानातून चालत आल्यासारखं. बधिरपणानं पाय ओढीत ते घरच्या माणसांपर्यंत पोचले. तिथं वावरातच, ढेकळातच पंगत बसली होती. पंगतीतला एक जणही वारकरी वाटत नव्हता. पत्रावळीवरच्या अन्नब्रह्मात मग्न झालेल्यांकडे रिकाम्या नजरेनं पाहत राहिलेल्या विनायकरावांना विश्राम म्हणाला,''बापू, कुठवर दिंडीवाल्यांची वाट बघत थांबायचं? त्यांची कुठंतरी सोय झाली असणारच बघा. म्हणून आईनं अन् मी विचार केला, पांडुरंगाच्या वाटेवर असणारा तो प्रत्येक जण वारकरीच. टाळ-पताका नसली म्हणून काय झालं? मिळतंय त्यांनाच खायला घालण्यापेक्षा कुठंच सोय नसणाऱ्यांना खायला घातलं तरी सेवा माऊलींचीच होणार आहे ना? बदलत्या दिवसांबरोबर आपणही थोडंसं बदलू या की! तुम्हाला विचारायला येणारच होतो. पण पालखी हलायची वेळ झाली. मग बसा म्हटलं या मंडळींना. माऊली-पांडुरंग घेईल समजून आपल्याला.''

''घेईल समजून नक्कीच! न समजायला तो काय माझ्यासारखा वेडा आहे का?'' असं म्हणत विनायकरावांनी पंगतीत वाढण्यासाठी लापशीचं घमेलं हातात घेतलं होतं.

●●●





# एक्झिट

प्रदीप म. वैद्य

रात्रीचे दोन किंवा काही तरी वाजले होते. तो त्याच्या क्युबिकलमध्ये काम करत बसला होता-त्याच्या खुर्चीत व्यवस्थित रुतून. एक तर तो आकारानं, वजनानं चांगलाच मोठा होता. खुर्ची आता त्याला जरा अपुरीच पडत होती; पण त्या खुर्चीला आता त्याच्या वजनाचं काही वाटत नसे. तिच्यावर असा बसून बसूनच तो वाढत होता. ती त्याच्या वाढीची अगदी निकटची साक्षीदार होती आणि आपणच डिझाईन केलेल्या गेमिंग सॉफ्टवेअरमधला एक-एक बग शोधून काढण्यासाठी असं बसावंच लागतं ना? तेही त्या खुर्चीला माहीत होतं; कारण ती पहिल्यापासूनच या ऑफिसमध्ये होती आणि पहिल्या दिवसापासून तिनं त्याला झेललं होतं. तो गेल्या अनेक रात्री उशिरापर्यंत असाच जागला होता. तसं त्याला काय करायचं होतं घरी जाऊन? तो एकटाच राहत होता. घरी जाऊन जसा पिझ्झा किंवा हॉटेलमधलं खाणं तो मागवू शकत असे, तसाच इथंही फोन करून तो ते मागवू शकत होता. घरी जाऊन एकच गोष्ट त्याला वेगळी करता येत असे, ती म्हणजे बेडवर लोळत टीव्ही पाहणं. ऑफिसमध्ये ही एकच गोष्ट त्याला अशी करता येत नसे. तो एकतर रिक्रिएशन रूममध्ये टीव्ही पाहू शकत असे, नाही तर डायनिंग रूममध्ये जेवू शकत असे किंवा कॉमन रूममध्ये झोपू शकत असे; पण आयुष्यात काही दुःखं माणसाला झेलावीच लागतात ना? बाकी सगळं ऑफिसमध्ये त्याला उपलब्ध होतं. सुसज्ज बाथरूम, जिम्नॅशिअम, कँटिन, खेळायच्या जागा, इनडोअर-आऊटडोअर सगळं

काही... क्षणभर विश्रांतीसाठी झोपायचीसुद्धा सोय होती; पण आजकाल ऑफिसेस अशीच असावी लागतात ना?

त्याला त्याच्याहून भलामोठा पगार होता. तो त्याच्यानं आजपर्यंत कधीच संपवला गेला नव्हता. म्हणजे काय काय मनात येईल एखाद्या माणसाच्या, ते सगळं त्या त्या वेळी ताबडतोब विकत घेऊन टाकलं, समोर दिसेल ते घेतलं, खूप खाल्लं, प्यायलं तरीही पगार आपला शिल्लकच; पण काय करणार, काही गोष्टी अशा उरतातच ना काहीही झालं तरी? तर त्या उरणाऱ्या पगारानं त्याचं एक बँक अकाऊंट असंच भलं मोठं केलं होतं-एखाद्या फुगलेल्या धरणासारखं. आता तो वाटेल ते घेऊ शकत होता. त्यानं स्वप्नात पाहिली नसतील अशी सुखं त्याच्या पायाशी आणि जरा वर म्हणजे मागच्या पाकिटामध्ये उबेत होती. एटीएम, डेबिट आणि क्रेडिट कार्डांच्या रूपानं.

त्यानं की-बोर्डच्या कीज भसाभस दाबल्या, माऊसच्या क्लिका दाबल्या आणि साधारण आणखी दोन तासांत त्याला बग सापडला. त्याचं या आठवड्यासाठी ठरवलेलं काम संपलं होतं. आता पुढं काहीही काम नव्हतं. म्हणजे खुर्चीवरून उठणं आलं; पण कधीकधी काम नसतानाही कष्ट घ्यावे लागतातच ना? तो खूप धडपडीनं उठला. त्यानं मशीन पार्क केलं. मशीन पार्क करण्याआधी, त्याची जी बॉस होती-श्रृणोत्तरा, तिला 'मी काम संपवलं आहे,' अशी मेल इंटर्नल मेसेंजरवर पाठवली. ऑफिसमध्ये ती येताच तिला मिळावी म्हणून. सुरुवातीला ती खूप सेक्सी वाटायची त्याला; पण आता त्याला तसं वाटेनासं झालं होतं. म्हणजे ती तशीच होती, त्याला वाटेनासं झालं होतं. तिच्या नावानं अनेक रात्री घरी तळमळत काढल्या. खऱ्या आयुष्यात त्याच्या विशाल देहामुळे कोणाशीही शक्य नव्हतं त्या शरीरसुखाची, अनेकदा तिच्याशी ते होताना, स्वप्नं पाहिली. बस; पण शेवटी काही गोष्टी अशाच असतात ना, की त्या स्वप्नातच खऱ्या झालेल्या बऱ्या! साधारण सहाच्या सुमाराला तो घरी निघाला. कार्ड स्वाइप करून ऑफिसबाहेर आला. गाडीत बसून आला. घरी शॉवर घेऊन तो झोपला. म्हणजे जरा आडवारला.

आता चार-पाच दिवस तो ऑफिसला नाही गेला तरी चालणार होतं. त्याला जरा झोप लागली. काय करणार, अधूनमधून सर्व सजीवांना झोप घ्यावी लागतेच ना? केव्हा तरी तो जागा झाला. पुन्हा बाथरूममध्ये शिरला. त्यानं पुन्हा शॉवर घेतला आणि आता मात्र त्याच्यापाशी करायला काहीच नव्हतं. तो घरातून बाहेर पडला. गाडी चालवत राहिला. एका मॉलपाशी आला. संपूर्ण मॉलभर फिरला. तिथं एकही वस्तू अशी नव्हती, की जी त्याच्या उपयोगाची किंवा आवडीची आहे; पण त्याच्याकडे ती नाही. तेच ते इंटिरिअर आणि त्याच त्या वस्तू. कंटाळवाणं सारं. मग त्याला वाटलं जरा चालावं. तो मॉलबाहेरच्या हमरस्त्यावरून चालू लागला. खूप माणसं, कुत्री, पोलीस, गाड्या, दुचाकी-चारचाकी... वस्तू, विक्रेते... बराच गोंधळ... आपण या सगळ्यात का आहोत आणि काय करायचं या सगळ्याचं हेच त्याला कळेना. तो आपला परत त्याच्या गाडीत शिरला. गाडी फिरवत राहिला. हमरस्त्यावरून जाता-जाता त्याला आपण शहरातून बाहेर पडत आहोत, असं जाणवलं. तो कधी असा बाहेर पडलाच नव्हता. आता त्याला जरा वळणदार रस्ता दिसू लागला; पण हेही त्याला कुठं तरी पाहिल्यासारखं वाटू लागलं. कार्सचे असंख्य गेम्स त्यानं डिझाईन केले होते. त्या गेम्समध्ये वळणांचा, बोगद्यांचा, पुलांचा रस्ता; पण त्याला हा समोरचा रस्ता जरा बोअरिंगच वाटला. म्हणजे गेम्समधला त्याचा रस्ता कसा स्मूथ होता. या रस्त्यावर गेम्समधले रोड-साइन्स, पोलीस व्हॅन्स, चॅलेंजेस नव्हते, लेव्हल्स नव्हत्या. अशा या नीरस रस्त्याचं पुढं काय होणार हेच त्याला कळेना, तरीही तो गाडी चालवत राहिला.

जरा वेळानं तो एका धबधब्यापाशी आला. बरंचसं पाणी त्यातून उगाचच वाहत होतं. काही तरुण मुलं-मुली त्या धबधब्यात धिंगाणा करत होती. पाणी उडवत भिजत होती. याला मात्र हे असं का करायचं तेच कळेना. धबधबा पाहून या सर्वांना वयाचा, मॅच्युरिटीचा विसर कसा पडतो हेच त्याला कळेना आणि एकमेकांच्या अंगावर पाणी उडवून काय मिळतं तेही. तो गाडी सुरू करून पुढं जात राहिला. पुढं-पुढं त्याला शेतं दिसली, माळरानं दिसली- जी हिरवी-हिरवी दिसत होती. ती सर्व त्यानं डिझाईन करून दिलेल्या सफारी गेममधल्या एकेका ग्रीनरी अँड ग्रास टाइलसारखी दिसत होती. त्याच्या ई-सफारी गेममध्ये ट्वेल्व्ह-एटी रेझोल्युशनला दिसतात इतपत छान ती दिसत होती; पण आता तर नवीन व्हर्जनमध्ये त्यानं त्या टाइल्स अधिक हाय रेझोल्युशनला कॉनफिगर केल्या होत्या. म्हणजे या समोरच्यांपेक्षा जास्त फिनेस! त्याला एकंदरच बोअर व्हायला लागलं. त्यानं कुठंतरी गाडी वळवली आणि तो परत घरी आला.

घरातल्या कॉम्प्युटरवर त्यानं काही गेम्स ठेवले होते, तो ते खेळू लागला; पण त्याला पुन्हा-पुन्हा तेच रस्ते, धबधबे वगैरे दिसले. त्यानं कॉम्प्युटर बंद केला. तो जरा वेळ बाल्कनीत आला. त्याला माणसं आपलं-आपलं काही-काही करण्यात गुंतलेली पाहून काही कळेनासं झालं. आपण काही वर्षांपूर्वी असंच काही तरी करत

बसायचो. ब्रेडच काय विकत आणायचो, भाज्याच काय विकत घ्यायचो. काय नि काय... शी! पैसे का कमवायचे? काम का करायचं? माणूस माणूस म्हणून जे जे काय काय करायचं असं म्हणतात ते का करायचं? का हे सर्व लोक असं काहीही करत बसतात? काहीच त्याला कळेना. त्यानं किचनमध्ये जाऊन कॉफी करायला घेतली. त्याला हाताला जे सापडलं ते त्यानं त्यात घातलं.

तो पुन्हा बाल्कनीत आला. एक जोडपं त्याच्या समोरच्या रस्त्यावरून गेलं. नकळत त्याला श्रृणोत्तराची आठवण झाली. ती आपल्याला का आठवते तेही त्याला कळेना. म्हणजे तिच्याबरोबर आपण काय करणार? सेक्स? लग्न? का हा सगळा कंटाळवाणा खेळ? आणि हे सगळं तरी कसं करणार? बाईचं शरीरच आता बोअर वाटू लागलंय. काय करायचं त्याचं? पुरुषाचं शरीर बोअरिंग असतंच. त्यात आपलं तर जास्तच. पोर्नो गेम्स तयार करताना त्याची नजर मेल्यागत झाली होती. दोन शरीरांचे जे-जे वेडेवाकडे प्रकार शक्य आहेत, ते-ते त्यानं ग्राफिकली घडवले होते. गेम्स करताना नेहमीच त्याला त्या दोन शरीरांच्या जागी श्रृणोत्तरा आणि तो स्वतःच दिसत असे; पण त्यामुळे आता तिच्याही शरीरात काही विशेष उरल्यासारखं वाटत नव्हतं. तरीही ती का आठवते ते त्याला कळेना. मन किती बोअरिंग आहे- त्याच त्या पॅटर्नमध्ये जगत बसतं, असं त्याला वाटून गेलं. इतकं सगळं बोअरिंग जग एक मोठा भूकंप होऊन उद्ध्वस्त का होत नाही, असा विचार त्याच्या मनात आला.

त्यानं नकळत क्षणभर डोळे मिटले. समोरचं सारं त्याला दिसेनासं झालं. त्याला क्षणभर भासलं, की तो एका मोठ्या वर्तुळाच्या केंद्रबिंदूवर उभा आहे आणि सारं जग त्याच्याभोवती फिरतं आहे, ॲस्ट्रॉनॉमीमध्ये त्यानं केलेल्या एका एज्युकेटिव्ह सिम्युलेशन गेमसारखं. म्हणजे खेळणारा त्या गेममध्ये सूर्य झाला, तर त्याला कसं वाटेल तसं; पण मग त्याला एकाच जागी, तेही या सर्वांच्या मध्यावर असणं अवघड वाटू लागलं. कंटाळवाणं वाटू लागलं आणि दृश्यं जरी नव्हती तरी आवाज चालूच होते की! आपण झोपेत असतो तेव्हा किती छान असतं. हे जगसुद्धा झोपून जातं... निदान आपल्यासाठी. आपण झोपेतून जागं का होतो ते त्याला कळेनासं झालं. म्हणजे या उद्ध्वस्त होण्याच्या लायकीच्या जगासाठी जागं होण्यात काय अर्थ आहे, असं त्याला वाटलं. अचानक त्याला एक गेम सुचला. त्यानं डोळे उघडले. मग लगेचच त्यानं त्या गेमविषयीचं प्रोजेक्ट तयार केलं. श्रृणोत्तरानं ते पास केलं. गेममध्ये जगाला उद्ध्वस्त करण्याचा प्लॅन कॉम्प्युटर म्हणजे 'ई-व्हील' या



परग्रहावरचा व्हिलन करतो आहे आणि त्याच्याविरुद्ध एक किंवा दोन प्लेअर्सनी खेळायचं. त्यांनी त्याचा हा डाव परतवून लावायचा, असा गेम.

त्याच्या टीमनं दिलेल्या फास्ट इनपुट्समुळे गेम फास्ट तयार झाला. श्रृणोत्तरा तो गेम खेळली, हरली. जग उद्ध्वस्त झालं. ती खूष झाली. त्याच्याकडे आली. तिनं त्याला मिठी मारून किस केलं. तिच्या कंपनीला खूप प्रॉफिट मिळवून देईल हा गेम, असं ती तेव्हा म्हणाली. होणाऱ्या प्रॉफिटच्या पोत्याला तिनं मिठी मारली आणि किस केलं, असं त्याला वाटून गेलं. श्रृणोत्तरानं नंतर केव्हा तरी त्याला एक ग्रीटिंग कार्ड पाठवलं- ई-कार्ड. ती त्यात म्हणाली होती, की त्यानं तिच्या कंपनीसाठी आतापर्यंत चक्क शंभर गेम्स तयार केले आहेत आणि ती त्याच्या सेलेब्रेशनसाठी सर्वांना पार्टी देणार आहे. पार्टी संपली तेव्हा तो खूप कंटाळला होता. श्रृणोत्तरा आणि त्याचे इतर सहकारी पिऊन तर्रर झाले होते. श्रृणोत्तरा सारखी त्याच्या अंगावर झेपावत होती एवढी तर्रर होती. तिच्या कपड्यांमधून तिचं शरीर बाहेर पडू पाहत होतं. जिथं जिथं जागा होती तिथून आणि नव्हती तिथूनही. तिला तसं आवडतही असे. त्याला मात्र तिच्या त्याच त्या शरीराकडं पाहण्याचा कंटाळा आला. त्याला आता दारूचाही कंटाळा आला होता. तो फार प्यायलाच नाही. दारू काय प्यायची? त्यानं तर्रर काय व्हायचं? कंटाळा आला. त्यानं डोळे मिटले. समोरची पार्टी नाहीशी झाली; पण म्युझिक, श्रृणोत्तराचं बरळणं, सगळे आवाज चालूच राहिले. साधारण तेव्हाच पार्टी संपली तसा तो घरी आला. आता तेच तेच करायचा त्याला कंटाळा आला होता. तो झोपला.

असाच केव्हा तरी तो झोपून उठला. परत झोपला. परत केव्हा तरी उठला. त्यानं स्वतःचं घरचं मशीन पुन्हा चालू केलं. गेमला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत चालला होता त्याबद्दल श्रृणोत्तराची थँक्सची मेल होती. ती त्यानं डिलीट केली. त्यानं नंतर उगाचच बँकेच्या खात्यावरचे व्यवहार पाहिले. बरेच आकडे त्याला दिसले. काही पैसे आले होते, काही गेले होते आणि बरेचसे उरले होते. थोड्याफार साईट्स पाहिल्या; पण थ्रिलिंग असं काहीच नव्हतं. मग त्यानंच डिझाईन केलेला विश्वनाशाचा गेम तो खेळला. आतापर्यंत सर्व जग या गेममध्ये जिंकण्यासाठी धडपडत होतं; पण ते फार कठीण करून ठेवलं होतं त्यानं. त्यात तो जिंकला. त्यात काहीही थ्रिलिंग नाही म्हणून त्यानं गेमचं एक्झिटचं आयकन जोरात क्लिक केलं. मग त्यानं कॉम्प्युटर बंद केला. आपल्या जीवनाप्रमाणेच यातही काही थ्रिलिंग नाही, असं त्याला लक्षात आलं. त्यानं डोळे बंद केले. त्याला बरं वाटलं.

पुढं काही दिवस असेच गेले. ऑफिसमध्ये खुर्चीत रुतून जाऊन त्यानं त्यातले बरेचसे दिवस काढले. त्याला काहीही नवीन वाटलंच नाही. श्रृणोत्तरानं त्याला पार्टनरशिप दिली; पण त्याचा तिलाच आनंद जास्त झाला. याच्या अकाऊंटमध्ये आणखी जास्त पैसे फुगू लागले. अधूनमधून तो डोळे बंद करीत राहिला. त्याला तेवढ्यापुरतं बरं वाटत राहिलं. एके दिवशी तो घरी आला. त्यानं  घरचं मशीन सुरू केलं. लॉग ऑन ते स्वतःहूनच होत असे. त्यानं श्रृणोत्तराला मेल केली. त्याची तिला ही पहिली पर्सनल मेल. त्यानं तीनच शब्द टाईप केले - 'गुड बाय. लव्ह.' त्याला काही तरी विलक्षण वाटलं. त्याला आता खूप थ्रिलिंग वाटलं होतं. आता यापेक्षा कमी थ्रिलिंग काहीही नको होतं. त्यानं कॉम्प्युटर ऑफसुद्धा केला नाही. तो तसाच पलंगावर पडला. मग जरा वेळानं तो उठला. एका कपाटातून त्यानं एक बाटली काढली. त्यातलं काही तरी तो प्यायला आणि पलंगावर पुन्हा पसरला......आणि वारला. त्याच्या चालू कॉम्प्युटरच्या मेसेंजरवर श्रृणोत्तरा त्याला सारखी बझ करत राहिली.

●●●





# कठपुतळी

डॉ. तृप्ती अ. बोरूळकर

श्रमलेल्या चैत्रानं शोभाला कॉफी करायला सांगून बेडवर ताणून दिली. गेले दोन दिवस खूप बिझी होती ती. एक बडा अभिनेता ड्रग्ज घेताना पकडला होता. काकदृष्टीने सनसनाटी 'न्यूज' शोधणाऱ्या तिच्या 'न्यूज आप तक' चॅनलला दोन- तीन दिवसांचा स्टॉकच मिळाला होता. चैत्रा, कॅमेरामनसह दोन दिवस याच कामात बिझी होती. बॉसचा नव्यानं रुजू झालेल्या चैत्रावर विश्वास बसत होता. नवेपणाच्या उत्साहात ही रिपोर्टर चांगलं काम करते, हे त्याच्या लक्षात आलं होतं.

तिचा 'बॉस' दूरदृष्टीचा होता. मार्केटिंग त्याच्या रक्तात भिनलं होतं. आपल्या सहकाऱ्यांच्या गळी ते उतरवण्यात तो यशस्वी व्हायचा. त्यांच्या चॅनलचा टीआरपी नेहमीच जास्त असायचा. हपापल्यासारखा तो न्यूजच्या शोधात असायचा. कोणती गोष्ट 'न्यूज' होऊ शकते याचे त्याचे आडाखे नेहमीच बरोबर असायचे. मॅनेजमेंट त्याच्यावर खूष होती. तो स्वतःवर. शोभाने चैत्राला उठवत फ्रेश व्हायला सांगितलं. जायफळ घालून केलेल्या गरमागरम कॉफीसोबत आवडीचे मटार सामोसे बघून खूष होत चैत्रा म्हणाली, "शोभा यू आर ग्रेट!"

"थोरल्या बाईंचा फोन होता दुपारी. चैत्रा कंटाळून येईल, खायचं तयार ठेव तिच्या आवडीचं म्हणून सांगितलं व्हतं, रात दिस काम, काम," शोभा उत्तरली.

कॉफीचा मस्त वास नाकात भरून घेताना चैत्राला काकू आठवली. छोट्या छोट्या

गोष्टीतही तिची काळजी घेणारी. सततच काम, नवा जॉब म्हणून ताण, खाण्यापिण्याची आबाळ बघून काकूनंच शोभाला 'ट्रेंड' करून पाठवलं होतं. शोभा तिची सगळी काळजी घेई. आपला जॉब, इकडं राहणं आवडत नसूनही काका-काकू सगळी मदत करतात. काका-काकू. आयुष्यभर प्रेमच मिळतंय त्यांच्याकडून. लाड केले. सगळे हट्ट पुरवले. एका ॲक्सिडेंटमध्ये आईबाबा 'ऑन स्पॉट' गेले, तेव्हापासून. चार वर्षांचे तर होतो आपण तेव्हा. अपत्यहीन काका-काकूंनी आपल्या धाकट्या भावाची ही 'ठेव' प्रेमानं वाढवली. त्यांना दुखवून चूक तर नाही करत ना आपण? चैत्राचं विचारचक्र सुरूच होतं.

काका जिल्ह्याच्या ठिकाणी शाळेचे मुख्याध्यापक. काकू शिक्षिका. पत्रकारितेची आवड. महिन्याच्या बजेटमध्ये पुस्तक खरेदीसाठी पैसे ठेवणाऱ्या काकांनी चैत्रावर लहानपणापासून वाचनाचे संस्कार केले. सगळ्या निबंध, वक्तृत्व स्पर्धेत चैत्रा पहिली यायची. आनंदाच्या क्षणी डोळ्यातलं पाणी परतवत काका-काकू कौतुक करत.

५-६ वर्षांमागे काकांनी व्हीआरएस घेऊन वृत्तपत्र सुरू केलं, 'निर्भीड.' गावाकडची शेती विकून पैसा जमवला. कोणत्याही राजकीय पक्षाची कास न धरणारा, वैचारिक-सामाजिक भान ठेवणारा, सवंग-भडकपणा नसणारा पेपर म्हणून बुद्धिजिवी वर्गात चांगलं नाव होतं. खर्चाच्या मानाने उत्पन्न कमीच; पण काकांना काम मनापासून आवडायचं. काकूची साथ होतीच.

कॉलेजात स्पर्धा गाजवत चैत्रानं जर्नालिझमचा कोर्स केला. चॅनल रिपोर्टर व्हायचं खूळ डोक्यात होतंच. ते ग्लॅमरस क्षेत्र तिला खुणवत होतं. जिल्ह्याचं ठिकाण असलं तरी मागासलेला भाग. चैत्रानं मुंबईचा हट्ट धरला. घरच्या वृत्तपत्रात काम करायला नाखूष म्हणून काका-काकूंनी तोही पुरविला. ओळखीनं रेंटेड फ्लॅट बघून थोडे दिवस सोबत राहून काकू गावी गेली.

मुलाखतीच्या वेळी तिचा बायोडेटा पाहत एक जण म्हणाले, "जेधे सरांशी काही नातं आहे का तुमचं?"

"सर, माझे काका आहेत ते. मुलीसारखंच वाढवलं त्यांनी मला."

"सरांसारखा माणूस आजच्या दुनियेत मिळणं कठीणच. त्यांच्या स्टुडंट होतो मी, आजही त्यांचं शिकवणं आठवतं."

काकांच्या विद्यार्थ्यांच्या 'स्ट्राँग रेकमेंडेशनमुळे' तिची निवड या प्रसिद्ध चॅनलसाठी झाली. हळूहळू या दिखाऊ दुनियेत सामावून जायचा प्रयत्न ती करू लागली. पण... मनातली अस्वस्थता संपायची नाही. सुसंस्कारित मनाला टोचत राहायचं. कितीही लपवायचा प्रयत्न केला तरी काका-काकूला तिची घालमेल उमजायची.



भल्या पहाटेच तिचा मोबाईल वाजला. बॉस फोनवर होते. सकाळी लवकरच फ्लाईट पकडून तिला निघायचं होतं. तिथून पुढे टॅक्सीनं 'हॉट स्पॉट'वर. बॉसनी सगळी व्यवस्था करायला सांगितलीच होती. बॉसच्या सूचना ऐकत ती तयारीला लागली.

सकाळी ११ च्या सुमारास सारा देश नव्या बातमीनं ढवळून निघाला. 'धानीची कहाणी.' 'धानी', आठ वर्षांची खेडूत मुलगी. जमीनदाराच्या शेळ्या चरायला घेऊन गेल्यावर तिच्यावर सामूहिक बलात्कार झालेला. खेळण्याच्या वयात गरिबीने लादलेली जबाबदारी पूर्ण करताना अजून एक भयानक सत्याचा विचित्र अनुभव आलेला. दूरवर असणाऱ्या मंदिराच्या पुजाऱ्याची चाहूल लागताच सगळे पळालेले. तेव्हापासून धानी बोलत नव्हती. भीती, लाज, वेदना साऱ्यांचा तिच्या कोवळ्या मनावर परिणाम होऊन तिची वाचाच बंद झाली होती.

लोकांना हादरवून सोडणाऱ्या भाषेत चैत्रा, संजीव सांगत होते. भेदरलेली, डोळ्यांतून पाणी गाळणारी धानी. केविलवाण्या चेहऱ्यानं, फाटक्या कपड्यात, मोडकळीस आलेल्या खोपटात, कोपऱ्यात थरथरणारी धानी. कॅमेरामन चोख काम करत होता. पाहणारा प्रत्येक जण सुन्न होत होता. टीव्हीसमोरून हलायला तयार नव्हता. सास-बहूच्या मालिका सोडून तमाम महिला उसासे टाकत डोळ्यांत पाणी आणत 'न्यूज आपतक' पाहत होत्या.

"धानी, पाहा इकडे, बोल माझ्याशी. काय झालंय तुला? आईशी बोल धानी," संजीव, चैत्रा तिला समजावत होते. त्यांच्याकडे टकमक पाहणारी, कृश, बापुडी धानी सारी जनता पाहत होती. कळवळत होती. कॅमेरा तिच्यावरून, घरावरून, नातेवाइकांवरून, वस्तीवरून फिरत होता. मंदिर, ती जागा परत परत दाखवली जात होती. लोकांना आपल्या चॅनलशी खिळवून ठेवण्यात संजीव, चैत्रा यशस्वी होत होते. ५०-६० उंबरठा असलेलं ते गाव एका दिवसात देशभर प्रसिद्ध झालं.

आजूबाजूच्या गावचे लोक जमा होऊ लागले. पुजाऱ्यानं मंदिराचा नसलेला इतिहास भावनिक शब्दांत टीव्हीवरून सांगितला. देवीचा महिमा सांगणाऱ्या त्याच्या बोलण्यामुळे गावाला गर्दी होऊ लागली. लोक धानीला पाहताना मंदिराला भेट देऊ लागले. तालुक्याहून पोलीस पथक आलं. टीव्हीवरून शोध सुरू आहे. आरोपींना पकडलं जाईल म्हणून सांगू लागलं. दुसऱ्या गावातून डॉक्टरांचं पथक आलं. धानीवर मोफत औषधोपचार करणार असल्याचं त्यांनी चॅनलवरून सांगितलं. गावचा मुखिया अधूनमधून टीव्हीवर झळकू लागला. विरोधी पक्षाची माणसं, सरकारची माणसं जमा झाली. प्रत्येक जण टीव्हीवर दिसण्यासाठी धडपडू लागला. धानीच्या घरच्यांचे करुण शब्दांतले बाईट्स पाहून साऱ्या देशाला कळवळा आला. चोहीकडून धानीसाठी मदतीचा ओघ सुरू झाला. पैसे, धान्य,

शिक्षणासाठी सवलती, कपडे, खाऊ... कितीतरी अनेक लोक, सामाजिक-राजकीय संघटना पुढे आल्या. एनआरआय, ई-मेल्स पाठवू लागले. देशभरातून 'न्यूज आपतक'ला धानीसाठी संदेश आले. खेळाडू, अभिनेते, रंगमंच कलाकार, राजकीय नेते, इंडस्ट्रियलिस्ट सगळेच पुढे झाले. धानीवर 'न भूतो न भविष्यती' मदतीचा वर्षाव झाला. धानी बोलेल का नाही, एवढा एकच प्रश्न पुऱ्या जनतेला पडला.

इकडे मुंबईत 'बॉस' खूष होता. रात्री त्याने सायकिएट्रिस्टची चर्चा चॅनलवर घडवून आणली. धानीवर काय परिणाम झाला असेल? ती बोलेल का? पुढील आयुष्यात त्याचे काय परिणाम असतील? असे अनेक प्रश्न चर्चिले गेले. पानटपरीपासून चकचकीत मॉल्समधल्या, रस्त्यांवरल्या, शाळा-कॉलेजमधल्या, घरातल्या, पार्कमधल्या, झोपडपट्टीतल्या लोकल-बसमधल्या लोकांच्या प्रतिक्रिया बाईट्सच्या रूपाने दाखवल्या जाऊ लागल्या. दुसऱ्या दिवशी राजकीय नेत्यांची चर्चा घडवून आणली, तर संध्याकाळी समाजसुधारकांची.

दोन दिवस सारा देश धानीमय झाला. तिसऱ्या दिवशी धानी बोलली. तिने कुकर्म करणाऱ्यांची नावे सांगितली. फरारींना पकडण्यासाठी पोलीस कार्यरत झाले. साऱ्या देशानं निःश्वास सोडला. महिला संघटना, समाजसुधारक पाठपुरावा करणार असल्याचे सांगू लागले. मुंबईत आल्याबरोबर एअरपोर्टवरूनच चैत्रा-संजीव, कॅमेरामनला हॉटेलमध्ये नेलं. सेलिब्रेशन पार्टी होती. त्या रातोरात प्रसिद्ध झालेल्या सायकिएट्रिस्टनी स्पॉन्सर केलेली. बॉसनी चैत्राचं मनापासून अभिनंदन केलं. तिघांना दोन दिवस ऑफ दिला.

रात्रीच्या जागरणानं चैत्रा उशिराच उठली. सगळ्या तनामनावर शीण होता. फ्रेश होत शोभाच्या हातचं चविष्ट जेवण जेवून ती गेल्या दोन-तीन दिवसांचे पेपर्स चाळू लागली. फ्रंटपेजला धानीचा केविलवाणा, भाबडा चेहरा पाहून तिला गलबललं. तिच्या निरागस डोळ्याला डोळे भिडवताना स्वतःचाच राग येऊ लागला. काय करतोय आपण? टाळूवरचं लोणी खाण्याचाच प्रकार आहे हा. स्वतःला धिक्कारत चैत्रा विचार करू लागली.चैत्राला पहिला दिवस आठवला. आडवळणाच्या रस्त्यानं गेल्यावर धानीची वस्ती सापडली होती. पहिल्यांदा कोणीच माहिती द्यायला तयार नव्हतं. तिनं व संजीवनं समजावून सांगितलं. टीव्हीवर दिसणार वगैरे. तो फाटका वाटणारा धानीचा बाप, त्याचे डोळेच चमकले. सरळ सरळ किती पैसे देणार विचारलं. पटवून सौदा हजारावर सुटला. आयुष्यात शंभराची नोट न बघितलेले ते लोक खूष झाले. सगळी माहिती सांग्रसंगीत सांगितली. तिची आई तर नवी साडी नेसून तयार. सगळं घरदार उत्साहात आलं.

धानी सोडून टीव्हीवाले म्हणून सगळी वस्ती चैत्रा- संजीव- जग्गूला मान देऊ



लागली. भावंडं नट्टापट्टा करायला लागली. मंदिराचा पुजारीही आला. बेरक्या नजरेच्या त्या माणसानं यातला फायदा हेरला. धानीच्या वडिलांना पटवलं. सगळी सूत्रं स्वतःच हातात घेतली. जास्तीत जास्त गरीब दिसायचा प्रयत्न करा, असा सल्ला धानीच्या घरच्यांना दिला. तोपर्यंत आजूबाजूच्या गावात माहिती समजलीच. इतरांनी धानीच्या वडिलांना फूस लावल्यानं रक्कम हजारावरून पाच हजारावर द्यायला लागली. स्थानिक पुढारी येऊन चित्रा-संजीवच्या पुढे पुढे करू लागले. आम्हांलापण टीव्हीवर दाखवा, एवढीच सगळ्यांची मागणी होती. पुजाऱ्यानं वाहत्या गंगेत हात धुऊन घेत मंदिराचा महिमा वर्णन करत भक्तगण मंदिराकडे वळवला. या साऱ्या गडबडीत धानीकडे कोणाचंच लक्ष नव्हतं. मोठी बहीण धानीला मिळणारं महत्त्व पाहून रडूच लागली. माझ्यासोबत का असं झालं नाही, म्हणून रागराग करू लागली. स्वतःची बुद्धी गहाण ठेवल्यासारखी चैत्रा आपलं काम यांत्रिकपणे उरकत होती. स्थानिक डॉक्टर्स, नेते, जमीनदार मंडळी साऱ्यांनी या घटनेचा फायदा उठवला.

दुसऱ्या चॅनलच्या लोकांना माहिती न देण्याची रक्कम चैत्रा-संजीवला चुकवावी लागली-तीसुद्धा स्थानिक नेत्यांना पैसे चारून. यामध्ये धानीचे कुटुंबीय सामील नव्हते. येणाऱ्या मदतीचा ओघही स्थानिक पुढाऱ्यांकडून येऊन नंतर धानीच्या घरच्यांना मिळाला. धानी बोलेल का नाही यावर सट्टा खेळला गेला. दीड कोटीचा. बाकीची माणसं वस्तीवर घिरट्या घालत होतीच.

या साऱ्या प्रसिद्धी, पैशासाठी वखवखलेल्या समाजाचा चैत्रा एक भाग बनून राहिली होती. धानीसारख्या निरागस मुलीच्या आयुष्यात वावटळ आली, पण इतरांना फायदा देऊन गेली. बिचारी धानी नकळत्या वयात कठपुतळीसारखी नाचवली गेली.

चैत्राला आपलं सुरक्षित, प्रेमळ छत्राखालचं बालपण आठवलं. आपण जे जगलोय, जे शिकलोय, जे अनुभवलंय, त्याविरुद्ध आपण जातोय याची तीव्र जाणीव झाली. स्वतःची घृणा येऊ लागली. तिला ढवळून आलं. कशीबशी बेसिनजवळ पोचली.

''जागरणं करायची, नुस्ता कामाचा विचार, व्हायच्याच उलट्या,'' शोभा ओरडलीच.

''शोभा, शरीराबरोबर मनही स्वच्छ झालंय ग.'' चैत्रा फोनकडे जात बोलली. विश्रांतीची वेळ असूनही तिनं गावी काका-काकूंना फोन लावला. 'आपण परत येतोय' ही बातमी ऐकताच त्यांचा येणारा आनंदी स्वर तिच्या कानात रुणझुणू लागला. अधीरतेनं ती फोन उचलण्याची वाट पाहू लागली.

●●●

# परवड

**पोपट कासुर्डे**

ऊन तापाया लागलं व्हतं. सावली पायात घुटमळत व्हती. दिस आग वकत व्हता.भुई इस्तवासारखी भाजत व्हती. तिच्या पोटातून गरम वाफा बाहेर पडत व्हत्या. डोंगरदऱ्यांतल्या नाल्याचं उघडं पडलेलं काळं खडक तहानेनं याकूळ झालं व्हतं. खडकावरील शेवाळाचं उन्हानं भुसकाट बनलं व्हतं. डोंगर फाटलेल्या शालूसारखा निस्तेज झाला व्हता. झाडाझुडपांना पान म्हणून शिल्लक राहिलं नव्हतं. हाडांच्या पिंजऱ्यासारखी उघडीबोडकी झाडं उभी व्हती. चिमणीपाखरांचं आवाज बंद झालं व्हतं. ससा, भेकरासारखी जनावरं एकतर आन-पाण्यावाचून मेली व्हती; न्हायतर डोंगर सोडून गेली व्हती. तसल्या उघड्याबोडक्या डोंगरात आपल्या मुक्या जित्राबाला चारा मिळंल म्हणून गंगा वनवन भटकत व्हता. हैबत्याला चारापाणी शोधत व्हता.

उन्हाच्या लाहीनं गवताची जळून राख झाली व्हती.

अख्ख्या डोंगरात पाण्याचा ठिपूस उरला नव्हता.

मोठी आशा मनाशी धरून गंगा चाळीस कोस वाट तुडवून शेणप्याच्या डोंगरावं आला व्हता. घरातील वैरणकाडी संपली व्हती.

मुकं जनावर असूनही गंगानं हैबतीला पोरासारखं संभाळलं व्हतं, पोटाला आन-पाणी मिळंना म्हणून हैबतीची बारकी बहीण चंद्री गाय आन तिच्या दीड महिन्याच्या वासरानं गोठ्यात टाचा घासून घासून जीव सोडला व्हता. त्या येळी



मुक्या बैलाच्या डोळ्यांतून घळाळा धारा वाहताना गंगानं बघितलं व्हतं. चंद्रीच्या गळ्यात पडून गंगाचं चार वर्सांचं पोर धाय मोकलून रडलं व्हतं.

गंगाला मागलं दिस आठवलं.

...सुकाळ व्हता. हैबतीचं दिस होतं. गव्हाणीतून रोज सकाळी हाराभर उष्टावळ उचलाया लागायची. हैबत्या आन चंद्री चांगला घास तेवढा निवडून खायची. शाळूचा कडबा, वला मका, भुईमुगाचं ढाळं आसलं की मनसोक्त जोगवायची. कुसळाचं गवत, सरमाड याला मात्र तोंडसुदीक लावायची नाहीत. गव्हाणीतून उकिरड्यावर फेकलेल्या त्या उष्टावळीवर गावातील मोकाट जनावरं तुटून पडायची. आज त्याच हैबतीला उकिरड्यावरील उष्टी काडीसुद्धा खायाला मिळत न्हवती. काळच असा पडला व्हता, की स्वतःच्या शेणात भरलेल्या वैरणीची पाचाटंसुद्धा जनावरं आधाशासारखी गिळत व्हती.

हैबतीचीही तीच अवस्था व्हती. काहीच मिळंना. पोटात आग पडाया लागली तेव्हा त्या मुक्या जनावरानं उकिरड्यावरच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या आन फाटक्यातुटक्या चिंध्या गिळाया सुरुवात केली. गंगा भकास नजरेनं ते विदारक चित्र पाहत व्हता; पण त्याचाही इलाज नव्हता. पोटाची खळगी भरणं गरजेचं होतं. आतड्यात काय जातंय याला महत्त्व नव्हतं, काहीतरी 'जातंय' हे महत्त्वाचं. भुकेपुढे कुणाचं काही चालत नव्हतं. हैबतीच्या अंगात फक्त हाडांचा सांगाडा उरला व्हता. कूस खोल गेली व्हती. अंगाच्या मानानं शिंगं थोराड वाटत व्हती. जोराचा वारा आला की त्याचा तोल जाऊ लागला. शिवारात वैरणीची काडी शिल्लक राहिली न्हवती. जनावरं माना टाकू लागली. शेतकऱ्यांना जनावरांचं दुःख बघवंना. तडफड पाहावंना. चारा-पाण्यावाचून उपाशीपोटी मरण्यापरीस पटकीसरशी त्यांचा जीव गेलेला बरा, असं लोकास्नी वाटू लागलं. मातीमोल किमतीनं शेतकरी जनावरं कसायला विकू लागली. कसायांची चंगळ झाली. दिवसाकाठी चार चार ट्रक जनावरं कत्तलखान्याकडं जाऊ लागली. कसायाचा ट्रक गावात आला, की हैबती आपल्या मालकाकडं करुण नजरेनं पाहायचा. त्याचं खोल खोल गेलेलं डोळं गंगाला विचारायचं,''माझी बी हीच गत व्हनार! एक दिवस मलाबी याच टरकात जावं लागनार?'' गंगाचा ऊर भरून यायचा. डोळ्यांत आसवं दाटायची. गंगा हैबतीच्या पाठीवरून हात फिरवत म्हणायचा,''तुला पोरावानी संभाळलं ते का कसायाची धन कराया? आरं, सोताच्या पोराला कोण कसायाला इकतं का?'' गंगानं त्याला पोरासारखं वाढवलं व्हतं म्हणूनच त्याचं ते जित्तेपणीचं मरण त्याला

बघवत नव्हतं.

देव का कोपला कुणाला समजत नव्हतं. गेल्या दोन वर्सांत मिरगापासूनची सारी नक्षत्रं कोरडी गेली व्हती. दोन वर्सांपूर्वी नांगरलेल्या जमिनीवरची ढेकळं जशीच्या तशी उताणी पडून व्हती. दोन आखाड सरलं; पण पावसाचं दोन थेंबसुदीक पडलं नाहीत. जमिनीत दाणा पेरण्याचं धाडस कुणी केलं न्हाय. चारसहा पायल्या बी पेरून मातीत घालण्यापरीस त्यावर चार आठवड्यांची गुजराण करता येईल, असं शेतकऱ्यांचं यवहारी गणित व्हतं.

कणग्यांचं तळ खरवडून झालं व्हतं. चार-दोन किडमुंग्या, दाण्यातली राख आन लिंबाची पानं सोडली तर आत कायसुदिक शिल्लक नव्हतं.

गाडग्या मडक्यांच्या तळाशी यळंकाळंला उप्योगी पडावं म्हणून ठेवलेलं चिपटं-मापटंभर उडीद-मूग तेवढं शिल्लक व्हतं. उडदाचं पातळ माडगं पिऊन गंगा पोटाची खळगी भरत व्हता. गंगाचं इवलंस पोर माडगं पिताना तोंड इस्कटत होतं. पचपचीत माडग्यानं बरबटलेलं त्वांड ते आपल्या कळकटलेल्या खमिसाला पुसत व्हतं. त्याच्या सदऱ्याच्या दोन्ही बाह्या काळ्या मिचकूट झाल्या व्हत्या. बिचारं बिनआयचं वनवासी प्वार!

...गेल्या साली रोजगार हमीच्या कामावर गंगाची कारभारीन जात व्हती. बिचारी सा महिन्यांची पोटुशी व्हती. डोझरनी काढलेली दगडं उचलत व्हती. अचानक भवळ आली, डोझरच्या चाकाखाली चिरडली! बेडकी फुटल्यागत तिचं गरगरीत पोट फुटलं! जित्या मांसाचा गोळा बाहेर पडला. सगळी भुई लाल झाली. गंगा न् गंगाचं पोर पोरकं झालं. ते तीन वर्सांचं शेंबडं पोर न हैबती, चंद्री यांचा संसार गंगानं नेटानं संभाळला.

कारभारीन गेली. कहार दुष्काळ पडला. पोटाला दानापानी मिळंना झालं. माणसांसारखीच जनावरांची गत झाली. दोघांचीबी पोटं पाठीला लागली. वनवन भटकंती सुरू झाली. शिवार भकास झालं. माणसं परागंदा झाली. गावात काम ऱ्हायलं न्हाय.

हैबतीला चारापाणी मिळंना. दावणीत तो टाचा घासू लागला. त्याचं दुख गंगाला बघवंना. त्याच्या पोटापाण्याची यवस्था करणं गरजेच होतं. दूर शेणप्याच्या डोंगरात बऱ्यापैकी चारापाणी हाय असं त्यानं ऐकलं व्हतं. हैबतीला जगायचं आसंल तर तिकडं नेण्यावाचून पर्याय नव्हता.

गंगानं लेकरू पाठीशी बांधलं. हैबतीला दावणीतून मोकळं केलं. हैबत्यात



चालण्यापुरतंही आवसान नव्हतं. गाडगीमडकी पालथी घालून शिल्लक राहिलेला उडीद, मूग एका फडक्यात गुंडाळला. खांद्यावर पोत्याची खोळ टाकली. डोईला टापशी बांधली न हैबतीला घेऊन गंगा शेणप्याची वाट चालू लागला. ...बिन आन-पान्याचं घर सोडलं होतं. हैबत्याच्या पायाइतकच गंगांचंही पाय जडावलं व्हतं. पोटात यट येत व्हतं. डोळ्यांपुढे काळी वर्तुळं नाचत व्हती. अंगात त्राण कसला तो शिल्लक न्हवता. फार शीण आला व्हता. खाली बसलं तर पुन्हा उभं राहण्याइतकंही अंगात आवसान नव्हतं. पोराच्या पोटात कावळं कोकाय लागलं व्हतं. "बा, भाकर..."

पोर राहून राहून बा ला भाकर मागत व्हतं.

गंगा वाटंत एखादं गाव भेटंल या आशेनं पावलं उचलत व्हता. घामानं निथळला व्हता. चालून चालून दमला व्हता.

दिस मावळला.

कडुसं पडायां लागलं; पण गाव काय नजरंच्या टप्प्यात यीना. वाडीवस्ती भेटल्यावर एखाद्याकडं मूठभर मूग देवून एखादी कोर पोरासाठी मिळती का बघावी, असं त्यानं मनाशी ठरवलं व्हतं. मूग कच्चं चावून खाण्याइतकं पोराचं दात निबार नव्हतं. हळूहळू ठार अंधार व्हायाला लागला. गंगा ठेचकाळाय लागला. वाटंत वढा लागला. काळोख दाटला; पण जसजसं चांदणं वाढू लागलं तसं अंधूक अंधूक दिसाया लागलं.

शिवार चिडीचीप झाला. हैबत्याही चालून चालून मेटाकुटीला आला. दमला. वढ्यातच त्यानं बैठक मारली. पांढरंशुभ्र झालेलं वढ्याचं गोटं त्याच्या पोटाला रुतलं. गंगा वढ्यात कुठं पाणी भेटतं का, ते धुंडू लागला. पाठीवरचं पोर अंधाराला घाबराया लागलं. गंगासुदिक मनातून घाबरतच व्हता; पण पोराला धीर देण्यासाठी स्वतः धीट झाला व्हता. पोर 'भाकर भाकर' करत होतं. त्याचं त्वांड टिमणीसारखं झालं व्हतं. सुकलं व्हतं. घसा कोरडा पडला व्हता.

बरंच धुंडल्यावर वढ्यात वाटंपासून दूर करंज्याच्या झाडाखाली एक ढव दिसला. ढवातलं पाणी घाण वास मारत व्हतं, पण इलाज न्हवता. गंगानं पोराला पाठीवरून खाली घेतलं. जमिनीवं पाय टेकताच पोर आधाशासारखं डव्हात वाकलं. दोन्ही गुडघं आन हाताचं तळवं टेकून पोर कोकरासारखं पाणी ढोसू लागलं. अंधारात पाण्यातली घाण दिसत नव्हती; पण नाकाला जाणवत होती. गंगाला ग्लानी आली. उष्ट्या बादलीतल्या पाण्याचा हैबत्यासुदिक वास काढायचा. पाणी पियाचा

न्हाय, आज पोटच्या लेकराला मात्र सडक्या डबक्यातील घाण ढोसावी लागत व्हती. पाणी पिता पिता मध्येच त्याला ठसका लागला. कसलातरी किडा नरड्यात वळवळला! पोराच्या नाकातोंडातून पाणी आलं. किड्याची वळवळ पोटात गेली. किडा आतडी कुरतडू लागला! पोरगं ठाण ठाण बोंबलाय लागलं. गंगानं त्याला पोटाशी धरलं, त्याचं मस्तक हलक्या हातनं चोळलं. सदऱ्यानं पोराचं त्वांड पुसलं. थोड्या येळानं पोराच्या पोटातील वळवळ कमी झाली. गंगानंही दोन वंजळी घाण पोटात ढकलली. पण लगेच त्या घाणीनं त्याला शिसारी झाली. भडाभडा उलटी झाली! नाकाडोळ्यांतनं पाणी आलं.

आता हैबतीच्या पोटाचं बघायचं व्हतं. रात वाढाया लागली व्हती. वढ्याच्या कडंला बऱ्यापैकी झाडी व्हती. त्या झाडांच्या सावलीत एकटं उभं राह्याला पोरगं घाबरत व्हतं. वाळक्या पालापाचोळ्यातनं सळसळ आवाज येत व्हता. दूर कुठूनतरी कोल्हेकुई कानावर पडत व्हती. गंगानं झाडाच्या हाताला येणाऱ्या चार कवळ्या फांद्या काटकन मोडल्या. त्या गोळा केल्या.

इकडं हैबती मालकाला दूर गेलेला बघून कावराबावरा झाला; पण उठण्याइतकंही त्याच्याकडं आवसान नव्हतं.

गंगा पाला घेऊन हैबतीपाशी आला. त्याच्यापुढे टाकला. हैबत्या बसल्या जागेवर त्या पानांवर आधाशासारखा तुटून पडला; पण त्याचंही तोंड सुकलेलं, जीभ कोरडी पडलेली. सुका घास पोटात जायना. ठसका लागू लागला. पाण्याचं चार घोट त्याच्या पोटात जाणं गरजेचं व्हतं. काय करावं ते गंगाला समजेना. भीतीमुळं हैबतीपाशी पोरगंबी एकटं थांबना. शेवटी पोराला पाठीवं बांधलं नि तो डव्हाकडं गेला. खाली वाकून पाण्याची वंजळ भरली. परत फिरला. बोटांच्या फटीतून पाणी झिरपू लागलं. हैबत्यापर्यंत चारच थेंब पोहोचलं. हैबत्यानं आपल्या खरबरीत जिभंनं पाण्यापाई गंगाचा ओला हात चाटला!

गंगाला ती तडफड बघवंना. त्यानं अंगातला सदरा काढला. डव्हात न्हेवून भिजवला. वला सदरा तो हैबत्याच्या मुखात पिळू लागला. हैबती माणसारखं त्वांड वर करून जिभंवर पडणारं पाण्याचं थेंब गिळू लागला. त्यातलं निम्मंअर्धं पाणी नाकातोंडावं पडून खाली सांडू लागलं. काही नाकात जाऊ लागलं. सदराही पिळून झाला. चार बादल्या पाणी पिणाऱ्या हैबत्याचं चार थेंबांनी काय भागतंय! पोटात आग पडली. ती शांत होयना. त्याला बोलता येत नव्हतं, पण आपल्या वेदना ते टापा झाडून व्यक्त करत होतं. भुकेल्या पोरासारखं हांबरत होतं. पाठीवरचं पोर भाकर भाकर करत होतं.

गंगाला पोराच्या भुकंची काळजी लागली. सोबत आणलेलं मूग त्यानं सदऱ्यात बांधलं. सदऱ्याची गाठ पाण्यात सोडली मूग भिजाया लागलं. थोडंसं मव-वलं झाल्यावर पोराला खायाला द्याव्यात, असा त्याचा इचार व्हता.

रात्रीची भयाण शांतता खायाला उठत व्हती. कुठूनतरी घुबडाच्या घुमण्याचा आवाज येत व्हता. हैबतीनं पाला खायचं बंद केलं व्हतं. सागाची पानं त्याच्या पोटात गेली व्हती. पानं आतड्याला पीळ देत व्हती. पोटात आग आग व्हत व्हती. जित्राब वरचेवर ठसकत व्हतं. त्याला कूसबी बदलता येत नव्हती. एकसारख्या ठसक्यानं त्याचं पोट खालीवर होत होतं. गंगाला लाडक्या हैबत्याची ती दैना बघवंना. त्यानं जवळचं उडीद सोडलं, हैबतीपुढं ठेवलं.

हैबती पाणावलेल्या डोळ्यांनी काही क्षण गंगाकडे बघत राहिला. तो मालकाला पुसत होता,''मी उडीद खाल्ल्यावं तुम्ही दोघं काय खाणार?''

गंगानं त्याच्या तोंडावरून हात फिरवला, म्हणाला,''तू जगलास तर आमचं जगणं. जीव जगिवण्यासाठी आज थोडंसं खाल्लंस तर उद्या खंडीनं पिकवून देशील आमाला, खा थोडं.''

हैबतीनं उडदाचा एक घास केला.

मध्यानरात टळून गेली. रातकिड्यांची किरकिरही शांत झाली. पोरगं कुशीत पडून झोपी गेलं. भूक भूक करत त्यानं डोळं मिटलं. डोक्यावरची पोत्याची खोळ गंगानं हैबतीशेजारी अंथरली. पोराला जवळ घेऊन तो आडवा झाला. उघड्या पाठीला चवऱ्या वारा झोंबू लागला. सदरा डव्हात मूग भिजवत व्हता. कानात वारं शिरू लागलं. गंगानं गुडघं पोटाशी लावलं. दोन्ही हातांच्या कोपरात मनगुटं गच आवळून धरलं. गंगाला झोप लागली.

एखादा घंटा गेला आसंल नसंल, कसल्यातरी धडपडीने तो जागा झाला. कुणीतरी आलं व्हतं. त्याच्यासमोर उभं होतं. अंधारात नीटसं कळत नव्हतं; पण समोरची काळी आकृती हल्ला करण्याच्या बेतात व्हती. त्या भयानक आकृतीकडं पाहून गंगाला दरदरून घाम फुटला. तो हाबकला. तोंडातून एक शब्दही फुटंना. पोराला त्यानं छातीशी गच्च आवळून धरलं! बैलाची धडपड झाली. हैबत्या फुस्कारला आन् अंगात कसलं करी बळ आल्यासारखा ताटकन उभा राह्यला. त्याबरोबर सामनी उभा असलेला चट्ट्यापट्ट्याचा तरस पेकाट वढत आल्या वाटंनं धूम पळाला...!

गंगाच्या काळजाची धडधड अजून शांत झाली नव्हती. आता डव्हावर जाऊन मूग आनन्याचं धाडस गंगामध्ये उरलं नव्हतं; पण मूग टाकून पुढं निघावं तर पोटाची पंचाईत व्हनार व्हती. सकाळपासून पोराच्याबी पोटात अन्नाचा कणसुदिक गेला नव्हता. थंडीत कुडकुडत गंगानं हैबत्याशेजारीच रात काढली.

झुंजूमुंजू झालं.

पोराला पाठीवं टाकून तो डव्हाकडं गेला.

खमिसाची गाठ डव्हातनं वर काढली. खमिसाच्या चिंध्या झालेल्या! बांधलेल्या गाठीच्या चाण्या लोंबत व्हत्या. मुगाचा एक दाणाबी शिल्लक नव्हता. खेकड्यांनी डाव साधला व्हता.

गंगानं कपाळावं हात मारून घेतला. त्याला भडभडून आलं. अंगात घालता न येण्यासारखं वलं धडूत त्यानं गारठलेल्या अंगात चढवलं. थंडीनं अंगावं काटा उभा राह्यला. प्वार बाच्या तोंडाकडं बघाय लागलं. ''बा, पाणी!''

गंगाच्या डोळ्यांतून घळाळा पाणी वाहू लागलं. पोरानं 'बा'ची गालावरून ओघळणारी ऊन आसवं जिभेनं टिपली!

''बा, भाकर!''

गंगाला हुंदका अनावर झाला!!

...उजाडलं.

गंगा पोराची समजी घालत हैबतीजवळ आला. रातच्या इश्रांतीनं हैबतीला जरा तकवा आला व्हता. तो मालकाबरं चालू लागला. दिस हळूहळू वर यवू लागला. पोराच्या अंगात कणकणी वाढू लागली. ताप भरला. गंगाच्या पाठीला तो जाणवू लागला. त्यानं पोर पाठीवरून खाली घेतलं. पोराच्या कपाळावं हात ठेवून पाह्यलं. कपाळ भाजत व्हतं, आंग हुडहुडायला लागलं व्हतं. त्याला थंडी सहन होत नव्हती.

दिस डोक्यावं आला. उन्हाची तिरिपी वाढली. वाटंत गाव लागलं. गंगा डाक्टर शोधू लागला; पण एकबी दार उघडं दिसंना! कुत्री-कोंबडी कुणी म्हणून रस्त्यावर फिरकंना. कड्याकुलपं लावून लोकं दुष्काळाला वैतागून परागंदा झाली व्हती!

एका घराशेजारच्या कोठरात गंगाला थोडंसं चघाळ दिसलं. बहुधा तिथं अगोदर गवताची गंज असावी. मालकानं साफ चोखळून तिथून वैरण हालवली व्हती. गवताच्या चार-दोन काड्या इकडंतिकडं पडलेल्या दिसत व्हत्या.

हैबती पुढं झाला. शोधून शोधून काड्या गिळू लागला. एकएका काडीसाठी



मूठ मूठ माती जिभंला लागून पोटात जाऊ लागली!

हैबतीनं माती गिळून प्वाट भरलं.

चिंध्या पांघरलेला गंगा एखाद्या भिकाऱ्यासारखा भासत व्हता.

पुढची वाट सुरू झाली.

पोर 'बा, भाकर' करत व्हतं, गंगा त्याला ऊन आसवं देत होता.

पोराचा ताप वाढतच व्हता.

दुपार टळून गेली.

दिस मावळतीकडं झुकला. शेणप्याचा डोंगर आवाक्यात यायला लागला. उद्या सकाळी सकाळी आपण डोंगरावं पोचू, अशी आशा वाटू लागली. 'एकदा डोंगरावं गेलं की झाडपाला, गवातकुसाळ खाऊन हैबती जगंल, पोराला इकडची तिकडची जांभळं, करवांदं देता येत्याल. आपल्याही पोटात रानफळं कोंबता यतील.' तो स्वतःशीच म्हणाला.

पण काळोख दाटू लागला तसं पोर तापानं बेफाम झालं. घेरी आली, बेशुद्ध पडलं!

आसपास माणसांची ना वस्ती, ना वावर. गंगाच्या जिवाची उलघाल सुरू झाली. पोराला वढ्याचं पाणी बादलं, पोटात गेलेल्या किडकानं पोराची आतडी खाल्ली. डाक्तर-दवाखाना काहीच जवळपास न्हाय. पोटच्या गोळ्याची तडफड पाहून गंगा बेचैन झाला. त्वांड आपल्याच हातानं बडवून घेऊ लागला! नशिबाला थपडा देऊ लागला. पोरानं हातपाय ताणलं.

तोंडातून फेस बाहेर आला.

''बा, भाऽकरऽऽ!''

पोराचं डोळं उघडंच राह्यलं!

जीव उडून गेला!!

हैबत्याच्या - मुक्या जनावराच्या डोळ्यांतून घळाळा टिपं आली. गंगानं ऊर बडवून घेतला. धाय मोकलून रडला!

पोराचं मढं मांडीवं घेतलं. बसला.

रडून रडून आसवं संपली.

मग उठला.

वाटंकडंला जागा बघितली. पोरासाठी खड्डा उकरला. माती दिली! शेणप्याचा डोंगर समोर दिसत व्हता; पण पोर एकटं टाकून जावं वाटंना.

रात झालीच व्हती. हैबतीसह दोघांनी रात तिथंच काढली. पोर मेलं. पोराबरोबर गंगाची भूक मेली!

दोन वर्सांपूर्वी काळानं बायकू नेली. आता पोरगं नेलं!

गंगा उठला. पोराची आठवण म्हणून चिमूटभर माती खमिसाच्या चिंधीत बांधली. हैबत्याला घेऊन तो पुढं जायाला निघाला; पण हैबत्या जागचा उठंना. बुजवलेल्या खड्ड्याकडे एकटक पाहत होता. आसवं ढाळत व्हता.

गंगाला म्हणत व्हता, "माझ्या बारक्या भावंडाला इथं एकटा टाकून मी पुढं कसा येऊ?"

गंगाला हैबत्याचं मन कळत होतं.

त्यानं हैबतीला सांगितलं, "एक प्वार मातीआड गेलं ते गेलं. आता तुझ्यावर तरी भूक भूक करत ती येळ येवू ने."

गंगानं हैबतीच्या पाठीवर थाप टाकली. तो चल म्हणाला. ते इमानदार जनावर उठून चालू लागलं.

चालून चालून पीठ झाल्यावर शेणप्याचा डोंगर आला. लांबून इवलासा वाटणारा तो डोंगर भला मोठा, ऊचच्या उच व्हता.

पण डोंगरानं साऱ्या आशेवर पाणी फिरवलं. डोंगर पुरा उघडाबोडका झालेला.

झाडाझुडपांवरचा पालाही ओरबडून नेलेला. गवताची जळून राख झालेली! वणव्यानं गवत गिळल्यालं! सगळं भकास! उघडी बोडकी काळी दगडं!

गंगाच्या तोंडचं पाणी पळालं. काय करावं सुचंना.

डोंगर चढता चढता त्याला धाप लागू लागली. तोंडातली वल आटलेली.

हैबतीच्या नख्या मोकळ्या खड्यांवरून घसरू लागल्या. तो भेलकांडू लागला.

वरच्या नाकाडावर वाळलेलं पांढरं गवत दिसत व्हतं, पण वाट बिकट व्हती. जाणं आवघड व्हतं. नाकाड सरळ होतं. जरा तोल गेला तर कड्यावरून खाली खोल दरीत कोसळावं लागणार व्हतं. हैबत्याच्या डोळ्यावं घेरी येत व्हती; पण पोटाच्या आगीपुढं इलाज चालत नव्हता. काय सुचत नव्हतं.

गंगाचा इलाजच खुटला व्हता. त्याला तहानभूक लागतच नव्हती. तो दुःख पिऊन जगत व्हता.

हैबत्यानंही पोरासारखं भूक भूक करून मरू नये म्हणून हैबतीला नाकाडावर



घेऊन जायचं धाडस करायचं त्यानं ठरवलं, एकदा वर पोचलं की काळजी नव्हती. नाकाडावरचं पांढरंशुभ्र गवात खालून दिसत व्हतं. हैबत्यानं चार घास पोटात टाकल्यावर त्याला तकवा यनार व्हता. आजचा दिस कठनार व्हता.

हैबत्या नाकाडावरची सरळसोट वाट चढू लागला. दमादमानं एक एक पाऊल उचलू लागला. स्वतःचं धूड त्याच्या पावलांना जड वाटाया लागलं. जसजसं वर जावं तसतसं अंगातलं अवसान कमी होऊ लागलं. हैबत्याच्या डोळ्यांवर झापड यऊ लागली. त्याला तोल सावरणं कठीण वाटू लागलं. वाटंच्या दोन्ही बाजूनं सरळसोट खाली गेलेलं काळंभिन कडं दिसाया लागलं. खाली खोल दरी. वाट तर यवढी आरुंद की हैबतीनं थोडा येळ बसावं म्हटलं तरी एकीकडं तोल जाणार. खाली कोसळणार!

गंगाच्या पोटात कालवाकालव सुरू झाली. तो देवाची करुणा भाकू लागला... "बायकू गेली, प्वार गेलं. संसाराची परवड झाली! एवढा एकच आधार बाकी हे. त्यालातरी वाचव देवा!"

हैबतीचं अवसान गळालं. जनावर पाय न उचलता एका जागेवर उभं राह्यलं. गंगा बगलं-बगलंनं त्याच्या मागून पुढं झाला. बैलाच्या गळ्यातील कंड्याला धरून त्याला वर वढू लागला. "माझ्या मागं ये बाप्पा. उलिसीच चढण बाकी हाय." पण हैबत्याचं बळ संपलं व्हतं. तो मालकाकडं हतबल होऊन बघू लागला. त्याचं आत गेलेलं डोळं पाणावलं. गंगाला भडभडून आलं. हैबत्याचं पाय थरथरू लागलं. भीतीची जोरदार कळ गंगाच्या मस्तकात उमटली. दोन्ही बाजूंच्या खोल दऱ्या एखाद्या राक्षसासारख्या अक्राळविक्राळ भासू लागल्या. हैबतीचं उभं राह्यचंही अवसान संपलं. गंगाचं अंग घामानं भिजलं. हैबतीच्या डोळ्यांवर घेरी आली. गंगा त्याला सावरू लागला, पण एवढं मोठं धूड सावरणं त्याच्या आवाक्यापलीकडचं होतं. बैलाचा पाय निसटला. तोल गेला! ते धूड दाणकन एका कुशीवर आपटलं! हैबतीनं हंबरडा फोडला! डोंगरावरून सुटलेला धोंडा दणादण आपटया खात पायथ्याकडे जावा तसं हैबतीचं धूड कड्यावरून आदळत आपटत दरीत कोसळलं!! त्याचा आर्त हंबरडा दरीत घुमला! कड्यावरचा कातळ लाल झाला! गंगाला ते दुःख सहन झालं नाही. हैबत्यासाठी त्यानं जिवाचं रान केलं व्हतं. संसाराची वाताहात झाली तरी तो हैबत्याच्या जिवासाठी धडपडत व्हता.

त्याला हुंदका आवरंना!

दुःख सहन होईना!

आता कुणासाठी जगायचं?

तो पोरका झाला व्हता. असं पोरकं जिणं त्याला पसंत नव्हतं! बायका-पोरांच्या आन हैबतीच्या आठवणींवर जगण्यापरीस मरान बरं!

हैबत्याच्या रक्तानं लाल झालेला कातळ त्याला खुणवू लागला!

टकुरं गरगराया लागलं! डोळ्यापुढं काळी वर्तुळं नाचाय लागली!

अन्

दुसऱ्याच क्षणी त्यानं स्वतःला खाली झोकून दिलं!!

कड्यावरच्या कातळावरून त्याचं धूड चेंडूसारखं आदळत आपटत दरीत कोसळलं!!

कातळावरील हैबत्याच्या रक्तात गंगाचं रगात मिसळलं...!!!

●●●



चालण्यापुरतंही आवसान नव्हतं. गाडगीमडकी पालथी घालून शिल्लक राहिलेला उडीद, मूग एका फडक्यात गुंडाळला. खांद्यावर पोत्याची खोळ टाकली. डोईला टापशी बांधली न हैबतीला घेऊन गंगा शेणप्याची वाट चालू लागला. ...बिन आन-पान्याचं घर सोडलं होतं. हैबत्याच्या पायाइतकच गंगांचंही पाय जडावलं व्हतं. पोटात यट येत व्हतं. डोळ्यांपुढे काळी वर्तुळं नाचत व्हती. अंगात त्राण कसला तो शिल्लक न्हवता. फार शीण आला व्हता. खाली बसलं तर पुन्हा उभं राहण्याइतकंही अंगात आवसान नव्हतं. पोराच्या पोटात कावळं कोकाय लागलं व्हतं. "बा, भाकर..."

पोर राहून राहून बा ला भाकर मागत व्हतं.

गंगा वाटंत एखादं गाव भेटंल या आशेनं पावलं उचलत व्हता. घामानं निथळला व्हता. चालून चालून दमला व्हता.

दिस मावळला.

कडुसं पडायां लागलं; पण गाव काय नजरंच्या टप्प्यात यीना. वाडीवस्ती भेटल्यावर एखाद्याकडं मूठभर मूग देवून एखादी कोर पोरासाठी मिळती का बघावी, असं त्यानं मनाशी ठरवलं व्हतं. मूग कच्चं चावून खाण्याइतकं पोराचं दात निबार नव्हतं. हळूहळू ठार अंधार व्हायाला लागला. गंगा ठेचकाळाय लागला. वाटंत वढा लागला. काळोख दाटला; पण जसजसं चांदणं वाढू लागलं तसं अंधूक अंधूक दिसाया लागलं.

शिवार चिडीचीप झाला. हैबत्याही चालून चालून मेटाकुटीला आला. दमला. वढ्यातच त्यानं बैठक मारली. पांढरंशुभ्र झालेलं वढ्याचं गोटं त्याच्या पोटाला रुतलं. गंगा वढ्यात कुठं पाणी भेटतं का, ते धुंडू लागला. पाठीवरचं पोर अंधाराला घाबराया लागलं. गंगासुदिक मनातून घाबरतच व्हता; पण पोराला धीर देण्यासाठी स्वतः धीट झाला व्हता. पोर 'भाकर भाकर' करत होतं. त्याचं त्वांड टिमणीसारखं झालं व्हतं. सुकलं व्हतं. घसा कोरडा पडला व्हता.

बरंच धुंडल्यावर वढ्यात वाटंपासून दूर करंज्याच्या झाडाखाली एक ढव दिसला. ढवातलं पाणी घाण वास मारत व्हतं, पण इलाज न्हवता. गंगानं पोराला पाठीवरून खाली घेतलं. जमिनीवं पाय टेकताच पोर आधाशासारखं डव्हात वाकलं. दोन्ही गुडघं आन हाताचं तळवं टेकून पोर कोकरासारखं पाणी ढोसू लागलं. अंधारात पाण्यातली घाण दिसत नव्हती; पण नाकाला जाणवत होती. गंगाला ग्लानी आली. उष्ट्या बादलीतल्या पाण्याचा हैबत्यासुदिक वास काढायचा. पाणी पियाचा

न्हाय, आज पोटच्या लेकराला मात्र सडक्या डबक्यातील घाण ढोसावी लागत व्हती. पाणी पिता पिता मध्येच त्याला ठसका लागला. कसलातरी किडा नरड्यात वळवळला! पोराच्या नाकातोंडातून पाणी आलं. किड्याची वळवळ पोटात गेली. किडा आतडी कुरतडू लागला! पोरगं ठाण ठाण बोंबलाय लागलं. गंगानं त्याला पोटाशी धरलं, त्याचं मस्तक हलक्या हातनं चोळलं. सदऱ्यानं पोराचं त्वांड पुसलं. थोड्या येळानं पोराच्या पोटातील वळवळ कमी झाली. गंगानंही दोन वंजळी घाण पोटात ढकलली. पण लगेच त्या घाणीनं त्याला शिसारी झाली. भडाभडा उलटी झाली! नाकाडोळ्यांतनं पाणी आलं.

आता हैबतीच्या पोटाचं बघायचं व्हतं. रात वाढाया लागली व्हती. वढ्याच्या कडंला बऱ्यापैकी झाडी व्हती. त्या झाडांच्या सावलीत एकटं उभं राह्याला पोरगं घाबरत व्हतं. वाळक्या पालापाचोळ्यातनं सळसळ आवाज येत व्हता. दूर कुठूनतरी कोल्हेकुई कानावर पडत व्हती. गंगानं झाडाच्या हाताला येणाऱ्या चार कवळ्या फांद्या काटकन मोडल्या. त्या गोळा केल्या.

इकडं हैबती मालकाला दूर गेलेला बघून कावराबावरा झाला; पण उठण्याइतकंही त्याच्याकडं आवसान नव्हतं.

गंगा पाला घेऊन हैबतीपाशी आला. त्याच्यापुढे टाकला. हैबत्या बसल्या जागेवर त्या पानांवर आधाशासारखा तुटून पडला; पण त्याचंही तोंड सुकलेलं, जीभ कोरडी पडलेली. सुका घास पोटात जायना. ठसका लागू लागला. पाण्याचं चार घोट त्याच्या पोटात जाणं गरजेचं व्हतं. काय करावं ते गंगाला समजेना. भीतीमुळं हैबतीपाशी पोरगंबी एकटं थांबना. शेवटी पोराला पाठीवं बांधलं नि तो डव्हाकडं गेला. खाली वाकून पाण्याची वंजळ भरली. परत फिरला. बोटांच्या फटीतून पाणी झिरपू लागलं. हैबत्यापर्यंत चारच थेंब पोहोचलं. हैबत्यानं आपल्या खरबरीत जिभनं पाण्यापाई गंगाचा ओला हात चाटला!

गंगाला ती तडफड बघवंना. त्यानं अंगातला सदरा काढला. डव्हात न्हेवून भिजवला. वला सदरा तो हैबत्याच्या मुखात पिळू लागला. हैबती माणसारखं त्वांड वर करून जिभंवर पडणारं पाण्याचं थेंब गिळू लागला. त्यातलं निम्मंअर्धं पाणी नाकातोंडावं पडून खाली सांडू लागलं. काही नाकात जाऊ लागलं. सदराही पिळून झाला. चार बादल्या पाणी पिणाऱ्या हैबत्याचं चार थेंबांनी काय भागतंय! पोटात आग पडली. ती शांत होयना. त्याला बोलता येत नव्हतं, पण आपल्या वेदना ते टापा झाडून व्यक्त करत होतं. भुकेल्या पोरासारखं हांबरत होतं. पाठीवरचं पोर



भाकर भाकर करत होतं.

गंगाला पोराच्या भुकंची काळजी लागली. सोबत आणलेलं मूग त्यानं सदऱ्यात बांधलं. सदऱ्याची गाठ पाण्यात सोडली मूग भिजाया लागलं. थोडंसं मव-वलं झाल्यावर पोराला खायाला द्याव्यात, असा त्याचा इचार व्हता.

रात्रीची भयाण शांतता खायाला उठत व्हती. कुठूनतरी घुबडाच्या घुमण्याचा आवाज येत व्हता. हैबतीनं पाला खायचं बंद केलं व्हतं. सागाची पानं त्याच्या पोटात गेली व्हती. पानं आतड्याला पीळ देत व्हती. पोटात आग आग व्हत व्हती. जित्राब वरचेवर ठसकत व्हतं. त्याला कूसबी बदलता येत नव्हती. एकसारख्या ठसक्यानं त्याचं पोट खालीवर होत होतं. गंगाला लाडक्या हैबत्याची ती दैना बघवंना. त्यानं जवळचं उडीद सोडलं, हैबतीपुढं ठेवलं.

हैबती पाणावलेल्या डोळ्यांनी काही क्षण गंगाकडे बघत राहिला. तो मालकाला पुसत होता, "मी उडीद खाल्ल्यावं तुम्ही दोघं काय खाणार?"

गंगानं त्याच्या तोंडावरून हात फिरवला, म्हणाला, "तू जगलास तर आमचं जगणं. जीव जगिवण्यासाठी आज थोडंसं खाल्लंस तर उद्या खंडीनं पिकवून देशील आमाला, खा थोडं."

हैबतीनं उडदाचा एक घास केला.

मध्यानरात टळून गेली. रातकिड्यांची किरकिरही शांत झाली. पोरगं कुशीत पडून झोपी गेलं. भूक भूक करत त्यानं डोळं मिटलं. डोक्यावरची पोत्याची खोळ गंगानं हैबतीशेजारी अंथरली. पोराला जवळ घेऊन तो आडवा झाला. उघड्या पाठीला चवऱ्या वारा झोंबू लागला. सदरा डव्हात मूग भिजवत व्हता. कानात वारं शिरू लागलं. गंगानं गुडघं पोटाशी लावलं. दोन्ही हातांच्या कोपरात मनगुटं गच आवळून धरलं. गंगाला झोप लागली.

एखादा घंटा गेला आसंल नसंल, कसल्यातरी धडपडीने तो जागा झाला. कुणीतरी आलं व्हतं. त्याच्यासमोर उभं होतं. अंधारात नीटसं कळत नव्हतं; पण समोरची काळी आकृती हल्ला करण्याच्या बेतात व्हती. त्या भयानक आकृतीकडं पाहून गंगाला दरदरून घाम फुटला. तो हाबकला. तोंडातून एक शब्दही फुटंना. पोराला त्यानं छातीशी गच्च आवळून धरलं! बैलाची धडपड झाली. हैबत्या फुस्कारला आन् अंगात कसलं करी बळ आल्यासारखा ताटकन उभा राह्यला. त्याबरोबर सामनी उभा असलेला चट्ट्यापट्ट्याचा तरस पेकाट वढत आल्या वाटंनं धूम पळाला...!

गंगाच्या काळजाची धडधड अजून शांत झाली नव्हती. आता डव्हावर जाऊन मूग आनऱ्याचं धाडस गंगामध्ये उरलं नव्हतं; पण मूग टाकून पुढं निघावं तर पोटाची पंचाईत व्हनार व्हती. सकाळपासून पोराच्याबी पोटात अन्नाचा कणसुदिक गेला नव्हता. थंडीत कुडकुडत गंगानं हैबत्याशेजारीच रात काढली.

झुंजूमुंजू झालं.

पोराला पाठीवं टाकून तो डव्हाकडं गेला.

खमिसाची गाठ डव्हातनं वर काढली. खमिसाच्या चिंध्या झालेल्या! बांधलेल्या गाठीच्या चाण्या लोंबत व्हत्या. मुगाचा एक दाणाबी शिल्लक नव्हता. खेकड्यांनी डाव साधला व्हता.

गंगानं कपाळावं हात मारून घेतला. त्याला भडभडून आलं. अंगात घालता न येण्यासारखं वलं धडूत त्यानं गारठलेल्या अंगात चढवलं. थंडीनं अंगावं काटा उभा राह्यला. प्वार बाच्या तोंडाकडं बघाय लागलं. "बा, पाणी!"

गंगाच्या डोळ्यांतून घळाळा पाणी वाहू लागलं. पोरानं 'बा'ची गालावरून ओघळणारी ऊन आसवं जिभेनं टिपली!

"बा, भाकर!"

गंगाला हुंदका अनावर झाला!!

...उजाडलं.

गंगा पोराची समजी घालत हैबतीजवळ आला. रातच्या इश्रांतीनं हैबतीला जरा तकवा आला व्हता. तो मालकाबरं चालू लागला. दिस हळूहळू वर यवू लागला. पोराच्या अंगात कणकणी वाढू लागली. ताप भरला. गंगाच्या पाठीला तो जाणवू लागला. त्यानं पोर पाठीवरून खाली घेतलं. पोराच्या कपाळावं हात ठेवून पाह्यलं. कपाळ भाजत व्हतं, आंग हुडहुडायला लागलं व्हतं. त्याला थंडी सहन होत नव्हती.

दिस डोक्यावं आला. उन्हाची तिरिपी वाढली. वाटंत गाव लागलं. गंगा डाक्टर शोधू लागला; पण एकबी दार उघडं दिसंना! कुत्री-कोंबडी कुणी म्हणून रस्त्यावर फिरकंना. कड्याकुलपं लावून लोकं दुष्काळाला वैतागून परागंदा झाली व्हती!

एका घराशेजारच्या कोठरात गंगाला थोडंसं चघाळ दिसलं. बहुधा तिथं अगोदर गवताची गंज असावी. मालकानं साफ चोखळून तिथून वैरण हालवली व्हती. गवाताच्या चार-दोन काड्या इकडंतिकडं पडलेल्या दिसत व्हत्या.

हैबती पुढं झाला. शोधून शोधून काड्या गिळू लागला. एकएका काडीसाठी



मूठ मूठ माती जिभंला लागून पोटात जाऊ लागली!

हैबतीनं माती गिळून प्वाट भरलं.

चिंध्या पांघरलेला गंगा एखाद्या भिकाऱ्यासारखा भासत व्हता.

पुढची वाट सुरू झाली.

पोर 'बा, भाकर' करत व्हतं, गंगा त्याला ऊन आसवं देत होता.

पोराचा ताप वाढतच व्हता.

दुपार टळून गेली.

दिस मावळतीकडं झुकला. शेणप्याचा डोंगर आवाक्यात यायला लागला. उद्या सकाळी सकाळी आपण डोंगरावं पोचू, अशी आशा वाटू लागली. 'एकदा डोंगरावं गेलं की झाडपाला, गवतकुसाळ खाऊन हैबती जगंल, पोराला इकडची तिकडची जांभळं, करवांदं देता येत्याल. आपल्याही पोटात रानफळं कोंबता यतील.' तो स्वत:शीच म्हणाला.

पण काळोख दाटू लागला तसं पोर तापानं बेफाम झालं. घेरी आली, बेशुद्ध पडलं!

आसपास माणसांची ना वस्ती, ना वावर. गंगाच्या जिवाची उलघाल सुरू झाली. पोराला वढ्याचं पाणी बादलं, पोटात गेलेल्या किडकानं पोराची आतडी खाल्ली. डाक्तर-दवाखाना काहीच जवळपास न्हाय. पोटच्या गोळ्याची तडफड पाहून गंगा बेचैन झाला. त्वांड आपल्याच हातानं बडवून घेऊ लागला! नशिबाला थपडा देऊ लागला. पोरानं हातपाय ताणलं.

तोंडातून फेस बाहेर आला.

"बा, भाऽकरऽऽ!"

पोराचं डोळं उघडंच राह्यलं!

जीव उडून गेला!!

हैबत्याच्या - मुक्या जनावराच्या डोळ्यांतून घळाळा टिपं आली. गंगानं ऊर बडवून घेतला. धाय मोकलून रडला!

पोराचं मढं मांडीवं घेतलं. बसला.

रडून रडून आसवं संपली.

मग उठला.

वाटंकडंला जागा बघितली. पोरासाठी खड्डा उकरला. माती दिली! शेणप्याचा डोंगर समोर दिसत व्हता; पण पोर एकटं टाकून जावं वाटंना.

रात झालीच व्हती. हैबतीसह दोघांनी रात तिथंच काढली. पोर मेलं. पोराबरोबर गंगाची भूक मेली!

दोन वर्सांपूर्वी काळानं बायकू नेली. आता पोरगं नेलं!

गंगा उठला. पोराची आठवण म्हणून चिमूटभर माती खमिसाच्या चिंधीत बांधली. हैबत्याला घेऊन तो पुढं जायाला निघाला; पण हैबत्या जागचा उठंना. बुजवलेल्या खड्ड्याकडे एकटक पाहत होता. आसवं ढाळत व्हता.

गंगाला म्हणत व्हता,''माझ्या बारक्या भावंडाला इथं एकटा टाकून मी पुढं कसा येऊ?''

गंगाला हैबत्याचं मन कळत होतं.

त्यानं हैबतीला सांगितलं,''एक प्वार मातीआड गेलं ते गेलं. आता तुझ्यावर तरी भूक भूक करत ती येळ येवू ने.''

गंगानं हैबतीच्या पाठीवर थाप टाकली. तो चल म्हणाला. ते इमानदार जनावर उठून चालू लागलं.

चालून चालून पीठ झाल्यावर शेणप्याचा डोंगर आला. लांबून इवलासा वाटणारा तो डोंगर भला मोठा, ऊचच्या उच व्हता.

पण डोंगरानं साऱ्या आशेवर पाणी फिरवलं. डोंगर पुरा उघडाबोडका झालेला.

झाडाझुडपांवरचा पालाही ओरबडून नेलेला. गवताची जळून राख झालेली! वणव्यानं गवत गिळल्यालं! सगळं भकास! उघडी बोडकी काळी दगडं!

गंगाच्या तोंडचं पाणी पळालं. काय करावं सुचंना.

डोंगर चढता चढता त्याला धाप लागू लागली. तोंडातली वल आटलेली.

हैबतीच्या नख्या मोकळ्या खड्यांवरून घसरू लागल्या. तो भेलकांडू लागला.

वरच्या नाकाडावर वाळलेलं पांढरं गवत दिसत व्हतं, पण वाट बिकट व्हती. जाणं आवघड व्हतं. नाकाड सरळ होतं. जरा तोल गेला तर कड्यावरून खाली खोल दरीत कोसळावं लागणार व्हतं. हैबत्याच्या डोळ्यावं घेरी येत व्हती; पण पोटाच्या आगीपुढं इलाज चालत नव्हता. काय सुचत नव्हतं.

गंगाचा इलाजच खुटला व्हता. त्याला तहानभूक लागतच नव्हती. तो दुःख पिऊन जगत व्हता.

हैबत्यानंही पोरासारखं भूक भूक करून मरू नये म्हणून हैबतीला नाकाडावर



घेऊन जायचं धाडस करायचं त्यानं ठरवलं, एकदा वर पोचलं की काळजी नव्हती. नाकाडावरचं पांढरंशुभ्र गवात खालून दिसत व्हतं. हैबत्यानं चार घास पोटात टाकल्यावर त्याला तकवा यनार व्हता. आजचा दिस कठनार व्हता.

हैबत्या नाकाडावरची सरळसोट वाट चढू लागला. दमादमानं एक एक पाऊल उचलू लागला. स्वतःचं धूड त्याच्या पावलांना जड वाटाया लागलं. जसजसं वर जावं तसतसं अंगातलं अवसान कमी होऊ लागलं. हैबत्याच्या डोळ्यांवर झापड यऊ लागली. त्याला तोल सावरणं कठीण वाटू लागलं. वाटंच्या दोन्ही बाजूनं सरळसोट खाली गेलेलं काळंभिन कडं दिसाया लागलं. खाली खोल दरी. वाट तर यवढी आरुंद की हैबतीनं थोडा येळ बसावं म्हटलं तरी एकीकडं तोल जाणार. खाली कोसळणार!

गंगाच्या पोटात कालवाकालव सुरू झाली. तो देवाची करुणा भाकू लागला... ''बायकू गेली, प्वार गेलं. संसाराची परवड झाली! एवढा एकच आधार बाकी हे. त्यालातरी वाचव देवा!''

हैबतीचं अवसान गळालं. जनावर पाय न उचलता एका जागेवर उभं राह्यलं. गंगा बगलं-बगलंनं त्याच्या मागून पुढं झाला. बैलाच्या गळ्यातील कंड्याला धरून त्याला वर वढू लागला. ''माझ्या मागं ये बाप्पा. उलिसीच चढण बाकी हाय.'' पण हैबत्याचं बळ संपलं व्हतं. तो मालकाकडं हतबल होऊन बघू लागला. त्याचं आत गेलेलं डोळं पाणावलं. गंगाला भडभडून आलं. हैबत्याचं पाय थरथरू लागलं. भीतीची जोरदार कळ गंगाच्या मस्तकात उमटली. दोन्ही बाजूंच्या खोल दऱ्या एखाद्या राक्षसासारख्या अक्राळविक्राळ भासू लागल्या. हैबतीचं उभं राह्यचंही अवसान संपलं. गंगाचं अंग घामानं भिजलं. हैबतीच्या डोळ्यांवर घेरी आली. गंगा त्याला सावरू लागला, पण एवढं मोठं धूड सावरणं त्याच्या आवाक्यापलीकडचं होतं. बैलाचा पाय निसटला. तोल गेला! ते धूड दाणकन एका कुशीवर आपटलं! हैबतीनं हंबरडा फोडला! डोंगरावरून सुटलेला धोंडा दणादण आपट्या खात पायथ्याकडे जावा तसं हैबतीचं धूड कड्यावरून आदळत आपटत दरीत कोसळलं!! त्याचा आर्त हंबरडा दरीत घुमला! कड्यावरचा कातळ लाल झाला! गंगाला ते दुःख सहन झालं नाही. हैबत्यासाठी त्यानं जिवाचं रान केलं व्हतं. संसाराची वाताहात झाली तरी तो हैबत्याच्या जिवासाठी धडपडत व्हता.

त्याला हुंदका आवरंना!

दुःख सहन होईना!

आता कुणासाठी जगायचं?

तो पोरका झाला व्हता. असं पोरकं जिणं त्याला पसंत नव्हतं! बायका-पोरांच्या आन हैबतीच्या आठवणींवर जगण्यापरीस मरान बरं!

हैबत्याच्या रक्तानं लाल झालेला कातळ त्याला खुणवू लागला!

टकुरं गरगराया लागलं! डोळ्यापुढं काळी वर्तुळं नाचाय लागली!

अन्

दुसऱ्याच क्षणी त्यानं स्वतःला खाली झोकून दिलं!!

कड्यावरच्या कातळावरून त्याचं धूड चेंडूसारखं आदळत आपटत दरीत कोसळलं!!

कातळावरील हैबत्याच्या रक्तात गंगाचं रगात मिसळलं...!!!

•••





# दम्पर

**रायभान दवंगे**

देवळापुढच्या पटांगणात आम्हां पोरांचा खेळ रंगात आला होता. तितक्यात माझा लहान भाऊ दिन्या पळत पळत आला अन् म्हणाला,

"भाऊ, तुला दादानं घरी बोलिवलंय. वडगावचा मामा आलाया."

"तू चल पुढं, आलोच मी," म्हणत मी जवळच्याच हापशावर गेलो. हापसून हापसून पाणी काढलं. हातपाय धुतले.

घरी आलो तर सपराच्या पडवीत मामा अन् दादा गप्पा मारीत बसलेले. आई चहाची कपबशी घेऊन मागच्या सपरातून आली. मी पडवीत गेलो अन् तिथंच बसत मामाला विचारलं,

"कधी आलात मामा?"

"ह्ये आत्ताच. कितवीला हायीस?" 'मामानं विचारलं.

"सातवीला," मी म्हणालो.

मामानं शेव-चुरमुऱ्यांचा पुडा हातात देत म्हटलं,

"जावा आत. खा समदी पोरं."

आम्ही पोरं शेव-चुरमुऱ्यांवर तुटून पडलो. दिन्या, मी, वच्छी अन् मनी. समदी जणं बुचकुल्या भरून बकाबका शेव-चुरमुरे खाऊ लागलो. आम्हांला खूप भूक लागली होती. आईनं सकाळीच डब्यातल्या उरलेल्या पिठाच्या दोन-तीन भाकऱ्या थापल्या होत्या. आम्हांला साऱ्यांना वाढून उरलेली अर्धी भाकरी नि

लसणाच्या चटणीचा गोळा फडक्यात बांधून ती सोमनाथ पाटलाच्या वावरात कपाशी निंदायला गेली होती.

संध्याकाळी मामा न् दादा बाहेर गेले तेव्हा आई मला म्हणाली,''वश्या, गयाकाकूच्या घरी जा अन् तिला म्हन की माज्या मायनं शेरभर जेवारीचं पीठ सांगिटलंय.''

जरमलाचं पातेलं घेऊन मी गयाकाकूच्या घरी गेलो, तर ती कांदा चिरीत होती. मी तिला म्हणालो,''काकू, माझ्या आईनं शेरभर जेवारीचं पीठ सांगितलंय.''

कांदा चिरता चिरता गयाकाकू उठली न् पिठाचा डबा उघडून त्यातील पिठाचा अंदाज घेत म्हणाली,''ह्ये पग, वश्या, पीठ उलीसंच हाये. येच्यातलं आरधं पीठ जाय घिऊन न् दोन-तीन दिसानं आनून घाल पुन्ना.''

मान हलवीत मी पातेल्यात पीठ घेतलं. घरी आल्यावर आईला सारं सांगितलं. तर आई म्हणाली,''बाजाराच्या दिशी पाटलानं माजी मजुरी दिल्योर दिऊ तिचं उसनं पीठ नेवून.''

पातेल्यात थोडंच पीठ पाहून आई विचारात पडली. जरा वेळानं कोपऱ्यातली मडक्यांची उतरंड उतरीत तळाच्या मडक्यातल्या शेवया तिनं काढल्या अन् म्हणाली,''कायी भाकऱ्या आन् कायी शेवायामदी समद्यानचंच भागंल. मडक्यामदल्या उरल्याल्या शेवाया उंद्याच्याला व्हतील.''

आईच्या चेहऱ्यावर हसू उमटलं.

रात्री आईनं दाळीचं पिठलं, भाकऱ्या आन् शेवाया केल्या. डब्यात थोडीशीच साखर राहिली होती, ती तिनं मामांच्या शेवायाच्या भातावर टाकली. आम्ही समद्यांनी भात तसाच खाल्ला.

रात्री जेवणं झाल्यावर आईनं भांडीकुंडी धुतली. सपरापुढच्या ओट्यावर मामा न् दादा बोलत बसले होते. दिन्या, वच्छी न् मनी ओट्यावरच कोपऱ्यात झोपले होते. मी जागाच होतो. तिथंच कुडाला टेकून बसलो होतो.

आईचं काम आटोपलं आणि तीपण ओट्यावर येऊन बसली.

''कशी काय हायेत भावू पोऱ्हंसोरं...?'' आईनं खाली बसत मामांना विचारलं.

''समदी खुशाल हायेत. म्या आन् तुजी भावजय-आमी दोगं मिळून जातू कामाला सुखलाल शेठजीच्या मळ्यामदी. आठुड्याच्या मजुरीवर भागतं कसं तरी. तुमचं कसं चाललंया?''



''आता बरंच म्हनावं लागंन. पर दिस लई वंगाळ आल्यात बाबा. दुस्काळच पडल्यागत वाटतंय!'' आई म्हणाली.

तसा दादा बोलला,''तसा कमीच पडला व्हता औंदा पाऊस.''

''म्हूनतर आसे दिस आल्याती.'' मामा म्हणाला.

''पर आज का येनं केलं भाऊ?'' आईनं मामाला विचारलं.

''त्येच्याकर्ताच तर आलो व्हतो. कोपरगाव भागात जायाचं हाय ऊस-तोडणीच्या कामाला. म्हनलं, आमच्या बिराडासंगं तुमचंबी बिराड न्यावं. तुमी दोगं नवराबायकू आन् ही चार चिल्लीपिल्ली.''

मामाचं ते बोलणं ऐकून माझ्या पोटात धस्सच झालं. माझ्या मनात शाळेचा विचार येऊ लागला... हे सातवीचं वर्ष... महत्त्वाचं वर्ष असल्यानं असं बाहेरगावी शाळा बुडवून राहायचं म्हणजे शिक्षणाचं वाटोळं होईल आपल्या.... मास्तर काय म्हणतील... सातवीला आपण पास होऊ का?

''मामा, माझी परीक्षा जवळ आलीय. तुमच्याबरोबर कामाला आलो तर नापास होईन मी सातवीला. शिक्षणाचं वाटोळं होईल माझ्या...'' मी मध्येच म्हणालो.

''कायबी व्हत नाय योक साल नापास जाला तर...'' दादा माझ्याकडं रागानं पहात म्हणाला.

''पण एक वर्ष वाया गेल्यावर पुढं अवघड होईल.'' मी दादाला म्हणालो.

''कायबी आवगड व्हत नाय, म्होरल्या साली देता यीन परीक्षा.'' दादा म्हणाला.

मला काहीच सुचेना. मी आईकडं वळून म्हणालो,''आई, तू तरी समजावून सांग दादाला.''

वडिलांनी कोणत्याही गोष्टीला नकार दिला की मी आईचा आधार घेत असे. आई म्हणाली,''आता वसंता म्हंतो त्ये खरं हाय. त्येला ऱ्हावू द्या हितंच.''

''आन् हितं ऱ्हावून काय खाईन?'' दादा रागानंच म्हणाला.

गावात माझी एक गंगू नावाची विधवा आत्या होती. ती एकटीच राहात होती. चार घरी भीक मागून खात होती. तिच्याकडं राहण्याचा विचार करून मी म्हणालो, ''मी गंगूआत्याजवळ राहतो.''

''तिचंच तर तिला जड जालंया. कशीतरी भीक मागून खातीया. त्येच्यात तुजी भर कशाला रे आनखी?''

दादा माझं काहीच ऐकत नव्हता. त्याला तसं शिक्षणाचं महत्त्व वाटत

नव्हतं. आपल्या पोरांनी अगोदर पोटापाण्याचा विचार करावा, असं त्याला वाटे. शिक्षणाविषयी त्याला तशी अनास्थाच होती.

माझा नाइलाज झाला. रात्री ओट्यावर पडलो; पण झोप येत नव्हती. मनात फक्त शाळेचेच विचार येत होते... आपल्या वर्गातले सारे मित्र पास होऊन आठवीला जातील... पण आपण सातवीच्याच वर्गात राहू...

दादाचा मला खूपच राग येत होता. पण काहीच चाललं नाही.

दादा, मामा अन् आई पहाटेच उठले. आईनं आम्हालाही उठून दिलं. आई सामानाची बांधाबांध करीत होती. तिनं बैलगाडीत भांड्यांचं पोतं, गवऱ्यांचं पोतं, एक फाटकी सतरंजी व दोन गोधड्या टाकल्या. गुळाचा कोरा चहा केला. चहा घेताना मी मनात विचार केला, की दिन्या, वच्छी, मनी अजून लहान आहेत. दुसरी-तिसरीच्याच वर्गात आहेत. त्यांचं काही वाटत नाही शाळा बुडाली तर, पण माझी सातवीची परीक्षा आहे. जर परीक्षेला येणं नाही झालं तर... आत्ता एप्रिल महिना येईल... कामावर जाताना आमचे वर्गशिक्षक साळुंके गुरुजींना तरी भेटून जावं असं वाटू लागलं.

उजाडत आलं होतं. मी आईला विचारून गुरुजींच्या घरी गेलो. साळुंके गुरुजी अंघोळ वगैरे आटोपून देवपूजा करीत होते. देवपूजा झाल्यावर गुरुजी मागे वळले आणि मला पाहून त्यांनी आश्चर्यानं विचारलं,"का रं वसंता, सकाळीच आलास?"

"........." मी गप्पच.

"आरे बोल ना, काय काम होतं?" गुरुजींनी विचारलं.

"आजपासून मला शाळेत येता येणार नाही गुरुजी." मी मोठ्या धीरानं म्हणालो.

"का बरं?"

"आम्हाला साऱ्यांनाच ऊसतोडणीच्या कामावर जायचंय. सगळं आवरलंय. सामानाची बांधाबांध करून ते गाडीत टाकलंय. जायच्या अगोदर म्हटलं तुम्हाला भेटून जावं, म्हणून आलोय."

"तुझे वडील काय म्हणताहेत?"

"त्यांचाच तर जास्त आग्रह आहे मला कामावर नेण्याचा. मी त्यांना म्हटलं की, मी इथंच आत्याकडं राहतो. शाळेत जात जाईन, पण ते काही ऐकत नाहीत."



"बरं बरं, अभ्यास चालू ठेव, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा होईल. परीक्षेला मात्र नक्की ये हं! नाहीतर उगीच वर्ष वाया जाईल तुझं."

"बरं." म्हणून मी उठलो अन् गुरुजींच्या पाया पडलो. त्या वेळी मला साळुंके गुरुजी देवासमान वाटले.

आनंदातच घरी आलो. सर्व जण माझीच वाट पहात होते. आई घराला कुलूप लावीत होती. तेवढ्यात मी तिला म्हणालो,"आई थांब. कुलूप नको लावूस, मला दप्तर घ्यायचंय."

तेवढ्यात दादा म्हणाला,

"आता तिकडं कशाला रे पायजे तुला दप्तर न् फिफ्तर? कामातच सारा दिस जाईल. रातच्यालाबी काम पडतं उसाचं, आन् आजून कशाला रे लागतंया तुला दप्तर...?"

मी दादाचं काहीच ऐकलं नाही. घरात गेलो, खुंटीवरचं दप्तर काढलं आणि मुकाट्यानं दप्तर घेऊन गाडीकडं आलो. दप्तर मांडीवर घेऊन गाडीत बसलो.

आई, दादा अन् मामाही गाडीत बसले. माझी भावंडं आधीच गाडीत बसली होती. दादांनी हातात कासरा घेत बैलांना हाकारलं. बैल चालू लागले. गाडीनं गावाच्या कडेनं वळण घेतलं आणि मला शाळा दिसली. मन उदास झालं.

दिवस वर वर येत होता. गावांमागून गावं जात होती. सकाळीच शाळेत जाणारी पोरं पाठीवर दप्तर घेऊन जाताना दिसत, तसं मनाला अजूनच वाईट वाटायचं.

मामाचं वडगाव आलं तेव्हा सकाळचे दहा-अकरा वाजले असतील. मामाच्या घरी साऱ्यांनी दोन-दोन घास खाल्ले. मामाचीही बैलगाडी तयार झाली. मामाला एक छोटी मुलगी होती. दुपारी बारा-एकच्या सुमारास आमच्या बैलगाड्या निघाल्या.

वरून ऊन लागत होतं. तापलेल्या रस्त्यावरून बैल पळत होते. फुफाटा उडत होता. मामाच्या गाडीमागं आमची गाडी चालली होती. मामा-दादा अधूनमधून गप्पा मारीत होते. पाथर्डी तालुक्यातून कोपरगावला जायचं म्हणजे दोन मुक्काम होणार होते. पहिल्या दिवशी राहुरीला मुक्काम झाला. देवळाच्या पटांगणात आई-मामीनं दगडाच्या चुली करून पिठलं-भाकरीचा स्वयंपाक केला. चांदणं पडलं होतं. जेवणं करून सारे जण पटांगणातच झोपले. मी दप्तर उशाला घेऊन झोपलो.

सकाळीच पुन्हा बैलगाड्या जुंपल्या. रस्त्यानं जाताना प्रत्येक गावात सकाळीच शाळेला जाणारी पोरं पाहिली, की मला गावाकडची शाळा आठवायची... आता घंटा होऊन मुलं प्रार्थना म्हणत असतील... साळुंके गुरुजी प्रतिज्ञा शिकवीत

असतील... गुरुजींनी हजेरी घेताना आपलं नाव उच्चारल्यावर वर्गातली पोरं काय काय बोलत असतील.... असा विचार मनात येऊन कधी कधी डोळ्यांत पाणी उभं रहायचं.

शिर्डी गाव आलं तसं श्रीसाईबाबांच्या देवळाच्या कळसाकडं हात जोडून आई-मामीनं दर्शन घेतलं. आम्ही पोरांनीपण हात जोडले. संध्याकाळ झाली होती. बाबांच्या मंदिराचा कळस रंगीबेरंगी दिव्यांच्या झगमगाटात खूपच सुंदर दिसत होता. शिर्डीच्या पुढं साकुरी शिवारात एका मोठ्या चिंचेच्या झाडाखाली गाड्या सोडल्या. तिथंच दुसरा मुक्काम झाला.

सकाळीच निघालो. कोपरगावचं शिवार सुरू झालं होतं. उसाचे हिरवेगार मळे दिसत होते. काही ठिकाणी ऊसतोडणीचं काम सुरू होतं. साखर कारखान्यावर आमच्या गाड्या आल्या तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. गाड्या थांबवून मामा कुठं तरी जाऊन आला. येताना त्याच्या बरोबर एक माणूस होता. मामा त्याला सारखा 'मुकादम' 'मुकादम' म्हणत होता. मुकादमानं मामाजवळ एक चिठ्ठी दिली आणि म्हणाला,"तुमी शिंगणापूरच्या ऊसथळात ऊस तोडायला जा. तिथं तुम्हाला कोपीसाठी बांबू, चटया मिळतील, ही चिठ्ठी दाखवा."

शिंगणापूर कारखान्यापासून मैलभर होतं. तिथं आलो. गावाच्या कडेला मोकळ्या जागेत बऱ्याच कोप्या उभ्या होत्या. मामानं तिथल्या म्होरक्याला मुकादमाची चिठ्ठी दिली. त्याने ती वाचून आम्हांला बांबू, चटया दिल्या. तासाभरातच आमच्या कोप्या उभ्या राहिल्या.

दुसऱ्या दिवसापासून आम्ही सारे थळात कामाला जाऊ लागलो. उसाचा थळ गावाजवळच होता. दादा, मामा ऊस तोडायचे. आई, मामी ऊस साळायच्या. मोळ्या बांधायच्या. आम्ही पोरं टिपरं गोळा करायचो. बैलांना उसाचे हिरवेगार शेंडे टाकायचो. कामाच्या नादात अभ्यासाचा विसर पडे. मध्येच शाळेची आठवण येई. समोर परीक्षा दिसे. रात्री झोपताना कधी कधी तर नापास झाल्याचंही स्वप्न पडे. दप्तर कोपीतच ठेवीत असे. संध्याकाळी कामावरून कोपीवर गेलो की चिमणीच्या उजेडात मी वाचत बसायचो. त्या वेळी दादा कारखान्यावर उसाची गाडी घेऊन गेलेला असायचा.

एक दिवस भलतंच आक्रीत घडलं. शिंगणापूरच्या आमच्या कोप्यांजवळच्या काही कोप्या पेटल्या. सारे गडी तिकडं पळाले. बाया-पोरं रडत-ओरडतच तिकडं पळत होती. आभाळात धुराचा लोट दिसत होता. दप्तराची आठवण येऊन मला खूपच



रडू आले. वाटलं, आपलं दप्तर जळून गेलं तर...? साऱ्या विषयांच्या वह्या जळून जातील... पुस्तकं जळून जातील... मग काय करायचं? परीक्षा कशी द्यायची?

मी गावच्या खंडोबाला हात जोडले अन् मनात म्हणालो, "देवा, खंडोबाराया, माझं दप्तर सुरक्षित ठेव. गावी आल्यावर नारळ फोडीन."

आम्ही सारे तिथं आलो, तर कारखान्याचा पाण्याचा बंब तिथं आधीच आलेला होता. आमच्या कोप्यांपलीकडच्या चार-पाच कोप्या जळून गेल्या होत्या. त्यांचा सारा संसार जळाला होता. सारे जण रानात होते म्हणून बरं! नाहीतर भलताच अनर्थ ओढवला असता. मी आमच्या कोपीत गेलो. सारं काही सुरक्षित होतं. माझं दप्तराकडं लक्ष गेलं. बांबूच्या मध्यभागी बांधलेलं दप्तर तसंच होतं. मी मनोमन खंडोबारायाचे आभार मानले.

दिवसांमागून दिवस जात होते. ऊसतोडणीचं काम जोरात सुरू होतं. मी दप्तर आता गुपचूप रानात नेत असे. टिपरं गोळा करता करता थकलो की बांधावरच्या आंब्याच्या सावलीत बसून अभ्यास करायचो. पाटीवर गणितं सोडवायचो.

एक दिवस गाडी भरायला उशीर झाला. दादा खूपच रागावला होता. दिसेल त्याच्यावर तोंडसुख घेत होता. मी सावलीत वाचत बसलो होतो. तोच दादा ओरडला,"वश्याऽऽ काय करतोस?"

"अभ्यास."

"आन् टिपरं कोन गोळा करीन? तुला कितीदा सांगितलंय की तुजं ते दप्तर जाळून टाक म्हून! आता माला जर ते दप्तर दिसलं तर म्याच जाळून टाकतो."

दादा खूपच रागावला की काय करील याचा नेम नव्हता. एकदा तर त्यानं माझं दप्तर पाण्यानं भरलेल्या चारीत फेकून दिलं होतं. पण धुणं धूत असलेल्या मामीनं ते पटकन धरलं; म्हणून वह्या-पुस्तकं कोरडीच होती.

दादा अडाणी होता. त्यामुळे त्याला शिक्षणाचं अजिबात महत्त्व वाटत नव्हतं. एकदा साळुंके गुरुजींनी घरी येऊन दादांना माझ्या अभ्यासाविषयी कल्पनाही दिली होती. पण दादा मनावर घेत नव्हता. मला सतत वाटे की शिकून आपण मोठं व्हावं. मास्तर व्हावं. दादाच्या दारिद्र्याच्या संसाराला हातभार लावावा. पण दादा माझ्या स्वप्नांचा चक्काचूर करू पाहत होता.

संध्याकाळी उसाची गाडी रिकामी करून दादा कारखान्यावरून घरी आला. कोपीच्या एका कोपऱ्यात मी चिमणीच्या उजेडात अभ्यास करीत होतो. आई दगडांच्या चुलीवर भाकऱ्या भाजीत होती. दादानं बैल सोडले अन् कोपीकडं येत

म्हणाला,''वश्या, बयलांना पानी पाज.''

मला एक गणित सुटत नव्हतं. मी फार प्रयत्न करीत होतो. माझं सारं लक्ष गणितातच होतं. मला दादाचं बोलणं नीटसं ऐकू आलं नाही. दादा पुन्हा रागानं जोरात ओरडला,''वश्याऽऽ आयकू आलं का? तुजं ते दप्तर-फफ्तर रातच्याला कुठंतरी टाकून देतो. मंग तरी कळंल.''

असं म्हणून दादा स्वतः बैलांना हाकारीत नदीवर गेला.

रात्री जेवताना दादा माझ्याशी बोलला नाही. माझं जेवणात लक्षच नव्हतं. रात्री झोपताना दप्तर उशाला घेतलं नाही, तर दप्तर जवळ घेऊन अंगावर गोधडी ओढून गुपचूप पडलो; बाळाला त्याची आई पोटाशी घेऊन झोपते तसं! मनात सारखे विचार येत होते- आता दप्तर कसं सांभाळायचं? दादानं खरंच दप्तर फेकून दिलं तर...?

त्या दिवशी पहाटेच उठलो. आईचा डोळा चुकवून दप्तर घेऊन निघालो. शिंगणापूरजवळच एक छोटी नदी होती. पात्र कोरडंच होतं. पात्राच्या मध्यभागी गेलो. भराभर वाळू उकरली. गुडघ्याइतका खोल खड्डा तयार झाला. दप्तराच्या पिशवीच्या बाहेरून प्लॅस्टिकचा कागद गुंडाळला. दप्तर खड्ड्यात ठेवलं. त्याच्यावर वाळू टाकली. खूण म्हणून त्यावर एक मोठा पांढरा दगड घट्ट रोवून ठेवला. दप्तर माझा 'प्राण' होता. माझा प्राणच पुरून ठेवल्यासारखं मला तेव्हा वाटलं. गावी जायच्या दिवशी पुन्हा दप्तर उकरून घेऊन जाऊ, या हेतूने मी पुन्हा कोपीकडं आलो.

मार्च महिना संपत आला होता. एप्रिलमध्ये परीक्षा होती. आता तसा बराचसा अभ्यास झाला होता. थोडासा धीर आला होता. शिंगणापूरचा उसाचा थळ एक-दोन दिवसांतच संपणार होता. दुष्काळामुळं कारखाना लवकरच बंद होणार, असं लोक आपापसात बोलत होते.

गावी परत जायला आता दोनच दिवस बाकी होते. त्यापूर्वी नदीतून आपलं दप्तर घेऊन येऊ असा विचार करून त्या दिवशी रात्री कोपीबाहेर पोत्यावर पडलो. सारी पोरं, आई, दादा झोपले होते; पण मला झोप येत नव्हती. कधी पहाट होईल असं वाटत होतं.

वर आभाळात पाहिलं. दोन-तीन ढग इकडून-तिकडं फिरत होते. तशाच अवस्थेत माझा डोळा लागला आणि काही वेळाने कसल्यातरी आवाजाने मला जाग आली. उठून पाहिलं तर काळ्याकुट्ट आभाळात विजा चमकत होत्या. पाऊस



पडायची लक्षणं दिसत होती. माझ्या पोटात भीतीनं खड्डाच पडला. वाटलं, पाऊस पडून नदीला पाणी आलं तर....? आपलं दप्तर वाहून जाईल!

आईनं आम्हाला साऱ्यांना उठवून कोपीत नेलं आणि थोड्याच वेळात कोपीच्या चटयांवर पावसाचे टपोरे थेंब टपटप आवाज करू लागले. माझी भीती खरी ठरली. आता दप्तराचं काय? मधूनच थोडीशी डुलकी लागे. दप्तर नदीच्या पुरात तरंगून जात असल्याचं स्वप्न पडे. मला जाग येई. जीव कासावीस होई.

सकाळीच उठलो. नदीच्या दिशेने धावत सुटलो आणि नदीतील पाणी पाहून माझ्या डोळ्यातही पाणी आलं. माझ्या दप्तराच्या जागेवरून गुडघाभर पाणी वाहात होतं. ते पावसाचं पाणी असल्याने लवकरच पूर ओसरेल या वेड्या आशेने मी कोपीकडे आलो. माती ओली झाल्याने ऊसतोडीचं काम बंद होतं. दादा, मामा मुकादमाबरोबर मजुरीचे पैसे आणायला कारखान्यावर गेले होते. मामी, आई कोपीतच बसून ज्वारीतील खडे निवडीत होत्या. त्या दिवशी मी सात-आठ वेळेस तरी नदीवर गेलो असेन. मनाची सारखी घालमेल होत होती.

दुपारी चार-पाचच्या सुमारास नदीतील पाणी ओसरलं, पात्र पुन्हा पहिल्यासारखं दिसू लागलं.

मी धावतच पात्राच्या मध्यभागी गेलो. वाळूत रोवलेला पांढरा दगड शोधू लागलो. शोधता शोधता त्याच दगडाला ठेच लागली. दगड बाजूला केला. भराभरा वाळू उपसली. आणि प्लॅस्टिकच्या कागदातलं दप्तर हळूच वर काढलं. सुदैवाने प्लॅस्टिकच्या कागदामुळे ते कोरडंच होतं. दप्तर लेकरासारखं छातीशी घेऊन मी कोपीकडे धावू लागलो. नदीतील पूर ओसरला होता, पण मनात आनंदाचा पूर ओसंडून वाहत होता. डोळ्यांवाटे तो वर येऊ पाहत होता.

●●●

# एम्पथी

## संतोष शिंत्रे

वार्षिक सेल्स कॉन्फरन्सच्या दुसऱ्या दिवशीचे पहिले दोन तास उलटले होते. सकाळी नऊ वाजताच ती सुरू केल्यामुळे झालेली प्रत्येकाचीच हँगओव्हरयुक्त चिडचिड अकरा वाजताच्या चहानं काहीशी कमी झाली होती आणि लंचचे वेध लागायला अजून दीडएक तास अवकाश होता. त्यामुळे काही लोक चक्क चालू कॉन्फरन्सच्या कामात लक्षही द्यायला लागले होते.

लागोपाठ तिसऱ्या वर्षी मकरंद फडतरेनं आपल्या प्रभागाचं विक्रीचं लक्ष्य ओलांडण्याचं बक्षीसही नेहमीप्रमाणेच घेतलं होतं. इन्सेन्टिव्हची खैरात, अॅवॉर्ड, युरोप दौऱ्याचं गाजर हेही यथासांग सगळं होऊन गेलं होतं, आणि तरीही एका बेचैनीनं त्याला अंतर्बाह्य व्यापलं होतं. एक वैश्विक कंटाळा! मार्केटिंग लाइफचाच मुदलात कंटाळा. सतत पर्चेसवाले, अकाऊंटवाले यांच्याशी हसतमुख राहून बोलण्याचा कंटाळा. विद्येचं माहेरघरवाल्या त्याच्या एकेकाळच्या आवडत्या शहराचा कंटाळा. शुभेच्छुक टिनपाटांचे बटबटीत फलक आणि फक्त वाहनं, वाहनं आणि आणखी वाहनं, इतकंच त्या शहरात आता दिसायचं.

कॉफीच्या नेहमीच्या अड्ड्यावरही पडीक इंटुक्स, मीडियावाले यांच्या जागी रिअल इस्टेट एजंट, अॅडमिशन रॅकेटवाले यांचं वर्चस्व वाढलेलं. घरी तर येणारा प्रत्येक सुहृद-नातेवाईक फक्त इंग्लंड-अमेरिकेचे वेगवेगळे व्हिसे, वर्क परमिटं कशी मिळवली या किंवा 'पल्याड'च्या नोकरीतल्या शौर्यगाथांमध्ये रममाण झालेला. त्यामुळे कॉन्फरन्सकडं संपूर्ण दुर्लक्ष करत स्वतःला अंतर्बाह्य ढवळून काढणारा अत्यंत मूलगामी विचार फडतरे करत होता. शेवटच्या रात्रीच्या कॉकटेल्सच्या आधी त्याला निष्कर्षाप्रत यायचं होतं.

तसा तो येत होताही. बारा-पंधरा वर्षांच्या झोकून दिलेल्या मार्केटिंगमधल्या आयुष्यातनं त्याला बाहेर पडायचं होतं. मूळचा तो प्रॉडक्ट डिझायनर-इंजिनिअर. मोठं जग-लोक बघायला मिळावेत म्हणून मार्केटिंगमध्ये आला होता. पहिली काही वर्षं मजाही आली होती. पण आता हिमनगाचा सात-अष्टमांश भाग म्हणतात तसा दिसायला लागला होता आणि तो कुठल्याही सर्जनशील माणसाला भयावहच होता. पर्चेसवाल्यांचे 'टक्के' ठरवून काहीसं ओशट हसत त्यांच्याशी हात मिळवताना त्याला आजकाल अंगावर शंभर झुरळं चढल्यासारखं वाटायचं. वार्षिक अप्रेझल, पगारवाढीच्या वेळी साहेबाच्या केबिनमध्ये शिरताना आजकाल त्याला आपण 'कूँऽऽ' असा आवाज काढत पायाशी घासणारा कुत्रा आहोत, असं वाटायचं. ज्युनियर्सशी अमानवी कठोर होताना त्याच्या डोळ्यांत खरं तर 'छप्पन्न सशांची व्याकूळता' दाटलेली असायची. यावर उपाय एकच दिसत होता, स्वतःचं असं एकमेवाद्वितीय काहीतरी सुरू करणं. आणि तेही असं, की मार्केटिंगमधल्या आपल्याच कम्युनिटीला साह्यकारी ठरेल. त्यानं स्वतः एखादं प्रॉडक्ट, गॅजेट डिझाईन केल्याला आता खरं तर काही वर्षं लोटली होती; पण इतकी निर्वाणीची परिस्थिती आल्यावर त्याच्या डोक्यातल्या 'त्या' बुद्धिपेशी एकदम तेज झाल्या होत्या. आराखडा पक्का होत आला होता. कॉन्फरन्स संपल्यावर लॉनवर दारू पिताना बाकी मंडळी जेव्हा दलेर मेहंदी लावून बिनडोक नाचत वगैरे होते तेव्हा त्या आराखड्याचा S WOT अनालिसिस करून टाकून घरी परतल्यावर मकरंद फडतरेनं राजीनामा देण्याचा बेत पक्का करून टाकला... आणि वरकरणी कॉन्फरन्समध्ये पुन्हा लक्ष घातलं.

काळ सहा महिन्यांनंतरचा. लिफ्टनं तिसऱ्या मजल्यावर उतरताक्षणीच पौर्णिमा रावला 'एम्पथी मार्केटिंग अलायन्स'चा ठसठशीत बोर्ड दिसल्यानं जरा बरं वाटलं. शोधाशोध, विचारणा टळली म्हणून. 'प्रॉडक्ट मॅनेजर' म्हणून तिचा हा पहिलाच इंटरव्ह्यू होता. कुणी मकरंद फडतरे... एम.डी. होता. तिला एकदम आठवलं, एम्पथी म्हणजे काय, ते तिचं घरी शब्दकोशात बघायचंच राहून गेलं होतं. क्षणभर थांबून तिनं तिच्या ब्लॅकबेरीमधली वेबस्टर डिक्शनरी उघडली. एम्पथी... आपण दुसऱ्याच्या जागी असलो तर काय विचार करू, हे समजण्याची क्षमता. काय

प्रॉडक्ट लाइन आहे कुणास ठाऊक! त्यांची वेबसाईटही दिसत नव्हती... म्हणजे नव्हतीच. हे सगळे विचार होईपर्यंत ती दारापर्यंत पोचलीही होती. तिला फार वेळ थांबायलाही लागलं नाही. काही काळातच ती संचालक मकरंद फडतरेंसमोर स्थानापन्न झालेलीही होती.

औपचारिक ओळखी, प्राथमिक माहितीची देवाणघेवाण, जुजबी प्रश्नोत्तरं हे सगळं व्यवस्थित पार पडलं. कसं काय कुणास ठाऊक, पण पहिल्यापासूनच पौर्णिमाला एक सकारात्मक फीलिंग आलं होतं... हीच कामाची जागा आहे किंवा असणार आपली, असं काहीतरी. तो एम.डी. पण तसा कंफर्टेबल दिसत होता. तो जेव्हा त्याच्यासमोर ठेवलेल्या पौर्णिमाच्या 'रिझ्युमे'ची कॉपी चाळत होता, तेव्हा हा सगळा विचार तिच्या डोक्यात येऊन गेला. अचानक फडतरेनं टेबलवरचा एक 'फेरारी'चा, अप्रतिम 'लुक' असणारा चष्मा उचलून पौर्णिमाला दिला. ''कॅन यू जस्ट वेअर इट... फॉर अ व्हाईल? ए फ्यू सेकंड्स... इन फॅक्ट.'' तो शांतपणे म्हणाला.

काहीही बोध न झाल्यानं पौर्णिमानं गोंधळून त्याच्याकडे पाहिलं. ''बघा तर... इट्स वर्क. नो प्रँक. आणि नंतर इकडे पाहा,'' त्यानं टेबलावर पडलेला तिचा रिझ्युमे आणि अन्य काही कागदांकडे निर्देश केला. थोडंसं अनिश्चित असं काही वाटत असताना पौर्णिमानं तसं केलं आणि त्याच्यासमोर ठेवलेल्या स्वतःच्या रिझ्युमेकडे नजर टाकली. तिला काय चाललंय हे कळायला दोन-पाच सेकंद लागले... पण कळल्यावर तिला धक्काच बसला. त्याच्यासमोर असलेला, तिला उलट दिसणारा तिचा रिझ्युमे तिला आता स्पष्ट वाचता येत होता. पौर्णिमा राव, अॅड्रेस, ई-मेल, समरी ऑफ क्वालिफिकेशन्स... काही शंकाच नव्हती. खरं तर सगळी अक्षरं काहीशी मोठीच, व्यवस्थित दिसत होती. तिनं चष्मा काढून पाहिलं... धूसर. पुन्हा उलटं दिसून तिला वाचता येईना. पुन्हा तिनं तो लावला... एकेक अक्षर स्पष्ट!

फडतरेच्या पुढच्या वाक्यानंच तिची हतबद्धता काहीशी कमी झाली. ''खरं आहे ते. इनफॅक्ट, हा आपला एक महत्त्वाचा प्रॉडक्ट आहे. ओ.डी.आर.... म्हणजे ऑपोझिट डॉक्युमेंट रीडर. मार्केटिंगमधल्या लोकांसाठीचं आपलं एक खास उत्पादन. का, ते सांगू शकाल?''

मधल्या वेळात पौर्णिमा त्या धक्क्यामधून काहीशी सावरली होती. ''ऑफ... ऑफकोर्स, सर. म्हणजे समजा एखादा मार्केटिंगवाला पर्चेस ऑफिसर किंवा रादर कुठल्याही डिसीजन मेकरसमोर बसला आहे... आणि त्याच्याच कॉम्पिटिटरची ऑफर किंवा एखादं महत्त्वाचं स्पेसिफिकेशन पर्चेसवाल्यासमोर ठेवलेलं आहे. तिथे याचा सगळ्यात...''

''बस - राईट. यू गॉट इट! हाच कळीचा उपयोग आहे या गॅजेटचा. वेल... मॅडम राव... आय थिंक यू होल्ड अ लॉट ऑफ प्रॉमिस. कधीपासून काम सुरू करू शकाल? बाकी गोष्टीही ठरवून घेऊ अर्थातच. बाहेर रिसेप्शनिस्टकडून उद्या-परवाची वेळ, तुमच्या-माझ्या सोयीची, घेऊन ठेवा, तेव्हा या. लेट्स फायनलाइझ... अर्थात, तुम्हालाही तसंच वाटलं तर.''

ऐकता ऐकता पौर्णिमानं तो चष्मा पुन्हा पटकन दोन सेकंदं लावून पाहिला. ''चालेल सर, नो प्रॉब्लेम. निघते आता मी. तुम्हालाही चार वाजता सुराणा इलेक्ट्रॉनिक्सला पोचायचंय.'' ती हसत हसत म्हणाली आणि निघाली. आता चमकण्याची पाळी फडतरेची होती. त्यानं पाहिलं, रिझ्युमेजवळच आठवण राहावी म्हणून त्यानं '4 PM - सुराणा इलेक्ट्रॉनिक्स' हे एका कागदावर दिसेल असं खरडून ठेवलं होतं.

सुराणानं नेहमीप्रमाणेच काम तर चोख करून ठेवलं होतं. त्यानं 'एम्पथी'साठी बनवलेलं ते सुबक गॅजेट मकरंद फडतरेनं काळजीपूर्वक हाताळत, प्रेमानं नीट निरखलं. अगदी छोटा, मिनिएचर असा तो कॅलक्युलेटर होता... एका बाजूला. त्याच्या दुसऱ्या बाजूला आणि गॅजेटच्या टोकाला असा मिळून तो एक सिगारेट लायटरही होता. दोन्ही बाजूंना 'एम्पथी'चा लोगोही स्पष्ट दिसत होता. ''सुराणा... इट्स मार्व्हलस्! तेही दोन वर्षांच्या गॅरंटीनं!'' तो म्हणाला.

''हे सीक्रसी अॅग्रिमेंट... नॉन डिस्क्लोजरचं.'' सुराणा म्हणाला. ''मला आता तरी सांग, हे काय प्रकरण आहे? बायोसेन्सर्स, नुसतेच फक्त आकडे आणि पर्सेंटेजचं बटण असणारा कॅलक्युलेटर! त्यातच महागडे प्लॅटिनम बेस्ड सेन्सर्स - हिरवा-पिवळा-लाल डिस्प्लेवाला लायटर. काय प्रकार आहे हा?'' फडतरेनं फक्त ते सगळं उचलून बॅगेत कोंबलं. सुराणाला चेक दिला. हसून तो म्हणाला, ''एकदा लाँच होऊ दे ना प्रॉडक्ट! कळेल तुला मजा आपोआप!'' पण हे सुराणापुरतं झालं. कारमध्ये मागे बसल्यावर त्यानं ती यंत्रणा पुन्हा काढून पाहता पाहता मनाशी पुन्हा एकदा सगळी उजळणी केलीच. कॅलक्युलेटरची 'वर्गमूळ', 'घनमूळ', 'साईन', 'कॉस', 'थीटा' यातली कोणतीही फंक्शन्स फडतरेनं संपूर्ण मार्केटिंग लाइफमध्ये बारा-पंधरा वर्षांत वापरली नव्हती. पर्सेंटेज सोडून कुठल्या बटणाला त्याचा हातही लागलेला त्याला आठवत नव्हता. करायचंय काय भरताड? भारतात मार्केटियरला

कॅलक्युलेटर लागतो, तो टक्के... फक्त समोरच्याचे 'टक्के' ठरवायला. आता त्यामुळेच आकडे आणि फक्त तेवढंच बटण दिल्यावर तो किती मस्त, स्लीक आणि कमी किमतीत तयार झाला होता... एम्पथीकडून.

आणि त्याच्यातच सामावून फडतरेनं दिलेल्या 'साईक अनालायझर' लायटरमुळे तर त्याचं कैक पटीनं मूल्यवर्धन झालं होतं. तो लायटर समोरच्याकडे रोखून पेटवला, की क्षणार्धात त्याच्यातले बायोसेन्सर्स, समोरच्या व्यक्तीचं आपल्याबद्दलचं त्या क्षणीचं मत, त्याचा मूड आपल्याला 'फेवरेबल' आहे का आपल्याबद्दलच्या संपूर्ण नकारात्मक विचारांच्या अमलाखाली तो वावरतो आहे आणि आपल्याला हवं ते करण्याची शक्यता त्याच्याकडून कितपत आहे, हे त्याच्या आसपासच्या विशिष्ट वेव्ह्ज पकडून तत्काळ सांगायचे. मनुष्य अनुकूल असेल तर हिरवा डिस्प्ले, प्रतिकूल असेल तर लाल आणि त्यानं काही मतच बनवलं नसेल तर पिवळा.

कारण अनुभवातून त्याला हे पक्कं माहिती होतं, की मार्केटिंगचा माणूस ज्या ज्या लोकांच्या संपर्कात येतो त्या सगळ्यांशी तो बऱ्याच वेळा खोटं प्रसन्न हसून वावरत असतो. क्लायंट्स, अकाऊंट्सवाले, पर्चेसवाले, एवढंच काय कंपनीतले वरिष्ठ बॉससुद्धा. मग तीही सगळी माणसं ते ओळखून याच्याशी असंच खोटं खोटं हसून-खेळून बोलत राहतात. समोरचा नक्की आपल्याला आता 'फळणार' आहे की नाही, याचा मार्केटिंगवाल्याला अंदाज यायला मग फार अडचणीचं होतं. तो 'मूड' जर कळला तर मार्केटिंगवाला आपलं बोलणं, आपला स्टान्स ठरवू शकेल यासाठी एम्पथीचं हे प्रॉडक्ट होतं. सायकोसोमॅटिक पातळीवरचे बदल सूक्ष्मातिसूक्ष्म पातळीवर टिपणारे सेन्सर्स, खर्चाकडं न पाहता, फडतरेनं त्यात घातले होते.

पौर्णिमा रावची नेमणूक, पगार पक्कं झाल्यावर फडतरेनं तिच्यासमोर एक सिरप आणि गोळी असं ठेवलं. ''वार्षिक टार्गेट्सची अवजड साखळी गळ्यात एकदा बांधून घेतली, की मग चतकोर टाकल्यासारखी तुमची कंपनी तुम्हाला पाच, आठ, दहा, बारा टक्के राईझ देणार. टार्गेट्सच्या त्या अतिरंजित, अमानवी काळ्या ढगाचं ओझं बाळगून मार्केटिंगचे किती लोक वर्षभर ओझ्याखाली राहतात, कॅन यू इमॅजिन? मग त्यातनं उद्भवणारे तणाव, व्यसनं... व्हॉट नॉट! क्वार्टरली मीटिंग्जनाही हीच परिस्थिती. घेतलेलं टार्गेट का झालं नाही, याची पटतील अशी कारणं शोधणं, एवढं फक्त नवं. आपला हा प्रॉडक्ट यावरचा अक्सीर ॲंटिडोट आहे. 'टार्गेट रिटार्डन्ट सिरप' किंवा टॅबलेटसुद्धा.'' अंदाज घेण्यासाठी त्यानं पौर्णिमाकडे पाहिलं.



ती बाटली उचलून निरखत होती. ''कसं काम करतं हे प्रॉडक्ट?''

''हे फक्त तुमच्या मेंदूत काही केमिकल्स ट्रिगर करतं. कॉन्फरन्सच्या 'त्या' दिवशी दोन तास आधी जर ते घेतलं (सिरप किंवा टॅब) तर टार्गेटची सर्वांत वरची फिगर स्वीकारण्यासाठी जेव्हा तुमचा हात, बोट वर जायला लागतं, भावी पगारवाढीच्या आशेनं तुम्ही भलतीच काहीतरी 'फिगर' अंगावर घेणार असता-नेमक्या त्या क्षणी, मेंदूतली ही केमिकल्स ॲक्टिव्हेट होऊन पहिलं म्हणजे तुमचा हात टेबलच्या वरच्या लेव्हलला तुम्ही उचलूच शकत नाही आणि दुसरं म्हणजे या औषधामुळे तुमची विजिगीषू वृत्ती, धडाडी ही तास-दोन तासांपुरती खचते. पूर्ण खचते. आणि पुढच्या वर्षभराच्या संकटातून, ताणांमधून आणि व्यसनांमधून तुम्ही वाचता. काहीही केलं, तरी पगारवाढ तर तेवढीच मिळणार असते. मग निदान अशक्य टार्गेट्सची ओझी घेऊन तरी तुम्ही फिरत नाही.''

''नाईस! ॲप्ट प्रॉडक्ट. फील लाईक सेलिंग व्हॉल्युम्स!'' पौर्णिमा म्हणाली.

पूर्ण आगळीवेगळी आणि स्पर्धा अजिबातच नसलेली प्रॉडक्ट लाइन मिळाल्यानं पौर्णिमानं पूर्ण उत्साहानं 'एम्पथी'त स्वतःला झोकून दिलं. तसं त्यांचं मार्केटिंग खूप वेगळं होतं. कोणतीही माध्यमं, जाहिरात याचा वापर त्यांनी करण्याचा प्रश्नच नव्हता. केवळ ग्राहकांच्या बोलण्या-बोलण्यातून होणारी 'माऊथ पब्लिसिटी' आणि नेटवर्किंग. पण त्यांना मार्केटिंगच्या दुनियेत फार भराभर प्रतिसाद मिळत गेला होता. काही प्रॉडक्ट्स तर त्यांनी लोकांच्या सांगण्यावरून खास तयार केले होते. उमलत्या, नवशिक्या सेल्स आणि पर्चेसवाल्यांसाठीच्या प्रशिक्षणाची सीडी हा त्यातला एक. सुरुवातीचे 'पैसे खाण्याचे सिग्नल कसे द्यावे-घ्यावे' इथपासून ते 'प्रत्यक्ष व्यवहार करताना तो हसतमुखानं, स्वतःचा आब राखून कसा करावा,' अशा अनेक सिच्युएशन्स त्यांनी प्रशिक्षित, कुशल अभिनेत्यांकडून अभिनयाद्वारे वठवून घेतल्या होत्या. त्याला दोन्ही 'बाजूं'च्या ग्राहकांचा उदंड प्रतिसाद लाभला होता. दीड वर्षात 'एम्पथी' फडतरेच्या अंदाजाहून कैकपटीनं वाढली होती. जाळं भारतभर फैलावलं होतं. त्यामुळे आता फडतरेमधला 'डिझायनर' पुन्हा एकदा जागा होत होता. पण त्याची या वेळची आकांक्षा खूप म्हणजे खूप मोठी होती. त्याला ग्लोबल अपील असणारा एक 'मास्टरपीस' बनवायचा होता आणि नंतर रोजच्या कारभारातून अंग काढून घेऊन आवडत्या, इतर गोष्टींकडे लक्ष केंद्रित करायचं होतं. 'एम्पथी' काय, पौर्णिमा तिची सेल्सची पोरंपोरी, वितरक हे सगळे चालवतच होते.

त्याची इच्छा जेमतेम सात-आठ महिन्यांतच पूर्ण झाली. अर्थात, हा संपूर्ण वेळ त्यानं स्वतःला डिझाईनमध्ये झोकून दिलं होतं. पौर्णिमा त्याला भेटायला आली, तेव्हा तो त्याच्या लॅपटॉपमध्ये डोकं खुपसून बसला होता. शेजारी ओव्हरहेड प्रोजेक्टरसदृश पण खूप छोटं एक गॅजेट त्याला जोडून ठेवलेलं दिसत होतं. पौर्णिमाला त्याच्यासमोर बसताना एक सेकंदभर थोडं चक्कर आल्यासारखं वाटलं. आल्यापासून ती सलग डेस्कटॉपवर बसून पुढच्या तिमाहीचं विक्री-उद्दिष्ट ठरवत ताणातच बसली होती. एकदा तिच्याकडे बघून फडतरेने काहीशा अधिकारवाणीनं तिला फर्मावलं,''समोर दोन कागद दिसतायत ना... साईन देम इमिजिएटली! एक अर्थातच तुझा स्वखुषीनं दिलेला राजीनामा आहे आणि दुसरं पत्र... तू 'एम्पथी'तला तुझा स्टॉक ऑप्शन्सचा शेअर कंपनीला परत विकून टाकतीयस असं. चल... पौर्णिमा! सही करून टाक... पटकन!'' कसलाच विचार न करता हसत हसत तिनं त्या दोन्ही कागदांवर क्षणार्धात सह्या करूनही टाकल्या. उलट त्यानं तिला खूप बरं वाटलं. काही मिनिटं अशीच गेली. फडतरेनं आपला लॅपटॉप आणि शेजारचं गॅजेट, दोन्ही बंद करून ठेवलं. तिचं पाणी पिऊन झाल्यावर ते दोन्ही कागद त्यानं तिला दाखवले आणि तिनं वाचल्यावर फाडून कचरापेटीत फेकून दिले. पौर्णिमाला काही कळत नव्हतं, पण काहीतरी गडबड वाटत होती. ''मी कधी लिहिला राजीनामा? आत्ता? सर... इज इट सम प्रँक?''

''येस पौर्णिमा... टेक इट अॅज अ प्रँक. हा आपल्या नव्या, मास्टरपीस प्रॉडक्टचा डेमो होता. तुझा राग आणि शॉक गेला असेल तर सांगतो.''

तिनं हसून मान होकारार्थी हलवली. आता नॉर्मल वाटत होतं. ''लॅपटॉपबरोबर जोडून घेऊन काम करणारं हे छोटं गॅजेट... माइंड मॅनिप्युलेटर. माझं आजवरचं सर्वांत कल्पक डिझाईन. लुक, मेंदूच्या ई.ई.जी., ई.एम.जी. या टेस्ट्स नसतात का? तशाच प्रकारे सेन्सिंग - फक्त वाय-फाय, वायरलेस पद्धतीनं हे करतं. आधी तुमचं मन 'वाचतं', ते लॅपटॉपवर 'ग्राफिक'ला दाखवतं आणि मग ते पॅटर्न्स तुम्हाला हवे तसे बदलून समोरच्याला आपल्या मनाप्रमाणे वागायला, आज्ञा पाळायला प्रवृत्त करू शकता. 'सह्या' वगैरे तर या गॅजेटमुळे आपलं लक्ष्य फटाफट करतं. तेही एंडॉर्फिन्ससारखी प्रसन्नचित्त करणारी रसायनं उद्दीपित करून.''

''अमेझिंग! सर, काय टेक्नॉलॉजी वापरलीय पण यात नक्की?''

''आहे बरंच काय काय. इरिडियम, वाय-फाय, अगदी फाईन-ट्यून केलेले सेल्युलर लेव्हलचे बायो-सेन्सर्स...'' आणि अचानक त्याला वाटलं, की आपण



फार तर बोलत नाही? पौर्णिमाही बायोफिजिक्स आणि नंतर एम.बी.ए. होती. ''वेल... उगीच सगळं समजावून सांगत बसायला ही काय एखादी विज्ञानकथा आहे? अॅप्लिकेशन महत्त्वाचं.''

पौर्णिमानं होकारार्थी मान हलवली. ''तेही आहेच म्हणा. मग सर, पुढचं ब्रीफिंग, मार्केट प्लॅन, सेग्मेंटेशन हे कधी करायचं आता?''

त्याचं उत्तर एक विश्वासू सहकारी म्हणून पौर्णिमाचा थोडं अपेक्षाभंग करणारं होतं... ''नो. नो. याची सगळी जबाबदारी, तीही ग्लोबल लेव्हलला आत्ता मी माझ्याचकडे ठेवणार आहे. माझे काही विशिष्ट, पण खूप मोठे प्लॅन्स आहेत माईंड मॅनिप्युलेटरसाठी. विशेषतः आपल्या देशातल्या त्याच्या अॅप्लिकेशनबद्दल. बघू या. आत्ता तरी तू फार काळजी करू नको.''

पुढचा सगळाच घटनाक्रम फार वेगानं घडला किंवा फडतरेनं प्रचंड उरक दाखवून तसा तो घडवून आणला. माइंड मॅनिप्युलेटर वगळता सर्वच्या सर्व उत्पादनं त्यानं विक्रीच्या जबाबदारीसाठी म्हणून पौर्णिमा आणि तिच्या भारतभरातल्या विक्री प्रतिनिधींवर सोपवली. प्रत्येकाला यथायोग्य पगारवाढ, बढत्या, असं काय काय यथायोग्य करून ते सगळे बुरूज त्यानं पक्के करून घेतले. पौर्णिमा तर खूषच झाली. कारण करिअरच्या जेमतेम दोन-अडीच वर्षांमध्ये ती आता व्हाईस प्रेसिडेंट, मार्केटिंग झाली होती. हे सगळं करून मग निःशंक मनानं मकरंद फडतरे युरोप-अमेरिका दौऱ्यावर रवाना झाला. आणि तसंच आवश्यक होतं. कारण 'माइंड मॅनिप्युलेटर'ची संकल्पना परिपूर्ण करताना, त्याची संरचना करताना त्याला स्वतःलाही भरपूर ताण आला होता. या गॅजेटमधली त्याची गुंतवणूकही - युरो आणि डॉलर्समध्ये आयात कराव्या लागणाऱ्या-लागलेल्या सुट्या भागांमुळे भरपूर झाली होती. तोही तसा एक वेगळा ताण होताच. जागतिक पातळीवर त्याचं मार्केटिंग प्लॅन करतानाही तो काहीसा दमला होता. तीन-चार दिवस प्रत्येकी ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड अशा आवडत्या ठिकाणी सुट्टी घेऊन मग काम सुरू करायचं त्याच्या डोक्यात होतं. अमेरिका मात्र त्यानं शेवटी ठेवली होती. तिथलं मार्केट खूपच मोठं होतं.

तीनच महिन्यांनी परत तो येऊन जेव्हा विमानतळावरून 'ज्युवेल ऑफ इंडिया'च्या कॉन्फरन्स रूममध्ये आपले तमाम वितरक, सेल्सवाले, पौर्णिमा यांच्यासमोर थेट हजर झाला तेव्हा लोकांना फारसं आश्चर्य वाटलं नाही. संपूर्ण विशेष कॉन्फरन्स पौर्णिमानं फार चांगली जमवून आणलेली दिसतच होती. तिनं आठवण करून दिली की त्याच्याच प्रेझेंटेशननं सुरुवात करायची ठरली होती. ''काय

काय टॉपिक्स कव्हर करणार सर तुम्ही?'' तिनं उत्सुकतेनं विचारलं. फडतरेनं ते मनाशी योजून ठेवलं होतंच.

''आधी अगदी थोडक्यात मी माइंड मॅनिप्युलेटर लोकांना समजावून सांगतो. दाखवतो. डेमो नको. आणि मग - मेनली त्याच्या इंडिया लाँचबद्दल.'' तसंच त्यानं केलं. मॅनिप्युलेटर कसं काम करू शकतो, हे दाखवून मग डायसवर जेव्हा तो बोलायला उभा राहिला, तेव्हा झालेला टाळ्यांचा कडकडाट अपेक्षितच होता. अनपेक्षित होतं ते फडतरेचं पुढचं बोलणं. ''जितकं तुम्ही आत्ता माझं कौतुक केलंत, तितकी माझी पात्रताच नाहीये खरं तर. आणि मी विनयानं वगैरे बोलत नाहीये. तशी गरजच नाही. एम्पथीच्या यशाचे तुम्ही सगळे भागीदार. आपल्या मार्केटिंग नेटवर्कच्या बॅकबोन - पौर्णिमा राव मॅडम. अमिड्स्ट ऑल ऑफ यू. आपण मोकळेपणे बोलू शकतो. मला तुमच्याबरोबर एक खूप मोठं सीक्रेट शेअर करू द्यात. त्यावर तुमचे ॲक्शन प्लॅन्स, सूचना ऐकू द्यात.''

त्यानं एक नजर श्रोतृवृंदावरून फिरवली. सगळे लक्षपूर्वक ऐकत होते. ''फर्स्ट थिंग्ज फर्स्ट. युरोप, यु.एस. आणि गल्फ - तीनही मार्केट्समध्ये आपण ज्याला फ्लॅगशिप प्रॉडक्ट म्हणतो, तो मॅनिप्युलेटर... त्याला एकही ऑर्डर मिळू शकलेली नाही. इट हॅज टर्न्ड टु बी अ व्हाईट एलेफंट फॉर अस.''

त्याला हे बोलून टाकल्यावर बरं वाटलं. आजवर याच लोकांनी त्याला साथ दिली होती, पुढेही देणार होते. त्यामुळे त्याला त्यांच्यापासून काहीही लपवून ठेवायचंच नव्हतं. त्यानं पौर्णिमाकडे पाहिलं. तीही काहीशी विचारमग्न होऊन ऐकत होती.

''वेल... लेट अस फेस इट. आधी माझ्या मनात काय होतं, ते मी तुम्हाला सांगतो. तुम्हाला माहितीच आहे, इंडिया इज ओपनिंग अप. थेट परकीय भांडवल, वर्ल्ड बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, बहुराष्ट्रीय कंपन्या, ऑईल कंपनीज... सगळ्यांचीच भारतातली गुंतवणूक या ना त्या प्रकारे वाढतेय. त्यांचे मोठमोठे प्रकल्प इथे उभे राहतायत. अनेक वेळा त्या प्रकल्पांच्या हिताचे, फायद्याचे अनेक निर्णय त्यांना मंजूर मात्र अद्याप तरी इथल्याच यंत्रणेकडून करून घ्यावे लागतात. या सवलती, निर्णय मंजूर करून घेणं हे इथल्याच लोकांकडून करून घ्यावं लागतं. यू नो... मिनिस्टर्स, ब्यूरॉक्रॅट्स. क्वचित वेळी फारच पेटलेल्या एखाद्या चळवळ-आंदोलनाला, एनजीओला वेसण घालणं, हे सगळं येतं. मग त्यात वेगवेगळ्या स्पेशल झोन्सची मंजुरी, किनारपट्टी कायदा मोडून म्हणजे ॲडजस्ट करून रिझॉर्ट्स, जंगलं तुळतुळीत करून रातांबी व्हॅलीसारखे बंगल्यांचे प्रोजेक्ट्स, कधी कधी स्थानिक लोकांना काहीसं धोकादायक ठरू शकणाऱ्या एखाद्या रसायनाची निर्मिती, जंगलांमध्ये खाणकाम, अशा अनेक गोष्टी, अनेक इश्यूज असू शकतात. अशा इश्यूजच्या वेळी जो कोणी निर्णय घेणार असेल तो आपल्या या कस्टमर्सच्या-मल्टिनॅशनल्स, नाणेनिधी वगैरेंच्या पूर्ण कह्यात राहावा. या लोकांनी न डगमगता हवं तिथे, हव्या तशा सह्या करून मोकळं व्हावं, याला माइंड मॅनिप्युलेटर फार कामाला येऊ शकतो. खरं तर तेच त्याचं मुख्य ॲप्लिकेशन आहे. या अँगलनं भारतात येऊ घातलेल्या, आलेल्या इन्व्हेस्टर मंडळींना मी तो प्रेझेंट केला. त्यांना हा प्रकार इंटरेस्टिंग वाटला. आवडला. पण ऑर्डर मात्र कुणीही दिली नाही.''

ऐकणाऱ्यांमध्ये एक आश्चर्ययुक्त कुजबुज झालेली त्याला जाणवली; पण कुणीच काही स्पष्ट बोललं नाही. फडतरेने पुन्हा सुरुवात केली, ''बऱ्याच सीईओजपासून वर्ल्ड बँकेच्या अध्यक्षांपर्यंत सगळ्यांचं असं मत पडलं, की भारतासाठी ही एक गैरलागू, अस्थानी आणि अनावश्यक गुंतवणूक होईल. आपण मॅनिप्युलेटरची प्राईस फक्त सहा लाख युरोज ठेवली होती, तरी त्यांना असं वाटलं. कारण एकच - अंदाज आपला चुकला होता. भारताबाबतचा या सगळ्याच जागतिक प्लेअर्सचा अनुभव वेगळा होता. जिथे जिथे म्हणून मोठ्या आस्थापना... सॉरी - इन्फ्रास्ट्रक्चरसाठी, त्यात येऊ घातलेल्या परकीय गुंतवणुकांना फायदेशीर असं रान मोकळं होण्यासाठी धोरणात्मक बदल, काही वेळा विशेष वटहुकूम काढण्यासाठीची सत्ता, अशा मोठ्या बदलांसाठी फार वरिष्ठ पातळीवरची सरकारी बाबू मंडळी, काही वेळा डिफेन्समधल्या डील्ससाठी टॉपचे ऑफिस बेअरर्स, मिनिस्ट्रीज यांच्याशी त्यांची खूप इंटरॲक्शन झालेली होती. आणि त्यात त्यांचा अनुभव असा, की एकदा त्या लोकांचे टक्के ठरून त्यांना पोचले, एकदा अशा डिसीजन मेकर्सचं त्यांना स्वतःला अपेक्षित कल्याण झालं, की आजवर एकदाही त्यांच्यातल्या कुणाचा कॉन्शन्सही जागा झाला नाही, ना त्यांनी कुणी त्याचा पुनर्विचार वगैरे केला, ना त्यांच्यातल्या कुणी काही अडथळा आणला. 'टर्म्स' एकदा ठरल्या, की त्यांची मनं यांच्याबरहुकूम चालतातच. त्याला मॅनिप्युलेटरची गरजच नाही, असं सगळ्यांचं मत पडलं. हे म्हणजे आपल्या क्रिकेटच्या भाषेत भारताला हरण्यासाठी वेगळे पैसे देणं झालं असतं.''

आपण फारच नकारात्मक सूर लावला, असं फडतरेला वाटून गेलं. ''वेल, ऑल इज नॉट लॉस्ट. फक्त आपण आपला फोकस थोडासा बदलतोय. आणि तिथे

मला आपल्या सगळ्या टीमची खूप मदत होणार आहे. डेव्हलपिंग नेशन्ससाठी, प्राईस काहीशी खाली आणून आपण आता मॅनिप्युलेटर विकू. सुरुवात अर्थातच भारतापासून करू या. आपल्या जनतेला मारक, पण विश्वाचं कल्याण करणारे असे अनेक निर्णय आपल्या घटनात्मक तरतुदींमुळे आजही भारतात राज्य पातळीवर, कधी कधी स्थानिक पातळीवर घ्यावे लागतात. यात मग वेगवेगळे स्पेशल झोन्स आखणं, बंदरं, विमानतळ यासाठी स्थानिकांना हुसकावणं, भर जंगलातले, अभयारण्यांमधले औद्योगिक प्रकल्प, खाणी मंजूर करणं, मेगा टाऊनशिप्स उठवणं, पेट्रोप्रॉजेक्ट्स अशा अनेक गोष्टी येतात. स्थानिक आणि राज्य पातळीवर संकुचित देशहिताचा विचार करणारी अनेक लोकं आजही आपल्याकडे आहेत. भारतीय कॉर्पोरेट उद्योगविश्वाला त्यांचा त्रासही भरपूर होतो आहे. काही साधं राहणीमानवाले आंदोलनं करणारे लोकनेते आणि स्थानिक, राज्य पातळीवरचे निर्णय घेणारे यांची मनं आवाक्यात आणण्यासाठी, भारतीय कॉर्पोरेट्सना हा मॅनिप्युलेटर आज फार गरजेचा आहे. आपापल्या टेरिटरीजमधले असे लोक तुम्हाला चांगले माहीत आहेत. सो... चीअर्स, फोक्स. मला फक्त आपापले हात उंचावून एकेकानं वार्षिक सेल्स तुम्ही किती करणार, त्याची फिगर सांगा. कमॉन, डू इट.'' पौर्णिमासकट एकही हात टेबलच्या वरच्या पातळीवर उठलेला त्याला दिसला नाही.

कुठल्याशा एम्पथीनं तिच्यासकट सगळ्यांनीच 'टार्गेट रिटार्डन्ट टॅबलेट' एकमेकालाही कळू न देता सकाळीच घेतली होती.

●●●





# बदल

गौतम पंगू

बिल्डिंगच्या मागे गाडी पार्क करून नितीन खाली उतरला. अजून एक लांबलचक दिवस संपला होता. जवळजवळ बारा तासांचं ऑफिसमधलं बैठं काम आणि त्यानंतर डाऊनटाऊनपासून शहराच्या एका कोपऱ्यात असलेल्या उपनगरातल्या त्याच्या अपार्टमेंटपर्यंतचा दीड तासाचा ड्राइव्ह... त्याचं अंग अगदी अवघडून गेलं होतं. उतरताना नेहमीच्या सवयीप्रमाणे गाडीतल्या केरकचऱ्यावर त्यानं एक नजर फिरवली. 'एकदा सवडीनं गाडी साफ केली पाहिजे' हा विचार मनात यायचा बंद होऊनसुद्धा आता बरेच दिवस झाले होते. कोणतीही घाई नसल्यासारखा संथपणे चालत तो बिल्डिंगच्या मुख्य दरवाजापाशी आला. 'पार्क प्लाझा अपार्टमेंट्स'... कधीकाळी ताज्या, चमकदार रंगामध्ये लिहिलेलं बिल्डिंगचं नाव आता पार विटून गेलं होतं.

'पार्क प्लाझा' म्हणण्यासारखं त्या इमारतीमध्ये काही शिल्लकही राहिलं नव्हतं. रंग उडालेल्या भिंती, आवाज करत उघडणारे दरवाजे, पूर्ण इमारतीत नेहमी येणारा कसलातरी कुबट वास, कितीही स्वच्छता ठेवली तरी सगळीकडं फिरणारे उंदीर आणि झुरळं... स्वतःचं काहीही खास वैशिष्ट्य नसलेली, अमेरिकेतल्या एका मोठ्या शहरातल्या एका कोपऱ्यातल्या उपनगरातली, एका कोपऱ्यातली बिल्डिंग... या महागड्या शहरात ज्यांना चांगल्या, मध्यवस्तीतल्या घरांमध्ये राहणं परवडत नाही त्यांना एक अतिशय स्वस्त आणि किमान सोयी असलेलं घर देणारी... मग

त्याला 'पार्क प्लाझा' म्हणा, नाहीतर अजून काही म्हणा, काय फरक पडतो? तथाकथित 'ब्लू कॉलर' लोकांनी भरलेली इमारत... इथे राहायचा म्हणजे नितीनही 'ब्लू कॉलर' होता का? की तो त्याची परिस्थिती 'लोअर मिडल क्लास' या थोड्या अधिक सन्माननीय नावाखाली लपवू शकत होता? तसा नितीन एका छोट्याशा कंपनीत 'सीनियर आय.टी. कन्सल्टंट' होता. सीनियर आय.टी. कन्सल्टंट... या वरवर झगझगीत वाटणाऱ्या हुद्द्याचा अर्थ एवढाच होता, की सध्या नितीनकडं एक नोकरी होती. मग ती एका डबघाईला आलेल्या कंपनीतली का असेना, कितीही तुटपुंज्या पगाराची का असेना, त्यात त्याचं आणि त्याच्या कुटुंबाचं अगदी जेमतेम का भागत असेना, ती नोकरी फक्त टिकवून ठेवण्यासाठी त्याला जिवाचा किती का आटापिटा करावा लागेना... त्याच्याकडं नोकरी होती. महिन्याच्या एक तारखेला त्याच्या अकाउंटमध्ये जो तुटपुंज्या रकमेचा चेक जमा व्हायचा, त्यावर त्याचं आणि त्याच्या कुटुंबाचं आयुष्य अवलंबून होतं, एवढंच त्या नोकरीमागचं आणि त्या हुद्द्यामागचं सत्य...

निव्वळ, 'तीनपेक्षा जास्त मजले असतील तर असला पाहिजे' या नियमाचा भंग होऊ नये म्हणून बिल्डिंगला असलेला 'एलेव्हेटर' आजही बंदच होता. नितीन जिने चढून वर जायला लागला. सहज हाताला चाळा म्हणून त्यानं खिशातला सेलफोन बाहेर काढला. वरून त्याच्याच मजल्यावरचा जाडा मेक्सिकन खाली येत होता. तो उगाचच हसून नितीनला म्हणाला,

"हे बडी! दॅट इज अ रियली ओल्ड फोन. यू शुड गेट ॲन आयफोन नाऊ!"

नितीन त्याच्याकडं बघून कसनुसं हसला. सहाच महिन्यांपूर्वी त्यानं 'कशाला उगाच खर्च' म्हणून घरातली बेसिक लँडलाइनही काढून टाकली होती. तो त्याच्या अपार्टमेंटच्या दारापाशी आला. कधीकाळी भारतातून हौसेनं आणलेल्या, जोडलेल्या हातांचं डिझाइन असलेल्या दारातल्या मॅटचे दोरे कधीचे निघाले होते. किल्लीनं दार उघडून तो आत आला. हॉलमधल्या जुन्या सोफ्यात डोळे मिटून बसला. किचनमध्ये नीलिमा काम करत होती. आत दोघांपैकी कुठलंतरी एक पोर रडत होतं. 'मी आलोय' असा आवाजही नितीननं दिला नाही. चष्मा बाजूला काढून ठेवून त्यानं दोन्ही तळहातांनी डोळे झाकून घेतले आणि तो तसाच शांत बसून राहिला. थकलेलं शरीर, ठणकणारं डोकं, कंटाळलेलं मन यांना जरा शांतता मिळाली. काही मिनिटं तो तसाच डोळे मिटून बसून राहिला. जवळ हालचाल जाणवली तसं त्यानं



ओळखलं, की नीलिमा चहा घेऊन आली असणार. त्यानं डोळे उघडून नीलिमाकडं पाहिलं. घामेजलेला चेहरा, विस्कटलेले केस, हातांना आणि कोपराला पीठ लागलेलं, अंगावर एक जुना, चुरगळलेला सलवार-कमीज... एकदम त्याला तिची दयाच आली. आपल्याशी लग्न करून अमेरिकेत आली; पण डिपेंडंट व्हिसावर असल्यामुळं नोकरी करता येत नाही, बिचारी! आजूबाजूच्या इंडियन लोकांना कुठं चपात्या करून दे, जेवणाचे डबे करून दे, असं करून थोडे पैसे कमावते. तेवढाच संसाराला आधार... दिवसभर गॅसपाशी लागलेली असते. त्यात अमेरिकेत आल्यापासून काय त्रास सुरू झाला देव जाणे, नेहमी सायनस, मायग्रेन, सर्दी, खोकला यांनी त्रासलेली असते. या शहराची हवाही इतकी घाणेरडी, तिचा त्रास दिवसेंदिवस वाढतच चाललाय.

नीलिमानं कप घेतलेला हात पुढं केला, तशी त्याची तंद्री तुटली आणि त्यानं कप हातात घेतला.

"थँक्स!" तो म्हणाला. नीलिमा शेजारच्या टी-पॉयवरच बसली.

"कसा होता आजचा दिवस?" तिनं विचारलं.

नेहमीची प्रश्नोत्तरं चालू झाली. नितीननं विचार केला.

"ठीक." एकाच शब्दात त्यानं उत्तर दिलं.

"मॅनेजर काय म्हणतो तुझा?"

"काही नवीन नाही, नेहमीचंच... मार्केट किती खराब आहे, कंपनीची अवस्था किती वाईट आहे..."

नीलिमा काही क्षण गप्प राहिली. आजकाल ती अधूनमधून नितीनला, "इतकं काम करतोस, तर पगार वाढवून का मागत नाहीस?" असं विचारायची. पगार वाढवून काय मागायचा? तीन महिन्यांपूर्वी नितीनच्या मॅनेजरनं कंपनीचं पूर्ण आयटी डिपार्टमेंटच बंद करायचं ठरवलं होतं. नितीनचं तर धाबंच दणाणलं होतं. एचवन व्हिसावर असताना नोकरी गेली, की संपलंच. एक तर दहा दिवसांत दुसरी नोकरी शोधा किंवा सगळा गाशा गुंडाळून भारतात कायमचं परत जा... कसंबसं मॅनेजरच्या हातापाया पडून त्यानं स्वत:ची नोकरी टिकवली होती. मॅनेजरनंही त्याची गरज हेरून त्याला एकट्यालाच नोकरीवर ठेवलं होतं. सध्या आहे तेवढ्या पगारात तो जवळजवळ सगळ्या डिपार्टमेंटचं काम एकटाच बघत होता... पगारवाढीची वगैरे तर काही शक्यताच नव्हती.

"नवीन जॉब ॲप्लिकेशन्स वगैरे?"

"नवीन काही नाही," मोठा सुस्कारा सोडून नितीन म्हणाला. ॲप्लिकेशन्स

करून फायदा कुठं होतो? सगळ्यांना एक तर अमेरिकन सिटीझन्स हवेत किंवा ग्रीनकार्ड होल्डर्स हवेत. एच वन व्हिसा म्हटल्यावर गाडं पुढं सरकतच नाही...

नीलिमा गप्प बसली. नितीन हळूहळू घोट घेत होता.

''आत कोण रडतंय ग?'' थोड्या वेळानं त्यानं विचारलं.

''अपूर्व रडतोय.''

''काय झालं?''

''काही नाही. उद्या अंजलीनं काही मुलं आणि त्यांच्या आया अशी 'प्ले डेट' अरेंज केली आहे. आधी चिल्ड्रेन्स म्युझियम, मग एक प्ले-प्लेस, असा भरगच्च प्रोग्रॅम आहे.''

पुढचा प्रश्न विचारणं निरर्थक होतं, तरीही नितीननं विचारलं, ''मग? काय ठरवलंयस तू?''

''नाही रे. बराच वायफळ खर्च होईल. पुन्हा तुलाच आम्हाला सोडावं आणि पिकअप करावं लागेल. शिवाय उद्या रात्री चावलांकडे पार्टी आहे.''

पुढचं काही नीलिमानं बोलायची गरजच नव्हती. चावलांकडच्या पार्टीच्या अर्ध्या स्वयंपाकाची ऑर्डर नीलिमाकडंच असायची. ती हातची गेली म्हणजे शंभर डॉलरवर पाणी. शिवाय प्ले-डेटचा खर्च वेगळाच. आजकाल मुलांचं सोशलायझेशन बंदच झालंय. या बिल्डिंगभोवती तर खेळायला मोकळी जागाही नाही. शिवाय या बिल्डिंगमधल्या मुलांमध्ये आपल्या मुलांना मिसळू द्यायचं म्हणजे नकोच वाटतं... 'ब्लू कॉलर!' ...मघाचा शब्द नितीनला आठवला. याआधी चौघं मिळून बाहेर कधी बरं गेलो होतो?

''अनन्या कुठं आहे?''

''झोपलीय आतमध्ये. अंग थोडं गरम लागतंय तिचं.''

''तुझी तब्येत कशी आहे?''

''माझं काय, नेहमीचंच. सकाळपासून डोकं ठणकतंय, नाक गच्च झालंय,'' नीलिमा एक सुस्कारा टाकून म्हणाली.

नितीन गप्प राहिला. 'पूर्ण विश्रांती घे' असं सांगणार तरी कसं? मग संध्याकाळच्या जेवणाच्या ऑर्डर्सचं काय? दोन-तीन दिवस डबे बंद केले तर ते लोक ऑर्डर्स देणंच बंद करायचे! मागे एका डॉक्टरला दाखवलं तर त्यानं 'पूर्ण ॲलर्जी स्क्रीनिंग केलं पाहिजे' म्हणून सांगितलं. त्याला तीन-चार महिने लागणार आणि प्रत्येक अपॉइंटमेंटची फी तीनचारशे डॉलर्स. इथली मेडिकल सिस्टिमही विचित्रच. नीलिमा



तेव्हा त्याच्या कंपनीच्या कुठल्यातरी फालतू इन्शुरन्स पॉलिसीवर होती. त्यांनी तर 'ही तुमची प्री-एक्झिस्टिंग कंडिशन आहे' म्हणून कोणताही खर्च कव्हर करायला चक्क नकार दिला होता. आता तर त्याच्या कंपनीनं आपल्या कर्मचाऱ्यांच्या परिवाराला इन्शुरन्स पुरवणंच बंद केलं होतं. बिचारी नीलिमा तसेच दिवस रेटत होती.

''अरे, अनन्या मागच्या समरमध्ये भरतनाट्यम् शिकायला जायची ना इथल्या टेंपलमध्ये, त्या बाईंचा फोन आला होता. तिला या वर्षीही पाठवून द्या, तिच्यामध्ये नॅचरल टॅलंट आहे म्हणत होत्या.''

नितीन गप्प बसून राहिला... होय-नाही काहीच न बोलता. काही क्षण थांबून नीलिमा रिकामा कप घेऊन आत निघून गेली. बस्स, दोघांमधलं कम्युनिकेशन आता एवढंच उरलं होतं... मोजकं, कामापुरतं, नजरेला नजर न देता बोलणं... नितीननं पुन्हा डोळे मिटून घेतले आणि तो सोफ्यात मागं रेलला. आता पुन्हा थोडा वेळ शांतता. मग कदाचित मुलं बाहेर येतील. त्यांचं आपल्याशी मोकळेपणानं हसणं, खेळणंसुद्धा कमीच झालंय आजकाल. मग संध्याकाळचे डबे घेऊन जायला लोक येतील, त्यानंतर जेवण-शक्यतो तेही आजकाल शांततेतच पार पडतं आणि मग झोपायचा प्रयत्न. उद्या सकाळपासून तेच चक्र पुन्हा सुरू...

आयुष्य केव्हा आणि कसं इथे येऊन पोचलं होतं? आर्थिक मंदीचा फटका म्हणावं, की त्याचं कौशल्य कमी पडलं म्हणावं? दोन-तीन बऱ्यापैकी नोकऱ्यांतून ले-ऑफ झाले. मिळेल ती मरतुकडी नोकरी पत्करावी लागली. आधीचं चांगलं अपार्टमेंट सोडून इथे राहायला यावं लागलं, यातच कधीतरी दोन मुलं झाली. नीलिमाची तब्येत बिघडतच गेली, आणि आता तर फक्त जगण्यासाठी धडपड करावी लागत होती, मूलभूत अस्तित्वासाठीच लढाई चालू होती. मदत तरी कोणाकडं मागणार? भारतात दोघांचेही मध्यमवर्गीय परिवार, वडील वारलेले, शिकणारी बहीणभावंडं... सगळं सोडून परत मायदेशात जाऊन नव्यानं पुन्हा सगळं सुरू करावं, तर तीही उमेद कुठंतरी खचत चालली होती... आयुष्य एका अंतहीन पोकळीत सापडल्यासारखं झालं होतं! मायदेश सोडून ज्या परक्या सधन देशात सगळे मुद्दाम नशीब काढायला म्हणून येतात, तिथे येऊन असं दारिद्र्यात अडकून राहणं फार भयंकर असतं... सेलफोन वाजतोय वाटतं... नितीननं डोळे उघडले. आजकाल स्वतःहून कोणाला फोन करणं किंवा मित्रांचे फोन उचलणं बंदच झालं होतं. फोनवर बोलायचं तरी काय? पण हा स्थानिक नंबर होता. एवढ्या संध्याकाळी कोणी रिक्रूटर फोन करणार नाही, हे माहीत असूनही उगाच खोट्या आशेनं त्यानं कॉल ॲक्सेप्ट केला.

"हॅलो, नितीन साठे का?" पलीकडच्या माणसानं मराठीतच बोलायला सुरुवात केली.

"अं... हो. आपण कोण?"

"सॉरी, आपल्याला त्रास देतोय. माझं नाव मुकुंद. मी इथल्या युनिव्हर्सिटीचा ग्रॅज्युएट स्टुडंट आहे."

"बरं, काय काम होतं?"

"काम तसं अर्जंट आहे. तुम्हाला 'द इंडियन बीट' हा रेडिओ शो तर माहीत आहेच."

"द इंडियन बीट? म्हणजे तुमच्या युनिव्हर्सिटीच्या रेडिओ स्टेशनवरून दर गुरुवारी रात्री सादर होतो, तो शो?"

त्या नावासरशी नितीनचं मन एकदम भूतकाळात गेलं. इंद्रपाल सिंग नावाचे भारतीय प्रोफेसर युनिव्हर्सिटीच्या रेडिओ स्टेशनवरून दर गुरुवारी रात्री हा शो करायचे. दोन वर्षांपूर्वी नितीनची आणि त्यांची कुठल्यातरी समारंभात भेट झाली होती आणि 'भारतीय चित्रपट संगीत' या विषयावर दोघांच्या गप्पा एकदम मस्त रंगल्या होत्या. नितीन जुन्या चित्रपट संगीताचा, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचा मोठा चाहता. संगीताचं शिक्षण काहीच नव्हतं, पण कान आणि जाण जबरदस्त होती. प्रोफेसरसाहेब त्याच्यावर एकदम खूष झाले होते आणि त्यांनी त्याला तो शो करायला बोलावलं होतं. कॉलेज रेडिओ असल्यामुळं सगळा स्वयंसेवकगिरीचा मामला. प्रोफेशनल कोणीच नव्हतं. पगार, मानधन वगैरेही प्रकार नव्हते. सगळे आपल्या हौसेखातर काम करणारे लोक. तरीही स्टेशन शहरात बरंच प्रसिद्ध होतं. प्रोफेसर सिंगनी बरीच वर्षं सातत्यानं काम करून 'द इंडियन बीट' नावारूपाला आणला होता. शहरातल्या सगळ्या एफएम स्टेशन्सवर सादर होणाऱ्या कार्यक्रमांपैकी पूर्णपणे भारतीय संगीत सादर करणारा तो एकमेव कार्यक्रम होता, आणि शहरातले भारतीयच काय, अमेरिकन लोकसुद्धा तो आवर्जून ऐकायचे. नितीनला तो अनुभव फारच आवडला होता. नंतर काही महिने त्यानं कधी एकट्यानं, तर कधी प्रोफेसर सिंग यांच्याबरोबर, असा बरेच वेळा तो शो केला होता. अगदी वेचून वेचून, वेगवेगळ्या थीम्स घेऊन तो शो बनवायचा. शो करायचाय म्हटलं की त्याची त्याला एक वेगळीच धुंदी चढायची. पण हळूहळू त्याचं वैयक्तिक आयुष्य विस्कटत गेलं, आणि ते सावरायची, किंबहुना ते अधिक विस्कटू नये याची खटपट करताना त्याचं हे रेडिओ शो करणं थांबूनच गेलं. प्रोफेसरसाहेबांशी तर तो वर्षभर बोलला पण नव्हता. आता तर त्याच्या मनातलं



गाणंच थांबलं होतं; आयुष्यातलं संगीतच संपल्यासारखं झालं होतं.

"हो, तोच शो. सध्या तो सिंगसरांबरोबर कधी कधी मी करत असतो," पलीकडचा माणूस- मुकुंद म्हणाला.

"बरं, मग?"

"आज त्या शोवर सिंग सरांनी डॉक्टर आत्मारामना बोलावलंय."

"डॉक्टर आत्माराम?"

"हो, म्हणजे जुने हिंदी संगीतकार आत्माराम. त्यांची मुलगी या शहरात राहते आणि ते भारतातून तिच्याकडे दोन-तीन महिने रहायला म्हणून आलेत. त्यांनी तीस वर्षांपूर्वी 'यानंतर संगीतकार म्हणून कधी श्रोत्यांसमोर येणार नाही' अशी प्रतिज्ञा केली होती म्हणे, पण सिंग सरांनी मोठ्या मुश्किलीनं त्यांना रेडिओवरच्या इंटरव्ह्यूसाठी तयार केलंय. सर स्वतःच इंटरव्ह्यू घेणार होते, पण नेमकी गेले दोन दिवस सरांची तब्येत फार बिघडली आहे. सरांना इंटरव्ह्यू कॅन्सलपण करायचा नाहीये, कारण ही जुन्या संगीताच्या चाहत्यांसाठी फार मोठी मेजवानी असेल, असं सर म्हणतात. मी इंटरव्ह्यू घ्यायला तयार आहे, पण मला आत्मारामांच्या संगीताबद्दल फारशी माहिती नाही. सर म्हणाले की, 'आत्माराम फार अभिमानी आणि सणकी माणूस आहे. त्यांना व्यवस्थित बोलतं केल्याशिवाय फारसं बोलणार पण नाहीत म्हणे.' सर म्हणाले की, 'मी माझं अज्ञान दाखवणारा एखादा प्रश्न विचारला तर आत्माराम कदाचित स्टेशनवरून ताडकन निघूनच जातील!' सरांच्या मते त्यांच्याशिवाय एकच माणूस आत्मारामांचा दोन तास व्यवस्थित इंटरव्ह्यू घेऊ शकतो आणि तो म्हणजे तुम्ही, नितीन! म्हणून मी तुम्हाला विनंती करतो, प्लीज तुम्ही आज रात्री रेडिओ स्टेशनवर येऊन 'द इंडियन बीट'साठी आत्मारामांचा इंटरव्ह्यू घेऊ शकाल?"

नितीन मुकुंदचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होता. आत्माराम आणि त्यांचा इंटरव्ह्यू! एकदम तो खुर्चीवरून ताडकन उठून उभा राहिला. त्याला अंगात नवा जोम संचारल्यासारखं वाटलं. मघाचा थकवा, शीण कुठल्या कुठे पळून गेला होता. आत्माराम - १९५० ते १९७० च्या दरम्यान मोजक्याच हिंदी चित्रपटांना पण अतिशय कर्णमधुर संगीत दिलेला अवलिया संगीतकार, व्यवसायानं डॉक्टर, पण उत्कृष्ट संगीतकार आणि शास्त्रीय गायकसुद्धा! त्यांचे कितीतरी किस्से नितीननं ऐकले होतं. कोणाच्याही दडपणाखाली न झुकता आपल्या मर्जीनुसार काम करणारा, 'आपण बरं आणि आपलं काम बरं' या खाक्यानं राहणारा आणि फिल्मी दुनियेच्या झगमगाटात अजिबात न रमणारा संगीतकार म्हणून त्यांची ख्याती होती. एकदा एका स्वतःचा इगो

कुरवाळत बसण्यात निष्णात असलेल्या तथाकथित सुपरस्टारनं 'माझ्यावर चित्रित झालेल्या गाण्यांना अमुक एक गायकाचाच आवाज पाहिजे,' असा आग्रह धरला होता, तर आत्मारामनी त्याला न जुमानता स्वतःला योग्य वाटलं त्या गायकाच्या आवाजात गाणी रेकॉर्ड करून गाजवून दाखवली होती. एका मोठ्या निर्मात्यानं त्यांना 'बी ग्रेडचा संगीतकार' म्हणून जाहीररीत्या हिणवलं होतं, तर त्याच्या पुढच्याच वर्षी त्याच्या प्रतिस्पर्धी निर्मात्याच्या चित्रपटाला आत्मारामनी असं तुफान संगीत दिलं होतं की सगळी अॅवॉर्ड्स् तर त्यांना मिळाली होतीच, पण त्या निर्मात्याला त्यांची जाहीर माफी मागावी लागली होती. नौशाद, शंकर-जयकिशन, एस.डी. बर्मन, ओ.पी. नय्यर यांच्यापेक्षा फक्त संख्येनं कमी, पण दर्जामध्ये तसूभरही कमी नाहीत, अशी आत्मारामांची गाणी! १९७० नंतर हिंदी संगीतातला गोंगाट वाढायला लागला आणि त्यांना मागणी असतानाही 'आता पुरे' म्हणून आत्मारामनी चित्रपटसृष्टीला एकाएकी रामराम ठोकला आणि पुन्हा डॉक्टरकी करायला लागले. त्यानंतर त्यांची काहीच खबर नव्हती.

ना त्यांनी 'गेले ते दिवस' असे उसासे टाकणाऱ्या मुलाखती दिल्या, ना पुनरागमनाचे केविलवाणे प्रयत्न केले!

"अं... नितीन, मग तुम्ही घेऊ शकाल ना इंटरव्ह्यू?" पलीकडून मुकुंद विचारत होता.

"हो, हो," नितीन घाईघाईनं म्हणाला, "आज रात्रीच ना?"

"हो. सॉरी, फारच शॉर्ट नोटीस आहे; पण वेळच तशी आली. तुमच्याकडे त्यांचं काही म्युझिक कलेक्शन आहे का? श्रोत्यांना त्यांची गाणी ऐकवत त्यांच्याशी बातचीत करायची, अशी सिंग सरांची कल्पना होती."

"हो, तुम्ही काही काळजी करू नका. माझ्याकडे आहे त्यांचं कलेक्शन. मला स्टेशनचीही सगळी व्यवस्थित माहिती आहे. मी लगेच तिकडे पोचतोच!"

मुकुंदनं पुन्हा पुन्हा आभार मानून फोन खाली ठेवला. नितीननं सेलफोनमध्ये किती वाजलेत ते पाहिलं. फारसा वेळ नव्हताच. तो टी.व्ही. टेबलपाशी गेला. खालच्या कप्प्यात एका कार्डबोर्ड बॉक्समध्ये त्यानं कधी काळी मेहनतीनं रेकॉर्ड केलेल्या सीडीज ठेवल्या होत्या. कित्येक महिन्यांत तो बॉक्स उघडलासुद्धा गेला नव्हता. त्यानं आतला सीडीजचा गठ्ठा बाहेर काढला. भराभर तो गठ्ठा चाळू लागला आणि काही क्षणांतच त्याला हवं होतं ते सापडलं - आत्मारामनी संगीत दिलेल्या गाण्यांच्या पाच सीडीज! कधी काळी सगळी गाणी मेहनतीनं स्वतः मिळवून त्यानंच



बनवलेल्या! प्रत्येक सीडीबरोबर गाण्यांची यादीपण होती. त्या यादीवरून नजर फिरवताना ती एकापेक्षा एक श्रवणीय गाणी त्याच्या कानात पुन्हा घुमायला लागली. गाण्यांचा सिक्वेन्स आणि इंटरव्ह्यूची रूपरेषा त्याच्या मनात पटापट पक्की होत गेली. हरवलेलं काहीतरी पुन्हा गवसल्यासारखं त्याला वाटायला लागलं. सीडीज बरोबर घेऊन तो उठला. किचनमध्ये फक्त तोंड घालून त्यानं नीलिमाला गडबडीत कल्पना दिली. मुलांना घाईनं 'बाय' केलं आणि मुकुंदचा फोन संपल्यापासून पंधरा मिनिटांच्या आत तो रेडिओ स्टेशनकडे जायला निघालासुद्धा!

अर्ध्या तासात तो युनिव्हर्सिटी कॅम्पसमध्ये असलेल्या रेडिओ स्टेशनवर पोचला. आत्माराम त्यांच्या मुलीबरोबर तिकडे आलेच होते. नितीननं त्यांना फक्त काही जुन्या फोटोंमध्ये बघितलं होतं. एक साधा हाफ-शर्ट आणि पँट घालून, तोंडात काहीतरी चघळत ते स्टेशनवर आले होते. पांढरे केस, चेहऱ्यावर बऱ्याच सुरकुत्या, पण डोळे मात्र एकदम भेदक! प्रोफेसर सिंगनी त्यांना आधी कल्पना दिली असावी, तरीपण नितीनला वाटलं की त्याला बघून त्यांची थोडी निराशाच झाली. हा तरुण काय दोन तास आपला इंटरव्ह्यू घेणार? असं काहीसं त्यांना वाटत असावं. "अच्छा, तो आप लेंगे मेरा इंटरव्ह्यू?" नितीननं स्वतःची ओळख करून दिल्यावर त्यांनी त्याला एवढंच विचारलं. तो त्यांना घेऊन 'ऑन एअर' रूममध्ये गेला. त्यांची मुलगी इंटरव्ह्यू होईपर्यंत स्टेशनमध्येच थांबणार होती. नितीनच्या आधीचा आर.जे. त्याचा शो संपवण्याच्या गडबडीत होता. नितीननं आत्मारामना चारपैकी एका माईकसमोर बसवलं. तो स्वतः आर.जे.च्या खुर्चीत बसला. एक मोठ्ठा श्वास घेऊन त्यानं खुर्चीवर स्वतःभोवतीच एक गिरकी घेतली. कित्येक दिवसांनंतर त्याला एकदम मोकळं-मोकळं वाटत होतं. आत्माराम त्याच्याकडे काहीशा विचित्र नजरेनं पहात होते. नितीन स्वतःशीच हसला.

नऊ वाजले आणि आधीच्या आर.जे.नं त्याच्या शोचा समारोप करायला लावलेलं गाणं नितीननं बंद केलं. पूर्वी करायचा तशा विशिष्ट शैलीत त्यानं श्रोत्यांचं स्वागत केलं. आत्मारामांची थोडक्यात ओळख करून दिली आणि 'त्यांच्याशी गप्पा मारण्याआधी आपण त्यांचं हे गाणं ऐकू' असं म्हणून एक बरंच जुनं आणि दुर्मीळ असं द्वंद्वगीत त्यानं लावलं. आत्मारामनी संगीत दिलेल्या पहिल्याच हिंदी चित्रपटातलं ते गीत होतं. सामान्य हिरो-हिरॉईन आणि सुमार कथा असलेल्या त्या चित्रपटातली फक्त गाणी तेवढी गाजली होती. त्या गाण्यांमुळंच चित्रपटसृष्टीचं लक्ष त्यांच्याकडं गेलं होतं.

आत्मारामनीच एका जुन्या मुलाखतीत कबूल केल्याप्रमाणं, हे त्यांचं स्वतःचं अतिशय लाडकं गीत होतं. आत्मारामांचा चेहरा एकदम खुलला. "वाह! क्या बात है!" ते स्वतःशीच उद्गारले आणि खुशीनं मान डोलवायला लागले. गाणं संपल्यावर त्याच्याच अनुषंगानं त्यांच्या चित्रपटसृष्टीतल्या पदार्पणाविषयी नितीननं विचारलं आणि आत्माराम एकदम मोकळेपणानं बोलायला लागले. त्यानंतर नितीन योग्य ती गाणी लावत गेला, आत्माराम भरभरून बोलत गेले आणि इंटरव्ह्यू उत्तरोत्तर रंगतच गेला. त्या काळचे एकेक अलौकिक गायक अन् गायिका, गीतकार, संगीतकार, त्यांच्यातली खेळीमेळीची स्पर्धा, निव्वळ गाण्यांवर सुपरहिट होणारे चित्रपट, आपल्या अचानक निवृत्तीमागची कारणं, आजच्या संगीताची स्थिती... नितीन एकदम मार्मिक प्रश्न विचारत गेला आणि आत्माराम बोलत गेले. सोबत त्यांची अफलातून गाणी होतीच. नितीननं मध्येच त्यांना त्यांची एक रागदारीतली चीज ऐकवायची विनंती केली आणि ती त्यांनी ऐकवली पण. दोन तासांत श्रोत्यांचे वीस-पंचवीस फोन येऊन गेले... इंटरव्ह्यू मस्त चाललाय, आम्ही खूप एंजॉय करतोय...

दोन तास कसे संपले कळलं पण नाही. नितीननं श्रोत्यांचा निरोप घेतला आणि दोघं 'ऑन एअर' रूमच्या बाहेर आले, तरी आत्माराम त्याच मूडमध्ये होते. त्यांची मुलगी नितीनला म्हणाली, "यू डिड अ ग्रेट जॉब! बाबांना मी आज कित्येक वर्षांनी त्यांच्या संगीताबद्दल इतकं भरभरून बोलताना ऐकलं! हू नोज, या उत्साहात ते कदाचित पुन्हा संगीत द्यायला सुरुवातसुद्धा करतील!"

निरोप घेताना आत्मारामनी नितीनला मिठी मारली आणि म्हणाले,"बेटा, तुमने तो हमे खुश कर दिया। तू इतका तरुण माणूस, तुला या जुन्या गाण्यांची एवढी तपशीलवार माहिती कशी?"

"सर, तुमच्या एकेका गाण्यानं एके काळी रात्र-रात्र जागवलंय मला. ही गाणी मी पूर्वी खूप ऐकायचो, त्यांच्याबद्दल मिळेल ती माहिती अधाशासारखी वाचायचो." स्वतःच्याच भूतकाळी क्रियापदांवर क्षणभर थबकत नितीननं उत्तर दिलं.

घरी परतताना नितीन एका वेगळ्याच धुंदीत होता. अर्ध्या वाटेत असताना त्याचा फोन वाजला. शहरातल्या 'इंडियन असोसिएशन'चे प्रेसिडेंट फोनवर होते. ते कधीपासून आत्मारामना विनंती करत होते, की शहरातल्या इंडियन लोकांसाठी एखाद्या संध्याकाळी तुमचा अनौपचारिक कार्यक्रम करू - थोड्याशा गप्पा, थोडीशी गाणी, पण आतापर्यंत त्यांच्या वाट्याला ठाम नकारच आला होता. पण आजच्या रेडिओवरच्या इंटरव्ह्यूनंतर आत्मारामनी स्वतः फोन करून त्यांना सांगितलं, की ते



असा कार्यक्रम करायला तयार आहेत. "ऑल क्रेडिट टू यू, नितीन. तू त्यांना इतकं खूष केलंस, की ते एकच काय, असे दहा कार्यक्रम करतील. ईट वुईल बी अ ट्रीट फॉर अवर इंडियन कम्युनिटी," प्रेसिडेंट नितीनला म्हणत होते.

बिल्डिंगच्या मागे कार पार्क केल्यावर नितीन झपाझप पावलं टाकत आत शिरला. एलेव्हेटर चालू झाला, की नाही, हे बघण्यासाठी न थांबताच एकेका उडीत दोन-दोन पायऱ्या चढत तो चार मजले चढून आला. शोमधलंच एक गाणं गुणगुणत त्यानं अपार्टमेंटचं दार उघडलं, किल्ली अंदाजानंच कुठं तरी भिरकावली, बूट पायातून हातानंच खस्सकन ओढून काढले आणि नीलिमाला हाक मारली,"ए नीलू, मी आलोय ग. जाम भूक लागलीये. तुमची जेवणं झाली का? नसतील झाली तर चल, सगळे मिळून मस्तपैकी एकत्र जेवण करू."

अपार्टमेंटमध्ये अंधार होता. नितीननं हॉलमधल्या लाईट्सचे स्विच दाबले, पण एकही लाइट लागला नाही. बेडरूममध्ये काहीतरी हालचाल झाली आणि नीलिमा हातात टॉर्च घेऊन झोपाळलेल्या चेहऱ्यानं बाहेर आली.

"काय झालं? लाइट्स का लागत नाहीत?" नितीननं विचारलं.

"अरे मी मायक्रोवेव्हमध्ये भात शिजवत होते, तर मध्येच फटकन फ्यूजच उडला. अंधारात बिल्डिंग मेंटेनन्सचा नंबरपण सापडेना. तसेही ते इतक्या रात्री आले असते. की नाही कोणास ठाऊक! घरात मेणबत्त्यापण नाहीत. नशिबानं हा जुना टॉर्च सापडला. या जुनाट बिल्डिंगचं वायरिंग पण तितकंच जुनाट..." टॉर्चच्या प्रकाशात नीलिमा किचनमधल्या छोट्याशा टेबलवर नितीनच्या जेवणाची मांडामांड करायला लागली. नितीननं काही क्षण वाट बघितली; पण तिनं रेडिओ शोबद्दल काहीच विचारलं नाही. नितीनच्या उत्साहावर एकदम पाणी फिरल्यासारखं झाली, पण मग तोच उसनं अवसान आणून म्हणाला,"अग, आजचा शो मस्त झाला. आत्माराम एकदम सही माणूस आहे.... काय छान गप्पा झाल्या आमच्या! कितीतरी लोकांचे फोन आले होते. तुला माहीत आहे, आत्माराम आपल्या इंडियन असोसिएशनसाठी एक कार्यक्रम पण करणार आहेत. प्रेसिडेंटनी मला खास 'थँक्स' म्हणण्यासाठी फोन केला होता..."

नीलिमा काही न बोलता त्याच्या जेवणाची मांडामांड करत होती. टॉर्चच्या प्रकाशात तिच्या चेहऱ्यावरचे भावपण दिसत नव्हते. नितीनच्या तोंडून नकळत प्रश्न निघून गेला,"तू ऐकलास की नाही शो?"

"नाही," तिनं एकाच शब्दात उत्तर दिलं.

नितीन एकदम गोंधळलाच. "अग, किचनमधल्या त्या छोट्या रेडिओवर ऐकता आला असता ना!"

काहीशा त्रासिक सुरात नीलिमा म्हणाली, "नाही जमलं ऐकायला नितीन. बराच स्वयंपाक व्हायचा होता. मुलांची किरकिर चालू होती. माझं डोकं दुखत होतं. त्यातच मध्ये लाइट्स पण गेले."

तिचा त्रासलेला सूर ऐकून नितीन एकदम गप्प झाला. अचानक संध्याकाळची डोकेदुखी, शीण, थकवा सगळं पुन्हा परत येतंय असं त्याला वाटायला लागलं.

थोड्या वेळानं तो पडलेल्या सुरात म्हणाला, "मुलं झोपली का?"

"हो," एक सुस्कारा टाकून नीलिमा म्हणाली, "बराच वेळ तुझी वाट बघत होती दोघं. शेवटी कंटाळून झोपली दोघं."

"माझी वाट? का?"

"मी सांगितलं ना त्यांना - प्ले डेट आणि डान्स क्लास कॅन्सल म्हणून. त्यांना वाटत होतं की तू परवानगी देशील. सारखा हट्ट चालू होता. मग मी रागावले आणि दोघं रडायला लागली. शेवटी रडून रडून झोपली."

अंधार होता, तरीही नितीननं डोळे घट्ट मिटून घेतले.

काही क्षण गेले आणि नीलिमा त्याच निर्विकार सुरात म्हणाली, "सगळं जेवण टेबलवर आहे. थंड आहे सगळं, कारण वीज नसल्यामुळे मायक्रोवेव्ह आणि गॅस दोन्ही बंद आहे. भातपण थोडा कमी शिजलाय, उद्या उठल्या उठल्या मेंटेनन्सला कॉल करावा लागेल."

जड पावलांनी नितीन खुर्चीवर येऊन बसला. उगाच काहीतरी करायचं म्हणून ग्लासमध्ये पाणी ओतून घेऊन ते प्यायला लागला.

नीलिमा म्हणाली, "तूच वाढून घेशील का प्लीज? माझं डोकं खूप दुखतंय. मी आत जाऊन झोपते. पुन्हा उद्या सकाळपासून चावलांच्या पार्टीचा स्वयंपाक करायचाय. बरोबर सहा वाजता त्यांना तयार हवीय त्यांची ऑर्डर."

नितीन काहीच बोलला नाही. काही क्षण थांबून नीलिमा आत निघून गेली आणि टॉर्चच्या केविलवाण्या प्रकाशात, टेबलावरच्या थंड जेवणासमोर नितीन एकटाच बसून राहिला.

●●●



सकाळ प्रकाशन

पुस्तके महाराष्ट्रातील सर्व विक्रेत्यांकडे व **सकाळ** पेपर्सच्या कार्यालयात उपलब्ध.
संपर्क-०२०-२४४०५६७८ / ८८८८८४९०५०
सकाळ पेपर्स प्रा. लि., ५९५, बुधवार पेठ, पुणे २



'स्मार्ट मूल' ; डॉ. सुनील गोडबोले
पृष्ठसंख्या १६० (पुठ्ठा बांधणी) ; ₹२७५



'मानसमंत्रणा' ; राजन खान
पृष्ठसंख्या १७० ; ₹१८५



'शब्दाशब्दांत' ; संदीप नूलकर :
पृष्ठसंख्या १६८ ; ₹१६०



'भारतीय निसर्ग-पर्यावरण पत्रकारिता - माध्यमे, सामाजिक संस्था व नागरिकांसाठी'
संतोष शिंत्रे ; पृष्ठसंख्या २१२ ; ₹४००
English language edition; ₹490


'आजच्या विश्वाचे आर्त'
दीपक करंजीकर
पृष्ठसंख्या १९० ; ₹२४०



'यशवंतराव चव्हाण - नवमहाराष्ट्राचे शिल्पकार'
पृष्ठसंख्या १४४ (पुठ्ठा बांधणी) ; ₹२५०



'मैत्री बँकिंगशी' ; वंदना धर्माधिकारी
पृष्ठसंख्या २२५ ; ₹२४०



'वैद्यकीय मदत कशी मिळवावी?'
क्षितीज पाटुकले ; पृष्ठसंख्या १३६ ; ₹१५०



'अखंड प्रेरणा गांधीविचारांची'
डॉ. रघुनाथ माशेलकर